अहवाल क्रमांक :१४८

# पंचायती राज समिती
# (२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# सहावा अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल दिनांक      डिसेंबर, २०१६ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, नागपूर २०१६

# पंचायती राज समिती

## (२०१५-२०१६)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या
सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन
अहवालातील परिच्छेदाबाबत

# सहावा अहवाल

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

---

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची ' कार्यकारी समिती प्रमुख ' म्हणून नामनियुक्ती केली आहे.

**सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. सभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'कार्यकारी समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सहावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ करिता समिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २५ मे, २०१५ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला " Mini Legislature " सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने नांदेड जिल्हा परिषदेस दिनांक १३, १४ व १५ सप्टेंबर, २०१५ रोजी भेट देऊन श्री. अभिमन्यु काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेस दिनांक १५, १६ व १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी भेट देऊन डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१५-२०१६ करिता गठीत झालेल्या समितीने नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी तसेच दिनांक २४ व २५ मे, व १ जून, २०१६ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. दिनेश कुमार जैन, अपर मुख्य सचिव, कृषि विभाग, श्री.विश्वनाथ गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.राजेशकुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,श्री.मुकेश खुल्लर, प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, श्रीमती.सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. एस.एस.संधू, प्रधान सचिव, सहकार विभाग, श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. राजेशकुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.व्ही. आर. नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, श्री.प्रभाकर देशमुख, सचिव, जलसंधारण विभाग, श्री. ओमप्रकाश बकोरिया, आयुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद म. न. पा. तसेच श्री.का.मा.विधाते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबईयांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त व शासनाचे विविध निर्णय व परिपत्रके परिशिष्टामध्ये दिले आहेत.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या नांदेड व औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१५-२०१६ करीता गठीत झालेल्या समितीने दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १३ डिसेंबर, २०१६.

**प्रकाश भारसाकळे,**
कार्यकारी समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | **जिल्हा परिषद, नांदेड** | | |
| (१) | एक | लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे, यामधील कपातीबाबत. (सन २०११-१२) | ३.५१/५८ | १ |
| (२) | दोन | लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता नियमबाह्य खर्चाबाबत. (सन २०११-१२) | ३.५२ | ६ |
| (३) | तीन | शाळांमध्ये स्वच्छतागृहे बांधकामासाठी प्रदान रक्कमांबाबत. (सन २०११-१२) | ३.१५९ | १० |
| (४) | चार | ड्युल डेस्क प्राप्त नसतांना देयकाचे प्रदान केले बाबत. (सन २०११-१२) | ३.१६० | २० |
| (५) | पाच | शालेय पाटी खरेदीतील अनियमिते बाबत. | ३.१६१ | ३२ |
| (६) | सहा | शालेय पोषण आहारातील जादा अदाई व अनियमितते बाबत. (सन २०११-१२) | ३.१६२ | ३८ |
| (७) | सात | पंचायत समिती हदगाव प्रशासकीय इमारत बांधकामातील अनियमितते बाबत. (सन २०११-१२) | ३.२९६ | ४४ |
| (८) | आठ | मंजुर अंदाजपत्रकातील बाबनिहाय कामे परिमाणानुसार व विनिर्देशानुसार भौतिक दृष्ट्या पूर्ण होवूनही बांधकामाचा लेखा बंद न करणे बाबत व अंशतः दर कमी करुन देयक अंतिम न करणेबाबत. (सन २०११-१२) | ३.२९७ | ४९ |
| (९) | नऊ | साईबाबा मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह, वाघाळा, सिडको तालुका नांदेडला प्रदान परिपोषण अनुदानातील प्रदान व इतर अनियमितता बाबत. (सन २०११-१२) | ३.६७५ | ५२ |
| (१०) | दहा | स्वंयसेवी संस्थाद्वारा चालविण्यात येणा-या अनुदानीत वस्तीगृहांच्या परिपोषण अनुदान प्रदानातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत. (सन २०११-१२) | ३.६७६ | ५८ |
| (११) | अकरा | मानव विकास योजनेअंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामावरील खर्चाबाबत. (सन २०११-१२) | ३.७४९ | ६२ |
| (१२) | बारा | जिल्हा परिषद मधील अपूर्ण स्थितीतील बांधकामे. (सन २०११-१२) | ३.८११(१८) | ६९ |
| (१३) | तेरा | थकित आगाऊ रकमा (थकित अग्रिम) (सन २०११-१२) | ३.८१४ | ७५ |
| (१४) | चौदा | सन २०१०-२०११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २०११-१२) | ३.८१५(१) | ८२ |
| (१५) | पंधरा | सन २०१०-२०११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २०११-१२) | ३.८१५(२) | ८७ |

**अनुक्रमणिका**—चालू



| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (१६) | सोळा | यशवंत ग्राम समृध्दी योजनामधून खर्च केलेल्या निधी बाबत (सन २०११-१२) | ४.४५ | ९० |
| (१७) | सतरा | पंचायत समित्यातील इतर नियमबाहय बाबी (सन २०११-१२) | ४.३९२ | ९२ |
| (१८) | अठरा | अपूर्ण स्थितीतील बांधकामे (सन २०११-१२) | ४.३९४ (५३-५७) | ९५ |
| (१९) | एकोणीस | विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी (सन २०११-१२) | ४.३९६ (२२-३२) | १०१ |
| (२०) | वीस | इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या पाटी खर्चातील अनियमितता बाबत. (सन २००८-०९) | ३.१३५ | ११० |
| (२१) | एकवीस | केंद्रीय प्राथमिक शाळांना प्रदान ४ टक्के सादील खर्चातील गंभीर अनियमितते बाबत. (सन २००८-०९) | ३.१३६ | ११५ |
| (२२) | बावीस | कोल्हापुरी बंधारा बांधकाम ढोसणी कामातील अनियमितता. (सन २००८-०९) | ३.४३३ | ११९ |
| (२३) | तेवीस | भारत निर्माण योजनेअंतर्गत पुरेसे अनुदान उपलब्ध नसतांना नियमबाह्य अनुदानापेक्षा अधिक रक्कमांचे प्रस्ताव मंजूर केल्या बाबत. (सन २००८-०९) | ३.५६५ | १२७ |
| (२४) | चोवीस | उन्हाळी पाणी पुरवठा नैसर्गीक आपत्ती-२२४५ या लेखा शिर्षाखाली टँकरवर इंधन व दुरुस्ती वरील खर्चा बाबत. (सन २००८-०९) | ३.५६८ | १३२ |
| (२५) | पंचवीस | विशेष घटक योजना अंतर्गत लाभार्थ्यांना साहित्य पुरवठा वरील खर्चाबाबत. (सन २००८-०९) | ३.७१७/३.७१८/ ३.७१९/३.७२०/ ३.७२१/३.७२२/ ३.७२३/३.७२४ | १३६ |
| (२६) | सव्वीस | महिला बचत गटांना आहार पुरवठा पोटी केलेले नियमबाह्य प्रदानाबाबत (सन २००८-०९) | ३.९५२ | १५१ |
| (२७) | सत्तावीस | गट विमा योजनेतील सदस्यांना बचतनिधी/विमानिधीतील अतिप्रदाना बाबत (सन २००८-०९) | ३.१०१८(४५०) | १५५ |
| | | **जिल्हा परिषद, औरंगाबाद** | | |
| (२८) | अठ्ठावीस | मागणी व पुरवठा फरक बाबत. (परिच्छेद ८७-अ) (सन २०११-१२) | ३.१४६/१०१ | १६१ |
| (२९) | एकोणतीस | पंचायत समिती पैठण प्रशासकीय इमारत बांधकामातील अनियमिततेबाबत (सन २०११-१२) | ३.२६७/१६३ | १६६ |
| (३०) | तीस | आरोग्य विभागाकडील मुळबांधकाम व दुरुस्ती मधील अनियमितते बाबत (सन२०११-१२) | ३.२६९/१६४ | १७२ |

**अनुक्रमणिका**—चालू


| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (३१) | एकतीस | मजूर सहकारी संख्या व ठेकेदार यांना एकाच वेळी ३ पेक्षा जास्त कामे देवून केलेल्या अनियमितते बाबत. (सन २०११-१२) | ३.३४६/२१२ | १७७ |
| (३२) | बत्तीस | केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योजने अंतगत क्विनॉलफॉस किटक नाशक वाटपाबाबत (५० अनुदानाबाबत.) (सन २०११-१२) | ३.५१७/२९८ | १८० |
| (३३) | तेहतीस | दिर्घकाळ विविध निधीची अखर्चित रक्कम पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या नुकसानी बाबत (सन २०११-१२) | ३.७८७/४३९ | १८६ |
| (३४) | चौतीस | जिल्हा परिषदेने लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न करणे. (सन २०११-१२) | ३.८१२/४३ | १९२ |
| (३५) | पस्तीस | १०० टक्के अनुदानावर समाजकल्याण विभागतर्फे लॅपटॉप पुरवठा करणे अनियमितता बाबत (पंचायत समिती गंगापुर) (सन २०११-१२) | ४.३३१/६०७ | १९८ |
| (३६) | छत्तीस | प्रा.आ. केंद्र लोणी खुर्द ता. वैजापूर इमारतीस संरक्षण भिंत बांधकाम बाबत (सन २००८-०९) | ३.२८१/१३० | २०३ |
| (३७) | सदतीस | प्र.रा.मा.८ खंडाळा बोधवड वसई प्रजिमा ४/३०० ते १०/०० रस्त्याच्या कामाबाबत (सन २००८-०९) | ३.२८४/१३१ | २०६ |
| (३८) | अडोतीस | पाझर तलाव दिग्रस-११ ता.सिल्लोड कामातील अनियमितते बाबत (सन २००८-०९) | ३.४०१/१० | २११ |


**परिशिष्ट**


शासनाचे आदेश व परिपत्रके आणि

समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, नांदेड

### लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे, यामधील कपातीबाबत

**परिच्छेद (३.५१/५८) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद नांदेड, सामान्य प्रशासन विभागाने लोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकामावर एकूण रुपये ३५,६८,३८८/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १७७ (४) अन्वये देयकावर ठेकेदार यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही तसेच नियम १६८ अन्वये कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केली नसल्याचे दिसून येते.

२. ग्राम पंचायत रहाटी बांधकामाचा आदेश गट विकास अधिकारी यांनी दिनांक २२ जून २०११ रोजी दिलेले असून कामाची सुरूवात दिनांक ४ जून २०११ रोजी आदेश देण्यापूर्वी केल्याचे दिसून येते.

३. सदरील कामाची नोंद ग्रामपंचायत मालमत्ता रजिस्टरवर घेणे आवश्यक आहे.

४. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९४ (क) नुसार २.२६% आयकर वसूल केलेला नाही. रुपये १,५८,८९०/- आयकर वसूल करणे आवश्यक आहे.

५. लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे सन २०१०-२०११ प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक ९२६, दिनांक १३/५/२०११ नुसार ग्रामपंचायत कासारखेडा - सी.सी. रोड व एका बाजूस नाली व ग्रामपंचायत निळा रस्ता व कामाच्या दोन्ही बाजूस नाली अशी मंजूर असतांना फक्त रस्त्याचे काम केलेले आहे.

६. लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे अंतर्गत पहिला हप्ता काम सुरू करण्यापूर्वी देण्याची तरतूद नसतांनाही ग्रामपंचायत कासारखेडा सी.सी.रोड कामासाठी रुपये २,५०,०००/- अदायी केलेली आहे. सदरील काम अपूर्ण आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकामावर रुपये ३५,६८,३८८ इतका खर्च झाल्याचे आक्षेपात नोंदविण्यात आलेले आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.

१. सदरील कामे ही ठेकेदारामार्फत केलेली नसून संबंधीत ग्रामपंचायती मार्फत करण्यात आली असल्यामुळे देयकावर ठेकेदाराची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. तसेच नियम १६८ अन्वये कार्यकारी अभियंता यांनी ५% कामाची तपासणी करणे अपेक्षित होते. सदर कामाची तपासणी कार्यकारी अभियंता यांनी केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. उपअभियंता यांनी कामाची तपासणी केली आहे.

२. ग्राम पंचायत रहाटी येथील कामाची सुरुवात ही दि. ४-०६-२०११ रोजी करण्यात आलेली नसून सदर कामाची सुरुवात ही दि.२४-६-२०११ रोजी करण्यात आली आहे. (सोबत पुर्णत्वाचे प्रमाणपत्र जोडण्यात आलेले आहे.)

३. सदरील कामाची नोंद ग्रामपंचायत मालमत्ता रजिस्टरवर दिनांक १८-०७-२०११ रोजी घेण्यात आलेली आहे. (सोबत ग्राम पंचायत न. न.२६ ची प्रत जोडण्यात आलेली आहे.)

४. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८ च्या वार्षिक अहवालातील परिच्छेद क्र.३.९.६.१ मध्ये आयकर कपात करु नये असे नमूद करण्यात आल्यामुळे आयकर कपात करण्यात आलेला नाही. (सोबत अहवालाची प्रत)

५. स्थानिक पातळीवर गावक-यांच्या मागणी नुसार जागेच्या अडचणीमुळे ग्राम पंचायत कासारखेडा यांनी दि. ०७-०५-२०११ रोजी ठराव घेऊन कामामध्ये बदल केला आहे. तसेच ग्राम पंचायत निळा यांनी पण जागेच्या अडचणीमुळे दि. २९-०५-२०११ रोजी ठराव घेवून कामामध्ये बदल केला आहे. त्यानुसार प्रत्यक्ष काम करुन घेण्यात आले आहे.(सोबत ग्राम पंचायतींचे ठराव जोडण्यात आलेले आहेत.)

६. मौजे कासारखेडा येथील सी.सी.रस्ता कामासाठी प्रथम अग्रिम रु.२,५०,०००/- देण्यात आला होता ही वस्तुस्थिती आहे. संबंधीत J.E., AA.O. व B.D.O. यांना नोटीस देण्यात आलेली आहे आणि आता सदर अग्रिमाचे समायोजन अंतिम देयकातून करण्यात आलेले आहे. (सोबत समायोजनाचा तपशील जोडण्यात आलेला आहे.)

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, ठेकेदाराने स्वाक्षरीत न केलेले देयक कोणत्या प्राधिकारात पारित केले, कार्यकारी अभियंत्यांनी नियमानुसार सदरहू कामाची ५ टक्के तपासणी का केली नाही, आदेशापूर्वीच काम कोणत्या प्राधिकारात सुरु केले, कामाच्या देयकातून आयकर रु.१,५८,८९०/- वसूल न करण्यास कोण जबाबदार आहे, रस्त्याच्या कडेला नाली बांधकामाचा समावेश असताना ते न करण्याचे कारण काय, कासारखेडा रस्त्याच्या कामासाठी रु.२,५०,०००/- इतका हप्ता काम सुरु होण्यापूर्वी कोणत्या प्राधिकारान्वये दिला व सदरहू काम केव्हा सुरु झाले, समितीच्या प्रश्नावर उत्तर देताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू कामे ठेकेदारामार्फत करण्यात आलेली नसून ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आलेली आहेत. त्यामुळे देयकावर ठेकेदाराची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम १७७ (४) अन्वये देयकावर ठेकेदाराची स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना, स्वाक्षरी न घेण्याचे कारण काय आहे, हे काम ३५ लाख रुपयांचे होते. त्यामुळे कायद्यातील तरतुदीनुसार ठेकेदाराची स्वाक्षरी घ्यावयास हवी होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे विदीत केले की, यामध्ये केवळ एकाच कामाचा समावेश नव्हता. ३५.६८ लाख रुपयांची कामे ही वेगवेगळी होती. एक-एक काम दोन ते सात लाख रुपयापर्यंतचे होते. शिवाय ही कामे ग्रामपंचायतीने केल्यामुळे ठेकेदाराची सही घेण्याची आवश्यकता नव्हती. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतीने जरी ही कामे केली असली तरी या कामांच्या संदर्भात करारनामा करण्याची गरज नव्हती काय, करारनामा करू नये अशी कायद्यात तरतूद आहे काय, त्यावर समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंत्यांनी ५ टक्के कामाची तपासणी केली नसताना सुध्दा गट विकास अधिका-यांनी देयक कसे अदा केले. या संदर्भात कार्यकारी अभियंता यांची जबाबदारी नेमकी काय होती. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस अवगत केले की, या संदर्भातील संपूर्ण जबाबदारी तत्कालीन कार्यकारी अभियंत्याची होती. त्यांनी ५ टक्के कामाची तपासणी केल्यानंतर देयक अदा करावयास हवे होते. परंतु ही प्रक्रिया या ठिकाणी पाळण्यात आलेली नाही हे कार्यकारी अभियंता यांनी मान्य केले. कार्यकारी अभियंत्यांनी ५ टक्के कामाची तपासणी केली नसताना सुध्दा देयक अदा करण्यात आले. त्यामुळे या विषयाच्या अनुषंगाने मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी काय कार्यवाही केली अशी विचारणा केली असता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्पष्ट केले की, या संदर्भातील कार्यवाही पंचायत समिती स्तरावरुन झालेली आहे.

समितीच्या प्रश्नावर समाधानकारक उत्तरे प्राप्त न झाल्यामुळे समितीने याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांसाठी लेखाशीर्ष-२५१५ मधून निधी मिळालेला आहे. नियमात तरतूद नसताना सुध्दा मौजे कासारखेडा येथील सी.सी.रस्त्याचे काम सुरु करण्यापूर्वीच २ लाख ५० हजार रुपयांचा अग्रीम देण्यात आला होता, हे खरे आहे. त्यामुळे तत्कालीन कनिष्ठ अभियंता, सहायक लेखा अधिकारी आणि गट विकास अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्यांनी खुलाशात नमूद केले की, संबंधित ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळेच त्यांना अग्रीम देण्यात आला. संबंधितांकडून आयकर वसूल करण्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्पष्ट केले की, आयकर कपात करण्यात येऊ नये, यासंदर्भात कॅगच्या अहवालात उल्लेख असल्यामुळे आयकराची कपात करण्यात आली नाही. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी असे अभिप्राय दिले की, कपातीच्या संदर्भात कलम १९४/सी बघितले असते तरी आपल्याला कल्पना आली असती. आयकर हा ठेकेदाराकडून वसूल केलाच पाहिजे. विरोधाभास असेल तर या मुद्दा संदर्भात ग्रामविकास विभागाकडून मार्गदर्शन मागविणे आवश्यक होते. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुन्हा समितीस स्पष्ट केले की, भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या सन २००८ च्या वार्षिक अहवालात आयकर कपात करु नये असे नमूद केल्यामुळे आयकर वसूल करण्यात आलेला नाही. कार्यकारी अभियंता यांनी ५ टक्के कामाची तपासणी करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तपासणी न केल्यामुळे कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. सदर काम ग्रामपंचायतीला दिले होते. यासंदर्भात ग्रामसेवकावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. यामध्ये ग्रामपंचायतीने चूक केली आहे. यामध्ये गट विकास अधिकारी सुध्दा जबाबदार आहेत. तत्कालीन गट विकास अधिकारी श्री. जाधव आता निवृत्त झाले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात समाधानकारक माहिती प्राप्त न झाल्यामुळे समितीने निदेश दिले की, या प्रकरणात जे अधिकारी/ कर्मचारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. समिती जिल्हा परिषदेला भेट देण्यासाठी येणार असल्यामुळे संबंधितांना नोटीस दिली आहे. समिती या ठिकाणी आली नसती तर संबंधितांना नोटीस दिली गेली नसती. कार्यकारी अभियंत्यांना अधिकार नसताना काम केले आहे. ५ टक्के कामाची तपासणी करणे अपेक्षित असताना तपासणी केली नाही तसेच त्यांना अग्रिम सुध्दा देण्यात आलेला आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंत्यांवर जबाबदारी निश्चित करुन दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच ग्रामसेवक, गटविकास अधिकारी आणि लेखापाल यांची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कारवाई करण्यात यावी आणि यासंदर्भातील संपूर्ण माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सदरहू परिच्छेदासमवेत अनेक परिच्छेदांमध्ये आयकर, कर, मुल्यवर्धित कर इ. मुद्दे असून या संदर्भात ग्रामपंचायतीकडून प्राप्तीकराची रक्कम वसूल करू नये याबाबत भारताचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांचे आदेश असल्याचे समितीस सांगण्यात आले असता सदरहू प्रकरणी ग्रामविकास विभागाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानुसार ग्रामपंचायतीकडून कराची १०० % वसुली करण्यात यावी, असे निर्देश समितीने दिल्यानुसार जिल्हा परिषदेने शासनाकडून मार्गदर्शन मागविले असून सदरचे मार्गदर्शन समितीला उपलब्ध का करून देण्यात आले नाही, या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

(२) सदरहू प्रकरणी ५ % कामाची तपासणी करण्याची जबाबादारी असलेल्या कार्यकारी अभियंत्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच ग्रामसेवक, गट विकास अधिकारी आणि लेखापाल यांच्यावर चौकशी करुन कारवाई करावी असे निर्देश समितीने दिले आहेत. सदरहू प्रकरणातील चौकशी अहवालात सर्व तत्कालीन सरपंच, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी (प), लेखाधिकारी, कनिष्ठ अभियंता, कार्यकारी अभियंता व गट विकास अधिकारी दोषी आढळल्याचे नमूद केले आहे. परंतु केवळ शाखा अभियंता, कनिष्ठ लेखापाल, ग्रामविकास अधिकारी यांची वेतन वाढ एक वर्षासाठी बंद करण्याची शास्ती करण्यात आली असून उर्वरित वरिष्ठ अधिकारी यांचेवर कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ? तसेच प्रकरणाचे स्वरुप पाहता जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही शासनास योग्य वाटते काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) महालेखाकार यांच्या सन २००८-०९ वर्षाच्या अहवालातील शिफारशीनुसार सदर कपाती ग्रामपंचायतीकडून करण्यात येऊ नये असे नमूद असल्याने सदर कपाती करण्यात याव्यात किंवा कसे याबाबत ग्राम विकास विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रधान सचिव यांना कळविले आहे.

(२) शाखा अभियंता, कनिष्ठ लेखापाल, ग्रामविकास अधिकारी हे जिल्हा परिषदेचे कर्मचारी असल्याने त्यांचेसंदर्भातील कारवाई करण्यात आली आहे मात्र कार्यकारी अभियंता व गट विकास अधिकारी यांचेविरूध्द कारवाई करण्याचे अधिकार प्रशासनिक विभागास आहेत, त्यामुळे विहित कार्यपध्दतीनुसार ग्राम पंचायत, कासारखेडा येथील कामाची ५ टक्के तपासणी कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ नुसार करणे आवश्यक असतानाही केली नसल्याने तत्कालीन कार्यकारी अभियंता बांधकाम श्री. एम.बी. बंगाळे व तत्कालीन गट विकास अधिकारी पंचायत समिती नांदेड श्री.के.बी. जाधव यांनी संबंधित कामास अग्रीम देण्याची तरतूद नसतानाही अग्रीम दिला असल्याने विहित कार्यपध्दतीनुसार त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेस्तव मा. विभागीय आयुक्त यांचेकडे दि.२३.२.२०१६ रोजी दोषारोप प्रपत्र १ ते ४ पाठविण्यात आले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) जिल्हा परिषदेमार्फत अनेक कामे ग्रामपंचायतींनी Agency म्हणून करण्यासाठी त्यांच्याकडे सूपूर्द केली जातात. ती कामे ग्रामपंचायतींमार्फत पूर्ण झाल्यानंतर त्याची देयके जिल्हा परिषदेकडे प्रदानासाठी दाखल केली जातात. त्या देयकातून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार वेगवेगळ्या वैधानिक कपाती जिल्हा परिषदांकडून केल्या जातात. सदर कपातीमध्ये प्रामुख्याने आयकर, कर, मुल्यवर्धित कर इ. चा समावेश आहे. महालेखापाल कार्यालयाने ग्रामपंचायतीच्या कामाच्या बिलामधून प्राप्तीकर व मुल्यवर्धित कर वसूल न करण्याबाबत अभिप्राय स्थानिक संस्था अहवालात नमूद केले आहेत. शासनाने आयकर आयुक्त (टीडीएस) व विक्रिकर आयुक्त (कायदा व नियम) यांच्याकडून आयकर व मुल्यवर्धित कर कपातीबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यानुसार आयकर

आयुक्त (टीडीएस) व विक्रिकर आयुक्त (कायदा व नियम) यांच्याकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. आयकर व मुल्यवर्धित कर कपातीबाबत शासनस्तरावर आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासनस्तरावरुन चौकशीची कार्यवाही करण्यात येईल.

**चौकशी अहवाल**

समितीच्या निदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन समितीस अहवाल सादर केला. सदर चौकशी अहवालाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणेः-

प्रशासकीय मान्यता आदेश ज्या कामासाठी दिलेला आहे त्यात बदल करुन काम करण्यात आलेला आहे. प्रशासकीय मान्यता आदेश ज्या कामासाठी आहे त्याच कामावर खर्च करणेबाबत प्रशासकीय मान्यता आदेशात नमूद आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यता आदेशाची अंमलबजावणी जशास तशी केली नाही.

१. प्रशासकीय मान्यता आदेशातील कामात बदल करण्याचा अधिकार नसताना ग्राम पंचायतीने चुकीचा ठराव घेतला व रस्ता व नालीचे काम मंजूर असताना फक्त रस्ताच घेतला.

२. अधिकार नसताना कामात बदल करुन घेतलेल्या ठरावाच्या आधारे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी (पं) यांनी अग्रीम मंजूर केले. विस्तार अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता आदेश न पाहता सी. सी. रस्त्यासाठी अग्रीम प्रस्तावित केले त्यावर लेखाधिका-याचा आक्षेप किंवा अभिप्राय नाही.

३. प्रशासकीय मान्यता आदेश न पाहता सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले तसे करताना प्रशासकीय मान्यता कोणत्या कामासाठी आहे हे न पाहता तांत्रिक मान्यता देण्यात आली त्यामुळे प्रत्यक्षात सी.सी. रस्त्याचे काम झाले असले तरी गुणवत्ता चांगली असली तरी अधिकार नसतांना कामात बदल करुन व अग्रीम देण्याची तरतूद नसतांना अग्रीम देण्यात आला असल्याने त्या काळातील सरपंच, ग्राम सेवक, विस्तार अधिकारी (पं), लेखाधिकारी, कनिष्ठ अभियंता, कार्यकारी अभियंता व गट विकास अधिकारी हे दोषी असल्याचे दिसून येते.

४. कार्यकारी अभियंता यांनी नियमानुसार ५ टक्के तपासणी केलेली नाही.

**चौकशी अहवालास अनुसरुन जिल्हा परिषद, नांदेड यांनी केलेली कार्यवाही :-**

सन २०११-१२ मध्ये ग्राम पंचायत कासारखेडा येथील लोकप्रतीनीधींनी सुचविलेल्या कामात प्रशासकीय मान्यतेनुसार काम करणे गरजेचे असताना प्रत्यक्षात तसे न केल्यामुळे श्री. के. बी. जाधव तत्कालिन गट विकास अधिकारी पंचायत समिती, नांदेड यांचेवर दोषारोप प्रपत्र १ ते ४ दि. १९.११.२०१५ नुसार बजावण्यात आले आहे. तसेच जी.एम. गौरे, लेखापाल, श्री.एस.एस. कावळे, शाखा अभियंता व श्री.एन.डी. कदम, विकास अधिकारी यांची एक वार्षिक वेतनवाढ या कार्यालयाचे आदेश दि.१९.११.२०१५ नुसार तात्पुरत्या स्वरुपात बंद केली आहे.

तत्कालीन गट विकास अधिकारी यांचे विरुद्ध विभागीय चौकशी सुरु करणेसाठी दोषारोप प्रपत्र बजावण्यात आले आहे व दोषी ग्रामसेवक, लेखाधिकारी, कनिष्ठ अभियंता यांची वेतनवाढ एका वर्षासाठी बंद अशी शास्ती करण्यात आली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान समितीने अशी विचारणा केली की, सदरहू परिच्छेदासमवेत अन्य अनेक परिच्छेदांमध्येही आयकर, कर, मुल्यवर्धीत कर इ. मुद्दे असून या संदर्भात ग्रामपंचायतीकडून प्राप्तीकराची रक्कम वसूल करू नये याबाबत भारताचे नियंत्रक व लेखा परीक्षक यांचे आदेश असल्याचे समितीस सांगण्यात आले व या प्रकरणी ग्रामविकास विभागाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानुसार ग्रामपंचायतीकडून कराची १०० टक्के वसुली करण्यात यावी, असे निर्देश समितीने दिले त्यानुसार जिल्हा परिषदेने शासनाकडून

मार्गदर्शन मागविले तथापि, ते मार्गदर्शन समितीला उपलब्ध का करून देण्यात आले नाही, या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता, ग्रामपंचायत एखादे काम स्वतः करणार असेल तर कर वसुली होत नाही, मात्र ते काम कंत्राटदारामार्फत करणार असेल तर कर भरावा लागेल. याबाबत आयकर विभागाचेही अभिप्राय घेतलेले आहेत. याबाबतचा शासन निर्णयाचा मसुदा तयार असून परिपूर्ण शासन निर्णय येत्या १५ दिवसात सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करण्यात येईल असे साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीसमोर स्पष्ट केले.

**अभिप्राय व शिफारशी**

नांदेड जिल्हा परिषदेने लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकामावर रुपये ३५,६८,३८८ एवढा खर्च केला ते काम करतांना त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १७७ (४) अन्वये देयकावर ठेकेदाराची स्वाक्षरी घेतलेली नव्हती तसेच त्यातील नियम, १६८ अन्वये कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केलेली नव्हती. लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे, काम सुरु होण्यापूर्वी पहिला हप्ता देण्याची तरतूद नसतानाही सी.सी.रोड कासारखेड ग्रामपंचायतीचे काम जणू अशाच पध्दतीने सुरु करण्यात आले होते. तथापि, सदर काम अद्याप अपूर्ण आहे. अशा प्रकारच्या अनियमितता समितीस साक्षीच्या वेळी आढळून आल्या होत्या.

साक्षी दरम्यान समितीस सादर झालेल्या चौकशी अहवालानुसार ग्रामपंचायत कासारखेड अंतर्गत सी.सी.रोड, नाली व ग्रामपंचायत नाला रस्ता या कामामध्ये दोषी तत्कालीन कार्यकारी अभियंता व गट विकास अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यास्तव माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये विभागीय आयुक्त स्तरावर दोषारोप प्रपत्र १ ते ४ पाठविण्यात आल्याचे समितीला पाठविलेल्या माहितीत नमूद आहे.

राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्राम पंचायतीचे स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालयाकडून लेखा परीक्षण केले जाते. तद्वतच भारतीय संविधानाच्या अनुछेद १५१(२) नुसार भारताचे नियंत्रक व महा लेखापरिक्षक पंचायती राज संस्थांचे लेखापरिक्षण करुन केलेल्या लेखा परिक्षणाचे निष्कर्ष संबंधित अहवालाद्वारे राज्यपालांना सादर करतात. त्यानुसार दिनांक ३१ मार्च, २००८ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.९.६.१ नुसार (परिशिष्ट १.१) वैधानिक वजावटी या परिच्छेदामध्ये कॅगने, ग्रामपंचायतीने केलेल्या कामाच्या देयकातून विविध कर वसुली करण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले असल्यामुळे आणि प्रस्तुत प्रकरणांतील कामे स्वतः ग्रामपंचायतीने केलेली नसल्यामुळे, त्यांच्या देयकांतून आयकर इत्यादि करांची वजावट केलेली नाही असा खुलासा जिल्हा परिषद स्तरावर केला गेला. तथापि, लेखापरिक्षणांच्या कॅग व स्थानिक निधी लेखा या दोन स्वतंत्र वैधानिक संस्थामधील मतभिन्नता आणि आयकर अधिनियमाच्या कलम १९४ क (परिशिष्ट १.२) मधील तरतुदी लक्षात घेता केवळ नांदेड जिल्हा परिषदच नव्हे तर संपूर्ण राज्यातील ग्रामपंचायतींच्या देयकातून करावयाच्या कर वजावटी संदर्भात स्पष्टता येण्याकरीता विभागाने असा कोणताही प्राप्तीकर, विक्रीकर (मुल्यवर्धित कर), विमा आकार, प्रतिभूती ठेव इ. वजावटींची वसुली करण्याची आवश्यकता नसल्याचे समितीस साक्षीच्या वेळी स्पष्ट केले आहे.

**सबब, याप्रकरणी वित्तीय अनियमितता झालेली असल्याने प्रस्तुत प्रकरणांतील दोषी कर्मचारी यांच्यावर जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांचे स्तरावर एक तात्पुरती वेतन वाढ रोखण्याची कारवाई करुन त्याबाबतची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्याबाबत समिती निर्देशित करीत असून प्रस्तुत प्रकरणातील तत्कालीन कार्यकारी अभियंता व गट विकास अधिकारी यांची सुरु करण्यात आलेली विभागीय चौकशी विहित कालमर्यादेत पूर्ण करुन केलेल्या कारवाईची माहिती विनाविलंब समितीला कळवावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

**तसेच, ग्रामपंचायतींकडून कार्यान्वित केलेल्या कामांच्याबाबतीत सदर देयकांमधून पंचायत समित्यांनी प्राप्तीकर, विक्रीकर (मुल्यवर्धित कर), विमा आकार, प्रतिभूती ठेव इ. वजावटी करण्याची आवश्यकता नसल्याबाबतचा स्वंयस्पष्ट शासन निर्णय ग्राम विकास विभागाने तयार करुन तो निर्गमित करावा व त्याची माहिती समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, नांदेड

### लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता नियमबाह्य खर्चाबाबत

**(परिच्छेद ३.५२) (सन २०११-२०१२)**

सामान्य प्रशासन विभागाने सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकामावर एकूण रक्कम रुपये ८,००,०००/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड. पी.ए./२०१०/प्रक्र१०१ /परा-८ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक ३१ मार्च २०११ अन्वये लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे याबाबत निधी मुक्त केलेला आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १००२/प्रक्र१२८/अर्थोपाय मंत्रालय, मुंबई, दिनांक ६ जून २००८ अन्वये सदरील निधी सन २०१०-२०११ व २०११-२०१२ मध्ये खर्च करणे आवश्यक होते. तथापि, पंचायत समिती मुखेडने प्रमाणक क्रमांक ५० दिनांक ०३.०९.२०१२ रुपये ४,००,०००/- व प्रमाणक क्रमांक ५ दिनांक ०३/०७/२०१२ रुपये ४,००,०००/- प्रमाणकाद्वारे सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम अनुक्रमे होनवडज व पाळासाठी सन २०१२-२०१३ मध्ये खर्च केलेला आहे. रक्कम वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१०-११ मध्ये लोकप्रतिनिधीनी सुचविलेली कामे या बाबत निधी दि.३१-३-२०११ रोजी प्राप्त झाला होता. सन २०११-१२ मध्ये सदर निधी पंचायत समिती स्तरावर देण्यात आला आहे. माहे मार्च २०१२ अखेर कामे पूर्ण होणे अपेक्षित होते तथापि, सदरील काम त्या वर्षात सुरु झाले नाही. लोकप्रतिनिधींच्या आग्रहामुळे सन २०१२-१३ मध्ये काम करण्यात आले आहे. निधी ज्या कामासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता त्याच कामासाठी वापरुन स्थानिक निधी विकास कामे अंतर्गतचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे.सन २०११-१२ मध्ये काम न करता सन २०१२-१३ मध्ये काम करुन खर्च केल्यामुळे अनियमितता झाली ही वस्तूस्थिती आहे. सदर अनियमितता करणा-या कर्मचा-याना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

तसेच लोकप्रतिनिधीनी सुचविलेल्या कामाचा निधी पुढील वित्तीय वर्ष सन २०१२-१३ मध्ये खर्च करण्याची कार्यात्तर मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करुन कार्योत्तर मान्यता घेण्याची कार्यवाही अनुसरण्यात येत असून सोबत कार्यवाहीचे पत्र जोडले आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक सं.१००२ दिनांक ६ जून, २००८ नुसार या कामावरील शिल्लक अनुदानातून होणारा खर्च सन २०११-१२ पर्यंत करणे अनिवार्य असताना तो सन २०१२-२०१३ मध्ये कोणत्या प्राधिकारान्वये केला, सन २०१२-२०१३ मध्ये खर्च करण्यास शासनाची मान्यता घेण्यात आली आहे काय, असल्यास केव्हा घेण्यात आली, याबाबत खुलासा करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं) यांनी सदर काम हे सन २०१०-२०११ मधील आहे. या कामास तांत्रिक मान्यता दि. ७/१२/२०११ रोजी मिळाली होती व कार्यालयीन आदेश दिनांक ३/७/२०१२ रोजी मिळाले होते. सदर काम माहे मार्च, २०१२ अखेर पूर्ण व्हावयास पाहिजे होते. परंतु हे काम सन २०१२-२०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये एकंदर दोन कामे आहेत. कामास विलंब का लागला याचा शोध घेतला असता. तथापि, झालेल्या विलंबाबाबत खुलासा करताना लोकप्रतिनिधींचा आग्रह व पैसे परत जाऊ नये यासाठी हे काम सन २०१२-२०१३ मध्ये करण्यात आले. सद्यस्थितीत सदर काम दि.३/८/२०१२ मध्ये पूर्ण झालेले आहे असे समितीसमोर विदित केले.

या कामास दि.७/१२/२०११ रोजी मान्यता मिळाली होती. तांत्रिक मान्यतेला विलंब का लागला, तांत्रिक मान्यता घेऊन वर्क ऑर्डर द्यायला तीन महिने लागले आहेत. कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी कालावधी निश्चित केलेला असतो. ४ लाख रुपयांच्या कामासाठी किती मुदत दिली जाते, तत्कालीन गट विकास अधिकारी कोण होते. या समितीच्या आक्षेपांवर खुलासा करताना काम करण्यास मुदत दिलेली नव्हती. सर्वसाधारणपणे अशा कामासाठी ६ महिन्याची मुदत असते. दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करावे असा उल्लेख आहे. परंतु तारीख नमूद केलेली नाही. सरपंच, ग्रामसेवक आणि गटविकास अधिकारी यांच्यामध्ये करार झाला होता. त्यावेळेस गट विकास अधिकारी श्री. जी. एल. रामोड हे होते. ज्या वर्षात काम मंजूर झाले त्या वर्षात किंवा पुढील वर्षाच्या माहे मार्च अखेरपर्यंत काम पूर्ण केले पाहिजे असे शासनाचे स्थायी आदेश होते असे समितीस सांगण्यात आले.

करारामध्ये कामाची मुदत नमूद करू नये असे परिपत्रक होते का, याबाबत खुलासा करताना समितीला कमाल ५ वर्षाची मुदत असते, जो निधी प्राप्त झालेला असतो तो त्या वर्षात खर्च झाला नाही तर पुढील वर्षात खर्च करता येतो असे सांगण्यात आले. तथापि, निविदा झाल्यानंतर कार्यआदेशामध्ये काम किती कालावधीत पूर्ण करावे याचा कालावधी नमूद केलेला असतो असे असताना या कामाबाबत कालावधी का नमूद केला नाही, या प्रश्नाचा खुलासा समितीस प्राप्त झाला नाही. तसेच दोन वर्षाच्या काळात काम पूर्ण झाले नाही, त्या नंतरच्या काळात पैसा खर्च केला. तो पैसा वितरित करण्याचे अधिकार नसताना गट विकास अधिकारी यांनी कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता असे करता येते का, परंतु या आक्षेपाचाही खुलासा समितीस प्राप्त नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणी चौकशी करुन दोषी आढळणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी व त्या संदर्भातील अहवाल समितीस सादर करावा असे निर्देश दिले असता सादर झालेल्या अहवालात संबंधित ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता व लेखाधिकारी आणि गटविकास अधिकारी दोषी आढळून आल्याचे नमूद करण्यात आले आहे. ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता, लेखाधिकारी यांची वेतनवाढ एक वर्षासाठी बंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे, परंतु तत्कालीन दोन्ही गट विकास अधिका-यांवर कारणे दाखवा नोटीसा व विभागीय चौकशीचे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून सदरहू चौकशीची सद्यस्थिती समितीस कळविलेली नाही, याची कारणे काय आहेत ? तसेच प्रकरणाचे स्वरुप पाहता जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही शासनास योग्य वाटते काय, याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

लोकप्रतिनिधीनी सुचविलेली कामे अंतर्गत ग्राम पंचायत होनवडज व पाळा येथील विहीत कालावधी संपल्यानंतर खर्च केलेला असल्याने संबधित जबाबदार कर्मचारी यांचेवर दि. १९.११.२०१५ रोजी एक वेतनवाढ एक वर्षासाठी थांबविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच संबंधित गटविकास अधिकारी श्री रामोड व श्री. टी. के. नवले तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी सुरू करणेसाठीचा प्रस्ताव विहित कार्यपध्दतीनुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे दि. २३.२.२०१६ रोजी पाठविण्यात आला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासनस्तरावरुन चौकशीची कार्यवाही करण्यात येईल.

**चौकशी अहवाल**

समितीच्या निदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन समितीस अहवाल सादर केला. सदर चौकशी अहवालाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणेः-

१. प्रत्यक्षात काम झाले आहे गुणवत्ता चांगली आहे.

२. सदरचे काम सन २०१०-११ चे असल्याने ते काम मार्च २०१२ पूर्वी पूर्ण होणे आवश्यक होते व मार्च २०१२ पर्यंत पूर्ण खर्च करणे आवश्यक होते परंतु कालावधी संपल्यानंतर म्हणजे दि. ०३.०७.२०१२ रोजी देयक अदा झाले आहे. शासनाच्या

आदेशाप्रमाणे सदरचे काम मार्च २०१२ पुर्वी होऊन खर्च होणे अपेक्षित असताना पुढील वर्षात म्हणजे २०१२-१३ मध्ये दि. ०३.०७.२०१२ रोजी देयक अदा झाले व काम दि. ०४.०५.२०१२ रोजी पूर्ण झाले आहे.

३. कालावधी संपल्यानंतर एकतर निधी शासनखाती जमा करणे आवश्यक होते किंवा शासनाची मान्यता घेऊन खर्च करणे आवश्यक होते त्यामुळे प्रशासकीय दृष्ट्या सदर ग्राम पंचायतचे ग्रामसेवक श्री. कोल्हे, कनिष्ठ अभियंता श्री. भोसले व लेखाधिकारी जे.डी. कांबळे व गट विकास अधिकारी श्री. रामोड यांनी शासनाच्या आदेशाचे पालन केले नाही. परवानगी नसताना व अधिकार नसताना कालावधी संपल्यानंतर खर्च केला आहे. हे अयोग्य होते त्यामुळे वरील सर्व दोषी आहेत असे निदर्शनास आले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी सदरहू प्रकरणी चौकशी करून दोषी आढळणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी व त्या संदर्भातील अहवाल समितीस सादर करावा असे निर्देश दिले असता जिल्हा परिषदेने समितीस सादर केलेल्या अहवालात संबंधित ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता व लेखाधिकारी आणि गटविकास अधिकारी दोषी आढळून आल्याचे नमूद आहे. ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता, लेखाधिकारी यांची वेतनवाढ एक वर्षासाठी बंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे. तत्कालीन दोन्ही दोषी गटविकास अधिका-यांवर कारणे दाखवा नोटीसा व विभागीय चौकशीचे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले तथापि, चौकशीची सद्यःस्थिती समितीस कळविलेली नाही, याची कारणे काय आहेत, तसेच, प्रकरणाच स्वरुप पाहता जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही शासनास योग्य वाटते काय, याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी समितीला संबंधित गटविकास अधिकारी श्री. रामोड व श्री. नवले यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे दिनांक २३.२.२०१६ रोजी पाठविलेला आहे. तर इतर कर्मचा-यांची एक वेतनवाढ रोखलेली आहे. तसेच विहित कालावधी संपल्यानंतर निधी खर्च केलेला असल्याने संबंधित जबाबदार कर्मचारी यांच्यावर एक वेतनवाढ एक वर्षासाठी थांबविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. असा खुलासा केला पुढे समितीसमोर साक्षीस येण्यापूर्वी अशा प्रकरणांचा आढावा घेण्याची पद्धत आपल्याकडे आहे काय, या समितीच्या प्रश्नाबाबत प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विभागाकडून अशा प्रकरणांचा आढावा समितीच्या सूचनेनुसार घेण्यात येत आहे असा समितीसमोर खुलासा केला.

## अभिप्राय व शिफारशी

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक १००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय मंत्रालय, मुंबई दिनांक ६ जून, २००८ (परिशिष्ट २.१) नुसार अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली राज्य शासनाकडून आखून देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणांमधील मुक्त केलेला निधी २०१०-११ व २०११-१२ मध्ये खर्च करण्याची अनुमती दिनांक ३१ मार्च, २०११ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आली असली तरी याच शासन निर्णयानुसार त्यानंतर अखर्चित राहिलेला निधी स्वायत संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील अशीही त्यात तरतूद आहे असे असतानाही नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समिती मुखेड यांनी सिमेंट कॉंक्रीट रस्त्यासाठी त्या आधीच्या २ वित्तीय वर्षामध्ये मंजूर झालेला निधी सन २०१२-१३ मध्ये खर्च केलेला आहे व लोकप्रतीनिधींच्या आग्रहामुळे व निधी परत जावू नये याकरिता त्या निधीतून सन २०१२-१३ मध्ये काम करण्यात आले या खुलाशाबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे.

प्रस्तुत प्रकरणातील चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार कालावधी संपल्यानंतर जिल्हा परिषदेने निधी शासन खाती जमा करणे किंवा शासन पूर्व मान्यतेने खर्च करणे आवश्यक होते. तथापि, त्यानुसार कार्यवाही न झाल्यामुळे प्रशासकीयदृष्ट्या संबंधित ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता, लेखाधिकारी यांची एक वेतनवाढ एका वर्षासाठी थांबविण्याची कारवाई जिल्हा परिषदेने केली आहे. त्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. तथापि संबंधित दोन्ही गट विकास अधिका-यांवर विभागीय चौकशीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने विभागीय आयुक्तांकडे पाठविला. **सदरच्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन दोषी आढळणा-या व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांचे म्हणणे विचारात घेऊन त्यानंतरच विहित कालावधीत चौकशी करुन संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करुन त्याबाबतचा कार्यवाही अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांकीत २६ सप्टेंबर, २००५ (परिशिष्ट २.२) अन्वये वित्त विभागाने विभागांतर्गत अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. राज्य शासनाने जिल्हा परिषदांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करताना येणा-या अडचणी लक्षात घेऊन सन २००८ च्या शासन निर्णयाद्वारे अखर्चित निधी लगतच्या पुढील वर्षात खर्च करण्याची अनुमती जरी दिलेली असली तरी बहुतांशवेळा आर्थिक वर्ष संपताना माहे मार्च अखेरीस निधी मुक्त केल्यामुळे जिल्हा परिषदांना निधी खर्च करण्यासाठी एकाच वर्षाचा कालावधी मिळतो असे समितीच्या निदर्शनास आले आहे. **सन २००८ च्या शासन निर्णयाचा हेतु निर्विवादपणे साध्य करावयाचा असल्यास शासनाने जिल्हा परिषदांना द्यावयाचा निधी एकतर वेळेवर मुक्त करुन द्यावा अन्यथा, आर्थिक वर्ष अखेरीस म्हणजेच माहे मार्च मध्ये मुक्त केलेल्या निधी किंवा विलंबाने मुक्त केलेल्या निधीकरिता निधी मुक्त केल्यापासून निश्चित कालावधीत तो खर्च करण्याचे सुस्पष्टपणे आदेश काढून त्या अन्वये बंधनकारक करावे तसेच जी कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत व मुदतीनंतर अशा कामांवर खर्च करावयाचा झाल्यास त्याबाबतच्या अधिकारांचे शासनाने विकेंद्रीकरण करुन असे अधिकार विभागीय पातळीवर देण्यासाठी व इतर बाबींसाठी शासनाने दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी (परिशिष्ट २.३) निर्गमित केलेला शासन निर्णय केवळ ३१ मार्च, २०१४ पर्यंत अखर्चित राहिलेल्या निधीकरीता असला तरी अशाप्रकारचा सर्वंकष सुधारित शासन निर्णय निर्गमित करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठवावी अशीही समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, नांदेड

### शाळांमध्ये स्वच्छतागृहे बांधकामासाठी प्रदान रक्कमांबाबत

**(परिच्छेद ३.१५९) (सन २०११-२०१२)**

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नांदेडने सन २०११-२०१२ मध्ये शाळांमध्ये स्वच्छतागृहे बांधकामासाठी किनवट वगळता पंधरा तालुक्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे आदेश क्रमांक जिपनां/शिअप्रा/सशिअ/बांध/२०११/२०१२/४२६ दिनांक ३१ मार्च २०१२ अन्वये रुपये १,४४,००,०००/- निधी वितरीत केला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४४/ वित्त-९ दिनांक १५ जुलै २००८ नुसार सदरील योजना राबविण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याची मान्यता घेतली नाही व टिप-१ नुसार कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

२. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक ६३१/२००४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार सर्व शाळांमध्ये दिनांक ३१ मार्च २०१२ पर्यंत स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

३. सदरील कामे पूर्ण झाल्याबाबतची प्रमाणपत्रे व उपयोगिता प्रमाणपत्रे वारंवार मागणी करूनही लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक एसडी-१०८९/१५१५/सीआर /५७११/२९ दिनांक १३ फेब्रुवारी, १९९० प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शासनाचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन शुध्दीपत्रक दिनांक २८ फेब्रुवारी २०१२ नुसार ग्रामिण पाणी पुरवठा कार्यक्रम योजना नुतनीकरण निधी या अंतर्गत घ्यावयाच्या कामाबाबत सुधारीत मार्गदर्शक सूचना आहे. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये पाणी पुरवठा व शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता कामे घेता येईल असे नमूद केले आहे.

मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र दिनांक १७/०२/२०१२ नुसार सर्व शाळामधून आवश्यक स्वच्छतागृहे व पिण्याचे पाण्याची सुविधा कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ मार्च २०१२ पर्यंत उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश होते.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ व ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४४४/वित्त९, दिनांक १५ जुलै, २००८ नुसार स्थायी सभेच्या अवलोकनार्थ ठेवणे आवश्यक होते. पण सदर आदेश निर्गमित केल्यानंतर स्थायी सभेला माहिती दिलेली दिसून येत नाही ही वस्तुस्थिती आहे. वरील तरतुदीनुसार योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषद च्या आगामी स्थायी सभेच्या अवलोकनार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**तक्ता**

| अ. क्र (१) | तालुका (२) | मंजूर संख्या (३) | पुर्ण न संख्या (४) | सुरु न झालेली कामे (५) | मंजूर रक्कम (६) | खर्चित रक्कम (७) | अखर्चित रक्कम (८) | सुरु न झालेली कामाची नावे (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | १७ | १३ | ४ | १५३०००० | ११७०००० | ३६०००० | जुना कोठा, आसदवन, मरळक बु., बोरगाव ते. |
| २ | अर्धापुर | २ | २ | ० | १८०००० | १८०००० | ० | |
| ३ | मुदखेड | ३ | ३ | ० | २७०००० | २७०००० | ० | |
| ४ | कंधार | १३ | १० | ३ | ११७०००० | ८६८५०० | ३०१५०० | हरवळ, कन्या कोठा, शिरुर जुने |
| ५ | लोहा | ५ | ५ | ० | ४५०००० | ४५०००० | - | |

**तक्ता—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | मुखेड | ५० | ५० | ० | ४५०००००० | ४२३००००० | २७०००० | |
| ७ | देगलुर | ७ | ० | ७ | ६३०००० | ० | ६३०००० | मोतीराम तांडा, झरी, मुजळगा पु., देगाव, अंतापूर, दावनगिरी, देगलुर |
| ८ | बिलोली | ३ | २ | १ | २७०००० | १३५००० | १३५००० | सावळी |
| ९ | नायगांव | १५ | १४ | १ | १३५०००० | १२६०००० | ९०००० | पाटोदा |
| १० | धर्माबाद | १० | १० | ० | ९००००० | ९००००० | - | |
| ११ | भोकर | ५ | ५ | ० | ४५०००० | ४५०००० | - | |
| १२ | उमरी | ६ | ६ | ० | ५४०००० | ५४०००० | - | |
| १३ | हदगांव | ९ | ९ | ० | ८१०००० | ८१०००० | - | |
| १४ | हिमायतनगर | ३ | ३ | ० | २७०००० | २७०००० | - | |
| १५ | किनवट | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १६ | माहुर | १२ | १२ | ० | १०८०००० | १०८०००० | ० | - |
| | एकुण | १६० | १४४ | १६ | १४४००००० | १२६१३५०० | १७८६५०० | |

सद्यःस्थितीत जिल्हा परिषदेच्या २२४३ शाळांमध्ये मुले व मुलींकरीता स्वतंत्र २२४३ स्वच्छतागृहे उपलब्ध असून उपयोगात आहेत.

२. सर्व शाळांमध्ये दि.३१.०३.२०१२ पर्यंत स्वच्छतागृहे व पिण्याचे पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सदरचा निधी दि. ३१.०३.२०१२ रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात आला. लेखा परिक्षणानंतर १६० पैकी १४४ बांधकामे पूर्ण करण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन उपयोगात आहेत. मंजुर कामापैकी १६ शाळांमध्ये मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध असल्यामुळे बांधकामे करण्यात आली नाही. सदरचा निधी पंचायत समिती स्तरावर शिल्लक आहे. अखर्चित रक्कम परत करण्यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड, देगलुर, बिलोली, नायगांव, कंधार व मुखेड यांना पत्र क्र.१०१६५, दि.१८.०८.२०१५ अन्वये देण्यात आले आहे.

सदरील कामे पुर्ण झाल्याबाबातचे प्रमाणपत्र, शौचालयाचे फोटो व शौचालय वापरात असल्याबाबतचे संबंधित मुख्याध्यापकाचे पत्र कार्यालयात उपलब्ध असून लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात येतील.

३. सदरील कामे पुर्ण झाल्याबाबतची प्रमाणपत्रे व उपयोगीता प्रमाणत्रे (Utilization Certificate), शौचालयाचे फोटो तसेच शौचालय वापरात असल्याबाबतचे संबंधित मुख्याध्यापकाचे पत्र अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, शाळांमध्ये स्वच्छतागृह बांधणे योजनेस सक्षम प्राधिका-याची मंजुरी नसताना ती कोणत्या प्राधिकारात राबविली, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत सर्व शाळांमध्ये स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात काय अडचण आली, स्वच्छतागृह बांधकामाचे उपयोगिता प्रमाणपत्र व पूर्णत्व प्रमाणपत्र लेखापरीक्षणास का उपलब्ध करून दिली नाहीत. त्यास कोण जबाबदार आहे, संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली, प्रस्तुत प्रकरणी देयक अदा करण्यात आले, परंतु उपयोगिता प्रमाणपत्र का घेतले नाही, हे काम कोणाच्या माध्यमातून झाले. यावर शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी समितीस शाळांमध्ये स्वच्छतागृह

बांधकामाचे माननीय विभागीय आयुक्त यांच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या पत्रानुसार शाळांमधून स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची सुविधा दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध करुन देण्याबाबतचे निर्देश होते. त्या अनुषंगाने या तरतुदीसाठी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु मान्यता घेतली गेली नाही ही वस्तुस्थिती आहे. सदरचा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला. सद्यःस्थितीत सर्व शाळांमध्ये मुलांसाठी व मुलींसाठी स्वच्छतागृह उपलब्ध आहेत.

हे काम शाळा समितीच्या माध्यमातून झाले. सद्यःस्थितीत शौचालये पूर्ण झाल्याचे फोटो, पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व वापरात असल्याचे मुख्याध्यापकांचे पत्र उपलब्ध असल्याचा खुलासा केला. समिती नांदेड दौ-यावर आली असता उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झाले की समिती येण्यापूर्वी उपलब्ध झाले याबाबत खुलासा करताना शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी उपयोगिता प्रमाणपत्र आता उपलब्ध करून घेण्यात आले असल्याची तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २०११-१२ मध्ये उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून पेमेंट देणे आवश्यक होते ते केलेले नाही ही वस्तुस्थिती मान्य केली. इतर ठिकाणी रक्कम कमी खर्च झाली, याबाबत खुलासा करताना शिक्षणाधिकारी यांनी दिनांक ३१ मार्च, २०१२ ला निधी वर्ग करण्यात आला, त्यानंतर बांधकाम झाले. अखर्चित रक्कम पंचायत समिती स्तरावर अद्याप अखर्चित असून जिल्हा परिषदेने सर्व पंचायत समित्यांना रक्कम वर्ग करण्यात यावी असे पत्र दिले आहे.

सर्व पंचायत समित्यांकडील रक्कमा जमा करून त्या शासनास समर्पित करण्यात याव्यात तसेच शौचालयाची गरज नसताना गरज आहे असा अहवाल केल्यामुळे अंदाजपत्रक तयार केले आणि तो निधी अखर्चित राहिला. याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी असे निदेश समितीने दिले.

प्रस्तुत प्रकरणातील तत्कालीन शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांच्यासह सन २००८-०९ व सन २०११-१२ व सन २०१२-१३ या वर्षातील संबंधित अधिकारी पंचायती राज समितीच्या बैठकीस उपस्थित राहिले नसल्याबद्दल समितीने सखेद आश्चर्य व्यक्त करुन ज्या तत्कालीन अधिका-यांना कळविण्यात येऊनही ते बैठकीस उपस्थित राहिले नाहीत. त्यांच्या नावाची यादी समितीला देण्यात यावी. असे निदेश समितीने भेटीच्या वेळी दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत शालेय शिक्षण विभागाकडून माहिती मागविली.**

१) पंचायती राज समिती साक्ष घेत असताना अहवाल वर्षात कार्यरत असणा-या अधिका-यांना साक्षीकरीता उपस्थित राहण्याबाबत शासनाचे परिपत्रक क्रमांक पंरास २००७/प्र.क्र.८९/पंरा-५ दिनांकित १० सप्टेंबर, २००७ असूनही गैरहजर राहणा-या अधिका-यांची एक वेतनवाढ रोखण्यात यावी व त्याबाबत त्यांच्या गोपनीय अहवाल व सेवा पुस्तकात नोंद घेण्यात यावी असे निदेश समितीने दिले असून सदर प्रकरणी समितीस सादर केलेल्या अहवालात अनुपस्थित राहीलेल्या २१ विभागप्रमुख व ११ गट विकास अधिका-यांचा खुलासा मागविण्यात आल्याचे व त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठीचा प्रस्ताव दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी संबंधित विभागाकडे पाठविण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. समितीच्या निदेशानुसार संबंधितांची वेतनवाढ रोखणे/गोपनिय अहवालात व सेवापुस्तकात त्याबाबत नोंद घेण्याबाबतच्या कार्यवाहीचा अधिकारीनिहाय सद्यस्थिती काय आहे ?

२) सदर प्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

३) सदरहू प्रकरणी उपयोगीता प्रमाणपत्र घेतल्याशिवाय देयक अदा करणा-या शिक्षण अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत समितीने निदेश दिले असून सदर प्रकरणी समितीस सादर झालेला अहवाल अत्यंत अस्पष्ट असून त्यात कोणती कारवाई करण्यात आली हे स्पष्टपणे नमुद करण्यात आले नाही. शासनाने याबाबत भूमिका स्पष्ट करावी ?

४) प्रस्तुत प्रकरणातील १५ तालुक्यांच्या गट शिक्षणाधिकारी यांना लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियमातील नियम ७ नुसार रुपये २५०००/- दंडाची वसुली त्यांचे देयकातून वसूल करण्यात येऊन संबंधित १४ शाळांच्या मुख्याध्यापकांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आलेली आहे. परंतु तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री.ए.वा.मडावी यांचे विरुध्द निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे दोन वेळा सादर करण्यात येऊनही त्यावर शासनाने अद्यापही कारवाई केली नसल्याचे दिसून येते, कारवाई करण्यात होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ? शासनाने भूमिका स्पष्ट करावी ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीने सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ चे लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल तसेन सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात जिल्हा परिषद नांदेड यांने दिनांक १३,१४,१५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्याचे ठरविले होते तसेच मा. उपसचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ३६४२४ दि.१७/८/२०१५ अन्वये अहवाल वर्षातील तत्कालीन संबंधीत असलेल्या सर्व अधिका-यांना बैठकीला उपस्थित राहण्याबाबत कळविले होते त्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. ३०३१ व ३०३२ दि. ४.९.२०१५ अन्वये ६२ विभाग प्रमुख व ८२ गट विकास अधिकारी यांनी सदर कालावधीत उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. पैकी ३ तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व १८ विभाग प्रमुख व ११ गट विकास अधिकारी अनुपस्थित होते. सदर अनुपस्थित अधिका-यांना या कार्यालयाची कारणे दाखवा नोटिस क्र. ४३३६/१ दिनांक २१.१२.२०१५ अन्वये खुलासा मागविण्यात आला होता संबंधीताने विहित मुदतीत खुलासा सादर न केल्यामुळे पत्र क्र. ४४०९ दि. २८/१२/२०१५ अन्वये सर्व संबंधीत अधिका-यांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करणेबाबत संबंधीत मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आले आहे.

२१ विभाग प्रमुख व ११ गट विकास अधिकारी खालीलप्रमाणे आहेत.

**तक्ता**

| क्रमांक<br>(१) | नाव<br>(२) | तत्कालीन पद<br>(३) | सद्यस्थिती<br>(४) |
|---|---|---|---|
| १) | श्री. श्रावण हर्डीकर | मुख्य कार्यकारी अधिकारी | संबंधित विभागाकडून शास्तीचे आदेश प्राप्त झालेले नाहीत. आदेश प्राप्त होताच कार्यवाही करण्यात येईल. |
| २) | श्री. दिपेंद्रसिंह कुशवाह | मुख्य कार्यकारी अधिकारी | |
| ३) | श्री. सुमंत एन.भांगे | मुख्य कार्यकारी अधिकारी | |
| ४) | श्री. पी.एम.लोहारे | कार्य.अभि.बांधकाम द. | |
| ५) | श्री.ए.जी. करपे(प्र) | कार्य.अभि.बांधकाम द. | |
| ६) | श्री.एम.बी.बंगाळे, सेवानिवृत्त | कार्य.अभि.बांधकाम उ. | |
| ७) | श्री. शेख हैदर प्र. सेवानिवृत्त | कार्य.अभि.बांधकाम उ. | |
| ८) | श्री. सी.आर.पेरगुलवार | जिल्हा आरोग्य अधिकारी | |
| ९) | श्री.एन.ए.खान | शिक्षणाधिकारी प्राथमिक | |
| १०) | श्री. ए.वा.मडावी | शिक्षणाधिकारी प्राथमिक | |
| ११) | श्री.आर.के. पवार | शिक्षणाधिकारी माध्यमिक | |
| १२ | श्री.एम.एन.शहा | कार्य. अभि ग्रामीण पा पु | |
| १३) | श्री.भा.तु.कवडे | कार्य.अभि.लघुपाटबंधारे | |

**तक्ता**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १४) | श्री.ए.व्ही.चिमकोडकर | कार्य.अभि.लघुपाटबंधारे | |
| १५) | श्री.चं.पु.कळसे | कार्य.अभि.लघुपाटबंधारे | |
| १६) | श्री.एम.बी.बंगाळे, सेवानिवृत्त | कार्य.अभि.लघुपाटबंधारे | |
| १७) | श्री.पी.एस.डहाळे | जिल्हा कृषी अधिकारी | |
| १८) | श्री.व्ही.बी.बलुरकर | उपमुकाअ(ग्राप) | |
| १९) | श्री.अ.श.पवार | शिक्षणाधिकारी नि शि | |
| २०) | श्रीमती गोरे जे एन. | शिक्षणाधिकारी नि शि | |
| २१) | श्रीमती देशपांडे ए.एस. | शिक्षणाधिकारी नि शि | |
| | **गट विकास अधिकारी** | | |
| १) | श्री.बी.जे. मिणेकर निलंबीत | गट विकास अधिकारी पस भोकर | |
| २) | श्री.एस.डी.बनसोडे | गट विकास अधिकारी पस भोकर | |
| ३) | श्री.एस.सी.भेले | गट वि.अ.प.स. हदगांव | |
| ४) | श्री.व्ही.बी.बलूरकर | गट विकास अधिकारी पं.स.कंधार | |
| ५) | श्री.टि.के.नवले | गट विकास अधिकारी पं.स.कंधार | |
| ६) | श्री.एस.बी.परिहार | गट विकास अधिकारी पं.स.किनवट | |
| ७) | श्री. एस.बी.कोंडेकर (प्र) | गट विकास अधिकारी पं.स.किनवट | |
| ८) | श्री.व्ही.एम.सुर्यवंशी | गट विकास अधिकारी पं.स.किनवट | |
| ९) | श्री.एस.एन.केंद्रे | गट विकास अधिकारी पं.स. लोहा | |
| १०) | श्री.सी.व्ही.जगधने | गट विकास अधिकारी पं.स.मुखेड | |
| ११) | श्रीमती एस.व्ही.पांडव | गट विकास अधिकारी पं.स.नांदेड | |

वरीलपैकी ३ तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व १८ खातेप्रमुख अनुपस्थित होते. विभागप्रमुखांपैकी ६ विभागप्रमुखांचे त्यामध्ये श्री.ए.जी.करपे, कार्यकारी अधिकारी (बांधकाम), श्री.सी.आर.पेरगुलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी, श्री.एम.बी.बंगाळे, कार्यकारी अभियंता (द.) यांचे खुलासे समाधानकारक असल्याने संबंधितांचे खुलासे संबंधित मंत्रालयीन विभागप्रमुखांकडे सादर करण्यात आलेले आहेत. श्री.भा.तु.कवडे, कार्यकारी अधिकारी (ल.पा) यांचा खुलासा प्राप्त झाला असुन तो समाधानकारक दिसुन येत नाही. तसेच ११ अनुपस्थित गट विकास अधिकारी यांच्या पैकी ४ गट विकास अधिकारी श्री.एस.डी.बनसोडे, गट विकास अधिकारी, भोकर, श्री. बी.एस.परिहार, गट विकास अधिकारी, किनवट, श्री.एम.यु.सुर्यवंशी, गट विकास अधिकारी, किनवट, श्रीमती एस.व्ही.पांडव, गट विकास अधिकारी, नांदेड यांचे खुलासे प्राप्त झाले असून सदर खुलासे समाधानकारक असल्याचे मा. सचिव ग्राम विकास व जलसंधारण विभाग मुंबई यांच्याकडे या कार्यालयाचे प.क्र. ११३/दिनांक १३.०१.२०१६ व पत्र क्र. ३६९ दिनांक ३०.०१.२०१६ अन्वये सादर करण्यात आलेले आहेत.

३) प्रस्तुत प्रकरणात या कार्यालयाचा प्रस्ताव जा.क्र.जिपना/ शिवि/लेखा-१/११५३७/२०१५ कार्यालय शिक्षण विभाग, जि.प.नांदेड दिनांक १०.११.२०१५ नुसार श्री.ए.वा.मडावी, तत्कालीन शिक्षणाधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयात सादर केलेला आहे.

सदरील अधिका-यांवर कारवाई करण्याचे अधिकार शासनास आहेत.

४) या प्रकरणात तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा) श्री.ए.वा.मडावी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत या कार्यालयाचे प्रस्ताव जा.क्र.जिपना/शिवि/लेखा-१/११५३७/२०१५, कार्यालय शिक्षण विभाग, जि.प.नांदेड दिनांक १०.११.२०१५ व शिस्तभंगाची कारवाई करुन निलंबीत करणेबाबत या कार्यालयाचा प्रस्ताव जा.क्र. जिपना/शिविप्रा / पंरास दौरा/१२०४१/ २०१५, शिक्षण विभाग (प्रा) जिल्हा परिषद, नांदेड दि. १६.१२.२०१५ नुसार मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

सदरील अधिका-यांवर कारवाई करण्याचे अधिकार शासनास आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शालेय शिक्षण व क्रिडा विभागाशी प्रश्न क्र. १) व २) संबंधित नसल्याने त्याबाबत शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने अभिप्राय दिलेले नाहीत. जिल्हा परिषदेने या विभागाच्या अधिपत्याखालील ७ गट विकास अधिकारी यांचे विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ३) व ४) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे अभिप्राय- आयुक्त शिक्षण यांच्याकडून रितसर प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

## चौकशी अहवाल

शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेडने सन २०११-१२ मध्ये शाळांमध्ये स्वच्छतागृहे बांधकामासाठी किनवट वगळता १५ तालुक्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांचे आदेश क्र. जिपना/शि.अ.प्रा./साशिअ/बांध/२०११-१२/४२६ दि. ३१/३/२०१२ अन्वये रु.१,४४,००,०००/- निधी वितरित केला आहे.

शासनाचे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन शुध्दीपत्रक दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ नुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम योजना नुतनीकरण निधी याअंतर्गत घ्यावयाच्या कामाबाबत सुधारित मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये पाणी पुरवठा व शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता कामे घेता येईल असे निर्देश आहेत. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे पत्र दिनांक १७/२/२०१२ नुसार सर्व शाळांमधुन आवश्यक स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याची सुविधा दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर उपलब्ध करुन देण्याच्या सुचना होत्या त्याअंतर्गत स्वच्छतागृहांच्या युनिटची अंदाजित रक्कम रु. ९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार केवळ) होती. सदरचा निधी या कार्यालयाकडून दिनांक ३१ मार्च, २०१२ अन्वये प्रत्येक तालुक्याच्या गट विकास अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आला.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए/२००८/प्र.क्र.४४४/वित्त-९ दिनांक १५ जूलै, २००८ नुसार सदरील योजना राबविण्यापूर्वी सक्षम प्राधिका-यांची जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक होते. पण तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी मान्यता घेतलेली नाही त्यामुळे तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा) श्री.ए.वा.मडावी हे जबाबदार आहेत.

तालुकानिहाय पुढीलप्रमाणे स्वच्छतागृहे मंजूर करण्यात आली होती पंचायत समिती नांदेड १७ अर्धापूर-२, मुदखेड-३, कंधार-१३, लोहा-५ मुखेड ५०, देगलूर-७, बिलोली-५ नायगांव-१५, धर्माबाद-१०, भोकर-५, उमरी-६, हदगाव-९, हिमायतनगर-३ किनवट-० माहुर, १२ असे एकूण १६० स्वच्छतागृहे व त्यापैकी काही कामे स्वच्छतागृहे उपलब्ध असल्यामुळे सुरु झाली नव्हती. स्वच्छतागृह उपलब्ध असल्यामुळे सुरु न झालेली कामे पंचायत समिती नांदेड-४ (जुना कौठा, असदवन-मरळक(बु) बोरगाव (तेलंग) कंधार-३ (हरबळ,कन्या कौठा, शिरुर(जुने) देगलूर-७ (मोतीराम तांडा, झरी मुजळगा देगांव-अंतापूर दावनगिरी देगलूर) बिलोली-१ (सावळी) नायगाव -१ (पाटोदा) आहेत. सदरची कामे त्या त्या वर्षाचा UDISE चा फॉर्म भरत असताना शाळेच्या मुख्याध्यापकांनी स्वच्छतागृहे उपलब्ध असताना नसल्याबाबतची चुकीची माहिती भरल्यामुळे मागणीमध्ये सदरच्या शाळा आलेल्या दिसुन येतात त्यास फॉर्म भरणारे शाळेचे तत्कालीन खालील मुख्याध्यापक जबाबदार आहेत.

१) श्रीमती सय्यद बेगम, तत्का मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा सावळी ता.बिलोली

२) श्री.वाकेकर, मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा पाटोदा, ता.नायगांव

३) श्री.वाघमारे, नरसिहंराव राम, मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शा हरबळ, ता.कंधार

४) श्री. कुरुळेकर जगन्नाथ मारोती, मुध्याध्यापक जि.प.प्रा.शा खेरका ब्रँच मुखेड ता.मुखेड

५) श्री. एस.डी.देव, मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शा शहाजीनगर, ता.नांदेड

६) श्री. किसवे एम.एल., मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा मरळक (बु), ता.नांदेड

७) श्री.वाधमारे एम.जी., विस्तार अधिकारी पंचायत समिती भोकर

८) श्री. पापटवार पी.एम, मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा येसगी, ता.देगलूर

९) श्री. धमने एच.पी., मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा मरतोळी ता.देगलूर

१०) श्री.नक्कावार भुवनेश्वर गंगाराम, मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा पिंपळगाव

११) श्री. मुडले बी.व्ही, मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा मोतीराम तांडा, ता.देगलूर

१२) श्री. लोणे गंगाधर जयराम, मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा देगांव, ता.देगलूर

१३) श्री. शिवाचार्य, मुख्याध्यापक जि.प हाय(मुलांचे), देगलूर ता.देगलूर

१४) श्रीमती पांडे विणा, मुख्याध्यापिका (निलंबीत) मुख्यालय पंचायत समिती हदगांव

१५) श्री. ननुरे गंगाधर भानुदास, मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा ब्रांच मुखेड, ता.मुखेड

१६) श्री. सय्य्द मुसा तत्का, मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा असदवन (मयत)

पंचायत राज समितीने आदेशीत केल्यानुसार चौकशी करण्यात आली त्यामध्ये वरील अधिकारी व कर्मचारी हे जबाबदार आहेत. यांचेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी अहवाल वर्षात कार्यरत असणा-या अधिका-यांना साक्षीकरिता उपस्थित राहण्याबाबत शासनाचे परिपत्रक दिनांक १० सप्टेंबर, २००७ नुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहणे बंधनकारक केले आहे असे असूनही समितीच्या भेटीच्या वेळी अनेक तत्कालिन विभाग प्रमुख अथवा अधिकारी समितीने कळवून देखील तिच्या भेटीच्या वेळी अनुपस्थित राहतात ही बाब नित्याचीच झाल्याने समितीने गैरहजर राहणा-या तत्कालिन अधिका-याची एक तात्पुरती वेतनवाढ रोखण्यात यावी व त्याचप्रमाणे त्यांच्या गोपनीय अहवाल व सेवा पुस्तकात नोंद घेण्यात यावी, असे निदेश समितीने दिले होते. त्यानुसार अनुपस्थित राहिलेल्या २१ विभाग प्रमुख व ११ गट विकास अधिका-यांचा खुलासा समितीसमोर आल्याचे व त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी संबंधित विभागाकडे पाठविण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे, याबाबत सद्यःस्थिती काय आहे असे विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, तत्कालीन २१ विभाग प्रमुख व ११ गट विकास अधिकारी बैठकीला उपस्थित नसल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यांचा खुलासा प्राप्त झालेला आहे. त्यापैकी ६ विभाग प्रमुखांनी समाधानकारक खुलासा दिलेला असल्यामुळे तो मान्य करण्यात आला व इतर विभाग प्रमुख आणि ११ गट विकास अधिकारी याचा खुलासा सचिव ग्रामविकास यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन पुढे प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीस अधिक माहिती दिली की, संबंधितांचा खुलासा विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. त्याचबरोबर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना साक्षीस उपस्थित राहण्याबाबत सूट देण्याची विनंती प्रधान सचिवांनी समितीस केली.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद नांदेड येथे समितीने भेट देऊन शाळांमध्ये स्वच्छतागृहे बांधकामासाठी प्रदान रकमांबाबत यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी याची साक्ष घेतली. उक्त साक्षीत शिक्षण विभाग जिल्हा परिषद, नांदेड यांनी सन २०११-१२ या कालावधीत शाळांमध्ये स्वच्छतागृहे बांधकामांसाठी किनवट वगळता पंधरा तालुक्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे क्रमांक जिपनां/शिअप्रा/सशिअ/बांध/२०११/२०१२/४२६ दिनांक ३१ मार्च, २०१२ अन्वये रुपये १,४४,००,०००/- निधी वितरीत केला. सदरचा निधी वितरीत करण्यासंदर्भात लेखा परीक्षणाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४४/ वित्त-९ दिनांक १५ जुलै, २००८ (परिशिष्ट ३.१) नुसार सदरील योजना राबविण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याची मान्यता न घेणे, मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक ६३१/२००४ प्रमाणे दिलेल्या निदेशानुसार सर्व शाळांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत स्वच्छतागृहे व शाळांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन न देणे, त्याचप्रमाणे शौचालयाची कामे पूर्ण झाल्याबाबतची प्रमाणपत्रे व उपयोगिता प्रमाणपत्रे वारंवार मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर न करणे इत्यादी गंभीर स्वरुपाचे आक्षेप लेखापरीक्षकांनी घेतले होते. या आक्षेपानुसार समितीसमोर आलेली माहिती अत्यंत धक्कादायक असूनही मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन या कामांसाठी पुरेसा कालावधी निश्चितच दिला असेल असे असूनही विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र दिनांक १७/०२/२०१२ नुसार इतक्या विलंबाने निर्गमित करणे हे समितीस अनाकलनीय वाटते. या पत्रानुसार सर्व शाळांमधून आवश्यक स्वच्छतागृहे व पिण्याचे पाण्याची सुविधा कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत उपलब्ध करुन देण्याबाबत निदेश दिलेले होते. सदरचे विभागीय आयुक्तांचे पत्र, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांवर करावयाच्या कार्यवाही यातील कालावधी लक्षात घेता केवळ ४५ दिवस सर्व शाळांमधील शौचालय बांधकाम व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी दिले होते ही वस्तुस्थिती आहे व या ४५ दिवसांमध्ये सर्व शाळांतील शौचालयांचे बांधकाम आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी नेमावयाचे कंत्राटदार इत्यादीकरीता हा कालावधी निश्चितच कमी आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने ज्याअर्थी सर्व शाळांतील मुला मुलींसाठी शौचालयाची व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. त्यासाठी राज्य शासनास निश्चितच पुरेसा वेळ दिला असेल त्यामुळे विभागीय आयुक्तांच्या दिनांक १७/०२/२०१२ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या सुचना व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी किनवट तालुका वगळता इतर पंधरा तालुक्यांना उपरोक्त कामासाठी वितरीत केलेला निधी यात समितीला प्रशासकीय अकार्यक्षमता दिसून येत आहे. दिनांक ३१ मार्च, २०१२ पूर्वी कोणत्याही परिस्थितीत खर्चीत रक्कम दाखवावी ही भूमिका जिल्हा परिषद प्रशासनाकडून घेतली गेली असल्याचे दिसून येते. प्रशासनाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे वेळीच पालन व्हावे याबाबत निश्चित अशी ठोस भूमिका घेऊन विहीत कालावधीत संबंधित कंत्राटदार नेमून योजनाबध्दरित्या शौचालयाची बांधकामे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली नसल्याचे दिसून येते. यामध्ये प्रशासनाने अत्यंत धीसाड घाई करुन निर्णय घेतला असून समितीसमोर उक्त पंधरा पंचायत समित्यांना वितरीत केलेला निधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी वितरीत केलेला आढळून येतो व असा निधी तत्कालिन शिक्षणाधिका-यांनी या सर्व कामांवर खर्च केला असल्याचे दिसून येते यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भूमिका समितीला स्वंशयास्पद वाटत आहे. कारण मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शिक्षणाधिकारी यांनी पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता देताना स्थायी समित्याच्या मान्यतेचा उल्लेख न करताच दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी निधी वितरीत केल्याचे दिसून येते. सदरचा निधी हा निश्चितच मार्च, २०१२ नंतर खर्च केला आहे व तो नंतरच्या किती कालावधीत खर्च केला याची निश्चित माहिती समितीसमोर आलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तत्कालिन शिक्षणाधिका-यांवर शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करणे हे समितीस अनाकलनीय वाटते. कारण उक्त निधी मंजूरीचा अधिकार स्थायी समितीला असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी म्हणजे आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी वितरीत केला आहे व त्याचे खापर तत्कालिन शिक्षणाधिकारी यांच्यावर फोडले आहे. या बाबींची चौकशी होणे समितीला आवश्यक वाटते. निष्कारण निर्दोश व्यक्तीवर कारवाई होऊ नये असे समितीला आर्वजून वाटते. जी व्यक्ती निधी मंजूर करुन वितरीत करण्यामध्ये दोषी आहे त्या अधिका-यावरच कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते.

सर्व पंचायत समित्यांकडील अखर्चित रक्कम जमा करुन त्या शासनास समर्पित करण्यात याव्यात तसेच शौचालयाची गरज नसताना गरज आहे असा अहवाल केल्यामुळे अंदाजपत्रक तयार केले आणि त्यामळे निधी अखर्चित राहीला याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याचे समितीने निदेश दिले होते. तथापि याबाबत

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली असल्याचे त्यांनी पाठविलेल्या कागदपत्र तपासले असता दिसून येत नाही. त्यामुळे सदरची बाब अत्यंत गंभीर आहे असे समितीला वाटते कारण समितीने राज्यात अनेक जिल्हा परिषदांना भेटी देऊन जिल्हा परिषदेच्या काही शाळांनादेखील भेटी दिलेल्या आहेत. उक्त भेटीच्या वेळेस नांदेड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत देखील जिल्हा परिषद शाळांना भेटी दिल्या होत्या. सदर शाळांमध्ये शौचालयाची अवस्था अत्यंत दयनीय असून बहुतांश शौचालयांचा वापर शाळेतील मुला मुलींद्वारा होत नसल्याचे समितीला दिसून आले आहे. या शौचालयाची पाहणी केली असता समितीला असे दिसून आले की, यातील काही शौचालयांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असणे, पाण्याची सुविधा नसणे, शौचालयात अत्यंत दुर्गंधी वाहत असणे, शौचालय साफसफाई करण्याची सुविधा नसणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अत्यंत वाईट असणे, बहुतांश शाळांमध्ये पिण्याच्या शुध्द पाण्याची व्यवस्था नसणे, ई. त्यामुळे या जिल्हा परिषदा शाळांमध्ये शौचालय बांधकाम व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था समितीला मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार केली असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेचा व पिण्याच्या पाण्याचा अधिकारच शासकीय यंत्रणेने हिरावून घेतला आहे असेही समितीला वाटते. याप्रकरणी संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीचे ठाम मत आहे.

लेखापरीक्षणाच्या वेळीस शौचालय बांधकामाचे पूर्णत्वाचे प्रमाणत्र तसेच उपयोगिता प्रमाणत्र लेखापरीक्षकास सादर न करणे. यावरुनच शाळेत शौचालय बांधकाम व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निकृष्ट दर्जाची झालेली असून याप्रकरणी अधिका-यांद्वारे अत्यंत बेजबाबदारपणा व अकार्यक्षमता झाली असल्याचे समितीला दिसून येते. जर प्रशासनाने शाळांतील शौचालये बांधकाम व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निधी मंजूर झाल्यांनतर त्वरेने नियमानुसार केली असती तर त्याबाबतची काम पुर्णत्वाची प्रमाणपत्रे सादर न करण्याचे कारणच नव्हते. काम केल्यानंतर असे प्रमाणपत्र उपलब्ध नसणे याबद्दल प्रशासकीय व तांत्रिक यंत्रणा कमालीची उदासिन व प्रसंगी निधीचा अपव्यय करुन त्यात अदेय लाभ घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एकूणच या शौचालय बांधकामात व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे समितीला दिसून येते. याबाबतीत सखोल चौकशी होऊन संबंधितांवर कडक कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. सुमारे १ कोटी ४४ लाख रुपये निधी वितरीत होऊनही उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे शाळांमधील शौचालयांची अवस्था अंत्यंत दयनीय असून पिण्याच्या पाण्याची व्यवस्थादेखील मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार केली असल्याचे दिसून येत नाही. शासनाने शौचालयाच्या बांधकामासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी निधीची मंजूरी केव्हा दिली, सदरचा निधी वितरीत होण्यास विलंब का लागला व त्यांनतर तो किती कालावधीत खर्च झाला याची स्वयंस्पष्ट माहिति समितीसमोर अद्यापपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेली नसल्यामुळे याबाबत समितीला शंका घेण्यास वाव आहे. **याबाबत शासनाने गांभीर्याने दखल घेऊन संपूर्ण शौचालयाच्या व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबाबतच्या बांधकामाची एका त्रयस्त यंत्रणेद्वारे तपासणी करुन संबंधित विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी, अभियंता इ. सर्वसंबंधित दोषी अधिका-यांविरुध्द कडक स्वरुपाची कारवाई करावी व याबाबतचा संपूर्ण चौकशी करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

मा.सर्वोच्च न्यालयायाने रिट पिटीशन क्रमांक ६३१/२००४ मध्ये दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करुन देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. कारण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी अनेक शाळांमध्ये शौचालयांची दयनीय अवस्था असून मुला मुलींना असे बांधलेले शौचालय वापरण्यायास लायक नाहीत असे वाटते. त्याचप्रमाणे शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्थादेखील पुरेशी व दखलपात्र नाही आणि बहुतांश शाळांच्या मुलांना अजूनही शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली नाही हे भेटीच्या वेळी समितीस आढळून येते. त्यामुळे याप्रकरणी संबंधित शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी इत्यादी संबंधित अधिका-यांवर कारवाई होणे समितीला आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वर्षाच्या शेवटी निधी वितरीत केला. सदरचा निधी कोणकोणत्या कामांवर खर्च केला. त्या कामाचा दर्जा काय याची देखील पाहणी करणे आवश्यक होते. **सदरची पाहणी केव्हा केली किंवा कसे हे सुध्दा तपासणे आवश्यक होते. निधीचाविनियोग वेळीच होणे आवश्यक असताना याप्रकरणी निधी अत्यंत विलंबाने दिला गेलेला आहे याची सर्वंकष चौकशी करण्यात यावी व दोषींवर कठोर करवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

राज्य शासनाने स्वच्छता अभियान राबवून कोट्यावधी रुपयांचा निधी शाळांमधील स्वच्छतागृहांसाठी खर्च केलेला आहे व ज्या कामासाठी निधी खर्च केला गेला त्या शौचालयाचा वापर विद्यार्थ्यांसाठी होणे आवश्यक आहे. याप्रकरणी शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षकांनी मागणी करुनही सादर न करणे हे अत्यंत गंभीर आहे.

त्याचप्रमाणे तत्कालीन योजना राबविणारे अधिकारी समितीने कळवून देखील समितीच्या साक्षीच्यावेळी अनुपस्थित राहिले ही बाब देखील गंभीर व प्रशासकीयदृष्टया गैरशिस्तीची आहे. त्यामुळे अशा अधिका-यांवर नियमानूसार कारवाई होणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देखील पत्र पाठविलेले आहे. परंतु समिती मुख्य कार्यकारी अधिकारी यासारख्या व्यक्तींना त्यांच्या कामाचा व्याप पाहता समितीसमोर बोलवत नाही. म्हणून तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वगळून संबंधित विभागप्रमुख व योजनेची अंमलबजावणी करणारे अधिकारी यांचेविरुध्दच कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीला वाटते. त्यानुसार जे अधिकारी जाणीपूर्वक व हेतुपुरस्सरपणे व पुरेशा कारणांशिवाय समितीच्या बैठकीच्या वेळी अनुपस्थित राहीले अशा अधिका-यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी असे समितीने भेटीच्या वेळी निदेश दिले होते. त्याचप्रमाणे अशा अनुपस्थित राहणा-या अधिका-यांचे खुलासे समितीला पाठविण्यात यावेत असे निदेश दिलेले होते. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरच कारवाई करणे समितीला अनाकलनीय वाटते. असे असले तरी समितीच्या भेटीच्या वेळी कळवून देखील जे अधिकारी जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सरपणे अनुपस्थित राहिले अशा अधिका-यांविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई केली असल्याचे त्यांनी पाठविलेल्या माहितीवरुन दिसून येते याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

त्याचप्रमाणे आणखी गंभीर मुद्दा म्हणजे शौचालयाच्या व पिण्याच्या पाण्याची कामे पूर्ण झाल्याबाबतची प्रमाणपत्रे आणि उपयोगिता प्रमाणपत्र वारंवार मागणी करुनही लेखापरीक्षणास अनेक अधिका-यांनी सादर केलेली नाही. हा प्रकार अत्यंत गंभीर स्वरुपाचा असल्याचे समितीला नमूद करावेसे वाटते. कारण सदरचे प्रमाणपत्र सादर न करणे म्हणजे त्या शौचालयाचे बांधकाम झाले किंवा कसे त्याबाबतचा वापर होतो किंवा कसे याबाबत समिती साशंक आहे. कारण **समितीला भेटीच्या वेळीस अनेक शौचालयाची पाहणी करताना शौचालयात दुर्गंधी असणे, पाण्याची व्यवस्था नसणे, शौचालयाचे काम निकृष्ट दर्जाचे असणे, शौचालयाचे काम अपु-या जागेत असणे इत्यादी उणिवा आढळून आलेल्या आहेत. म्हणून याप्रकरणी ज्या अधिका-यांनी लेखापरिक्षणाच्यावेळी लेखापरीक्षकांनी मागणी केलेली कागदपत्रे सादर केलेली नाही अशा सर्व अधिका-यांविरुध्द चौकशी करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्यांच्याकडून नियमानुसार दंड वसुल करावा व त्याचप्रमाणे अशा सर्व अधिका-यांच्या सेवापुस्तकात नोंद घेवून त्यांची तात्पुरती एक वेतनवाढ रोखावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चार

# जिल्हा परिषद, नांदेड

## ड्युल डेस्क प्राप्त नसतांना देयकाचे प्रदान केल्याबाबत

**(परिच्छेद ३.१६०) (सन २०११-२०१२)**

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नांदेडने प्रमाणक क्रमांक १८१८ दिनांक ३१ मार्च २०१३ ला रुपये १,९९,९९,३८०/- चे रुपये ७,२७७ ड्युल डेस्ककरीता प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ९० अन्वये नमुना क्रमांक ३२ मध्ये प्राप्त साहित्याच्या नोंदी घेवूनच देयकाचे प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७९ अन्वये तात्काळ संवितरणासाठी आवश्यक असल्याखेरीज पैसे काढण्यात येणार नाही. अशी तरतूद असतांना व ड्युल डेस्क प्राप्त नसतांना प्रदान करण्यात आलेले रक्कम रुपये १,९९,९९,३८०/- वसूल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे.

३. सदर देयक वित्त विभागास अदाईसाठी प्राप्त झाल्यावर तालुक्याला वाटप करण्यात आलेल्या साहित्याची मुळ पावती व ॲडव्हांस पावती जोडलेली नसल्यामुळे शिक्षण विभागाने सदर त्रुटींची पूर्तता केली नसतांनाही देयकाचे प्रदान केल्याचे दिसते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. सन २०११-१२ मध्ये नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती कडून आदेश क्र.१२९१, दि.०२/०१/२०१२ अन्वये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना ३४५११७०३ या लेखाशिर्षाखाली रु.२,००,००,०००/- (अक्षरी रु.दोन कोटी केवळ) तरतुद वितरीत करुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. दि.१९/१२/२०११ च्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव क्र.४७३ अन्वये तांत्रिक मान्यता घेण्यात आली. त्यानुसार उद्योग सहसंचालक (भा.खा), विकास आयुक्त उद्योग यांचे दि.३०/०८/२०११ चे दरकरारानुसार महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ,मुंबई यांना रु.२७४८.३० पैसे (रु.दोन हजार सातशे अठ्ठेचाळीस रु.तीस पैसे) प्रमाणे प्रस्तुत कार्यालयाने पुरवठा आदेश क्र.२९३६, दि.१४/०३/२०१२ नुसार दि.३१/०३/२०१२ पर्यंत पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई यांनी फक्त १०१६ ड्युल डेस्क चा पुरवठा केला होता.पुरवठा हा दि.३१/०३/२०१२ पर्यंतच करावयाचा असल्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग, मुंबई याच्या आगावू पावती (ॲडव्हांस पावती) च्या आधारे ३१/०३/२०१२ मध्ये धनादेश तयार करुन ठेवण्यात आला होता. परंतु सदरील पुरवठादाराने एकुण ७२७७ पैकी १०१६ ड्युल डेस्क पुरवठा करुन रु.२७,९२,२७३/- ची मागणी केली होती. संबंधितास दिलेल्या खरेदी आदेशाच्या अटी व शर्तीनुसार १०० टक्के पुरवठा न केल्यामुळे नमुना क्र.३२ मध्ये नोंद घेण्यात आलेली नाही तसेच त्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग महामंडळ मुंबई यांचे देयक अदा करण्यात आले नाही.

ड्युल डेस्क प्राप्त नसतांना देयकाचे प्रदान करण्याची कार्यवाही सुरु झाली होती परंतु सदर धनादेश त्यांना देण्यात आला नव्हता ही वस्तुस्थिती आहे.याबाबत दि.२०/०८/२०१५ रोजी संबंधितांचा खुलासा मागविण्यात आला आहे.

२. प्रस्तुत कार्यालयाने पुरवठा आदेश क्र.२९३६, दि.१४/०३/२०१२ नुसार दि.३१/०३/२०१२ पर्यंत पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई यांनी फक्त १०१६ ड्युल डेस्क चा पुरवठा केला होता.पुरवठा हा दि.३१/०३/२०१२ पर्यंतच करावयाचा असल्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग, मुंबई याच्या आगावू पावती (ॲडव्हांस पावती) च्या आधारे ३१/०३/२०१२ मध्ये धनादेश तयार करुन ठेवण्यात आला होता. नमुना क्र.३२ च्या नोंदी तसेच साहीत्य प्राप्तीच्या नोंदी व मुळ पावत्या नसल्यामुळे रु.१,९९,९९,३८०/- चा धनादेश वितरीत करण्यात आलेला नाही. सदरील रक्कम अखर्चित आहे. व खादी ग्राम उद्योग महामंडळास देयकाचे प्रदान करण्यात आले नाही.

३. देयकाचे कोणत्याही प्रकारचे प्रदान करण्यात आलेले नाही. आज रोजी रु.२,००,००,०००/- ची तरतुद जिल्हा निधीमध्ये अखर्चित आहे. या कार्यालयाचे पत्र क्र.३८७६, दि.११/०६/२०१४ व पत्र क्र.२५४१ दि.१०/०३/२०१५ नुसार सदरची रक्कम खर्च करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांचेकडे परवानगी मागीतलेली आहे.

आक्षेपात दर्शविण्यात आलेल्या बाबीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,ड्युल डेक्स प्राप्त झाल्यानंतर त्याची नोंद नमुना नं.३२ मध्ये वेळीच का घेण्यात आली नाही, ड्युल डेक्स प्रत्यक्षात कधी प्राप्त झाले, त्या देयकाचे प्रदान कधी करण्यात आले, देयकासोबत तालुक्याला साहित्य वाटप केल्याची व ॲडव्हान्स पावती आदी मूळ अभिलेखे नसताना नियमबाह्य देयक कोणत्या प्राधिकारात अदा केले, यावर शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की,अहवाल वर्षात नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत माननीय जिल्हाधिकारी तथा सदस्य, जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून दि.२ जानेवारी, २०१२ अन्वये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना ३४५११७०३ या लेखाशीर्ष अंतर्गत ड्युल डेस्क पुरविण्यासाठी २ कोटी रुपयांचा निधी वितरीत करुन त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. दि.१९/१२/२०११ रोजीच्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.४७३ अन्वये तांत्रिक मान्यता घेण्यात आली. त्यानुसार उद्योग सहसंचालक (भा.खा), विकास आयुक्त उद्योग यांच्या दि.३० ऑगस्ट, २०११ च्या दर करारानुसार महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना प्रत्येकी रु.२७४८.३० पैसे या दराने दि.३१/०३/२०१२ पर्यंत पुरवठा करण्याचे आदेश दिले. परंतु महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने ७२७७ ड्युल डेस्कपैकी केवळ १०१६ ड्युल डेस्कचाच पुरवठा केला. खादी ग्रामोद्योग मंडळाने करारातील अटी व शर्तीनुसार विहित मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यामुळे नमुना क.३२ मध्ये नोंद घेण्यात आली नाही. तसेच त्यांनी पूर्ण मालाचा पुरवठा न केल्यामुळे त्यांना देयक सुध्दा अदा करण्यात आलेले नाही. ड्युल डेस्कसाठी प्राप्त झालेली तरतूद दि.३१/०३/२०१२ पर्यंत खर्च करावयाची असल्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्या नावे आगावू पावतीच्या आधारे दि.३१/०३/२०१२ रोजी धनादेश तयार करुन ठेवला होता. शिक्षणाधिका-यांच्या उत्तरावर हरकत घेत समितीने मत व्यक्त केले की, मुळात खादी ग्रामोद्योग मंडळाने दि.३० मार्चपर्यंत मालाचा पुरवठा करावयास हवा होता. मालाचा पुरवठा केल्यानंतर जिल्हा परिषदेने धनादेश काढावयास पाहिजे होता. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, पुरवठादाराने सुरूवातीला ७२७७ ड्युल डेस्कपैकी १०१६ डेस्कचा पुरवठा केला होता. विभागाला वाटले की, विहित मुदतीत उर्वरित मालाचा पुरवठा करण्यात येईल. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी रक्कम खर्च करावयाची असल्यामुळे पुरवठादाराच्या नावे धनादेश तयार करुन ठेवण्यात आला होता.

पुरवठादाराच्या नावे काढण्यात आलेला धनादेश रद्द केला आहे काय, असा प्रश्न समितीने केला असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पुरवठादाराला उर्वरित मालाचा पुरवठा करुन, धनादेश घेऊन जाण्यास सांगितले होते. परंतु त्यांनी मालाचा पुरवठा न केल्यामुळे त्यांच्या नावे काढण्यात आलेला धनादेश रद्द करण्यात आलेला आहे. सदरहू रक्कम अखर्चित आहे असे समितीस विदीत केले.

समितीच्या मते पुरवठादाराकडून ३० मार्चपर्यंत संपूर्ण मालाचा पुरवठा झाला नसल्यामुळे संपूर्ण रकमेचा धनादेश काढण्याची गरज नव्हती. आर्थिक वर्षाच्या शेवटी संपूर्ण मालाच्या किंमतीचा धनादेश तयार करण्याऐवजी प्रत्यक्षात जेवढा माल प्राप्त झाला होता तेवढ्या रकमेचाच धनादेश तयार करावयास हवा होता. पुरवठादाराने विहित मुदतीत मालाचा पुरवठा केला नाही. अशा परिस्थितीत जिल्हा परिषदेने अखर्चित रक्कम समायोजित करणे आवश्यक होते. पुरवठादाराला आवश्यक तेवढ्या मालाचा पुरवठा करणे शक्य नव्हते तर जिल्हा परिषदेने निविदा मागवावयास हव्या होत्या. निधी उपलब्ध असताना सुध्दा पुरवठादाराने माल न पुरविल्यामुळे विद्यार्थ्यांना डेस्क उपलब्ध होऊ शकले नाही. पुरवठादाराला देयकाचे कोणतेही प्रदान करण्यात आलेले नाही व अखर्चित असलेली २ कोटी रुपयांची तरतूद जिल्हा निधीमध्ये आहे. दि.१० मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये सदरहू रक्कम खर्च करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांच्याकडे परवानगी मागितली आहे. उक्त समितीकडून या बाबत परवानगी मिळाली आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदीत केले की, सदरहू रक्कम खर्च करण्यास जिल्हा नियोजन समितीची परवानगी घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. अद्यापपर्यंत परवानगी मिळालेली नाही.

समितीच्या मते पुरवठादाराने मालाचा पुरवठा न केल्यामुळे किंवा जिल्हा परिषदेने माल मिळण्यासाठी पत्र व्यवहार किंवा पाठपुरावा न केल्यामुळे शाळा, विद्यार्थी आणि जिल्ह्याचे नुकसान झाले आहे. अधिका-यांच्या अकार्यक्षमतेमुळेच मालाचा पुरवठा झाला नाही. मुळात जिल्हा परिषदेने खादी ग्रामोद्योग मंडळाकडे तगादा लावून माल प्राप्त करुन घ्यावयास पाहिजे होता. पुरवठादाराला सांगावयास हवे होते की, १५-२० दिवस मागे-पुढे झाले तरी चालेल, पण संपूर्ण मालाचा पुरवठा करावा. परंतु असे काहीही केले नाही. जिल्हा परिषदेच्या उदासीनतेमुळे सद्यः स्थितीत विद्यार्थी झाडांखाली बसतात, त्यांना बसण्यासाठी डेस्क

वा बस्कर पट्टया नाहीत. अहवाल वर्षात शासनाने डेस्कसाठी २ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला असताना सुध्दा केवळ अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे किंवा उदासीनतेमुळे ती रक्कम खर्च होऊ शकली नाही. या प्रकरणी तत्कालीन शिक्षणाधिका-यांवर जबाबदारी निश्चित करावयास पाहिजे. मुळात ३१ मार्चला अग्रीम देता येत नाही. सद्यःस्थितीत जरी मंडळाकडून माल घ्यावयाचा झाला तरी अहवाल वर्षाच्या तुलनेत आजचे दर हे निश्चित वाढलेले आहेत. मालाचा धनादेश तयार करुन ठेवलेला असताना सुध्दा पुरवठादाराने तो धनादेश घेतला नाही. याचा अर्थ पुरवठादाराला त्या दरामध्ये मालाचा पुरवठा करणे परवडत नसेल म्हणूनच त्याने धनादेश घेतला नसावा. पुरवठादार संस्थेने केवळ १५ टक्के मालाचा पुरवठा केला आणि उर्वरित ८५ टक्के मालाचा पुरवठा केला नाही. यामध्ये पुरवठादाराचा दोष असल्यामुळे सध्याच्या दरातील फरक संबंधित पुरवठादाराकडून वसूल केला पाहिजे. तसेच अधिका-यांनी पाठपुरावा न केल्यामुळे मालाचा पुरवठा होऊ शकला नाही. त्यामुळे पुरवठादाराइतकेच अधिकारी सुध्दा दोषी आहेत. मूळात यामध्ये खादी ग्रामोद्योग मंडळाची चुकी आहे. कारण त्यांनी करारानुसार विहित मुदतीमध्ये संपूर्ण मालाचा पुरवठा केला नाही. दिनांक ३० मार्च पर्यंत मालाचा पुरवठा केलेला नसताना सुध्दा जिल्हा परिषदेने पुरवठादाराच्या नावे संपूर्ण रकमेचा धनादेश काढून ठेवला होता. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणी तत्कालीन शिक्षणाधिका-यांवर जबाबदारी निश्चित करावी. त्याबरोबर पुरवठादाराने संपूर्ण मालाचा पुरवठा न केल्यामुळे त्यांच्यावर सुध्दा जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत शालेय शिक्षण व उद्योग विभागाकडून माहिती मागविली.**

१) पुरवठादाराने संपूर्ण मालाचा पुरवठा केलेला नसतांना सुध्दा जिल्हा परिषदेने पुरवठादारासोबत पत्रव्यवहार किंवा पाठपुरावा केल्याचे समितीला दिसून आले नाही. तसेच खादी ग्रामोद्योग मंडळाने देखील विहीत मुदतीत पुरवठा केलेला आढळून आलेला नाही. पुरवठा झालेला नसतांना देखील जिल्हा परिषदेने पुरवठादाराच्या नावे धनादेश काढून ठेवल्यामुळे तत्कालिन शिक्षण अधिका-यावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्याचे निर्देश समितीने दिले असून सदर प्रकरणी समितीस सादर झालेल्या अहवालात तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री.ए.वा.मडावी व तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.भोसले हे दोषी आढळून आले आहेत. त्यापैकी केवळ शिक्षणाधिकारी श्री.मडावी यांचेविरुध्द निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे दोन वेळा सादर करण्यात येऊनही त्यावर शासनाने अद्यापही कारवाई केली नसल्याचे दिसून येते, कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

२) या प्रकरणी पुरविण्यात आलेले डयुल डेस्क वापरात आहेत काय ? असल्यास सदर डयुल डेस्कचे देयके देण्यात आले आहेत काय ? नसल्यास त्याची कारणे काय ?

३) उद्योग सहसंचालक (भा.ख.) यांना डयुल डेस्कचा अपुरा पुरवठा केल्याबाबत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना पुरवठादाराच्या काळ्या यादीमध्ये टाकण्याबाबत दि. १६ डिसेंबर, २०१५ रोजी शिफारस करण्यात आली असून शासनाने मंडळाला पुरवठादाराच्या काळ्या यादीमध्ये अद्याप समाविष्ट केलेले नाही, सदरील प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

४) सदरहू प्रकरणी तत्कालीन मुख्य लेख व वित्त अधिकारी श्री. भोसले हे चौकशीस जबाबदार असल्याचे निदर्शनास येऊनही त्यांचेवर अद्याप कोणतीही कारवाई प्रस्तावित न करण्याचे कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) या प्रकरणात तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा.) श्री.ए.वा.मडावी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत या कार्यालयाचे प्रस्ताव जा.क्र.जिपनां/शिवि/लेखा-१/११५३७/२०१५, कार्यालय शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नांदेड दिनांक १०.११.२०१५ व शिस्तभंगाची कारवाई करुन निलंबीत करणेबाबत या कार्यालयाचा प्रस्ताव जा.क्र.जिपनां/शिविप्रा/पंरास दौरा/ १२०४१/२०१५ शिक्षण विभाग (प्रा) जिल्हा परिषद नांदेड दि.१६.१२.२०१५ नुसार मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेविरुध्द कारवाईचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी या कार्यालयाने जा.क्र.जिपनां/शिविप्रा/पंरासदौरा/लेखा १/१२०५६/२०१५ शिक्षण विभाग (प्रा)जिल्हा परिषद, नांदेड दि. १६.१२.२०१५ नुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद नांदेड यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार

कार्यालयाचे पत्र क्र. ८६५ दि. २३.०२.२०१६ अन्वये प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. कारवाई करण्याचे अधिकार शासनास आहेत.

२) या प्रकरणातील ७२७७ पैकी पुरवठादाराने पुरवठा केलेले १०१६ डयुल डेस्क विविध शाळांमध्ये वापरात आहेत. सदर पुरवठा केलेल्या डयुल डेस्कचे देयक रु.२७,९२,२७३/- (अक्षरी रु.सत्तावीस लक्ष ब्यानऊ हजार दोनशे त्र्याहत्तर फक्त) अद्याप अदा करण्यात आले नाही. पुरवठादाराने विहीत कालावधीत १०० टक्के मालाचा पुरवठा न केल्यामुळे पुरवठादारास देयक अदा करण्यात आले नाही.

३) डयुल डेस्कचा अपुरा पुरवठा केल्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.११५७७, दि. १८/११/२०१५ अन्वये मे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना नोटीस देण्यात आलेली असून सदरील संस्थेस पुरवठादाराच्या काळ्या यादीमध्ये टाकणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.१२०४९, दि.१६/१२/२०१५ अन्वये उद्योग सहसंचालक (भा.ख.) यांना शिफारस करण्यात आलेली आहे.

४) प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेविरुध्द कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्र. ८६५, दि.२३.०२.२०१६ अन्वये सादर करण्यात आलेला आहे.

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**१) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे अभिप्रायः -**

आयुक्त शिक्षण यांच्याकडून रितसर प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात येत आहे

**२) उद्योग विभागाचे अभिप्रायः-**

उद्योग संचालनालयाने दिनांक ३०/०८/२०११ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना आरक्षित केलेल्या 'लाकडी फर्निचर' या बाबीसाठी सन २०११-१२ साठी दर निश्चिती करण्यात आली आहे. सदरच्या दरनिश्चितीचा कालावधी दिनांक ३०/०६/२०१२ पर्यंत होता. त्यामधील अटी/शर्तीनुसार पुरवठादारांनी मागणी पत्र मिळाल्यापासून ३ महिन्याच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. तसेच मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यानंतर ९० टक्के रक्कम २ आठवड्यामध्ये संबंधित महामंडळास देणे आवश्यक आहे व उर्वरित १० टक्के रक्कम सर्व मालाची मागणीकाराला पोच सुस्थितीत व विनिर्देशाप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत करणे आवश्यक आहे. परंतु पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर दंड आकारुन वसुली करण्याची जबाबदारी मागणीकार कार्यालयावर सोपविण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषद, नांदेड यांनी सन २०११-१२ मध्ये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्यासाठी दरनिश्चितीच्या आधारे एकूण ७,२७७ नग पुरवठा करण्याचे आदेश निर्गमित केले होते. तथापि, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांनी १०१६ इतक्या डयूल डेस्कचा पुरवठा केला आहे. उर्वरित मालाचा पुरवठा त्यांनी केलेला दिसून येत नाही. त्यामुळे जिल्हा परिषद, नांदेड यांनी पुरवठा कालावधीत पुरवठा न झाल्याने दिनांक ३०.८.२०११ च्या आदेशातील अटी/शर्तीनुसार त्यांचेविरुध्द दंड आकारण्याची कार्यवाही करणे अपेक्षित होते, तसेच सदरची बाब विहित कालावधीत म्हणजेच सन २०११-२०१२ मध्ये जिल्हा परिषद, नांदेड यांनी उद्योग संचालनालयास कळविणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. आता ३ वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतर जिल्हा परिषद, नांदेड यांनी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ या संस्थेस पुरवठादाराच्या काळ्या यादीमध्ये टाकण्याची दिनांक १६.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शिफारस केली आहे.

तथापि, संचालनालयाकडील दस्ताऐवज तपासले असता असा प्रस्ताव जिल्हा परिषद, नांदेड यांचे दिनांक १६.१२.२०१५ रोजीचे पत्र अनौपचारिकरित्या शिक्षण विभागाकडून प्राप्त करुन पुढील कार्यवाहीसाठी उद्योग संचालनालयाकडे पाठविण्यात आले आहे.

## चौकशी अहवाल

सन २०११-१२ मध्ये नाविन्यपूर्ण योजना अंतर्गत मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड कडून आदेश क्र.१२११ दि.०२/०१/२०१२ अन्वये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना डयुल डेस्क उपलब्ध करुन देण्याचे अनुषंगाने लेखाशिर्ष-३४५११७०३ या खाली रु. २,००,००,०००/- (अक्षरी रु. दोन कोटी केवळ) तरतूद प्राप्त झाली. सदर योजनेचा उद्देश जिल्हा परिषद शाळेतील ग्रामीण भागातील मुलांना शाळेत डयुल डेस्क उपलब्ध करुन देणे यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी उपस्थिती वाढण्यास मदत होईल म्हणुन नाविन्यपूर्ण योजनेतुन जिल्हा नियोजन समितीने या योजनेस मंजूरी दिली होती. दि.१९/१२/२०११ च्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव क्र. ४७३ अन्वये तांत्रिक मान्यता घेण्यात आली. दरकरारानुसार महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई यांना रु. २७४८.३० पैसे (रु. दोन हजार सातशे अठ्ठेचाळीस रु. तीस पैसे) प्रस्तुत कार्यालयाने पुरवठा आदेश क्र.२९३६ दि.१४/०३/२०१२ नुसार दिले. डयुल डेस्क पुरवठा करण्याची मुदत दि. ३१/०३/२०१२ पर्यंत दिली होती. दि. ३१/३/२०१२ पर्यंत डयुल डेस्क पुरवठा करण्याचे करार असतानाही महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई यांनी फक्त १०१६ डयुल डेस्क चा पुरवठा केल्याचे दिसून आले. साहित्य पुरवठा करण्याचा करार हा दि. ३१/०३/२०१२ पर्यंतच करावयाचा असल्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी ग्रामउद्योग मुंबई यांच्या आगावू पावती (ॲडव्हान्स पावती) च्या आधारे ३१/०३/२०१२ मध्ये धनादेश तयार करुन ठेवण्यात आला होता. परंतु सदरील पुरवठादाराने एकूण ७२७७ पैकी १०१६ डयुल डेस्क पुरवठा केले. संबंधितास दिलेल्या खरेदी आदेशाच्या अटी व शर्तीनुसार १०० टक्के पुरवठा न केल्यामुळे नमुना क्र.३२ मध्ये नोंद घेण्यात आलेली नाही तसेच त्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई यांचे देयक अदा करण्यात आले नाही असे संचिकेवरुन दिसून येते, तथापि, प्राप्त साहित्याच्या नोंदी साठा नोंदवहीच्या क्र. ३२ मध्ये नोंदी घेतल्यावरच धनादेश तयार करणे अपेक्षीत होते. परंतु तसे झालेले नाही व उर्वरित साहीत्य प्राप्त करुन घेण्याकरीता कोणताही पाठपुरावा केल्याचे सदरील संचिकेवरुन दिसुन आले नाही. परंतु कार्यालयीन यंत्रणेने पुरवठादारास सतत माल पुरवठा करण्याचे संदर्भात तोंडी विनंती केल्याचे चौकशीच्या वेळेस निदर्शनास आणून दिले. परंतु याबाबत कोणत्याही लेखी सुचना दिल्याचे दिसुन आले नाही यामध्ये विभाग प्रमुख म्हणुन तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा) श्री.ए.वा.मडावी यांची जबाबदारी निश्चित होते.

तसेच डयुल डेस्कचा अपुरा पुरवठा असतानाही त्याचे संपुर्ण देयक वित्त विभागास आदाईसाठी सादर करण्यात आले होते. केवळ ॲडव्हान्स पावतीच्या आधारे सदर देयक वित्त विभागास सादर करण्यात आले. डयुल डेस्क प्राप्त झाल्यावचरच संपूर्ण रक्कमेचे देयक वित्त विभागास सादर करणे अपेक्षीत होते. परंतु तशी प्रक्रीया झालेली नाही. तसेच साहित्याची मुळ पावती व ॲडव्हान्स पावती जोडलेली नसल्यामुळे शिक्षणविभागाने सदर त्रुटीची पूर्तता केली नसतांनाही वित्त विभागाने देयक मान्य केले असल्याचे दिसून येते. परंतु प्रत्यक्षात धनादेश पुरवठादारास प्रदान केलेला नाही. त्यामुळे तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.भोसले व तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा) श्री.ए.वा.मडावी हे विभागप्रमुख म्हणुन जबाबदार आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पुरवठादाराने संपूर्ण मालाचा पुरवठा केला नसताना सुध्दा जिल्हा परिषदेने पुरवठादारासोबत पत्रव्यवहार किंवा पाठपुरावा केल्याचे दिसून आले नाही. तसेच खादी ग्रामोद्योग मंडळाने देखील विहित मुदतीत पुरवठा केल्याचे आढळून आले नाही. पुरवठा झाला नसताना सुध्दा जिल्हा परिषदेने पुरवठादाराच्या नावे धनादेश काढून ठेवल्यामुळे तत्कालीन शिक्षण अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याचे समितीने निदेश दिले होते. सदर प्रकरणी समितीकडे सादर झालेल्या अहवालात तत्कालीन शिक्षण अधिकारी श्री.ए.वा. मडावी व तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.भोसले यांचा लेखी खुलासा अथवा म्हणणे ऐकून न घेताच ते दोषी आढळून आले आहेत हा निष्कर्ष कशाच्या आधारे काढत आहात. शिक्षणाधिकारी श्री.मडावी यांच्याविरुध्द निलंबनाची कारवाई करुन विभागीय चौकशी करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाकडे दोन वेळा सादर करुन कारवाई का करण्यात आली नाही, तसेच या प्रकरणी पुरविण्यात आलेले ड्युल डेस्क वापरात आहेत का, असल्यास त्याचे देयक देण्यात आले आहे का, नसल्यास त्याची कारणे काय आहेत यावर शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी समितीस विदित केले की, ड्युल डेस्कचा पुरवठा झालेला नाही. या प्रकरणी पुरवठादाराकडून पुरवठा होईल या उद्देशाने

दिनांक ३१ मार्च रोजी त्यांच्या नावाने चेक काढून ठेवण्यात आला होता. परंतु त्यांना पेमेंट करण्यात आले नाही. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी ३ मुद्यांच्या संदर्भात संबंधित अधिकारी श्री.ए.वा.मडावी यांच्याविरुध्द दोषारोप पत्र पाठविले आहे. यासंबंधी आयुक्त स्तरावरुन अभिप्राय मागवून घेतला आहे. शिक्षण विभागाकडे प्रस्ताव आलेला आहे. आता यासंबंधी तातडीने विभागीय चौकशी सुरु केली जाईल.

समितीने पुढे अशीही विचारणा केली की, या प्रकरणी संबंधितांना शिक्षा होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे त्यावर शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी समितीस माहिती दिली की, माननीय मुख्यमंत्र्यांनी असा निर्णय घेतला आहे की, दोन वर्षांपेक्षा जास्त काळाकरिता प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढावीत. त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग आणि शालेय शिक्षण विभाग सुध्दा पाठपुरावा करीत आहोत. विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल आल्यास तातडीने कार्यवाही करता येईल. योग्य पध्दतीने कार्यवाही करण्यासाठी थोडा वेळ जातो. या प्रकरणी तातडीने कार्यवाही पूर्ण करु असेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिका-यांवर नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे मांडण्याची संधी न देता कार्यवाही सुरु केल्याप्रकरणी समितीने मत व्यक्त केले की, समिती अनेक जिल्ह्यांना भेट देत असते. त्यावेळी समितीसमोर विविध प्रकरणे येत असतात. समितीसमोर संबंधित अधिकारी उपस्थित असून सुध्दा समितीसमोर आपली भूमिका मांडत असताना त्याच्यांवर दबाव असतो. यामुळे ते आपली भूमिका समितीसमोर मांडू शकत नाही. अशा पध्दतीने कोणावरही अन्याय होऊ नये म्हणून समिती नेहमी दक्षता घेत असते. समितीकडे असा विषय आल्यानंतर सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन, माहिती घेऊन समितीकडे अहवाल सादर करावा जेणेकरुन संबंधित अधिका-याला नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आपली भूमिका मांडता येऊ शकेल अशा प्रकारे समिती भूमिका घेत असते. या संदर्भात एका अधिका-याकडून समितीकडे पत्र आलेले आहे. ते समितीने शासनाकडे दिलेले आहे. नवीन अधिकारी असतो, त्यांना काम करण्याची इच्छा असते. यामुळे आपली भूमिका किमान शासनाने ऐकून घ्यावी अशी त्यांची इच्छा असते. एखाद्या निर्दोष अधिका-यावर कारवाई होता कामा नये. या प्रकरणी चौकशी करुन तो अधिकारी शासनाकडे न्याय मागत आहे यावर शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी स्पष्ट केले की, नैसर्गिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने सर्व प्रक्रिया करुन कार्यवाही केली जात आहे.

या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी प्रस्ताव पाठविल्यानंतर आयुक्तांकडून अभिप्राय घेतलेला आहे. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. या प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करावीच लागेल ही बाब स्पष्ट झाली आहे. तद्नंतर प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी सदरहू प्रकरणात अनुसरावयाची कार्यपध्दती समितीस विषद केली की, या संदर्भात एक अहवाल तयार झालेला आहे. विभाग यासंबंधी कार्यवाही करीत असते. संबंधित पुरवठादार विभागाकडे पावती देत असतो. त्यानंतर सक्षम अधिकारी त्यांच्या मान्यतेने आदेश देत असतात. त्यानंतर बजेट आहे किंवा नाही तसेच पावती बघून बिलांची रक्कम अदा केली जाते. प्रस्तुत प्रकरणी तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिका-यांचा काही दोष आहे असे समितीस प्रथमदर्शनी वाटले नाही. या प्रकरणी सक्षम अधिका-यांचे मंजुरी आदेश आहेत. पुरवठादाराच्या पावत्या आहेत व बजेटसुध्दा आहे.

दि. ३० मार्च रोजी ऑर्डर दिली जाते आणि लगेच दि. ३१ मार्च रोजी देयक अदा कसे केले जाते या समितीच्या आक्षेपावर १०० टक्के मालाचा पुरवठा न केल्यामुळे पेमेंट झालेले नाही. परंतु, पुरवठादाराच्या नावे पेमेंट काढून ठेवलेले आहे असे स्पष्टीकरण समितीस देण्यात आले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिक स्पष्टीकरण केले की, रेकॉर्ड मिळाल्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी देयक अदा केलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. खोटे रेकॉर्ड तयार केले म्हणून ते प्रकरण विभागीय चौकशीसाठी पाठविले आहे.

समितीने पुढे सूचना केली की, हे प्रकरण दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजीचे आहे. विभागीय चौकशी ६ महिन्यात पूर्ण केली पाहिजे. समितीच्या सूचनेवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद नांदेड शिक्षणाधिकारी यांच्या विरुद्ध शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला असून आता विभागीय चौकशी सुरु होईल. असे स्पष्टीकरण दिले. त्यानंतर ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी देखील अधिक स्पष्टीकरण दिले की, हा स्थानिक निधी लेखा याचा मुद्दा आहे. त्यांनी पंचायती राज समितीची वाट न बघता त्यांच्या पातळीवर कार्यवाही करावी. त्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची समिती तयार केलेली आहे. मागील एका वर्षापासून याला गती मिळालेली आहे आणि याला आणखी गती मिळेल. याचे परिक्षण करण्यासाठी सचिव, शालेय शिक्षण यांच्या कार्यालयात पूर्णवेळ अधिकारी नियुक्त केलेला आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, लेखी उत्तरात असे नमूद केलेले आहे की, विविध शाळांमध्ये १०१६ ड्युल डेस्क वापरात आहेत. सदर पुरवठा केलेल्या ड्युल डेस्कचे देयक रु.२७,९२,२७३/- अद्याप अदा करण्यात आले नाही. पुरवठादाराने विहित कालावधीत १०० टक्के मालाचा पुरवठा न केल्यामुळे पुरवठादारास देयक अदा करण्यात आलेले नाही. ड्युल डेस्कचा अपुरा पुरवठा केल्याबाबत मे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना नोटीस देण्यात आलेली असून सदरील संस्थेस पुरवठादाराच्या काळ्या यादीमध्ये टाकण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.१२०४९, दिनांक १६/१२/२०१५ अन्वये उद्योग सह संचालक (भा.ख.) याना शिफारस करण्यात आलेली आहे. यासंदर्भात पुढे कोणती कारवाई केली आहे यावर महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सदस्य सचिवांनी समितीस विदित केले की, त्यांनी १०१६ नग दिलेले आहेत. त्यांना त्याचे बिल दिलेले नाही. जिल्हा परिषदेने या संदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी उद्योग संचालनालयाकडे पत्र पाठविलेले आहे की, मे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना काळया यादीत टाकावे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे छोटे उद्योग रजिस्टर होतात आणि ऑर्डर असेल तर त्या वस्तूंचा ते पुरवठा करतात. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाला काळ्या यादीत टाकले तर त्यांच्याशी जे उद्योग संलग्न आहेत ते बंद होतील. ज्यावेळी करणे आवश्यक आहे अशा अनेक प्रकरणांमध्ये पुरवठादाराला काळ्या यादीत टाकलेले आहे. खादी ग्राम उद्योग मंडळाला काळ्या यादीत टाकले तर अनेक लघु उद्योग बंद होतील.

समितीच्या मते एखादा पुरवठादार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाला अडचणीत आणणार असेल तर त्या पुरवठादाराला काळया यादीत टाकले पाहिजे. मंडळाने प्रत्येक उद्योगाला सम प्रमाणात ऑर्डर द्यावयास पाहिजे होती. एकूण ७,२७७ डयुल डेस्क पुरवठा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. मंडळाने दोन-चार पुरवठादारांना आदेश द्यावयास पाहिजे होते. एकाच पुरवठादाराला आदेश दिल्यामुळे ते पुरवठा करु शकले नाही. हे काम महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळाच्या अधिका-यांचे आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी समितीस विदित केले की, दिनांक ०१.०२.१९९२ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासनाच्या विविध विभागांना लागणा-या लाखो रुपयांच्या वस्तूंचा पुरवठा उत्पादक मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत केला जातो. त्यासाठी वस्तू आरक्षित केल्या जातात. ड्युल डेस्क ही बाब खादी मंडळाने आरक्षित केलेली होती. प्रती डेस्क २,७४८ रुपये किंमत ठरविण्यात आली होती. नांदेड जिल्हा परिषदेने दिनांक १४.०३.२०१२ रोजी मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे ७,२७७ ड्युल डेस्कची ऑर्डर दिली होती. खादी बोर्ड स्वतः मालाचा पुरवठा करीत नाही. जिल्हा परिषदेने ऑर्डर दिल्यानंतर ती ऑर्डर प्राप्त झाल्यानंतर त्या भागात जो उद्योजक असेल तो त्या मालाचा पुरवठा करु शकतो काय हे तपासून त्याला ऑर्डर दिली जाते. खादी मंडळाची भूमिका समन्वयकाची आहे. या उत्तरावर समितीने आक्षेप घेत पुढे विचारणा केली की, डेस्क तयार करणा-या किती कंपन्या होत्या आणि एकाच कंपनीला ऑर्डर का दिली, मंडळाने त्यांना पत्र दिले आणि त्यांनी नकार दिलेला आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्राम उद्योग मंडळ यांनी समितीस माहिती दिली की, त्या काळात ड्युल डेस्क तयार करणारे किती उद्योजक होते याची माहिती माझ्याकडे नाही. मी जानेवारी, २०१३ पासून तेथे आहे. नाशिक, इचलकरंजी, पुणे अशा ठिकाणी ड्युल डेस्क तयार करणारे उद्योजक आहेत. ही घटना सन २०१२ मधील आहे. त्यावेळी तेथे इतरही उद्योजक होते. ही ऑर्डर एकाच उद्योजकाला का दिली गेली याचा कागदपत्रावर कोठेही उल्लेख नाही. जिल्हा ग्रामोद्योग अधिका-यामार्फत त्या उद्योजकाची मालाचा पुरवठा करण्याची क्षमता आहे किंवा नाही हे बघण्यात आले होते. तो मालाचा पुरवठा करु शकतो किंवा नाही हे बघून त्यांना ऑर्डर देण्यात आलेली आहे.

समितीच्या मते महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची सर्व उद्योगांना चालना देण्याची भूमिका असली पाहिजे. परंतु, त्यावेळी मंडळाकडून ही भूमिका पाळण्यात आलेली नाही. दोन-तीन उद्योजकांकडून मालाचा पुरवठा करुन घेतला असता तर निश्चितपणे विद्यार्थी वंचित राहिले नसते. शिक्षणाधिका-यांबरोबर खादी ग्रामोद्योग विभागाचे अधिकारी देखील यासाठी तेवढेच कारणीभूत आहेत. खादी ग्रामोद्योग ही शासनाची संस्था आहे. दुस-या विभागाचे असे म्हणणे आहे की, त्या संस्थेला काळया यादीत टाकावे. असे असताना आजपर्यंत संबंधित उद्योजकावर कारवाई का केली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी समितीस विदित केले की, सन २०१२ मध्ये कोणती परिस्थिती निर्माण झाली होती तसेच सर्वांना सम प्रमाणात ऑर्डर का दिली गेली नाही, याबाबत मी भाष्य करु शकत नाही. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्या अशा उत्तरावर तिव्र नापसंती व्यक्त केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, बोर्डाचा ठराव असा आहे की, जो उद्योजक ऑर्डर आणेल त्यालाच ती ऑर्डर देण्यात यावी. तरी देखील बोर्डाचा हा निर्णय योग्य नसला तरी सन २०१३ ते २०१५ या काळात कोणत्याही उद्योजकांने ऑर्डर आणलेली असो, प्रत्येक माणसाची कार्यक्षमता लक्षात घेऊन सर्व ऑर्डर वाटून दिलेल्या आहेत.

सचिव, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी समितीस विदित केले की, पुरवठादाराने १०१६ बेंचचा शॉर्ट सप्लाय केल्यामुळे त्याच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. समितीच्या दौ-यानंतर जिल्हा परिषदेने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये मंडळाला पत्र पाठविले आहे. सदरहू पत्र समितीची साक्ष लागल्यानंतर कार्यालयास प्राप्त झाले व त्यानंतर पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली. महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळाकडून पुढील १५ दिवसात संबंधितावर कोणती कारवाई करावयाची आहे याबाबत निर्णय घेऊन ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यासह इतर कारवाई पुढील ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येईल. नवीन धोरणानुसार लघु उद्योगामार्फत २० टक्क्यांचे प्रमाण पुरवठा करण्याकरिता राखून ठेवण्यात येते. सदरहू प्रकरणी टेंडर प्रक्रिया राबविण्यात येत असली तरी त्यामध्ये केव्हीआयपी किंवा एमएसएसआयडीसी सारख्या संस्था भाग घेऊ शकतात व एल-१ च्या रेटमध्ये ३० टक्के पुरवठा करु शकतात. लहान उद्योजकांकडून पुरवठा करण्याकरिता एक वेब पोर्टल एमएसएसआयडीसीकडून तयार करण्यात येत आहे. अशा पध्दतीने एमएसएसआयडीसीकडून छोट्या लघु उद्योजकांना मार्केट उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

समितीने पुढे विचारणा केलीकी, पुरवठादाराला पुरवठा करण्याची ऑर्डर देण्यापूर्वी तो मालाचा पुरवठा करु शकतो, याची खात्री करण्यात आली होती का यावर मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी समितीस माहिती दिली की, होय. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, हिंगोली यांना पुरवठादार मालाचा पुरवठा करु शकतात किंवा नाही, याबाबत विचारणा करण्यात आली होती. सदरहू प्रकरणी पुरवठादार पुरवठा करु शकतील असा अहवाल त्यांनी दिला होता. समितीने पुढे विचारणा केली की, सदरहू अधिकारी यांनी चुकीचा अहवाल पाठविला असल्याने ते दोषी आहेत, असे आपणास वाटत नाही का यावर मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी समितीस विदित केले की, पुरवठादाराने सांगितले आहे की, सागवानाचे दर, लोखंडाचे दर वाढलेले आहेत, त्यामुळे पुरवठा करणे शक्य नाही. पुरवठादाराने ऑर्डर घेताना मालाचा पुरवठा करण्याची तयारी दर्शविली होती व तीन महिन्यांनंतर मालाचा पुरवठा करण्यास असहमती दर्शविली आहे. पुरवठादाराची भूमिका कायद्याच्या चौकटीमध्ये योग्य आहे किंवा कसे, याची तपासणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित पुरवठादारास नोटीस पाठवून त्याची बाजू ऐकून घेण्यात येईल व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ यांनी समितीस पूढे विदीत केले की, माहे डिसेंबर, २०१२ मध्ये जिल्हा परिषद, नांदेड यांना कळविण्यात आले होते की, सदरहू उद्योजक उर्वरित मालाचा पुरवठा करु शकणार नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेने इतर पुरवठादाराकडून माल खरेदी करण्यासंदर्भातील कार्यवाही करावी. यावर समितीने असहमती व्यक्त करत विचारणा केली की, सुरुवातीला पुरवठ्याच्या संदर्भात आपल्या ग्रामोद्योग मंडळाने जबाबदारी स्वीकारली होती ती आता मंडळ जिल्हा परिषदेवर का टाकत आहे. ग्रामोद्योग मंडळामार्फत इतर उद्योजकाकडून उर्वरित डेस्कचा पुरवठा का करुन देण्यात येत नाही यावर मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी समितीस विदित केले की, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने विभागाने सदरहू प्रकरणी सन २०१२ मध्ये जिल्हा परिषदेला पत्र दिले आहे. नोंदणीकृत असलेले अनेक उद्योजक डेस्कचा पुरवठा करु शकतात. सदरहू डेस्कचा पुरवठा जिल्हा परिषदेला पाहिजे असेल तर आम्ही तो करण्यास तयार आहोत. समितीने प्रस्तुत प्रकरणी निदेश दिले की, सन २०१२ मध्ये असलेला दर आज नसल्याने जिल्हा परिषद आज डेस्कची खरेदी करुन शकत नाही कारण ते खरेदी करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नाहीत. याप्रकरणी विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असल्याने शिक्षण विभागाचे, केव्हीआयपीचे संबंधित अधिकारी व उद्योजक यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन अनुपालन अहवाल समितीला सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद नांदेडने दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी रुपये १,९९,९९.३८०/- चे रुपये ७,२७७/- डयुल डेस्ककरीता सन २०११-१२ या वर्षामध्ये नावीन्यपुर्ण योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, नांदेड यांच्याकडून आदेश क्रमांक १२९१, दिनांक २.१.२०१२ अन्वये जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांकरिता रुपये २,००,००,०००/- ची तरतुद वितरीत करुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्याबाबतच्या ठरावास दिनांक १९.१२.२०११ रोजी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ४७३ अन्वये तांत्रिक मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार उद्योग सहसंचालक, विकास आयुक्त, उद्योग यांचे दिनांक ३०.८.२०११ रोजीचे दरकरारानुसार महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई यांना रुपये २७४८.३० पैसे प्रमाणे जिल्हापरिषदेने पुरवठा आदेश क्र.२९३६, दिनांक १४.३.२०१२ नुसार दिनांक ३१.३.२०१२ पर्यंत पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, सदरचा कालावधी विचारात घेता पुरवठादाराने डयुल डेस्कचा पुरवठा करणे

कदापीही शक्य नाही असे असूनही पुरवठादाराने दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत १०१६ डयुल डेस्कचा पुरवठा केला आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी पुरवठादाराचा कोणताही दोष समितीला दिसून येत नाही. कारण पुरवठादारास केवळ १८ दिवसाची मुदत दिली होती ती मुदत कमीत कमी ६ महिने देणे आवश्यक होते.असे असूनही पुरवठादार यांनी केवळ १८ दिवसात १,०१६ डयुल डेस्कचा पुरवठा केला होता. महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम ७९ अन्वये तात्काळ संवितरणासाठी आवश्यक असलेल्याखेरीज पैसे काढण्यात येऊ नयेत तसेच नियम ९० मधील नियम क्रमांक ३१ मध्ये प्राप्त साहित्याच्या नोंदी घेतल्यानंतरच देयकाचे प्रदान करण्यात येईल अशी तरतुद असूनही दिनांक ३१.३.२०१२ मध्ये धनादेश तयार करुन ठेवण्यात आला होता. परंतु सदरील पुरवठादाराने सुरुवातीला ७२७७ डयुल डेस्कपैकी केवळ १०१६ डेस्क पुरवठा करुन रुपये २७,९२,२७३/- ची मागणी केली होती. संबंधितांस दिलेल्या खरेदी आदेशानुसार १००% मालाचा पुरवठा न केल्याने नमुना क्रमांक ३२ मध्ये नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच त्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे देयक अदा करण्यात आलेले नाही अशी माहिती समितीसमोर आली आहे.

या प्रकरणी सन २०११-१२ मध्ये नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समिती नांदेडने ग्रामिण भागातील विद्यार्थी उपस्थिती वाढण्यास मदत होईल या उद्देशाने जिल्हा परिषद शाळांना डयूल डेक्स उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. डयूल डेस्क खरेदीकरीता जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेने दिनांक १२.१२.२०११ रोजी तांत्रिक मान्यता दिली. उद्योग विभागाच्या दर करारानुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाला प्रती डेस्क रुपये २७४८.३० पैसे प्रमाणे ७२७७ डेस्क पुरविण्याकरिता दिनांक ४.३.२०१२ रोजी आदेश देण्यात आले. त्या ७२७७ डेस्कचा दिनांक ३१.३.२०१२ पर्यंत पुरवठा करणे बंधनकारक होते. परंतु पुरवठादाराने दिनांक ३१.३.२०१२ रोजी पर्यंत केवळ १०१६ डयूल डेस्कचा पुरवठा केला. तथापि, खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या आगावू पावतीच्या आधारे जिल्हा परिषदेने दिनांक ३१.३.२०१२ रोजी पूर्ण रकमेचा म्हणजेच १,९९,९९,३८०/- रुपयांचा धनादेश काढून ठेवला. तथापि, पुरवठादाराने १०० टक्के पुरवठा केला नसल्यामुळे व नमुना ३२ मध्ये नोंदी घेतल्या नसल्याने व पुरवठा पूर्ण झाला नसल्यामुळे धनादेश रद्द केला.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या अधिका-यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, 'जो पुरवठादार मागणीपत्र घेवून येईल त्यालाच पुरवठयाचे आदेश द्यावेत' असा निर्णय मंडळाने ठराव करुन घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणात पूरवठादार ७२७७ डयूल डेस्कचा पुरवठा करु शकतो असे अभिप्राय जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, हिंगोली यांनी दिले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. डयूल डेस्कच्या प्रकरणी जबाबदारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची असून त्यांनी संबंधित पुरवठादार उर्वरित मालाचा पूरवठा करु शकणार नाही. तेव्हा इतर उद्योजकांमार्फत डेस्कच्या पुरवठयाची तयारी असल्याचे सन २०१२ मध्ये पत्र दिले असल्याचे समितीच्या निदर्शनास आणून दिले आहे.

डयुल डेस्क खरेदी प्रकरणामध्ये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई ही संस्था पुरवठादार कंपनी आणि जिल्हापरिषद दरम्यान समन्वयाची भूमिका वटवत होती. राज्यातील छोटे-छोटे लघु उद्योजक जे आपला माल तयार करतात अशा लघु उद्योजकांना बाजारपेठ मिळेल व त्यांच्या मालाची विक्री व्हावी.

या उद्देशाने राज्य शासनाने मंडळाची निर्मिती केलेली आहे. या मागे राज्य शासनाचा दूरदृष्टीचा निर्णय होता. राज्यात लघु उद्योग वाढावेत, लघु उद्योगांतून जास्तीत जास्त रोजगार निर्मिती व्हावी व त्याद्वारे राज्याची प्रगती व्हावी हा देखील उद्देश सदरचे मंडळ स्थापन करण्यामागे राज्य शासनाचा होता. सदरहू उद्दिष्टाप्रमाणे या मंडळात कार्यरत असणा-या अधिका-यांनी राज्य शासनाच्या सदरहू भूमिकेतून कार्य करणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. कारण या प्रकरणी जिल्हा ग्रामीण उद्योग अधिकारी, हिंगोली यांनी उक्त पुरवठादार कंपनी संबंधित ७२७७ डयूल डेस्क पुरवठा करु शकते असे अभिप्राय महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांना दिले होते. त्यावरुन सदर मंडळाने उक्त पुरवठादार कंपनीची शिफारस जिल्हा परिषदेकडे केली होती. जिल्हापरिषदेने पुरवठ्याकरिता लेखी करार करुन घेतला होता. याचाच अर्थ महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातील अधिका-यांनी संबंधित पुरवठादाराचे भागभांडवल किंवा पुरवठा करण्याची क्षमता ह्या सर्वबाबी तपासून मंडळाला त्याची शिफारस केली. तथापि, उक्त पुरवठादाराने १०१६ डयुल डेस्क पुरवठा केले आणि त्याबाबतचे देयक अदा करण्याबाबत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास कळविले. त्याचप्रमाणे लाकूड व लोखंड या साहित्याचे भाव वाढल्यामुळे करारात नमूद केलेल्या दराप्रमाणे पुढील मालाचा पुरवठा करणे शक्य होणार नाही असे कळविले यावेळी पुरवठादारास पुरवठा देण्यास केवळ १८ दिवसांचा कालावधी दिला होता हा देखील विचार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने गांभीर्याने करणे आवश्यक होते. कारण पुरवठादार हा लघु उद्योजक होता. त्याचे भागभांडवल अर्थातच मर्यादीत स्वरुपाचे असणार त्यामुळे त्यांनी उर्वरित

मालाचा पुरवठा करण्यास अल्प कालावधीमुळे असमर्थता व्यक्त केली असेल असे समितीला वाटते. जर मंडळाने पुरेसा कालावधी देऊन या पुरवठादाराबरोबरच इतरही पुरवठादाराची नेमणूक केली असती तर सुमारे ७२७७ डेस्क हे करारात नमूद केलेल्या कालावधीत जिल्हापरिषदेला पुरवठा करणे शक्य झाले असते असेही समितीचे ठाम मत आहे. तथापि, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, हिंगोली यांनी पाठविलेल्या अहवालावरुन मंडळाने त्याची काहीही खातरजमा न करता सदर पुरवठादारासमवेत करार केला. त्यास डयुल डेस्क पुरवठा करण्याचे काम दिले ही बाब तेवढीच सत्य आहे. या प्रकरणी जिल्हा परिषदेने केवळ मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार कारवाई केली असल्याचे दिसून येत आहे. कारण सदरची डेस्क पुरवठ्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची होती. या प्रकारच्या सर्वबाबी तपासण्याची यंत्रणा जिल्हापरिषदेकडे नसून महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे आहे असे समितीचे ठाम मत आहे. जिल्हापरिषद केवळ मागणी करते व पुरवठ्याप्रमाणे त्याबाबत रक्कम अदा करते हीच बाब येथे प्रामुख्याने नमूद करावीशी वाटते. म्हणून या प्रकरणी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सर्व संबंधित अधिका-यांना जबाबदार धरण्यात यावे अशी समितीची ठाम भूमिका आहे. कारण महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी यथोचितरित्या व कार्यतत्परतेने पार पाडली आहे असे दिसून येत नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर डयुल डेस्क पुरवठा केला गेला. ही बाब संबंधित अधिका-यांनी गांभीर्याने घेतल्याचे आढळून आले नाही. जिल्हा परिषदेकडे निधी असताना केवळ डयुल डेस्क पुरवठा न झाल्यामुळे त्याबाबतचा निधी संबंधीतांना दिला गेला नाही. यामध्ये ज्या उदात्त हेतूने जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर करुन निधीबाबत जिल्हा नियोजन समितीकडे मागणी केली व उक्त समितीने देखील जिल्हापरिषदेची मागणी पूर्ण केली. परंतू तो हेतू येथे सफल झाला नाही. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना या सुविधेपासून वंचित रहावे लागेल ही बाब समिती अत्यंत गांभीर्याने घेत आहे. केवळ तांत्रिक दृष्टया शिक्षण अधिका-याने संबंधित मालाच्या पुरवठ्याच्या निधीचा चेक तयार करुन ठेवला म्हणून त्या अधिका-यावर कारवाई करणे ही बाब समितीस योग्य वाटत नाही. वर्षा अखेरीस किती खर्च करावयाचा यासंबंधीची स्पर्धा शासनाच्या प्रत्येक विभागामध्ये होताना दिसून येते. या प्रकरणी सदरचा निधी दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत खर्च करणे आवश्यक असल्याचे व त्या कालावधीत डयुल डेस्कचा पुरवठा करण्याचा करार असल्यामुळे शिक्षण अधिका-याने सदरचा पैसा तत्परतेने वितरीत करण्यासाठी तयारी ठेवली. यामध्ये निश्चितच मालाचा पुरवठा झाल्यानंतर संबंधित लघु उद्योजक किंवा पुरवठादारास त्याचा निधी मिळावा हा हेतू असल्याचे प्रामुख्याने समितीला वाटते. परंतु खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या अधिका-यांनी पुरवठादाराची डयुल डेस्क तयार करण्याची क्षमता विचारात न घेता केवळ एका पुरवठादारास संपुर्ण कंत्राट देण्याबाबत तयार असल्याचे मंडळास कळविले व मंडळाने देखील याबाबत डोळेझाक करुन करारास मुर्तस्वरुप देणे ही बाब समितीला अनाकलनीय वाटते. **विभागीय सचिवांनी समितीसमोर साक्ष देताना 'आमच्याकडे त्यावेळेला राज्यामध्ये इतरत्र डयुल डेस्क पुरवठा करणारे उपलब्ध होते' अशी माहिती समितीला दिली. याप्रकरणी मंडळाच्या संबंधित अधिका-यांवर ठपका ठेऊन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हापरिषदेने सुमारे ७२७७ डयुल डेस्क पुरवठयाबाबतचे पुरवठा आदेश दिल्यानंतर त्यातील केवळ १०१६ डयुल डेस्क पुरवठादाराने जिल्हापरिषदेला सुपर्द केले. सदरचे डयुल डेस्क आजपर्यंत जिल्हापरिषदेने वापरले आहेत. या डयुल डेस्कची किंमत रुपये २७,९२,२७३/- इतकी निश्चित केल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. सदरची रक्कम लघुउद्योजकाने मंडळाकडे मागणी केली होती. तथापि, मंडळाने संपूर्ण डेस्कचा पुरवठा केला नसल्यामुळे ती मागणी मान्य केली नाही. असे असताना लघुउद्योजकांच्या संदर्भात शासनाच्या धोरणाची महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून पायमल्ली झाली असेही समितीला वाटते. शासन ज्या लघुउद्योजकांना प्रोत्साहन देते त्या लघुउद्योजकाने १०१६ डयुल डेस्क पुरवठा केला. त्याचवेळी त्यांनी मागणी केलेल्या बाबीची पुर्तता केली असती तर अजून डेस्कचा पुरवठा केला असता. परंतु तसे होताना दिसत नाही. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून पुरवठादार लघुउद्योजकासमवेत सहकार्याची भूमिका घेणे आवश्यक आहे. तथापि, अशा प्रकारणी या लघुउद्योजकांना संपविण्याची शक्यता दिसून येते. सुमारे सत्तावीस लाख रुपये किंमतीचे डयुल डेस्क तयार करणा-या व्यक्तीस त्याचे पैसे वेळेवर मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी ४ वर्षे विलंब लागत असेल तर त्याची विवंचना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या लघुउद्योजकाने कोणाकडून कर्ज घेतले असेल, त्यासाठी बँक अथवा उसणवारीचे पैसे घेतले असतील प्रसंगी बँकेकडून त्याच्याकडील मालमत्तेची जप्ती देखील झाली असेल याचा देखील सहानुभूतीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. ड्युल डेक्सच्या कामासाठी पैसे खर्च केले असतील, परंतु तो खर्च केलेला पैसा लघुउद्योजकास जर मोबदला रुपाने मिळत नसेल तर असे लघुउद्योग चालणार कसे, त्यांची प्रगती कशी होईल तसेच लघु उद्योगांवर अवलंबून असणा-या रोजगारांची स्थिती काय राहील या विवंचनेत समिती आहे.

सदरचा पुरवठा पुरवठादाराने ४ वर्षापूर्वी केला ही बाब गृहीत धरली असता त्या रक्कमेच्या व्याजासह त्यांनी घेतलेल्या कर्जाचे व्याज किती झाले असेल त्याचा त्याला किती त्रास होत असेल ही बाब देखील विचारात घेणे महत्वाचे आहे. खरे म्हणजे या खरेदी प्रकरणी मंडळावर एक समन्वयक व लघुउद्योजकांना प्रोत्साहन देण्याची भूमिका सोपविलेली असताना या उद्देशाला महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातील काही अधिका-यांनी हरताळ फासला आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातील अधिकारी अशा प्रकारे काम करीत असल्यास ते या व इतर प्रकरणामध्ये लघु उद्योजकांना संपविण्याचा प्रकार तर करीत नाही ना असे समितीला वाटत आहे. म्हणून या मंडळातील अधिका-यांची कार्यक्षमता, जबाबदारी व हेतू इत्यादी बाबत समितीच्या मनात शंका उत्पन्न होत आहे. म्हणून या मंडळातील अधिका-यांच्या कार्यक्षमतेबाबत शंका घेण्यास वाव आहे. विभागीय सचिवांनी सांगितले की, नवीन धोरणानुसार लघु उद्योगामार्फत एकूण पुरवठ्यापैकी पुरवठा करण्याकरिता २० टक्के पर्यंत प्रमाण राखून ठेवण्यात येते. सदरहू प्रकरणी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असली तरी त्यामध्ये खादी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ या सारख्या संस्था या प्रकरणामध्ये भाग घेऊ शकतात व एल-१ च्या रेटमध्ये ३०% पुरवठा करु शकतात. लहान उद्योजकांकडून पुरवठा करण्याकरिता एक वेब पोर्टल मंडळाकडून तयार करण्यात येत आहे. अशा पध्दतीने मंडळाकडून छोटया लघु उद्योजकांना मार्केट उपलब्ध करुन देण्याबाबत धोरण करण्यात येत आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

**राज्य शासनाची धेय धोरणे राज्य शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत बाजारपेठ मिळणे. तसेच लघुउद्योजक बाजारपेठेत टिकून राहणे यासाठी सचिवांनी खरेदीबाबत प्रक्रिया नमूद केली आहे. त्यामध्ये या प्रकरणात आलेल्या अनुभवाचा देखील विचार करावा व त्या दृष्टीने त्याबाबत लघुउद्योजकाला हक्काची, सोयीस्कर व सुरक्षित बाजारपेठ कशी मिळेल याचा त्यामध्ये अंतर्भाव करावा व सदरचे धोरण लवकरात लवकर शासनाने जाहीर करावे अशी समितीची शिफारस आहे.**

प्रस्तुत प्रकरणात सन २०१२ मध्ये सदरची प्रक्रिया पूर्ण होऊन केवळ तांत्रिक दृष्टया संपूर्ण डयुल डेक्सचा पुरवठा न केल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. जिल्हा नियोजन समितीने व जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेने एक नाविन्यपूर्ण योजना म्हणून ज्या उदात्त हेतूने व उस्फुर्ततेने सदरचा निधी मंजूर केला त्या उस्फुर्ततेने खादी ग्रामोद्योग मंडळाने कामे केली नाही. केवळ अधिका-यांच्या अकार्यक्षमतेमुळे लघुउद्योजकांना नाहक वेठीस धरण्याच्या भूमिकेमुळे जिल्हापरिषदेच्या अधिका-यांनी निधी तयार ठेऊन देखील त्याबाबतचा पुरवठा न होणे हे दुर्दैव आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या अधिका-यांच्या या भूमिकेमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे असे समितीचे ठाम मत आहे. सदरचा निधी शासनास परत गेला आहे. आता मालाचा भाव वाढलेला आहे. ज्या लघुउद्योजकांनी या प्रकरणी आपले भांडवल गुंतवून थोडया प्रमाणात का होईना डयुल डेस्क पुरवठा केला. त्याचे देखील नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत न्याय देणे जिकरीचे झाले आहे. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीने पुन्हा डयुल डेस्क पुरवठा करण्याकरिता निधी मंजूर करावा. तसेच सदरची योजना नाविन्यपुर्ण असल्यामुळे या योजनेचा राज्यातील इतरही जिल्हापरिषदेतील विद्यार्थ्यांना लाभ कसा होईल याची देखील दुरदृष्टी विभागाने ठेवावी या प्रकरणी जिल्हा नियोजन समितीने व जिल्हा परिषदेने योग्य तो निर्णय घेऊन आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देऊन सर्व विद्यार्थ्यांना डयुल डेस्क कसे उपलब्ध होतील, याबाबत तातडीने उपाययोजना करुन निधी उपलब्ध करुन देणे संदर्भात निर्णय घ्यावा व डयुल डेस्कचा पुरवठा करण्याबाबत तातडीने अंमलबजावणी करावी. त्याचप्रमाणे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, हिंगोली यांच्या अहवालाच्या आधारे लघु उद्योजकास महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने पुरवठा आदेश केला आहे. ग्रामोद्योग अधिका-याने लघु उद्योजकाचे भांडवल व त्याची क्षमता तपासणे आवश्यक होते. लघु उद्योजकांना शासनाच्या सर्वच योजनांची माहिती असते असे नाही. शासनाची विविध परिपत्रके, लेखासंहिता, त्याचप्रमाणे किचकट नियम यांची जाण देखील लघु उद्योजकांना असतेच असे नाही. उद्योजकाला त्याच्या कार्यक्षमतेवर विश्वास असतो म्हणून तो अशा करारांना संमती देत असतो. लघु उद्योजकाला अशा प्रकारे कंत्राट मिळाल्यास त्याची प्रगती होईल असा विश्वास त्याला असतो. या विश्वासाने तो अशी कामे स्विकारण्यास उत्सुक असतो अशा वेळी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या अधिका-यांनी प्रोत्साहन देऊन तो करीत असलेल्या कराराचा व त्यातील तांत्रिकबाबी देखील तपासून सांगणे आवश्यक आहे. परंतु या प्रकरणी त्या लघु उद्योजकाचा भांडवली खर्च झाला असून त्याने तयार केलेले डयूल डेस्क जिल्हा परिषद वापरत आहे. लघु उद्योजकास दिनांक १४ मार्च, २०१२ रोजी दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत पुरवठा करण्याचे आदेश दिले होते. इतक्या कमी म्हणजेच केवळ १८ दिवसात ७२७७ इतक्या मोठ्या प्रमाणावर ड्युल डेक्सचा पुरवठा जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत करणे कोणत्याही लघु उद्योजकास शक्य नाही. संबंधित अधिका-यांनी याबाबतीचा थोडा तरी विचार करणे आवश्यक होते. **इतक्या मोठ्या प्रमाणावर पुरवठा असताना**

पुरवठादारास कमीत कमी सहा महिने तरी कालावधी देणे आवश्यक होते. तथापि, केवळ १८ दिवसाचा कालावधी देवून या लघु उद्योजकास वेठीस धरण्यात आले आहे असे समितीचे ठाम मत असून या प्रकरणी सर्वंकष चौकशी करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

केवळ करारातील अट म्हणून पुरवठादारास शिक्षा देऊन त्याचा लघु उद्योग संपवण्याचे शासनाचे धोरण नाही. त्यामुळे याबाबत विभागाने तातडीने निर्णय घेऊन सदर लघु उद्योजकाची सुमारे २७,९२,२७३/- इतकी रक्कम त्याने पुरवठा केल्याच्या तारखेपासून व्याजासह संबंधित विभागाने तातडीने लघु उद्योजकास एक महिन्यात अदा करावी शक्य झाल्यास अशा लघु उद्योगासह जिल्ह्यातील व राज्यातील इतर लघु उद्योगांस डयुल डेस्क पुरवठा करण्याबाबत आजमावावे व त्या प्रकरणी कारवाई करावी अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी.

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, नांदेड

### शालेय पाटी खरेदीतील अनियमितता बाबत

**(परिच्छेद ३.१६१) (सन २०११-१२)**

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नांदेडमध्ये मुळ परिच्छेदात नमुद केलेल्या प्रमाणकान्वये रुपये २३,२४,२६८/- प्रदान केले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/ प्र.क्र४४४/वित्त-९, दिनांक १५ सप्टेंबर २००८ अन्वये सदरील योजनेसाठी मा.अध्यक्ष, स्थायी समिती जिल्हा परिषद यांना अधिकार आहेत. तथापि सदरील योजनेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबद्दल सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी दर्शविणे आवश्यक आहे.

२. उक्त शासन निर्णयाच्या टिप क्रमांक १ नुसार उक्त प्रशासकीय मान्यतेची माहिती पुढील विषय समितीस/स्थायी समितीस अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येते.

३. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००९/ प्र.क्र.५१४/वित्त-९, दिनांक २० नोव्हेंबर २००९ अन्वये उक्त साहित्य खरेदीचा करार करण्यासाठी रुपये १५००/- चे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना केवळ रुपये १००/- च्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. त्यामुळे रुपये १४००/- चे कमी मुद्रांक घेतल्यामुळे झालेल्या नुकसानीची वसुली होणे आवश्यक आहे.

४. उक्त शालेय पाटी पुरवठ्यासाठी दिनांक ३० मार्च २०१२ रोजी पुरवठा आदेश व दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी मालाचा पुरवठा केल्याबाबत संचिकेत आढळुन आले. दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजीचा पुरवठा आदेश असतांना त्याच दिवशी त्याचा चाचणी अहवाल प्राप्त होणे शक्य नसे देयक अदाईसाठी साहित्य प्राप्त झाल्याचे व साहित्याची गुणवत्ता तपासल्याचा आभास निर्माण केल्याचे दिसून येते.

५. वारंवार मागणी करुनही ११ पंचायत समित्यांनी शालेय पाट्या प्राप्त झाल्याबद्दल साठा नोंदवही दर्शविली नाही. तथापि, पंचायत समिती मुदखेड, नायगाव, हिमायतनगर व माहूर यांची डिलीव्हरी चालाने ३१ मार्च २०१२ ची आहेत. परंतू त्यांच्या साठा नोंदवह्या तपासल्या असता त्यांना साहित्य उशीरा म्हणजे एप्रिल, जूनमध्ये प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांना दंड ५ टक्के प्रमाणे रुपये २२,५०२/- वसूल करणे आवश्यक आहे.

६. आयकर अधिनियम १९६१ चे नियम १९४सी अन्वये २.३ टक्के आयकर कपात करुनच संबंधितास देयकाची रक्कम अदा करावयाची आहे. सदरील देयकातून कपात न केलेली आयकर रक्कम रु.५३,४५८/- वसूल होणे आवश्यक आहे.

७. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.पंरास-१०२०/प्र.क्र.५०१३ /३८, दिनांक ३० मार्च २००० अन्वये आर्थिक वर्षाच्या अखेरीस नियोजनाअभावी कोणत्याही प्रकारची खरेदी करण्यात येवू नये असे असतांनाही उक्त साहीत्याचे खरेदी आदेश मार्चच्या शेवटी दिले असून साहीत्य प्राप्त नसतांना रक्कमेचे प्रदान केले असल्यामुळे योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

८. पंचायत समिती मुदखेड, नायगांव, हिमायतनगर व माहूर यांना पुरवठा झालेल्या पाट्यांपैकी काही पाट्यांचे वाटप लेखापरिक्षण दिनांकापर्यंत झाले नसल्यामुळे योजनेचा लाभ शालेय विद्यार्थ्यांना झाला नसल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.–**

१. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र४४४/वित्त-९, दि.१५ जुलै २००८ अन्वये सदरील योजनेसाठी मा. अध्यक्ष, स्थायी समिती जिल्हा परिषद यांना अधिकार होते. तथापि, महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र४४४/ वित्त-९, दि.१५ जुलै २००८ हा शासन निर्णय रद्द झाल्याने ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय दि.१९-०३-२०१२ मधील तरतुदीनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रु.२०.०० लक्ष पर्यंत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याबाबत अधिकार असल्यामुळे तरतुदीस मान्यता घेण्यात आली. परिच्छेदामध्ये दर्शविलेली रक्कम २३,२४,२६८/- ही वेगवेगळ्या योजनेतील मंजूर असून या तरतुदीतून एकत्रित खरेदी करण्यात आलेली नाही. प्रस्तुत कार्यालयाचे पुरवठा आदेश क्र.३५०२, दि.३०-०३-२०१२ अन्वये शालेय पाटी संख्या ४३,३६९ नगासाठी एकूण रु.९,३६,७७०/- व पुरवठा आदेश क्र.३४९८, दि.३०-०३-२०१२ अन्वये शालेय पाटी संख्या ६४,२३६ नगासाठी रु.१३,८७,४९८/- ची खरेदी करण्यात आली. त्यामुळे लेखा आक्षेपात नमूद केल्यानुसार प्रशासकीय मान्यतेसाठी संचिका मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांचेकडे सादर करण्यात आली नाही.

२. रु.२०,००,०००/- पर्यंत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता बाबतचे अधिकार ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय दि.१९-०३-२०१२ नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्यामुळे स्थायी समिती व विषय समिती मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यासाठी संचिका सादर करण्यात आलेली नाही. दि.१७-०८-२०१५ रोजीच्या विषय समितीच्या बैठकीपुढे सदरील संचिका अवलोकनासाठी सादर करण्यात आली आहे.

३. रक्कम रु.१४००/- दि.२०-०८-२०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. सोबत चालानप्रत जोडण्यात येत आहे.

४. दि.३०-०३-२०१२ रोजी शालेय पाटी पुरवठा करणेसाठी आदेश देण्यात आला, पुरवठादाराकडून दि.३१-०३-२०१२ रोजी सर्व गट शिक्षणाधिकारी यांना तालुकास्तरावर शालेय पाटीचा पुरवठा करण्यात आला. दि.३१-०३-२०१२ रोजी सुपरीटेंडन्स कंपनी ऑफ इंडिया, मुंबई यांनी शालेय पाटी योग्य असल्याचा तपासणी अहवाल सादर केलेला आहे. सर्व गटशिक्षणाधिकारी यांचेकडून दि.३१-०३-२०१२ मध्ये शालेय पाटी प्राप्त झाल्याची पोच पावती प्रस्तुत कार्यालयात उपलब्ध आहेत. त्यानुसार देयक अदा करण्यात आले.

५. मुदखेड, नायगांव, हिमायतनगर व माहुर वगळता ज्या गटशिक्षणाधिकारी यांनी साठा नोंदवही दाखविलेली नाही त्यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला आहे. आज रोजी पंचायत समिती यांचेकडे साठा नोंदवही उपलब्ध आहेत.

मुदखेड, नायगांव, हिमायतनगर व माहुर या गटशिक्षणाधिका-यांचे साठा नोंदवही मध्ये डिलेव्हरी चालानची नोंद दि.३१-०३-२०१२ रोजीची आहे. परंतु साठा नोंदवह्या तपासल्या असता त्यांना साहीत्य उशीरा म्हणजे एप्रिल, जुन मध्ये प्राप्त झाल्याचे दिसुन येते. या कारणास्तव गिरीजामाता जनहीत सेवाभावी संस्था, औरंगाबाद यांना ५ टक्के दंड रु.२२,५०२/- भरणा करणेसाठी पत्र क्र.१००८९, दि.१४-०८-२०१५ अन्वये कळविण्यात आले आहे.

६. संबंधित फर्मच्या देयकानुसार आयकराच्या रक्कमेचे दायीत्व पुरवठादारावर होते. ही आयकराची रक्कम कार्यालयाने देयकातुन कपात करणे अपेक्षीत होते पण ती कपात करण्यात आली नाही ही वस्तुस्थिती आहे. या कारणासतव संबंधित लिपीकास पत्र क्र.१०२५१, दि.२१-०८-२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला आहे.

७. सन २०११-१२ मध्ये मा. शिक्षण संचालक (प्रा), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्र.४७८७, दि.०८-०७-२०११ व आदेश क्र.१३६९, दि.१५-०३-२०१२ नुसार व मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांचेकडून इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन साहीत्य पुरवठा करण्याबाबत दि.२३-०६-२०११, दि.२०-०२-२०१२ व दि.३०-०३-२०१२ अन्वये तरतुद प्राप्त झाली. शासनाकडून तरतुद माहे जून ते मार्च पर्यंत टप्या टप्याने प्राप्त झाल्याने अंतिम तरतूद मार्च अखेर प्राप्त झाल्यामुळे आर्थिक वर्षाच्या अखेरीस खर्च करावी लागली. लेखन साहीत्य दि.३१-०३-२०१२ रोजी प्राप्त झाल्याने पुरवठादारास देयक अदा करण्यात आले आहे.

८. पंचायत समिती मुदखेड, नायगांव, हिमायतनगर व माहुर या पंचायत समितीचे लेखापरीक्षण चालू असतांना पाट्याचे वाटप चालू होते ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदरच्या पाट्या विद्यार्थ्यांना लगेच वाटप करुन लाभ देण्यात आलेला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभागाच्या दि.१५ सप्टेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार योजनेस प्रशासकीय मान्यता का घेण्यात आली नाही, साहित्य खरेदीसाठी कमी रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यास कोण जबाबदार आहे, शालेय पाट्यांचा पुरवठा केल्यानंतर एकाच दिवसात त्याचा तपासणी अहवाल कसा प्राप्त झाला, शालेय पाट्या प्राप्त झाल्याची नोंद असणा-या साठा नोंदवह्या ११ पंचायत समित्यांनी लेखा परीक्षणास उपलब्ध का करुन दिल्या नाहीत, त्यास कोण जबाबदार आहे आणि देयकातून रुपये ५३,४५८/- आयकर कपात न केल्याने शासनाच्या नुकसानीला कोण जबाबदार आहे अशी विचारणा केली त्याबाबत खुलासा करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभागाच्या दि.१५ सप्टेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार योजनेला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार माननीय अध्यक्ष, स्थायी समिती, जिल्हा परिषद यांना होते. परंतु सदरहू शासन निर्णय रद्द झाल्यामुळे ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभागाच्या दि. १९ मार्च, २०१२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिका-यांना देण्यात आले. त्यानुसार त्यांची मान्यता घेण्यात आली असे समितीस स्पष्ट केले.

मुख्य कार्यकारी अधिका-यांना २० लाख रुपयांपर्यंतच्याच कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. परंतु हे काम २३ लाख २४ हजार रुपयांचे होते व हे काम २० लाख रुपयांच्या वरील असल्यामुळे शासन निर्णयातील तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिका-यांना त्या कामास प्रशासकीय मान्यता देता येत नव्हती, त्यामुळे जिल्हा परिषदेने या कामाचे दोन भाग करुन मुख्य कार्यकारी अधिका-यांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतली, ही वस्तुस्थिती असली तरी सदरहू काम हे एकूण २० लाख रुपयांपेक्षा जास्त म्हणजेच २३ लाख रुपयांचे असल्यामुळे या कामी स्थायी समितीची मान्यता का घेतली नाही या समितीच्या प्रश्नावर शिक्षणाधिकारी, प्राथमिक यांनी स्थायी समितीची मान्यता त्यावेळी घेण्यात आली नाही ही वस्तुस्थिती मान्य केली. शालेय पाटी पुरवठा करण्यासाठी दि.३०-३-२०१२ रोजी आदेश दिले, पुरवठादाराकडून दि.३१-३-२०१२ रोजी सर्व तालुकास्तरावर पाटीचा पुरवठा करण्यात आला आणि त्याच दिवशी शालेय पाटी योग्य असल्याचा तपासणी अहवाल सादर झाला. एकाच दिवशी पुरवठा व पाटी योग्य असल्याचा अहवाल मिळाला, ही फार गंभीर बाब असल्याप्रकरणी समाधानकारक खुलासा समितीस प्राप्त झाला नाही. या उलट सीएसपीओचा हा दर करार होता आणि शासनाच्या संस्थेकडूनच शालेय पाट्यांचा पुरवठा झालेला आहे, अशी उत्तरे समितीस प्राप्त झाली.

समितीने पुढे विचारणा केली की, अभिलेख उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात लेखापरीक्षकांनी ३ वेळा पत्र दिलेले असतांनासुध्दा अभिलेख का उपलब्ध करुन दिला नाही व ज्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख उपलब्ध करुन दिला नाही त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात आणि त्यावेळी तत्कालीन शिक्षणाधिकारी कोण होते, या प्रश्नावर देखील समितीस उत्तर प्राप्त होऊ शकले नाही. प्रस्तुत प्रकरणी या विषयाच्या संदर्भात सखोल चौकशी करुन यासंदर्भातील परिपूर्ण अहवाल समितीला उपलब्ध करुन द्यावा, असे समितीने भेटीच्या वेळी निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सदरहू प्रकरणी लेखा परिक्षकांनी तीन वेळा पत्रे देवूनही लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत. सदर प्रकरणाची चौकशी करुन संबंधित शिक्षण अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना निलंबित करण्याची कार्यवाही शासनाकडे प्रस्तावित करावी, या समितीच्या निदेशानुसार समितीस सादर झालेल्या अहवालात तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री.ए.वा.मडावी व तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.भोसले हे दोषी आढळून देखील त्यांचेवर कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत.

(२) या प्रकरणी एकाच दिवशी पुरवठा आदेश, साहित्य पुरवठा व शालेय पाटी उपयोगिता प्रमाणपत्र त्याच दिवशी देऊन पारीत होणे, याबाबत चौकशीत शिक्षणाधिकारी तसेच तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी दोषी असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेविरुध्द कारवाई न करण्याची कारणे काय, तसेच देयकातून

आयकर विभागाने रक्कम कपात केलेली नाही असे नमूद केले आहे, परंतू अहवालासोबत वित्त विभागाचे वरील अभिप्राय जोडण्यात आले नाहीत, याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.—**

(१) या प्रकरणात तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा) श्री.ए.वा.मडावी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत या कार्यालयाचे प्रस्ताव जा.क्र.जिपनां/शिवि/लेखा-१/११५३७/२०१५, कार्यालय शिक्षण विभाग, जि.प.नांदेड दिनांक १०-११-२०१५ व शिस्तभंगाची कारवाई करुन निलंबीत करणेबाबत या कार्यालयाचा प्रस्ताव जा.क्र.जिपनां/शिविप्रा/पंरास दौरा/१२०४१/२०१५, शिक्षण विभाग (प्रा) जिल्हा परिषद, नांदेड दि.१६-१२-२०१५ नुसार मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेविरुध्द कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्र.८६५, दि.२३-०२-२०१६ अन्वये सादर करण्यात आलेला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.—**

सदर प्रकरणी श्री. मडावी, तत्कालीन शिक्षणाधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करुन निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून प्राप्त झाला आहे. यानुसार शिस्तभंगविषयक परिपूर्ण प्रस्ताव आयुक्त शिक्षण यांचेकडून मागविण्यात आला आहे. तसेच तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याची विनंती जिल्हा परिषदेमार्फत वित्त विभागास करण्यात आली आहे.

## चौकशी अहवाल

पंचायत राज समितीने शालेय पाटी खरेदीतील अनियमिततेबाबत चौकशी करुन जबाबदारी निश्चित करणेसाठी निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने सविस्तर चौकशी अहवाल खालीलप्रमाणे आहे. सदर योजनेचा उद्देश जिल्हा परिषद शाळेतील ग्रामीण भागातील मुलांना शालेय साहीत्य उपलब्ध करुन देणे यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी उपस्थिती वाढण्यास मदत होईल म्हणून या उद्देशाने या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. सन २०११-१२ मध्ये शासनाचे विविध योजनातून विद्यार्थ्याकरिता रु. २३,२४,२६८/- ची शालेय पाटी खरेदी करण्यात आली होती. परिच्छेदामध्ये दर्शविलेली रक्कम २३,२४,२६८/- ही वेगवेगळ्या योजनेतील मंजूर असून या तरतुदीतुन एकत्रित खरेदी करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते.

मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त तरतुदी मधुन प्रस्तुत कार्यालयाचे पुरवठा आदेश क्र.३५०२ दि. ३०.३.२०१२ अन्वये शालेय पाटी संख्या ४३,३६९ नगासाठी एकूण रु.९,३६,७७०/- ची खरेदी करण्यात आली आहे. तसेच जिल्हा नियोजन समिती, नांदेडकडून प्राप्त तरतुदीमधुन प्रस्तुत कार्यालयाने पुरवठा आदेश क्र.३४९८ दि.३०-३-२०१२ अन्वये शालेय पाटीसंख्या ६४,२२६ नगासाठी रु.१३,८७,४९८/- ची खरेदी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४४/वित्त-९, दि. १५ जुलै, २००८ अन्वये सदरील योजनेसाठी मा.अध्यक्ष, स्थायी समिती जिल्हा परिषद यांना अधिकार होते. तथापि, महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४४/वित्त-९, दि.१५ जुलै, २००८ हा शासन निर्णय रद्द झाल्याने ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय दि.१९-०३-२०१२ मधील तरतुदीनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रु. २०,०००/- लक्ष पर्यंत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याबाबत अधिकार असल्यामुळे तरतुदीस मान्यता घेण्यात आली.

रुपये २०,००,०००/- पर्यंत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता बाबतचे अधिकार ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय दि. १९-०३-२०१२ नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्यामुळे स्थायी समिती व विषय समिती मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यासाठी संचिका सादर करण्यात आलेली नाही. खरेदी प्रक्रियेनंतर सदर बाब स्थायी समिती विषय समितीमध्ये अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक होते. पण तसे झाल्याचे दिसून येत नाही. यास तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा) श्री.ए.वा.मडावी यांची समितीसमोर ही बाब निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी विभाग प्रमुख म्हणून होती. परंतु असे केल्याचे दिसून येत नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रु. २०.०० लक्ष पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. परंतु हे काम रु २३,२४,२६८/- चे होते. सदरील काम रु. २०.०० लक्ष पेक्षा जास्त असल्यामुळे शासन निर्णयातील तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिका-यांना प्रशासकीय मान्यता देता येत नव्हती. त्यामुळे जिल्हा परिषदेने या कामाचे २ भाग करुन मुख्य कार्यकारी अधिका-यांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतली. कारण शालेय साहित्य खरेदी करीता प्राप्त निधी हा दोन वेगवेगळ्या योजनेतून मा.शिक्षक संचालक, म.रा.पुणे यांचेकडून विशेष घटक योजनेंतर्गत प्राप्त झाला व जिल्हा नियोजन समिती नांदेड कडून विशेष गट सर्वसाधारण मधुन प्राप्त झाला. त्यामुळे प्रशासकीय मान्यता वेगवेगळ्या घेतल्याचे दिसून येते.

संचिका तपासली असता दि. ३०-०३-२०१२ रोजी शालेय पाटी पुरवठा करणेसाठी आदेश देण्यात आला, त्यानुसार पुरवठादाराने दि. ३१-०३-२०१२ पर्यंत साहित्यपुरवठा करणे बंधनकारक होते. पुरवठादारा कडून दि. ३१-०३-२०१२ रोजी सर्व गट शिक्षणाधिकारी यांना तालुकास्तरावर शालेय पाटीचा पुरवठा करण्यात आला. दि. ३१-०३-२०१२ रोजी सुपरिटेंडन्स कंपनी ऑफ इंडिया, मुंबई यांनी शालेय पाटी योग्य असल्याचा तपासणी अहवाल सादर केलेला आहे.

यावरुन असे सिध्द होते की, एकाच दिवशी पुरवठा आदेश,साहित्य पुरवठा व शालेय पाटी योग्य असल्याचा रिपोर्ट प्राप्त झाला असुन एकाच दिवशी संचिका करुन वित्त विभागामार्फत देयक पारित करणे ही प्रक्रिया दोन दिवसात झाल्याची संचिकेवरुन तपासणी केली असता दिसून यते. जे की दोन दिवसात पुरवठा आदेश देणे, मान्यता घेणे, माल देयक मंजुरीसाठी पाठविणे, वित्त विभागात देयक मंजूर होणे, धनादेश तयार करणे, धनादेश वितरीत करणे या बाबी एवढ्या कमी कालावधीत होणे शक्य वाटत नाही त्यामुळे सदर प्रकरणात अनियमितता झाल्याचे सिध्द होते. त्यात संबंधित अधिकारी जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. यास तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा) श्री.ए.वा.मडावी व तत्का.मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.भोसले हे विभागप्रमुख म्हणून जबाबदार आहेत.

याबाबतीत वर्ग-१ चे अधिकारी जबाबदार असल्याचे प्रथम दर्शनी सिध्द होत असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरुन त्यांचेवर प्रशासकीय कारवाई करणे योग्य राहील. वरील प्रमाणे शालेय पाटी खरेदीतील अनियमितता चौकशी अंती सिध्द होते. त्यामुळे पुढील प्रशासकीय कारवाई करीता चौकशी अहवाल सादर.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी तत्कालीन शिक्षणाधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या संदर्भातील हा विषय प्रकरण चार डयूल डेस्क या विषयाप्रमाणेच आहे. अतः त्याचप्रमाणे याबाबत देखील कार्यवाही करावी असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

नांदेड जिल्हा परिषदेमध्ये सन २०११-२०१२ या अहवाल वर्षात शालेय पाटी खरेदी प्रकरणी केलेल्या लेखा परिक्षणाच्यावेळी लेखा परिक्षकांनी दिनांक १५ जुलै, २००८ (**परिशिष्ट ३.१**) रोजीच्या शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचा आक्षेप घेतला आहे. तथापि, सदरहू शासन निर्णय शासनाने पूर्वीच रद्द केलेला असल्यामुळे सदरील योजनेस मुख्य कार्यकारी अधिका-यांना रु. २० लक्ष पर्यंत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याबाबत अधिकार होते हे स्पष्ट होते. परंतु एकूण खरेदी २३,२४,२६८ रुपयांची असून ते काम नियमात बसविण्याकरिता ९,३६,७७० व १३,८७,४९८ असे दोन प्रस्ताव आदेश देवून विभागणी केल्याचा आक्षेप पुढे आला त्यावेळी रुपये २३,२४,२६८ ही रक्कम एकाच योजनेची नसल्याचे तसेच एकत्रित खरेदी केली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहू दोन आक्षेपांवरील खुलासा समिती मान्य करते असे असले तरी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या तरतुदी मधुन प्रस्तुत कार्यालयाचे पुरवठा आदेश क्र.३५०२ दि. ३०-३-२०१२ अन्वये शालेय पाटी संख्या ४३,३६९ नगासाठी एकूण रु.९,३६,७७०/- ची खरेदी करण्यात आली असल्याचे दिसून येते. तसेच जिल्हा नियोजन समिती, नांदेडकडून प्राप्त तरतुदीमधुन पुरवठा आदेश क्र.३४९८ दि.३०-३-२०१२ अन्वये शालेय पाटीसंख्या ६४,२२६ नगासाठी रु.१३,८७,४९८/- ची खरेदी करण्यात आली असल्याचे दिसून आले. खरेदी करीता सदरचा निधी हा शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यकडून आणि जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांच्याकडून दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी प्राप्त झाल्याचे यावरून दिसून येते. सदरचा निधी एवढ्या विलंबाने वितरीत करुन नांदेड जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागाला खर्च करण्यास सांगण्यात येणे ही बाब देखील

विचारात घेणे आवश्यक आहे. सदरहू प्रकरणी खरेदीची प्रक्रिया केव्हा झाली, मालाचा पुरवठा केव्हा करण्यात आला, निधी केव्हा वितरीत करण्यात आला, निधी विलंबाने वितरीत झाला असेल तर त्याची कारणे काय इ. बाबी तपासणे महत्वाचे आहे. शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर निधी आल्यामुळे त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर सदर वस्तुचा लाभ देण्यात आला ही बाब निश्चितच गंभीर असून त्यामुळे त्या त्या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ न होता पुढील वर्षी लाभ दिल्याचे दिसून येते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या चौकशी अहवालात शिक्षणाधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यावर ठपका ठेवल्याचे दिसून येते. परंतू सक्षम अधिकारी म्हणून तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची देखील तेवढीच जबाबदारी आहे. कारण मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी म्हणून त्यांची प्रशासकीय मान्यता शिक्षण विभागाने घेतली असल्याचे दिसून येते. शालेय पाटी पुरवठा करण्याचे आदेश, शालेय साहित्य प्राप्त झाल्याच्या नोंदी, शिक्षण विभागाने त्याच्या साठा नोंदवहीत घेतल्या आहेत. याची खात्री देयकासोबतच्या प्रमाण पत्रावरुन करण्यात आली. सदरचा पुरवठा करण्यात आलेले साहित्य हे दर्जेदार आहे किंवा कसे याची खात्री शिक्षण अधिका-याकडूनच त्याबाबतचे नियमानुसारचे प्रमाणपत्र सादर झाल्यानंतर नस्ती वरील प्रमाणपत्राची तपासणी केल्यानंतरच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सदर नस्तीवर स्वाक्षरी केल्याचे दिसून येते. तथापि याप्रकरणी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांची भुमिका पुढील बाबतीत समितीला संशयास्पद वाटते. योजनेसाठी निधी उशिरा येणे, निधी आल्यानंतर एकाच दिवशी पुरवठा आदेश व लगेच दुस-या दिवशी मालाचा पुरवठा व शालेय पाटी योग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाला असून सदर बाब समितीला अनाकलनीय वाटते. **याप्रकरणी यथायोग्य चौकशी होऊन तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांची चौकशी करण्यात यावी व त्यात ते दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, नांदेड

### शालेय पोषण आहारातील जादा अदाई व अनियमितेबाबत

**(परिच्छेद ३.१६२) (सन २०११-२०१२)**

पंचायत समिती लोहा सन २०११-२०१२ च्या लेखापरिक्षणात गट विकास अधिकारी यांनी धनादेश क्रमांक ८६४१२९ दिनांक ३१ मार्च २०१२ रुपये १९,५८,६७३/- व धनादेश क्रमांक ८६४१६४ दिनांक ३१ मार्च २०१२ रुपये ६,९२,११२/- एकूण रुपये २६,५०,७८५/- खाजगी शाळा पोषण आहाराचे धनादेश गट शिक्षणाधिकारी यांचे नावे काढुन अदाई केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ चे नियम २९ अन्वये संबंधित खाजगी शाळा यांचे नावे धनादेश देणे आवश्यक होते. परंतू अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

२. रुपये २६,५०,७८५/- नमुना क्रमांक ४ रोखपुस्तिकामध्ये जमा घेण्यात आली आहे. परंतू खाजगी शाळांना रक्कम रुपये २६,१२,०८०/- शालेय पोषण आहारासाठी वाटप केलेली आहे. जादा रक्कम रुपये ३८,७०५/- रोखवहीमध्ये शिल्लक आहेत. सदरील रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

३. प्रमाणक क्रमांक ५९४ मध्ये संत गाडगेबाबा महाराज लोहा यांना जादा प्रदान झालेले रुपये १४,२०४/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

४. संत गाडगेबाबा महाराज लोहा यांचे रुपये १०,३२०/- ची उपप्रमाणके नाहीत.

५. ग्रामीण विद्यालय माळाकोळी यांना जादा प्रदान झालेली रक्कम रुपये २३१/- ची वसुली होणे आवश्यक आहे.

६. जिल्हाधिकारी यांचे विद्यार्थी पटपडताळणीनुसार कमी विद्यार्थी आढळून आलेल्या शाळांची तपासणी करुन शालेय पोषण आहारामध्ये झालेल्या जादा अदायीची वसूली होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.**

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ चे नियम २९ अन्वये संबंधित खाजगी शाळा यांचे नावे धनादेश देणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. याबाबत श्री.विनोद पोहरे, तत्कालीन गट विकास अधिकारी तथा सध्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव जि.बीड यांना दि.२१-०८-२०१५ नुसार नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला आहे.

२. रोखवहीमधील शिल्लक रक्कम रुपये ३८७०५/- चालान दिनांक १७-०८-२०१५ अन्वये शासन खाती भरणा केलेली आहे. सदरचे चालान अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

३. संत गाडगेबाबा महाराज विद्यालय, लोहा यांना जादा प्रदान झालेले रुपये १४२०४/- चालान दि.१७-०८-२०१५ अन्वये शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. सदरचे चालान अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

४. संत गाडगेबाबा महाराज विद्यालय, लोहा यांचे रुपये १०,३२०/- ची प्रमाणके नाही ही वस्तुस्थिती आहे. तथापि तत्कालीन संबंधित कर्मचारी यांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे अभिलेखे उपलब्ध होऊ शकले नाहीत. अभिलेख्याचा शोध घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

५. ग्रामीण विद्यालय माळाकोळी यांना जादा प्रदान झालेली रक्कम रुपये २३१/- वसूल करुन चालान दिनांक १७-०८-२०१५ अन्वये शासन खाती भरणा करण्यात आली आहे. सदरचे चालान अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

६. जिल्हाधिकारी यांचे विद्यार्थी पटपडताळणी नुसार कमी विद्यार्थी आढळून आलेल्या शाळांची पाहणी करुन शालेय पोषण आहारामध्ये जादा अदायगी झाली असल्यास वसुली करुन शासन खाती भरणाकरण्याबाबत गट शिक्षणाधिकारी सर्व, पंचायत समिती जि.नांदेड यांना पत्र क्र. १०१५५, दिनांक १७-०८-२०१५ अन्वये कळविण्यात आले आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहाराचे धनादेश शाळांची नावे काढणे आवश्यक असताना गट शिक्षणाधिकारी यांची नावे कोणत्या प्राधिकारात काढले, अखर्चित रक्कम रुपये ३८,७०५/- शासनास केव्हा भरणा केली, त्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २९ अन्वये संबंधित खाजगी शाळा यांचे नावे धनादेश देणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही झाली. याबाबत श्री. विनोद पोहरे, तात्कालिन गट विकास अधिकारी तथा सध्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव, जि.बीड यांना दि. २१-८-२०१५ नुसार नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला आहे. रोखवहीमधील शिल्लक रक्कम रुपये ३८,७०५/- एवढ्या रकमेचा दिनांक १७-८-२०१५ रोजीच्या चालानाव्दारे अन्वये शासन खाती भरणा केलेला आहे. संत गाडगेबाबा महाराज विद्यालय, लोहा यांना जादा प्रदान झालेल्या रुपये १४,२०४ रकमेचा दिनांक १७-८-२०१५ रोजी शासन खाती भरणा केलेला आहे. संत गाडगेबाबा महाराज विद्यालय, लोहा यांचे रुपये १०,३२०/- ची प्रमाणके नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तथापि, तत्कालीन संबंधित कर्मचारी यांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे अभिलेखे उपलब्ध होऊ शकले नाहीत. तथापि अभिलेख्यांचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ग्रामीण विद्यालय माळाकोळी यांना जादा प्रदान झालेले रुपये २३१/- वसूल करुन दिनांक १७-८-२०१५ रोजीच्या चालनव्दारे शासन खाती भरणा करण्यात आली आहे. सदरचे चालान अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे असे साक्षीच्या वेळी समितीस सांगितले.

पटपडताळणीमध्ये एकंदर किती शाळेत विद्यार्थ्यांची संख्या कमी आढळून आली, यावर १७८ शाळेंच्या पटपडताळणीमध्ये ६६ टक्के विद्यार्थी कमी आढळून आले होते अशी समितीस माहिती प्राप्त झाली. या प्रकरणी संबंधित शाळेवर कोणती कारवाई करण्यात आली, पुन्हा पटपडताळणी करण्यात आली आहे काय याबाबत पुन्हा पटपडताळणी करण्यात आली नाही. परंतु दरवर्षी पट नोंदणी केली जात असते अशी माहिती समितीस देण्यात आली.

विद्यार्थ्यांची संख्या कमी असताना शिक्षण अधिका-यांनी जास्तीचे पैसे दिले आहेत या समितीच्या अभिप्रायावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी, गट शिक्षण अधिका-यांकडून उपस्थिती येत असते उपस्थितीनुसार पैसे देण्यात आले. परंतु पोषण आहारामध्ये जादा पैसे दिल्याबद्दल सदर जादा वसुली संबंधित गट शिक्षणाधिका-याकडून करण्याबाबत पत्र दिले असल्याचा समितीसमोर खुलासा केला.

पट पडताळणी झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या लक्षात आले की, संख्या कमी आहे. जिल्हाधिका-यांना तपासणी करण्याचे अधिकार होते. साक्षीदरम्यान समितीला सांगितले की, ६६ टक्के फरक आढळला आहे. जो अहवाल त्यांनी सादर केला त्यानुसार तेवढ्या विद्यार्थ्यांचा शालेय पोषण आहार पुरविला जात होता. हा ६६ टक्के पोषण आहार कोणाच्या हातात गेला, कोणामुळे शासनाच्या निधीचा अपहार झाला याची चौकशी होणे आवश्यक आहे. जे दोषी असतील त्यांची जबाबदारी निश्चित करावी लागेल. ज्यांच्यामुळे ६६ टक्के मुलांकरिता अधिकचे द्यावे लागले तो खर्च वसूल करण्याची प्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुरू करावी. चौकशी करून जो निर्णय घेण्यात येईल त्याचा अहवाल तीन महिन्यात समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) अहवाल वर्षात झालेल्या पट पडताळणीत एकूण विद्यार्थी संख्येत ६६% फरक आढळला आहे. समितीच्या मते सदर ६६% पोषण आहाराच्या रकमेचा अपहार झालेला असून त्याची चौकशी करण्यात यावी व अपहारात गुंतलेली रक्कम वसूल करण्यात यावी असे निदेश देऊनही सदर बाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल समितीस न पाठविण्याचे कारणे काय ? सदरची माहिती अत्यंत अस्पष्ट व त्रोटक असून याबाबत शासनाचे काय मत आहे ?

(२) ५०% पेक्षा जास्त अनुपस्थिती असलेल्या जिल्ह्यातील १३१ शाळा असून शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत झालेल्या जादा अदायगीची एकूण रक्कम रुपये ७०,३५,००१/- एवढी असून सदरहू रक्कम वसूल करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून तीन वेळा गट शिक्षण अधिका-यांना पत्रव्यवहार करुनही तसेच वसुली न झाल्यास रुपये २५,०००/- दंडाची तरतूद करुनही त्याची वसुली अद्याप झालेली नाही याची कारणे काय आहेत व यास कोण जबाबदार आहे ?

(३) चौकशी अहवालात नमुद केल्यानुसार संबंधित मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक असतांना ती अद्याप का केलेली नाही, कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

(४) खाजगी शाळेच्या मुख्याध्यापक व संस्थाचालकांकडून शालेय पोषण आहार व गणवेश वाटपातील जादा अदाईची वसुली करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सदर प्रकरणात चौकशी करण्यात आली असून शाळेच्या मुख्याध्यापकाकडून जादा अदाईची रक्कम वसूल करुन शासन खाती भरणे बाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या कार्यालयाचे पत्र क्र.१०१५५, दिनांक १७-०८-२०१५ व क्र.११५७८, दिनांक १८-११-२०१५ व क्र.१२०५४, दिनांक १६-१२-२०१५ अन्वये सर्व गट शिक्षणाधिकारी (सर्व) जिल्हा परिषद, नांदेड यांना कळविण्यात आलेले आहे.

सदर खाजगी शाळेच्या बाबतीत वसुलपात्र रक्कम मुख्याध्यापकाकडून वसुल करुन तात्काळ शासन खाती भरणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.२४, दिनांक ०१-०१-२०१६ अन्वये खाजगी शाळेच्या अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात आले होते. तथापि सर्व संबंधितांनी वसुलपात्र रक्कम न भरल्यामुळे सर्व संबंधित संस्थाचे वेतनेत्तर अनुदान या कार्यालयाचे आदेश क्र.१५५, दिनांक १२-०१-२०१६ नुसार रोखण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणात जादा अदाईची रक्कम वसूल करणेसाठी ३ वेळा पत्र देवूनही त्याकडे दुर्लक्ष करणारे संबंधित शाळेचे केंद्रप्रमुख, संबंधित बीट चे शिक्षण विस्तार अधिकारी, संबंधित तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी, तसेच खाजगी शाळेचे मुख्याध्यापक व जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक जबाबदार आहेत. तसेच सदर वसुलपात्र रक्कम मुख्याध्यापकाकडून वसूल करुन तात्काळ शासन खाती भरणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.२४, दिनांक ०१-०१-२०१६ अन्वये खाजगी शाळेच्या अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात आलेले होते. तथापि सर्व संबंधितांनी वसुलपात्र रक्कम न भरल्यामुळे सर्व संबंधित संस्थाचे वेतनेत्तर अनुदान या कार्यालयाचे आदेश क्र. १५५, दिनांक १२-०१-२०१६ नुसार रोखण्यात आले आहे.

(३) खाजगी शाळेचे मुख्याध्यापकांचे नियुक्ती प्राधिकारी खाजगी संस्था असल्यामुळे त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. २३, दिनांक ०१-०१-२०१६ नुसार संस्थेचे सचिव/अध्यक्ष यांना कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषद शाळेच्या २९ मुख्याध्यापकांची वेतनवाढ आदेश क्र.२३ दिनांक ०१-०१-२०१६ अन्वये रोखण्यात आलेली आहे. तसेच खाजगी शाळेचे मुख्याध्यापकाकडून ५०% व संबंधित बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी यांचेकडून ५०% याप्रमाणे व जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापकाकडून ५०% संबंधित बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी कडून २५% व संबंधित केंद्र प्रमुखाकडून २५% या प्रमाणे जादाची अदाई वसुलीचे आदेश जा.क्र.१५६३ ते १६७६ दिनांक ०४-०४-२०१६ नुसार देण्यात आले आहेत. संबंधिताचे वेतनातून समान हप्त्यात रक्कमेची वसुली करुन शासन खाती भरण्यात येत आहे.

(४) सदर प्रकरणात जादा अदाईची रक्कम वसुल करण्यात येईल. सदरील जादा अदाईची रक्कम शासन खाती न भरल्यास खाजगी संस्थेस वेतनेत्तर अनुदान देण्यात येणार नाही व जिल्हा परिषद मुख्याध्यापकांचे वेतनातून सदरील रक्कम वसूल करण्यात येईल.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून ज्या शाळांना जादा रक्कम अदा झाली आहे त्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडून जादा अदाईची रक्कम वसूल करुन शासन खाती जमा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. याबाबत सर्व गट शिक्षणाधिका-यांना कळविण्यात आलेले आहे.

खाजगी शाळेच्या बाबतीत वसुलपात्र रक्कम मुख्याध्यापकाकडून वसूल करुन तात्काळ शासन खाती जमा करण्याबाबत खाजगी शाळेच्या अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात आले होते. तथापि, सर्व संबंधितांनी वसुलपात्र रक्कम न भरण्यामुळे सर्व संबंधित संस्थांचे वेतनेत्तर अनुदान दिनांक १२-०१-२०१६ च्या आदेशानुसार रोखण्यात आले आहे.

## चौकशी अहवाल

सदर प्रकरणामध्ये शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी चौकशी केलेली असुन नांदेड जिल्ह्यामध्ये शालेय पोषण आहार योजनेमध्ये जिल्हाधिकारी यांचे पटपडताळणीनुसार ५० टक्के पेक्षा जास्त अनुपस्थिती असलेल्या जिल्हा परिषदेच्या २९ शाळा व खाजगी अनुदानित १०२ शाळा असे एकूण १३१ शाळा आहेत. या शाळांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत झालेल्या जादा अदाईची परिगणना करण्यात आली असून सदरची एकूण रक्कम रु. ७०,३५,००१/- (अक्षरी रु. सत्तर लक्ष पस्तीस हजार एक केवळ) एवढी होते. याबाबत जादा अदाईची रक्कम शाळेच्या मुख्याध्यापकाकडून वसूल करुन शासन खाती भरण्यात यावी या संदर्भाने या कार्यालयाचे पत्र क्र. १०१५५ दि. १७/०८/२०१५ व क्र. ११५७८ दि. १८/११/२०१५ व क्र. १२०५४ दि. १६/१२/२०१५ अन्वये सर्व गट शिक्षणाधिकारी (सर्व) जिल्हा परिषद नांदेड यांना कळविण्यात आलेले आहे.

खाजगी शाळेच्या मुख्याध्यापकांचे नियुक्ती प्राधिकारी हे त्या शाळेची संस्था असल्यामुळे मुख्याध्यापकावर कार्यवाही करण्याचे अधिकार संबंधित शाळेच्या संस्थेला आहेत. या मुख्याध्यापकांवर कारवाई करण्यासंदर्भात पत्र क्र. २४, दि. ०१/०१/२०१६ नुसार कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या २९ शाळेच्या तत्कालीन मुख्याध्यापकांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात आदेश क्र. २३ दि. ०१.०१.२०१६ अन्वये रोखण्यात आलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी अहवाल वर्षात झालेल्या पट पडताळणीत एकूण विद्यार्थी संख्येत ६६ टक्के फरक आढळला आहे, समितीच्या मते सदर ६६ टक्के पोषण आहाराच्या रकमेचा अपहार झालेला असून त्याची चौकशी करण्यात यावी व अपहारात गुंतलेली रक्कम वसूल करण्यात यावी. असे निदेश देऊनही याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल समितीस न पाठविण्याबाबत खुलासा करताना शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी नांदेड जिल्ह्यात ८९ माध्यमिक शाळा असून २५ शाळा जिल्हापरिषदेच्या आहेत, शाळेच्या मुख्याध्यापकांकडून जादा अदाईची रक्कम वसूल करण्याची ऑर्डर मे महिन्यात दिलेली आहे. या महिन्यापासून वसुली सुरू होणार आहे. ५० टक्के रक्कम वसूल करण्याचे आदेश काढण्यात आले असून वसुली सुरू झालेली आहे, असे समितीसमोर स्पष्ट केले.

समितीने पुढे एकूण किती रक्कम गुंतलेली आहे ही रक्कम वसूल होण्यासाठी किती वर्षे लागणार आहेत याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकूण ७० लाख ४३ हजार रुपये गुंतले आहेत, पगारातून १/३ रक्कम वसूल करण्यात येत आहे. पगारातून वसूल करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत, १० हजार व त्यापेक्षा कमी रक्कम असेल तर ती एक रकमी वसूल करावयाची आहे. १० हजार रुपयांच्या वर रक्कम असेल १/३ रक्कम पगारातून वसूल करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. अशा प्रकारे एकूण ११४ मुख्याध्यापकांच्या पगारातून वसुलीची कारवाई सुरू करण्यात आली आहे असा समितीसमोर खुलासा केला.

समितीने शिक्षकांच्या बदल्यांसंदर्भात विभागीय सचिवांकडून माहिती जाणून घेतली. तसेच शिक्षण हा विषय समितीच्या मते अतिशय महत्वाचा आहे, शिक्षकांच्या बदल्यांच्या संदर्भात शासनाने निश्चित धोरण ठरविले पाहिजे, शिक्षकांच्या बदल्यांमध्ये मोठा गैरप्रकार होतो. शिक्षकांच्या बदल्यांच्या संदर्भात सुस्पष्ट धोरण तयार करण्याची गरज आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना मोठ्या प्रमाणात घरी बसावे लागत आहे, ब-याच वेळा अशी परिस्थिती निर्माण होते की, किनवट भाग ग्रामीण असल्यामुळे त्या भागात शिक्षक राहत नाहीत. शिक्षक हे शहरात राहावयास जातात. शिक्षकांची नियुक्ती झाल्यावर त्यांना काही ठराविक कालावधी ग्रामीण भागातील शाळांमध्ये काढला पाहिजे. असे त्यांच्यावर बंधन टाकता येईल काय, याबाबत विचार केला पाहिजे. कारण शिक्षकांची मानसिकता ग्रामीण भागात राहावयाची नाही. शहराकडे सर्वांचा ओढा असतो, याबाबत शासनाने धोरण ठरविले पाहिजे, असे साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी सूचित केले. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी, दोन शिक्षकी शाळा असायला पाहिजे, याबाबत शासनाचे धोरण स्पष्ट आहे. यासंदर्भात आढावा घेण्यात आला आहे, शिक्षक सेवानिवृत्त झाले की, ब-याच वेळा ते पद भरले जात नाही. एक शिक्षकी शाळेचे धोरण ब-याच वर्षापासून नाही. काही ठिकाणी शिक्षक अतिरिक्त आहेत तर काही ठिकाणी शिक्षकांची कमतरता आहे, त्यामुळे शिक्षकांचे समायोजन तातडीने करण्याची आवश्यकता आहे, जिल्हापरिषदेकडे शिक्षकांची संख्या आहे, त्यांचे वेळीच समायोजन करण्याची आवश्यकता आहे.त्यानुसार आता कार्यवाही करण्यात येत आहे. असा समितीसमोर खुलासा केला. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने विचार

मांडत असताना एखादा शिक्षक चांगले काम करीत असेल आणि त्याची इच्छा असेल तोपर्यंत त्याला त्या जागेवर ठेवले पाहिजे. कारण इतर कर्मचारी व शिक्षक यांच्यामध्ये फरक असतो, शिक्षकांबाबत पालकांकडून तक्रारी असतील तर अशा वेळी बदली केल्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. काही शिक्षक अतिशय चांगल्या पध्दतीने कामे करतात, त्यामुळे शिक्षण धोरणानुसार निर्णय घेणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शिक्षकांच्या अडचणी कळतात. शिक्षक शाळेत सेट झाला असेल ंकिंवा तेथील लोकांना आवडत असेल तर अशा शिक्षकांची बदली त्यांच्या इच्छेशिवाय करू नये असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रतिपादन केले. तसेच शहरात शिक्षकांच्या जागा रिक्त असतील तर दूरच्या भागातील शिक्षकांची तेथे नियुक्ती करावी असे काही करता येत असेल तर पहावे असे समितीस सांगितले.

ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी शिक्षकांच्या बदल्यासंदर्भात खुलासा करताना महाराष्ट्रातील दुर्गम भागात कोणताही कर्मचारी जाण्यास इच्छुक  नसतो.  महाराष्ट्रातील २० टक्के भाग असा आहे की, तेथे कोणीही काम करण्यास तयार नाही.  आता सरकारने असे केले आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे सरळसेवेने जे लोक नियुक्त होतात त्यांना विदर्भात नियुक्ती दिली जाते, त्यांना ते बंधनकारक करण्यात आले आहे, अशा प्रकारचा विचार जिल्हा परिषदेला करता येइल काय, याबाबत जिल्हा परिषदेने अभ्यास करून काही ठराविक कालावधीत ग्रामीण भागात काम केल्याशिवाय त्यांना पदोन्नती मिळणार नाही, अशा प्रकारचा विचार करता आला तर हा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल.  त्यावर शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी खुलासा करताना त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी असतांना, अमरावती जिल्हा परिषदेमध्ये ते मुख्य कार्यकारी अधिकारी असतांना त्यांनी काही शिक्षकांना मेळघाट येथे फक्त तीन वर्षासाठी पाठविले होते, मेळघाट हा डोंगरी भाग आहे, काही कालावधीनंतर त्यांची मुख्य कार्यकारी अधिकारी पदावरून बदली झाली परंतु त्या शिक्षकांची अद्यापही तेथून बदली केली जात नाही, तीन वर्षे होऊन गेले तरी त्यांना तेथून हलविले जात नाही.  त्यामुळे अशा ठिकाणी लोक रुजू होण्यास तयार होत नाहीत. कारण ते एक वेळ रूजु झाले की, त्यांना तेथून बदलीची शाश्वती नसते.  यासंदर्भात कायद्यात सुधारणा केल्याशिवाय हे काम करता येणार नाहीत, यामध्ये मानवी हस्तक्षेप निर्माण होत आहे हा त्यांचा अनुभव त्यांनी समितीसमोर कथन केला.

किनवट हा दुर्गम आणि आदिवासी भाग आहे.  तसेच नंदूरबार जिल्ह्यात अक्राणी आणि अक्कलकुवा हे अतिदुर्गम भाग आहेत.  अशा ठिकाणी शिक्षकांना पाच वर्षासाठी सेवा देणे अनिवार्य करावे. त्यानंतर त्यांची दुसरीकडे बदली करावी वसतिशाळांतील शिक्षकांना कायम केले.  ते शिक्षक अप्रशिक्षीत होते.  त्यांना स्थानिक बोली भाषा अवगत असल्यामुळे त्यांना नोकरी देण्यात आली. आता त्या शिक्षकांना ग्राऊंड फ्लोअर पोस्टींग दिली आहे.  त्यांना तेथील काही समजत नाही.  ते अतिदुर्गम भागात काम करण्यास तयार आहेत. साधारणतः असे ७० ते ९० शिक्षक काम करीत आहेत.  त्यांची त्या भागात घरे आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांची बदली करता येत नाही.  त्यावर समितीने  जर ते शिक्षक दुर्गम भागात काम करण्यास तयार असतील तर सरकार अशा प्रकरणांबाबत परवानगी देईल काय अशी पृच्छ केली.  त्यावर शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी ते शिक्षक तसा अर्ज करणार असतील तर त्यांच्या विनंतीवरून तसे करता येईल.  दुर्गम भागात कोणी स्वतः परत येत असतील तर त्यांना तेथे घेतले पाहिजे.  अन्यथा शिक्षक काम करीत नाहीत आणि मुले देखील शिकत नाहीत असे समितीस विनीत केले.

## अभिप्राय व शिफारशी

नांदेड जिल्हापरिषदेस, समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी शालेय शिक्षण आहारातील जादा अदाई व अनियमिततेबाबत प्रामुख्याने संबंधित खाजगी शाळाच्या नावे धनादेश न देता गट शिक्षणाधिकारी यांचे नाव काढण्यात आले.  या घेतलेल्या आक्षेपावर संबंधित गट विकास अधिकारी यांच्यावर कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्याचे अखर्चित रकमा, अतिप्रदाना संबंधित आक्षेपाप्रकरणी सदरहू रकमा शासन खाती जमा न केल्याची परंतु दिनांक ३ ते ५ ऑक्टोबर, २०११ या कालावधीत जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडून झालेल्या पट पडताळणीमध्ये एकूण पटाच्या ६६ टक्के विद्यार्थी बोगस आढळून आले असल्याची व त्या ६६ टक्के बोगस विद्यार्थ्यांवर शालेय पोषण आहाराची रक्कम खर्च करण्यात आल्याची बाब चर्चेच्या अनुषंगाने समितीसमोर आली.  विभागीय सचिवांच्या साक्षीच्या दरम्यान या बोगस विद्यार्थ्यांवर सुमारे रु. ७०,३५,००१/- एवढी रक्कम खर्च करण्यात आल्याची माहिती समितीस देण्यात आली.  ज्या शाळांना जादा रक्कम अदा झाली आहे त्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडून जादा अदाईची रक्कम वसूल करून शासन खाती जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

विद्यार्थ्यांची ५० टक्के पेक्षा जास्ती अनुपस्थिती असलेल्या एकूण १३१ शाळा असून त्यातील १०२ खाजगी शाळा आहेत. या शाळेच्या मुख्याध्यापकांचे नियुक्ती अधिकारी खाजगी संस्था असल्यामुळे त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत त्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात आलेले असून २९ जिल्हा परिषदेच्या शाळांच्या मुख्याध्यापकांच्या एक वार्षिक वेतन वाढ रोखण्यात येवून त्यांची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात आली आहे. शालेय पोषण आहार योजनेतील ७०,३५,००१/- रुपयांपैकी किती रक्कम वसुल केली व किती रक्कम वसूल करणे बाकी आहे याची माहिती समितीसमोर आलेली नाही. शिवाय सुमारे १०२ खाजगी शाळा असल्याचे सांगितले परंतु यांतील अनुदानित व विना अनुदानित शाळा किती आहेत तसेच त्या शाळा अनुदानित व विना अनुदानित शाळा किती कालावधी पासून आहत हे ही नमुद केले नाही. त्यामुळे याप्रकरणी जो चौकशी अहवाल समितीला पाठविला आहे त्यात अनेक उणीवा असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. सदर जिल्हा परिषदेच्या व खाजगी शाळा पटावर विद्यार्थी नसून सुध्दा शालेय पोषण आहाराचे अनुदान शासनाकडून गैर मार्गाने घेत असून लेखा परीक्षणास केवळ सन २०११-२०१२ चा उल्लेख आहे. या अगोदर किती वर्षापासून सदरच्या शाळा या घोटाळ्यात आहेत हे ही चौकशी अहवालात नमुद केलेले नाही. अगदी जुजबी चौकशी केल्याचे दिसून येते. या शाळांनी एका वर्षात सुमारे ७० लक्ष रुपयांस शासनास फसविले आहे. यात शाळा संस्था चालविणा-याचा देखील समावेश असू शकतो. त्याचप्रमाणे विनाअनुदानीत शाळांना अनुदान नसल्याने उक्त शाळांतील शिक्षकांनी अशा प्रकारे विद्यार्थ्यांना पटावर दाखवून त्यांचे शालेय पोषण अनुदान घेऊन सदरचा पैसा स्वतःच्यासाठी तर वापरला नाही ना, अशी शंका समितीला येत आहे. तेव्हा त्या दृष्टीने देखील चौकशी होणे आवश्यक असून केलेली चौकशी केवळ लेखापरीक्षण अहवाल वर्षातील असून ही बाब गंभीर असल्याने सर्वंकष चौकशी होणे आवश्यक असून यातील सत्याचा शोध घेणे आवश्यक असल्याने अशा प्रत्येक खाजगी शाळेची तपासणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे या जिल्ह्यातील ज्या खाजगी शाळांनी शाळा पोषण आहाराचे बोगस बिले सादर केली अशा सर्व शाळांची चौकशी करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. **शिवाय या खाजगी शाळांच्या व्यवस्थापनांना त्यांच्या शाळेतील शिक्षकांची नेमणूक करण्याचे अधिकार आहेत ही बाब विचारात घेता शाळा व्यवस्थापन हे नियुक्त प्राधिकारी असल्याने उक्त शाळांमधील शिक्षक हे शाळा व्यवस्थापनाच्या दबावाखाली काम करण्याची शक्यता नाकारता येत नाही तेव्हा या गंभीर प्रकरणाची सर्वंकष चौकशी होणे आवश्यक असून उक्त चौकशीनंतर संबंधित दोषींवर कडक स्वरुपाची कारवाई करावी. त्याचप्रमाणे खाजगी शाळांच्या व्यवस्थापनाने जर मुख्याध्यापकांवर अद्यापही कारवाई केली नसेल अथवा वसुली केली नसेल तर अशा व्यवस्थापनावर कारवाई करण्याबरोबरच शासनाकडून जे ही अनुदान अशा शाळांना देण्यात येत आहे असे सर्व अनुदान सदरील रक्कम वसुल होऊन संबंधितांवर कार्यवाही प्रस्तावित होईपर्यंत अदा करण्यात येऊ नये अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

तसेच शालेय पोषण आहारातील चर्चेच्या अनुषंगाने शिक्षकांच्या बदल्यांच्या संदर्भात सर्वंकष धोरण आखले नसल्याची बाब समितीस दृगोच्चर झाली. दुर्गम भागात शिक्षक सर्वसाधारणपणे जाण्यास नाखूष असतात किंवा एखाद्या दुर्गम भागात नेमणूक झाल्यानंतर तेथून लवकर शिक्षकांची बदली होत नाही असा सर्वसाधारण अनुभव आहे. तसेच एकाच जागी अनेक वर्ष राहिलेल्या शिक्षकांचे तेथील परिसर व शाळा यांचेशी असलेले संबंध दृढ होवून अध्यापनाचा दर्जा वाढतो. **त्यामुळे बदल्यांच्या अधिनियमात केवळ शिक्षक या प्रवर्गाकरीता सुधारणा करणे आवश्यक आहे काय या व इतर सर्वबाबींचा सर्वकष विचार करून शिक्षकांच्या बदल्यांसंदर्भात आवश्यक असल्यास शासनाने दुर्गम व डोंगराळ भागातील शिक्षकांसाठी बदल्यांच्या कायद्यात दुरुस्ती करून अथवा नव्याने शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत विचार विनिमय करून त्याबाबत कार्यवाही करावी अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, नांदेड

### पंचायत समिती हदगाव प्रशासकीय इमारत बांधकामातील अनियमिततेबाबत

**(परिच्छेद ३.२९६) (सन २०११-२०१२)**

पंचायत समिती हदगावच्या प्रशासकीय इमारत बांधकामावर एकुण रुपये ७३,८२,४५०/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. सदर खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. सदर कामाच्या बाब क्रमांक ११ मध्ये १२ एम.एम.जाडीमध्ये भिंतीला गिलावा करणे कामाचे परिमाण १३४३.७२ चटई क्षेत्र दर रुपये ७७/- नुसार रुपये १,०३,४६६/- ऐवजी रुपये १०,३४,४६६/- रक्कम दर्शवून रुपये ९,३१,०००/- बेरीज जादा दर्शविली. तसेच बाब क्रमांक १० मधील रुपये २,१५०/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम रुपये ९,३३,१५०/- वसूल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १७७ (चार) प्रमाणे विभागाने अचूक तपासणी केलेली नाही. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ३७(१) प्रमाणे वित्त विभागाने अचूक तपासणी अंती प्रदान करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

२. सदर कामाची निविदा ६.५ टक्के अधिक दराची स्विकारल्यामुळे रुपये ४,७४,६३१/- एवढ्या रक्कमेने मुळ निविदा रक्कमेत वाढ झालेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ११४, तसेच शासन निर्णय झेडपीए-२९८२/२८ दिनांक २५ मे, १९८९ प्रमाणे सदरील कामास सुधारीत प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ व १४४ व नियम २०९ प्रमाणे कपात केलेली ठेवीची रक्कम रुपये ६८,४६१/- नमुना क्रमांक ७१ ला जमा नोंद दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. सदर कामाच्या बाब क्र-११ मध्ये १२ एम.एम. जाडी मध्ये भिंतीला गिलावा करणे कामाचे परिमाण १३४३.७२ चटई क्षेत्र दर रुपये ७७/- नुसार रुपये १,०३,४६६/- ऐवजी रुपये १०,३४,४६६/- रक्कम दर्शवुन रू ९,३१,०००/- बेरीज जादा दर्शवून देयक देण्यात आले होते. अंकगणितीय चुकीमुळे श्री ए.के.क्षिरसागर, वरिष्ठ सहाय्यक यांना पत्र क्र १४२३/दि.२४-८-२०१५ अन्वये समज देण्यात आली आहे. जादा प्रदान झालेली रक्कम रुपये ९,३१,०००/- संबंधीत कंत्राटदाराच्या तीस-या धावत्या देयका मधुन समायोजित करण्यांत आली आहे. त्याचा प्रमाणक क्रमांक २९४ दिनांक २५-२-२०१३ असा आहे. तसेच बाब क्र १० मधील परिमाण ५.०० घनमिटर व दर रु ४३० नुसार रु २१५०/- इतकी जादा प्रदान झालेले नाही. यामध्ये मोजमाप पुस्तीका क्र ३७८ पान क्र.७ वर नोंदविलेल्या नोंदी नुसार विट बांधकामाच्या भिंतीचे मोजमापाचे परिमाण (२x६.१०x२.४०-२९.२८) घनमिटर येते. तथापि अंकगणितीय चुकीमुळे ते २४.२८ घनमिटर दाखविले आहे. परंतु एकूण बेरजे मध्ये परिमाण १११.१० घनमिटर घेतलेले आहे. जे की बरोबर आहे. त्यामुळे या मध्ये जादा रु २१५०/-प्रदान झालेले नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १७७ (चार) व ३७ (१) प्रमाणे विभागामार्फत अंकगणितीय तपासणी १००% करण्याबाबत संबंधीत शाखेस आदेश दिले आहेत. त्याची अमंलबजावणी करण्याची दक्षता घेण्यात येत आहे

२. सदरील कामाची प्रशासकिय मान्यता रु १,११,९२,०००/-व तांत्रिक मान्यता रु ७३,७२,१००/- आहे. व निविदा किंमत रु ७२,०२,०२२/- असून ६.५% जादा दराने किमंत रु ४,७४,६३१/- इतकी येते ही वस्तुस्थिती आहे.

निविदा किंमत रु ७२,०२,०२२/- ही रक्कम जुने दरसुची सन २००९-१०-प्रमाणे असून नविन दरसुची सन २०१०-११ प्रमाणे निविदेची किमंत रु ७६,३०,२०२/- आहे. ६.५% जादा दराने भरलेली निविदेची किमंत रु ७७,७६,६५३/- आहे. नविन दर सुची प्रमाणे आलेली किमंत रु ७६,३०,२०२/- असून दोन्ही मधील फरक रु १,४६,६५०/- येते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १३९ (३) प्रमाणे रु २०.०० लक्ष ते १ कोटी या मधील खर्चाच्या बांधकामासाठी २% किंवा रु १.०० लक्ष यातील अधिक असेल ती रक्कम ग्राहय असेल अशी तरतुद आहे.तथापि (२% प्रमाणे रक्कम रु १५२६०४/-) येत असल्यामुळे वेगळी सुधारित प्रशासकिय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ व १४४ व नियम २०९ प्रमाणे कपात केलेली ठेवीची रक्कम रुपये ६८,४६१/-नमुना नंबर ७१ मध्ये पृष्ठ क्रमांक ६३ वर ठेवीच्या रक्कमेची नोंद घेण्यात आली आहे. सदर नोंदीच्या पृष्ठांची छायाकिंत प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, इमारत बांधकाम देयकामध्ये रुपये ९,३३,१५०/- इतक्या जादा प्रदानास कोण जबाबदार आहे, सदर जादा प्रदान वसूल केले आहे काय, या अनियमिततेबाबत संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली, देयकातून कपात केलेली ठेवीची रक्कम रु. ६८४३१ ची नोंद नोंदवहीमध्ये का घेण्यात आली नाही यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम उत्तर) यांनी समितीस माहिती देताना एकूण रक्कम रु. १,०३,४६६/- असताना रु. १०,३४,४६६/- इतकी रक्कम दाखवून देयक अदा केले होते. जादा रक्कम तपासणी न केल्यामुळे प्रदान झाली होती. ही अनियमितता दिसून आल्यानंतर संबंधित कर्मचा-यांना समज दिली आहे. जादा प्रदान झालेली रक्कम रु. ९.३१ लाख कंत्राटदाराच्या तिस-या देयकातून वसूल केली आहे असे समिती समक्ष सांगितले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, रु. ९.३१ लाख लेखा परिक्षण झाल्यानंतर वसूल केले का, जादा प्रदान ९.३१ लाख रुपये किती तारखेला दिले गेले व ते वसूल केव्हा केले, त्यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम उत्तर) यांनी लेखापरिक्षण झाल्यानंतर जादा प्रदानाची वसुली करण्यात आली. दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी पेमेंट करण्यात आले आणि वसुली तिस-या देयकातून दिनांक २५.२.२०१३ रोजी केली आहे परंतु त्यावरील व्याज वसूल केलेले नाही. उपविभागाकडून लेखापरिक्षण केले जाते असे समितीस विदीत केले. समितीने आणखी विचारणा केली की, विभागाचे लेखापरिक्षक लेखापरिक्षण करतात त्यानंतर लेखापरिक्षकांनी सुध्दा तपासले पाहिजे होते या तिघांना दोषी धरले पाहिजे. विभाग प्रमुख म्हणून सही करता त्यावेळी सर्व जबाबदारी घेत असता. अंकगणित चांगले असल्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची जबाबदारी आहे असे म्हणता येणार नाही. संबधित अधिका-यांच्या चुकीमुळे ९ लाख रुपयांची रक्कम एक वर्ष ठेकेदाराकडे पडून होती. लेखा आक्षेप आल्यानंतर ती वसूल केली आहे. सही करणारे उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांची जबाबदारी नाही काय, परंतु यावर समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. सबब, याबाबत लेखापाल, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखापरिक्षक यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी. १.११ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी असताना तांत्रिक मान्यता ७३ लाखास दिली गेली. अंदाजपत्रक चुकीचे होते का, हा भाग सुध्दा चौकशीमध्ये समाविष्ट करावा. एक वर्षाचे व्याज संबंधित जबाबदार अधिका-यांकडून वसूल करण्याची कार्यवाही करावी असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) सदरहू प्रकरणी रुपये ९,३३,१५०/- इतक्या जादा प्रदानाची वसुली करण्यात आली आहे. तसेच रुपये १.११ कोटी एवढी प्रशासकीय मंजुरी असताना सदरहू कामास तांत्रिक मान्यता रुपये ७३ लक्षची देण्यात आली, या प्रकरणातील मुख्य लेखा अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी, दरम्यानच्या काळातील व्याज संबंधित अधिका-याकडून वसूल करण्याचे निदेश समितीने दिले असता समितीस सादर झालेल्या अहवालात अंकगणितीय चुकीमुळे कंत्राटदाराला रुपये ९,३१,०००/- अतिप्रदान करण्यात आले होते परंतु सदरहू रक्कम तिस-या धावत्या देयकातून वसुल करण्यात आली. मोजमाप पुस्तिका व संचिकेची पाहणी केली असता शाखा अभियंता, सहाय्यक लेखा अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक यांच्या निष्काळजीपणामुळे अतिप्रदान झाल्यामुळे त्यांस जबाबदार धरुन त्यांचेकडून व्याजाची रक्कम वसुल केलेली आहे. परंतु वरील पाचही कर्मचा-यांवर व्याज वसुली शिवाय अन्य कोणतीही दंडात्मक कारवाई प्रस्तावित न करण्याची कारणे काय आहेत ?

२) सदर चौकशी अहवालात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ३७ (१) नुसार अचुक तपासणी केली नसल्याबाबतचा उल्लेख का करण्यात आला नाही, सदर उल्लेख नसतानाही याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केलेला खुलासा शासनाने मान्य केला आहे काय, नसल्यास त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती हदगाव प्रशासकीय इमारत बांधकामाचे दुस-या धावत्या देयकातून जादा अदायी झाली होती जादा अदायीस जबाबदार असणा-या संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्याकडून व्याजाची रक्कम रु.१,०२,४१०/- वसूल करुन दि.२२.१२.२०१५ रोजी शासन खाती जमा करण्यात आली आहे. संबंधित जबाबदार कर्मचा-यांनी व्याजाची रक्कम भरणा केल्यामुळे दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित केली नव्हती.

सदरील प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना पत्र क्र.जीपना/बाउवि/परास/१३९७/१५ दि.२१.०८.२०१५ अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. त्या अनुषंगाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे पत्र क्र.५९७७ दि.२८.०८.२०१५ अन्वये खुलासा सादर केलेला आहे. सदरील खुलासा योग्य व समाधानकारक असल्याचे मा.समिती अध्यक्ष, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांनी मान्य केला असून त्यांचे नियुक्त प्राधिकारी (प्रधान सचिव, वित्त विभाग) यांना श्री.भोसले यांचे विरुध्द कोणतीही कारवाई करु नये असे पत्र व्हाआयपी/एमएमए/निलंगा/मु/४८६/२०१६ दिनांक १४.०३.२०१६ अन्वये कळविले आहे. तसेच कार्यालय प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना पत्र दिनांक २२.०३.२०१६ अन्वये कळविले आहे. इतर कर्मचारी यांना दिनांक ३१.१२.२०१५ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तवणूक) नियम १९६७ भंग केल्याच्या अनुषंगाने कारणे दाखवा नोटीस देण्यात येऊन खुलासा मागविण्यात आला. दिनांक ०५.०१.२०१६ रोजी संबंधिताचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (वर्तवणूक) नियमाचा भंग केल्यामुळे संबंधितास दिनांक ०७.०१.२०१६ रोजी सक्त ताकीद देण्यात येऊन भविष्यात असे घडणार नाही याची नोंद घेण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्राम विकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय-** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

| | |
|---|---|
| कामाचे नाव | प्रशासकिय इमारत बांधकाम पंचायत समिती हदगाव |
| प्रशासकीय मान्यता रुपये | रु. १,११,९२,०००/- |
| तांत्रिक मान्यता रुपये | रु. ७३,७२,१००/- |
| लेखाशिर्षक | पंचायत समिती प्रशासकिय इमारत बांधकाम |
| निविदा रक्कम | रु.७३,०२,०२२/- |
| कंत्राटदाराचे नांवश्री. | गजानन कन्स्ट्रक्शन नांदेड |
| कार्यारंभ आदेश | आदेश क्र. २ दिनांक ८/३/२०११ |
| कामाची मुदत | १२ महिने |
| संक्षिप्त आक्षेप | अतिप्रदानास जबाबदार कर्मचारी/अधिकारी यांची चौकशी करुन व्याजाची रक्कम वसूल करणेबाबत |

**आक्षेपाबाबत करावयाची कार्यवाही :-**

प्रशासकीय इमारत पंचायत समिती हदगाव या इमारतीचे धावते दुस-या देयकातुन मोजमाप पुस्तीका क्र. ३७८ पान क्र. ४८ वर बाब क्रमांक ११ सिमेंट प्लास्टर करणे या बाब मध्ये अंकगणितीय चुकीमुळे संबंधीत कंत्राटदाराला रुपये ९,३१,००० अतिप्रदान करण्यात आले असुन ही रक्कम तिस-या धावत्या देयकातुन वसुल करण्यात आलेली आहे. सदरील अतिप्रदान रक्कम दिनांक ३०.३.२०१२ रोजी देण्यात आली होती. व ती दिनांक २५.२.२०१३ रोजी तीस-या देयकातुन समायोजित करण्यात आली आहे. परंतु जवळपास अकरा महिने संबंधीत गुत्तेदारानी वापरली असुन सदरील मोजमापन पुस्तीका व संचिकेची पाहणी केली असता संबंधीत श्री.पी.एस.मुढे, शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग हदगाव तसेच विभागीय कार्यालयातील श्री.ए.के.क्षिरसागर, पूर्वतपासणी शाखा, श्री. टि.एल.लोणेकर, सहाय्यक लेखा अधिकारी (सेवा निवृत्त) व अर्थ विभागातील पूर्व तपासणी शाखेतील तत्कालीन कर्मचारी/अधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळे रक्कम रुपये ९३१०००/-गुत्तेदाराला जादा प्रदान झालेली होती. सदरील जादा प्रदानास वरिल कर्मचारी/अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांचेकडून व्याजाची रक्कम वसुल करणे योग्य वाटते.

सदर कामाची प्रशासकिय मान्यता ही १११.९२ लक्ष असताना अंदाजपत्रक फक्त रु. ७३.७२ लक्ष चे बनविण्यात आले यात एवढी तफावत का याबाबत उपलब्ध अभिलेख्यांवरुन मुळे प्रशासकिय मान्यतेच्या रक्कमेत मुख्य इमारतीसह जोडरस्ता, परिसर सुधारणे, वाहनतळ, विद्युतीकरण, पाणी पुरवठा आणि संगणकीकरण या बाबीचा समावेश आहे. फक्त मुख्य इमारतीचे अंदाजपत्रक रुपये ७३.७२ लक्ष एवढे आहे. उर्वरित रक्कमेमधुन सर्व कामाचे वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करुन कामे करुन घेण्यात आली व प्रशासकीय रक्कमेपर्यंत या कामावर खर्च करण्यात आला आहे. अहवाल उचित कार्यवाहीस्तव सादर.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरणी रु. ९,३३,१५०/- इतक्या जादा प्रदानाची वसुली करण्यात आली आहे. तसेच रु. १.११ कोटी एवढया रक्कमेस प्रशासकीय मंजुरी असताना सदरहू कामास फक्त रु. ७३.०० लक्षची तांत्रिक मान्यता देण्यात आली, या प्रकरणातील मुख्य लेखाधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी. दरम्यानच्या काळातील व्याज संबंधित अधिका-याकडून वसूल करण्याचे निर्देश समितीने दिले असता समितीस सादर झालेल्या अहवालात अंकगणितीय चुकीमुळे कंत्राटदाराला रु. ९,३१,०००/- अति प्रदान करण्यात आले होते. परंतु, सदरहू रक्कम तिस-या धावत्या देयकातून वसूल करण्यात आली. मोजमाप पुस्तिका व संचिकेची पाहणी केली असता शाखा अभियंता, सहाय्यक लेखा अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक यांच्या निष्काळजीपणामुळे अति प्रदान झाल्यामुळे त्यांस जबाबदार धरून त्यांचेकडून व्याजाची रक्कम वसूल केलेली आहे. परंतु, वरील पाचही कर्मचा-यांवर व्याज वसुली शिवाय अन्य कोणतीही दंडात्मक कारवाई प्रस्तावित न करण्याची कारणे काय आहेत यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पंचायत समिती हदगाव प्रशासकीय इमारत बांधकामाचे दुस-या धावत्या देयकातून जादा आदायी झाली त्यास जबाबदार असणा-या संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांकडून रु. १,०२,४१०/- इतक्या व्याजाची वसुली करण्यात आलेली आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा खुलासा मागविण्यात आला होता. त्याचप्रमाणे तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.भोसले यांनी समितीकडे सविस्तर खुलासा केलेला आहे. उक्त खुलासा पुढीलप्रमाणे आहे. 'सदर प्रकरणी १.११ कोटी एवढी प्रशासकीय मंजुरी असताना सदर कामास तांत्रिक मान्यता रुपये ७३.०० लक्ष देण्यात आली या संबंधाने सादर करण्यात येते की, तांत्रिक मान्यतेचा विषय हा संबंधित विभागाचा म्हणजे कार्यकारी अभियंता (उत्तर), जिल्हा परिषद, नांदेड यांचा आहे तसेच सदरील देयकातील कामाच्या नोंदी व मोजमाप पुस्तिकेतील नोंदी तपासल्या असल्याबाबतचे कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्र देयकावर नमुद करुन बांधकाम विभाग (उत्तर) विभागाने वित्त विभागात देयक प्रदानार्थ सादर केलेले असल्याने व देयकावर विभागाने नमुद केलेल्या प्रदानार्थ रकमेनुसारच वित्त विभागाने सदरील देयक पारित केले आहे आणि परिच्छेदात नमुद केलेल्या रकमेचे समायोजन बांधकाम विभाग (उत्तर) विभागाने सदरील कामाच्या तिस-या धावत्या देयकातुन केलेले आहे.' सदरहू खुलासा समाधानकारक असल्याने श्री. भोसले यांच्या विरूद्ध कारवाई प्रस्तावित केलेली नाही. इतर संबंधित कर्मचा-यांना कारणे दाखवा नोटीस देऊन भविष्यात पुन्हा असे घडता कामा नये याबाबत काळजी घेण्याची दक्षता घेतलेली आहे असा समितीसमक्ष खुलासा केला.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायत समिती, हदगांव प्रशासकीय इमारतीच्या बांधकामात तिस-या धावत्या देयकातून कंत्राटदाराला ९,३१,०००/- रुपयांचे अतिप्रदान झाल्याबाबतच्या घेतलेल्या आक्षेपावर सदरहू अतिप्रदान हे मोजमाप पुस्तीकेत अंकगणितीय चूकीमुळे झाल्याचे तसेच सदरहू अतिप्रदान तिस-या धावत्या देयकातून वसुल करण्यात आले असल्याचा खुलासा जिल्हा परिषदेने केला. मोजमाप पुस्तीका व संचिका संबंधित शाखा अभियंता त्यानंतर विभागीय कार्यालयातील सहाय्यक, सहाय्यक लेखाधिकारी, अर्थ विभागातील पूर्व तपासणी शाखेतील कर्मचारी/ अधिकारी यांच्यामार्फत हाताळण्यात येवूनही साध्या बेरीज वजाबाकीतील चूकीमुळे सुमारे एक वर्ष संबंधित ठेकेदाराने तब्बल ९,३१,०००/- ऐवढी मोठी रक्कम वापरली असे होवूनही जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित अधिका-यांस समज देण्यापलिकडे कोणतीही कारवाई केली नसल्याप्रकरणी समिती तीव्र खेद व्यक्त करते.

मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या साक्षी दरम्यान झालेल्या अतीप्रदानास जबाबदार असणा-या कर्मचारी / अधिकारी यांच्याकडून अतिप्रदानावरील व्याज वसुलीप्रकरणी समितीच्या निदेशानुसार उक्त अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून १,०२,४१० रुपये इतक्या व्याजाची वसुली केल्याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करते.

पंचायत समिती हदगांव प्रशासकीय इमारत बांधकामाची प्रशासकीय मान्यता ही रुपये १११.९२ लक्ष असताना तांत्रीक मान्यता फक्त रुपये ७३.७२ लक्षला का घेण्यात आली, यासदंर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त होऊ शकले नाही. तथापि तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा सविस्तर खुलासा आल्यामुळे समिती समाधान व्यक्त करते. तद्वतच, प्रशासकीय मान्यता प्रदान करणा-या ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांकः- पंसई २००९/प्र.क्र.१७१/परा-७ दिनांकित ३१ डिसेंबर, २००९ **(परिशिष्ट ४.१)** अनुसार हदगांव पंचायत समितीच्या केवळ इमारतीच्या बांधकामासाठी १,११,९२,००० रुपये इतक्या किमंतीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असतानाही विभागीय सचिवांच्या साक्षीत प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेत मुख्य इमारतीसह जोड रस्ता, वाहन तळ, विद्युतीकरण, पाणी पुरवठा, संगणकीकरण ई. बाबींचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. उर्वरित रक्कमेमधुन सर्व कामांचे वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करुन कामे करुन घेण्यात आल्याचा खुलासा समितीस केलेला आहे. याबाबत समिती नापसंती व्यक्त करते. **महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ११४, तसेच शासन निर्णय झेडपीए-२९८२/२८ दिनांक २५ मे, १९८९ अन्वये सदरील कामास सुधारीत प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी घेतली नाही ही बाब देखील गंभीर स्वरुपाची आहे. त्यामुळे संबंधितांवर कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे या प्रकरणात अंकगणीतीय चुका झाल्याचे मान्य केले असून भविष्यात चूका, अनियमितता, अंकगणितीय चूकांमुळे होणारी अतिप्रदाने टाळण्याकरीता जिल्हा परिषद प्रशासनाने कोण-कोणती काळजी व दक्षता घ्यावी याबाबतचे सर्वंकष परिपत्रक ग्रामविकास विभागाने निर्गमित करावे व त्याबाबतचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, नांदेड

### मंजुर अंदाजपत्रकातील बाबनिहाय कामे परिमाणानुसार व विनिर्देशानुसार भौतिकदृष्ट्या पूर्ण होवूनही बांधकामाचा लेखा बंद न करणे बाबत व अंशतः दर कमी करुन देयक अंतिम न करणेबाबत

**(परिच्छेद ३.२९७) (सन २०११-२०१२)**

बांधकाम विभाग (उत्तर) चे अहवालातील मुळ परिच्छेदातील तपशीलानुसार एकुण सात कामे ही मंजूरी अंदाजपत्रकानुसार व विनिर्देशानुसार भौतिकदृष्ट्या पूर्ण होवूनही बांधकामाचे लेखे बंद करण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १९० नुसार प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यावर शक्य तितक्या लवकर बांधकामाचे लेखे बंद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १९०(१) खालील टिपनुसार काम पूर्ण झाल्याची तारीख ही ज्या तारखेस काम पूर्ण झाले असेल तीच तारीख समजण्यात यावी. तसे न करता चाचणीस्तव मंजुर दरापेक्षा अंशतः दर देवून देयक अंतिम न करता धावते देयक म्हणून पारित करून कामे होवूनही अपूर्ण कामाच्या संख्येत भर पडतांना दिसून येते. सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांचे पत्र क्रमांक जीजीआर/२३४/का-४/दिनांक ९ सप्टेंबर १९८७ नुसार कामावर वापरलेल्या साहित्याची चाचणी अहवाल प्राप्त नसल्यास केलेल्या कामाच्या १० टक्के रक्कम रोखून ठेवणे आवश्यक आहे. तथापि नाममात्र रक्कम रोखुन किंवा काही कामाच्या बाबतीत चाचणी अहवाल प्राप्त होवुनही अंशतः दर मंजुर करून नियमबाह्यता केल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १७७ नुसार कंत्राटदाराचे बील तयार करण्यापूर्वी मोजमाप पुस्तिकेतील कामाचे वर्णन व परिमाणे यांच्या संबंधीतच्या नोंदीची तपासणी व छाननी करुन देयक तयार करण्यात येईल. पूर्ण झालेले काम करार विनिर्दिष्ट असेल तर त्या कामासाठी पूर्ण दर व बांधकाम मानकापेक्षा कमी असेल तर अशा वेळी करारनाम्यातील सर्वसाधारण शर्ती लक्षात घेवून अंशतः दर मंजूर करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला .**

अहवालातील मुळ परिच्छेदातील तपशीलानुसार एकूण सात कामाचे देयके अंतिम करण्यात आलेली नव्हती तथापि, तद्नंतर सदर च्या सर्व कामाची देयके अंतिम करण्यांत आली असून त्या कामाचे अंतिम देयके पुर्ण झाल्याचा दिनांक पुढील प्रमाणे आहे.(१) संरक्षणभिंत बांधकाम पशु वैद्यकीय दवाखाना मौ.शिवणी ता.किनवट दि.२७-२-२०१२(२)हुंडा ते हंगीरगा रस्त्याची दुरुस्ती करणे किमी १/० ते २/०इजिमा-३३ ता.उमरी दि२५-२-२०१२ (३) जामगांव ते कुदळा रस्त्याची सुधारणा करणे किमी २/० ते २/५०० ता.उमरी दि.२५-२-२०१२ (४) जि.प.हायस्कुल दुरुस्ती मौ.विष्णुपूरी ता.नांदेड दि.२३-२-२०१२ (५) जि.प.नांदेड (कॉन्फरन्स हॉल) सभागृहाची सुधारणा करणे दि.२८-२-२०१२ (६) निळकंठवाडी रस्त्याचे बांधकाम करणे ता.हदगांव किमी ०/० ते १/० दि.१५-१२-२०११ (७) प्रजिमा-७ ते मांडवा रस्त्याची सुधारणा करणे किमी ०/० ते ०/५०० ता.किनवट दि.१५-३-२०१२ रोजी मंजूर अंदाजपत्रकानुसार व विनिर्देशानुसार पूर्ण करण्यांत येवुन बांधकामाचे लेखे बंद करण्यात आलेले आहेत. कामे पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र अवलोकनार्थ ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १७७ नुसार कंत्राटदाराने बील तयार करण्यापूर्वी मोजमाप पुस्तीकेतील कामाचे वर्णन व परिमाणे यांच्या सबंधीताच्या नोंदीची तपासणी व छाननी करुन देयक तयार करण्यात येते व पूर्ण झालेले काम करार विनिर्दिष्ट असेल तर त्या कामासाठी पूर्ण दर व बांधकाम मानकापेक्षा कमी असेल तर अशा वेळी करारनाम्यातील सर्वसाधारण शर्ती लक्षात घेवुन अंशतः दर मंजूर करण्यात येते. तथापि चाचणी अहवाल प्राप्त न झालेले बाबीचे १० % कपात करणे बाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, विभागाकडील एकूण ७ कामे भौतिकदृष्टया पूर्ण होऊनही या कामाचे लेखे बंद न करण्याची कारणे काय आहेत, सा.बां.विभागाचे पत्र दिनांक ९ सप्टेंबर, १९८७ नुसार साहित्याची चाचणी अहवाल प्राप्त नसल्यास १० टक्के रक्कम रोखून ठेवायची असताना नाममात्र रक्कम कोणत्या प्राधिकारान्वये

रोखून ठेवली, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम उत्तर) यांनी खुलासा करताना तांत्रिक अहवाल नसेल तर १० टक्के रक्कम रोखून पेमेंट केले जाते. इतर ७ कामे पूर्ण झालेली आहेत असे समितीस उत्तर दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकूण ७ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण होऊनही त्यांचे लेखे बंद करण्यात आलेले नाहीत. मुळात ही कामे पूर्ण करण्याची मुदत वेगवेगळी होती. मुदत संपल्यानंतर सुध्दा ती कामे अपूर्ण दाखविण्यामागील कारणे काय आहेत यावर खुलासा करताना कार्यकारी अभियंता बांधकाम, उत्तर यांनी, हा प्रकार तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांच्या काळात घडलेला आहे. त्यांना आजच्या बैठकीला उपस्थित राहण्याबाबत पत्र पाठविले होते. परंतु ते परदेशात असल्यामुळे आजच्या बैठकीला येऊ शकलेले नाहीत. अहवाल वर्षात अपूर्ण असलेली कामे आजच्या घडीला पूर्ण झालेली आहेत. ही कामे पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. असे समितीने स्पष्ट केले यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या संदर्भात तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांकडून खुलासा घेण्याचे निदेश दिले.

**तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. एम.बी. बंगाळे, यांचा खुलासा**

(१) पंचायती राज समितीस उपस्थित राहण्याच्या सूचना असलेले आपले पत्र त्या कालावधीत लागूनच मी परदेशात मुलाकडे गेलेलो असल्यामुळे व तद्नंतर प्रकृती स्वास्थ्यामुळे घरी नसल्यामुळे बाहेरगावी असल्यामुळे मला प्राप्त होऊ शकले नाही. तसेच अन्य कोणत्याही माध्यमातुन मला पंचायत राज समितीस असल्याचे अवगत न झाल्यामुळे मी पंचायत राज समितीस उपस्थित राहू शकलो नाही.

(२) जी कामे भौतिकदृष्टया पुर्ण झालेली परंतु अंतिम देयक अदा करुन लेखा बंद करण्याची कार्यवाही राहीली आहे अश्या कामासंदर्भात सादर करण्यात येते की, महाराष्ट्र बांधकाम लेखा संहितेनुसार प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण झाल्यावर सदर बांधकामाच्या लेखावर कोणताही खर्च केला जाऊ नये या एकमेव उद्देशाने शक्य तितक्या लवकर बांधकामाचे लेखे बंद करण्यात येतात. तथापि सदर काम भौतिकदृष्टया पुर्ण झाल्यानंतर कोणताही अतिरिक्त खर्च प्रश्नाधिन कामावर झालेला नाही.

(३) प्रत्यक्षात कामपुर्ण करणे व कामाचे देयक अंतिम करणे हया दोन्ही स्वतंत्र बाबी असुन काम पुर्ण करणे ही बाब तांत्रिक असुन कामाचे अंतिम देयक अदा करण्याची संपुर्ण कार्यवाही प्रशासकीय स्वरुपाची आहे. कामाच्या घाईगर्दीत कामात लेखा बंद करावयाचे राहून गेले असल्यास अश्या कामाचा लेखा केव्हाही अंतिम करता येऊ शकतो.

(४) पंचायत राज समितीच्या आक्षेपात नमूद सर्व कामांचे बांधकाम लेखे बंद करण्यात आलेले आहेत. तसेच त्यावर जास्तीचा खर्चही झालेला नाही.

(५) याशिवाय येथे सादर करण्यात येते की, महाराष्ट्र शासन नियम पुस्तिकेनुसार प्रदान अधिकारानुसार कंत्राटदाराने केलेल्या कामाची प्रत्यक्ष पहाणी करुन अंशतः दर मंजूर करण्याची तरतूद आहे. तसेच अंशत दर केल्यामुळे शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

(६) मी आता सेवा निवृत्त होऊन बराच काळ उलटलेला आहे व अशा परिस्थितीत माझ्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्याची कृती अस्तित्वातील नियमानुसार योग्य ठरणार नाही. तेव्हा अशी कार्यवाही करणे माझ्या विरुध्द अन्यायकारक असल्याने तशी कार्यवाही न करण्यास विनंती आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

श्री. एम.बी. बंगाळे, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचा खुलासा विचारात घेता त्यांचे विरुध्द कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर प्रकरणी तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचा खुलासा सादर केला होता. संबंधित खुलासा विचारात घेता त्यांचे विरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**उपरोक्त संदर्भात ग्राम विकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभाग** - जिल्हा परिषदेच्या उत्तराशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीस जिल्हा परिषदेकडून दिलेल्या माहितीत असे नमूद केलेले आहे की, सदर प्रकरणी तत्कालिन कार्यकारी अभियंता यांचा खुलासा सादर केला होता. संबंधिताचा खुलासा विचारात घेता त्यांचे विरुद्ध कोणतीही कार्यवाही येऊ नये असे जिल्हा परिषद, नांदेड यांनी उत्तर दिलेले असून, त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविलेली आहे. पुढे समितीने विचारणा केली की, काम अंतिम न करता एक्सलेशन दिले जाते काय? यावर बांधकाम विभागाच्या सचिवांनी हे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले आहे व स्पेसिफिकेशनप्रमाणे काम झालेले आहे. त्यामुळे अंतिम बिल करणे अपेक्षित होते. या केसच्या संदर्भातील डिटेल घेतले जातील. मार्च महिन्याच्या शेवटी बिल आले असल्यामुळे ते मंजूर केले असावे. श्री. बंगाळे हे दोन वर्षापूर्वी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. या कामावर खर्च होणार नाही, त्यामुळे कारवाई करु नका अशी चर्चा नांदेड जिल्हा परिषदेत झाली होती. अशी घटना ज्यावेळी घडते किंवा कोणतेही बिल येते त्यावेळी ५ टक्के प्रमाणे चेकिंग करण्याचे राहिले असेल तर पुढील बिलाला चेकिंग दाखवावे म्हणून ती घटना घडली असावी, असे वाटत आहे. दिनांक ३१ मार्चला जास्त बिले आल्यानंतर पास करून पुढच्या महिन्यात फायनल केले असे होऊ शकते. दिनांक ३१ मार्चला असे घडू शकते. बिलाचे चेकिंग राहिले असल्यास असे होऊ शकते. संबंधित अधिकारी दोन वर्षापूर्वी सेवानिवृत्त झालेले आहेत. लेखे बंद करण्याची आवश्यकता असते.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या कामात वित्तीय शिस्त, काटेकोरपणा येऊन शासनाच्या अनुदानाचा व संस्थांच्या स्वनिधीचा विनियोग नियमानुसार होण्याकरिता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ तयार करण्यात आली आहे. लेखासंहितेतील नियम १९० नुसार कामे प्रत्यक्ष पूर्ण झाल्यावर शक्य तितक्या लवकर बांधकामांचे लेखे बंद करणे आवश्यक असते. परंतु बांधकाम (उत्तर), विभाग, नांदेड जिल्हा परिषद यांनी एकूण सात कामांचे लेखे बंद केलेले नव्हते, यामुळे कामे पूर्ण होऊनही अपूर्ण कामांची संख्या वाढते हा आक्षेप प्रस्तुत प्रकरणांत प्रामुख्याने घेतला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांच्या साक्षीच्या वेळेला संबंधित तत्कालिन कार्यकारी अधिकारी अनुपस्थित राहील्याने त्यांचा लेखी खुलासा घेण्याचे निदेश समितीने दिले होते.

तत्कालिन कार्यकारी अधिकारी यांचा खुलासा समितीस प्राप्त झाला असुन त्यास कामाच्या घाईगडबडीत कामाचे अभिलेखे बंद करण्याचे राहून गेले असल्याचे व अशा कामांचे अभिलेख केव्हाही बंद करता येतात असे नमुद करण्यात आले आहे. सदर खुलासा लेखासंहिता नियम १९० (१) नुसार ग्राह्य धरता येत नाही. संबंधित तत्कालिन कार्यकारी अधिकारी दोन वर्षापूर्वी निवृत्त झालेले असून सदरहू कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्यानंतर कोणताही अतिरिक्त खर्च प्रस्तुत प्रकरणातील कामावर झालेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द कोणतीही कारवाई किंवा शिफारस समिती करीत नाही. परंतू, प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण झाल्यावर सदर बांधकामाच्या लेख्यावर कोणताही खर्च केला जावू नये या उद्देशाने लेखासंहितेत नियम १९० ची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारे काम पूर्ण होऊन ही बांधकामाच्या कामांचे लेखे बंद न करणे हे प्रशासकीय दृष्टया गैरशिस्तीचे आहे. याप्रकरणी संबंधितांना कडक स्वरुपाची समज देऊन तशी नोंद त्यांचे सेवा पुस्तिकेत घ्यावी. त्याचप्रमाणे समितीला आश्वासित केल्याप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १७७ नुसार कंत्राटदाराने बील तयार करण्यापूर्वी मोजमाप पुस्तीकेतील कामाचे वर्णन व परिमाणे यांच्या सबंधीताच्या नोंदीची तपासणी व छाननी करुन देयक तयार करण्यात येते व पूर्ण झालेले काम करार विनिर्दिष्ट असेल तर त्या कामासाठी पूर्ण दर व बांधकाम मानकापेक्षा कमी असेल तर अशा वेळी करारनाम्यातील सर्वसाधारण शर्ती लक्षात घेवुन अशंतः दर मंजूर करण्यात येते. **तथापि चाचणी अहवाल प्राप्त न झालेले बाबीचे १० % कपात करणे बाबतची कार्यवाही पुर्ण केली असल्याचे समितीला पाठविलेल्या माहितीत दिसून येत नाही. संबंधीत चाचणी प्राप्त न झालेल्या बाबींचे १०% रक्कम संबंधितांकडून कपात करुन ती शासनाच्या खाती जमा करण्यात यावी अशाही समिती शिफारस करीत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्यात पाठविण्यात यावा.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, नांदेड

### साईबाबा मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह, वाघाळा, सिडको तालुका नांदेडला प्रदान परिपोषण अनुदानातील प्रदान व इतर अनियमितता बाबत

**(परिच्छेद ३.६७५) (सन २०११-२०१२)**

समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेडचे सन २०११-२०१२ चे लेखापरीक्षणात उक्त वस्तीगृहासाठी प्रमाणक क्रमांक २७२/१४ मार्च २०१२ रक्कम रुपये १,८५,२२०/- व प्रमाणक क्रमांक १२३७/३१/०३/१२ रक्कम रुपये ४,०६,९८०/- अन्वये एकूण रक्कम रुपये ५,९२,२००/- खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-१०९७/प्र.क्र.१०७/ मावक-४ दिनांक १६ मार्च १९९८ चे (आठ) अनुदानाचे निर्धारण अ नुसार परिपोषण अनूदान ६० टक्के अग्रीम अनुदान माहे जून मध्ये देणे आवश्यक असतांना उपरोक्त प्रकरणी माहे मार्च मध्ये वितरीत केले.

२. उक्त शासन निर्णयातील उक्त नियमान्वयेच चालु वर्षासाठी दिलेल्या ६० टक्के अग्रीम अनुदानाचा विनियोग झाल्याची खात्री तपासणी अधिकारी करून विद्यार्थी संख्येच्या सरासरीप्रमाणे अंतिम ४० टक्के समायोजीत करणे आवश्यक आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणात माहे मार्च १२ मध्ये ६० टक्के अग्रीम अनुदान दिले आहे.

३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२००९/प्र.क्र.९३/मावक-४ दिनांक ०२ जुलै २००९ नुसार वाढविण्यात आलेला मान्य विद्यार्थी संख्येत दिनांक ३१ मे, २०११ च्या शासन निर्णयानुसार ४८ ने कपात करुन मान्य विद्यार्थी संख्या २५ केली आहे याबाबत ६० टक्के मागणी प्रस्तावावर समाजकल्याण अधिकारी यांनी विद्यार्थी संख्या २५ केली आहे. ६० टक्के मागणी प्रस्तावावर समाजकल्याण अधिकारी यांनी विद्यार्थी संख्येची तपासणी करुन अनुदान अदा करण्यास सुचविले असतांना तशा प्रकारची कार्यवाही झालेली नाही. अर्धसमासपत्र क्र.०९ दिनांक ३१/१०/२०१२ लेखी अन्वये मागणी करुनही सदर वस्तीगृहाचे मान्य विद्यार्थी संख्येचे प्रमाणपत्र दर्शविले नाही. ६० टक्के मागणी प्रस्तावावरील विद्यार्थी संख्या ४९ नुसार एकुण १०० टक्के अनुदानाची रक्कम रुपये ३,०८,७००/- असतांना सदर वस्तीगृहास रुपये ५,९२,२००/- प्रदान केले आहेत. जादा रक्कम रुपये २,८३,५००/- वसूल केले नाहीत व विद्यार्थी संख्येबाबत खात्री करता आली नाही.

४. उक्त शासन निर्णयाचे नियम आठ अनुदानाचे निर्धारण (अ) मधील तरतुदीनुसार समाजकल्याण अधिकारी यांनी ६०% अग्रीम अनुदान देण्यापुर्वी वस्तीगृह व्यवस्थापनाबरोबर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु करारनाम्यावर समाजकल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्यामुळे करारनाम्याची विधीग्राह्यतेची खात्री करता आली नाही.

५. संचीकेतील दिनांक १०/०८/११ च्या तपासणी अहवालाप्रमाणे रेकॉर्ड अद्यावत नाही व मानकानुसार भोजनव्यवस्था नाही ह्या उणीवा नमुद असताना दिनांक १६/०३/१९९८ चे शासन निर्णयातील (आठ) अनुदानाचे निर्धारणनुसार ९ प्रकारच्या उणीवाबद्दल प्रत्येक रुपये १,०००/- दंडाप्रमाणे रुपये २,०००/- दंड वसुल केले नाही.

६. सदर संस्थेने सनदी लेखापालांचा लेखापरीक्षण अहवाल आक्टोबर अखेर पर्यंत सादर करणे आवश्यक असतांना दिनांक ०२/०३/१२ रोजी सादर केल्यामुळे दिनांक १६ मार्च १९९८ शासन निर्णयातील ८ (अ) नुसार अनूदानाच्या पाच टक्के दंडाची रक्कम रुपये १५,४३५/- वसुल केले नाही.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७७ (२) अन्वये प्रदानाची पोचपावती घेतलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र बीसीएच १०९७/ प्र.क्र. १०७/मावक-४ दि. १६ मार्च १९९८ चे (आठ) अनुदानाचे निर्धारण अ नुसार परिपोषण अनुदान ६०% अग्रीम अनुदान माहे जून २०११ मध्ये देणे आवश्यक आहे.

तथापि सन २०११-१२ या वर्षात तरतुद माहे जून २०११ मध्ये आदेश क्र १७४९ दि १४.०६.२०११ अन्वये ४६४६४०००/- ऐवढी प्राप्त तरतुदीतुन प्रलंबीत प्रकरणावर खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ. क्र | वर्ष | विवरण | वसतीगृह संख्या | रुपये लाखात |
|---|---|---|---|---|
| १. | २०१०-११ | ४०% अनुदान | १०५ | १४५.८१ |
| २. | २०१०-११ | मानधन | १७५ | १२८.३३ |
| ३ | २०१०-११ | इ.भाडे | १०२ | १९०.५० |
| **एकुण** | | | | **४६४.६४** |

वरील प्रमाणे प्राप्त झालेली तरतुद प्रलंबित प्रकरणावर पुर्णतः रु. ४६४.६४ लाख ऐवढी खर्च झालेली आहे त्यामुळे माहे जून २०११ मध्ये ६०% तरतुदीसाठी एकुण तरतुद रु. ५ कोटी ४० लाख आवश्यक होती. सदरील तरतुद प्रादेशीक उपायुक्त यांचे आदेश क्रमांक ४५३, दि. ०८.०२.१२ अन्वये ५४०.७०/-लाख माहे मार्च १२ मध्ये तरतुद प्राप्त झाल्यामुळे ६०% व ४०% अदा केले आहे.

२. उक्त शासन निर्णयातील उक्त नियमान्वयेच चालु वर्षासाठी दिलेल्या ६०% अग्रीम अनुदानाचा विनियोग झाल्याची खात्री करणे आवश्यक होते ही वस्तुस्थिती आहे. माहे जून मध्ये प्राप्त तरतुद ४६४.६४ लाख ऐवढी तरतुद प्रलंबित प्रकरणावर खर्च झाली असल्यामुळे ६० टक्के अनुदान अदा करता आले नाही. माहे मार्च १२ मध्ये ५४०.७० लाख तरतुद प्राप्त झाल्यामुळे माहे मार्च मध्ये ६० टक्के व ४० टक्के अनुदान खात्री करुनच सदरील अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

३.**अ)** शासन निर्णय २४ ऑगस्ट २००४ अन्वये अनुदानित साईबाबा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह वाघाळा या वसतिगृहातील विद्यार्थी संख्या २४ ला मान्यता आहे

**ब)** शासन निर्णय ९ जुलै २००९ अन्वये ७३ ने जादा संख्या वाढवुन एकुण विद्यार्थी संख्या ९७ केलेली आहे.

**क)** शासन निर्णय दि ३१ मे २०११ नुसार ४८ विद्यार्थी संख्या कमी करुन ४९ ऐवढी मान्य संख्या मंजुर केली आहे.

**ड)** वरील आदेशा प्रमाणे ऑगस्ट २००४ ते एप्रिल २००९ या कालवधीत २४ विद्यार्थी मान्य संख्या होती.

**इ)** जुलै २००९ ते एप्रिल २०११ या कालावधीत ९७ मान्य संख्या होती.

**फ)** मे २०११ ते एप्रिल २०१५ या कालावधीत ४९ मान्य संख्या दिसुन येते त्यानुसार सन २०१०-११ या वर्षात ९७ विद्यार्थी संख्या असल्याने ०३ विद्यार्थी अपात्र ठरल्यामुळे ९४ विद्यार्थ्यांवर ६३० रु प्रमाणे १० महिन्याचे ५९२२०० रु अदा केले आहेत. ही वस्तुस्थिती आहे.

शासन निर्णय दि.३१ मे २०११ नुसार २०११-१२ या वर्षापासुन ४९ ऐवढी विद्यार्थी संख्या कपात करुन सदर वसतीगृहाकडे ९७ वजा ४८ – ४९ ऐवढी विद्यार्थी संख्या राहते सन २०१०-११ मध्ये सदरील वसतीगृहात ९७ ऐवढ्या संख्येपैकी ३ विद्यार्थी अपात्र ठरवुन ९४ विद्यार्थ्यांवर देयक अदा करण्यात आले आहे. ९४x१०x६३० = ५९२२००/- ऐवढी रक्कम अदा केली आहे.

उक्त शासन निर्णयाचे नियम आठ अनुदानाचे निर्धारण (अ) मधील तरतुदीनुसार समाज कल्याण अधिकारी यांनी ६०% अग्रीम अनुदान देण्यापूर्वी वसतीगृह व्यवस्थापना बरोबर करारनामा करणे आवश्यक आहे. तथापि, सबंधीत वसतीगृहा बाबत व्यवस्थापना बरोबर करारनामा करण्यात आला आहे करारनाम्यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी व यांची स्वाक्षरी नाही ही वस्तुस्थिती आहे तत्कालीन स.क.अ व तत्कालीन विस्तार अधिकारी यांना पत्र क्र १९१४/१९१३ दि२१.८.१५ अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे.

४. संचिकेतील दि. १०.०८.२०११ च्या तपासणी अहवालाप्रमाणे रेकॉर्ड अद्यावत नाही व मानकानुसार भोजन व्यवस्था नाही ह्या उणीवा नमुद केलेली आहेत. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सबंधीत संस्थेस याबाबत खुलाशासाठी क्र १८३९ दि. १४.०८.२०१५ खुलासा मागविण्यात आलेला होता. त्यामुळे संबंधित संस्थेकडुन उणीवा असल्याबद्दल दंड म्हणुन २०००/- शासन खाती भरले आहेत चलनाची छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

५. सनदी लेखापालाचा लेखा परिक्षण अहवाल माहे ऑक्टोंबर अखेर सादर करणे आवश्यक असतांना दि ०२.०३.२०१२ रोजी सादर केला आहे ही वस्तुस्थिती आहे या बाबत संबंधित संस्थेस या कार्यालयाचे पत्र क्र १८३९ दि १४.०८.२०१५ अन्वये नोटीस दिली आहे. त्यामुळे ५ % दंडाची रक्कम १५४३५/-रु संबंधित संस्थेने शासन खाती भरले आहेत चलनाची छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७७ (२) अन्वये प्रदानाची पोचपावती घेतलेली नाही ही वस्तुस्थिती आहे.त्यामुळे संबंधितना अनुदानाचे धनादेश वितरीत केल्याची पोच पावती घेण्यात आली असून पोच पावतीची छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, वसतिगृहाची मंजूर विद्यार्थी संख्या व प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या यांची तपासणी समाजकल्याण अधिकारी यांनी का केली नाही, वसतिगृह मान्य विद्यार्थी संख्येचे प्रमाणपत्र लेखा परीक्षणास का उपलब्ध केले नाही, अनुदान मागणी प्रस्तावानुसार ४९ विद्यार्थी संख्या असताना ९४ विद्यार्थी संख्या घेऊन रु.२८३,५०० इतके नियमबाहय जादा अनुदान वितरण कोणत्या प्राधिकारात केले, संबंधितांवर याबाबत काय कारवाई केली, व्यवस्थापनाबरोबर केलेल्या करारनाम्यावर समाजकल्याण अधिकारी यांनी स्वाक्षरी का केली नाही, वसतिगृह तपासणी अहवालात आढळलेल्या उणिवांबाबत काय कार्यवाही केली, तसेच अनुदान वितरणाची पोच का घेण्यात आली नाही, यावर खुलासा करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस साईबाबा मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहास २४ विद्यार्थ्यांना मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर दिनांक ९ जुलै, २००९ रोजी ७३ इतकी संख्या वाढवून ती ९७ करण्यात आली. पुढे दिनांक २१ मे, २०११ रोजी ९७ ही संख्या ४८ ने कमी करुन ४९ इतकी करण्यात आली. हा संख्येचा घोटाळा झाल्यामुळे फरक पडतो. विद्यार्थी संख्येबाबत शासनाने धोरण ठरविले आहे असे स्पष्ट केले.

समितीने पुढे विचारणा केली की, ज्यांनी करारनाम्यावर सही केली नाही त्यांच्यावर काय कारवाई केली, मानकाप्रमाणे विद्यार्थ्यांना भोजन देत नसताना त्याच्यावर कारवाई होत नसेल तर ही बाब गंभीर आहे. या प्रकरणाची चौकशी करून हे वसतिगृह रद्द का करण्यात येऊ नये याची कारवाई करावी. समिती येणार म्हणून केवळ दंडात्मक कारवाई केली आहे. चुकीचे काम होत असेल तर वसतिगृह का बंद करण्यात येऊ नये याबद्दल जिल्हा परिषदेने आपला अहवाल समितीकडे पाठवावा असे निदेश समितीने दिले यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाच्या नियमानुसार ज्या त्रुटी आढळल्या त्या प्रत्येक त्रुटीबाबत २००० रुपये दंड आकारला जातो. समितीच्या मार्गदर्शनाप्रमाणे सदर बाब शासनाकडे संदर्भ करण्यात येईल आणि तीन महिन्याची एकूण जी रक्कम असेल तेवढा दंड लावण्याविषयी मार्गदर्शन घेतले जाईल असे समितीसमोर स्पष्ट केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) सदरहू प्रकरणी तत्कालिन समाज्यकल्याण अधिका-यांनी व्यवस्थापनाबरोबर केलेल्या करारनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही, मानंकाप्रमाणे विद्यार्थ्यांना भोजन दिले जात नाही असे समितीच्या निदर्शनास आल्यावर सदरहू प्रकरणी चौकशी करुन सदर वसतीगृह रद्द का करण्यात येऊ नये याबाबत कार्यवाही करुन समितीला अहवाल पाठवावा असे निदेश समितीने दिल्यावरुन समितीस अहवाल सादर करण्यात आला. सदरहू अहवालानुसार वसतीगृहास जादा प्रदान केल्याचे दिसून येत नाही. परंतू सदरहू अहवालात सन २०१०-११ या वर्षात वसतीगृहाची मान्य संख्या ९७ वरुन सन २०११-१२ या वर्षाकरीता केवळ ४९ ऐवढी घटली असल्याचे स्पष्ट होते, ही संख्या घटल्याची कारणे काय आहेत ?

२) सदरहू अहवालानुसार तत्कालिन समाजकल्याण अधिकारी श्री.संजय कदम यांना जबाबदार ठरवून त्यांची एक वेतनवाढ रोखावी व २५,०००/- रुपये दंड आकारण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचेकडे सादर केल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कारवाई केली आहे, अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

३) वसतीगृहांच्या प्रत्येक त्रुटीबाबत रु.२०००/- दंड आकारला जातो. सदरहू दंडाची रक्कम ही अत्यल्प असल्याचे समितीचे मत असून सदरहू दंडाची रक्कम वाढविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सदर प्रकरणी तत्कलीन समाज कल्याण अधिकारी यांची करारनाम्यावर स्वाक्षरी नव्हती सद्यस्थितीत स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.समितीने दिलेल्या निर्देशानुसार समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नांदेड कार्यालयाचे आदेश क्रमांक १२८ दिनांक २०.१०.२०१६ अन्वये सदरी वसतीगृहाची चौकशी केली असून सद्यस्तितीत वसतीगृह समाधानकारक चालु असल्याचे तपासणीत दिसून आले. मानकाप्रमाणे विद्यार्थ्यांना भोजन दिल्याचे चौकशी अंती दिसून आले. तसेच जादा अनुदान प्रदान करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२००९/प्र.क्र.९३/मावक-४ दिनांक ३१ मे २०११ अन्वये दिनांक ०१ जून २०११ पासून वसतिगृहास वाढविण्यात आलेल्या विद्यार्थी मान्य संस्थेत ४८ विद्यार्थी संख्या कपात करण्यात आली. सदरील वस्तीगृहास २४ विद्यार्थी संख्या मंजूर असून त्यात बंद पडलेले जनता मुलीचे वसतीगृह नांदेड विद्यार्थी संख्या २४ व कॉस्मोपॉलीटन मुलांचे वसतीगृह मुदखेड यांची विद्यार्थी संख्या २४ व कॉस्मोपॉलीटन मुलांचे वसतीगृह मुदखेड यांची विद्यार्थी संख्या ४९ वर्ग करण्यात आल्यामुळे मान्यता संख्या ९७ झाली होती. मात्र ज्या संस्थेतील वस्तीगृहात वर्ग करण्यात आले होते त्या संस्थेत शासनाने ४८ विद्यार्थी संख्या परत केली आहे. त्यामुळे केवळ ४९ विद्यार्थी संख्या राहिली आहे. बंद पडलेल्या वसतीगृहाची विद्यार्थी संख्या राहिली आहे. बंद पडलेल्या वसतीगृहाची विद्यार्थी मान्यता सदर वसतीगृहास देण्यात आली होती. परंतु वरील शासन निर्णयान्वये वसतीगृहे चालू झाल्याने पुनःश्च त्यांची मान्यता प्रदान केल्याने विद्यार्थी संख्या कमी झाली.

२) मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे पत्र क्रमांक ३००५ दिनांक १९.१२.२०१५ अन्वये मा.आयुक्त समाज कल्याण आयुक्तालय, पुणे महोदयांना पत्र देवून तत्कालीन समाज कल्याण अधिकारी श्री.संजय कदम यांची एक वेतनवाढ बंद व रु.२५००/- दंड बाबत शिफारस केली आहे.

३) शासन निर्णय १६ मार्च १९९८ च्या ८ फ नुसार प्रत्येक उणीवाबाबत रु. १०००/- दंड आकारणे नमूद केले आहे. त्यानुसार दंडाची रक्कम वसूल केली आहे. दंडाची रक्कम वाढविणेबाबत शासन स्तरावर निर्णय अपेक्षीत आहे.

**उपरोक्त संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :-** जिल्हा परिषद नांदेडच्या अभिप्रायाशी सहमत.

वसतीगृहासंदर्भात शासन निर्णय दिनांक १६.३.१९९८ मधील दंडाची रक्कम वाढविणेबाबत शासनस्तरावर निर्णय अपेक्षित आहे असा उल्लेख केलेला आहे, तरी शासन निर्णय दिनांक १६.३.१९९८ मधील नियम ८ फ नमूद दंडाची रक्कम वाढविण्याची आवश्यकता आहे किंवा कसे ही बाब तपासून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना दिनांक २९.२.२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

**चौकशी अहवाल**

पंचायत राज समितीची बैठक दिनांक १३/९/२०१५ रोजी दिलेल्या सूचना नुसार साई बाबा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह वाघाळा सिडको नांदेड या वसतीगृहाची तपासणी दिनांक ०१/१२/२०१५ रोजी केलेली आहे. त्यानुसार सन २०१०-११ या वर्षात वसतीगृहाची मान्य संख्या ९७ एवढी होती त्यापैकी तीन विद्यार्थी अपात्र ठरवून ९४ विद्यार्थ्यांवर परिपोषण अनुदान अदा केले आहे. ९४x१०x६३०=५९२२००/- एवढी रक्कम नियमानुसार सन २०११-१२ या वर्षात अदा केली आहे ही वस्तुस्थिती आहे त्यामळे २८३५००/- एवढी रक्कम वसतीगृहास जादा अनुदान प्रदान केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न

उद्‌भवत नाही. व्यवस्थापना बरोबर केलेल्या करार नाम्यावर तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. तसेच रेकॉर्ड अद्ययावत नाही व भोजन मानकाप्रमाणे नाही या उणिवाबाबत आकारण्यात आलेला दंड २०००/- रुपये व १५४३५/- सनदी लेखा पालाचा अहवाल उशिरा सादर केल्यामुळे दोन्ही मिळून एकूण रक्कम रुपये १७४३५/- रुपये दिनांक १९/०८/२०१५ रोजी चलनाने आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम संबंधित वसतीगृहाने भरलेली आहे. या कार्यालयाचे आदेश क्र. ३००५ दि. १९/१२/२०१५ अन्वये उणिवा बाबत तत्कालीन समाज कल्याण अधिकारी श्री. संजय कदम यांची एक वेतन वाढ व २५,०००/- रुपये दंड आकारण्याबाबत मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

कार्यालयीन आदेश क्र.१२८दि. २०/०१/२०१६ अन्वये साई बाबा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह वाधाळा सिडको नांदेड या वसतीगृहाची तपासणी करुन चौकशी अहवाल सादर करणेबाबत श्री. एस.व्ही.वनशेट्टे समाज कल्याण निरिक्षण यांना आदेशीत केले होते त्यानुसार वसतीगृहाची दिनांक २१/०१/२०१६ रोजी संबंधित वसतीगृहाची तपासणी करुन चौकशी अहवाल या कार्यालयात सादर केला आहे. सदरील चौकशी अहवालात वसतीगृहाची मान्य संख्या सन २०१०-११ या वर्षात ९७ एवढी दर्शविण्यात आलेली असून त्यात शासन निर्णय २ जुलै, २००९ अन्वये मान्यता आहे.

सन २०१०-११ या वर्षातील मान्य संख्या ९७ एवढी होती. त्यापैकी ३ विद्यार्थी अपात्र ठरवून ९४ विद्यार्थ्यावर परिपोषण अनुदान ९४ x१०x६३०=५९२२००/-एवढी रक्कम सन २०११-१२ या वर्षात अदा केल्याचे नमुद केले आहे. त्या अनुषंगाने संबंधित वसतीगृहास जादा रक्कम २८३५००/- रुपये जादा अदा केलेल नाही असे चौकशी अंती दिसून आल्याचे अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे वसतीगृहावर कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**सध्या स्थितितील वसतीगृहाची तपासणी :-** सध्या स्थितीत वसतीगृहाची तपासणी दिनांक ०१/१२/२०१५ व २१/०१/२०१६ रोजी केली असता वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना गादी, उशी, बेडशिट, चादर,ब्लँकेट, लाकडी कपाट, बूट, ताट, वाटी,ग्लास इ. साहीत्य पुरविण्यात आल्याचे दिसून आले. वसतीगृहात स्वच्छता दिसून आली या बाबीचा विचार करता वसतीगृह समाधान कारक चालू असल्याचे दिसून आले. परिच्छेदातील उणिवा बाबत दिनांक २१/०१/२०१६ रोजी साई बाबा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह वाघाळा सिडको नांदेड यांनी खुलासा सादर केला आहे. खुलासा समाधान कारक असल्याने वसतीगृहाचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

**अभिप्राय :-** वरील प्रमाणे चौकशी अहवालानुसार सदरील वसतीगृह सध्या स्थितीत समाधान कारक असल्याचे दिसून येते त्यामुळे सदरील वसतीगृह बंद करण्यात येऊ नये अशी शिफारस करण्यात येत आहे असा चौकशी अहवाल समितीस सादर केला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सदर प्रकरणी तत्कालीन समाजकल्याण अधिका-यांनी व्यवस्थापनाबरोबर केलेल्या करारनाम्यावर सही केलेली नाही, मानंकाप्रमाणे विद्यार्थ्यांना भोजन दिले जात नाही असे समितीच्या निदर्शनास आल्यानंतर सदर प्रकरणी चौकशी करुन सदर वसतिगृहाची मान्यता रद्द का कारण्यात येऊ नये याबाबत कार्यवाही करुन समितीला अहवाल पाठविण्याचे निदेश दिल्यानंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार वसतिगृहाला जादा प्रदान केल्याचे दिसून येत नाही, परंतु अहवालात सन २०१०-११ या वर्षात वसतिगृहाची मान्य संख्या ९७ वरुन सन २०११-१२ या वर्षाकरिता ४९ इतकी घटली असल्याचे स्पष्ट होते. ही संख्या घटण्याचे कारण स्पष्ट करताना सदर अहवालानुसार तत्कालीन समाजकल्याण अधिकारी श्री.संजय कदम यांना जबाबदार ठरवून त्यांची एक वेतनवाढ रोखावी व २५ हजार रुपयांचा दंड आकारण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्याकडे सादर केल्याचे नमूद करण्यात आले आहे. **सदर प्रस्तावावर शासनाने अद्याप कारवाई केली नसून त्याबाबतच्या विलंबाची कारणे स्पष्ट करताना सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी समितीला दिनांक २ जुलै, २००९ रोजी शासन आदेश काढून त्याअन्वये दोन वसतिगृहे बंद करुन तेथील मुले या वसतिगृहात ट्रान्सफर करण्यात आली होती. २४ + ७३ प्रमाणे ९७ इतकी मुलांची संख्या झाली होती. त्यानंतर इतर दोन वसतिगृहे बंद करुन तेथील ४८ मुले या वसतिगृहात ट्रान्सफर करण्यात आली होती. ती मुले दिनांक ३१ मे, २०११ रोजीच्या आदेशानुसार सदर**

**वसतिगृहांमध्ये परत करण्यात आली. यामुळे ९७ मधून ४८ मुले कमी झाल्यामुळे सन २०११-१२ यावर्षी मुलांची संख्या ४९ इतकी राहिली. ही सर्व प्रक्रिया शासनाच्या निर्णयानुसार केलेली आहे. तसेच श्री.संजय कदम यांची एक वेतनवाढ रोखण्याची आणि दंड करण्याकरिता जिल्हा परिषदने आयुक्तांकडे शिफारस केली आहे. याबाबतची प्रक्रिया आयुक्त स्तरावर सुरु आहे. या संदर्भात दोषारोपपत्र तयार करुन आयुक्तांकडे पाठविले आहे. यावर समितीने अशा प्रकारच्या चौकशी पूर्ण करण्यासाठी अनेक वर्षे लागतात. या संदर्भात अहवाल सादर करीत असताना मंत्री महोदयांसमवेत चर्चा करुन वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली प्रकरणे पूर्ण करण्यासाठी ठराविक कालमर्यादा टाकणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.**

## अभिप्राय व शिफारशी

साईबाबा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, वाघाळा, जि. नांदेड यांना समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड कडून परिपोषण अनुदानाच्या प्रदानातील अनियमिततेबाबत शासन निर्णय दिनांक १६ मार्च, १९९८ (**परिशिष्ट ५.१**) मधील सहायक अनुदान देण्याबाबत नियम ८ (अ) अनुसार माहे जून व माहे मार्च मध्ये अनुक्रमे ६०% व ४० % अनुदान वितरीत केले नाही. तसेच सदर नियमांत अनुदानाचा विनियोग झाल्याची खात्री समाजकल्याण अधिका-याने करणे आवश्यक होते. परंतु तशी तपासणी झाली नाही, त्यामुळे मान्य विद्यार्थी संख्येची खात्री न केल्यामुळे रु.२,८३,५००/- एवढे अनुदान जास्तीचे प्रदान झाले व त्याची वसुली केली नाही असे प्रमुख आक्षेप आहेत. सदरहू आक्षेपावर जिल्हा परिषद नांदेड यांनी समितीच्या निदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन अहवाल पाठविला आहे. साईबाबा मागासवर्गीय मुलांच्या वस्तीगृहाची दिनांक २४ ऑगस्ट, २००४ ते दिनांक ९ जुलै, २००९ पर्यंत मान्य विद्यार्थी संख्या २४ होती. शासनाने दिनांक ९ जुलै, २००९ ते दिनांक ३१ मे, २०११ या कालावधीत वाढवून ती ९७ केली व ३१ मे, २०११ ते सध्यास्थितीत ती ४९ एवढी आहे. समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद, नांदेड यांना ५ कोटी ४० लक्षची आवश्यकता असताना माहे मार्च मधील पहिला हप्ता ४ कोटी ४४ लक्ष प्राप्त झाल्यामुळे तसेच प्रलंबित प्रकरणावर पूर्ण रु.४ कोटी ४४ लक्ष खर्च केल्यामुळे ६० % व ४० % दोन्हीही अनुदान माहे मार्च २०१२ मध्ये अदा केल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **तसेच शासनाने विद्यार्थी संख्या कमी केल्यामुळे जादा रक्कम रुपये २,८३,५००/- वसुल करण्याची आवश्यकता नाही असे समितीचे मत झाले आहे.**

**या प्रकरणात समाजकल्याण अधिका-याने विद्यार्थी संख्येची खात्री केली नाही व अनुदान देण्यापूर्वी वसतीगृह व्यवस्थापनाबरोबर करारनामा करताना समाजकल्याण अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नसल्याने या प्रकरणी समाजकल्याण अधिकारी यांची एक वेतन वाढ रोखून त्यांना २५,०००/- रुपये दंड आकारण्याच्या प्रस्तावावर तीन महिन्याच्या आत कारवाई करुन केलेल्या कारवाईची माहिती समितीस पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

**साईबाबा मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील परिपोषण अनुदान अदायकीच्या संचिकेतील अभिलेखे अद्ययावत नसणे, मानकानुसार भोजन व्यवस्था नसणे इत्यादी ९ उणीवाबाबत दिनांक १६ मार्च, १९९८ च्या शासन निर्णयानुसार संस्थेवर समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी नियमानुसार दंड रुपये १५,४३५/- वसुल करुन शासन खाती जमा केला असल्याचे निदर्शनास आले. याचाच अर्थ वसतीगृह प्रशासनाने शासन निर्णयात अंतर्भूत असलेल्या अटींचा भंग केलेला आहे. परंतू अशाप्रकारे चुका करणा-या वसतीगृहांना अल्प दंड आकारल्यास ते पुन्हा अशा चुका करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, याप्रकरणी ज्या अटींचे उल्लंघन केले जाते त्या अटींच्या उल्लंघनाबाबत आणखी कठोर शास्ती करण्याबाबत सन १९९८ मध्ये दंडाची जी १०००/- रुपये रक्कम निश्चित केली आहे. सदर रक्कम संस्थाचालकांस योग्य त्या सुविधा देण्यास भाग पाडण्यास अपुरी असल्याने विभागीय सचिवांनी सदर दंडाची रक्कम वाढविण्याची आवश्यकता आहे किंवा कसे हे तपासून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्याबात आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांस कळविल्यानुसार सदर अहवाल प्राप्त करुन घेऊन सहायक अनुदान देण्याबाबतच्या नियमांमधील नऊ उणीवांबद्दल प्रत्येक प्रकरणात १०००/- रुपये पर्यंत दंड आकारण्याची किंवा अनुदानातुन वजा करण्याच्या तरतुदीत योग्य ती वाढ करुन केलेल्या सुधारणेबाबत नव्याने शासन निर्णय निर्गमित करावा व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, नांदेड

### स्वंयसेवी संस्थाद्वारा चालविण्यात येणा-या अनुदानीत वस्तीगृहांच्या परिपोषण अनुदान प्रदानातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत

**(परिच्छेद ३.६७६) (सन २०११-२०१२)**

समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेडचे सन २०११-२०१२ चे लेखापरीक्षणात सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे विविध स्वयंसेवी संस्थाद्वारा चालविण्यात येणा-या अनुदानीत वस्तीगृहांच्या परिपोषण अनुदानापोटी एकुण रक्कम रुपये ४२,७३,३२३/- प्रदान केल्याचे दिसुन आले आहे यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक-बीसीएच-१०९७/प्र.क्र.१०७/ मावक-४, दिनांक १६ मार्च,१९९८ चे (आठ) अनुदानाचे निर्धारण अनुसार वस्तीगृहास देय दरडोई परिपोषण अनुदान ६० टक्के अग्रीम अनुदान माहे जुन मध्ये तर दुसरा हप्ता माहे जानेवारी मध्ये वितरीत करणे आवश्यक असताना उपरोक्त प्रकरणी सन २०११-२०१२ साठी ६० टक्के अनुदान माहे मार्चमध्ये वितरीत केल्याचे दिसुन आले.

२. समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-१०९७/प्र.क्र.१०७/ मावक-४, दिनांक १६ मार्च, १९९८ अन्वये चालु वर्षासाठी दिलेल्या ६० टक्के अग्रीम अनुदानाचा विनियोग वस्तीगृह तपासण्यासाठी व उपस्थित विद्यार्थी संख्या तपासणीकरीता प्राधिकृत केलेले अधिकार भेटी देतील. तथापि माहे मार्च, १२ मध्ये ६० टक्के अग्रीम अनुदान दिलेले आहे व सदर संचिकेत सन २०११-२०१२ मध्ये केवळ एक अथवा दोनच भेटी देवून तपासणी केल्याचे दिसून आले. अर्धसमासपत्र क्रमांक ०५ दिनांक २३/१०/२०१२, क्रमांक ११ दिनांक ०६/११/२०१२ व क्र.१२ दिनांक १२/११/१२ अन्वये मागणी करूनही इतर तपासणी अहवाल अथवा संबंधीतांच्या दौरा दैनंदिन्या लेखापरीक्षणास सादर केल्या नाहीत उक्त नियमाचे पालन न करता केलेले ४० टक्के प्रदान अनियमित आहे. सन २०११-२०१२ मध्ये किमान तीन तपासण्या आवश्यक आहेत. अशी कार्यवाही झालेली नाही.

३. उक्त शासन निर्णयाचे नियम आठ अनुदानाचे निर्धारण (अ) मधील तरतुदीनुसार समाजकल्याण अधिकारी यांनी वस्तीगृह व्यवस्थापनाबरोबर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु सदर संचिकेतील करारनाम्यावर समाजकल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी नाही, त्यामुळे करारनाम्याची विधीग्राह्यतेबाबत खात्री करता आली नाही.

४. उक्त शासन निर्णयाचे चार नियम ७ (पाच) प्रमाणे मांग, भंगी, कातकरी व गौंड या जमातीच्या स्थानिक विद्यार्थी आणि अनाथ, अपंग असे स्थानिक विद्यार्थी वगळता इतर जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी अनुदान देय नसताना काही इतर जाती/ जमातीच्या स्थानिक विद्यार्थ्यांना अनुदान प्रदान केल्यामुळे रक्कम रुपये ८८,२००/- चे जादा प्रदान झाले ते वसुल केले नाही.

५. उक्त दिनांक १६/०३/१९९८ चे शासन निर्णयातील (आठ) फ नुसार ९ प्रकारच्या उणीवांबद्दल प्रत्येकी रुपये १,०००/ - प्रमाणे दंड आकारणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर वस्तीगृहांना रुपये १२,०००/- दंड आकारणे आवश्यक आहे तो वसुल केलेला नाही.

६. उक्त शासन निर्णयाचे आठ अनुदानाचे निर्धारण (अ) नुसार स्वयंसेवी संस्थेने सनदी लेखापालांचा लेखापरीक्षण अहवाल प्रत्येक वर्षी माहे ऑक्टोबर अखेरपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, अनुदानाच्या पाच टक्के आकारणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर वस्तीगृहांना एकुण रक्कम रुपये १,९३,०९५/- दंड आकारणे आवश्यक आहे तो वसुल केलेला नाही.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ७७ (२) अन्वये प्रदानाची पोचपावती दर्शवली नाही.

**उपरोक्त आक्षेपांसदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. समाज कल्याण सांस्कृतीक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच १०१७/ प्र.क्र १०७/ मावक -४/ दि. १६ मार्च १९९८ चे (आठ) अनुदानाचे निर्धारण अ नुसार वसतीगृहास देय दरडोई परिपोषण अनुदान ६०% अखेर अनुदान माहे जुन मध्ये

तर दूसरा हप्ता माहे जानेवारी मध्ये वितरीत करणे आवश्यक आहे, ही वस्तुस्थिती आहे. कृपया सन २०११-१२ या वर्षात तरतुद माहे जुन २०११ मध्ये आदेश क्र १७४९ दि १४.०६.२०११ अन्वये ४६४६४०००/- एवढी तरतुद प्राप्त झाली होती. प्रलंबीत प्रकरणावर प्राप्त तरतुदीतुन खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.क्र | वर्ष | विवरण | वसतीगृह संख्या | रुपये लाखात |
|---|---|---|---|---|
| १. | २०१०-११ | ४०% अनुदान | १०५ | १४५.८१ |
| २. | २०१०-११ | मानधन | १७५ | १२८.३३ |
| ३ | २०१०-११ | इ.भाडे | १०२ | १९०.५० |
| एकुण | | | | ४६४.६४ |

वरील प्रमाणे प्राप्त झालेली तरतुद प्रलंबित प्रकरणावर पुर्णतः रु. ४६४.६४ लाख एवढी खर्च झालेली आहे. त्यामुळे माहे जुन २०११ मध्ये ६०% तरतुद अदा करता आली नाही. प्रादेशीक उपायुक्त यांचे आदेश क्रमांक ४५३, दि.०८.०२.१२ अन्वये रु. ५४०.७०/-लाख माहे मार्च, १२ मध्ये तरतुद प्राप्त झाल्यामुळे ६०% व ४०% अदा केले आहे.

२. समाज कल्याण सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, क्र बीसी.एच१०९७/ प्र.क्र. १०७/ मावक-४/दि. १६ मार्च १९९८ अन्वये वसतिगृह तपासणी व उपस्थिती संख्या तपासणीसाठी ६० % अनुदान वितरणासाठी १ भेटी व ४० % अनुदान वितरण करण्यासाठी किमान ३ तपासणी भेट आवश्यक आहेत. ही वस्तुस्थिती आहे. तत्कालीन समाज कल्याण अधिकारी व विस्तार अधिकारी यांना या बाबतचा खुलासा पत्र क्र १९१३/१९१४ दि.२१.०८.२०१५ नुसार मागविण्यात आला आहे. सद्यःस्थितीत तपासणी भेटी देणेबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

३. उक्त शासन नियामाचे नियम ८ अनुदानाचे निर्धारण (अ) मधील तरतुदीनुसार समाज कल्याण अधिकारी यांनी वसतीगृह व्यवस्थापना बरोबर करारनामा करणे आवश्यक आहे. पंरतू सदर संचिकेतील करारनाम्यावर समाज कल्याण अधिकारी यांचे स्वाक्षरी नाही ही वस्तुस्थिती आहे. या बाबत तत्कालीन जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र क्र. १९१४ दि.१९.०८.२०१५ अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे. या पुढे करारनाम्यावर स्वाक्षरी घेण्यात येवुन देयके अदा करण्याची दक्षता घेण्यात येत आहेत.

४. उक्त शासन निर्णयाचे चार नियम ७ (५) प्रमाणे मांग, भंगी कातकरी व गौंड या जमातीच्या स्थानिक विद्यार्थी आणि अनाथ, अपंग असे स्थानिक विद्यार्थी वगळता इतर जाती /जमातीच्या विद्यार्थ्यासाठी अनुदान देय असतांना काही इतर जाती/ जमातीच स्थानिक विद्यार्थ्यांना अनुदान प्रदान केल्यामुळे रक्कम रु. ८८२००/- चे जादा प्रदान झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. संबंधित संस्थेला दंडाची व जादा प्रदानाची या अक्षेपाच्या अनुषंगाने या कार्यालयाची पत्र क्र १८३९ दि.१४.०८.२०१५ अन्वये नोटीस देवुन खुलासा मागविण्यात आला आहे. व ८८२००/- रु जादा प्रदान रक्कम शासनखाती भरण्या बाबत कळविले आहे.

५. उक्त दि. १६.०३.१९९८ चे शासन निर्णयातील (आठ) फ नुसार ९ प्रकारच्या उणीवा बदल प्रत्येकी रु. १०००/- प्रमाणे दंड आकारणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर वसतीगृहाना रु. १२०००/- दंड आकारणे आवश्यक आहे. कृपया उणिवा बाबत दंडाची रक्कम भरणे बाबत संबंधित संस्थेला पत्र दि.१८३९ दि.१४.०८.२०१५ अन्वये आदेश देण्यात आले आहेत.

६. उक्त शासन निर्णयाचे आठ अनुदानाचे निर्धारण (अ) नुसार स्वंयसेवी संस्थेने सनदी लेखापालांचा लेखापरिक्षण अहवाल प्रत्येक वर्षी ऑक्टोंबर अखेरपर्यत सादर करणे आवश्यक आहे.

उणिवाबाबत दंडाची रक्कम भरणेबाबत संबंधित संस्थेला पत्र क्र. १८३९ दि.१४.०८.२०१५ अन्वये नोटीस देण्यात आलेल्या आहेत. सदर आक्षेपात दोन वसतीगृहाकडून १) ७५९०/- २) ७५६०/- एवढी वसुली करुन शासन खाती जमा करण्यात आली. सोबत चालानाची छायांकित प्रत जोडली आहे.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती चे अधिनियम १९६८ नुसार पोच पावत्या दर्शविणे आवश्यक आहे लेखा परिक्षणाच्या वेळी त्या दर्शविल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तत्कालीन जि.स.क.अ. यांना १९१४ दि.२१.०८.२०१५ अन्वये नोटीस दिली आहे. यापुढे वसतीगृहाकडून पोच पावत्या घेण्यात येतील.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखा परीक्षणाने मागणी करूनही तपासणी अहवाल व दौरे दैनंदिनी लेखा परीक्षणास का उपलब्ध करून दिल्या नाहीत यास जबाबदार कोण, व्यवस्थापनाशी केलेल्या करारनाम्यावर समाजकल्याण अधिका-यांनी स्वाक्षरी का केली नाही, अनुज्ञेय नसणा-या विद्यार्थ्यांना अनुदान रु. ८८२०० जादा प्रदान झाले यास जबाबदार कोण आहे  वसतिगृह तपासणीत आढळलेल्या उणिवांबाबत कोणती दंडात्मक कारवाई केली यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यापुर्वीच्या प्रकरणाप्रमाणेच प्रस्तुत प्रकरणात त्रुटींची पुनरावृत्ती झालेली आहे ही बाब मान्य करुन एकूण २०५ संस्था असुन १० ते १५ ठिकाणी करारनाम्यावर स्वाक्षरी केली नसल्याचे आढळून आले आहे. या सर्व २०५ संस्थांची तपासणी करुन समितीस अहवाल सादर करण्याचे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अनुज्ञेय नसणा-या विद्यार्थ्यांना ८८२०० रुपये जादा प्रदान केले त्याची जबाबदारी कोणावर निश्चित केली यावर समाजकल्याण अधिका-यांनी  ती रक्कम माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वसूल केली असल्याचे सांगितले सन २०११-१२ च्या प्रकरणात २०१३ मध्ये वसुली झाली असती तर योग्य झाले असते. लेखा आक्षेपामध्ये जिल्हा परिषदेने वसुलीची माहिती दिलेली नाही. समिती नांदेड येथे येणार आहे म्हणून माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वसुली केली आहे. याबाबत देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहवाल सादर करुन संबंधित अधिका-यांनी किती कालावधीपासून वसुली केली नाही, किती व्याजाचे नुकसान झाले, याला जबाबदार कोण आहे, ज्यांच्यावर वसुलीची जबाबदारी होती त्यांच्याकडून तीन वर्षाच्या व्याजासहित वसुली करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अनुज्ञेय नसणा-या विद्यार्थ्यांना अनुदान रुपये ८८,२००/- जादा प्रदान झाले प्रकरणी संबंधित अधिका-यांची चौकशी करुन कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्याचे निदेश मा.समिती प्रमुखांनी दिले होते. त्यानुसार कारवाई केली असल्याचे समितीस पाठविलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या कार्यवाहीशी शासन सहमत आहे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

अनुज्ञेय नसणा-या विद्यार्थ्यांना अनुदान रुपये ८८,२००/- संबंधित वसतीगृहाकडून वसूल करुन शासन खाती जमा केले आहे. तसेच सदर प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्रमांक ३००३, ३००२, ३००४, दिनांक १९.१२.२०१५ अन्वये संबंधीत कर्मचा-यांवर एक वेतनवाढ बंद व रु.२५०००/- दंडाची कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग-** जिल्हा परिषद नांदेडच्या अभिप्रायाशी सहमत.

### चौकशी अहवाल

शासन निर्णय १६ मार्च, १९९८ चे आठ नुसार वसतीगृहाचा परिपोषण अनुदान ६० % जून मध्ये दुसरा हप्ता ४०% माहे जानेवारी मध्ये वितरीत करणे आवश्यक आहे. सन २०११-१२ या वर्षात प्राप्त झालेली तरतूर ४६४.६४ लाख तरतूद माहे जुन/ जुलै, २०११ मध्ये सन २०१०-११ प्रलंबित प्रकरणावर तरतूद खर्च झालेली आहे त्यामुळे माहे जून २०११ मध्ये वसतीगृहाला अनुदान अदा केले नाही ही वस्तुस्थिती आहे. तत्कालीन समाज कल्याण अधिकारी श्री. संजय कदम व विस्तार अधिकारी श्री. डी. आय. गायकवाड तसेच के.आर.रेणेवाड (विस्तार अधिकारी) श्री. डी.के.हटकर, कनिष्ठ सहाय्यक सदरील कर्मचारी जबाबदार असून या बाबत या कार्यालयाचे आदेश क्र. ३००३, ३००४, ३००२ दि. १९/१२/२०१५ अन्वये त्यांची एक वार्षिक वेतनवाढ थांबविली असून २५,०००/- रुपये दंड लावण्यात आला आहे.

वसतीगृहातील व्यवस्थापनाशी केलेल्या करारनाम्यावर समाज कल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याने या कार्यालयाचे पत्र क्र. ३००५ दि. १९/१२/२०१५ अन्वये तत्कालीन समाज कल्याण अधिकारी श्री. संजय कदम यांची एक वेतन वाढ थांबविणे व २५,०००/- दंडाची कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबत मा. आयुक्त समाजकल्याण पुणे महोदयाकडे सादर केला आहे. अनुज्ञेय नसणा-या विद्यार्थ्यांना अनुदान ८८,२००/- जादा प्रदान झालेले आहे या बाबत संबंधित वसतीगृहाकडून ८८२००/- रुपये वसूल केले आहेत तसेच ८८२००/- एवढया रक्कमेवरील व्याज तत्कालीन कर्मचा-यांच्या वेतनातुन रुपये ३१६६२/- वसूल करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश क्र. ३०११ दि. ३१/१२/२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

लेखा परिक्षण अहवालातील २३ वसतीगृहांना अनियमिततेबाबत दंड रु. २९३२९५/- एवढी रक्कम संबंधित वसतीगृहाकडून वसूल करुन चलनाव्दारे कोषागरात भरणा करण्यात आली आहे. दिनांक १/१२/२०१५ ते ३/१२/२०१५ या कालावधीत २३ वसतीगृहांची तपासणी केली असून वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सोयीसुविधा खालीलप्रमाणे दिल्याचे दिसून आले. प्रवेशित विद्यार्थ्यांना ताट, गादी, उशी, बेडशीट, चादर, बॅल्केट, कपाट, बूट इत्यादी शासनाकडून मिळालेल्या सोयी सुविधा पुरविण्यात आल्याचे दिसून आले. वसतीगृहामध्ये स्वच्छता दिसून आली. मानकामध्ये विद्यार्थ्यांना जेवण दिल्याचे दिसून आले असून सर्व वसतीगृहामध्ये बायोमॅट्रीक मशिन कार्यान्वित दिसून आली असुन वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती समाधानकारक दिसून आली असून प्रत्येक वसतीगृहामध्ये एक महिना पुरेल एवढा धान्यसाठा दिसून आला. सनदी लेखापालाचा अहवाल मुदतीच्या आत सादर करणे बाबत सूचित करण्यात आले असून मुदतीच्या आत प्राप्त झाले आहेत.

सदरील वसतीगृह तपासणी अंती सुव्यवस्थित दिसून आले.

**अभिप्राय व शिफारशी**

नांदेड जिल्हा परिषदेच्या सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालात स्वयंसेवी संस्थाद्वारा चालविण्यात येणा-या अनुदानातील वसतीगृहांच्या परिपोषण अनुदान प्रदानातील अनियमिततेबाबत आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. दिनांक १६ मार्च, १९९८ (परिशिष्ट ५.१) रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन ६० टक्के अग्रिम माहे जून मध्ये तर दुसरा हप्ता माहे जानेवारी मध्ये अदा करण्यात आलेला नाही, वसतीगृह व्यवस्थापनासोबत करावयाच्या करारनाम्यावर समाजकल्याण अधिका-यांनी स्वाक्षरी केलेली नाही. मागासवर्गीय विद्यार्थी यांच्या व्यतिरिक्त इतर जातीच्या विद्यार्थ्यांसाठी रुपये ८८,२००/- च्या केलेल्या प्रदानाची व्याजासह वसुली केलेली नाही. वसतीगृहांच्या उणीवांपोटी दंड वसुली केलेली नाही. स्वयंसेवी संस्थाचा सनदी लेखापालांचा लेखापरिक्षण अहवाल सादर न केल्या प्रकरणी दंड आकारलेला नाही व लेखापरिक्षणाचे वेळी कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत. इत्यादीबाबीं संदर्भात समितीने योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी केली असून समितीला सादर केलेल्या चौकशी अहवालात संबंधितांवर कारवाई केली असल्याचे नमूद केले आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने दिनांक १६ मार्च, १९९८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांचे संचलन करणा-या स्वयंसेवी संस्था आणि जिल्हा परिषदांच्या समाजकल्याण विभागाच्या अधिका-यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती व तिचे नियम विषद केले आहेत. राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाच्या सोयी आणि शैक्षणिक सवलती यांचा फायदा घेण्याबाबत प्रोत्साहन देण्याच्या उदात्त उद्दिष्ठांच्या पूर्ततेकरीता शासन कोट्यवधी रुपयांचा निधी दरवर्षी खर्च करीत असते. प्रस्तुत प्रकरणातील जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत २०५ पेक्षा अधिक संस्था वसतीगृहे चालवितात या संस्थांनी उक्त शासन निर्णयातील अटी शर्तींचे पालन केलेले नसल्यामुळे, लेखापरिक्षकांनी आक्षेप नोंदविले आहेत. समितीसमोर सदरहू आक्षेपांवर जिल्हा परिषद, नांदेड यांनी कार्यवाहीदेखील केलेली आहे. सदरची बाब लेखा परीक्षणात उघड झाली नसती तर या संस्थांनी अशाप्रकारे शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय केला असता या बाबींस सामाजिक न्याय विभागाच्या अधिका-यांची देखील कर्तव्यदक्षता, सचोटी देखील तितकीच महत्वाची आहे. अधिका-यांचा निष्काळजीपणा अथवा संस्था चालकांबरोबर सख्य या बाबी देखील या वसतीगृहांची तपासणी करुन कारवाई होत नाही ही वस्तुस्थिती आहे. अनेक प्रकारच्या गंभीर बाबी वसतीगृहात व वसतीगृहाच्या आवारात तसेच पोषण अनुदान भत्यात आढळून येतात, स्वच्छता, आहार, पाणी पुरवठा इ. समस्या आहेतच या सर्व बाबींचा सामाजिक न्याय विभागाने विचार विनिमय करुन त्या अनुषंगाने संस्था चालक कंत्राटदार व अधिका-यांवर वचक निर्माण व्हावा अशा प्रकारच्या कडक अटी व शर्ती लादून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात सर्व संबंधितांना बाध्य करावे जेणेकरुन शासन ज्या योजनेसाठी खर्च करीत आहे त्या योजनेची फलनिष्पत्ती समाजातील दुर्बल घटकाच्या कल्याणासाठी व त्यांची समाजातील स्थिती सुधारणे सुकर होईल. शासन स्वयंसेवी संस्थांना मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय जातीच्या विद्यार्थ्यांच्या शारिरीक व शैक्षणिक उन्नतीसाठी वसतीगृहांना परिपोषण अनुदान मंजूर करते. **सुदृढ व बुध्दीमान विद्यार्थी ही देशाची सर्वात मोठी संपत्ती आहे. तथापि, सदर अनुदानाचे प्रदान वेळेवर न झाल्यामुळे त्या वसतीगृहातील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थी परिपोषण तसेच वसतीगृहातील आवश्यक सोई-सुविधा व शैक्षणिक सवलतीपासून वंचित राहिल्याची बाब प्रकर्षाने जाणवत आहे आणि असे विद्यार्थी या सुविधेपासुन वंचित राहील्यास त्यांची सर्वांगिण प्रगती खुंटल्यावाचून रहाणार नाही हे या निमित्ताने गांभिर्याने नमूद करावेसे वाटत आहे. याप्रकरणी हयगय वा जाणीवपूर्वक पर्यवेक्षकीय जबाबदारी पार पाडणा-या जिल्हापरिषदेतील अधिकारी/कर्मचारी यांनी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी विभागाने गांभीर्याने दखल घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. तसेच दिनांक १६ मार्च, १९९८ रोजी शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन त्यात आणखी कडक स्वरुपाच्या अटी व शर्तींचा समावेश करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण अकरा

# जिल्हा परिषद, नांदेड

## मानव विकास योजनेअंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामावरील खर्चाबाबत

**(परिच्छेद ३.७४९) (सन २०११-२०१२)**

पंचायत समिती भोकरने सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षामध्ये मानव विकास मिशन योजनेअंतर्गत अंगणवाडी बांधकामावर खर्च नोंदविला आहे. त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ZPA/प्रक्र ४४४/वित्त-९ दिनांक १५ जुलै २००८ अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतू अशी कार्यवाही केल्याबाबतचा ठराव दिसून येत नाही.

२. महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्र.PRC/ZPA/१०९०/प्रक्र १११९/३३ दिनांक २५ ऑक्टोबर, १९९० अन्वये ग्रामपंचायतींना निविदा न मागविता कामे देतांना ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती सक्षमतेबाबत प्रमाणपत्र, काम करण्यास तयार असल्याबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचा काम करण्याबाबतचा मागणी अर्ज इ. कागदपत्राची पूर्तता करुनच कामाचे वाटप करणे आवश्यक आहे. परंतू परिशिष्टातील क्रमांक १ ते १२ या कामाच्या संचिकेत ग्रामपंचायतींचा मागणी अर्ज, ग्रामपंचायतीला काम देण्याबाबतचा पत्रव्यवहार, ग्रामपंचायतीचा ठराव व इतर कागदपत्रे दिसून आली नाहीत. तेव्हा गटविकास अधिकारी यांनी सदरील कागदपत्रांची पूर्तता केली नसतांनाही कोणत्या आधारे काम मंजूर केले याची खात्री पटत नाही.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १०७ अन्वये प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेच्या ठरावाची एक प्रत अंदाजपत्रकावर नेहमी उद्‌भूत करण्यात येईल. परंतू अंदाजपत्रके तपासण्यात आली असता अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. तसेच सर्व अंगणवाड्यांनी एकच अंदाजपत्रक तयार केलेचे दिसून येते.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४६ अन्वये निविदा मंजुरीनंतर कंत्राटदारासोबत करारनामा करुन नंतर कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. परंतु संचिका तपासल्या असता काही करारनामे कोरेच आहेत.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४७ अन्वये मंजूर करण्यात आलेला प्रत्येक करारनामा नमुना नंबर ४८ मधील करारनामा नोंदवहीत नोंदविण्यात येईल आणि त्या प्रत्येक नोंदीवर लेखापाल/उपलेखापाल आद्याक्षरी करील. परंतू अशी कार्यवाही झालेचे दिसून येत नाही. तरी नमुना नंबर ४८ ठेवून तो अद्यावत करणे आवश्यक आहे.

५. ग्रामपंचायतीसोबत कामाबाबत करारनामा केलेनंतर गटविकास अधिकारी यांनी कामाचे कार्यादेश देणे आवश्यक आहे. परंतू अ.क्र.१ ते २२ कामाच्या संचिका तपासल्या असता कोणत्याच संचिकेत कामाचे आदेश दिसून आले नाहीत. तेव्हा काम कोणाच्या आदेशाने सुरू केले.

६. परिशिष्टातील अनुक्रमांक १, २ व ११ कामाच्या देयकातून खालीलप्रमाणे कपाती करणे आवश्यक होते. परंतू मूल्यवर्धीत कर रुपये ३६,०००/- विमा रुपये ९,०००/- कामगार उपकर रुपये ९,०००/- व स्वामीत्व धन रुपये १२,४६३/- अशी एकूण रक्कम रुपये ६६,४६३/- कपाती केल्या नाहीत.

७. परिशिष्टातील अनुक्रमांक ९ अंगणवाडी बांधकाम थेरबन व अ.क्र.१० अंगणवाडी बांधकाम आमठाणाच्या बांधकामाच्या संचिका व मोजमाप पुस्तिकाची तपासणी केली असता सदरील देयकातून स्वामीत्व धनाची रक्कम कमी कपात केली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणेः

अ) ग्रामपंचायत थेरबनच्या देयकातून रुपये १,६३८/- कमी कपात.

ब) ग्रामपंचायत आमठाणाच्या देयकातून रुपये २,२९५/- कमी कपात.

अशी एकूण रुपये ३,९३३/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

८.भारत सरकारचा आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९४ (क) मधील तरतुदीनुसार संबंधीत ग्रामपंचायत यांच्या देयकातून २.२६% आयकर कपात करणे आवश्यक होते. परंतु आयकर कपात केलेला दिसून येत नाही. तरी खालील दर्शविल्याप्रमाणे संबंधीत ग्रामपंचायतीकडून आयकराची रक्कम रुपये ८०,१८८/- वसूल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

९.अनुक्रमांक १ ते १२ कामाची संचिक, मोजमाप पुस्तिका तपासल्या असता अंदाजपत्रकातील बाब क्रमांक १२ प्रोव्हायडींग अँड फिक्सींग स्टील विंडोज या बाबीचा दर रुपये २,१८२/- असतांना रुपये २,४८२/- ने प्रदान केलेले आहे. तरी मुळ परिच्छेदातील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे रुपये १९,३८३/- चे जादा प्रदान झालेले आहे. ते वसूल होणे आवश्यक आहे.

१०. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १८० प्रमाणे मोजमाप पुस्तिकेतील मोजमापांचे प्रदान झालेनंतर त्यावर लाल शाईने कर्णरेषा काढून न चुकता खोडून टाकण्यात आले पाहिजे. तथापि, अशा प्रकारची कार्यवाही झाल्याची दिसून आले नाही.

११. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १९७ अन्वये पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही न.नं. ६९ मध्ये ठेवून त्यात कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी नोंदवही ठेवलेली नाही. न.नं.६९ नोंदवही ठेवून ती अद्यावत करणे आवश्यक आहे व जादा प्रदानाची व कपातीची रक्कम रुपये १,६९,९६७/- वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१.महाराष्ट्र शासन,ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय, क्रमांक ZPA/ प्रक्र ४४४/ वित्त-९ दिनांक १४ जुलै २००८ अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेची माहिती ही सभागृहात वाचुन दाखवण्यात येते व त्या बाबत सभागृहात सविस्तर माहिती देखील देण्यात येत असते परंतु सदरील कामाची माहिती पुढील पंचायत समितीच्या सभेत अवलोकनार्थ सादर करण्यांत आली नाही ही वस्तुस्थिती आहे, यापुढे अशी सर्व माहिती पंचायत समिती सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यांची दक्षता घेण्यात येत आहे.

२.महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक पिआरसी/झेडपीए/ १०१०/प्रक्र१११९/३३ दि.२५ऑक्टो १९९० अन्वये ग्रामपंचायतींना निविदा न मागवता कामे देतांना ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती सक्षमतेबाबत प्रमाणपत्र काम करण्यास तयार असल्याबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचा काम करण्याबाबतचा मागणी अर्ज इत्यादी कागदपत्रांची पूर्तता करुनच कामाचे वाटप करणे आवश्यक आहे ग्रामपंचायतीचा मागणी अर्ज ग्रामपंचायतीला काम देण्याबाबतचा पत्रव्यवहार ग्रामपंचायतचा ठराव इतर कागदपत्र दिसून आले नाहीत परंतू सदर कागदपत्र इतरत्र सुटे असल्यामुळे उपलब्ध करुन देता आली नाही ही वस्तुस्थिती आहे तथापि सदर प्रमाणपत्र इतर कागदपत्रे नस्तीस अवलोकनार्थ उपलब्ध आहेत तरी या बाबत संबंधित कर्मचारी यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक-२४.०८.२०१५अन्वये कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे व यापुढे अशी अनियमितता होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

३.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ ची नियम १०७ अन्वये प्रत्येक कामास प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर प्रशासकिय मान्यतेच्या आदेशाची प्रत प्रत्येक अंदाजपत्रकावर उद्भूत करण्यात आली आहे मंजूर असलेले सर्व अंगणवाडी इमारतीचे शासनाने ठरवून दिलेले एकच नमुना अंदाजपत्रक आहे ही वस्तुस्थिती असून मंजूर असलेल्या सर्व कामास प्रशासकिय मान्यता रक्कम एक सारखीच असल्यामुळे वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाहीत.

४.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४६ अन्वये निविदा मंजुरी नंतर कंत्राटदारासोबत करारनामा करुन कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. व कांही कोरे असलेले करारनामे करारनामा लिहुन पूर्ण करण्यात आलेले असून ते अवलोकनार्थ उपलब्ध आहेत. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४७ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या प्रत्येक करारनामा नमुना नंबर ४८ मध्ये ठेवण्यात आला असून तो अद्ययावत करण्यात आला असून अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

५.ग्रामपंचायत सोबत कामाबाबत करारनामा केले नंतर गटविकास अधिकारी यांनी कामाचे कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. परंतु, सदरचे कार्यारंभ आदेश लेखा परिक्षणाचेवेळी दाखविता आले नाहीत ही वस्तुस्थिती असुन त्यावेळी सदरचे

कार्यारंभ आदेश सुटे असल्याने ते इतरत्र होते सद्यस्थितीत आता सर्व संचिकेस कार्यारंभ आदेश जोडण्यांत आले असुन अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

६. मा.प्रधान लेखाकार (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांचा दिनांक- ३१.०३.२००८ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल परिच्छेद क्रं. ३.९.६.१ मध्ये वैयक्तीक वजावटी ग्राम पंचायतींनी केलेल्या कामाच्या बिलामधून पंचायत समितीनी, प्राप्तीकर, विक्रीकर, मुल्यवर्धीत कर, विमा आकार, प्रतिभुती ठेव इ. वजावटी वसुल करण्याच्या आवश्यकता नाही असे नमुद आहे. तसेच स्वामित्व धनाची रक्कम रू.१२,४६३/- वसुल करण्यांत येवून शासनखाती जमा करण्यात आली आहे सर्व चालानाच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

७. अ) परिशिष्टातील अनु क्र. ९ अंगणवाडी बांधकाम थेरबन येथील स्वामित्व धन रक्कमेची परिगणना केली असता त्याची रक्कम रूपये- ४,४०७/- एवढी होत नसुन रुपये २,७६९/- एवढीच होत आहे. त्यानुसार रक्कम रूपये- २,७६९/- एवढी रक्कम देयकातून कपात करण्यात आली असुन स्वामित्व धन परिगणना छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

ब) परिशिष्टातील अनु क्र. १० अंगणवाडी बांधकाम आमठाणा येथील स्वामित्व धनाची रक्कम रूपये- ४,७५९/- कपात करणे आवश्यक असतांना रूपये- ३,९३३/- एवढी रक्कम देयकातून कपात करण्यांत आली होती व उर्वरित रक्कम रूपये- २,२९५/- कमी कपात करण्यांत आली होती ही वस्तुस्थिती असुन आक्षेपात नमुद वसुलपात्र रक्कम रूपये- २,२९५/- वसुल करून शासन खाती जमा करण्यात आली असुन चालानाची प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

८. मा.प्रधान लेखाकार (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांचा दिनांक ३१.०३.२००८ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल परिच्छेद क्रं. ३.९.६.१ मध्ये वैयक्तीक वजावटी ग्राम पंचायतींनी केलेल्या कामाच्या बिलामधून पंचायत समितीनी प्राप्तीकर, विक्रीकर, मुल्यवर्धीत कर, विमा आकार, प्रतिभुती ठेव इ. वजावटी वसुल करण्याच्या आवश्यकता नाही असे नमुद आहे अहवालाची छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे

९. अनु. क्र. १ ते १२ कामाची संचिका, मोजमाप पुस्तीका तपासल्या असता अंदाजपत्रकातील बाब क्र. १२ प्रोव्हायडिंग ॲड फिक्सींग स्टील विंडोज या बाबीचा दर रुपये- २,१८२ /-नसुन तो रुपये- २,४८२/- नी प्रदान केलेला आहे.तरी परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे १९,३८३ /- ने जादा प्रदान झालेली रक्कम ही वस्तुस्थिती आहे. तथापि रु. १९,३८३/- रक्कम ग्राम पंचायत कार्यालय यांचेकडून वसुल करण्यात आली असून चालानाद्वारे शासन खाती जमा करण्यात आली आहे. चालानाची प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

१०. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १८० प्रमाणे मोजमाप पुस्तीकेतील मोजमापाचे प्रदान झाले नंतर त्यावर लाल शाईने कर्ण रेषा काढून न चुकता खोडून टाकण्यात आले पाहिजे तथापि अशा प्रकारची कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही ही वस्तुस्थीती आहे. याबाबत संबंधित कनिष्ठ अभियंता यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक २४.०८.२०१५ अन्वये नोटीस देण्यांत आली असुन सद्यस्थितीत मोजमाप पुस्तीकेतील मोजमापाचे प्रदान झाले नंतर त्यावर लाल शाईने कर्ण रेषा काढून न चूकता खोडून टाकण्यात आलेल्या असुन मोजमाप पुस्तीकेची छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

११. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १९७ अन्वये पूर्ण झालेल्या कामाची नोदवही नमुना नं ६९ मध्ये ठेवून त्यात कामाची नोंद घेणे आवश्यक असून ती लेखा परीक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आली नाही ही वस्तुस्थिती असून आता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १९७ अन्वये पूर्ण झालेल्या कामाची नोदवही नमुना नं ६९ मध्ये नोंद घेण्यात आली आहे तसेच स्वामित्व धनाची रक्कम रूपये-१४,७९८- व १९,३८३/- अशी एकुण वसुल करण्यांत येऊन शासन खाती जमा करण्यांत आली आहे. उर्वरित रक्कम १,५३,५७१/- ही आयकर,मुल्यवर्धीत कर कामगार उपकर व विम्याची असुन मा.प्रधान लेखाकार (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांचा दिनांक- ३१.०३.२००८ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल परिच्छेद क्रं. ३.९.६.१ मध्ये वैयक्तीक वजावटी ग्राम पंचायतींनी केलेल्या कामाच्या बिलामधून पचायत समितीने प्राप्तीकर, विक्रीकर, मुल्यवर्धीत कर, विमा आकार, प्रतिभुती ठेव इ. वजावटी वसुल करण्याच्या आवश्यकता नाही असे नमुद आहे चालानाची व अहवालाची छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतींना कामे देण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेली नसतानाही कामांचे वाटप कसे केले, ग्रामपंचायतीला कामे दिल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी आवश्यक करारनामा करण्याची कार्यपध्दती का डावलण्यात आली, सर्व १२ कामांचे कार्यादेश देण्यापूर्वीच कामे नियमबाह्यपणे कशी सुरु केली, अंगणवाडी बांधकाम आमठाणाच्या देयकातून कमी स्वामित्वधन वसूलीस कोण जबाबदार आहे लेखा परीक्षणास कागदपत्रे दाखविण्यात आली नाहीत. उत्पन्नाचे प्रमाणपत्र ग्रामपंचायतीकडून मागितले होते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखापरीक्षणास त्यावेळी कागदपत्रे दाखविणे आवश्यक होते. परंतु आता कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. या विषयाच्या संदर्भात सर्व वसूली करण्यात आली आहे अशी समितीस माहिती दिली.

पंचायत राज समिती नांदेड जिल्हा परिषदेला भेट देणार असल्यामुळेच जिल्हा परिषदेने ही वसुली केली आहे. शासनाचा पैसा ३ वर्षे दुस-याने वापरला आहे, त्यामुळे ३ वर्षाच्या व्याजासह ही रक्कम वसूल करण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणात कर्मचा-यांनी मोजमाप पुस्तिका तयार केली, दर निश्चित केले यासदंर्भात जबाबदारी निश्चित करुन संबंधितांच्या सेवा पुस्तिकेत याबाबतची नोंद घेण्यात यावी. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी असे निदेश समितीने दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड यांनी समितीला विदित केले की, यामध्ये जे जबाबदार आहेत त्यांच्या सेवा पुस्तिकेत यासंबंधात नोंद घेतली जाईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, लोखंडी खिडकीच्या बाबीचे प्रदान मंजूर अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने कोणत्या प्राधिकारान्वये केले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, या कामामध्ये चूक झाली आहे. व्याजासह सर्व पैसे वसूल केले जातील. या प्रकरणांमध्ये जबाबदारी निश्चित करुन व्याजासह रक्कम वसुल केली जाईल. आयकर, विक्रीकर, बांधकाम कामगार कल्याण कर या संदर्भात समितीने चर्चा केली. समितीच्या मते काही ठिकाणी हा कर वसूल केला आहे, काही ठिकाणी वसूल केलेला नाही. या विषयाबाबत शासनाकडून पुन्हा मार्गदर्शन मागविण्यात यावे, किती प्रकरणात वसुली केली किंवा शासनाकडे प्रस्ताव पाठविला, त्या प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे, ग्रामविकास विभागाने असा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर रितसर कार्यवाही करून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सहकार्य करावे, नांदेड जिल्हयाची साक्ष घेण्यापूर्वी या विषयाचे स्पष्टिकरण झाले पाहिजे आणि निर्णय होणे आवश्यक आहे. ग्रामविकास विभागाच्या प्रतिनिधींनी याची नोंद घ्यावी. साक्ष होण्यापूर्वी आपल्याकडील प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणी गुंतलेली रक्कम व्याजासह वसुल करण्यात यावी, संबंधितांच्या सेवा पुस्तिकेत याबाबतची नोंद घ्यावी, तसेच काही प्रकरणांत कर वसुल केला असुन काही प्रकरणांत केलेला नाही त्याबाबत जिल्हा परिषदेने ग्रामविकास विभागाकडून मार्गदर्शन घ्यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीकडे सादर करावा असे निदेशित केले आहे. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सदरहू प्रकरणी गुंतलेली रक्कम रुपये- ३५,७७९/- व व्याजाची रक्कम रुपये- १०,२५८/- असे एकुण रक्कम रुपये- ४६,०३७/- संबंधितांकडून वसुल करण्यात येवून शासन खाती चलनाद्वारे भरणा करण्यात आली आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र क्रमांक- ९९४ ते ९९७ दिनांक १९.१२.२०१५ अन्वये संबंधित कनिष्ठ अभियंता श्री पाटील व श्री कुलकर्णी यांची एक वेतनवाढ थांबविण्यात येवून त्यांना प्रत्येकी रुपये- २५,०००/- दंडाची शास्ती चौकशी अंती करण्यात आली आहे.

२) काही प्रकरणात कर वसुल केला असुन कांही प्रकरणात केलेला नाही त्याबाबत पंचायती राज समितीने सुचित केल्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक- ९७५ दिनांक १९.१२.२०१५ अन्वये ग्रामविकास विभागाकडे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद नांदेड यांचे अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येत आहे. तसेच आयकर आयुक्त (टीडीएस) व विक्रिकर आयुक्त (कायदा व नियम) यांच्या कडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. आयकर व व्हॅट कपातीबाबत शासनस्तरावर आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

## चौकशी अहवाल

मानव विकास योजनेअंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामावरील खर्चाबाबत पंचायत समिती भोकरच्या लेखा आक्षेपाबाबत पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए/प्र.क्र.४४४/ वित्त-९ दिनांक १४ जुलै, २००८ अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेची माहिती ही सभागृहात वाचून दाखविण्यात येते व त्याबाबत सभागृहात सविस्तर माहितीदेखील देण्यात येत असते परंतु सदरील कामाची माहिती पुढील पंचायत समितीच्या सभेत अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

२) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी/झेडपीए/१०१०/प्र.क्र./१११९/३३ दिनांक २५ ऑक्टोबर, १९९० अन्वये ग्रामपंचायतींना निविदा न मागविता कामे देताना ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती क्षमतेबाबत प्रमाणपत्र, काम करण्यास तयार असल्याबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव, उत्पन्नाचे प्रमाणपत्र ग्रामपंचायतीचा काम करण्याबाबतचा मागणी अर्ज इत्यादि कागदपत्राची पुर्तता करुनच कामाचे वाटप करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीचा मागणी अर्ज ग्रामपंचायतीला काम देण्याबाबतचा पत्रव्यवहार, ग्रामपंचायतचा ठराव इतर कागदपत्र संचिकेत उपलब्ध आहेत.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ ची नियम १०७ अन्वये प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेच्या आदेशाची प्रत प्रत्येक अंदाजपत्रकावर उद्‌भूत करण्यात आली असुन मंजूर असलेले सर्व अंगणवाडी इमारतीचे शासनाने ठरवून दिलेले एकच नमुना अंदाजपत्रक असल्यामुळे व सर्व कामास प्रशासकीय मान्यता रक्कम एक सारखीच असल्यामुळे वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाहीत.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४६ अन्वये निविदा मंजुरी नंतर कंत्राटदारासोबत करारनामा करुन कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत व करारनामे लिहुन पुर्ण करण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४७ अन्वये मंजुर करण्यात आलेल्या प्रत्येक करारनामा नंबर ४८ मध्ये ठेवण्यात आला असुन तो अद्ययावत करण्यात आला आहे.

५) ग्रामपंचायत सोबत कामाबाबत करारनामा केलेनंतर गट विकास अधिकारी यांनी कामाचे कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.

६) मा.प्रधान लेखाकार (लेखापरिक्षा) महाराष्ट्र भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा दिनांक ३१/३/२००८ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल परिच्छेद क्रमांक ३.९.६.१ मध्ये वैयक्तिक वजावटी ग्रामपंचायतीने केलेल्या कामांच्या बिलांमधुन पंचायत समितीने प्राप्तीकर विक्रीकर मुल्यवर्धित कर विमा आकार प्रतिभुती ठेव इत्यादि वजावटी वसूल करण्याच्या आवश्यकता नाही असे नमूद केल्यामुळे स्वामित्व धनाची रक्कम रुपये १२४६३/- वसूल करण्यात येऊन शासनखाती जमा करण्यात आली आहे.

अ) परिशिष्टातील अनुक्रमांक ९ अंगणवाडी बांधकाम थेरबन येथील स्वामित्व धन रक्कमेची परिगणना केली असता त्याची रक्कम रु.४४०७/- एवढी होत नसुन रुपये २७६९/- एवढीच होत आहे. त्यानुसार रु २७६९/- एवढी रक्कम देयकातुन कपात करण्यात येवून शासनखाती भरणा करण्यात आली आहे.

ब) परिशिष्टातील अनुक्रमांक १० अंगणवाडी बांधकाम आमठाणा येथील स्वामित्व धनाची रक्कम रुपये ४७५९/- कपात करणे आवश्यक असताना रुपये ३९३३/- एवढी रक्कम देयकातून कपात करण्यात आली होती व उर्वरित रक्कम रुपये २२९५/-वसूल करुन शासन खाती जमा करण्यात आली आहे.

७) अनु. क्र. १ ते १२ कामाची संचिका, मोजमाप पुस्तीका तपासल्या असता अंदाजपत्रकातील बाब क्र.१२ प्रोव्हायडिंग अँड फिक्सींग स्टील विंडोज या बाबींचा रुपये १९३८३/- ने जादा प्रदान झालेली रक्कम ग्राम पंचायत कार्यालय यांचकडून वसूल करण्यात आली असून चलनाव्दारे शासन खाती जमा करण्यात आली आहे.

८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंवायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १८० प्रमाणे मोजमाप पुस्तीकेतील मोजमापाचे प्रदान झाले नंतर त्यावर लाल शाईने कर्ण रेषा काढून न चुकता खोडून टाकण्यात आले आहे.

९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १९७ अन्वये पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना नं.६९ मध्ये ठेवून त्यात कामाची नोंद घेण्यात आली आहे तसेच स्वामित्व धनाची रक्कम रुपये १४,७९८/- व १९,३८३/- अशी एकूण वसूल करण्यात येऊन शासन खाती जमा करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम १,५३,५७१/-ही आयकर, मूल्यवर्धीत कर, कामगार उपकर व विम्याची असून मा. प्रधान लेखाकार (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा दिनांक ३१.०३.२००८ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल परिच्छेद क्र. ३.९.६.१ मध्ये वैयक्तीक वजावटी ग्राम पंचायतींनी केलेल्या कामाच्या बिलामधून पंचायत समितींनी प्राप्तीकर, विक्रीकर, मूल्यवर्धीत कर, विमा आकार, प्रतिभुती ठेव. इ. वजावटी वसूल करण्याच्या आवश्यकता नाही असे नमुद असल्याने ती कपात केली नसल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

सदर प्रकरणी उपलब्ध अभिलेख्यांचे अवलोकन केले असता सर्व अभिलेखे अद्ययावत आहेत. सद्यस्थितीत अनुसुचितील सर्व अंगणवाडी बांधकामे पूर्ण झाली असुन मा.पंचायत राज समितीने शिफारस केल्यानुसार संबंधितांकडून स्वामित्व धनाच्या रुपये १४७९८/- व बाब क्र. १२ प्रोव्हायडिंग ॲण्ड फिक्सींग स्टील विंडोज या बाबींचा रुपये १९३८३/- असे एकूण रुपये ३४१८१-च्या व्याजाची परिगणना केली असुन ती १०२५८/-असुन सदर रक्कम शासन खाती भरणा करणे योग्य वाटते, तसेच सदर कामात कोणतीही गंभीर अनियमितता झाल्याचे आढळून आले नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मानव विकास योजनेंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामावरील खर्चाच्या संदर्भातील प्रस्तुत प्रकरणात अधिकचा खर्च झालेला आहे. व्याजाची रक्कम वसुल केलेली आहे. तसेच या प्रकरणी कनिष्ठ अभियंता श्री. एस.एन. पाटील व श्री. टी.डी. कुलकर्णी यांची एक वेतनवाढ थांबविण्यात आलेली आहे. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ९९४ ते ९९७ दिनांक १९-१२-२०१५ अन्वये संबंधितांवर २५०००/- दंडाची शास्ती चौकशीअंती करण्यात आली आहे. यामध्ये दोन भाग आहेत. मार्गदर्शनचा एक भाग आहे आणि संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन व्याजासह रक्कम वसूल करणे हा दुसरा भाग आहे असा खुलासा सचिव, महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी समितीसमोर केला.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नांदेड जिल्हापरिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिका-याची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्यावेळी उपस्थित झालेल्या प्रकरणी गुंतविलेली रक्कम व्याजासह वसूल करण्यात यावी व संबंधितांवर कारवाई करुन त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात यावी. काही प्रकरणात विक्रीकर व आयकर वसूल करण्यात आला नाही. त्याबाबतचे मार्गदर्शन ग्रामविकास विभागाकडून घेऊन समितीकडे सादर करण्यात यावे. सर्व प्रकरणात समितीने विभागीय सचिवांची साक्ष देखील घेतली.

सदर साक्षींच्या वेळी जिल्हापरिषद नांदेड यांचे अभिप्रायासह ग्रामविकास विभागाने सहमती दर्शविली असून आयकर आयुक्त (TDS) व विक्रीकर आयुक्त (कायदा व नियम) यांच्याकडून मार्गदर्शन प्राप्त झाले असून आयकर व व्हॅट कपातीबाबत शासन स्तरावर आदेश निर्गमित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे असे नमूद केले. त्याचप्रमाणे या प्रकरणी चौकशी करुन समितीला अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले असता ग्रामविकास विभागाच्या दिनांक १४ जुलै, २००८ च्या शासन निर्णयाअन्वये पंचायत समितीच्या स्तरावर देण्यात आलेली प्रशासकीय व तांत्रिक माहिती सभागृहात वाचून दाखविण्यात येते व त्याबाबत सभागृहात सविस्तर माहिती सुध्दा देण्यात येते. परंतु सदरील कामाची माहिती पंचायत समितीच्या सभेपुढे सादर केल्याचे तसेच वाचून दाखविल्याचे दिसून येत नाही. असे चौकशी अहवालात नमूद केले आहे. त्याचप्रमाणे दिनांक २५ ऑक्टोंबर,

१९९० रोजीच्या शासन निर्णयाअन्वये ग्रामपंचायतीने निविदा न मागविता कामे देताना ग्रामपंचायतीची आर्थिकस्थिती, क्षमतेबाबत प्रमाणपत्र, कामे करण्यास तयार असल्याबाबतचा ठराव, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीची कामे करण्याबाबतचा मागणी अर्ज इत्यादि कागदपत्रे प्राप्त करुन कामाचे वाटप करणे आवश्यक होते. तथापि, ही कागदपत्रे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध नव्हती. समितीने भेट दिल्यानंतर ही कागदपत्रे उपलब्ध झाली असे चौकशी अहवाल नमूद केले आहे. सदर प्रकरणी रुपये १२,४६३- स्वामित्वधनाची वसूली देखील केली असल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे प्रोव्हॉयडींग ॲण्ड फिक्सिंग स्टील विंडो याबाबीवर रुपये १९,३८३/- दिलेल्या रकमेबाबत ग्रामपंचायत कार्यालयाने वसूली करुन शासन खाती जमा केल्याचे दिसून येते. एकूणच अनेक कामांमध्ये या प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे. समितीने जिल्हापरिषदेस भेट दिली नसती तर याबाबतचा उलघडा झाला नसता म्हणून जिल्हापरिषदेतील संबंधित अधिका-यांची अकार्यक्षमता समितीस आढळून आली. या प्रकरणी मानव विकास योजनेअंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामावरील खर्चाच्या संदर्भात अधिकचा खर्च झाला असून व्याजाच्या रकमेची वसूली केलेली आहे. तसेच संबंधित कनिष्ठ अभियंत्याची वेतनवाढ थांबविण्यात आल्याचे समितीला विभागीय सचिवांनी विदित केले आहे. त्याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

**अनुक्रमांक १, २ व ११ कामाच्या देयकातून नमुद कराची कपाती करणे आवश्यक होते. परंतू मूल्यवर्धीत कर रुपये ३६,०००/- विमा रुपये ९,०००/- कामगार उपकर रुपये ९,०००/- व स्वामीत्व धन रुपये १२,४६३/- अशी एकूण रक्कम रुपये ६६,४६३/- कपाती केल्या नसल्या प्रकरणी जिल्हापरिषदेने मा.प्रधान लेखाकार (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांचा दिनांक- ३१.०३.२००८ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल परिच्छेद क्रं. ३.९.६.१ मध्ये वैयक्तीक वजावटी ग्राम पंचायतींनी केलेल्या कामाच्या बिलामधून पंचायत समितीनी, प्राप्तीकर, विक्रीकर, मुल्यवर्धीत कर, विमा आकार, प्रतिभुती ठेव इ. वजावटी वसुल करण्याच्या आवश्यकता नाही असे नमुद आहे असा खुलासा केला. विभागीय सचिवांनी मात्र यासंदर्भात आयकर आयुक्त (TDS) व विक्रीकर आयुक्त (कायदा व नियम) यांच्याकडून मार्गदर्शन प्राप्त झाले असून आयकर व व्हॅट कपातीबाबत शासन स्तरावर आदेश निर्गमित करण्याबाबतची बाब शासनाचे विचाराधीन असल्याचे विदीत केले आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतींना कंत्राटाच्या देय असलेल्या त्यांच्या कामाच्या देयकावर, आयकर व व्हॅट कपातीबाबत शासन स्तरावर प्रलंबित असलेला निर्णय त्वरित घेऊन तो सर्व जिल्हापरिषदाना निर्गमित करावा व सदरची कार्यवाही तातडीने करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण बारा

# जिल्हा परिषद, नांदेड

## जिल्हा परिषदेमधील अपूर्ण स्थितीतील बांधकामांबाबत

**परिच्छेद ३.८११(१८) (सन २०११-१२)**

जिल्हा परिषदांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना, विहिरी (निष्फळ/सुरू झालेल्या परंतु अपूर्ण) खेडयातील, जिल्ह्यातील रस्ते दुरुस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती व बांधकामे. पशुवैद्यकीय दवाखाना, शाळागृहे, समाजमंदिरे दुरुस्ती व बांधकामे, कोल्हापूर टाईप बंधारे इत्यादी स्थानिक व सामुहिक विकासाच्या जिल्हा परिषद, शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या वर्षी मंजुरी दिली जाते. त्या वर्षात ती कामे पुर्ण होण्याची शासनाची अपेक्षा असते.

तथापि, त्यापैकी काही कामे विभिन्न कारणांमुळे त्या त्या वर्षात पूर्ण होत नाहीत. अशी अपुर्णावस्थेतील कामे वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे त्यात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकास योजनांचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची व त्यामुळे गुंतलेल्या निधीचे नुकसान होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समितीने योजनांतर्गत व योजनेत विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेले कामे अपूर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपुर्णावस्थेत पडुन असलेल्या बांधकामांचा तपशील पुढीलप्रमाणे केवळ उदाहरणादाखल दिला आहे.

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १८ | नांदेड | लघुपाटबंधारे | २३ | ८३,२३,०००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदरील १५ कामापैकी ८ कामे पुर्ण झालेली आहेत. क्षेत्रीय अडचणीमुळे काही कामे पुर्ण होऊ शकली नाहीत. उर्वरित कामापैकी ६ कामे १५ ते २० वर्षापासून अर्धवट स्थितीत असून आजच्या स्थितीत १०% पेक्षा कमी खर्च झालेला आहे. त्यामुळे ती कामे रद्द करणे बाबत प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

| पूर्ण झालेली कामे | प्रगती पथावरील कामे | रद्द करावयाची कामे |
|---|---|---|
| १) गे.बं कोथळा ता.हदगाव | १) पाझर तलाव थेरबन ता.भोकर. | १) को.प.बंधारा रुई ता.कंधार. |
| २) गे.बं हज्जापुर क्र १ ता.मुदखेड | | २) को.प.बंधारा घागरदरा ता.कंधार. |
| ३) गे.बं पळशी क्र १ ता.किनवट | | ३) को.प.बंधारा घोटका ता.लोहा |
| ४) गे.बं कनकी क्र १ ता.किनवट | | ४) को.प.बंधारा वायफना ता.हदगाव |
| ५) गे.बं सलाईगुडा ता.किनवट | | ५) को.प.बंधारा अलेगाव ता.नांदेड |
| ६) गे.बं चिखलीतांडा ता.किनवट | | ६) को.प.बंधारा वाघलवाडा ता.उमरी |
| ७) को.प.बंधारा सिंगोडा ता.किनवट | | |
| ८) गेटेड बंधारा इब्राहीमपुर क्र ४ ता.देगलूर | | |

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने बांधकाम (उत्तर) विभागाकडील एकूण ११० कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, ही कामे किती कालावधीपासून अपूर्ण आहेत, अपूर्ण कामे पूर्ण करून घेण्यासाठी विभागाने काय उपाययोजना केली, कामे पूर्ण झाली असतील तर हा आक्षेप का उपस्थित झाला, अशी समितीने विचारणा केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही जिल्हा परिषदेची सर्वसाधारण कामे होती. ११० कामे २०११-१२ मध्ये पूर्ण झाली आहेत. त्याबाबत खुलासा करताना ११० कामे पूर्ण झाली की नाही याचे रेकॉर्ड दाखविले गेले नसावे, त्यामुळे ही कामे झाली की नाहीत अशी शंका निर्माण झाली. ५.३३ कोटी रुपयांची कामे होती. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा खुलासा अधिक स्पष्ट करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांनी विविध विभागांची ११० कामे आहेत. या कामांची अंदाजित किंमत ६४२.०२ लाख रुपये होती. २०११-१२ मध्ये ५३३.१३ लाख रुपये इतका निधी प्राप्त झाला आणि तो खर्ची पडला. उर्वरित निधी १०८.८९ लाख रुपये त्याच वर्षी उपलब्ध झाला आणि तो निधी खर्ची पडला व कामे पूर्ण झाली, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर स्पष्ट केले.

लघुपाटबंधारे विभागाकडील एकूण १५ कामे दीर्घकाळ अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत, अपूर्ण कामांपैकी ६ कामे १५ ते २० वर्षापासून अर्धवट स्थितीत आहेत, त्यामुळे या योजनेमधून होणा-या लाभापासून लाभार्थी वंचित राहिले यास जबाबदार असणा-यांवर काय कारवाई केली, अपूर्ण/अर्धवट कामांमुळे निष्फळ ठरणा-या निधीस कोण जबाबदार आहे. या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५ कामांपैकी ६ कामे अपूर्ण होती. ज्या कामाची सुरूवात झाल्यानंतर १० टक्क्यापेक्षा कमी खर्च झाला आहे अशी कामे रद्द करण्याचे प्रस्ताव तयार करीत आहोत. रद्द करण्यात यावयाच्या कामाची यादी सोबत दिली आहे. ती कामे आता होऊ शकत नाहीत. सर्व कामे कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याची होती असा खुलासा केला.

कामे पूर्ण न झाल्याची कारणे काय आणि त्यावर किती खर्च झाला. ६ कामे १५ ते २० वर्षापासून अर्धवट आहेत. निधी प्राप्त झाला नाही की निधी प्राप्त होऊनही काम सुरू केले नाही, त्या कामाच्या ठिकाणी कार्यकारी अभियंत्यांनी भेट दिली का, को.प.बंधारा रूई हे काम १९८८-८९ मध्ये सुरू झाले. ७.८० लाख रुपये अंदाजपत्रकीय रक्कम असताना ४.४० लाख रुपये खर्च झाला आहे. काम पूर्ण करण्यासाठी महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांच्याकडून मार्गदर्शन मागविण्यात आले, असे नमूद केले आहे. काम सुरू झाल्यानंतर बंद कसे झाले, ५० टक्के निधी खर्च झाला आहे, कार्यकारी अभियंत्यांने ते काम पाहिले का, ४.४० लाख रुपये खर्च झाला आहे, या व अशा कामांमध्ये शासनाचे ८३ लाख रुपये गुंतले आहेत, शासनाचा हा निधी निष्फळ ठरला याला जबाबदार कोण आहे, २०११-१२ नंतर या कामाबद्दल जिल्हा परिषद प्रशासनाची भूमिका काय राहिली, ठेकेदाराबरोबर पत्रव्यवहार केला होता काय या समितीने विचारलेल्या प्रश्नास जिल्हा परिषदेकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

शासनाने दिलेला निधी खर्च होऊनही काम पूर्ण झाले नाही. ठेकेदाराची उदासिनता आहे हे जिल्हा परिषदेने चुकीचे उत्तर दिलेले आहे. आज तो ठेकेदार जिल्हयामध्ये इतर ठिकाणी कामे करीत असावा, त्या ठेकेदाराला काळया यादीत टाकण्यात यावे. काम पूर्ण का झाले नाही याची चौकशी करण्यात यावी, विभागीय आयुक्त कार्यालयाकडे जी प्रकरणे प्रलंबित असतील त्याचा निपटारा त्वरित करण्यात यावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याची जबाबदारी निश्चित करावी, शासनाचे ८३ लाख रुपये खर्च झाले आहेत. चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी आणि ज्या ठेकेदाराना काम देण्यात आले होते त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे. विभागीय चौकशीमध्ये जबाबदारी निश्चित करण्यात आल्यानंतर रक्कम व्याजासह वसूल करण्यात यावी, असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) सदरहू प्रकरणी शासनाचे रु.८३.०० लक्ष खर्च झाले आहेत त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व सदरहू प्रकरणी ठेकेदारास काळया यादीत टाकणेबाबत व काम पुर्ण का झाले नाही, याची चौकशी करणेबाबत समितीने निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? याबाबत जिल्हा परिषदेनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे काय ?

२) सद्यःस्थितीत अपुर्ण असलेले कोल्हापुर बंधारे १५ ते २० वर्ष इतकी जुनी असल्याने ते बंद करणेबाबतची महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत काय ? असल्यास, त्यात काय नमुद केले आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड मधील १५ अपूर्ण कामांपैकी ८ कामे पूर्ण झाली आहेत. सदरील ८ कामांवर झालेला खर्च निष्फळ झालेला नाही. एक काम प्रगतीत असून सदर काम लवकरच पूर्ण होईल. उर्वरित सहा अपूर्ण कामांवर एकुण खर्च २९.४६ लक्ष खर्च झाला आहे. सहा कामांपैकी दोन कामे ही ठेव तत्वावर नांदेड लघु पाटबंधारे विभाग नांदेड आणि लेंडी प्रकल्प विभाग नांदेड यांना देण्यात आली आहेत. चार कामे ही जिल्हा परिषदस्तरावर करण्यात आली आहेत. त्यापैकी मौजे आलेगांव येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याचे काम चालू असतांना अर्ध्या भागात खडक न लागल्यामुळे व कामामध्ये अतिरिक्त वाढ झाल्यामुळे काम आहे त्या स्थितीत अंतिम करण्यात आले आहे. जिल्हा परिषद स्तरावरील उर्वरित कामांशी संबंधीत ठेकेदारांची नांवे काळ्या यादीत टाकाण्याची शिफारस कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद नांदेड यांनी पत्र क्र. जिपना/लपा/पंरास १६०९/२०१५ व क्र. जिपना/लपा/पंरास, १६१०/२०१५ दिनांक २१/१२/२०१५ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याकडे शिफारस केली आहे.

ठेव तत्वावरील कोल्हापूरी बंधारा या कामाचे कार्यकारी अभियंता नांदेड यांना या कार्यालयाचे पत्र क्र. जिपना/लपा/पंरास १६-१२-२०१५ दिनांक २१/१२/२०१५ अन्वेय व कोल्हापूरी बंधारा घागरदरा ता. कंधार या कामाचे कार्यकारी अभियंता विष्णूपूरी प्रकल्प नांदेड व लेंडी प्रकल्प नांदेड यांना या कार्यालयाचे पत्र क्र. जिपना/लपा/पंरास १६११, २०१५ दिनांक २१/१२/२०१५ अन्वये कळवून तत्कालीन अपूर्ण कामासाठी जबाबदार कार्यकारी अभियंता व ठेकेदार यांचेविरुध्द कार्यवाही करणेस्तव कळविले आहे. तसेच या कार्यालयाचे तत्कालीन आठ कार्यकारी अभियंता यांना अपूर्ण कामे असल्याबाबत शास्तीची कार्यवाही म्हणून त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्यापैकी चार कार्यकारी अभियंता यांनी खुलासा सादर केला आहे. संबंधित कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे करिता पत्र क्र. जिपना/लपा/पंरास १६१३, १६१४ - १६१५, १६१६ व १६१८/२०१५ दिनांक १६१८/२०१५ अन्वेय कळविले आहे. तसेच काही कार्यकारी अभियंता यांचा पत्ता मिळण्यासाठी मा.मुख्य अभियंता लघु सिंचन (जलसिंचन) पुणे यांना या कार्यालयाचे क्र. जिपना/लपा/ पंरास १६६९, २०१५ दिनांक २१/१२/२०१५ अन्वेय अन्वये माहिती मागविलेली आहे.

सद्यस्थितीत अपूर्ण कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे १५ ते २० वर्ष अपूर्ण स्थितीत असल्याने सदरील बंधा-याची कामे पुढे करावित किंवा कसे याबाबतीत महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था नाशिक यांना कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद नांदेड यांनी पत्र क्र. जिपना/लपावि/तांशा-१/२०१५/१११० दिनांक ३/९/२०१५ अन्वये मार्गदर्शन मागविले आहे. (२) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था नाशिक यांचे अभिप्राय प्राप्त झाले नाहीत.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्यावर कार्यवाहीस्तव जलसंपदा विभागाकडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी पत्र क्र. जिपना/लपा/पंरास १६१३, १६१४, १६१६, १६१७ व १६१८/२०१५ दिनांक २१/१२/२०१५ अन्वये कळविले आहे. अपूर्ण कामांशी संबंधित ठेकेदारांची नावे काळया यादीत टाकण्याची शिफारस कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद नांदेड यांनी पत्र क्र. जिपना/लपा/पंरास १६०९ व १६१०, /२०१५ व दिनांक २१/१२/२०१५ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याकडे केली आहे.

सद्यस्थितीत अपूर्ण कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे १५ ते २० वर्षे अपूर्ण स्थितीत असल्याने सदरील बंधा-यांची कामे पुढे करावित किंवा कसे याबाबतीत महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था नाशिक यांना कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद नांदेड यांनी पत्र क्र. जिपना/लपावि/तांशा-१/२०१५/१११० दिनांक ३/९/२०१५ अन्वये मार्गदर्शन मागविले आहे.

## चौकशी अहवाल

दिनांक १३.०९.२०१५ रोजी मा.पंचायती राज समिती यांची जिल्हा परिषद नांदेड येथे झालेल्या आढावा बैठकीत लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत अपुर्ण स्थितीत असलेली बांधकामांच्या आक्षेपावर चर्चा करण्यात आली व त्याअनुषंगाने सदर प्रकरणात विभागीय चौकशी करण्याचे आदेशीत करण्यात आले. त्याअनुषंगाने अपुर्ण स्थितीतील बांधकामाच्या अभिलेखे अनुसार खालीलप्रमाणे चौकशी अहवाल सादर करण्यात येत आहे.

लेखा आक्षेप अनुसार लघुपाटबंधारे विभागात १५ कामे अपूर्ण असून ६ कामे १५ ते २० वर्षापासून अर्धवट स्थितीत आहेत. त्यामुळे या योजनेवर झालेला खर्च रु. ८३.०० लक्ष गुंतले असलेबाबतचा आक्षेप आहे. आजच्या स्थितीत १५ कामांपैकी आठ कामे ही पुर्ण झालेली असुन वर्ष २०१०-११ मधील एक काम प्रगतीत आहे व सदरील काम मार्च, २०१६ पर्यंत पुर्ण होईल. उर्वरीत खालील सहा कामे ही पंधरा ते विस वर्षापासून अर्धवट स्थितीत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | तालुका | प्रशासकीय मान्यता वर्ष | अंदाजीत किंमत रु. लक्ष | झालेला खर्च रु.लक्ष | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | कोपब रुई | कंधार | १९८८-८९ | ७.८२ | ४.४० | स्लॅब लेवल |
| २ | कोपब घोटका | लोहा | २०००-०१ | १२.४७ | ६.९२ | सिल लेवल |
| ३ | कोपब आलेगाव | नांदेड | १९९९-२००० | ३१.६८ | ६.९२ | पायाचे अर्धवट काम |
| ४ | कोपब वायफणा | हद्‌गाव | १९९०-९१ | ४.८१ | ३.८८ | स्लॅब लेवल |
| ५ | कोपब घागरधरा | कंधार | १९९१-९२ | ३.८१ | १.८१ | पायाचे अर्धवट काम |
| ६ | कोपब वाघलवाडा | उमरी | १९८९-९० | ४६.०० | ५.५३ | पायाचे अर्धवट काम |
| | एकूण रुपये | | | | २९.४६ | |

वरील सहा अपूर्ण कामावर एकूण रु. २९.४६ लक्ष खर्च झाले असून मा.आलेगाव येथील कोपब कामाच्या पायामधील अर्ध्या भागात खडक न लागल्याने व सदरील कामाच्या संकल्पेत बदल होत असल्यामुळे सदरील कामाची किंमतीत वाढ होत असल्यामुळे आणि निधीच्या कमतरतेमुळे सदरील काम आहे त्या स्थितीत अंतिम करण्यात आले आहे. उर्वरीत कोल्हापूर बंधारेची कामे वेळेत पुर्ण न केल्यामुळे सदरील बंधा-याच्या किमतीत वाढ होत गेली.

सदरील कामे पुर्ण करणेस्तव तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी संबंधीत कंत्राटदाराशी काम पुर्ण करणे बाबत पत्रव्यवहार केल्याचे अभिलेखेवरुन निदर्शनास येते तसेच काम वेळेत पुर्ण न केल्यामुळे सदरील कामाचे अंदाजपत्रक सुधारीत करण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी विभागीय पातळीवरुन उपविभागीय स्तरावर पत्रव्यवहार केल्याचे अभिलेखेवरुन निदर्शनास येते.

तथापि सदरील झालेल्या पत्रव्यवहाराने काम पुर्ण करुन घेता आले नाही त्यामुळे सदरील झालेला पत्रव्यवहारास व्यवहारीकदृष्ट्या शुन्य किंमत ठरते. कार्यकारी पदावरुन काम करुन घेताना आवश्यक ती दंडात्मक कारवाई संबंधीत ठेकेदारावर किंवा कामात कुचराई करणा-या अधिनिस्त कर्मचारी किंवा अधिकारीवर करण्यात आली असती तर कोपब आलेगाव वगळता उर्वरीत अपुर्ण कामे पुर्ण झाली असती. परंतु अशी कारवाई केल्याचे दिसुन येत नाही.

कोपब घोटका व कोपब वायफणा च्या कामाशी संबंधीत कंत्राटदाराचे नावे काळया यादीत टाकण्याची शिफारस करण्यात येत आहे. को.प.ब. वाघलवाडाचे काम हे ठेव तत्वावर कार्यकारी अभियंता, नांदेड लघुपाटबंधारे विभाग नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात येत असल्याने सध्याच्या कार्यकारी अभियंता यांना तत्कालीन कार्यकारी अभियंता व संबंधीत कंत्राटदार यांच्यावर कारवाई करुन अहवाल सादर करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. कोपब घागरधराचे काम हे ठेव तत्वावर कार्यकारी अभियंता,

लेंडी प्रकल्प विभाग नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात येत असल्याने सध्याच्या कार्यकारी अभियंता यांना तत्कालीन कार्यकारी अभियंता व संबंधीत कंत्राटदार यांच्यावर कारवाई करुन अहवाल सादर करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.

सदरील कामे अपुर्ण राहण्यामागे जबाबदार कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागवीण्यात आला आहे. संबंधीतांनी खुलासा अप्राप्त असल्यामुळे त्यांच्या विरुध्द कारवाई करणेबाबत मा.सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई यांना कळविले आहे.

सद्यस्थितीत सदरील कोल्हापूर बंधारे पंधरा ते विस वर्षापासून अपूर्ण स्थितीत असल्याने सदरील बंधा-यांची कामे पुढे करावे किंवा कसे याबाबतीत महासंचालक महाराष्ट्र अभियांत्रीकी संशोधन संस्था नाशिक यांना जा.क्र./जिपना/जपवि/ताशा-१/२०१५/१११० दिनांक ३.०९.२०१५ अन्वये मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. पंधरापैकी आठ पुर्ण झालेली व एक काम प्रगतीत असलेल्या कामाचे यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | तालुका | प्रशासकीय मान्यता वर्ष | अंदाजीत किंमत रु. लक्ष | झालेला खर्च रु.लक्ष | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | गे.ब.कोथळा | हदगाव | २०११-१२ | ६.१३ | ५.५९ | काम पुर्ण |
| २ | गे.ब.हज्जापुर क्र १ | मुदखेड | २०११-१२ | ७.५२ | ७.५२ | काम पुर्ण |
| ३ | गे.ब.पळशी क्र.१ | किनवट | २०११-१२ | ७.४४ | ५.५७ | काम पुर्ण |
| ४ | गे.ब.कनकी क्र.१ | किनवट | २०११-१२ | ७.४५ | ५.५६ | काम पुर्ण |
| ५ | गे.ब.सलाईगुडज्ञ | किनवट | २०११-१२ | ४.९९ | ३.८४ | काम पुर्ण |
| ६ | गे.ब.चिखलीतांड | किनवट | २०११-१२ | ७.४८ | ७.२४ | काम पुर्ण |
| ७ | को.प.ब.सिंगोडा | किनवट | २०११-१२ | ११.३४ | ९.३१ | काम पुर्ण |
| ८ | सि.ब.इब्राहीमपुर क्र.१ | देगलूर | २०११-१२ | ४.९९ | ४.८१ | काम पुर्ण |
| ९ | पा.त.थेरबन | भोकर | २०१०-११ | ४३.८२ | २९.८१ | काम प्रगत |

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदरहू प्रकरणी शासनाचे ८३ लक्ष रुपये खर्च झालेले असल्याने संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन ठेकेदारास काळया यादीत टाकणे व काम पूर्ण का झाले नाही याबाबत चौकशीचे निर्देश समितीने दिले होते. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय, याप्रकरणी जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे काय, तसेच कोल्हापूर बंधारे जुनी असल्याने ते बंद करणेबाबत महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक या संस्थेकडून अभिप्राय प्राप्त झाले आहेत काय अशी समितीने पृच्छा केली. याप्रकरणी १५ कामांची किंमत ८३ लाख रुपये होती. त्यामधील ९ कामे पूर्ण झाली असून ६ कामे अपूर्ण असून त्याची किंमत २९ लाख रुपये आहे. सदरहू प्रकरणी ठेकेदारांना काळ्या यादीमध्ये टाकण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागास पाठविण्यत आला आहे. सदरहू कामे १५-२० वर्षापूर्वीची असल्याने त्याबाबत पुढे काय करावयाचे यासंदर्भात मार्गदर्शन मागविण्यात आले असून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नसल्याचे विभागीय सचिवांनी समिती समोर स्पष्ट केले.

महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक या संस्थेला पत्र कधी पाठविण्यात आले, यावर महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ रोजी पत्र पाठविले असल्याचे उत्तर समितीस प्राप्त झाले. तथापि, वसुली होण्यापूर्वी पत्र का पाठविले नाही याचे उत्तर समितीस प्राप्त झाले नाही. पुढे कोल्हापूरी बंधा-यासंबंधी

जबाबदार कार्यकारी अभियंत्यावरील कारवाई संबंधी खुलासा करतांना सदरहू प्रकरणी जबाबदार असलेल्या दोन व्यक्तींचा खुलासा प्राप्त झाला असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव माननीय विभागीय आयुक्त यांचेकडे दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजी पाठविण्यात आला आहे. दोघांच्या विरुध्द दोषारोपपत्र तयार करण्यात आले आहे, असे समितीस सांगण्यात आले.

### अभिप्राय व शिफारशी

सन २०११-२०१२ या वर्षात नांदेड जिल्हा परिषदेचे लेखा परिक्षण करताना लेखापरिक्षकांनी सुमारे ११० एवढया मोठ्या संख्येवर बांधकामे अपूर्ण स्थितीत होती. समितीने सन २०१५ मध्ये भेट दिली असता सदर आक्षेपावरील खुलासा लक्षात घेता ६-७ कामे अद्यापही अपूर्ण राहिल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. लेखापरिक्षणाचे वेळी संबंधित कामांची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नव्हती. या ११० अपूर्ण कामांपैकी आता बहुतांश पूर्ण झाली असून त्यातील ७ अपूर्ण कामांपैकी एका कामाच्या ठिकाणी खडक न लागल्यामुळे ते काम आहे त्या स्थितीत अंतिम केल्याचा खुलासा समिती ग्राह्य धरते. परंतू उर्वरित ६ कामांसाठी शासनाचा तब्बल २९.४६ लक्ष निधी खर्च होवूनही सदरची कामे पुर्ण झाली नसल्यामुळे उक्त कामांवर खर्च केलेला निधी हा निष्फळ ठरला आहे असे समितीचे मत झाले आहे. अपूर्ण कामांची केवळ ठेकेदाराचीच जबाबदारी नसून संबंधित कार्यकारी अभियंता अथवा विभाग प्रमुख आणि त्याच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी कर्मचा-यांचीही ही कामे वेळेवर पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी असते. चौकशी अहवालात नांदेड लघू पाटबंधारे विभाग, नांदेड व लेंडी प्रकल्प विभाग, नांदेड यांचेकडे एकूण दोन को.प.बंधारे ठेव तत्वावर दिलेले असून त्या दोन्ही कामांशी संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून याप्रकरणी जबाबदार असलेल्या सर्व संबंधित अधिका-यांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांची विभागीय चौकशी करण्यात यावी, असे समितीचे ठाम मत आहे. **सदर अपूर्ण कामे अद्यापही पूर्ण झाली नाहीत त्यावर लाखोंचा खर्च झाला आहे. त्यामुळे याबाबतीत योग्य नियोजन झाले नसल्यामुळे तसेच त्यात अधिका-यांबरोबर कंत्राटदारही दोषी असल्यामुळे संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून आवश्यक ती रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच संबंधित अधिका-यांची चौकशी करुन नियमाप्रमाणे त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

समिती समोर श्री.ए.व्ही. चिमकोडकर, सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता, श्री.चं.पू.कळसे, कार्यकारी अभियंता, श्री.एस.एस. मुदीराज, सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता, श्री.कि.अ.विडेकर, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, श्री.भा.तु. कवडे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, श्री. टि.के. रावते, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, श्री.मोहम्मद जलील, अधिक्षक अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेकडून खुलासा मागविण्यात आला असल्याने चौकशी अहवालात नमूद केले आहे. तथापि तो अद्याप अप्राप्त असल्याने पुढील कारवाई सचिव जलसंपदा, विभाग यांनी करावी. त्याचबरोबर जिल्हा परिषद, नांदेड यांना त्यांच्या लघूपाटबंधारे विभागात काम केलेले सात सेवानिवृत्त कार्यकारी अभियंते यांचा शोध घेऊन त्यांचेवर कोणतीही कारवाई अद्याप केली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **विभागप्रमुखांनी उक्त अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्याकरिता व त्यांचे खुलासे मागविण्याकरिता मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांना कळवूनही अद्याप त्या सात सेवानिवृत्त कार्यकारी अभियंत्यांचा अद्याप माग लागलेला नाही व त्यांचेविरुध्द काहीही कारवाई केली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. चौकशी अहवालात या सर्व सेवानिवृत्त कार्यकारी अभियंत्यांवर जबाबदारी निश्चित केलेली असून त्यांची विभागीय चौकशी विहीत कालमर्यादेत पूर्ण करुन केलेल्या कारवाईची माहिती समितीस पाठविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

**तसेच नांदेड जिल्हापरिषद, लघुपाटबंधारे विभागाकडे पंधरा ते वीस वर्षापासूनची अपूर्ण व जुनी बांधकामे पूर्ण करावीत किंवा कसे याबाबत महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक (लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद नांदेड यांनी दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना अग्रषित केलेले पत्र) (परिशिष्ट ६.१) यांच्याकडून मार्गदर्शन मिळवण्याबाबत कळवून या बाबतीत समितीस आश्वासीत करण्यात येवूनही या नऊ कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याच्या कामांबाबतीत समितीच्या साक्षीपर्यंत मार्गदर्शन प्राप्त होऊ शकले नव्हते ही अत्यंत खेदजनक बाब आहे असे समितीचे मत आहे. कारण सदर संस्था ही शासनाची असून संबंधित अधिका-याने त्यांना मागितलेले मार्गदर्शन वेळीच देणे अपेक्षित आहे. त्यातही सदरची बाब समितीच्या बैठकीत आल्याने त्याला अनन्य साधारण महत्व आहे. याबाबींचा विचार करता सदर संस्थेकडून तातडीने अपूर्ण कामे पूर्ण करावयाची किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागविण्यात यावे. त्यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार संबंधित कामे पूर्ण करावी किंवा कसे याबाबत निर्णय घ्यावा अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण तेरा

# जिल्हा परिषद, नांदेड

## थकित आगाऊ रकमांबाबत (थकित अग्रिम)

**परिच्छेद ३.८१४ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशाप्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशोब देऊन समायोजन/वसुली करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली झाल्यावर नवीन आगाऊ रकमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रकमांच्या नोंदवह्या पाहता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकित अगाऊ रकमांमध्ये फार जुन्या म्हणजेच १९६२ पासूनच्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली थकित असल्याचे दिसून येते. उदाहरणादाखल, पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन २०११-२०१२ अखेर खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा समायोजन/वसुली अभावी थकित होत्या.

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३७ | नांदेड | वित्त | ३ | २,८०,२८,९७०/ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम २१० (ब) च्या तरतुदीनुसार जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुख /कर्मचारी यांना वेळोवेळी निरनिराळया कार्यक्रमाच्या अमंलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाने व मान्यतेने अगाऊ रकमा देण्यात येतात या आगाऊ रकमाचे समायोजन त्याच आर्थिक वर्ष अखेर पर्यंत होणे आवश्यक आहे ही वस्तुस्थिती आहे.

अग्रीमाचे समायोजनाबाबतची सद्यःस्थिती पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता**

| अ. क्र (१) | विभाग (२) | २०११-१२लेखा परिक्षणात दर्शविलेली समायोजीत न झालेली रक्कम (३) | रकाना (३) पैकी समायोजित झालेली रक्कम (४) | समायोजन होणे शिल्लक असलेली रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| १ | उप.मु.का.अ (सा) जि.प.नांदेड | १५,५५,२०० | ११,२५,१५६ | ४,३०,०४४ |
| २ | उपमु.का.अ. (ग्राप) जि.प. | २३,८७,११६ | ० | २३,८७,११६ |
| ३ | का.अ.(बां)द. जि.प.नांदेड | ३४,५७,८५३ | ० | ३४,५७,८५३ |
| ४ | का.अ.(बां) उत्तर | ३७,१२,०१३ | ० | ३७,१२,०१३ |
| ५ | शिक्षणाधिकारी (निरंतर) | ३०,००० | ० | ३०,००० |
| ६ | शिक्षणाधिकारी (प्रा.) | ३८,९६,५५० | ० | ३८,९६,५५० |
| ७ | का.अ.(ल.पा) | २५,६४,९८७ | ० | २५,६४,९८७ |

**तक्ता**–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ८ | का.अ.ग्रा.पा. पु. विभाग | २१,३३,८५७ | १,००,००० | २०,३३,८५७ |
| ९ | समाज कल्याण विभाग | २७,७७,१०० | ० | २७,७७,१०० |
| १० | जि.अ. अधिकारी | १०,०८,८५५ | ० | १०,०८,८५५ |
| ११ | जि.कृषी अधिकारी | १,३३,९२९ | १०,००० | १,२३,९२९ |
| १२ | जि.पशु. संवर्धन अधिकारी | ४०,७८,९६० | १३,३४,००० | २७,४४,९६० |
| १३ | उप.मु.का.अ. (बाक) | २,६५,३०० | ० | २,६५,३०० |
| १४ | वरिष्ठ लेखाधिकारी | २७,२५० | ० | २७,२५० |
| | एकूण | २,८०,२८,९७० | २५,६९,१५६ | २,५४,५९,८१४ |

प्रलंबित अग्रीम असलेल्या विभाग प्रमुख यांना पत्र क्रं ५७३२ दि.१३.०८.२०१५ अन्वये त्वरित समायोजन करणे बाबत कार्यवाही करण्याचे आदेशीत केले आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, वैयक्तिक अग्रिम म्हणजे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा सणानिमित्त अग्रिम दिला जातो. यात वकिलांची कोर्ट फी, फर्निचर खरेदी याचाही समावेश आहे. सन १९८८ पासूनचे अग्रिम आहेत. रुपये ३८ लाखापैकी ३.३१ लाख रुपये वसूल झाले असून रुपये ३५.७५ लाखाचे समायोजन शिल्लक आहे. मोहीम घेऊन समायोजन करावे लागेल असा खुलासा समितीसमोर केला.

समितीने पुढे विचारणा केली की, एखाद्या अधिका-याला अग्रिम किती रक्कमेपर्यंत आणि किती कालावधीसाठी देता येतो, एवढया मोठया प्रमाणावर अग्रिम का द्यावा लागतो, ३५ लाख रुपये वसूल व्हायचे असल्यामुळे आपण हे चॅलेंज स्वीकारले पाहिजे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस महिन्याभरात जास्तीत जास्त जितकी वसुली करता येईल तितकी वसुली करु अशी हमी देऊन अग्रिम कामाचा खर्च असेल त्याप्रमाणे दिला जातो. अग्रिम ज्या कारणासाठी दिला जातो ते कारण संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत त्याचे समायोजन करून हिशोब सादर करावयाचा आहे. दिनांक १२.३.२००८ रोजी शिक्षण सेवक निवडीसाठी परीक्षा झाली होती. त्यासाठी शिक्षण विभागाला १.१२ लाख रुपये दिनांक १३ जून, २००८ रोजी अग्रिम दिले होते. दिनांक ३१.७.२००८ रोजी पुन्हा ५० हजार रुपये शिक्षण सेवक भर्तीसाठी दिले होते. अशा प्रकारचा खर्च झाल्यानंतर प्रत्येक व्हाऊचर तीन महिन्यात जमा करावयास पाहिजे.

तसेच सन १९८८ पासूनची अग्रीम रकमा थकीत आहेत. पंचायती राज समिती आली म्हणून या रकमा वसूल करण्यासाठी नांदेड जिल्हा परिषद तीन महिन्याच्या कालावधीचे आश्वासन देत आहे. ही समिती आली नसती तर या अनुषंगाने कसलीही कार्यवाही झाली नसती, असे मत समितीने दर्शवुन निदेश दिले की, श्री.यु.डी.पेटकर, कनिष्ठ सहायक यांच्याकडे रु. ६,३५,०००/-, श्री.जी.एम.कुलकर्णी, सेवानिवृत्त भांडारपाल यांच्याकडे रु.३५,७०४/-, श्री.एस.जी. परळकर, सेवानिवृत्त भांडारपाल यांच्याकडे रु. ५५,०००/-, ॲड.व्ही.एस.पानपट्टे यांच्याकडे ४,१३,६०१/-, ॲड.जे.व्ही.सावंत यांच्याकडे रु.५,३७८/- ॲड.श्री.शमशोद्दीन यांच्याकडे २८,४००/-, श्री.नागेश सिंदगीकर, अधीक्षक यांच्याकडे १ लाख रुपये, श्री.जी.डी.रासवते, वरिष्ठ सहायक यांच्याकडे रु.१०,१५,०००/-, श्री.एम.डी.पाटील, सेवानिवृत्त उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे रु.२,५०,०००/-, श्रीमती उषा वाकळे, कनिष्ठ सहायक यांच्याकडे रु.६०,०००/- आणि श्री.संजय वाघमारे, भांडारपाल यांच्याकडे रु.२,६९,२१०/- अशी एकूण रुपये २८,६७,२९३- इतकी अग्रीमाची रक्कम थकीत आहे. ज्या अधिका-यांनी उपरोक्त कर्मचा-यांना आगाऊ रकमा दिल्यानंतर त्या वसूल करण्यासाठी केवळ जुजबी पाठपुरावा केला त्यांच्यावर कारवाई करावी. तसेच जे अधिकारी/कर्मचारी या प्रकरणी जबाबदार असतील त्यांच्याकडून थकीत आगाऊ रकमा वसूल कराव्यात. सन १९८८ पासून या रकमा संबंधित कर्मचा-यांकडे थकीत आहेत.

उपरोक्त लोकांकडे अग्रीम स्वरुपात उचललेले लाखो रुपये थकीत असणे आणि जिल्हा परिषद स्तरावरुन त्या रकमा वसूल करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही न होणे हे जिल्हा परिषदेच्या दृष्टीने मुळीच भूषणावह नाही.

समितीच्या मते सर्वप्रथम थकीत रक्कम व्याजासह किती येते याचा हिशेब करुन त्यानुसार संबंधितांकडून या रकमा वसूल करण्याची एक महिन्यात कार्यवाही करण्याचे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी आश्वासन दिले. ज्या प्रकरणात महसूल वसूल करण्याची गरज असेल त्या संदर्भात जिल्हाधिका-यांची परवानगी घेऊन कार्यवाही करावी असे निदेश समितीने दिले.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अग्रीम रक्कम ही मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या मान्यतेने देण्यात आली आहे. या रकमा वसूल करण्यासाठी आतापर्यंत ८ वेळा पत्र व्यवहार करण्यात आला आहे. परंतु पत्रांना उत्तर मिळाले नाही. तरीही या रकमा वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असा खुलासा समितीसमोर केला. त्यावर समितीने मुळात प्रत्येक विभाग प्रमुखांची थकीत अग्रीम रक्कम वसुल करण्याची जबाबदारी आहे. विभाग प्रमुख जर मुख्य लेखा व वित्त अधिका-यांच्या पत्राची दखल घेत नसतील तर हे पुर्णपणे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे. तसेच या रकमा थकीत राहिल्यामुळे शासनाचा पैसा अडकून राहत आहे. याप्रकरणी समितीने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभाग प्रमुख यांच्यावर या बाबतची जबाबदारी निश्चित करावी असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) सदरहू प्रकरणी थकीत रक्कम व्याजासह किती होती याचा हिशोब करुन संबंधितांकडून या रकमा वसुल कराव्यात व जबाबदारी निश्चित करावी. यथास्थिती महसुली वसुली करणे आवश्यक असल्यास जिल्हाधिका-यांच्या परवानगीने ती वसुली करावी असेे निदेश समितीने दिलेले आहेत.

२) समितीने या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करण्याचे निदेश दिले असता २,८०,२८,९७०/- इतक्या रक्कमेपैकी केवळ ४५,६०,७९०/- इतक्या रक्कमेचे समायोजन झाले आहे. उर्वरित रक्कम समायोजित न होण्याची कारणे काय आहेत. तसेच तत्कालिन अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रकरणांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, नसल्यास त्याची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत राज समिती परिच्छेद क्र.३.८१४ नुसार जि.प.नांदेड कडील सर्व विभागाकडे एकूण रक्कम रु.२,८०,२८,९७०/- एवढ्या अग्रिम रकमेचे समायोजन करणे प्रलंबित असून त्यापैकी दिनांक ३०.३.२०१६ अखेर एकूण रक्कम रु.५८,२७,०३३/- चे समायोजन करण्यात आलेले आहे. पंचायत राज समितीने सूचित केल्याप्रमाणे विभाग प्रमुखाकडे (परिच्छेदात नमुद अग्रीमापैकी) प्रलंबित असलेल्या रक्कमेची व्याजासह (१२.२५%) (९.५०+२.७५) परिगणना करण्यात येऊन वसुली संदर्भात सर्व विभागांना पत्र देण्यात आलेले आहे. व वसुलीची कार्यवाही चालू आहे. त्यानुषंगाने विभागाने ग्राम विकास विभागाकडील परिपत्रक झेडपीए-२००९/प्र.क्र.५२२/वित्त-९ दिनांक १०/१२/२०१० प्रमाणे प्रलंबित अग्रीमाचे वर्गीकरण केले असून त्याचे सविस्तर विवरण खालील प्रमाणे आहे.

उपरोक्त नमुद कोष्टकानुसार समायोजन होऊ शकणारी रक्कम रु.४९,७६,८७८/- असून मुदतबाह्य झाल्यामुळे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून त्याचे समायोजन करणे आवश्यक असून त्यानुसार जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही चालु आहे, समायोजन होऊ न शकणारी रक्कम रु.३४,०८,२३९/- आहे व या संबंधीत तत्कालीन जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसुली करण्यासाठीचे आदेश काढलेले असून त्यांच्या वेतनातून/निवृत्ती वेतनातून सदर वसुलीची कार्यवाहीचे आदेश दिलेले आहेत. कोर्ट प्रकरणात/वकिलास दिलेल्या अग्रीमामध्ये गुंतलेली रक्कम रु.२१,६३,१८६/- आहे व निर्लेखनासाठी प्रस्तावित करावयाची रक्कम रु.४०,८७,१०४/- एवढी आहे व इतर कारणामुळे प्रलंबित असलेली रक्कम रु.७५,६६,५३०/- एवढी आहे.

जिल्हा परिषदच्या या सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ६७.०० लक्ष समायोजनांसाठी दिनांक १८.३.२०१६ च्या अंदाजपत्रकामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. वरील प्रमाणे अग्रीमाचे समायोजन करण्यात येईल, समायोजन न झाल्यास अंतिमतः महसुली वसुलीची कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हा परिषद नांदेड च्या सन २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या लेखा परीक्षणामध्ये अग्रिम रक्कमांचे समायोजन मोठ्या प्रमाणात झालेले नव्हते. तथापि, पंचायत राज समितीने सूचित केल्याप्रमाणे व ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक झेडपीए-२००९/ प्र.क्र. ५२२/वित्त-९ मंत्रालय मुंबई-४०००३२ दिनांक १० डिसेंबर, २०१० नुसार विभागवार कार्यवाही केलेली आहे. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**उपरोक्त संदर्भात मंत्रालयीन विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) **शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे अभिप्राय**- जिल्हा परिषद सेसचा निधी असल्यामुळे शालेय शिक्षण विभागाशी संबंधित नाही.

२) **सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय-** सार्वजनिक आरोग्य विभाग सहमत आहे.

३) **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय-** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे प्रलंबित असलेले अग्रीम रु.२१,३३,८५७-पैकी रु.१०,०७,७३९/- च्या अग्रीमाचे समायोजन करण्यात आले आहे व रु.११,२६,११८/- चे समायोजन होणे बाकी आहे. त्या अग्रीमापैकी न्यायालयीन प्रकरणात रु.५,०४,५४४/- गुंतलेले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे. प्रकरण निकाली निघताच सदर समायोजन करण्यात येईल. आणि उर्वरित रु.६,२१,५७४/- समायोजनाबाबत जबाबदार अधिकारी व कर्मचा-यांना अंतिम नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सदरील रक्कम त्यांचेकडून वसूल करुन शासन खाती जमा करण्यात येतील.

४) **ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे अभिप्राय-** समायोजन होऊ न शकणारी रक्कम रु.३४,०८,२३९/- ही संबंधीत तत्कालीन जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसुली करण्यासंबंधाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून तत्कालीन जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास, नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**चौकशी अहवाल**

सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात अग्रीमाच्या परिच्छेदानुसार एकुण रु. २,८०,२८,९७०/- अग्रीमाचे समायोजन करणे प्रलंबीत होते. दि.१३.०९.२०१५ ते १५.०९.२०१५ दरम्यान पंचायत राज संस्था बैठकी दरम्यान सदर अग्रीमाच्या संदर्भात सविस्तर चर्चा होऊन प्रलंबीत अग्रीमाचे तात्काळ समायोजन करणे याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. वित्त विभागामार्फत मोठया प्रमाणावर पत्र व्यवहार करुन अग्रीमाचे समायोजन करणे बाबत विभाग प्रमुखाकडे पाठपुरावा करण्यात आलेला होता. याबाबत पंचायत राज समितीने देखील त्यांचे अहवालात तसे नमुद केलेले आहे.

प्रलंबित अग्रिमापैकी रु.२५,६९,१५६/- चे समायोजन पंचायतराज समिती बैठकीपुर्वी करण्यात आले होते व बैठकी नंतर आजपावेतो २४,११,६१८/- चे असे एकुण रुपये ४९,८०,७७४/- चे समायोजन करण्यात आलेले आहे व तरतुदीच्या अधिन उर्वरित अग्रिमाचे समायोजन करण्याची प्रकिया वेगाने सुरु आहे. प्रस्तुत प्रलंबित अग्रिमाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, एकुण प्रलंबित अग्रिमापैकी मोठया प्रमाणावर समायोजन करणे हे जिल्हा परिषद उपकर अंतर्गत करण्याचे असुन त्यासाठी अर्थ संकल्पात संबंधित लेखाशिर्ष निहाय तरतुद उपलब्ध करुन समायोजन करणे शक्य होईल. तसेच माळेगाव यात्रा संबंधित एकुण साधारण ८५,१२,४२८/- अग्रिमाचे समायोजन करण्यासाठी तरतुदी उपलब्ध करुन देण्याची सुचना वरिष्ठ स्तरावरुन करण्यात आली आहे त्यामुळे सदर रक्कमेचे समायोजन करण्याची कार्यवाही चालू आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रकरणाधिन थकित रक्कम व्याजासह किती होती याचा हिशोब करून संबधितांकडून या रक्कमा वसुल कराव्यात व जबाबदारी निश्चित करावी, यथास्थिती महसुली वसुली करणे आवश्यक असल्यास जिल्हाधिका-यांच्या परवानगीने ती वसुली करावी असे निर्देश समितीने दिले असताना २ कोटी ८० लाख २८ हजार ९७० इतक्या रक्कमेपैकी केवळ ४५ लाख ६० हजार ७९० इतक्या रक्कमेचे समायोजन झाले आहे. उर्वरित रक्कम समायोजित न होण्याची कारणे काय आहेत. तसेच तत्कालिन अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रकरणावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास त्याची कारणे काय, या समितीच्या

प्रश्नास उत्तर देताना १९ प्रकरणे आहेत. त्यामध्ये एकूण अग्रीम १० लक्ष १८ हजार ८५५ विविध कारणांसाठी घेण्यात आले होते. एकूण ७ अग्रीम समायोजित झाली होती. त्याची रक्कम रुपये ३ लक्ष २८ हजार २०५ आहे, कोर्ट प्रकरणात प्रलंबित असलेली ११ अग्रीमे आहेत. त्यामध्ये ६ लक्ष ८५ हजार ६५० इतकी रक्कम आहे. प्रलंबित ५ हजार रुपयांची अग्रीम रक्कम आहे. विभागाने त्याचा सर्व तपशिल दिलेला आहे. यासंदर्भातील यादी समितीच्या अवलोकनार्थ सादर केलेली आहे. वकीलास हजार रुपयांची फी संबंधितांकडून घेतलेली आहे.

तसेच दिनांक २१-०९-१९९० रोजी न्यायालयीन प्रकरणासाठी २ हजार रुपये घेण्यात आले होते. ते देखील दिनांक ३-०९-२०१५ रोजी भरण्यात आलेले आहेत. दिनांक १-१-१९९६ रोजी १५ हजार रुपये घेण्यात आले होते. सद्यःस्थितीत जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये त्यांनी हा विषय घेऊन सदर अग्रीम कालबाह्य झाल्यामुळे सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव सादर केलेला आहे. हे खूप जुने प्रकरण होते. सदर विषय सन १९९६ मधील होता. पुढील विषय सन १९९६ मधील कोर्टाच्या संदर्भातील आहे. ही रक्कम देखील कालबाह्य झाल्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत प्रस्तुत करण्यात आलेला आहे असा प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला.

यानंतर पुढील कार्यवाहीबाबत खुलासा करतांना विभागीय सचिवांनी आता एकच १९ नंबरचा अग्रीम प्रलंबित आहे. यामध्ये कोर्ट केससाठी १५ हजार रुपये घेण्यात आले होते. यापैकी १० हजार रुपये समायोजित केली असून, ५ हजार रुपये शिल्लक आहेत. ते संबंधितांकडून वसुल करण्याची कार्यवाही बाकी आहे. उर्वरित सर्व अग्रिम निर्लेखित झालेले आहेत असा खुलासा केला. त्यावर अग्रिमे निर्लेखित केलेली आहेत म्हणजे नेमकी कोणती कार्यवाही केलेली आहे. सर्वसाधारण सभेने ठराव केल्यानंतर विभागाने निर्णय घ्यायचा, म्हणजे विभागाने पुढील कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे, या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी एकूण १९ परिच्छेद होते. यापैकी ६ समायोजित झाले आहेत. म्हणजे १० लक्ष रुपयांपैकी ३ लक्ष २८ हजार रुपयांची रक्कम समायोजित झाली आहे. कोर्टाशी संबंधित ११ प्रकरणे आहेत. त्यामध्ये ६ लक्ष ८५ हजार रुपयांची रक्कम होती. यापैकी विभागाकडे आता एकच परिच्छेद प्रलंबित आहे, असे समितीस उत्तर दिले.

यात शासनाची रक्कम गुंतलेली असल्यामुळे ती वसूल झाली पाहिजे ही समितीची धारणा आहे. परंतु विभागीय सचिव हे जुने अग्रिम असल्यामुळे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव घेऊन अग्रिमाची रक्कम निर्लेखित केल्याचे सांगत आहेत परंतु समितीस अग्रिम निर्लेखित करणे म्हणजे नेमके काय, ते कोणत्या नियमाव्दारे करता येते याबाबत पुन्हा पुन्हा विचारणा करुनही विभागीय सचिवांना माहिती देता न आल्याने समितीने नाराजी व्यक्त करुन याउलट ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सदर रक्कम वसूल झाली पाहिजे, ही बाब नमुद केली. परंतु ३० ते ३५ वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. सदर कागदपत्रे सापडत नाहीत. यामुळे अडचणी येत असल्यामुळे यासंबंधी कार्यवाही करण्याकरिता समितीच्या मार्गदर्शनाबाबत विनंती केली.

जिल्हा परिषदेने रकमा निर्लेखित करण्यासाठी अशा पध्दतीने ठराव घेणे असे आपल्याला करता येऊ शकते का, निर्लेखनाकरिता असलेली ४० लाख ८७ हजार १०४ इतकी रक्कम किती प्रकरणांमधील आहे, याचे उत्तर समितीस प्राप्त झाले नाही. परंतु दुस-या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यात ९ विभागांचा समावेश आहे. शिक्षण विभागाची १८ हजार ५८ रुपये, समाजकल्याण विभागाची २६ लाख २७ हजार १०० रुपये, लघुपाटबंधारे विभागची ६ लाख ४० हजार ५७१ रुपये, बांधकाम उत्तरची १ लाख ७० हजार रुपये, पंचायती विभागाची १ लाख ८८ हजार ३७५ रुपये, बांधकाम दक्षिणची ३ लाख रुपये, सामान्यचे ७०० रुपये, शिक्षण विभाग निरंतरचे निरंक, कृषी विभागाचे निरंक आहे, पशुसंवर्धन विभागाची २ हजार रुपये, महिला व बालविकास विभागाची १ लाख ४० हजार ३०० रुपये अशा प्रकारे एकूण ४० लाख ८७ हजार १०४ रुपयांची रक्कम निर्लेखित करावयाची आहे असे समितीस उत्तर दिले. समाजकल्याण विभागाची २६ लक्ष रुपयांची रक्कम नेमक्या कोणत्या प्रकरणांमधील आहे. या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समाजकल्याण विभागाची सन १९९८-९९ पासून सदर रक्कम शिल्लक आहे. टीन पत्र्यांची खरेदी करणे तसेच कामांकरिता दिलेल्या अग्रिमाची ही रक्कम आहे. या संदर्भात खरेदी करण्यात आली. परंतु त्यांची बिले सादर करुन अग्रिम समायोजित करणे, हिशेब करणे राहून गेल्यामुळे या अडचणी निर्माण झाल्या आहेत असे समितीला उत्तर दिले. मागील अग्रिम समायोजित झाल्याशिवाय पुढील अग्रिम देता येत नाही या समितीच्या मताशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली व अग्रिम द्यावयास पाहिजे नव्हता, परंतु तो दिलेला आहे. ही वस्तुस्थिती मान्य करुन आता पंचायती राज समितीच्या निमित्ताने जिल्हा परिषदेने १०० टक्के अग्रिम देणे बंद केले आहे हे स्पष्ट केले.

पंचायती राज समितीच्या निमित्ताने ५८ लाख रुपयांचे समायोजन झाले आहे. परंतु खरोखर समायोजन झाले आहे की, फक्त बिलांना बिले लावलेली आहेत, याबाबत खुलासा करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खरोखर समायोजन झालेले आहे. झालेल्या खर्चांच्या पावत्या घेऊन बिले सादर करण्यात आली आहेत असे समितीस सांगितले. समितीने पुन्हा विचारणा केली की, आपण समितीला रकमा निर्लेखन करण्यासंबंधी ठराव घेतला आहे. अशा प्रकारे आपल्याला ठराव घेता येतो का व अग्रिम कालबाहय होऊ शकते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर देत संदर्भाधीन शासन निर्णय समितीस पुढीलप्रमाणे वाचून दाखविला.

तसेच ग्रामविकास विभागाने दिनांक १० डिसेंबर, २०१० रोजी शासन निर्णय काढला आहे.

त्यात पुढील तरतुदी दिलेल्या आहेत. १) प्रलंबित अग्रीमाची वसुली नियमाप्रमाणे तत्काळ करावी. २) जे कर्मचारी बदलीने अन्यत्र बदलून जातात त्यांच्या प्रलंबित अग्रीमाची नोंद त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रामध्ये घेण्यात यावी. ३) जे कर्मचारी / अधिकारी सेवानिवृत्त झाले त्यांची वसुली नियमाप्रमाणे करावी. ४) जे कर्मचारी/अधिकारी मयत झाले त्यांच्याकडून अग्रीम वसुली होणे शक्य नाही, त्यांच्याबाबत निर्लेखनाची कार्यवाही करावी. ५) कार्यालय प्रमुखांनी जे अग्रीम दिलेले आहेत त्यांच्या कागदपत्रांचा शोध घेऊन समायोजनाची कार्यवाही करावी. ६) वरीलपैकी कार्यवाही करुनही वसुली होत नसल्यास संबंधितांच्या मालमत्तेतून नियमाप्रमाणे वसुली करण्याची कार्यवाही महसूल खात्यामार्फत करावी. म्हणजेच आर.आर.सी.द्वारे वसुलीची कार्यवाही करावी. ७) अग्रीमांचे अभिलेख अद्ययावत व योग्य प्रकारे ठेवावेत. ८) एकदा अग्रीम दिला असल्यास त्याची वसुली झाल्याखेरीज दुसरा अग्रीम देवू नये. आता समितीला दिलेल्या माहितीनुसार अनुक्रमांक ४ च्या संदर्भात निर्लेखन करण्याची कार्यवाही करण्याबाबत जीआरमध्ये नमुद करण्यात आले आहे. सदर जीआरमध्ये कालबाह्य वगैरे नमूद केलेले नाही. तसेच जिल्हा परिषदेने आता संबंधित कर्मचारी / अधिका-यांच्या पगारातून आर.आर.सी. वसुलीची कार्यवाही सुरु केली आहे. ६ कर्मचारी मयत झाल्यामुळे २६ लाख रुपयांपैकी दीड लाख रुपये वगळता उर्वरित रक्कम निर्लेखित करण्यासंबंधी प्रस्ताव केलेला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खुलाशावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी ग्रामपंचायती, पंचायत समित्या तसेच जिल्हा परिषदांच्या संदर्भात अकांऊट पध्दतीमध्ये सुधारणा होण्याकरिता मॉडेल अकाऊंट सिस्टीम सुरु करीत आहोत. याबाबतची माहिती विभाग निहाय समितीकडे सादर करेल असे समितीस सांगितले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत निरनिराळ्या योजना, बांधकामे इत्यादी बाबी कार्यान्वित करण्यासाठी ठेकेदार, विभागप्रमुख अगर कर्मचारी यांना सन १९६२ पासून वेळोवेळी अगाऊ रकमा देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे देण्यात आलेल्या रकमांचे संबंधित वर्ष अखेर खर्चाची प्रमाणके व हिशोब देवून नियमितरित्या समायोजन/वसुली करणे आवश्यक होते. परंतु सन २०११-१२ अखेर सुमारे २ कोटी ८० लक्ष रुपयांच्या रकमांचे समायोजन/ वसुली अद्यापी प्रलंबित होती. पंचायती राज समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली असता सदरहू प्रकरणी थकीत रक्कम व्याजासह किती होते याचा हिशोब करुन संबंधितांकडून रकमा वसूल करण्याबाबत दिलेल्या निदेशानुसार फक्त ५८ लक्ष २० हजार रुपयांच्या रकमांचे समायोजन होवू शकले. जिल्हा परिषदेने उर्वरित सुमारे २ कोटी २२ लक्ष थकीत रुपये अग्रिमांच्या बाबतीत

१) समायोजन होवू शकणारी रक्कम रुपये ४९,७६,८७८ असून ती मुदतबाह्य झाल्यामुळे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन त्याचे समायोजन आवश्यक असून त्यानुसार कार्यवाही चालू आहे. २) समायोजन होवून शकणारी रक्कम रुपये ३४,०८,२३९ आहे व संबंधित तत्कालीन जबाबदार अधिकारी कर्मचारी यांच्याकडून वसूली करण्यासाठीचे आदेश काढलेले असून त्यांचे वेतनातून/ निवृत्ती वेतनातून सदर वसुली करण्याचे आदेश दिलेले आहेत. ३) न्यायालयात प्रकरणात वकिलांस दिलेल्या अग्रिमामध्ये गुंतलेली रक्कम रुपये २१,६३,१८६ ४) निर्लेखनासाठी प्रस्तावित करावयाची रक्कम रुपये ४०,८७,१०४ ५) व इतर कारणांमुळे प्रलंबित असलेली रुपये ७५,६६,५३० एवढी रक्कम असल्याचे समितीस सांगण्यात आले. जिल्हा परिषदेच्या सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ६७ लक्ष समायोजनासाठी अंदाजपत्रकामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्याची बाब देखील समितीच्या निदर्शनास आली.

एकूण रुपये २,८०,२८,९७० रुपयांच्या थकीत अग्रिमापैकी विभागीय सचिवांच्या साक्षीपर्यंत फक्त रुपये ५८,२७,०३३ चे समायोजन करण्यात आलेले होते व सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात ६७ लक्ष रुपये समायोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. सद्यस्थितीत रुपये १,५५,०१,९३७ रुपयांच्या अग्रिमांचे समायोजन/वसुली प्रलंबित आहे. मुदतबाह्य अग्रिम किंवा

अग्रिमांच्या निर्लेखनासंबंधी ग्रामविकास विभागाच्या दिनांक १० डिसेंबर, २०१० रोजीच्या परिपत्रकामधील बाब क्रमांक ४ मध्ये तरतूद करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. वस्तुतः जे कर्मचारी/अधिकारी मयत झाले आहेत त्यांच्याकडून अग्रिम वसुल होणे शक्य नाही अशा प्रकरणांमध्ये निर्लेखनाची कार्यवाही करण्याचे निदेश प्रस्तुत परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मध्ये अशाप्रकारे अग्रिमांची रक्कम मुदतबाह्य किंवा निर्लेखित करण्याची तरतूद नाही. दिनांक २६ सप्टेंबर, १९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये (परिशिष्ट ७.१) वित्त विभागाने शाससकीय अधिकारी/ कर्मचारी यांना मंजूर केलेल्या विविध अग्रीमांच्या संदर्भात कसुरदारांविरुध्द करावयाची कार्यवाही केली नाही असे दिसून येते. परंतू जिल्हा परिषदेने लेखा संहिता नियम ४५ अन्वये मुदतबाह्य मागणी या बाबींखाली अग्रिम रकमेचे समायोजन करुन त्यास ठराव क्र.३१३ अनुसार सर्वसाधारण सभेत दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी मान्यता घेतल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **वस्तुतः अग्रिम रक्कम वसूल न करता निर्लेखित करणे म्हणजे त्या निधीपासून जिल्हापरिषद कायमची वंचीत रहाते किंवा त्या रकमेचे नुकसानच होय व शासनाच्या निधीचा अपव्यय आहे असे समितीचे मत झाले आहे. त्यामुळे शासनाचा एक पैसा देखील अपव्यय न होता त्याची संबंधितांकडून वसूली करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

नांदेड जिल्हा परिषदेकडून वारंवार दिनांक १० डिसेंबर, २०१० **(परिशिष्ट ७.२)** रोजीच्या परिपत्रकाच्या आधारे प्रलंबित अग्रीमांचे वर्गीकरण केले असल्याचे जरी सांगण्यात येत असले तरी प्रस्तुत परिपत्रकात विशेष योजनाबध्द मोहिमेचे आयोजन करुन सदर अग्रिमे वसूल करण्याच्या सूचना असूनही पाच वर्षानंतरही जिल्हापरिषदेकडे तब्बल रुपये १,५५,०१,९३७ या रकमेचे समायोजन/वसुली होणे बाकी होते. जिल्हापरिषदेचा कोणताही कर्मचारी/अधिकारी सेवानिवृत्त होत असताना त्याच्या येणे/देणे ना दाखल्याशिवाय सेवानिवृत्ती वेतन दिले जात नाही ही कार्यपध्दती आहे. तरीही कर्मचा-यांना निवृत्ती वेतन अदा केलेली असून आता त्या कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून अग्रिमांची वसूली करण्यात येत आहे. उक्त नमूद परिपत्रक हे केवळ वैयक्तिक अग्रिमांच्या वसुलीबाबत असून त्यामध्ये खातेनिहाय अग्रिमांबाबत उल्लेख नाही असे ही समितीचे मत आहे. **त्यामुळे एखादा कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी जे 'ना देय' प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते ते ना देय प्रमाणपत्र संबंधितांनी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांकडून घेतले नाही व अग्रीम घेणा-या कर्मचा-यास सेवानिवृत्त होऊ देण्यास मदतच केली या प्रकरणी ना देय प्रमाणपत्र देणा-या अधिका-यांचा शोध घेऊन त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अग्रीम रकमेची वसुली केल्यानंतरच निवृत्त होणा-या कर्मचा-यास/व्यक्तीस ना देय प्रमाणपत्र देण्यात यावे अशी निश्चित भुमिका शासनाकडून घेण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रलंबित अग्रीमांच्या बाबतीत समितीसमोर जिल्हा परिषद, नांदेड कडून प्राप्त झालेले वर्गीकरण समितीस प्राप्त झाले आहे. **सदर वर्गीकरणानुसार कालबाह्य झालेली रक्कम रुपये ४९,७६,८७८ व निर्लेखित करावयाच्या रुपये ४०,८७,१०४ रकमेबाबत जिल्हा परिषदेने तद्संबंधातील लेखा संहितेतील तरतूदी लक्षात घेवून व प्रसंगी वित्त व ग्रामविकास विभागाचे मार्गदर्शन घेऊनच कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतची सविस्तर माहिती समितीस विना विलंब पाठवावी. त्याचप्रमाणे जबाबदार अधिकारी / कर्मचा-यांकडून वसुल करावयाची रुपये ३४,०८,२३९ रक्कम निश्चित कालमर्यादा घालून घेवून व्याजासह वसुल करण्यात यावी तर न्यायालयीन प्रकरणामध्ये गुंतलेल्या रुपये २१,६३,१८६ व इतर कारणांमुळे प्रलंबित रुपये ७५,६६,५३० रकमेची समायोजना / व्याजासह वसुली तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत पाठविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

सदरहू आक्षेपात अग्रिमांच्या समायोजन/ वसुलीबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. संबंधित कर्मचारी/ अधिका-यांने विभागांतर्गत अग्रिमांचा विनियोग त्यांच्या कामासाठी करुन खर्चाची प्रमाणके व हिशोब देवून त्याच्या नोंदी नोंदवहीमध्ये अचूक ठेवल्या असत्या व त्या त्या वर्षाची अग्रिमे त्या त्या वर्षी वेळेवर समायोजीत झाली असती, तसेच लेखासंहितेतील नियमाप्रमाणे पूर्वीच्या अग्रिमांचे समायोजन / वसुली झाल्याखेरीज दुस-यांदा अग्रिम देवू नये या नियमाचे पालन झाले असते तर अशा प्रकारचा लेखा आक्षेप समितीसमोर आला नसता. **एका जिल्हापरिषदेचा जवळपास २ कोटी ८० लक्ष रुपयांचा निधी नाहक थकित अग्रीमात गुंतला नसता असे समितीचे ठाम मत आहे. त्यामुळे प्रकरणनिहाय थकीत अग्रिमांच्या प्रकरणी सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचेवर नियमानुसार कारवाई करावी. केलेल्या कारवाईची माहिती तीन महिन्यांत समितीस पाठविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चौदा

## जिल्हा परिषद, नांदेड

**सन २०१०-२०११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी परिच्छेद ३.८१५ (१) (सन २०११-२०१२)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | निवासस्थान, शाळा भाडे, इमारत दुरूस्ती, गाळा भाडे वसुली (भुईभाडे) | नांदेड | सामान्य प्रशासन | ५ | १८,०३,१५२/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ या वर्षात जिल्हा परिषद नांदेड मध्ये गाळे भाडे वसुली संदर्भात आक्षेपात नमुद केल्या नुसार पुढील प्रमाणे अनुपालन करण्यात सादर करण्यात येत आहे.

**तक्ता**

| अ.क्र | गाळा क्र. | गाळा धारकाचे नाव | दि.३१-३-२०१२ अखेर थकबाकी | वसूल केलेली रक्कम | वसूल करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ०१ | अध्यक्ष महात्मा गांधी मिशन | ७४२९० | ७४२९० | निरंक |
| २ | ०२ | संपादक, लोकपत्र | ६८१०२ | ६८१०२ | निरंक |
| ३ | ०३ | श्री शकीलूर रेहमान | ३२८२६ | ३२८२६ | निरंक |
| ४ | ०४ | श्री एस.डी. महाजन | ३९७५३ | ३९७५३ | निरंक |
| ५ | ०५ | श्री एस.डी. महाजन | ४४८९६ | ४४८९६ | निरंक |
| ६ | - | जिल्हा मध्यवर्ती बँक | ४८८१८४ | १९५७२८ | २९२४५६ |
| ७ | ६व ७ | श्री अब्दुल गफार | ४५८५५० | ० | ४५८५५० |
| ८ | १३ | श्री दशरथ शिवलाड | ७००२४ | ७००२४ | निरंक |
| ९ | १४ | श्री सखाराम पाटील | ९२२२० | ९२२२० | निरंक |
| १० | १८ | श्री जी.आर. पुरोहीत | ११५०३६ | ११५०३६ | निरंक |
| ११ | STD | श्री वैजनाथ जाधव | ५०५२६ | ५०५२६ | निरंक |
| १२ | उपहार गृह | श्रीमती सोनार | २६८७४५ | २४४६५६ | २४०८९ |
| | | | १८०३१५२ | १०२८०५७ | ७७५०९५ |

जिल्हा परिषदेच्या मालकीची बांधलेली दुकाने (गाळे) भाडयाने दिलेली आहे दि.३१-३-२०१२ अखेर रु.१८०३१५२ थकीत होती. त्यापैकी रु.१०२८०५७/- वसुली केलेली आहे. श्री अब्दूल गफार गाळा क्र.६ व७ यांनी गाळे भाडे भरले नसल्यामुळे त्यांच्या दुकानास सील ठोकले आहे. व त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हा मध्यवर्ती बँक व उपहार गृह यांच्याकडे राहीलेल्या गाळे भाडयाच्या रक्कमा वसुली करण्याची कार्यवाही चालू आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषद, पंचायत समितीस येणे असलेले गाळा भाडे/ भुईभाडे रु.१८,०३,१५२/- केव्हापासून थकीत आहे. श्री.अब्दूल गफार यांच्याकडे ४,५८,५५०/- रुपये थकीत राहण्याची कारणे काय आहेत, या समितीच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा करतांना श्री.अब्दुल गफार यांचे ज्यूस सेंटर असून दि. १७.७.१९९१ पासून सदर रक्कम थकीत आहे असे सांगितले. त्यावर समितीने ज्या अधिका-यांकडे वसुलीचे काम आहे त्यांना यासंदर्भात दोषी धरले पाहिजे. एखाद्या व्यक्तीवर जिल्हा परिषद मेहरबान असणे योग्य नाही. सदर गाळेधारकाकडून करारनामा सुध्दा करण्यात आलेले नाही. त्यामुळे या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जबाबदारी स्वीकारुन रक्कम व्याजासह वसूल करावी तसेच दुकान सील करुन ताब्यात घ्यावे, कायदेशीर कारवाई करावी. जिल्हा परिषदेला चार पैसे मिळाले तर त्याचा फायदा जिल्हा परिषदेलाच होईल. सर्व गाळेधारकांकडून व्याजासह रक्कम वसूल करण्यात यावी. यासंदर्भात जो निर्णय घेतला जाईल त्याची माहिती समितीला एक महिन्यात उपलब्ध करुन देण्यात यावी, असे सुचित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने दिलेल्या निदेशानुसार गाळयांना सील केले आहे. परंतू वसुलीबाबत नमूद नाही. उलट सदर व्यक्ती दिवाणी न्यायालयात गेली. दिवाणी न्यायालयाने रक्कम वसुलीसाठी स्थगिती दिली आहे काय, नसल्यास सदर वसुली करण्यास जिल्हा परिषदेस काय अडचणी आहेत. सदर व्यक्तीविरुध्द रकमेचे स्वरुप विचारात घेवून फौजदारी कारवाई का करण्यात आली नाही, ती यापुढे करण्यात येईल काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार गाळा क्र.६ व ७ ला दिनांक ३/१/२०१६ रोजी सील करण्यात आले असून याविरुद्ध संबंधिताने मा.दिवाणी न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. माहे मार्च २०१२ अखेर रु.१८,०३,१५२/- गाळेभाडे थकित होते. त्यापैकी रुपये १०,२८,०५७/- एवढी वसुली पंचायत राज समिती दौ-यापूर्वी करण्यात आली होती व रुपये ७,७५,०९५/- थकीत होते. त्यापैकी रुपये ४,४७,१४५/- वसुल करण्यात आले असून उर्वरित पैकी रुपये २,६९,८७२/- हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व श्री.अब्दुल गफूर यांच्याकडे रुपये ५८,०७८/- असे एकूण रु.३,२७,९५०/- थकीत आहेत. ते वसुल करण्यासाठी वारंवार तोंडी व लेखी नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

श्री.अब्दुल गफुर यांचे गाळे रिकामे करुन घेण्यासाठी व गाळेभाडे वसुलीसाठी संबंधिताविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवण्यासाठी दिनांक २३/०२/२०१६ रोजी वजीराबाद पोलीस स्टेशनमध्ये तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्राम विकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली**.

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावर कार्यवाही सुरू आहे.**

## चौकशी अहवाल

नांदेड जिल्हा परिषदे अतंर्गत एकूण २० गाळे असून भाडेकरु १३ आहेत. सन २००९-२०१२ या कालावधीतील रुपये १८,०३,१५२/- थकीत भाडयापोटी रुपये १०,२८,०५७/- एवढे पंचायत राज समिती दौ-याच्यावेळी वसुली करण्यात आले होते तर रु. ७,७५,०९५/- एवढे थकीत होते त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | गाळा क्र. | गाळा धारकाचे नाव | दि.३१-३-२०१२ अखेर थकबाकी | वसूल केलेली रक्कम | वसूल करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ०१ | अध्यक्ष महात्मा गांधी मिशन | ७४२९० | ७४२९० | निरंक |
| २ | ०२ | संपादक, लोकपत्र | ६८१०२ | ६८१०२ | निरंक |
| ३ | ०३ | श्री.शकीलूर रेहमान | ३२८२६ | ३२८२६ | निरंक |
| ४ | ०४ | श्री. एस.डी. महाजन | ३९७५३ | ३९७५३ | निरंक |

**तक्ता**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ५ | ०५ | श्री. एस.डी. महाजन | ४४८९६ | ४४८९६ | निरंक |
| ६ | १० ते १२ | जिल्हा मध्यवर्ती बँक | ४८८१८४ | १९५७२८ | २९२४५६ |
| ७ | ६ व ७ | श्री. अब्दुल गफारी | ४५८५५० | ० | ४५८५५० |
| ८ | १३ | श्री. दशरथ शिवलाड | ७००२४ | ७००२४ | निरंक |
| ९ | १४ | श्री.सखाराम पाटील | ९२२२० | ९२२२० | निरंक |
| १० | १८ | श्री. जी.आर.पुरोहित | ११५०३६ | ११५०३६ | निरंक |
| ११ | च्क्र | श्री. वैजनाथ जाधव | ५०५२६ | ५०५२६ | निरंक |
| १२ | उपहारगृह | श्रीमती सोनार | २६८७४५ | २४४६५६ | २४०८९ |
| | | एकूण | १८०३१५२ | १०२८०५७ | ७७५०९५ |

त्यापैकी श्री.अब्दुल गफार (गाळा क्र. ६ व ७) यांचेकडे रुपये ४,५८,५५०/- थकीत होते याबाबत पंचायत राज समितीने दिलेल्या निदेशानुसार गाळेभाडे वसूलीसाठी जबाबदार असलेले तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) श्री सुधीर भातलवंडे व श्री. शिवाजी कपाळे यांना या कार्यालयाची नोटीस दिनांक २३.१२.२०१५ रोजी नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. संबंधिताने भाडेवसूली तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, मा.अध्यक्ष व स्थायी व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा यांचे निदर्शनास ही बाब आणून गाळा रिकामा करुन घेण्यासाठी प्रयत्न केल्याबाबत खुलासा केला आहे.

श्री.अब्दुल गफार यांनी दिनांक २३.११.२०१५ रोजी जिल्हा परिषद विधीज्ञ मार्फत कायदेशीर नोटीस देऊन त्यांचा करार कालावधी संपला असल्यामुळे व ते अनधिकृतरित्या गाळा वापरत असल्यामुळे व गाळेभाडे वेळोवेळा देत नसल्यामुळे गाळा रिकामा करणेसाठी नोटीस बजावली असता संबंधीताने दिनांक ०२.०१.२०१६ रोजी खुलासा सादर केला असुन रुपये ४,५८,५५०/- पैकी रुपये ४,००,४७२/- भरणा केल्याबाबत पुरावे सादर केले आहेत. तारीखनिहाय धनादेश क्रमांक व रकमेचा स्पष्ट उल्लेख करुन खुलासा केला आहे. याबाबत त्यांनी दिलेल्या धनादेश क्रमांक व चालान क्रमांकाचे पडताळणी केली असता रुपये ४,००,४७२/- एवढी रक्कम जमा केलेली आहे. संबंधीताकडे थकीत गाळेभाडे रुपये ४,५८,५५०/- वजा करुन रुपये ४,००,४७२/- गेले असता एकूण शिल्लक रुपये ५८,०७८/- आहेत. सन २०१२ पर्यंतचे आजतागायतचे गाळेभाडे संबंधीतांकडे थकीत आहे ते वसुल करण्यासंदर्भात संबंधीतास दिनांक ३१.१२.२०१५ रोजी अंतिम कारणे दाखवा नोटीस देऊन सदर गाळा दिनांक ०३.०१.२०१६ रोजी पंचनामा करुन सील करण्यात आलेला आहे. त्यामुळे गाळेभाडेधारक श्री.अब्दुल गफार यांनी मा.जिल्हा न्यायालय दिवाणी स्तर, नांदेड येथे आरसीएस नंबर ११/२०१६ दाखल केला असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

पंचायती राज समिती दौ-यानंतर रुपये ४,४७,१४५/-वसूली झालेली असून उर्वरित रक्कमेपैकी मध्यवर्ती बँकेकडे रु. २,६९,८७२/- व श्री.अब्दुल गफार यांचेकडे रु. ५८,०७८/- अशी एकंदरीत

रु. ३,२७,९५०/- शिल्लक आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवहार बंद असल्याने त्यांच्याकडील भाडे थकीत आहे, ते वसूल करण्याची कार्यवाही चालू आहे. तर श्री.अब्दुल गफार यांनी प्रकरण न्यायप्रविष्ट आहे त्यांच्याकडील रु. ५८,०७८/- ची वसुली करण्याची कार्यवाही चालू आहे. इतर सर्व गाळेभाडे धारकाकडून अहवाल वर्षापर्यंतचे सर्व भाडे वसुल करण्यात आलेले आहे.

**तक्ता**

| अ.क्र | गाळा क्र. | गाळा धारकाचे नाव | दि.३१-३-२०१२ अखेर थकबाकी | वसूल केलेली रक्कम | वसूल करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ | अध्यक्ष महात्मा गांधी मिशन | ७४२९० | ७४२९० | निरंक |
| २ | ०२ | संपादक, लोकपत्र | ६८१०२ | ६८१०२ | निरंक |
| ३ | ०३ | श्री.शकीलूर रेहमान | ३२८२६ | ३२८२६ | निरंक |

**तक्ता**–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ०४ | श्री. एस.डी. महाजन | ३९७५३ | ३९७५३ | निरंक |
| ५ | ०५ | श्री. एस.डी. महाजन | ४४८९६ | ४४८९६ | निरंक |
| ६ | १०ते १२ | जिल्हा मध्यवर्ती बँक | ४८८१८४ | २१८३१२ | २६९८७२ |
| ७ | ६ व ७ | श्री. अब्दुल गफार | ४५८५५० | ४००४७२ | ५८०७८ |
| ८ | १३ | श्री. दशरथ शिवलाड | ७००२४ | ७००२४ | निरंक |
| ९ | १४ | श्री.सखाराम पाटील | ९२२२० | ९२२२० | निरंक |
| १० | १८ | श्री. जी.आर.पुरोहित | ११५०३६ | ११५०३६ | निरंक |
| ११ | च्ल्क्र | श्री. वैजनाथ जाधव | ५०५२६ | ५०५२६ | निरंक |
| १२ | उपहारगृह | श्रीमती सोनार | २६८७४५ | २६८७४५ | निरंक |
| | एकूण | | १८०३१५२ | १४७५२०२ | ३२७९५० |

जिल्हा परिषद उपहार गृह (हॉटेल पद्मावती) हे श्रीमती सुशिलाबाई तुळशीराम सोनार यांना दि. ०१.०५.१९८६ ते ३०.०४.१९९१ या कालावधीत करारनामा करुन घेऊन भाडेतत्वावर देण्यात आले होते. संबंधीत श्रीमती सुशिलाबाई तुळशीराम सोनार यांचे दिनांक ०९.०६.१९९८ रोजी निधन झाले. त्यांच्या मृत्युनंतर श्री. दिलीप सोनार यांनी नांदेड कोर्टात RCS ५३०/१९९८ चा दावा दि. ०६.१०.१९९८ रोजी दाखल केला. दि. २७.०१.२००३ रोजी मा. जिल्हा न्यायाधिश नांदेड यांनी दिलेल्या निर्णयात उपहार गृह ची जागा जिल्हा परिषद नांदेडला ताब्यात घेणे असल्यास नियमाप्रमाणे रिकामी करण्यासाठी सक्षम कोर्टात पीटीशन दाखल करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार पीटीशन दाखल करण्यात येत आहे.

तसेच सर्व गाळेभाडे धारकांना नोटीस देवून करारनामा करुन घेणे संदर्भात कळविण्यात आले असून न्यायप्रविष्ठ प्रकरणे वगळता इतर सर्व गाळे भाडे धारकांसोबत करारनामा करुन घेवून चालू RCS प्रमाणे भाडे निश्चित करुन करारनामा करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने दिलेल्या निर्देशानुसार गाळ्यांना सील केले आहे. परंतु, वसुलीबाबत नमूद नाही. उलट सदर व्यक्ती दिवाणी न्यायालयात गेली. दिवाणी न्यायालयाने रक्कम वसुलीसाठी स्थगिती दिली आहे काय, नसल्यास सदर वसुली करण्यास जिल्हा परिषदेस काय अडचणी आहेत, सदर व्यक्ती विरूध्द रकमेचे स्वरूप विचारात घेऊन फौजदारी कारवाई का करण्यात आली नाही, ती यापुढे करण्यात येईल काय अशी समितीने साक्षीच्या वेळी पृच्छा केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित गाळ्याचे थकित भाडे रु. १८,०३,१५२/- लाख इतके होते. समितीच्या दौ-यापूर्वी त्यापैकी रु. १०,२८,०५७/- एवढी वसुली करण्यात आली होती. नंतर ७,७५,०९५/- इतक्या थकित भाड्यापैकी ४,४७,१४५/- लाख रुपयांची वसुली करण्यात आली असून उर्वरित रक्कमेच्या वसुलीबाबत फॉलोअप सुरु आहे. समितीच्या सूचनेप्रमाणे पोलीस स्टेशनमध्ये तक्रार अर्जही केलेला आहे. मात्र संबंधित गाळेधारक कोर्टामध्ये गेलेला आहे. याबाबतची केस कोर्टात सुरु आहे, त्यावर जो निर्णय होईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असा खुलासा केला.

जिल्हापरिषदेची प्रत्येक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मालमत्ता असते. त्याची माहिती घेऊन देखभाल करणे गरजेचे असते. ब-याच ठिकाणी गोदामे वगैरे भाडे तत्त्वावरही दिली जातात. काहींनी जिल्हापरिषदेची मालमत्ता जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतली व ते कोर्टामध्ये गेले. ही फार गंभीर बाब आहे या समितीच्या अभिप्रायावर कोर्टाने याबाबतीत आदेश दिले तर त्याप्रमाणे कारवाई करता येईल. मात्र कोर्टाने आदेश दिलेले नसतानाही भाडेकरुला तेथे ठेवता येणार नाही. यावर अतिरिक्त मुख्य

कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, ही प्रॉपर्टी सील केल्यानंतर ती सील का केली या कारणास्तव तो कोर्टामध्ये गेला आहे. सदरहू केसचे प्रथम सुनावणी ५ मे रोजी आहे. त्यावर समितीने सील केल्यानंतर ती व्यक्ती कोर्टामध्ये गेलेली आहे. परंतु, कोर्टाचे आदेश अद्याप झालेले नाहीत, आता ती मालमत्ता कोणाच्या ताब्यात आहे, अशी पृच्छा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अवगत केले की, प्रॉपर्टी सील केल्यानंतर तो कोर्टामध्ये गेला. याबाबत पोलीस स्टेशनमध्येही गुन्हा दाखल करुन घेतला जात नाही. पोलीस याबाबत सहकार्य करीत नाहीत, ही बाब समितीने गांभीर्याने घेतली, प्रस्तुत प्रकरणी प्रसंगी गृह विभागाच्या सचिवांना साक्षीला बोलविण्याचा विचार समितीने बोलुन दाखविला असेच होत असेल तर भविष्यात कोणीही जिल्हापरिषदेची मालमत्ता आपल्या ताब्यात घेईल. त्यांनी असे करणे अपेक्षित नाही. तेथील सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता तेथे आता सील असून तेथील दुकान बंदच आहे. प्रथम सील करुन दुकान बंद केल्यावर त्याने ते सील तोडले होते. त्यानंतर तेथे परत सील केलेले आहे. तो सील असतानाही तेथे घुसल्याने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली असता, त्यांनी ती नोंदवलेली नाही. सध्या तो गाळा रिकामी असून तेथे सील केलेले आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सील केले म्हणून त्याने त्यांच्याच विरोधात केस दाखल केली आहे. यावर समितीने शासनाची मालमत्ता जबरदस्तीने कोणी घेत असेल तर त्याच्या विरुध्द तक्रार केलीच पाहिजे. जिल्हापरिषदेची मालमत्ता सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने पर्यवेक्षनासाठी एक योजना तयार करावी असे समितीने असे निदेश दिले असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे घालून दिली जातील असे आश्वासन समितीला दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

नांदेड जिल्हापरिषदेने तिच्या मालकीची बांधलेली दुकाने (गाळे) भाड्याने दिलेली आहेत. सदर गाळ्यांच्या भाड्यापोटी एकूण १८,०३,१५२/- रुपये वसूल होणे बाकी असल्याचा आक्षेप लेखापरिक्षणाच्या वेळी उपस्थित करण्यात आला होता. तसेच दर ३ वर्षांनी भाड्याचे नुतनीकरण करणेही आवश्यक होते व त्यासंदर्भातील अभिलेख लेखा परिक्षणाचेवेळी अवलोकनार्थ प्राप्त झाले नसल्याचाही सदर प्रकरणात आक्षेप होता. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची जिल्हा परिषदेस भेट देऊन साक्ष घेतली. तोवर जिल्हा परिषदेकडून रुपये १८,०३,१५२/- भाड्यापैकी रुपये १०,२८,०५७/-भाड्याची वसुली करण्यात आली होती. परंतू गाळा क्र. ६ व ७ च्या गाळे धारकांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ट केल्यामुळे त्याची भाडे वसुली प्रलंबित होती. परंतु या संदर्भात न्यायालयाचे वसुली थांबविण्याबाबत स्थगनादेशाबाबत स्पष्ट आदेश नसताना वसुलीची कार्यवाही थांबविण्याची आवश्यकता नव्हती असे समितीचे स्पष्ट मत आहे. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीसमोर आलेल्या कागदपत्रावरून उक्त गाळेधारकाने ४,००,४७२/- रुपये एवढी रक्कम जमा केल्याचे निदर्शनास आले. एवढे होवूनही गाळेधारकाने प्रकरण न्यायालयात नेले आहे. सद्यस्थितीत गाळा जिल्हापरिषदेच्या ताब्यात असून जिल्हापरिषद अधिका-यांनी त्यास 'सील' केलेले आहे. **एकूण गाळयांचे भाडे करार वेळेवर न करणे, वसूली संदर्भात पाठपुरावा न करणे या बाबींमुळे जिल्हापरिषदेस गाळ्यांच्या भाड्यास मुकावे लागत आहे. अतः न्यायालयाचे स्पष्ट आदेश नसल्यास जिल्हापरिषदेने सदर रक्कम वसुल करण्याबाबत न्यायालयाकडून स्पष्ट आदेश मिळविण्यासाठी मा.न्यायालयाकडे पाठपुरावा करुन जाणीवपूर्वक भाडे देणे टाळणा-या व्यक्तींकडून तातडीने भाडे वसुली कार्यवाही सुरु ठेवावी. त्याचप्रमाणे जिल्हापरिषदेचे रिक्त असलेल्या गाळ्यांचे रितसर भाडे करार करुन त्यात कठोर अटींचा अंतर्भाव करुनच ते भाड्याने द्यावेत तसेच जुन्या भाडेकरुने पुन्हा येवून दुकानाचे सील फोडले किंवा तसा प्रयत्न केल्यास जिल्हा परिषदेने त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करावा याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

प्रकरण पंधरा

## जिल्हा परिषद, नांदेड

### सन २०१०-२०११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी

**परिच्छेद ३.८१५(२) (सन २०११-२०१२)**

| अ. क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | लिलावाची थकबाकी | नांदेड | लघु पाटबंधारे | ३ | २,७५,७६५ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

मस्त्य व्यवसाय ठेकेदाराकडून ठेक्याची रक्कम भरणा करण्यात आलेली नसतांना तलावाचा ठेका देण्यात आला आहे. ही वस्तुस्थिती आहे. गंगापुत्र मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था यांनी (५) तलावाच्या ठेक्याच्या रक्कम भरलेल्या नाहीत. किनवट तालुका मच्छीमार सहकारी संस्था किनवट यांनी (४) तलावाच्या ठेक्याच्या रकम भरलेल्या नाहीत. अडोळी मच्छीमार संस्था अप्पारावपेठ यांनी (१) तलावाच्या ठेक्याची रक्कम भरली नाही. मन्याड गंगापुत्र मच्छीमार संस्था कंधार यांनी (२) तलावाच्या ठेक्याची रक्कम भरली नाही. साईकृपा मच्छीमार संस्था अंबुलगा यांनी (१) तलावाची रक्कम भरणा केली नाही.

उपरोक्त मत्स्यव्यवसाय संस्थांना तलावाच्या ठेक्याची रक्कम ताबडतोब भरणा करण्याबाबत आदेशीत केले आहे. संबंधीतांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आलेला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने मत्स्य तलावाच्या लिलावाची रक्कम भरणा केलेली नसताना तलावाचा ठेका कोणत्या प्राधिकारान्वये देण्यात आला, लिलावाची रक्कम भरणा न केल्याने संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली असा प्रश्न केला त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लिलावाच्या संदर्भातील २.७५ लाख रुपयांची रक्कम जमा झालेली नाही. २.७५ लाखापैकी केवळ १८ हजार रुपयांची वसूली आतापर्यंत झाली आहे. त्यांचे ठेके रद्द केले आहेत आणि त्यांना काळया यादीत टाकावे म्हणून शिफारस केली आहे, असा खुलासा भेटीच्या वेळी केला.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन तातडीने वसुली करावी असे निदेश समितीने देऊनही त्यानुसार कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

चौदा तलावांचे मत्स्य व्यवसाय करणेसाठी सहा मत्स्य संस्थांना दिनांक १ जुलै, २००६ ते ३० जून, २०११ या कालावधीसाठी लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड कार्यालयाचे आदेश क्रमांक १६६४ दिनांक ३१.८.२००६ अन्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले होते.

अनामत रक्कम भरुन करारनामा करणेसाठी संबंधित संस्थाना कळविण्यात आले होते. परंतु संबंधितांनी प्रतिसाद न दिल्यामुळे लघु पाटबंधारे विभाग, जिल्हापरिषद, नांदेड कार्यालयाचे आदेश क्र.१६५४ दिनांक १०.७.२००८ अन्वये ठेका रद्द करण्यात आलेला आहे. सदरील संस्थानी अनामत रक्कम भरुन करारनामा न केल्यामुळे त्यांना मासेमारी करता आली नाही. करारनामा न झाल्याने संस्थांकडून ठेक्याची रक्कम वसुल करता आली नाही. साईकृपा मच्छीमार सहकारी संस्था अंबुलगा

ता.कंधार यांचेकडे सन २००९-१० व २०१०-११ या वर्षाचे ठेका रक्कम रुपये ९००० येणे आहे. थकबाकी आहे. याबाबतीत संबंधीतास लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा नांदेड कार्यालयाचे पत्र क्रमांक ०६, दिनांक २ जानेवारी, २००७ अन्वये थकबाकी भरणेसाठी सूचना देण्यात आली आहे. तसेच साईकृपा मच्छीमार सहकारी संस्था अंबुलगा ता.कंधार यांनी ठेका रद्द केल्यानंतर अनामत रक्कम व मागील तीन वर्षाची ठेकेची रक्कम रुपये १६५०० भरणा केल्यामुळे साईकृपा मच्छीमार सहकारी संस्था यांचे ठेका पुर्ववत करण्यात आले आहे.

संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

साईकृपा मच्छीमार सहकारी संस्था अंबुलगा ता.कंधार यांचेकडे सन २००९-१० व २०१०-११ या वर्षाचे लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड ठेका रक्कम रुपये ९००० येणे आहे. त्यापैकी अनामत रक्कम रुपये ३००० कार्यालयाकडे जमा असुन त्यांच्याकडें फक्त रुपये ६००० थकबाकी आहे. याबाबतीत संबंधितास जिल्हा परिषद, नांदेड यांचे पत्र क्रमांक, ०६ दिनांक २ जानेवारी, २०१५ अन्वये थकबाकी भरणेसाठी सूचना देण्यात आली आहे.

संबंधितांकडून जिल्हा परिषद, नांदेड यांचे पत्र क्रमांक १३०६ दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,सन २०१०-२०११ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी - सदरहू प्रकरणी जबाबदारी निश्चित करून तातडीने वसुली करावी असे निर्देश समितीने देऊनही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत, यावर विभागीय प्रतिनिधींनी या प्रकरणामध्ये ६ हजार रुपयाची वसुली करण्याचा भाग होता. ती वसुली कालच झालेली आहे. आता वसुली नाही, असे समितीसमोर स्पष्ट केले.

## अभिप्राय व शिफारशी

नांदेड जिल्ह्यातील एकूण १३ मत्स्य तलावांच्या लिलावाची रक्कम भरणा केली नसतानाही तलावाचा ठेका देण्यात आला. यामध्ये एकूण रुपये २,७५,७६५ गुंतलेले असून या प्रकरणी चौकशी करावी व जबाबदारी निश्चित करुन गुंतलेल्या रक्कमेची तातडीने वसूली करण्याबाबतचे निदेश समितीने दिले होते. परंतु मत्स्य व्यवसाय करणा-या संस्थांना अनामत रक्कम भरण्यासंदर्भात कळवूनही त्यांनी अनामत रक्कम भरली नसल्यामुळे त्यांचे मासे व्यवसायाचे ठेके रद्द करण्यात आले असल्याचे विभागीय सचिवांचे साक्षीच्या वेळी समितीस सांगण्यात आले. एकूण १३ तलावांची अनामत रक्कम भरणा करण्यात आलेली नव्हती अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेटीच्या वेळी दिली तर विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी १४ तलावांचा ठेका असल्याची माहिती समितीसमोर आली. आक्षेपाधीन एकूण रक्कम रुपये २ लक्ष ७५ हजार ७६५ असताना साक्षीच्या वेळेपर्यंत केवळ मे.साईकृपा मच्छिमार सहकारी संस्था यांनी रुपये १६५००/- एवढ्या रकमेचा भरणा केल्यामुळे त्यांचा ठेका पूर्ववत केल्याचे समितीस सांगण्यात आले.

उर्वरित रक्कम आतापर्यंत संबंधित मच्छिमार संस्थांकडून वसूल न करणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणी संबंधित मच्छिमार संस्थांवर कायदेशिर कारवाई केली आहे किंवा कसे याबाबत देखिल समितीस काहीही अवगत करण्यात आलेले नाही. पुढील वस्तुस्थिती काय राहील किंवा सदरची वसूली कशाप्रकारे करण्यात येईल याची देखील माहिती समितीसमोर सादर केलेली नाही. केवळ रुपये ६,०००/- वसूल केल्याबाबत विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. मात्र उर्वरित सुमारे अडीच लाख रुपये वसूल न होण्याची कारणे विभागीय सचिवांनी समितीला विदित केली नाही. लेखा आक्षेपात नमूद रक्कम वसूल करणे आवश्यक आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी देखील सांगण्यात आले आहे. असे असताना या वसूलीबाबत दिरंगाई किंवा अकार्यक्षमता संबंधित अधिका-याकडून होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. **शासनाचा निधी वर्षानुवर्षे वसूल न होणे ही एक प्रशासकीय कामातील केलेली अकार्यक्षमता आहे. म्हणून संबंधितांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. वसूली करण्यासंदर्भात जे अधिकारी जबाबदार असतील ज्यांनी नियमानुसार कार्यवाही केली नसेल अशा सर्व**

अधिका-यांवर कारवाई करुन त्यांच्याविरुध्द कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे या मच्छिमार संस्था जर काळया यादीत टाकल्या असतील तर त्यांच्याकडून वसूली होणे आवश्यक असल्याने रक्कम त्वरित वसूल करण्यासंदर्भात फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता असल्यास आर्थिकबाब विचारात घेऊन तसा निर्णय देखील घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

प्रकरण सोळा

## जिल्हा परिषद नांदेड

### यशवंत ग्राम समृध्दी योजनामधून खर्च केलेल्या निधीबाबत - पंचायत समिती, नायगाव

**परिच्छेद ४.४५ (सन २०११-२०१२) :**

पंचायत समिती, नायगांव सन २०११-२०१२ च्या लेखा परीक्षणात यशवंत ग्राम समृध्दी योजनेमधून रक्कम रुपये ३,००,०००/- चा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.—

यशवंत ग्राम समृध्दी योजना सन २००५-२००६ बंद झालेली आहे, यशवंत ग्रामसमृध्दी योजनेची अखर्चीत रक्कम तात्काळ शासन खाती भरणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता यशवंत ग्राम समृध्दी योजनेत अनामत या लेखाशिर्षातून रक्कम रुपये ३,००,०००/- नियमबाह्य खर्च दर्शविलेला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

यशवंत ग्राम समृध्दी योजनेमधुन खर्च केले बाबतच्या लेखी आक्षेपा अनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे. या योजने मधुन सन २००५-२००६ या वर्षात सिमेंट रोडचे काम घेण्यात आले होते. सदरील काम मुदतीत पूर्ण झाले असून त्या कामाचे मोजमाप व मुल्यांकन मोजमाप पुस्तीका क्र. ३१४८ च्या पान क्र. २० ते २२ वर नोंदवलेले आहे. व सक्षम तांत्रीक प्राधिका-यानी तपासणी केलेली आहे. परंतु सीसी रोड कामाचे ग्रामपंचायत दरेगांवचे रु.३,००,०००/- चे देयक मार्च २०१२ मध्ये देण्यात आले आहे. ही वस्तु स्थिती आहे.

तथापि ग्रामपंचायत दरेगांव यांनी पत्र दि.३-०२-२००६ अन्वये सी.सी. रोडच्या कामाबाबत ग्रामपंचयातीचा वाद निर्माण झालेला आहे. ग्रामपंचायतील अंतर्गत वाद मिटे पर्यंत कामाचे देयक अदा करण्यात येऊ नये. असे कळविले आहे. म्हणून त्यावेळी देयकची रक्कम अदा करण्यात आलेली नाही. ग्रामपंचायत दरेगांव यांनी सदरील कामा बाबतचा असलेला वाद मिटल्याचे ग्रामपंचायत ठराव क्र .७ दिनांक २२-०२-२०१२ द्वारे पंचायत समितीस कळविले आहे. व सीसी रोड कामाच्या देयकाची मागणी केली आहे. त्यानुसार सन २०११-१२ मध्ये अदाई करण्यात आली आहे. सदर अभिलेखे अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. उक्त साक्षीच्यावेळी समितीने सन २००५-०६ मध्ये योजना बंद झाली होती व जिल्हा परिषदेने सन २०११-१२ मध्ये त्याच योजनेमधील अखर्चित राहिलेली रक्कम खर्च केली आहे, याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या काळात हा खर्च नियमबाहय झालेला आहे, ही वस्तुस्थिती मान्य केली. समितीने पुढे खर्च कोणत्या कामासाठी केला, तत्कालीन बीडीओ कोण होते, शासनाने तुम्हाला खर्च करण्यास परवानगी दिली होती का, योजना बंद झाल्यानंतर ५ वर्षांनी कोणाच्या परवानगीने खर्च केला अशी विचारणा केली. त्यावर तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी, झरीगाव येथील रस्त्याचे ३ लाखाचे काम मंजूर केले होते ग्रामपंचायत झरीगाव येथील ग्रामपंचायतीमध्ये वाद होता. त्यावेळी त्यांचा निधी पंचायत समितीकडे जमा होता. वाद मिटल्यानंतर त्यांनी तशा प्रकारचे पत्र दिलेले संचिकेमध्ये आहे. त्यांचा निधी शासनाकडे परत न करता पंचायत समितीकडे ठेवण्यात आला होता. त्या ग्रामपंचातीचे काम त्याच वर्षात झाले होते. तसे लेखी पत्र बीडीओ यांच्याकडे आहे. लेखाधिकारी आणि जेई यांनीही खात्री केली होती अशी समितीपुढे माहिती दिली. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी करून त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा आणि समितीला माहिती सादर करावी असे सुचित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणी समितीने दिलेल्या निदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीशी प्रकरणाच्या स्वरुपाशी शासन सहमत आहे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती नायगाव अंतर्गत अहवाल वर्षात यशवंत ग्राम समृध्दी योजनेमधून मंजूर निधी हा दोन वर्षांत खर्च करणे आवश्यक असते. दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर सदरील खर्च करण्यात आलेला असून यास जबाबदार असलेले कर्मचारी यांची एक तात्पुरत्या स्वरुपात एक वेतनवाढ थांबविण्यात आली आहे व गटविकास अधिकारी श्री. के.आर. गवळी दोषी आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेसाठी विहित कार्यपध्दतीनुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडे दिनांक २३-२-२०१६ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येईल.

## चौकशी अहवाल

महाराष्ट्रातील पंचायतीराज संस्थांच्या लेख्यावरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल वर्ष २०११-१२ मधील परि. क्र. ४.४५ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे. पंचायत समिती, नायगांव खै.सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणात यशवंत ग्राम समृध्दी योजनेमधून रक्कम रु. तीन लक्षचा खर्च करण्यात आलेला आहे. या संदर्भात लेखा परिक्षण केले असता सदरील योजना ही सन २००५-०६ या वर्षात बंद झालेली असल्याचे आढळून आले. त्यामुळे सदरील निधी शासनास परत न करता ग्रामपंचायत दरेगाव येथे रु. तीन लक्ष चा खर्च केलेला असल्याचे निदर्शनास आले. प्रत्यक्षात सदरील काम हे भौतिकदृष्टया केलेले असल्याची नोंद मोजमात पुस्तिका क्र.१४८, पान क्र. २० व २२ वर नोंदविलेले आहे व सक्षम प्राधिकारी यांनी त्यांची तपासणी केलेली आहे. परंतु सी.सी.रोड कामाचे ग्राम पंचायत दरे गावचे रु. तीन लक्षचे देयक मार्च, २०१२ मध्ये देण्यात आलेले आहेत. ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात संबंधीत ग्रामपंचायतीस विचारणा केली असता ग्राम पंचायत दरेगाव येथे सदर कामा संदर्भात वाद असल्याकामाने सदरील रक्कमेची मागणी केली नसल्याचे म्हणणे आहे. तथापि, सदरील रु. तीन लक्ष खर्च हा नियमबाहय केलेला आहे. यास खालील दर्शविलेले अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून येतात.

१) श्री.के.आर.गवळी, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती नायगांव (सध्या सेवा निवृत्त).

२) श्री.व्हि.एस.गायकवाड, तत्कालीन सहाय्यक लेखाधिकारी पंचायत समिती नायगांव (सध्या कार्यरत पंचायत समिती हदगांव).

**निष्कर्ष :-**

सदर प्रकरणात उपरोक्त दर्शविण्यात आलेले क्रमांक १ व २ अधिकारी व कर्मचारी दोषी असल्याचे स्पष्ट होते करीता उपरोक्त प्रमाणे चौकशी अहवाल सादर करण्यात येत आहे.

## अभिप्राय व शिफारशी

यशवंत ग्राम समृध्दी योजना सन २००५-२००६ मध्ये बंद झालेली आहे. सदरहू योजनेचा अखर्चित निधी तात्काळ शासन खाती जमा करणे आवश्यक असताना यशवंत ग्राम समृध्दी योजनेत अनामत या लेखाशिर्षातून रक्कम रुपये ३ लक्ष नियमबाह्य झाल्याचे प्रस्तुत प्रकरणात समितीच्या निदर्शनास आले. पंचायत समिती नायगांव अंतर्गत ग्रामपंचायत दरेगाव येथे सदरील रुपये तीन लक्ष खर्च नियमबाह्य करण्यात तत्कालिन गट विकास अधिकारी श्री.के.आर.गवळी व तत्कालिन सहाय्यक लेखाधिकारी श्री.व्ही.एस.गायकवाड दोषी आढळून आले असल्याचे तसेच त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आल्याचे तसेच विभागीय आयुक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालावरुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असे शासनाने लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत नमुद करण्यात आले आहे.

वस्तुतः संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचे लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये केवळ दोन महिन्यांचे लेखापरिक्षणाचा अंतर्भाव केलेला असतो. उर्वरित १० महिन्यांचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालयाकडून केले जात नसते. **योजनेतील अखर्चित निधी शासनाच्या खात्यात जमा होण्याकरिता यशवंत ग्राम समृध्दी या बंद केलेल्या योजनेतील असा अखर्चित निधी किती व त्यापैकी शासन खाती जमा होणे आवश्यक निधी किती आहे याचा आढावा शासनाने घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. प्रस्तुत प्रकरणातील दोषी अधिका-यांविरुध्द प्रस्तावित विभागीय चौकशी देखील विहित मुदतीत पुर्ण करण्यात यावी व तत्संबंधीत अंतिम अहवाल समितीस लवकरात लवकर पाठविण्यात यावा अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सतरा

## जिल्हा परिषद, नांदेड

### पंचायत समित्यातील इतर नियमबाहय, पंचायत समित्याकडील रोखवही व बँक पासबुक यांच्या शिल्लकेतील तफावतीबाबत

**(परिच्छेद ४.३९२) (१५) (सन २०११-१२)**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता १९६८ नियम ५७ प्रमाणे नमुना ७ मध्ये ठेवलेल्या रोखवहीतील दरमहा अखेर येणा-या शिल्लकेची पडताळणी बँकेच्या पासबुकाच्या शिल्लकेबरोबर करावयाची आहे. येणारा फरक हा ज्या काही चुकांमुळे येईल त्या चुका दुरूस्त करण्यासाठी किंवा अन्य प्रकारे फरक काढून टाकण्यासाठी सत्वर आणि प्रभावी उपाययोजना करावयाची आहे. तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ वटविण्यात न आलेले धनोदश गट विकास अधिकारी यांच्या वैयक्तिक निदर्शनास आणणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकारे केलेल्या बँकमेळ विवरणपत्रची एक प्रत मासिक लेखासोबत जोडणे आवश्यक आहेत. तथापि, खालील नमुद केलेल्या पंचायत समित्यानी फरकाचे विवरणपत्र तयार केले असूनही त्यात दिसुन येत असलेली तफावत दुर करण्याबाबत काहीही प्रयत्न केल्याचे आढळले नाही.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | पासबुक व रोखवही यांच्या शिल्लकेतील तफावतीची रक्कम रुपये | निधीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १५ | नांदेड | लोहा | १३ | १,१७,३४,२९०/-<br>६,४२२/-<br>१,१७,८२,७७९/-<br>१३,०४,९३५/- | रोखवही व बँक पासबुकातील फरक |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समित्याकडील रोखवही व बँकपासबूक यांच्या शिल्लकेतील तफावती बाबतच्या लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सादर करण्यात आला.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता १९६८ नियम ५७ प्रमाणे नमुना ७ मध्ये रोखवही ठेवण्यात आलेली असून दरमहा अखेर येणा-या शिल्लकेची पडताळणी बँकेच्या पासबुक प्रमाणे केलेली असून त्यामधील पुढील प्रमाणे फरक काढलेला आहे. रोखवही व बँक पासबुक यांच्या शिल्लकेतील तफावती बाबत कार्यवाही न केलेल्या सबंधितास नोटीस देण्यात येवुन त्यांचा खुलासा मागवण्यात आला आहे.

| सामान्य रोजकिर्दीचा प्रकार | ताळमेळ पुर्ण झाल्याचा दिनांक |
|---|---|
| जिल्हा निधी | ३१-१०-२००९ पर्यत पुर्ण केले असून उर्वरीत काम प्रगती पथावर आहे. |
| अभिकरण योजना | ३१-१०-२००९ पर्यत पुर्ण केले असून उर्वरीत काम प्रगती पथावर आहे. |
| विशेष निधी | ३०-०९-२००७ पर्यत पुर्ण केले असून उर्वरीत काम प्रगती पथावर आहे |
| १३ वा वित्त आयोग | ३१-०३-२०११ |
| प स उपकर | ३०-११-२०११ पर्यत पुर्ण केले असून उर्वरीत काम प्रगती पथावर आहे |
| यशवंत ग्राम समृधी योजना | ३०-०४-२००६ (३०-०४-२००६ नंतर खर्च नाही.) |

२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता १९६८ चे नियम (६३) प्रमाणे बँक ताळमेळ घेण्यात आलेला आहे.

३) बँकेकडुन सर्व लेख्याचे बँक स्क्राल उपलब्ध करुन घेण्यात आलेले आहेत .

४) सर्वसाधारण रोकडवहीत न वटलेले धनादेश नमुद केलेले आहेत.

संबंधित कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना अद्यापपावेतो सन २०११-१२ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण न केल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र. १०८१ दि.२४-०८-२०१५ अन्वये ताळमेळ अद्यावत करणे संबंधी आदेशीत करण्यात आले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीच्या सद्यस्थितीत ताळमेळ पूर्ण झाला आहे का, या प्रश्नास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा निधीचा दिनांक ३१-३-२००९ पर्यंत ताळमेळ झालेला आहे. अभिकरणाचा, १३ व्या वित्त आयोगाचा ३१-३-२०११ पर्यंत ताळमेळ झालेला असून उप कराचा ३१-११-२०११ पर्यंत ताळमेळ पूर्ण झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. विशेषतः पंचायत समिती लोहामध्ये मोठया प्रमाणात ताळमेळ घालण्याचे काम अपूर्ण आहे, असे उत्तर दिले.

समितीने प्रस्तुत प्रकरणी पंचायत समितीचे रेकॉर्ड दोन वर्षांपासून ऑडीटसाठी उपलब्ध नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी संबंधित गट विकास अधिका-यांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून द्यावीत. व या प्रकरणी जी काही कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे ती करावी असे सुचित केले त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा व वित्त अधिका-यांच्या माध्यमातून एखाद्या अधिकारी/कर्मचा-याला पाठवून आवश्यक ते रेकॉर्ड ताब्यात घेऊन ते लेखा परीक्षणासाठी सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणी दोन वर्षांपासून लेखा परिक्षणासाठी अभिलेख उपलब्ध करुन न देणा-या संबंधित गटविकास अधिका-यावर निलंबनाची कार्यवाही प्रस्तावित करावी. तसेच सदर प्रकरणी जी काही कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे ती करावी असे निर्देश समितीने दिलेले आहेत, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? तसेच समितीस चौकशी अहवाल का पाठविण्यात आले नाहीत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दोन वर्षांपासून पंचायत समिती, लोहा येथील गटविकास अधिकारी यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. या प्रकरणाची चौकशी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केली असून पंचायत राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार श्री. रंगवाळ, तत्कालीन गटविकास अधिकारी यांना मा. विभागीय आयुक्त यांच्याकडून दि. ०६/०१/२०१६ रोजी नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. संबंधितांनी दि. ०६/०२/२०१६ रोजी खुलासा सादर केला असून तो समाधानकारक नसल्यामुळे संबंधितास निलंबित करण्यासाठी दि.२३/०२/२०१६ रोजी मा.विभागीय आयुक्त यांना प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

या प्रकरणी पंचायत समिती, लोहा येथील श्री.बी.एस.मुंढे,क.स.व बी.जी.मुंढे, क.स. यांची प्रत्येकी एक वेतनवाढ रोखण्यात आली असून त्यांना अनुक्रमे रुपये २५,०००/- व रु. ३००/- दंड आकारण्यात आलेला आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येईल.

**चौकशी अहवाल**

समितीने निदेश देवूनही प्रस्तुत प्रकरणातील चौकशी अहवाल समितीस सादर करण्यात आला नाही.

**अभिप्राय व शिफारशी**

राज्यातील सर्व पंचायत समित्यांमध्ये नमुना नं.७ मध्ये ठेवलेल्या रोखवहीतील महिन्याच्या अखेरीस येणारी शिल्लक आणि बँकेच्या पासबुकातील शिल्लक याची पडताळणी केली जाते. यामध्ये काही फरक आढळल्यास तो ज्या काही चुकांमुळे येईल त्या चुका दुरस्त करण्यासाठी सत्वर आणि प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणी लोहा पंचायत समितीने अशा प्रकारची तफावत दूर करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. प्रस्तुत प्रकरणातील दोषी गटविकास अधिका-यांवर निलंबनाची कार्यवाही करुन त्याचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांकडे दिनांक ६/२/२०१६ रोजी पाठविला असून विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येईल असे समितीला लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत नमुद केले आहे. **याबाबत समिती समाधान व्यक्त करीत असून सदर दोषी गटविकास अधिका-यांवरील विभागीय चौकशी विहीत कालमर्यादेत पूर्ण करुन त्याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. त्याचप्रमाणे समितीने विभागीय सचिवांची साक्ष होईपर्यंत २००९ पर्यंत मासिक शिल्लकीच्या फरकाचा ताळमेळ घेण्याचे काम पूर्ण झालेले होते. उर्वरित ७ वर्षांच्या ताळमेळाचे काम प्रलंबित असणे म्हणजे नियमाप्रमाणे केलेली सत्वर व प्रभावी उपाययोजना नव्हे. याकरिता प्रस्तुत प्रकरणातील ताळमेळाचे काम चालू महिन्यापर्यंत अद्ययावत करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण अठरा

## जिल्हा परिषद, नांदेड

### अपूर्ण स्थितीतील बांधकामांबाबत

**परिच्छेद ४.३९४ (५३ ते ५७) (सन २०११-१२)**

**(१) अपूर्ण स्थितीतील बांधकामे, ४.३९४ (५३) :-**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना, विहिरी, खेडयातील रस्ते, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादीसारख्या स्थानिक विकासाच्या व सामूहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थसहाय्य देण्यात येते. अर्थसहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढयाच रक्कमेचे बांधकाम पूर्ण करुन उर्वरीत काम पुर्ण केले जात नाही. अशा अपुर्णावस्थेत राहिलेली बांधकामे वर्षानुवर्षे पडुन असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजना अंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपुर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल, लेखापरीक्षणाच्या वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशाप्रकारे अपूर्णावस्थेत पडून असलेल्या ३१ मार्च २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे.—

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ५३ | नांदेड | हदगाव | ९ | ८०,५३,०००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

अपुर्ण स्थितीतील बांधकामाच्या लेखा आक्षेपा अनुषंगाने पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.—

विविध योजना अंतर्गत प्राप्त निधी प्रमाणे बांधकामे केली जातात.त्यातील काही कामे अपुर्ण स्थीतीत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. तथापि सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये पंचायत समिती हदगांव मधील ३७ कामे अपुर्ण होती त्यापैकी २८ कामे पुर्ण झालेली आहेत. पुर्णत्वाचे प्रमाणपत्र अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

जी कामे अपुर्ण आहेत त्या ग्रामपंचायतीच्या सचिवांना नोटीसा देऊन खुलासा मागवुन संबंधिताची एक वार्षीक वेतनवाढ तात्पुरती बंद करण्यात आली आहे. त्या संबंधित आदेशाची प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे. अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी मुदत वाढीची परवानगी मागीतली आहे. परवानगी मिळताच अपुर्ण कामे पुर्ण करण्यात येतील.

**(२) अपूर्ण स्थितीतील बांधकामे, ४.३९४ (५४)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना, विहिरी, खेडयातील रस्ते, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादीसारख्या स्थानिक विकासाच्या व सामूहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थसहाय्य देण्यात येते. अर्थसहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढयाच रक्कमेचे बांधकाम पूर्ण करुन उर्वरीत काम पुर्ण केले जात नाही. अशा अपुर्णावस्थेत राहिलेली बांधकामे वर्षानुवर्षे पडुन असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे

फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजना अंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपुर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल, लेखापरीक्षणाच्या वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशाप्रकारे अपूर्णावस्थेत पडून असलेल्या ३१ मार्च २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे.—

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | कंधार | १३ | १३,०५,०००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विविध योजनेअंतर्गत प्राप्त निधी प्रमाणे बांधकामे केली जातात. त्यातील काही कामे अपुर्ण स्थितीत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. तथापि सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये पंचायत समिती, कंधार मधील ८ कामे अपुर्ण होती त्यापैकी २ कामे पुर्ण झालेली आहे. अपूर्ण कामे पुर्ण करण्यासाठी मुदतवाढीची परवानगी जिल्हा वार्षीक नियोजन समितीला पत्र क्रंमाक जा.क्र. जिपना/ मबावि/ एबाविसेयो/सांख्यिकी/२११/१५, दिंनाक २-३-२०१५ अन्वये मागितली आहे. परवानगी प्राप्ती नंतर सदर कामे पूर्ण करण्यात येईल. संबंधित अभिलेखे अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

अपुर्ण बांधकामाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | गावाचे नाव | मंजूर वर्ष | अदायी रक्कम | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी बांधकाम | शिशी बु. | २०१०-११ | १४०००० | लेंटल लेव्हल |
| २ | अंगणवाडी बांधकाम | येलूर | २०१०-११ | १४०००० | सुरु नाही |
| ३ | अंगणवाडी बांधकाम | जयरामतांडा | २०१०-११ | १९०००० | छतापर्यंत |
| ४ | अंगणवाडी बांधकाम | पानशेवडी | २०१०-११ | २००००० | लेंटल लेव्हल |
| ५ | अंगणवाडी बांधकाम | काटकंळबा | २०१०-११ | निंरक | सुरु नाही |
| ६ | अंगणवाडी बांधकाम | शिरुर | २०१०-११ | २२०००० | छत लेव्हल |

**(३) अपूर्ण स्थितीतील बांधकामे, ४.३९४ (५५)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना, विहिरी, खेडयातील रस्ते, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादीसारख्या स्थानिक विकासाच्या व सामूहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थसहाय्य देण्यात येते. अर्थसहाय्याच्या रकमेमधे जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या अभिरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढयाच रक्कमेचे बांधकाम पूर्ण करुन उर्वरीत काम पुर्ण केले जात नाही. अशा अपुर्णावस्थेत राहिलेली बांधकामे वर्षानुवर्षे पडुन असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजना अंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपुर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल, लेखापरीक्षणाच्या वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशाप्रकारे अपूर्णावस्थेत पडून असलेल्या ३१ मार्च २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे.–

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ५५ | नांदेड | किनवट | १३ | ५६,००,००० |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विविध योजना व बांधकामासाठी शासनाकडून प्राप्त निधी नुसार सदर कामे त्याच वर्षात पुर्ण होणे आवश्यक होते. परंतू ती अपुर्ण आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणानंतर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

सन २०११-१२ मधील २६ अपुर्ण बांधकामांपैकी १५ कामे पुर्ण झाली असून त्यांचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र अवलोकनार्थ उपलब्ध आहे. उर्वरित ११ कामे अपुर्ण आहेत. अपुर्ण कामे असलेल्या ग्रामपंचायतीच्या सचिवांना नोटिसा देऊन खुलासा मागविण्यात येऊन संबधिताची एक वार्षिक वेतन वाढ बंद करण्यात आली आहे. संबधिताच्या शास्तीच्या आदेशाची प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे. अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी मुदतवाढीची परवानगी मागीतलेली आहे. परवानगी मिळताच अपुर्ण कामे पुर्ण करण्यात येतील.

**(४) अपूर्ण स्थितीतील बांधकामे, ४.३९४ (५६)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना, विहिरी, खेडयातील रस्ते, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादीसारख्या स्थानिक विकासाच्या व सामूहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थसहाय्य देण्यात येते. अर्थसहाय्याच्या रकमेमधे जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या अभिरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढयाच रक्कमेचे बांधकाम पूर्ण करुन उर्वरीत काम पुर्ण केले जात नाही. अशा अपुर्णावस्थेत राहिलेली बांधकामे वर्षानुवर्षे पडुन असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजना अंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपुर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल, लेखापरीक्षणाच्या वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशाप्रकारे अपूर्णावस्थेत पडून असलेल्या ३१ मार्च २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ५६ | नांदेड | बिलोली | ९ | २३,४२,०००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विविध योजना व बांधकामासाठी शासनाकडून प्राप्त निधीनुसार सदर कामे त्याच वर्षात पूर्ण होणे आवश्यक होते, परंतू ती अपुर्ण आहे ही वस्तुस्थिती आहे, तथापि सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणानंतर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

सन २०११-१२ मधील १३ अपूर्ण बांधकामांपैकी ०३ कामे पुर्ण झालेली असून त्यांचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र अवलोकनार्थ उपलब्ध आहे. उर्वरीत १० कामे अपुर्ण आहेत.

अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी मुदतवाढीची परवानगी मागितलेली आहे त्याबाबतचे पत्र अवलोकनार्थ उपलब्ध आहे. परवानगी मिळताच अपुर्ण कामे पुर्ण करण्यात येतील.

**(५) अपूर्ण स्थितीतील बांधकामे, ४.३९४ (५७)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना, विहिरी, खेडयातील रस्ते, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादीसारख्या स्थानिक विकासाच्या व सामूहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थसहाय्य देण्यात येते. अर्थसहाय्याच्या रकमेमधे जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या अभिरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढयाच रक्कमेचे बांधकाम पूर्ण करुन उर्वरीत काम पुर्ण केले जात नाही. अशा अपुर्णावस्थेत राहिलेली बांधकामे वर्षानुवर्षे पडुन असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजना अंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपुर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल, लेखापरीक्षणाच्या वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशाप्रकारे अपूर्णावस्थेत पडून असलेल्या ३१ मार्च २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ५७ | नांदेड | लोहा | २० | १८०००००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

अपुर्ण स्थितीतील बांधकामे सन २०११-१२ च्या लेखाआक्षेपाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

लेखा परिक्षणात दर्शविण्यात आलेल्या बांधकामाची सद्यस्थितीची माहीती सादर करणे बाबत संबधित अधिकारी व कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देवुन खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच सदर संबंधित अभिलेखे तत्परतेने उपलब्ध करुन देणे बाबत कळविले आहे. प्राप्त झालेले अभिलेखे अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने पंचायत समिती हदगाव, कंधार, किनवट, बिलोली व लोहा यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर अपूर्ण कामे होती. पंचायत समिती हदगावकडे ३७ कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, ही कामे विहित मुदतीत पूर्ण करून न घेण्यास कोण जबाबदार आहे व पंचायत समिती हदगाव यांच्याकडे अपूर्ण असलेल्या कामांची सद्यःस्थिती काय आहे असा प्रश्न केला. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अहवाल वर्षात अपूर्ण असलेल्या ३७ पैकी २८ कामे पूर्ण झालेली असून कामाच्या पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. उर्वरित अपूर्ण कामांचे २८ लाख ५३ हजार रुपये शिल्लक आहेत. पंचायत समितीकडे अपूर्ण असलेल्या कामांमध्ये गुंतलेल्या रकमा मोठ्या आहेत. अहवाल वर्षात हदगाव पंचायत समितीमध्ये अपूर्ण असलेल्या कामांमध्ये ८० लाख ५३ हजार रुपये इतकी रक्कम गुंतलेली, कंधार पंचायत समिती अंतर्गत ८ कामे अपूर्ण व त्यामध्ये १३ लाख ५ हजार रुपये किनवटमध्ये २६ कामे अपूर्ण व त्यामध्ये ५६ लाख रुपये बिलोली पंचायत समिती अंतर्गत १३ कामे अपूर्ण व त्यामध्ये २३ लाख ४२ हजार रुपये व लोहा पंचायत समिती अंतर्गत १८ कामे अपूर्ण होती व त्यामध्ये १८ लाख रुपये रक्कम गुंतलेली होती.

मुख्य कार्यकारी अधिका-यांनी अहवाल वर्षात अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने मोहीम हाती घेऊन, ही कामे पूर्ण करावीत. कारण अपूर्ण कामांवर खर्च करण्यात आलेली रक्कम कोट्यवधी रुपयांची आहे. त्यामुळे अपूर्ण असलेली कामे सहा महिन्यांत पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. ज्यांच्याकडून विहित मुदतीत कामे पूर्ण केली जाणार नाहीत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. तसेच संबंधित एजन्सी वा ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून त्यांना कामे देऊ नयेत. असे निदेश समितीने प्रस्तुत प्रकरणी दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अहवाल वर्षातील अपूर्ण असलेली कामे मोहिम हाती घेवून पूर्ण करावीत. विहित मुदतीत कामे पूर्ण न करणा-यांवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच संबंधित एजन्सी वा ठेकेदाराला काळया यादीत टाकून त्यांना कामे देऊ नयेत असे निर्देश समितीने दिलेले आहेत, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच समितीस चौकशी अहवाल का पाठविण्यात आले नाहीत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती किनवटची २६ अपुर्ण कामांपैकी १५ कामे पुर्ण झाली असून ११ कामे प्रगती पथावर आहेत. पंचायत समिती बिलोलीची १३ अपुर्ण कामांपैकी १३ कामे पुर्ण झाली आहेत. पंचायत समिती हदगाव ३७ अपुर्ण कामांपैकी २८ कामे पुर्ण झाली असुन ०९ कामे प्रगती पथावर आहेत. पंचायत समिती कंधार ०८ अपुर्ण कामांपैकी ०२ कामे पुर्ण झाली असुन ०६ कामे प्रगती पथावर आहेत. पंचायत समिती लोहा, येथील २२ अपुर्ण कामांपैकी १८ कामे पुर्ण झाली असून ४ कामे प्रगतीपथावर आहेत.

उर्वरित अपुर्ण कामे पंचायत समिती निहाय माहे मार्च, २०१६ अखेर पुर्ण करण्यात येत आहेत. सदरील कामे अहवाल वर्षात पुर्ण न झाल्यामुळे अखर्चित निधी खर्च करण्याच्या परवानगीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. शासनाने माहे मार्च, २०१६ अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी दिल्याने सदरील कामे माहे मार्च, २०१६ अखेर पुर्ण करण्यात येत आहेत. सदरील कामे अपुर्ण राहण्यास जबाबदार ग्रामसेवकांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आलेली आहे. सदरील कामे ही ग्रामपंचायतीकडून करवून घेण्यात येत असल्याने ग्रामपंचायतींना काळया यादीत टाकण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदरील प्रकरणांचा चौकशी अहवाल पाठविण्यास विलंब झाला आहे याबद्दल क्षमापन असावे. तसेच प्रकरणांचा चौकशी अहवाल सादर करण्यात येत आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अहवाल वर्षातील अपूर्ण असलेली कामे मोहिम हाती घेऊन पूर्ण करावीत. विहित मुदतीत कामे पूर्ण न करणा-यांवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच संबंधित एजन्सी वा ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून त्यांना कामे देऊ नयेत असे निर्देश समितीने दिले होते. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच समितीस चौकशी अहवाल का पाठविण्यात आले नाहीत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती, किनवट येथील २६ अपूर्ण कामांपैकी १५ कामे पूर्ण झाली असून, ११ कामे प्रगतीपथावर आहेत. पंचायत समिती, बिलोली येथील १३ अपूर्ण कामांपैकी १३ कामे पूर्ण झाली आहेत. पंचायत समिती, हदगांव येथील ३७ कामांपैकी २८ कामे पूर्ण झाली असून ९ कामे प्रगतीपथावर आहेत. पंचायत समिती, कंधार येथील ८ अपूर्ण कामांपैकी २ कामे पूर्ण झाली असून, ६ कामे प्रगतीपथावर आहेत. पंचायत समिती, लोहा येथील २२ अपूर्ण कामांपैकी १८ कामे पूर्ण झाली असून, ४ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित अपूर्ण कामे पंचायत समितीनिहाय माहे मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्यात येत आहेत. सदरील कामे अहवाल वर्षात पूर्ण न झाल्यामुळे अखर्चित निधी खर्च करण्याच्या परवानगीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सदरील कामे अपूर्ण राहण्यास जबाबदार असणा-या ग्रामसेवकांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आलेली आहे, असे समितीस साक्षीच्या वेळी सांगितले.

## अभिप्राय व शिफारशी

नांदेड जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी पंचायत समिती, किनवट २६, बिलोली १३, हदगांव ३७, कंधार ८, व लोहा येथील २२ अपूर्ण बांधकामांमध्ये ८०,५३,०००/- रुपयांचा निधी निरर्थक अडकून पडला असल्याचा आक्षेप लेखापरिक्षकांनी घेतलेला आहे. सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणाचेवेळी अपूर्ण आढळलेल्या १०६ कामांपैकी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीपर्यंत काही कामे पूर्ण झाल्याची तर विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी ७६ कामे पूर्ण व उर्वरित ३० कामे प्रगती पथावर

असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासनाचा निधी ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना, विहिरी (निष्फळ/सुरु झालेल्या परंतू अपूर्ण), खेडयातील रस्ते, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादी स्थानिक व सामूहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत केलेल्या तरतुदीतून देण्यात येतो. अर्थसहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) एकत्रित करुन त्यातून सदर बांधकामांना ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते. परंतू अशा कामांचे बांधकाम शासनाच्या अर्थसहाय्यातून पूर्ण केले जात नाही. वर्षानुवर्षे अपूर्ण बांधकामे पडून असल्यामुळे जनतेला विकास योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागते. याकरिता जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी कामे अपूर्ण अवस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. सदर कामे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येत असून या अपूर्ण कामास जबाबदार असणा-या ग्रामसेवकांची प्रत्येकी एक वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आल्यामुळे समिती याबाबत समाधान व्यक्त करते.

प्रस्तुत प्रकरणातील नांदेड जिल्हा परिषदे अंतर्गत अपूर्ण बांधकामांचा अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदरहू अखर्चित निधी माहे मार्च, २०१६ अखेर खर्च करण्याची परवानगी शासनाने दिली असून उक्त कालावधीत नांदेड जिल्हा परिषदेकडून सर्व अपूर्ण कामे पूर्ण होतील अशी अपेक्षा समिती व्यक्त करते. **त्याचबरोबर वरील सर्व अपूर्ण स्थितीतील बांधकामे व प्रगती पथावर असलेली बांधकामे मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्यात आल्याबाबतचा पंचायत समिती निहाय व प्रकरणनिहाय वस्तुनिष्ठ अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण एकोणीस

# जिल्हा परिषद, नांदेड

## विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकीबाबत

**परिच्छेद ४.३९६ (२२ ते ३२) (सन २०११-१२)**

**(१) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (२२)**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये ७,६२,४३,९८२/- थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २२ | नांदेड | हदगाव | ९ | ८०,५३,०००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकीच्या लेखा आक्षेपा अनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची वसुली बाबत पंचायत समिती स्तरावर अद्यावत माहिती ठेवणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती आहे. तथापि सन २०११-१२ च्या लेखा आक्षेपानंतर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. पंचायत समितीकडे वसुली थकबाकीची नोंद वही अद्यावत ठेवली असून त्यांचे ग्रामपंचायत निहाय नोंदी घेतल्या आहेत.सन २०११-१२ ची नोंदवहिची छांयाकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे. रुपये १८,५५,०००/- थकबाकी पैकी रुपये १३,४६,५००/- वसुल करुन कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. थकबाकीस जबाबदार असलेल्या संबंधिताकडुन या बाबत चा खुलासा मागवुन एक वार्षीक वेतन वाढ तात्पुरती बंद करण्यात आली आहे. आदेशाची प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

उर्वरीत थकबाकीची वसुली करण्यात येत आहे. वसुली केलेल्या रक्कमेचे विवरणपत्र अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

**(२) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (२३)**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते.

सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये ७,६२,४३,९८२/- थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २३ | नांदेड | कंधार | ९ | ८८,२४,५८६/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकीच्या लेखा आक्षेप अनुषंगाने पुढील प्रमाणे सविनय खुलासा सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ५० नुसार न.न. ८ व ९ मध्ये नोंदवही ठेवण्यात आली नाही ही वस्तुस्थिती आहे. तथापि विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची वसुली बाबत पंचायत समिती स्तरावर अद्यावत नोंदवही ठेवण्यात आली आहे. नोंदवहीची छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे. लेखा परिक्षणात शिल्लक थकबाकी ८८,२४,५८६/- एवढी दर्शविली आहे. परंतु वास्तविक थकबाकी परिगणित केल्यानंतर ४८,१३,७८४/- एवढी येते. शिल्लक थकबाकी रक्कमेपैकी रु.२,७०,८४६/- इतकी रक्कम वसुली झाली असून उर्वरित रक्कमेची वसूली करण्याची कार्यवाही सुरु आहे.

### (३) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (२४)

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक अर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये ७,६२,४३,९८२/- थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २४ | नांदेड | किनवट | ९ | १३,१२,१७५/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्ती थकबाकी बाबत लेखा आक्षेपा अनुषंगाने पुढीलप्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणाच्या वेळी विद्युतपंप व हातपंप दुरूस्ती बाबत पंचायत समिती स्तरावर अद्यावत नोंद वही ठेवण्यात आलेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. सन २०११-१२ च्या लेखा आक्षेपानंतर पंचायत समिती कडील वसुलीची थकबाकी नोंदवही अद्यावत ठेवण्यात आलेली असून त्यांच्या ग्राम पंचायत निहाय नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. अद्ययावत नोंदी असलेल्या नोंदवही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

सन २०१२-१३ मध्ये ग्राम पंचायतींना अनुज्ञेय असलेल्या अनुदानातुन रक्कम रुपये ८,६३,७६९/- वसुली करुन कार्यकारी अभियंता (पापु) जि.प.नांदेड यांना पाठविण्यात आलेली आहे. थकबाकी वसुल न केलेल्या संबंधीताकडुन या बाबतचा खुलासा मागविण्यात येऊन एक वेतनवाढ तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

## (४) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (२५)

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये ७,६२,४३,९८२/- थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २५ | नांदेड | बिलोली | ८ | १८,३१,१३६/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी बाबतच्या लेखा आक्षेपा अनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणाच्या वेळी विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीबाबत पंचायत समिती स्तरावर अद्यावत नोंदवही ठेवण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. सन २०११-१२ च्या लेखा आक्षेपानंतर पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

पंचायत समितीकडील वसूलीची थकबाकी नोंदवही अद्यावत ठेवण्यात आलेली असून त्याच्यात ग्रामपंचायत निहाय नोंदी घेण्यात आलेल्या आहेत, सन २०१२-१३ मध्ये ग्रामपंचायतीला अनुदेय असलेल्या रक्कम रु.१८,३१,१३६/- पैकी रु.१,०८,६७९/ - प्रमाणक क्र.२३ दि.२९.०६.२०१५ अन्वये वसूल करुन कार्यकारी अभियंता (पापू), जिल्हा परिषद नांदेड यांना पाठविण्यात आलेले आहे.

## (५) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (२६)

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये ७,६२,४३,९८२/- थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २६ | नांदेड | देगलूर | ७ | २३,२०,९१४/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युत पंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी बाबतच्या लेखा आक्षेप अनुषंगाने पुढीलप्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे. विदयुतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रं. GWO/१४७९/ ५६६०/३३७९/ ३६ दिनांक ३१.१०.१९७९ अन्वये शासनाने जिल्हापरिषदेकडे सोपविली आहे. तसेच शासन निर्णय क्रं ३३०७/प्र.क्र/२६/पा.पु.-१५ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक ०७/०४/२००८ नुसार दिलेल्या निर्देशानुसार ग्रामपंचायतीना देण्यात येणा-या अनुदानातुन जिल्हापरिषदाकडे At Source कपात करुन ते जिल्हनिधी या योजनेमध्ये समाविष्ट करावे अशा सुचना आहेत. पंचायत समिती स्तरावर हातपंप विदयुतपंप मागणी व वसुली बाबत नोंदवही ठेवण्यात आलेली असून ती अदयावत आहे. आक्षेपात नमुद केलेले थकबाकी वसुली करीता ग्रामसेवकाना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. थकबाकी मधील शिल्लक रक्कम २३२०९१४/- पैकी रु ४२५०६७/- रक्कमेची वसुली ग्रामपंचायतीकडुन करण्यात आलेली आहे. व रुपये १८९५८४७/- वसुली करीता ग्रामसेवकाना हातपंप थकित वसुलीकरण्याकरीता नोटीस देण्यात आलेली आहे.

**(६) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (२७)**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक अर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये **७,६२,४३,९८२/-** थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २७ | नांदेड | लोहा | ९ | ३३,३९,५००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युत पंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकीच्या लेखा अक्षेपाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता १९६८ नियम ५० प्रमाणे मागणी व वसुलीची थकबाकीची नोंदवही ठेवण्यात आलेली नव्हती ही वस्तुस्थिती होती. तथापि सदरची नोदंवही अद्यावत करुन आवलोकनार्थ उपलब्ध आहे.

२. हातपंप दुरूस्ती बाबतची वर्गणी सन २०१२-२०१३ अखेर रूपये ३३,३९,५००/- थकबाकी होती. त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर रू.१६,३१,८४२/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| ९७६०५० | ०१/१०/२०१३ | ७१,७३२ |
| ४३८७६८ | ३०/०३/२०१४ | २,१७,५५१ |
| ५२३३७६ | २३/०९/२०१४ | १३,४२,५५९ |
| | एकुण | १६,३१,८४२ |

तसेच उर्वरीत वसुली करणे बाबत या कार्यालयाचे पत्र क्र १८२० दिनांक २४.०८.२०१५ नुसार विस्तार अधिकारी पंचायत यांना आदेशीत केले आहे.

**(७) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (२८)**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक अर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये **७,६२,४३,९८२/-** थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २८ | नांदेड | मुदखेड | ६ | ९,४९,५००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युतपंप व हातपंपचे थकबाकी बाबत लेखा अक्षेपानुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

सन २०११-१२ च्य लेखा परिक्षणाच्या वेळी नोंदवही दर्शविण्यात आली नाही. ही वस्तुस्थिती आहे. तथापि सध्या अद्यावत नोंदवही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

१. पंचायत समिती मुदखेडचे हातपंप व विद्युतपंप थकबाकी मागणी वसुली नोंदवही सन २०१३-१४ अखेर अद्यावत केली आहे सदर नोंदवही आवलोकनार्थ उपलब्ध आहे.

२. थकीत रकम रु.९,४९,५००/- पैकी सन २०१४-१५ अखेर (१,९३,३२०) एवढी थकबाकीची वसूली झाली असून थकबाकी वसुली बाबत दिरंगाई करणा-या संबधितावर कार्यवाही करण्यात आलेली आहे व उर्वरित थकबाकी वसुली करण्यात येत आहे.

**(८) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (२९)**

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत

समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक अर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये **७,६२,४३,९८२/-** थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २९ | नांदेड | उमरी | ५ | ९,१५,५००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युत पंप व हातपंप दुरुस्तीची थकीत रक्कमा वसुलीबाबतच्या लेखा आक्षेपअनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करयात येत आहे. सन २०११-१२ मध्ये हापपंप देखभाल दुरुस्तीची रक्कम रु. ९,१५,५००/- थकीत होती. हे वस्तुस्थिती आहे. तथापि पंचायत समिती स्तरावर नोंदवही अद्यावत ठेवली आहे. २०११-१२ अखेर ९१५५००/- थकबाकी होती त्यापैकी आजपर्यंत ३९४३६५/- रक्कमेची वसुली केली आहे. थकीत वसुलीसाठी जबाबदार असलेले कर्मचारी तत्कालीन ग्रामसेवक व पर्यवेक्षिय अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. उर्वरित थकीत रक्कमेची वसुलीची कार्यवाही चालू आहे.

### (९) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (३०)

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक अर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये **७,६२,४३,९८२/-** थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३० | नांदेड | माहूर | ६ | १,७०,०००/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युत पंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकीच्या लेखा आक्षेपाचे अनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

१. पंचायत समितीअंतर्गत पंचायत समिती स्तरावर हातपंप विद्युतपंप मागणी वसुलीची नोंदवही अद्यावत करण्यात आली आहे. सदर अभिलेखे अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

२. सन २०११-१२ मध्ये एकूण थकबाकी रुपये १,७०,०००/- पैकी ग्राम पंचायत कडून धनादेशाव्दारे रुपये ३१,५००/- व २८,५००/- असे एकुण रुपये ६०,०००/- आणि रु.१,०२,४४६/- वसूल करुन असे दोन्ही मिळून एकूण रुपये १,६२,४४६/- वसुल करण्यात येवून कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) जिल्हा परिषद नांदेड यांच्या कार्यालयाकडे धनादेशाद्वारे जमा करण्यात आली आहे.उर्वरीत रु.७५५४/- वसुलीची कार्यवाही चालू आहे. सदर आभिलेखे अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

३. हातपंप/विद्युतपंप दुरुस्तीचे प्रस्तावाची नोंद वही ठेवण्यात आली आहे.

## (१०) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (३१)

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक अर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये **७,६२,४३,९८२/-** थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३१ | नांदेड | नायगाव | ६ | ३५,८१,३८०/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्युत पंप हातपंप दुरुस्तीची थकबाकी बाबत लेखा आक्षेपा अनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे. पंचायत समिती नायगावचे सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणाच्यावेळी हातपंप व विद्युतपंत दुरुस्ती व देखभाल ची ३५८१३८०/- एवढी रक्कम ग्रामपंचायतीकडून वसूल करणे बाकी होते. ही वस्तु स्थिती आहे. तथापि या संदर्भात ग्रामपंचायतीकडून हातपंप थकबाकी ची वसूलीची रक्कम रु.१०६८८४२/- एवढी वसूल करण्यात आलेली असून सदर वसूली बाबतचे अभिलेखे अवलोकनार्थ उपलब्ध आहेत. उर्वरीत रकमेच्या वसूलीसाठी संबंधीत कर्मचा-यास प्रत्र क्रमांक. ७४४ दिनांक.२१-०३-२०११ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

## (११) विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची थकबाकी, ४.३९६ (३२)

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परीपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. जिल्हा परीषदा ह्या पंचायत समित्यांच्या हद्दीत असलेल्या पाणीपुरवठयासाठी विद्युतपंप व हातपंप, भूजल सर्व्हेक्षण विभागामार्फत पुरवितात. प्रत्येक अर्थिक वर्षामध्ये सदर विद्युतपंप व हातपंप यांच्या दुरुस्तीवर जिल्हा परिषद खर्च करते व त्याबाबत पंचायत समित्यांना माहिती देऊन वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देते. पंचायत समित्यांकडे याबाबत नोंदवही ठेवावी लागते. विद्युतपंप बंद/ चालू, हातपंप बंद/ चालू, चालू वर्षाची मागणी, मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली असे विवरण पंचायत समितीने ठेवावयाचे असते. सन २०११-२०१२ च्या तपासणीत असे आढळून आले की, पंचायत समित्या अशा प्रकारची नोंदवही ठेवत नाहीत आणि ठेवली तरी ती अपुर्ण असते. ही अत्यंत गंभीर उणीव आहे. सदर वसुली ग्रामपंचायतीकडून वेळच्यावेळी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीची थकित वसुली रहिल्यास ती ग्रामपंचायतीकडून वसूल होणे कठीण जाते. त्यामुळे पर्यायाने जिल्हा परीषदा व

शासनाचे नुकसान होते. उदाहरणादाखल खालील ३५ पंचायत समित्यांकडील हातपंप/ विद्युतपंप दुरुस्ती व देखभालीची रक्कम रुपये **७,६२,४३,९८२/-** थकित वसुली करुन भरणा करणेत यावी.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३२ | नांदेड | धर्माबाद | ६ | १८,४७,५८५/- |

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विद्यूत पंप व हातपंपदुरुस्तीच्या थकबाकीच्या लेखा आक्षेप अनुषंगाने पुढील प्रमाणे खुलासा सविनय सादर करण्यात येत आहे.

विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची वसुलीची नोंदवही अद्यावत ठेवण्यात आलेली आहे. सन २०११-१२ अखेर रु. १८,४७,५८५- थकबाकी होती आजपावेतो त्यापैकी रु. १३,७७,९००/- ची वसुली करण्यात आली असून थकीत वसुलीला जबाबदार असलेले कर्मचारी व संबंधीत पर्यवक्षीय अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागवीण्यात आला आहे. उर्वरीत थकीत रक्कमेची वसूली करण्याची कार्यवाही चालू आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने, विद्युतपंप व हातपंप वर्गणीची नोंदवही अद्ययावत न ठेवण्याची कारणे काय आहेत, त्यास कोण जबाबदार आहे, विद्युतपंप व हातपंत वर्गणीची वसुली प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, हातपंप वर्गणी वेळेत वसूल व्हावी यासाठी जिल्हा परिषदेने काय उपाययोजना केल्या, कंधार पंचायत समिती अंतर्गत विद्युतपंप व हातपंप दुरूस्तीची थकबाकी रु. ८८,२४,५८६/- इतकी आहे. यापैकी किती रक्कम वसूल केली आहे अशी विचारणा केली त्यावर तत्कालीन गट विकास अधिकारी, कंधार यांनी लेखा परीक्षणात कंधार पंचायत समितीची थकबाकीची रक्कम रु. ८८,२४,५८६- इतकी दर्शविली होती. परंतु प्रत्यक्षात ही रक्कम रु. ४८,१३,७८४/- आहे. यापैकी रु. २,७०,८४६/- रु. वसूल केलेले असून, उर्वरित रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे अशी माहिती दिली. त्यावर समितीने पुढे गेल्या चार वर्षात ही रक्कम वसूल का होऊ शकली नाही असा प्रश्न केला असता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस जिल्ह्यामध्ये सन २००८ ते २०११ या कालावधीत पिण्याच्या पाण्याची टंचाई होती. अनेक ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करावा लागला. परिणामी, उक्त कालावधीत थकीत रकमेची वसुली होऊ शकली नाही. सन २००८ ते २०११ या कालावधीत कंधार आणि लोहा तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा ५० टक्के कमी पाऊस झाला. परिणामी रकमा वसूल होऊ शकल्या नाहीत असा खुलासा केला. त्यावर थकबाकी वसूल करण्यासंदर्भात जी कारणे सांगितलेली आहेत ती पटण्याजोगी नाहीत. थकबाकीच्या वसुलीबाबत गट विकास अधिका-यांची भूमिका चुकीची दिसते. सन २००८ ते २०११ या कालावधीत कमी पाऊस पडला असा अभिप्राय व्यक्त केला. नांदेड जिल्ह्यापेक्षा बिकट परिस्थिती लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात आहे. उक्त थकबाकीच्या रकमेप्रकरणी तसेच हदगांव पंचायत समितीमध्ये सुध्दा ८० लाख ५३ हजार रुपयांची थकबाकी प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी लक्ष घालून वसुली केली पाहिजे असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सर्व थकबाकीच्या रकमेप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष घालून वसुली केली पाहिजे. हदगाव पंचायत समितीमध्ये रु. ८०.५३ लक्षची थकबाकी आहे. ही थकबाकी १००% वसुल करावी असे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ? तसेच समितीस चौकशी अहवाल का पाठविण्यात आले नाहीत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती हदगाव अंतर्गत हातपंप/विदयुतपंप दुरुस्तीची थकबाकी रु. ८०.५३ लक्ष नसून ती आकडेवारी चुकीने दर्शविण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात पंचायत समिती हदगाव येथील हातपंप/विदयुतपंप दुरुस्तीची थकबाकी रु. १८,५५,०००/- ची होती. त्यापैकी रु. १३,४६,५००/- ची वसुली करण्यात आली आहे. उर्वरित वसुलीची कार्यवाही चालु आहे. सदर प्रकरणी

चौकशी करण्यात आली असून थकबाकीस जबाबदार असलेल्या संबंधित कर्मचारी श्री.के.व्ही.रेणेवाड, विस्तार अधिकारी (पंचायत) यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी बंद करण्यात आली आहे. समितीस चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदेतील वर्ग-३ च्या बाबतीत नियुक्ती तथा शिस्तभंग विषयक प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. सदर प्रकरणी संबंधित कर्मचा-याच्या बाबतीत कार्यवाही केलेली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी आक्षेप घेतलेला मुद्दा विद्युतपंप व हातपंपाच्या दुरुस्तीच्या संदर्भातील आहे. सदरहू प्रकरणी ८० लाख रुपये दुरुस्ती खर्च आला होता. हातपंप व विद्युतपंप दुरुस्तीची थकबाकी १८ लाख ५५ हजार रुपये होती त्यापैकी १३ लाख रुपये वसूली करण्यात आली आहे. उर्वरित वसुली १४ व्या वित्त आयोगातून वळती करुन घेता येईल व त्यामुळे १०० टक्के वसुली होईल असा समितीसमोर खुलासा केला.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या हद्दीत पाणीपुरवठ्यासाठी भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत हातपंप व विद्युतपंप पुरविले जातात. प्रत्येक आर्थिक वर्षात जिल्हा परिषदा या पंपांच्या दुरुस्तीवर व देखभालीवर खर्च करतात व त्याबाबत पंचायत समित्यांना वसुलीच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देतात. पंचायत समित्यांनी चालू/बंद स्थितीतील हातपंप व विद्युतपंप, चालू वर्षाची मागणी मागील थकित वसुली, वर्षभरातील एकूण वसुली यांची नोंदवही ठेवणे आवश्यक असते. तथापि, नांदेड जिल्हापरिषदे अंतर्गत सर्व पंचायत समित्यांनी एकतर अशा प्रकारची नोंदवहीच ठेवली नाही किंवा ती अपूर्ण ठेवली असल्याचा लेखा आक्षेप प्रस्तुत प्रकरणांत घेण्यात आला. ग्रामपंचायतींनी वेळच्यावेळी थकीत वर्गणीची वसुली करणे आवश्यक होते. परंतू ग्रामपंचायतींनी वसुली थकित ठेवल्यामुळे नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समिती, हदगांव रुपये ८०,५३,०००/-, कंधार रुपये ८८,२४,५८३/-, किनवट रुपये १३,१२,१७५/-, बिलोली रुपये १८,३१,१३६/-, देगलूर रुपये २३,२०,९१४/-, लोहा रुपये ३३,३९,५००/-, मुदखेड रुपये ९,४९,५००/-, उमरी रुपये ९,१५,५००/-, माहूर रुपये १,७०,०००/-, नायगांव रुपये ३५,८१,३८०/-, धर्माबाद रुपये १८,४७,५८५/- या पंचायत समित्यांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर वसुली थकित राहिली होती.

सन २००८ ते २०११ या कालावधीत नांदेड जिल्ह्यात अवर्षणाची परिस्थिती उद्भवल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई होती. अनेक ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केल्यामुळे हातपंप व विद्युतपंप वर्गणीची वसुली होऊ शकली नसल्याची बाब मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आली. तसेच विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीच्या वर्गणीची थकित रक्कम संबंधित ग्रामपंचायतींना १४ व्या वित्त आयोगाचा निधी वितरीत करीत असताना वळती करुन घेता येईल व त्यामुळे १००% वसुली होईल ही वस्तुस्थिती विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली. समितीच्या मते विद्युतपंप व हातपंप दुरुस्तीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक जीडब्ल्युओ/ १४७९/५६६० (३३७९)/३६, दिनांक ३१ ऑक्टोबर १९७९ अन्वये शासनाने जिल्हा परिषदांकडे सोपविली आहे. सदरहू परिपत्रकानुसार पाणीपुरवठ्याच्या कामात व्यापक लोकसहभाग अपेक्षित आहे. हातपंप व विद्युतपंपाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी मुळातच ग्रामपंचायतीची आहे. त्यांनी किमान ७५ रुपये प्रतिकुटुंब वसुल करुन त्यातून त्याबाबतचा खर्च भागविणे आवश्यक आहे. परंतू ग्रामपंचायती ही वर्गणी वसुल करुन जमा करीत नसल्यामुळे, दिनांक ७ एप्रिल, २००८ रोजी शासनाने निर्गमित केलेल्या निर्णयानुसार **(परिशिष्ट ८.१)** जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतींना देण्यात येणा-या अनुदानातून ॲट सोर्स कपात करुन ती रक्कम देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये जमा करण्याचे आदेश आहेत.

**सबब, भविष्यात राज्यातील सर्व जिल्हा परिषदेअंतर्गत विंधन विहीरींवर बसविलेल्या हातपंप / विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीकरीता गाव, तालुका व जिल्हा या तीन्ही पातळयांवर योजना राबवित असताना देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये प्रती हातपंप ५००/- रुपये व प्रती विद्युतपंप २५००/- रुपये अशी वर्गणीची रक्कम संबंधित ग्रामपंचायतीकडून वेळोवेळी पाठपुरावा करुन वसुल करुन जमा करण्याची दक्षता घेण्यात यावी. अशा थकीत वर्गणीमुळे ग्रामपंचायतमधील विकास कामांना त्याचबरोबर उक्त कामांवरील देखभाल व दुरुस्ती निधी वेळेवर उपलब्ध होत नाही. त्यामुळे अशा अनेक योजना देखभाल दुरुस्ती अभावी निकामी होतात. यास्तव ग्रामपंचायतींनी वर्गणीदारांकडे थकीत असलेली रक्कम वेळच्यावेळी वसुल करावी त्यासाठी एखादी आकर्षक योजना आखून ती राबवावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण वीस

## जिल्हा परिषद, नांदेड

### इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या पाटी खर्चातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद ३.१३५ (सन २००८-०९)**

जिल्हा परिषद नांदेड यांनी १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा योजने अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या पाटी खरेदीवर रूपये १८,५९,३६५/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. गणवेश/२००१/प्र.क्र. १९/२५, दि.२०/२/२००२ मधील परिच्छेद क्र. २० प्रमाणे साहित्याचे वाटप शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणात खरेदी मार्च २००९ मध्ये झालेली असल्यामुळे विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यामुळे शासनाचा उद्देश सफल झालेला नाही.

२. प्रस्तुत योजनेतून खरेदी केलेले साहित्य पात्र विद्यार्थ्यांना मिळालेबाबत पोचपावती लेखा परिक्षणात उपलब्ध केलेल्या नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. सन २००८-०९ मध्ये इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरीता गणवेश व लेखन साहीत्य या योजने अंतर्गत मा.शिक्षण संचालक प्राथमिक पुणे यांचे आदेश क्र. ४८७५, दि.१८/०९/२००८ नुसार व मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांचे आदेश क्र. १३५३, दि.३०/०९/२००८ अन्वये खालीलप्रमाणे योजना निहाय तरतुद प्राप्त झाली होती.

| अ. क्र | योजना | प्राप्त तरतुद | २०% लेखन साहीत्य | ८०% गणवेश |
|---|---|---|---|---|
| १ | नियमित | ९,६१,०००/- | १,९२,२००/- | ७,६८,८००/- |
| २ | १०३ विकास गट योजना (विघयो) | ४९,८९,०००/- | ९,९७,८००/- | ३९,९१,२००/- |
| ३ | आदिवासी क्षेत्र (TSP) | २,८०,०००/- | ५६,०००/- | २,२४,०००/- |
| ४ | आदिवासी क्षेत्राबाहेर (OTSP) | ३,६७,०००/- | ७३,४००/- | २,९३,६००/- |
| ५ | १०३ विकास गट (स.सा) | २७,००,०००/- | ५,४०,०००/- | २१,६०,०००/- |
| | **एकुण** | **९२,९७,०००/-** | **१८,५९,४००/** | **७४,३७,६००/-** |

परंतु सन २००८-०९ मधील मान्य तरतुद ही प्रत्यक्षात सप्टेंबर २००८ मध्ये प्राप्त झाली व पुरवठा आदेश क्र.३१७१ दि. २७/०२/२००९ रोजी देण्यात आला.त्यामुळे सन २००८ च्या शाळेच्या पहील्या दिवशी या वर्षातील तरतुदी प्रमाणे साहीत्याचे वाटप होवू शकले नाही ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, आदल्या वर्षात देखील निधीची तरतुद उशीराने प्राप्त झाल्यामुळे सन २००७-०८ या वर्षातील साहीत्याचा दि. ०५/०३/२००८ रोजी पुरवठा आदेश देवून साहीत्य खरेदी करण्यात आले होते. जे दि.०९/०३/२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाले. ते वाटपास उपलब्ध असल्यामुळे शाळेच्या पहील्या दिवशी जुन २००८ मध्ये वाटप करण्यात आल्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यांची वर्षभराची सोय झाली आहे. तसेच २००८-०९ या वर्षातील साहीत्य जुन २००९ मध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहील्या दिवशी वाटप करण्यात आले.

२. लेखा परीक्षण चालु असतांना शालेय पाटी वाटपाच्या पोच पावत्या शाळांकडून गोळा करण्यात आल्या नव्हत्या ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे लेखा परीक्षणात पोच पावती दाखविण्यात आली नाही. तथापि, गट शिक्षणाधिकारी स्तरावर साठा

नोंदवही मध्ये नोंदी घेतल्याचे अभिलेखे उपलब्ध आहेत. तसेच तालुका अंतर्गत शाळांना वाटप केलेल्या व शाळांनी विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या नोंदी उपलब्ध आहेत. अभिलेखे अवलोकनासाठी उपलब्ध आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखन साहित्य आर्थिक वर्षाअखेर खरेदी केल्याने ते विद्यार्थ्यांना त्या शैक्षणिक वर्षात उपलब्ध झाले नाही. त्यामुळे योजनेचा मुळ हेतू सफल झाला नाही. यास कोण जाबाबदार आहे, लेखन साहित्य वाटल्याबाबतची विद्यार्थ्यांची पोच का घेण्यात आली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदीत केले की, सन २००८-२००९ मधील मान्य तरतूद ही प्रत्यक्षात सप्टेंबर २००८ मध्ये प्राप्त झाली व पुरवठा आदेश क्र.३१७१ दि. २७/२/२००९ रोजी देण्यात आला. त्यामुळे सन २००८ च्या शाळेच्या पहिल्या दिवशी या वर्षातील तरतुदी प्रमाणे साहित्याचे वाटप होऊ शकले नाही. आदल्या वर्षात देखील निधीची तरतूद उशीराने प्राप्त झाल्यामुळे सन २००७-२००८ या वर्षातील साहित्याचा दि.५/३/२००८ रोजी पुरवठा आदेश देवून साहित्य खरेदी करण्यात आले होते. जे दि.९/३/२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाले. ते वाटपास उपलब्ध असल्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशी जून, २००८ मध्ये वाटप करण्यात आल्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यांची वर्षभराची सोय झाली आहे. तसेच २००८-२००९ या वर्षातील साहित्य जून, २००९ मधील शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी वाटप करण्यात आले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर योजनेतून खरेदी केलेले साहित्य पात्र विद्यार्थ्यांना मिळाल्याबाबत पोहचपावत्या लेखा परीक्षणात का उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, लेखा परीक्षण सुरु असताना शालेय पाटी वाटपाच्या पोहच पावत्या शाळांकडून गोळा करण्यात आल्या नव्हत्या ही वस्तुस्थिती असल्यामुळे पोहच पावत्या त्या लेखा परीक्षणात दाखविण्यात आल्या नाहीत. तथापि गट शिक्षणाधिकारी स्तरावर साठा नोंदवही मध्ये नोंदी घेतल्याचे अभिलेखे उपलब्ध आहेत. तसेच तालुका अंतर्गत शाळांना वाटप केलेल्या व शाळांनी विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या नोंदी अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत शालेय शिक्षण विभागाकडून माहिती मागविली.**

लेखन साहित्य वर्षा अखेर खरेदी केल्यामुळे ते विद्यार्थ्यांना त्या शैक्षणिक वर्षात उपलब्ध झाले नाही. त्यामुळे योजनेचा मुळ हेतू सफल झाला नाही असे समितीचे मत झाले आहे. या पुढील काळात सदरहू योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व योजनेचा उद्देश सफल होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**उपरोक्त संदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासनाच्या विविध योजनांतर्गत शैक्षणिक साहित्याचा निधी शैक्षणिक वर्षाचे सुरुवातीस न मिळता साधारणपणे वर्ष अखेरीस मिळतो त्यामुळे त्या त्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना त्या योजनेचा लाभ त्याच वर्षात मिळत नाही. शैक्षणिक वर्षात प्राप्त झालेला निधी शैक्षणिक वर्षाचा शेवटी खर्च करण्यात आल्याने खरेदी केलेल्या साहित्याचा विनियोग पुढच्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांना वाटप करुन करण्यात येतो. त्याऐवजी चालू शैक्षणिक वर्षातील निधी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस प्राप्त झाल्यास त्या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना त्याच वर्षात देता येईल. म्हणून अशा प्रकारचा निधी शैक्षणिक वर्षाचे सुरुवातीस मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. ११४७३ दि.९.११.२०१५ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.

**उपरोक्त संदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मोफत गणवेश व लेखन साहित्य योजनेचा निधी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच संबंधितांना वितरीत झाल्यास योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित होऊन विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्यापूर्वी गणवेश व इतर लेखन साहित्य मिळू शकते. सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येत असलेला मोफत गणवेश व पाठ्यपुस्तके शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मिळतील याअनुषंगाने दरवर्षी नियोजन करण्यात येते. राज्य शासनाच्या मोफत गणवेश व लेखन साहित्य योजनेचा निधी वित्त विभागाकडून प्राप्त झाल्यावर तात्काळ जिल्हास्तरावर वितरीत करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येईल.

## चौकशी अहवाल

सन २००८-०९ मध्ये इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरीतागणवेश व लेखन साहीत्य या योजने अंतर्गत मा. शिक्षण संचालक प्राथमिक पुणे याचे आदेश क्र. ४८७५, दि. १८/९/२००८ नुसार व मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांचे आदेश क्र. १३५३ दि. ३०/९/२००८ अन्वये खालीलप्रमाणे योजनानिहाय तरतुद प्राप्त झाली होती.

| अ.क्र. | योजना | प्राप्त तरतुद | २०% लेंखन साहीत्य | ८० % गणवेष |
|---|---|---|---|---|
| १ | नियमित | ९,६१,०००/- | १,९२,२००/- | ७,६८,८००/- |
| २ | १०३ विकास गट योजना (विघयो) | ४९,८९,०००/- | ९,९७,८००/- | ३९,९१,२००/- |
| ३ | आदिवासी क्षेत्र (TSP) | २,८०,०००/- | ५६,०००/- | २,२४,०००/- |
| ४ | आदिवासी क्षेत्राबाहेर (OTSP) | ३,६७,०००/- | ७३,४००/- | २,९३,६००/- |
| ५ | १०३ विकास गट (स.सा.) | २७,००,०००/- | ५,४०,०००/- | २१,६०,०००/- |
| | एकूण | ९२,९७,०००/- | १८,५९,४००/- | ७४,३७,६००/- |

सन २००८-०९ मधील मान्य तरतुद ही प्रत्यक्षात सप्टेंबर, २००८ मध्ये प्राप्त झाली व पुरवठा आदेश क्र. ३१७१ दि. २७/०२/२००९ रोजी देण्यात आला. त्यामुळे सन २००८ च्या शाळेच्या पहिल्या दिवशी या वर्षाततील तरतुदी प्रमाणे साहीत्याचे वाटप होवू शकत नाही. ही बाब निदर्शनास आणून देण्यात येते. तथापि, पुढील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

आदल्या वर्षात देखील निधीची तरतूद उशीराने प्राप्त झाल्यामुळे सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील साहीत्याचा पुरवठा आदेश दि. ०५/०३/२००८ रोजी देवून साहीत्य खरेदी करण्यात आले होते. जे की दि. ०९/०३/२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाले. त्यामुळे प्राप्त साहीत्य त्या शैक्षणिक वर्षात म्हणजेच ते उपलब्ध साहीत्य शाळेच्या पहिल्या दिवशी जून, २००८ मध्ये वाटप करण्यात आल्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यांची वर्षभराची सोय झाली. तसेच २००८-०९ या वर्षातील साहीत्य जून, २००९ मध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहील्या दिवशी वाटप करण्यात आले.

योजनेची तरतुद त्या त्या शैक्षणिक वर्षात होवून साहीत्य खरेदी नियमानुसार झालेली आहे. परंतु साहीत्य वाटप शैक्षणिक वर्षाच्या शेवटी म्हणजेच मार्च अखेर वाटप न करता ते साहीत्य विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात म्हणजेच शाळा प्रारंभी जून महिन्यात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात येते. यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता नसून कोणताही अधिकारी व कर्मचारी दोषी नसून शैक्षणिक वर्षाचा शेवट व आरंभ यामधील तांत्रिक बाब असल्याचे सिध्द होते.

## विभागीय सचिवांची साक्ष

उपरोक्त माहितीच्या आधारे दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वर्षाअखेर खरेदी केल्यामुळे ते विद्यार्थ्यांना त्या शैक्षणिक वर्षात उपलब्ध झाले नाही. त्यामुळे योजनेचा मूळ हेतू सफल झाला नाही. या पुढील काळात सदरहू योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व योजनेचा उद्देश सफल होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,यावर प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी स्पष्ट केले की, ही योजना अडचणीत आली आहे. जे राज्य आर्थिकदृष्टया चांगले होते त्या राज्यांनी अशा योजना सुरू ठेवल्या. सन २००० पूर्वी शैक्षणिकदृष्टया मागासलेले भाग १०३ होते आता ती संख्या वाढली आहे. अशा भागांना विशेष मदत करण्यासाठी शासनाने ही योजना केली. पण ते इतर राज्यांना जमले नाही. सन २००० मध्ये सर्व शिक्षा अभियान ही योजना आल्यानंतर भारत सरकारने सर्व राज्यांबरोबर कॉन्ट्रॅक्ट केले व सांगितले की, आता सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवनवीन विचार येणार तसेच निधी देखील मिळणार आहे. परंतु राज्याने सुरू केलेली योजना बंद करता येणार नाही असे ते ॲग्रीमेंट होते. पूर्वी एक गणवेश देण्याची योजना होती. भारत सरकारने सर्व शिक्षा अभियानांतर्गत दोन गणवेश देण्याची योजना आणली. राज्य तो गणवेश देत होते त्या गणवेशासाठी ५७ रुपये नॉर्म ठरले होते. आता एका गणवेशासाठी २०० रुपये आहेत म्हणजे एका विद्यार्थ्यास दोन गणवेशासाठी ४०० रुपये देतो. ती रक्कम देखील कमी पडते असे सांगण्यात येते. शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या भागातील विद्यार्थ्यांना एक २०० रुपयांचा गणवेश आणि दुसरा ५७ रुपयांचा गणवेश मिळतो.

लेखन साहित्यासाठी जो निधी मिळत होता तो गणवेशासाठी खर्च रुपये सुद्धा ती रक्कम २०० रुपये होत नाही, अशी अडचणीची ही योजना आहे. यावर समितीने पृष्छा केली की, असे असेल तर आपली योजना बंद करुन त्या योजनेमध्ये २०० रुपये देता येणार नाहीत काय, यावर विभागीय सचिवांनी विदित केले की, केंद्र सरकारने १४३ रुपये मॅचिंग ग्रांट देण्यास सुरूवात केली होती. परंतु नंतर केंद्र शासनास असे लक्षात आले की, केंद्र शासनाने राज्य शासनाशी जो करार केला आहे त्याच्या हे विरोधात आहे, त्यामुळे त्यांनी मॅचिंग ग्रांट देणे बंद केले. त्यामुळे राज्य शासनास १४३ रुपये प्रत्येक विद्यार्थ्यामागे देणे भाग आहे पण त्यासाठी फार अडचण येते. यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, राज्य शासनाची योजना बंद करूप सर्व शिक्षा अभियानाच्या योजनेतून लाभ का देत नाही, यावर विभागीय सचिवांनी समितीस माहिती दिली की, आपणास एक गणवेश देण्याची योजना बंद करता येणार नाही. शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या भागात दोन गणवेश मिळतात. त्यामुळे शासनास २०० रुपये खर्च करावे लागतात. या कामासाठी मागील वर्षी ४.५ कोटी रुपये लागले होते. ही रक्कम मिळण्यासाठी खूप खटाटोप करावा लागतो. ५७ रुपयांच्या नॉर्मवरून ती २०० रुपये नेणे किंवा सर्व शिक्षा अभियान योजनेबरोबर मॅचिंग करावे असा पर्याय आहे. पण तो मान्य होत नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शालेय शिक्षण विभागाकडून वित्त विभागाकडे तसा प्रस्ताव गेला आहे काय, अन्यथा समिती तशी शासनास शिफारस करील त्यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, शालेय शिक्षण विभागाने तसा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविलेला आहे आणि त्याबाबत कार्यकारी समितीमध्ये चर्चा झालेली आहे. शालेय शिक्षण विभागाला एकदा ती रक्कम मिळालेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने सन १९७९-८० या शैक्षणिक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती/जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जातीच्या इयत्ता १ ते ४ थी तील विद्यार्थ्यांना विशेष सुविधा म्हणून मोफत गणवेश व लेखन साहित्य वाटप योजना सुरु केली. सन २००८-०९ या वर्षाच्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात नांदेड जिल्हा परिषदेने महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.गणवेश/ २००१/प्र.क्र.१९/२५, दि.२०/२/२००२ मधील परिच्छेद क्र.२० प्रमाणे साहित्याचे वाटप शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना केले नाही. प्रस्तुत प्रकरणात खरेदी माहे मार्च २००९ मध्ये झालेली असल्यामुळे विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यामुळे शासनाचा उद्देश सफल झालेला नाही, असा आक्षेप घेण्यात आलेला आहे. वस्तुतः सन २००८-०९ या वर्षाकरीता सदरहू योजनेकरीताचा निधी शासनाकडून उशिरा म्हणजे दिनांक ३०.०९.२००८ रोजी जिल्हा परिषदेस प्राप्त झाला. एवढेच नव्हे तर सन २००७-०८ या वर्षाकरीता देखील उशिरा म्हणजे दिनांक ०९.०३.२००८ रोजी निधी प्राप्त झाल्यामुळे त्यावर्षीच्या निधीतून शैक्षणिक साहित्याची खरेदी केलेली असल्यामुळे अहवाल वर्षात वाटपासाठी साहित्य उपलब्ध असल्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी वाटप करण्यात आले व विद्यार्थ्यांची वर्षभराची सोय झाली असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली.

**शासन निर्णयानुसार शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा करणे आवश्यक असले तरी शासनाकडून वेळेवर निधी उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे जिल्हा परिषदांना वेळेवर खरेदी व वाटप इत्यादी कार्यवाही पार पाडणे शक्य होत नाही. अतः सदर योजनेचा मुळ हेतू साध्य करण्यासाठी वित्त विभागाने त्या त्या शैक्षणिक वर्षासाठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्य वाटप योजना अंतर्गत नियतव्यय मंजूर करुन खर्च करण्यासाठी वितरीत करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रस्तुत प्रकरणात लेखन साहित्याबाबत आक्षेप असला तरी सदरहू योजना लेखन साहित्य व गणवेशाच्या वाटपाबाबत असल्यामुळे गणवेश वाटपाचे वेळी देखील समस्या उद्‌भवत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. राज्य शासनाच्या योजनेत गणवेशासाठी ५७ रुपये प्रती गणवेश अनुदान दिले जात होते. परंतू केंद्र शासनाने सन २००० मध्ये सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत गणवेश देण्यास सुरुवात केली. राज्य शासन व केंद्र शासनातील करारानुसार राज्य शासनाची सुरु असलेली योजना बंद करता येत नाही, त्यामुळे राज्य शासनाच्या प्रती गणवेश ५७ रुपये योजनेत केंद्र शासनाने १४३ रुपयांचे मॅचींग ग्रांट देण्यास सुरुवात केली. केंद्र शासनाच्या नंतर लक्षात आले की अशी मॅचींग ग्रांट देणे हे राज्य शासनाशी केलेल्या कराराच्या विरुध्द आहे. म्हणून केंद्र शासनाने मॅंचींग ग्रांट देणे बंद केले. त्यामुळे सद्यस्थितीत राज्यशासनास प्रती विद्यार्थी हे १४३ रुपये देणे अडचणीचे ठरत आहे. सन २०१४-१५ या वर्षासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाच्या योजनेचे लाभार्थी असणा-या विद्यार्थ्यांना केवळ १ गणवेशासाठी प्रती विद्यार्थी २०० रुपये या प्रमाणे तरतूद मंजूर केली आहे. सदर विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निकषानुसार दुसरा

गणवेश उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये १८७९.४९ लक्ष रुपयांचा निधी राज्य शासनाने उपलब्ध करुन दिला. **शालेय शिक्षण विभागाकडून वित्त विभागाकडे तसेच कार्यकारी समितीसमोर सदरहू योजनेसाठी विहित मुदतीत निधी देण्यासंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. अतः राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या मोफत गणवेश वाटप योजनेतील लाभार्थी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती/जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जातीच्या इयत्ता १ ली ते ४ थी तील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता अर्थसंकल्पीय तरतूद करताना सदरचा निधी त्या त्या शैक्षणिक वर्षात खर्च होऊन गणवेशाचा लाभ लाभार्थी विद्यार्थ्यांना होण्याच्या दृष्टीने तरतूद केलेली रक्कम विहित वेळेत वितरीत होणेकामी योग्य ते नियोजन करावे व असा निधी शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी कोणत्याही परिस्थितीत संबंधित विभागास देण्यास वित्त विभागाने सत्वर कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी.**

प्रकरण एकवीस

## जिल्हा परिषद नांदेड

### केंद्रीय प्राथमिक शाळांना प्रदान ४ टक्के सादील खर्चातील गंभीर अनियमिततेबाबत

**परिच्छेद ३.१३६ (सन २००८-२००९)**

पंचायत समिती हदगावने सन २००८-०९ या वित्तीय वर्षात केंद्रीय प्राथमिक शाळांना ४ टक्के सादीलवार रक्कम रुपये ८,८०,०००/- प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. पीआरई १०९४/७०४/(दोन)/प्राशि-१, दिनांक १४ नोव्हेंबर १९९४ नुसार प्रत्येक शाळांना जून व डिसेंबरच्या वेतन देयकात सादीलवार रक्कम दोन समान हप्त्यात देण्यात यावी परंतु पंचायत समिती हदगांवने मार्च मध्ये एकाच हप्त्यात रक्कमा प्रदान केल्या आहेत.

२. ४ टक्के सादील नोंदवही, मंजूर शिक्षकांचे पदे या बाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणात सादर केली नाहीत.

३. साहित्य खरेदी करतांना जिल्हा परिषद आकस्मिक खर्च अधिनियम १९६५ च्या नियम क्र. ७२ च्या अनुषंगाने परिशिष्ट ६ मधील तरतुदीचे पालन केले नाही.

४. साहित्य खरेदी करतांना सीलबंद पाकिटात दरपत्रके मागविली नाहीत.

५. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निणर्य क्र. पी.आर.ई. १०९४/७०४/(दोन) प्राशि.-१, दिनांक १४ नोव्हेंबर १९९४ मधील प्रपत्र अ नुसारच साहित्य खरेदी करणे आवश्यक होते. परंतु के.प्रा.शाळांनी प्रपत्र अ व्यतिरिक्त साहित्य खरेदी केलेले आहे. ते नियमबाह्य आहे.

६. काही शाळांनी खर्च न केलेली ४ टक्के सादील रक्कम रुपये १,३९,१२०/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००८-०९ या वर्षात पंचायत समिती हदगांव यांना केंद्रीय प्राथमिक शाळांना ४ टक्के सादीलवार रक्कम प्रदान करण्यात आली. त्या लेखा आक्षेपाबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

१. शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.पीआरई१०९४/७०४/(दोन) प्राशि-१,दि.१४ नोव्हेंबर १९९४ नुसार प्रत्येक शाळांना जुन व डिसेंबरच्या वेतन देयकात सादीलवार रक्कम दोन हफ्त्यात देणेसाठी निर्देश आहेत. जिल्हा स्तरावरुन दि.१८/०९/२००८ व दि.२७/०२/२००९ या आदेशानुसार तालुका स्तरावर वितरीत करण्यात आली. तालुका स्तरावरील शिक्षण विभागाकडून देयके तयार करुन गट विकास अधिकारी पंचायत समिती हदगांव यांचेकडे मंजुरीसाठी सादर केल्यानंतर ती तरतुद शाळांना वितरीत करण्यास विलंब झाला व सादीलवारच्या दोन्ही हफ्त्याची रक्कम विलंबाने दि.३१/०३/२००९ या तारखेस एकाचवेळी शाळांना वितरीत करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. विलंबाने तरतुद वाटप केल्याबाबत तत्कालीन सेवानिवृत्त गट शिक्षणाधिकारी श्री.एस.एम.केंद्रे यांना दि.२१/०८/२०१५ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. तथापि शैक्षणिक वर्षाच्या सुरुवाती पासून शासन निर्णय दि.१४ नोव्हेंबर १९९४ मधील तरतुदीनुसार आवश्यकतेनुसार साहीत्य खरेदी केलेले आहे व त्या साहीत्याचा वापर शाळेने आवश्यकतेनुसार वेळोवेळी केला आहे.

२. लेखा परीक्षण काळात अभिलेखे उपलब्ध न करुन दिल्याबद्दल तत्कालीन सेवानिवृत्त गट शिक्षणाधिकारी श्री.एस.एम.केंद्रे यांना दिनांक १६/०८/२०१५ रोजी नोटीस बजावण्यात आलेली आहे. ४ टक्के सादील नोंदवही व मंजुर शिक्षकांचे पदे यांचे अभिलेखे गट शिक्षणाधिकारी कार्यालयात उपलब्ध आहेत.सदरचे अभिलेखे अवलोकनासाठी उपलब्ध आहेत.

३. साहीत्य खरेदी करतांना जिल्हा परिषद आकस्मिक खर्च अधिनियम १९६५ च्या नियम क्र.७२ च्या अनुषंगाने परिशिष्ट ६ मधील तरतुदीचे पालन केले नाही ही वस्तुस्थिती आहे.

४. साहीत्य खरेदी करतांना सिलबंद पाकीटात दरपत्रके मागविली नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

५. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.पीआरई१०९४/७०४/(दोन)प्राशि-१, दि.१४ नोव्हेंबर १९९४

मधील प्रपत्र अ नुसारच साहीत्य खरेदी करणे आवश्यक होते. परंतु प्राथमिक शाळांनी प्रपत्र अ व्यतिरिक्त साहीत्य खरेदी केले ही वस्तुस्थिती आहे. शासन निर्णयानुसार सदरच्या साहीत्याची खरेदी फक्त जिल्हा स्तरावरुन करण्याचे अधिकार आहेत. तथापि, मुख्याध्यापकांनी शाळेच्या गरजेनुसार ग्राम शिक्षण समितीच्या मान्यतेने प्रपत्र-अ व्यतिरीक्त साहीत्य खरेदी केल्याचे दिसते. या अनियमिततेबाबत सर्व संबंधित मुख्याध्यापकांना दि.१६/०८/२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

६. शाळांनी खर्च न केलेली ४ टक्के सादील रक्कम रु.१,३९,१२०/- एवढी नसून मुद्दा क्र.५ मध्ये प्रपत्र अ व्यतिरीक्त साहीत्य खरेदी केल्याची किंमत त्यामध्ये रु.६१,५९८/- समाविष्ट आहे. ही समाविष्ट केलेली रक्कम वजा केल्यास रु.६७,६२०/- शिल्लक राहतात. या रु.६७,६२०/- रक्कमेपैकी रु.२२,५६५/- एवढी रक्कम केंद्र प्राथमिक शाळा जांभळा या शाळेस देण्यात आली होती. ती त्यांनी अंतर्गत शाळांना वाटप केली नाही असा आक्षेप आहे. तथापि, सदरची रक्कम लेखापरीक्षण नंतर अंतर्गत शाळांना दि.२२/०९/२००९ व दि.२३/०९/२००९ रोजी वाटप केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध आहेत व उर्वरित रक्कम रु. ४५,०५५/- ही एकुण ७ शाळांकडे अखर्चित राहीली होती. त्यानंतर शाळांनी ग्राम शिक्षण समितीच्या परवानगीने अखर्चित रक्कम पुढच्या शैक्षणिक वर्षामध्ये आवश्यकतेनुसार खर्च केली आहे. अखर्चित रक्कम खर्च करण्याची परवानगीची आवश्यकता असते ही बाब अवगत नसल्याने सदरचा खर्च करण्यात आला. या केलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी यासाठी गट शिक्षणाधिकारी हदगांव यांचेकडून शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद नांदेड यांचेकडे दि.२१/०१/२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यास शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी दि.१८/०८/२०१५ नुसार कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की,शाळांना द्यावयाचे सादिल अनुदान वर्षातून दोन वेळा म्हणजे जून व डिसेंबर मध्ये द्यावयाचे आहे हे अनुदान पंचायत समिती हदगावने मार्च मध्ये दिल्याने वर्षासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदीवर विपरीत परिणाम झाला काय, यास जबाबदार कोण आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.पीआरई १०९४/ ७०४/ (दोन)प्राशि-१ दि. १४ नोव्हेंबर,१९९४ नुसार प्रत्येक शाळांना जून व डिसेंबरच्या वेतन देयकात सादीलवार रक्कम दोन हप्त्यात देण्यासाठी निर्देश आहेत. जिल्हा स्तरावरुन दि.१८/९/२००८ व दि.२७/२/२००९ या आदेशानुसार तालुका स्तरावर वितरीत करण्यात आली. तालुका स्तरावरील शिक्षण विभागाकडून देयके तयार करुन गट विकास अधिकारी पंचायत समिती हदगांव यांचेकडे मंजुरीसाठी सादर केल्यानंतर ती तरतूद शाळांना वितरीत करण्यास विलंब झाला व सादीलवारच्या दोनही हप्त्यांची रक्कम विलंबाने दि. ३१/३/२००९ या तारखेस एकाचवेळी शाळांना वितरीत करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. विलंबाने तरतूद वाटप केल्याबाबत तत्कालीन सेवानिवृत्त गट शिक्षणाधिकारी श्री.केंद्रे यांना दि.२१/८/२०१५ रोजी नोटीस बजावली आहे. तथापि शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासून शासन निर्णय दि. १४ नोव्हेंबर, १९९४ मधील तरतुदीनुसार आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी केले आहे व त्या साहित्याचा वापर शाळेने आवश्यकतेनुसार वेळोवेळी केला आहे. मागच्या वर्षाचा निधी पुढील वर्षी खर्च करण्यात आलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. समितीने पुढे विचारणा केली की, या वर्षीचा सादिल वापर आहे काय, यावर समितीला उत्तरादाखल असे सांगितले की, यावर्षी सादिल वापर बंद आहे. समितीने पुढे विचारणा केली की, ४ टक्के रक्कम शाळास्तरावर पडून आहे. त्यामुळे अखर्चित रक्कम शासनाला परत केली पाहिजे. अखर्चित रक्कम शाळास्तरावर तसेच स्थानिक निधी किती पडून आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यामध्ये जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडून चूक झाली आहे असे समितीसमोर कबुल केले असता समितीने निदेश दिले की, ज्यांच्यामुळे विलंब झालेला आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. मुख्याध्यापकांनी हा पैसा परस्पर खर्च केला आहे. यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन, जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत शालेय शिक्षण विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणी अखर्चित निधी व विलंबाने निधी वितरीत झाल्याप्रकरणी ज्यांच्यामुळे विलंब झाला आहे त्याची संपूर्ण चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर प्रकरणात शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी चौकशी केलेली असुन या अनियमिततेबाबत तत्कालीन गट शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री गोरे, पंचायत समिती हदगांव यांना ४ टक्के सदीलची रक्कम एकाच हप्त्यात व विलंबाने वितरीत केल्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. १०२३९, दि. २१/०८/२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून खुलासा अद्याप अप्राप्त असल्याने या कार्यालयाचे पत्र क्र. १२०५९ दि. १६.१२.२०१५ अन्वये स्मरणपत्र देण्यात आलेले आहे व त्यांची एक वार्षिक वेतनवाढ रोखण्याबाबत मा. शिक्षणआयुक्त, पुणे यांना पत्र क्र. १२२१२ दि. २१.१२.२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

आयुक्त शिक्षण, पुणे यांना संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याबाबत दि.२९.२.२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

## चौकशी अहवाल

केंद्रीय प्राथमिक शाळांना प्रदान ४ टक्के सादील खर्चातील गंभीर अनियमितताबाबत पंचायत राज समितीने दिलेल्या निदेशानुसार चौकशी करुन अहवाल सादर करण्यात येत आहे. शाळा स्तरावर शाळेस आवश्यक असलेले साहीत्य खरेदी करण्याकरीता शासन निर्णय दि. १४ नोव्हेंबर, १९९४ मध्ये दिलेल्या परिशिष्ट-अ यादीतील साहीत्य खरेदी करण्यासाठी ४ टक्के सादील निधी जिल्हा स्तरावरुन शाळा स्तरावर वाटप करण्यात येत असतो. जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत पंचायत समिती हदगाव ला सन २००८-०९ या वित्तीय वर्षात केंद्रीय प्राथमिक शाळांना ४ टक्के सादीलवर रक्कम रुपये ८,८८,०००/- प्रदान केले आहे.

जिल्हा स्तरावरुन दि. १८/९/२००८ व दि२७/०२/२००९ या आदेशानुसार दोन टप्प्यात तरतुद तालुका स्तरावर वितरीत करण्यात आली. त्यानुसार तालुका स्तरावरुन शाळा स्तरावर तात्काळ आलेली तरतुद वितरीत करणे आवश्यक होते. परंतु तसे केल्याचे दिसून येत नाही. तालुका स्तरावरुन आलेला निधी वाटप बाबत विलंब झाल्याचे सिध्द होते. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.पीआरई १०९४/७०४/(दोन) प्राशि-१ दि.१४ नोव्हेंबर १९९४ नुसार प्रत्येक शाळांना जून व डिसेंबरच्या वेतन देयकात सादीलवार रक्कम दोन समान हप्त्यात देणेबाबत नमूद आहे. परंतु पंचायत समिती हदगावने मार्च मध्ये एकाच हप्त्यात रक्कम प्रदान केल्याचे दिसून येते.

तालुका स्तरावरील गट शिक्षणाधिकारी यांचेकडून देयके तयार करुन गट विकास अधिकारी पंचायत समिती हदगांव यांचेकडे मंजुरीसाठी सादर केल्यानंतर ती तरतुद शाळांना वितरीत करण्यास विलंब झाला व सादीलवारच्या दोन्ही हप्त्याची रक्कम विलंबाने दि. ३१/३/२००९ या तारखेस एकाचवेळी शाळांना वितरीत करण्यात आली. यास तत्कालीन गट शिक्षणाधिकारी, श्रीमती जयश्री गोरे, सध्या कार्यरत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत जिल्हा परिषद, हिंगोली हया जबाबदार आहेत. शाळा स्तरावर साहीत्य खरेदी करतांना खालीलप्रमाणे अनियमितता झालेली आहे.

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.पीआरई १०९४/७०४/(दोन) प्राशि-१, दि. १४ नोव्हेंबर, १९९४ मधील प्रपत्र अ नुसारच साहीत्य खरेदी करणे आवश्यक होते. उदा. खडू, कागद, पेन, गोंद,पेन्सील, कार्बन, फाईल, वहया, टाचण्या,स्टेपलर, फोटो, कुलूप, टॅग, गुंडाळ फळे, कचरा पेटी, पिण्याचे पंप, कात्री, सुतळी, दोरा, नेलकटर, बादली, टॉवेल, पातेली, नकाशा स्टँड इ. १२४ वस्तुपैकी खरेदी करणे आवश्यक होते. परंतु के.प्रा.शाळांनी प्रपत्र अ व्यतिरिक्त म्हणजेच प्रपत्र-ब मधील साहीत्य उदा. टेबल, अलमारी, लोखंडी, रॅक, खुर्ची, पैळे, डयुल डेस्क, साधी बाके, आसनपट्टया इ.साहीत्य खरेदी केलेले आहे. ते शासन निर्णय दि. १४ नोव्हेंबर, १९९४ चे निर्देशाप्रमाणे नियमबाहय आहे.

अशी अनियमित खरेदी खालील शाळांनी केल्याचे लेखापरीक्षण अहवालावरुन सिध्द होते. केंद्रीय प्राथमिक शाळा, आष्टी, प्रा.शा.सेटेवाडी, प्रा.शा.लिंगापूर, के.प्रा.शा.मनाठा, प्रा.शा कनकेवाडी, प्रा.शा.वरवंट, प्रा.शा.पाथरड, प्रा.शा.शिवपुर, प्रा.शा.उमरी, प्रा.शा.पळसा, प्रा.शा.कवाना, प्रा.शा.बरडशेवाळा, प्रा.शा.भानेगांव, प्रा.शा.शिवपुरी, के.प्रा.शा.निवघा, प्रा.शा.काळेश्वर, प्रा.शा.शिरळ, प्रा.शा.वैदुवाडी, प्रा.श.कोहळी, के.प्रा.शा. चिंचगव्हाण, प्रा.शा.पिंपरखेड, प्रा.शा शिबदरा, नवी आबादी, प्रा.शा.जंगापूर, प्रा.शा.चिंचगव्हाण, प्रा.शा.गारगोटी, प्रा.शा.भाकसरा, प्रा.शा.चक्री, प्रा.शा.खरटवाडी सर्व ता.हदगांव येथील तत्कालीन मुख्याध्यापक व तत्कालीन गट शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री गोरे हया जबाबदार आहेत.

वर नमूद केलेल्या तत्कालीन मुख्याध्यापक यांचेविरुध्द जिल्हा परिषद स्तरावर नियमानुसार अनियमितता केल्याबद्दल प्रशासकीय कारवाई तत्कालीन गट शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री गोरे, हयांचेविरुध्द वर्ग-२ अधिकारी असल्याने त्यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई शासनाकडे प्रस्तावित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

राज्यातील ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याचे उद्दिष्ट गाठणे तसेच प्राथमिक शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता उंचावण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील किरकोळ खर्चाचे प्रमाणे वेतन खर्चाच्या ४ टक्के पर्यंत वाढविण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समिती, हदगावने सन २००८-०९ या वित्तीय वर्षात केंद्रीय प्राथमिक शाळांना ४ टक्के सादीलवार रक्कम रुपये ८,८०,०००/- प्रदान केली आहे. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. पीआरई १०९४/७०४/(दोन)/प्राशि-१, दिनांक १४ नोव्हेंबर १९९४ **(परिशिष्ट ९.१)** नुसार प्रत्येक शाळांना माहे जुन व डिसेंबरच्या वेतन देयकात सादीलवार रक्कम दोन समान हप्त्यात देणे बंधनकारक असताना पंचायत समिती, हदगांव यांनी माहे मार्च मध्ये एकाच हप्त्यात रक्कमा प्रदान करणे, तसेच शासन निर्णयातील इतर बाबींचे उल्लंघन करणे इत्यादी प्रमुख तसेच सादील संबंधित अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न करणे, अखर्चित रक्कम शासन खाती भरणा न करण्यासंदर्भात लेखा आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आले आहेत. याबाबत विभागाने केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने समितीचे मत आहे.

जिल्हा परिषद स्तरावरुनच माहे सप्टेंबर, २००८ व माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये सादीलवार रक्कम पंचायत समिती, हदगांव यांच्याकडे वितरीत करण्यात आली. तालुकास्तरावरील शिक्षण विभागाकडून देयके सादर केल्यानंतर ती तरतूद शाळांना वितरीत करण्यास विलंब झाल्याचे भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले. परंतू लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न देणे, साहित्य खरेदी करतांना जिल्हा परिषद आकस्मिक खर्च अधिनियम, १९६५ च्या कलम ७२ च्या अनुषंगाने परिशिष्ट ६ मधील तरतुदीचे पालन न करणे, साहित्य खरेदी करतांना सीलबंद पाकिटात दरपत्रके मागविलेली नसणे, उक्त शासन निर्णयामधील प्रपत्र अ नुसारच साहित्य खरेदी न करणे, याबाबतीत तत्कालिन २५ शाळांचे मुख्याध्यापक व तत्कालिन गटशिक्षणाधिकारी श्रीमती. जयश्री गोरे यांचेवर चौकशीअंती जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

अखर्चित रक्कम खर्च करण्याकरीता शासनाच्या परवानगीची आवश्यकता असते ही बाब अवगत नसल्याने सदरचा खर्च करण्यात आला असल्याचाखुलासा समितीस अस्वीकार्ह आहे. **चौकशीअंती दोषी आढळेलेल्या मुख्याध्यापकांवर सेवा नियमानुसार कारवाई करण्यात यावी तसेच नांदेड जिल्हा परिषदेकडून तत्कालिन गटशिक्षणाधिका-यावर शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडे सुरु असलेली प्रशासकीय कारवाई कालमर्यादा घालून घेऊन पूर्ण करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. पीआरई १०९४/७०४/(दोन)/प्राशि-१, दिनांक १४ नोव्हेंबर १९९४ मधील सादीलवार खर्चाकरीता घालून दिलेल्या अटी व शर्तीचे काटेकोर अनुपालन करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी आढावा घ्यावा व सादील खर्चाकरीता अनुज्ञेय होणारी रक्कम प्रत्येक शाळेच्या माहे जून व डिसेंबर या महिन्याच्या वेतन देयकामध्ये स्वतंत्रपणे दर्शवून काटेकोरपणे देण्याकरीता आवश्यकता भासल्यास स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करावे व केलेल्या कारवाईची माहिती समितीस १ महिन्यात पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण बावीस

## जिल्हा परिषद, नांदेड

### कोल्हापुरी बंधारा बांधकाम ढोसणी कामातील अनियमितता

**परिच्छेद ३.४३३ (सन २००८-०९)**

कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा ढोसणी येथील कामाची सहा भागात विभागणी करून रुपये २५,७४,७६०/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए-१०९३/प्र.क्र.१५१६/भाग-२/३३ दिनांक २७/४/२००० अन्वये कोणत्याही कामाची विभागणी करू नये असे असतांना सदर कामाचे ६ भागात विभाजन केले आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ व ९९ नुसार प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे. तथापि संचिकेत कागदपत्रे उपलब्ध नाहीत. कामाचे अंदाजपत्रकही उपलब्ध करून दिले नाही.

३. सदरील कामापैकी १, २, ३ व ४ कामाच्या निविदा कधी व कोणत्या पावतीद्वारे खरेदी करण्यात आल्या, निविदा फी/सुरक्षा रक्कमा जिल्हा परिषद खाती भरणा केल्याची खात्री झाली नाही.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १३८ नुसार जाहीर निविदा मागविण्यात आल्या नाहीत.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १३६ नुसार मजूर सहकारी संस्था अट क्र. २, ३, ४ ची पुर्तता करीत असल्याबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४ खालील परिशिष्ट दोन व ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए २००० प्र.क्र.४०२३/ ३३ दिनांक १२ जानेवारी २००१ मधील टिप क्र.१ नूसार स्विकारलेल्या निविदेची माहिती पुढील स्थायी, विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर केली नाही.

७. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे कलम १२६ व शासन निर्णय ग्रामविकास विभाग सीआर २६९२-२८ दिनांक ३/३/१९८६ नुसार वर्क ऑर्डर देणे व करारनामा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पदनामाने करणे आवश्यक असतांना कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे जिल्हा परिषद नांदेड यांचे पदनामाने केलेला आहे.

८. करारनाम्यावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद नसल्यामुळे करारनामा विहित मुदतीत केल्याची व वैध असल्याची खात्री पटविणे व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १४७ नुसार करारनामाची नोंद नमुना क्र.४८ मध्ये नोंद होणे आवश्यक आहे.

९. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग झेडपीए-२०००/प्र.क्र.२७/३३ दिनांक ५/९/२००० मधील परिच्छेद क्र. २ नूसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नांवे काढलेल्या रक्कमेचा रेखांकित धनाकर्ष कंत्राटदाराने निविदेसोबत सादर करणे आवश्यक असतांना व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १३८ (५) नूसार निविदेसोबत इसारा रक्कम प्राप्त झाल्याशिवाय निविदा स्विकारू नये असे असतांना आदेशात पहिल्या देयकातून इसारा व बयाणा रक्कम कपात करावी अशी अट टाकण्यात आली आहे.

१०. शासन निर्णय क्र. जिपर/२०००/प्र.क्र.-८३७/३५ दिनांक ८/५/२००२ अन्वये कंत्राटी काम प्रारंभ करण्यापुर्वी कंत्राटदाराने शासकीय विमा निधीकडे विमा उतरविणे आवश्यक असतांना धावत्या देयकातून रक्कम कपात करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणात कार्यकारी अभियंता व वित्त विभागातील अंतर्गत लेखापरिक्षकांनी नियमाचे पालन केले नाही.

११. सदर कामाचे ब-१ करारात साहित्य खरेदीसाठी रक्कम देण्याची तरतूद नसतांनाही व ठेकेदाराने सिमेंट व स्टीलच्या पुर्ण बाबीचे काम केले नसतांनाही केवळ कंत्राटदाराचे हित जोपासण्यासाठी पहिल्या धावत्या देयकाद्वारे साहित्य पुरवठा केल्याचे दर्शवून रक्कमांचे प्रदान केले आहे.

१२. अनुक्रमांक १ व २ चे कामाची मोजमाप पुस्तिका तपासली असता विभागाने १ टन लोखंड पुरवठा केल्याबाबत एकुण परिमाणातून वजा केले आहे. तथापि लेखी मागणी करुनही साहित्य साठा नोंदवही न दर्शविल्यामुळे सदरील स्टील विभागाने केंव्हा खरेदी केले व त्यापैकी किती विनियोग व पुरवठा केलेल्या साहित्याची रक्कम विहित खाती जमा झाल्याबाबत बोध होत नाही.

१३. शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. पंरास-१००१/प्र.क्र.१६/३८, दिनांक ३१/१/२००१ मधील अनुक्रमांक ८ प्रमाणे कार्यवाही करुन मुदतीत काम पुर्ण केले नसल्यास ठेकेदाराकडुन दंडाची रक्कम कपात करुन देयक प्रदान करणे आवश्यक आहे.

१४. उपरोक्त कामामधून विविध प्रकारच्या कपाती (सुरक्षा ठेव, रॉयल्टी, व्हॅट, आयकर, विमा) केल्या आहेत तथापि योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा केल्याच्या पावत्या दर्शविल्या नाहीत.

१५. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १८० प्रमाणे मोजमाप पुस्तिकेतील मोजमापे प्रदान झाल्यानंतर लाल शाईने कर्णरेषा काढुन मोजणीच्या गोषवा-यावर रक्कम दिल्याची व प्रमाणक क्रमांक, दिनांक यांची नोंद केलेली नाही. त्यामुळे कामासाठी दुबार प्रदान घेण्याची शक्यता आहे.

१६. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ११८ (२) नुसार अंदाजपत्रकापेक्षा जादा कामास सक्षम प्राधिका-यांची पुर्व मान्यता घेणे तसेच १२० (२) नूसार एका कामाची बचत दुस-या कामास वापरु नये असे असतांना भाग ३, ४, ५ मधील विविध बाबीमध्ये रुपये ६१,००७/- ची जादा अदाई झालेली आहे.

१७. मोजमाप पुस्तिका क्र.१२२ चे पृष्ठ क्र.१६ वरील बाब क्र.५ मध्ये गणितीय तपासणीत रुपये २७०/- चे जादा प्रदान झालेले आहे.

१८. शासन निर्णय महसुल व वनविभाग क्र.गोखवि/१०८८/ ४३३/३५९२/ख.दिनांक १८/१०/२००१ व सुधारित आदेशाप्रमाणे विहित दराने गौण खनिजाची रक्कम कामाच्या देयकातुन वसुल केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. कोल्हापुरी बंधारा बांधकाम ढोसणी ता.देगलूर चे काम लवकर पुर्ण व्हावे म्हणुन अधिक्षक अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ कार्यालय औरंगाबाद यांचे पत्र क्र तांशा २ ढोसणी /कोपबं/ विभाजन १०१३/६ दिनांक २४.२.२००६ अन्वये विभाजन प्रस्तावास मान्यता प्रदान केल्यामुळे कामाचे ६ भागात विभाजन करुन पुर्ण करण्यात आले.

२. सदरील कामाचा आदेश क्र १६७/१०९४ दिनांक २४.२.२००६ अन्वये तांत्रीक मान्यता प्राप्त आहे. प्रशासकिय मान्यता आदेश संचीकेत उपलब्ध नसल्यामुळे संबंधीतांना या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/लपा/परास /२०१५-१६/१०६२ दिनांक ३१.८.२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आलेला आहे.

३. अ.क्र १, २, ३ व ४ या कामाचे सर्व निविदा फार्म पुर्णपणे भरणा करण्यात आले आहेत. तसेच निविदा फार्मवर पावती क्र ११०९२६ ते ११०९३१ दि.२८.२.२००६ नमुद केला आहे. सदर रक्कम १९.७.२००६ रोजी चलनाद्वारे भरणा केली आहे. चलनाची छायांकित प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

४. शासन निर्णय दिनांक १.२.२००६ अनुसार सदर काम हे ५.०० लक्षच्या आत असल्यामुळे मजुर सहकारी संस्थेस देण्यात आली आहे. त्यामुळे निविदा मागविण्यात आल्या नाहीत.

५. काम वाटप समितीने अट क्र २, ३, ४ या अटीची पुर्तता होत असल्याची खातरजमा करुन मजुर सहकारी संस्थेस काम वाटप केले आहे.

६. प्रत्येक महिन्यात होणा-या स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीत लघुपाटबंधारे कामाच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात येतो. सदर बैठकीत स्विकारण्यात आलेल्या निविदांचा आढावा घेण्यात येतो.

७. सदरील अधिनियमान्वये लघुपाटबंधारे विभागातील कामाचे कार्यारंभ आदेश देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र ZPN/GAD/EST-१/१९७७/१०९१८ दिनांक ०९/११/१९७७ अन्वये कामाचे कार्यारंभ आदेश देण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यकारी अभियंता यांनी कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित केले आहेत.

८. सदरील कामाचा करारनामा ८ मार्च २००६ रोजी करण्यात आला आहे. सदर कराराची नोंद नमुना क्र. ४८ मध्ये घेण्यात आली आहे. सदर अभिलेखे अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

९. कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याच्या तारखेपर्यंत संबंधीत मजुर सहकारी संस्थेने बयाना रक्कमेचा धनाकर्ष न दिल्यामुळे पहिल्या धावत्या देयकातुन इसारा रक्कम व बयाना रक्कम कपात करुन ठेव शिर्षाकाखाली जमा करण्यात आले आहे. यापुढे काम करणा-या एजन्सीकडुन इसारा रक्कम प्राप्त करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

१०. विमा संचालक शासकिय विमा निधी विमा संचालनालय मुंबई यांनी दिलेल्या मार्गदर्शन सुचने प्रमाणे कार्यारंभ आदेश निर्गमित केल्यानंतर प्रत्यक्ष कामास प्रारंभ करण्यापुर्वी कंत्राटदाराने विमा उतरविला नसल्यास विमा हप्त्यापोटी कंत्राटी कामाच्या निविदा रक्कमेवर १% या दराने विमा हप्ता रक्कम कपात करण्याची तरतुद आहे. नमुद करण्यात आलेल्या तरतुदीनुसार देयकातुन १% रक्कम कपात करण्यात आली आहे.

११. महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम लेखसंहीता नियम क्र १०.२.२१ (क) अनुसार कंत्राटदाराला बांधकामाच्या जागेवर आणलेल्या बांधकामाचे साहित्यासाठी अगाऊ रक्कम देण्याची तरतुद आहे. सदरील कामाचे पहिल्या धावत्या देयकाद्वारे स्टिल सिमेंट खरेदीबाबत प्रदान असून उपअभियंता यांनी सदर स्टिल व सिमेंट हे सेक्युअर्ड ॲडव्हान्स असल्याबाबत मोजमाप पुस्तीकेत प्रमाणपत्र दिले आहे. खरेदी केलेल्या व स्टिलचा वापर शेडयुल बी मधील बाबीवर करुन पहिल्या धावत्या देयकाद्वारे प्रदान केलेली रक्कम पुढील धावत्या देयकामधुन समायेजीत केली आहे. अंतिम देयक शेडयुल बी प्रमाणे असून शेक्युअर्ड अडव्हान्सची प्रथम धावत्या देयकातुन संपुर्ण वसुल झाली आहे.

१२. उप विभागाकडे उपलब्ध असलेल्या स्टिल पैकी १ टन् स्टिल सदर कामावर वापरुन कामाच्या परिमाणातुन वजा केली आहे. रिकव्हरी स्टेटमेंट उपविभागाकडे पंजिकेत आहे. साठा नोंदवही उपलब्ध आहे.

१३. उपविभागीय अभियंता देगलूर यांचे कडुन प्राप्त झालेल्या शिफारस प्रस्तावाप्रमाणे कार्यकारी अभियंता यांचे अभिप्राय विचारात घेऊन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने विनादंड मुदतवाढ प्रस्ताव मान्य करण्यात आले आहे.

१४. उपरोक्त कामामधुन कपात केलेले धनादेश वित्त विभागा मार्फत संबंधीत कार्यालयास पाठविण्यात आले आहे. त्याची योग्य त्या नोंदवह्यात नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. याची खातरजमा करण्यात आली आहे.

१५. मोजमाप पुस्तिकेतील मोजमापे प्रदान झाल्यानंतर त्यावर लाल शाईने कर्णरेषा काढून न चुकता खोडून टाकण्यात आली नाही. ही वस्तुस्थिती आहे. लेखा परिक्षणात सदरील बाब निदर्शनास आल्यानंतर कंत्राटदाराला दुबार रक्कम प्रदान होऊ नये म्हणुन मोजमाप पुस्तीकेत लाल शाईने कर्णरेषा काढून प्रमाणक क्रमांक व दिनांक दर्शविण्यात आला आहे. अशा प्रकारची चुक केल्याबाबत संबंधीतांना या कार्यालयाचे पत्र क्र जा.क्र. जिपना/परास/२०१५-१६/१०७६ दिनांक ३१.८.२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आलेला आहे.

१६. कार्यकारी अभियंता/ उपअभियंता यांनी प्रत्यक्ष कामाच्या भेटीच्या वेळी तोंडी सुचना दिल्यानुसार अंदाजपत्रकापेक्षा जादा काम केले आहे. जादा कामास नंतर मान्यता घेतली आहे. संपुर्ण कामाचे अंदाजपत्रक एकच असल्यामुळे एका कामाची बचत दुस-या कामासाठी वापरुन अंदाजपत्रकाचे आणि कार्यारंभ आदेशाचे रक्कमेच्या मर्यादेत काम पुर्ण करुन घेण्यात आले आहे. एका कामावर होणारी बचत दुस-या कामावर वापरण्याचा रक्कमेस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी समक्ष मान्यता दिली आहे. समक्ष मान्यतेसंबंधी नस्ती अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

१७. वसुल पात्र रक्कम रु २७०/- वसुल करुन शासनखाती भरणा करण्यात आली आहे.

१८. सदरील देयकातुन गौण खनीज रक्कम कपात करण्यात आलेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे संबंधीत उप विभागीय अभियंता यांना या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र. जिपना/लपा/ परास/ २०१५-१६/१०५९ दिनांक ३१.८.२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे.

सद्यस्थितीत कोल्हापुरी बंधारा ढोसणी ता. देगलूर हा बंधारा चांगले स्थितीत असून त्यामध्ये पाणी साठवण व्यवस्थीत प्रकारे होते.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभागाच्या दि.२७/४/२००० रोजीच्या शासन निर्णयान्वये कामाची विभागणी करण्यास मनाई असताना बंधा-याच्या कामाची ६ भागात विभागणी कोणत्या प्राधिकारानुसार केली. कामाच्या प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यतांचा तपशील व अंदाजपत्रक लेखा परीक्षणास का उपलब्ध करून दिले नाही, कामाचे आदेश देण्यापूर्वी सुरक्षा अनामत घेणे आवश्यक असताना ती न घेताच कामाचे नियमबाह्य आदेश कसे दिले ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदरहू काम हे केटी वेअरचे आहे. कामाची गरज लक्षात घेऊन आणि सदरहू काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने अधीक्षक अभियंता यांची मान्यता घेऊन कामाचे ६ तुकडे पाडण्यात आले. मुळात कामाचे तुकडे पाडणे हे चुकीचे आहे. आता सदरहू काम पूर्ण करण्यात आलेले आहे. खरे म्हणजे या बंधा-याची सहा विभागात विभागणी करावयास नको होती.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, खरे म्हणजे हे काम एकच ठेकेदार पूर्ण करु शकत होता. एका बंधा-याचे काम सहा ठेकेदार कसे काय करु शकतात ? यावर कार्यकारी अभियंता यांनी या कामाची निविदा मागविण्यात आली होती. ही कामे लवकर पूर्ण व्हावी यासाठी तुकडे पाडण्याचा प्रस्ताव अध्यक्ष कार्यालयात सादर करण्यात आला. असल्याचे तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या सहा तुकडयांना अधीक्षक अभियंत्यांनी संमती दिली होती. १) डाव्या तीरावरील सा.क्र.२०मीटर ते ८० मीटर मधील भराव काम, दगडी अस्तरीकरण व कॉंक्रीट लाईनिंगची कामे रु.४,६१,१४६/- २) डाव्या तीरावरील सा.क्र. ० मीटर ते २० मीटर मधील भरावकाम, दगडी अस्तरीकरण व क्रॉक्रीट लाईनिंगची कामे व उर्ध्व बाजूचे कठीण खडकातील अडथळा निर्मूलनाचे काम रु.४,०५,१६३/-३) सा.क्र. ० मीटर ते ३७ मीटर लांबीतील को.प. बंधा-यावरील स्लॅब, विवरींग कोट, फॉर्म वर्क व इतर आनुषंगिक कामे.३,७६,८४८/- ४) सा.क्र. ३७ ते ७४ मीटर लांबीतील को.प.बंधा-यावरील स्लॅब,विवरींग कोट,फॉर्म वर्क व इतर शिल्लक बांबीची कामे रु.३,७६,८९८/- ५) डाव्या तीरावरील पक्ष भिंतींची बांधकामे रु.४,९९,२७५/- ६) उजव्या तीरावरील पक्ष भिंतींची बांधकामे, भरावकाम, दगडी अस्तरीकरण व क्रॉक्रीट लाईनिंगची कामे रु.४,५५,३२७/- ही कामे छत्रपती मजूर सह. संस्था, बेट मोगरा, ता.मुखेड. डॉ.हेगडेवार मजूर सह.संस्था, मुखेड तसेच व्यंकटेश मजूर सह.संस्था, नागराळा, ता.देगलूर या तीन संस्थांना प्रत्येकी दोन दोन कामे देण्यात आली होती. या तीनही संस्थांना जिल्हा उपनिबंधकांनी मान्यता दिली होती.

तुकडे पाडण्याचे काम नियमबाह्य झालेले आहे. नियमाच्या बाहेर जाऊन अधिका-यांनी परवानगी दिली आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करुन ज्यांनी परवानगी मागितली, ज्यांनी परवानगी दिली अशा सर्वांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणी तुकडे पाडण्याचे काम नियमबाहय झालेले असुन सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करुन ज्यानी परवानगी दिली अशा सर्वावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार संबंधीत अधिका-याविरुध्द कारवाई करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने मुळ संबंधीत विभागाने पाठविला आहे. उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा ढोसणी, तालुका देगलूर हे अपूर्ण अवस्थेतील काम वित्तीय वर्षात पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातुन कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद नांदेड यांनी पत्र क्र. जिपनालपा/२३८ दिनांक १/२/२००६ अन्वये अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, औरंगाबाद यांच्या कामाचे भाग पाडण्याच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेकडे मजूर सहकारी सोसायटीला कामे देण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला. त्यानुसार त्याची मजुर सोसायटीची शिफारस प्राप्त झाल्यानंतर सदर मजूर सोसायटीमार्फत कामे पूर्ण करुन घेण्यात आली. प्रस्तुत कामाचे भाग पाडण्याची शिफारस तत्कालिन कार्यकारी अभियंता यांनी केली असून सध्या ते मयत आहेत.

शासन परिपत्रक क्र.झेडपीए/१०९३/प्र.क्र./१५१६,भाग-२-३३ दिनांक ३०/४/२००० मधील तरतूदीचा आधार न घेता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड यांनी ढोसणी कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याच्या उर्वरित कामाच्या ६ भागात केलेल्या विभाजन कामास मजूर सहकारी संस्थांची शिफारस केली आहे. जिल्हा उपनिबंधक नांदेड यांनी उर्वरित कामाची सद्यस्थिती विचारात घेतलेली दिसत नाही. यासंबंधात जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड यांच्यानियमबाहय कृतीबाबत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद नांदेड यांना पत्र क्र.जिपना/ लपा/ पंरास, १५३३/ दिनांक २०१५/१२/०७ अन्वये उप संचालक साखर औरंगाबाद यांच्याकडे कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला आहे. खुलासा अप्राप्त असल्याने श्री.बी.एस.जाधव, तत्कालीन जिल्हा उपनिबंधक नांदेड यांच्याविरुध्द कार्यवाही करणेसाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी पत्र क्र.जिपना/ लपा/ पंरास, २०१५/१६०६दिनांक २०१५ /१२/१९ अन्वये सचिव, सहकार, मंत्रालय, मुंबई यांना कळविले आहे. शासन परिपत्रक क्र.झेडपीए/१०९३/प्र.क्र./१५१६, भाग-२-३३ दिनांक २०००/४/२७ मधील तरतूदीमध्ये कामाचे तुकडे पाडण्यात येऊ नये असे नमूद करण्यात आले आहे तरी श्री.जे.एम लिहितकर, तत्कालिन अधीक्षक अभियंता यांनी शासन परिपत्रकातील तरतूदीचे उल्लंघन करुन उर्वरित कामाच्या ६ भागात होणा-या विभाजन प्रस्तावास मान्यता दिली आहे. या संबंधात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी पत्र क्र.जिपना/ लपा/ पंरास, १५४४/ दिनांक २०१५/ १२/५ अन्वये खुलासा मागविण्यात आला होता परंतु सदर खुलासा अप्राप्त असल्याने त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी पत्र क्र.जिपना/ लपा/ पंरास, १६०५/२०१५ दिनांक २०१५ / १२/१९ अन्वये सचिव, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई यांना कळविले आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाचे अवलोकन केले असता, तत्कालिन जिल्हा उपनिबंधक नांदेड व तत्कालिन अधीक्षक अभियंता यांचे संदर्भाने विहित कार्यपध्दतीनुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेमार्फत संबंधित प्रशासनिक विभागाकडे संबंधित अधिका-यांविरुध्दच्या विभागीय चौकशी संदर्भाने दोषारोपांसह प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते.

**चौकशी अहवाल**

दिनांक १३.०९.२०१५ रोजी मा.पंचायती राज समिती यांची जिल्हा परिषद, नांदेड येथे झालेल्या आढावा बैठकीत मौ ढोसणी ता.देगळूर येथील कोल्हापूर बंधारा कामाचे सहा भागात तुकडे पाडून काम पूर्ण केले बाबत आक्षेप घेण्यात आला व त्या अनुषंगाने सविस्त चौकशी करुन वस्तुस्थिती अहवाल समितीसमोर ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्या अनुषंगाने कोल्हापुर बंधारा ढोसणी ता.देगळूर कामाची संचिका तपासून ज्या बाबी आढळून आल्या त्यावरुन खालील प्रमाणे कोल्हापूर बंधारा ढोसणी अनियमीतता बाबतचा अहवाल सादर करण्यात येत आहे.

१) सदरील कामास मुळ तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता सन १९८९-९० मध्ये प्रदान करण्यात आले. मुळ प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये ९.९९ लक्ष एवढी होती.

२) द्वितीय सुधारीत ता.मा. दिनांक १८.३.१९९३ व द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक २६.३.१९९३ रोजी रुपये २४.९५ लक्ष एवढया किमतीस प्रदान करण्यात आले.

३) तिसरे सुधारीत तांत्रिक मान्यता मा.अधिक्षक अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ कार्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक १०.२.१९९९ रोजी रुपये ३७.९९ लक्ष ऐवढया किमतीस प्रदान केले होते व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ३२९ दिनांक ४.१२.१९९९ अन्वये रु.४७.६६ लक्ष एवढया किमतीस तिसरी सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती.

४) तब्बल नऊ वर्षानंतर सदरील बंधा-याचे दोन्ही तिरावरील गुंताव व पक्ष भिंतीचे काम, बाजु भरावाचे काम व संपुर्ण स्लॅपचे काम शिल्लक राहिलेले होते. काम वेळेवर पूर्ण न झाल्याने सदरील कामाच्या किंमतीत दरवर्षी वाढ होत होती. नऊ वर्षामध्ये काम वेळेवर पूर्ण न झाल्याने कामाच्या किंमतीत रु.३७.६७ लक्षने वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

५) सदरील संचीकेवरुन असे निदेशनास येते की, तिसरे सुधारीत अंदाजपत्रकास रितसर मान्यता घेतल्यानंतर सदर

कामाची निविदा प्रसिध्द केल्यानंतर सदर कामास ठेकेदाराचा प्रतिसाद मिळाला नाही. सदरील काम नऊ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असल्याने कामास ठेकेदारांचा प्रतिसाद मिळाला नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

६) सदरील अपूर्ण काम हे लेंडी नदीवर असल्याने प्रत्येक वर्षी कामाची हानी होत होती.

७) सदरील काम पूर्ण करण्यासाठी तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सुधारीत दर सूची वर्ष २००३-२००४ प्रमाणे चौथे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास मा.अधिक्षक अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ कार्यालय, औरंगाबाद यांची तांत्रिक मान्यता आदेश क्रमांक १६७ दिनांक २४.२.२००६ प्रमाणे रु. ५१.२१ लक्ष ऐवढया रक्कमेस मंजूरी घेण्यात आली व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक २७.०३.२००६ अन्वये रुपये ५६,३३,८००/- एवढया रक्कमेस चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

८) सन २००६ पर्यंत सदरील कामाची किमंत रु. ९.९९ लक्षवरुन रु. ५६.३३ लक्ष एवढी झाली होती. यामध्ये उर्वरित कामाची किंमत रु. २५.७४ लक्ष एवढी होती.

९) सन २००० मध्ये कंत्राटदारांचा सदरील अपूर्ण कामाच्या निवीदेस प्रतिसाद न मिळाल्याने याच बाबीस प्रमाण मानुन तत्कालीन कार्यकारी अभियंता मयत श्री. एस. आर. मुखेडकर यांनी सदरील कामाचे भाग पाडून त्यास काम लवकर पूर्ण होण्याचा दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून व दरवर्षी कामाच्या किमतीत होणारी वाढ लक्षात घेऊन मा.अधिक्षक अभियंता यांची मान्यता घेतली. सदरील भाग पाडण्याच्या प्रस्तावास तत्कालीन श्री. लिहीतकर जे. एम. यानी कार्यालयीन पत्र क्रमांक १०१२ दिनांक २४/०२/२००६ अन्वये कामाच्या विभाजन प्रस्तावास मान्यता दिली.

१०) सदरील कामाचे विभाजन खालीलप्रमाणे करण्यात आले असुन सदरील प्रत्येक भागाचे काम मजुर सहकारी संस्थेस देण्यात आले आहे त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | काम मंजुर करण्यात आलेले मजुर सहकारी संस्थेचे नाव | उर्वरीत कामाचे भाग पाडुन आलेली किंमत रु. लक्ष |
|---|---|---|
| १) | छत्रपती मजुर सहकारी संस्था म.बेटमोगरा ता.मुखेड | ४.६१ |
| २) | छत्रपती मजुर सहकारी संस्था म.बेटमोगरा ता.मुखेड | ४.०५ |
| ३) | डॉ.हेडगेवार मजुर सहकारी संस्था म.मुखेड ता.मुखेड | ३.७७ |
| ४) | डॉ.हेडगेवार मजुर सहकारी संस्था म. .मुखेड ता. मुखेड | ३.७७ |
| ५) | व्यंकटेश्वरा मजुर सहकारी संस्था म.नागराळा ता.देगलूर | ४.९९ |
| ६) | व्यंकटेश्वरा मजुर सहकारी संस्था म.नागराळा ता.देगलूर | ४.५५ |
| | **एकूण रु.** | **२५.७४ लक्ष** |

उपरोक्त कामाचे वाटप हे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड यांनी केले आहे.

११) शासन परिपत्रक झेडपीए १०९३/प्र.क्र./१५१६ (भाग २)/३३ मंत्रालय, मुंबई दिनांक २७.४.२००० अन्वये कामाचे कोणत्याही परिस्थितीत तुकडे पाडुन काम करण्यात येऊ नयेत. जाहीर निविदा काढुन निकोप स्पर्धेतुन कामे करण्यात यावीत असे शासनाचे या परिपत्रकामागचे धोरण आहे.

तथापि सदरील काम हे १६ वर्षापासुन अर्धवट स्थितीत होते. काम अर्धवट असल्याने कामातील शासनाची रक्कम गुंतुन पडलेली होती. व त्यावर झालेला खर्च निष्फळ ठरण्याची शक्यता होती. याशिवाय सदरील बंधा-यामुळे १०० हेक्टर शेती सिंचनाखाली येणार होती. आजच्या स्थितीस बंधारा सुस्थितीत असुन त्याचा लाभ शेतक-यांना होत आहे.

तथापि प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास येते. अशा अपवादात्मक परिस्थितीत तत्कालीन कार्यकारी अभियंता मयत श्री.एस.आर.मुखेडकर यांनी भाग पाडण्याच्या प्रस्तावास शासनाची मान्यता घेणे अपेक्षीत होते. परंतु तसे न करता त्यांनी अधिक्षक अभियंता यांची मान्यता घेतली. त्या अनुषंगाने तत्कालीन अधिक्षक अभियंता सेवा निवृत्त श्री.जे.एम.लीहीतकर यांचा खुलासा मागविण्यात आलेला होता. त्यांचा खुलासा अप्राप्त आहे. त्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र. जिपना/लपवि/पंरास/१६०५/२०१५ दिनांक १९/१२/२०१५ अन्वये मा. सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय विभाग, मुंबई यांना योग्य त्या कारवाईबाबत कळविले आहे तसेच तत्कालीन जिल्हा उपनिबंधक श्री.बि.एस.जाधव यांचा खुलासा मागविण्यात आलेला होता तो अप्राप्त असल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्रमांक जिपना/लपावि/पंरास १६०६/२०१५ दिनांक १९/१२/२०१५ अन्वये मा.सचिव सहकार व वस्त्रोद्योग मंत्रालय मुंबई यांना कार्यवाहीस्तव कळविले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने कोल्हापूरी बंधा-यासंबंधीचा एक मुद्दा आहे त्याबाबतचा खुलासा करण्यात यावा असे निर्देश दिले असता विभागीय सचिवांनी सदरहू प्रकरणी जबाबदार असलेल्या दोन व्यक्तींचा खुलासा प्राप्त झाला असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव माननीय विभागीय आयुक्त यांचेकडे दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजी पाठविण्यात आला आहे. दोघांच्या विरुध्द दोषारोपपत्र तयार करण्यात आले असल्याचे समितीस विदित केले.

## अभिप्राय व शिफारशी

ग्रामविकास विभागाच्या दिनांक २७ एप्रिल, २००० रोजीच्या शासन निर्णयान्वये (परिशिष्ट १०.१) जिल्हा परिषदेने कोणत्याही कामाची विभागणी करु नये असे निर्बंध घातलेले असतानाही जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, ढोसणी, तालुका देगलूर या कामाची सहा भागात विभागणी केली असल्याचा प्रमुख आक्षेप प्रस्तुत प्रकरणात आढळून आला. तसेच प्रस्तुत कामास लेखासंहिता कलम १२५ व ९९ नुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता व अंदाजपत्रक लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणे, कामाच्या निविदा न मागविणे, स्वीकारलेल्या निविदेची माहिती स्थायी विषय समितीसमोर न ठेवणे, इसारा रक्कम प्राप्त झाल्याशिवाय निविदा स्वीकारणे, कामाचा विमा न उतरविणे, ब-१ करारात साहित्य खरेदी करीता रक्कम अदा करणे, मुदतीत काम पूर्ण झाले नसल्याप्रकरणी ठेकेदाराकडून दंड आकारणे, मोजमाप पुस्तिकेत लाल शाईने कर्णरेषा काढलेल्या नसणे, वाढीव कामास सक्षम प्राधिका-याची पूर्वमान्यता न घेणे, गौणखनिजाची रक्कम देयकातून वसूल केलेली नसणे इत्यादी अनेक अनियमितता प्रस्तुत प्रकरणात झाल्याचे समितीस आढळून आले आहे. त्यामुळे या प्रकरणी सर्व संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

प्रस्तुत कामातील मोठ्या प्रमाणावर झालेल्या अनियमिततेच्या पार्श्वभुमीवर समितीने या प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते. सदरहू चौकशीचा अहवाल समितीस सादर करण्यात आला त्यावरुन कोल्हापूर पध्दती बंधारा ढोसणी, तालुका देगलूर या कामास सन १९८९-९० मध्ये मुळ तांत्रिक व प्रशासकीय मान्यता रुपये ९.९९ लक्ष एवढी होती. तद्नंतर दोन वेळा सुधारीत तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येवूनही व नऊ वर्षानंतरही बंधा-याच्या दोन्ही तीरावरील गुंताव व पक्षभिंतींचे, बाजू भरावाचे व स्लॅपचे काम शिल्लक राहिले होते. वेळेवर काम पूर्ण न झाल्यामुळे कामाच्या किंमतीत ३७.६७ लक्ष रुपयांनी वाढ झाली. तिस-यांदा सुधारीत प्रशासकीय मान्यता व तात्रिक मान्यता प्राप्त केल्यानंतरही कामाच्या निविदेस प्रतिसाद मिळाला नाही. परिणामी, लेंढी नदीवरील कामाची प्रत्येक वर्षी हानी होत गेली. तत्कालिन कार्यकारी अभियंत्यांनी दिनांक २७ मार्च, २००६ रोजी ५६,३३,८००/- एवढ्या रकमेस चौथ्यांदा सुधारीत मान्यता घेतली. सन २००० मध्ये कंत्राटदारांनी अपूर्ण कामाच्या निविदेस प्रतिसाद दिला नसल्यामुळे काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून तसेच दरवर्षी कामाच्या किंमतीत होत असलेली वाढ लक्षात घेऊन तत्कालिन कार्यकारी अभियंत्यांनी कामाचे विभाजन करण्याच्या प्रस्तावास अधिक्षक अभियंत्यांची मान्यता घेतली.

सदरील काम हे १६ वर्षापासून अर्धवट स्थितीत असणे, शासनाची रक्कम गुंतून झालेला खर्च निष्फळ ठरण्याची शक्यता शिवाय बंधा-यामुळे १०० हेक्टर सिंचन क्षमता वाढणार असल्यामुळे सदरहू निर्णय घेतला असून सद्यस्थितीत बंधारा सुस्थितीत असून त्याचा लाभ शेतक-यांना होत असल्याचे चौकशी अहवालात नमूद आहे. शासन परिपत्रक दिनांक २७ एप्रिल,२००० अनुसार कोणत्याही कामाची विभागणी करु नये. जाहिर निविदा काढून निकोप स्पर्धेतून कामे करावीत असे शासनाचे या परिपत्रकामागचे धोरण आहे. सदरचा बंधारा पूर्ण झाला असून त्याद्वारे लाभार्थी, शेतकरी सिंचनाचा लाभ घेत आहेत ही बाब समितीला सुखावणारी आहे. समितीच्या मते एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत शासनाचा निधी निष्फळ जावू नये तसेच कामामुळे होत असलेले व्यापक जनहित लक्षात घेता वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले काम एखाद्या अधिका-याने जाणीवपूर्वक शेतक-यांना लाभ देण्याच्या दृष्टीने केले असल्यास अशा अधिका-यावर कारवाई होऊ नये असे समितीला मनोमन वाटते. त्यामुळे केवळ जनहिताच्या दृष्टीने काम केले असल्यामुळे याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करते.

प्रकरण तेवीस

## जिल्हा परिषद, नांदेड

### भारत निर्माण योजनेअंतर्गत पुरेसे अनुदान उपलब्ध नसतांना नियमबाह्य अनुदानापेक्षा अधिक रक्कमांचे प्रस्ताव मंजूर केल्याबाबत

**परिच्छेद ३.५६५ (सन २००८-०९)**

जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत पाणीपुरवठा विभाग यांनी शासकीय अनुदान उपलब्ध नसतांना नविन प्रस्ताव मंजूर करुन रुपये ४,४१७ लक्षाचे दायित्व निर्माण केले आहे. याबाबत अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.परास-१००१/प्र.क्र.-०६/३८, दिनांक ३१ जानेवारी २००१ अन्वये जिल्हा परिषदेने त्यांचेकडील बांधकामाचे नियोजन करतांना अपूर्ण कामासाठी आर्थिक वर्षाच्या तरतूदीपैकी ७० टक्के निधी अपूर्ण कामासाठी ठेवावा असे स्पष्ट असतांना शिल्लक अनुदानापेक्षा जादा खर्चाचे प्रस्ताव मंजूर केले आहेत.

२. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-१०८९/प्र.क्र.२९५७/२८, दिनांक ९ जून १९८९ अन्वये मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याची विचार विनिमय केल्याशिवाय कोणताही व्यवहार, प्रकल्प किंवा प्रस्ताव हाती घेण्यात येणार नाही असे स्पष्ट असतांना त्या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

३. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी २००१ चे उल्लंघन करुन किती योजना मंजूर करण्यात आलेल्या आहेत. शासनाकडून निधी उपलब्ध करण्यासाठी योजलेली उपाय योजना तसेच जे प्रस्ताव आर्थिक निधी उपलब्ध नसतांना अपूर्ण अवस्थेत आहेत व निधीमुळे नवीन दराने अंदाजपत्रकानुसार करावयाची अदाईची रक्कम परिगणित करणे आवश्यक आहे.

४. उपलब्ध निधीचा विचार न करता नविन प्रस्ताव मंजूर केल्यामुळे शासनाने लोकोपयोगी व उदात्त भावनेने सुरु केलेली योजना निधी अभावी अपूर्ण असल्याने शासनाचा उद्देश सफल होत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. भारत निर्माण कार्यक्रम सन २००६ पासून सुरू झालेला असून सदर कार्यक्रम पाणी पुरवठा योजनांसाठी आहे. सदर कार्यक्रम लोकसहभागावर आधारित असून ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत योजनेचे काम करणे अपेक्षित आहे. जिल्ह्यात घ्यावयाच्या पाणी पुरवठ्याच्या उपाय योजनांबाबत दरवर्षी कृती आराखडा तयार करुन शासनास सादर करण्यात येतो. जिल्हा परिषदेकडून सादर झालेल्या आराखड्याचा शासन स्तरावर विचार करुन निधी उपलब्धतेनुसार आराखड्यातील आवश्यक योजनांना शासनाकडून मंजूरी दिली जाते. २००८-०९ आराखड्याचा या वर्षातील तपशिल पुढील प्रमाणे आहे.

सन २००८-२००९ मधील मंजूर झालेला आराखडा (रु.लक्षात) :-

| बाब<br>(१) | मंजूर योजना<br>(२) | लागणारा निधी<br>(३) | पुर्वीची शिल्लक<br>(४) | प्राप्त निधी<br>(५) | एकूण प्राप्त निधी<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| २००७-०८ पर्यंतची अर्धवट कामे | ३१५ | २८४५.०० | ६४७.७६ | २१९७.२४ | २८४५.०० |
| नविन प्रस्तावित कामे | १६८ | १७९५.९२ | — | १७९५.९२ | १७९५.९२ |
| एकूण . . | ४८३ | ४६४०.९२ | ६४७.७६ | ३९९३.१६ | ४६४०.९२ |

सन २००८-२००९ मध्ये शासनाकडे निधीची केलेली मागणी प्राप्त निधी इ. तपशिल खालील प्रमाणे आहे. (रु.लक्षात)

| पुर्वीची शिल्लक (१) | प्राप्त निधी (२) | एकूण उपलब्ध निधी (३) | झालेला खर्च (४) | शिल्लक निधी (५) |
|---|---|---|---|---|
| ६४७.७६ | ३९९३.१६ | ४६४०.९२ | ४३५९.१७ | २८१.७५ |

वरिल प्रमाणे आवश्यकतेनुसार शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे.

२. भारत निर्माण योजनेमध्ये कोणती कामे घ्यावीत व त्या कामांना किती निधी देण्यात आला आहे हे शासन स्तरावरुन निश्चित केले जाते. त्याप्रमाणे सदरिल शासन निर्णयानुसार प्रत्येक कामासंबंधीच्या संचिकेवर वित्त विभागाशी विचार विनिमय करुन व अभिप्राय घेवून निधी वितरित करण्यात येतो.

३. भारत निर्माण कार्यक्रम अंतर्गत योजना मंजूर करण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनाला आहेत. सन २००८-२००९ या वर्षी शासनाने पुर्वीची शिल्लक ६४७.७६ लक्ष असतांना प्रत्यक्ष आराखडा ४६४०.९२ लक्ष रुपयांचा आराखडा मंजूर केला व त्यापैकी रु. ४३५९.७६ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. त्यामुळे २००९-२०१० या वर्षात रु. २८१.७५ लक्ष शिल्लक होते. या वस्तुस्थितीचा विचार करता नवीन दराने अदाईची रक्कम परिगणीत करण्याची आवश्यकता भासली नाही. तसेच निधी अभावी कोणतीही योजना अपूर्णावस्थेत नाही.

४. सन २००८-०९ मध्ये रु.४६४०.९२ लक्ष एवढी तरतूद उपलब्ध होती व त्यानुषंगाने खर्च रु.४३५९.१७ लक्ष झालेला आहे. निधी अभावी योजना अपूर्णावस्थेत राहत नाही. यामुळे शासनाचा उद्‌देश सफल झालेला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, २००७-०८ व २००८-०९ मधील भारत निर्माण योजनेंतर्गत विभागाकडील कामांची संख्या किती आहे, या कामांची सद्यःस्थिती काय आहे, यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, २००८-०९ मध्ये एकूण ४८३ कामे होती, त्यापैकी १९ कामे पूर्ण झाली. २००९-१० मध्ये ४६४ कामांपैकी ८१ कामे पूर्ण झाली. २०१०-११ मध्ये ३८३ कामे शिल्लक होती, त्यातील २५३ कामे पूर्ण झाली व १३० कामे शिल्लक होती. आज अखेर ४८३ पैकी १७ कामे शिल्लक आहेत. २.८१ कोटी रुपये शिल्लक राहिले, त्याचे काय केले ते पैसे पुढील वर्षी वापरले आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, १७ कामे शिल्लक आहेत त्याबाबत काय करता येईल यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खरोखर यामध्ये अडचण असल्याचे कबुल करुन वास्तव पाहिले तर ५० हजार रुपयेची खरेदी करावयाची असेल तरी ई-टेंडर काढावे लागते. २ लाखाचा निधी देखील कार्यालयांना उपलब्ध होत नाही. तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर समित्यांना कितीही निधी लगेच उपलब्ध होतो. ज्या समित्या स्थापन झाल्या त्यात पदसिध्द सरपंच, पंचायत समिती सदस्य असतात. यामध्ये जबाबदारी निश्चित करणे अवघड होते. जी कामे मागे राहिली आहेत त्याबाबत तांत्रिक आधार नाही, तांत्रिक मनुष्यबळ नाही. कोट्यवधी रुपयांचा निधी समित्यांकडे जातो ही वस्तुस्थिती समितीला विशद केली. समितीने महाराष्ट्रातील पाणी पुरवठ्याच्या योजना निव्वळ पाणी पुरवठा समित्यांमुळे रखडल्या आहेत. त्यांना प्रचंड अधिकार दिले आहेत. काम न करता २५-२५ लाख रुपये उचलले जातात ही बाब अधोरेखीत केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १०० पैकी ८० कामे झाली आहेत. जी कामे शिल्लक आहेत त्या गावातील पाण्याचा प्रश्न सोडवावा लागतो. ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती काम करीत नाही त्यामुळे जिल्हा परिषदेला काम करावे लागते ही वस्तुस्थिती विशद केली.

आपल्याकडे जेवढ्या पाणी पुरवठा योजना मंजूर झाल्या होत्या, त्यातील ज्या योजना रखडल्या त्याची कारणे काय आहेत हे नांदेड जिल्हा परिषदेच्या अनुभवासहित समितीला कळवावे. भविष्यकाळाच्या दृष्टीने कोणती मार्गदर्शक तत्वे दिल्या पाहिजेत, यावर कोणाचे नियंत्रण असले पाहिजे याबाबत समितीमार्फत शासनास शिफारस केली जाईल असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

नांदेड जिल्ह्यात तसेच संपूर्ण राज्यात पाणी पुरवठा योजना रखडल्या असून त्याकरिता निधीची कमतरता, पाणी पुरवठा समित्यांमधील वाद, तांत्रिक ज्ञानाचा अभाव इ.कारणे समितीच्या निदर्शनास आली आहेत. भविष्यकाळात ग्रामीण, शहरी या सर्व पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याकरिता प्रभावी नियंत्रण असणे आवश्यक आहे. याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

भारत निर्माण कार्यक्रम सन २००५ ते २००९ या कालावधीकरिता आणि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१० पासून चालु झालेला आहे. सदरील कामे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येतात. योजना अपूर्ण राहण्याची कारणे खालील प्रमाणे आहे.

(१) समितीमधील अंतर्गत वाद.

(२) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीनंतर नविन समिती गठीत झाल्यानंतर नवीन समितीस हिशोब देण्यास होणारा विलंब.

(३) समितीस बँकेतून रक्कम काढण्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव शासन निर्णय दिनांक ०२ डिसेंबर, २०११ अन्वये बंधनकारक केले होते. त्यामुळे शासन अनुदान ग्रामपंचायतीमार्फत समितीच्या खात्यामध्ये जमा करण्यास होणारा विलंब.

(४) शासन निर्णय दि.१२.०८.२००९ अन्वये समितीचे पदसिध्द अध्यक्षपदी सरपंच व पदसिध्द पदी ग्रामसेवक राहतील असा निर्णय दिला आहे. त्याविरोधात समितीने न्यायालयात धाव घेतल्याने शासन निर्णय दि. १५.१०.२०१० अन्वये वरील शासन निर्णयापूर्वी अस्तित्वात असलेली ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना कायम केली आहे.

(५) समितीकडील तांत्रिक ज्ञानाचा अभाव.

**उपरोक्त संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

भारत निर्माण कार्यक्रम सन २००५ ते २००९ या कालावधीकरीता आणि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१० पासुन चालु झालेला आहे. सदरील कामे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येतात. पाणी पुरवठा समितीमधील अंतर्गत वाद, ग्रामपंचायतीच्या निवडणुकीनंतर नविन समिती गठीत झाल्यानंतर नवीन समितीस हिशोब देण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

(१) समितीस बँकेतून रक्कम काढण्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव शासन निर्णय दिनांक ०२ डिसेंबर, २०११ अन्वये बंधनकारक केले होते. त्यामुळे शासन अनुदान ग्रामपंचायतीमार्फत समितीच्या खात्यामध्ये जमा करण्यास होणारा विलंब.

(२) शासन निर्णय दि. १२.०८.२००९ अन्वये समितीचे पदसिध्द अध्यक्षपदी सरपंच तर सचिव पदी ग्रामसेवक राहतील असा निर्णय आहे.

त्याविरोधात समितीने न्यायालयात धाव घेतल्याने शासन निर्णय दि. १५/१०/२०१० अन्वये वरील शासन निर्णयापूर्वी अस्तित्वात असलेली ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना कायम केली आहे.

**चौकशी अहवाल**

पंचायत राज समिती नांदेड जिल्हा परिषदेस दिनांक १३/९/२०१५ ते १५/९/२०१५ या कालावधीत भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली आहे. सदर साक्षीच्या वेळी ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत भारत निर्माण योजना राबविताना येणा-या अडचणी बाबत शासनास कळविण्याचे सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने योजना राबवितांना येणा-या अडचणी खालीलप्रमाणे आहेत.

(१) सदर कामासाठी अनुदान ग्रामपंचायतीच्या नावे देण्यात येतो. तथापि सदर निधी विलंबाने समितीच्या खात्यात वर्ग करण्यात येतो.

(२) निवडणुकीमुळे नवीन सरपंचाची/पदाधिका-यांची निवड झाल्यानंतर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मध्ये बदल होतात. जुन्या अध्यक्ष/सचिव यांना कामाचा हिशोब देणे याप्रकरणी विलंब होतो. परिणामी कामे वेळेवर होण्यास अडचण निर्माण होते.

(३) समितीच्या अंतर्गत वादामुळे/वरीलप्रमाणे बदल झाल्यामुळे वेळेवर काम पूर्ण होत नाही. परिणामी बाजारात साहित्याचे दर वाढल्यास ते काम मंजूर दराने करण्यास अडचण निर्माण होते.

(४) शासन निर्णय दिनांक नुसार सरपंच व ग्रामसेवक हे अनुक्रमे समितीचे अध्यक्ष व सचिव असतील अशा सूचना होत्या त्यामुळे जुन्या समितीचे पदाधिकारी न्यायालयात गेले. त्यानंतर मा.न्यायालयाने ग्रामसभेने निवडलेले अध्यक्ष व सचिव हे पूर्ववत ठेवण्याचे निर्देश दिले.

(५) सदरिल योजना किती कालावधीत पूर्ण कराव्यात याबाबत भारत निर्माण कार्यक्रम सदर राबविण्यात येणा-या धोरणात उल्लेख नव्हता.

वरील बाबीमुळे योजना कार्यान्वित करण्यास अडचण निर्माण होत आहे. तथापि सध्या शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक १७ मार्च, २०१० अन्वये योजना किती कालावधीत पूर्ण करावे याबाबत सविस्तर वेळापत्रक ठरवून दिले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीदरम्यान समितीने विचारणा केली की, भारत निर्माण योजनेंतर्गत पुरेसे अनुदान उपलब्ध नसताना नियमबाह्य अधिक रकमांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत काय, यावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांनी समितीस विदित केले की, पहिल्या प्रश्नाचे जे उत्तर दिले तेच उत्तर या प्रश्नाचे आहे. पुरेसे अनुदान नसताना नियमबाह्य अधिक रकमांचे प्रस्ताव मंजूर करण्याचे कारण नाही. नांदेड जिल्ह्यात अनेक योजना रखडलेल्या आहेत त्याप्रमाणेच हा प्रश्न आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजना ग्राम स्तर, जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अशा तीन स्तरांवर राबविण्यात येतात. या योजनेतील ग्रामसमिती स्तर काढून टाकण्यात आला आहे. तसेच, ग्राम समितीचा पदसिध्द अध्यक्ष सरपंच असावा याकरिता कायद्यात दुरुस्ती करण्यात येत असून ग्रामविकास विभागाकडून सुधारणा विधेयक सादर करण्यात येणार आहे, असे मला वाटते. समितीमुळे मराठवाड्यात अनेक योजना रखडलेल्या आहेत. यापुढे अंमलबजावणीचे अधिकार समितीकडे ठेवण्यात येणार नसून त्यांच्या माध्यमातून स्कीम पुढे चालू ठेवण्यात येतील.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद नसतानाही जिल्हा परिषदा मोठ्या प्रमाणावर कामे सुरु करतात त्यामुळे निधी अभावी ती कामे अपुर्ण राहतात व ती अपूर्ण कामे पूर्ण न करता पुन्हा नवीन कामे सुरु करण्यात येतात त्यामुळे अपूर्ण कामावरील शासनाचा निधी विनाकारण अखर्चित राहतो, त्यामुळे सन २००० व २००१ या वर्षाकरिता गठीत झालेल्या पंचायती राज समितीने आपल्या पाचव्या अहवालात (दहावी विधानसभा) अशी शिफारस केली की, या पुढील काळात जिल्हापरिषदेला देण्यात येणा-या एकंदर निधीपैकी ७० टक्के निधी हा अपूर्ण बांधकामासाठी राखून ठेवण्यात यावा व ३० टक्के निधी नवीन कामासाठी देण्यात यावा. समितीच्या सदर शिफारशीस अनुसुरुन शासनाने दि. ३१ जानेवारी, २००१ (**परिशिष्ट ११.१**) मध्ये शासन निर्णय निर्गमित केला आहे. परंतु जिल्हापरिषद, नांदेड अंतर्गत पाणी पुरवठा विभागाने शासकीय अनुदान उपलब्ध नसताना नवीन प्रस्ताव मंजूर करुन ४४१७ लक्ष रुपयांचे दायित्व निर्माण केल्याचे आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आले आहेत. यांसदर्भात सन २००८-२००९ मध्ये रु.४६४०.९२ लक्ष तरतूद उपलब्ध होती. त्यानुंषगाने रुपये ४३५९.१७ खर्च झाल्याचे व निधी अभावी योजना अपूर्ण अवस्थेत राहत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

भारत निर्माण योजनेंतर्गत तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, २०१० अंतर्गत हाती घेतलेली कामे करित असताना निधी ऐवजी सदरील कामे ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करताना प्रामुख्याने अडचणी निर्माण होतात. हे समितीच्या निदर्शनास आले आहे. यामध्ये पाणीपुरवठा समितीमधील अंतर्गत वाद ग्रामपंचायत निवडणूकीनंतर नवीन समिती गठीत झाल्यानंतर समितीस हिशोब देण्यात होणारा विलंब इत्यादी कारणांमुळे पाणी पुरवठ्याची कामे रखडली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडून निधीचा गैर वापर होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यावर शासनाने दिनांक १२ ऑगस्ट, २००९ रोजी शासन निर्णयाव्दारे या समितीच्या संरचनेत बद्दल करुन समितीच्या पदसिध्द अध्यक्षपदी

ग्रामपंचायतीचे सरपंच व पदसिध्द सचिव पदी ग्रामसेवक राहतील असा निर्णय घेतला. सदरहू शासन निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रद्द ठरविला असल्यामुळे पुन्हा ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची जुनी रचना कायम राहिली. तदनंतरही शासनाने दि. २ डिसेंबर, २०११ (**परिशिष्ट ११.२**) रोजी शासन निर्णय निर्गमित करुन ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या निधीच्या गैर वापरास अंकुश ठेवण्याकरिता समितीने बँक खात्यातून रक्कम काढताना सोबत ग्रामपंचायतीचा ठराव धनादेशा सोबत बँकेस सादर करण्यासारख्या अटी टाकण्यात आल्या अशा प्रकारचे निर्बंध टाकण्यात येवूनही ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांकडून पाणी पुरवठा योजना वेळेवर पूर्ण होवू शकल्या नाहीत.या योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात उदभवणा-या अडचणीचां गोषवारा शासनाकडे पाठविला आहे.विभागीय सचिवांनी ग्रामिण पाणी पुरवठा योजना, ग्रामस्तर, जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधीकरण या तीन स्तरावर राबविण्यात येतात. या योजनेतील ग्राम समिती स्तर काढून टाकण्यात आल्याची माहिती समितीला दिली.

**समितीच्या मते मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारणा करुन सन २००३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ व्दारे नविन कलम ४९ दाखल करण्यात येऊन ग्रामविकास समित्यांची रचना करण्यात आली आहे. त्यानुसार कलम ४९ अनुसार स्थापन झालेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या व्यवहारांवर ग्रामपंचायतीचे नियंत्रण आणण्यासाठी तसेच निधीचा अपहार रोखण्यासाठी समितीच्या निधीच्या व्यवहारासंदर्भात जबाबदारी वाढविण्यासाठी समितीचा पदसिध्द अध्यक्ष व सचिव पदी अनुक्रमे सरपंच व ग्रामसेवक यांना नेमण्याकरिता सदरहू अधिनियमात योग्य ती सुधारणा करुन अथवा शासन निर्णयाचे पुनर्विलोकन करुन नव्याने सुधारणा करुन शासन निर्णय निर्गमित करण्याकरिता कार्यवाही करावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चोवीस

## जिल्हा परिषद, नांदेड

### उन्हाळी पाणी पुरवठा नैसर्गिक आपत्ती - २२४५ या लेखा शिर्षाखाली टँकरवर इंधन व दुरुस्तीवरील खर्चाबाबत

**परिच्छेद ३.५६८ (सन २००८-०९)**

पंचायत समिति, कंधार यांनी उन्हाळी पाणीपुरवठा योजने अंतर्गत वाहनावर इंधन खर्च रुपये ५४,७४,१०९/- व दुरुस्तीवर रक्कम रुपये १,१५,२००/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, परिपत्रक क्रमांक एस.सी.वाय-१३२५-७१७, दिनांक ६ जून १९८२ अन्वये टँकर नादुरुस्त झाल्यास टँकर खरेदी किंमतीच्या १ टक्क्यापर्यंत खर्च करुन फक्त किरकोळ दुरुस्ती करण्यात यावी असे स्पष्ट नमूद असतांना नविन टँकर वाहनांची किंमत सुमारे रुपये ११,००,०००/- पर्यंत असल्याचे विचारात घेऊन एकूण ११ वाहनावर उपरोक्त शासन परिपत्रकान्वये टँकर दुरुस्तीवर मर्यादेपेक्षा रुपये १३,५३,७८४/- चा जादा खर्च झालेला आहे.

२. श्री बी. डी. गायकवाड यांना टँकर दुरुस्ती कामासाठी दिलेला अग्रीम रुपये ३९,२४,०००/- चे समायोजन लेखापरीक्षण वित्तीय वर्षामध्ये झालेले नाही. त्यामुळे दुरूस्तीचा खर्च यापेक्षा अधिक होणार आहे. त्यामुळे शासन परिपत्रकात नमुद तरतुदीपेक्षा जादा दुरूस्ती खर्च झालेला आहे.

३. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२ अन्वये वार्षिक खरेदी रुपये ५०,०००/- पेक्षा जादाची असेल तर वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागवून वाजवी दराने खरेदी करणे आवश्यक असतांना शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. अर्धसमास पत्र क्र.५, दिनांक ४/१२/२००९ अन्वये परिच्छेदात नमूद केलेल्या एकूण २७ वाहनाचे लॉगबुक व इतिहास पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्याबाबत लेखी मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पाणी पुरवठा विभागास टंचाई अंतर्गत विविध उपाय योजना राबविण्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त होतो. टंचाई कार्यक्रमांतर्गत सदर उपाययोजना राबविण्यासाठी पंचायत समिती, कंधार यांना विभागामार्फत निधी वितरित करण्यात आलेला आहे.

१. आक्षेपात नमूद केल्यानुसार टँकर दुरुस्तीवर मर्यादेपेक्षा जादा खर्च झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि तालुक्यात पाणी पुरवठा करण्यात आलेले टँकर हे जवळपास ३० ते ३५ वर्षापूर्वीचे आहेत. कंधार तालुका हा डोंगराळ असून काही भाग अतिदुर्गम आहे. टँकरचे आयुष्यमान व दरवाढ याचा विचार करता प्रत्यक्ष गरजेनुसार खर्च करण्यात आला आहे. आणि ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यात आला आहे. टँकरच्या किरकोळ दुरुस्तीकरिता खरेदी केलेले साहित्य व दुरुस्तीकरिता दिलेली मजुरी याचा तपशिल परिक्षणास दर्शविण्यास उपलब्ध आहे.

२. होय, ही वस्तुस्थिती आहे. परंतू सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात तरतूद उपलब्ध नसल्याने सदरिल अग्रीमाचे समायोजन सन २००९-२०१० मध्ये करण्यात आले आहे. त्याचा सविस्तर तपशिल परिक्षणास उपलब्ध आहे.

३. सन २००८-२००९ या वर्षात २७ टँकर पाण्यासाठी वापरात होते. टँकर हे जवळपास ३० ते ३५ वर्षाचे जुने आहेत. तसेच दुर्गम भागात पाणी पुरवठा करतांना उदभवणारी दुरुस्तीची निकड लक्षात घेता आवश्यकतेप्रमाणे साहित्य खरेदी करुन वेळेवर दुरुस्ती करण्यात येवून ग्रामीण भागातील जनतेला पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

४. आक्षेपात नमूद केल्यानुसार लॉगबुक व इतिहास पुस्तीका लेखा परिक्षणाच्या वेळी दर्शविण्यात आले नाही ही वस्तुस्थिती आहे. याबाबत संबंधित कर्मचा-याचा दिनांक १३.०८.२०१५ च्या पत्रान्वये खुलासा मागविण्यात आला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, महसूल व वन विभागाच्या दिनांक ६ जून, १९८२ च्या शासन निर्णयानुसार नादुरुस्त टँकरवर त्याच्या खरेदी किंमतीच्या १ टक्क्यापर्यंत दुरुस्तीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. परंतु ११ टँकरवर नियमबाह्यपणे १३.५३ लाख रुपये जादा खर्च केले, हा जादा खर्च कोणत्या प्राधिकारान्वये केला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, लेखापरीक्षण आक्षेपानंतर आम्ही टँकरचा रितसर आढावा घेतला. हे टँकर ३० ते ३५ वर्षापूर्वीचे आहेत, त्यामुळे मोठ्या प्रमाणात दुरुस्तीवर खर्च होतो ही वस्तुस्थिती आहे. जिल्हाधिकारी महोदयांकडे या आक्षेपासंदर्भात चर्चा करण्यासाठी गेलो होतो. सर्वच टँकर निर्लेखित करीत आहोत. सदरहू टँकर १ लीटर इंधनात ३ कि.मी. अंतराची सरासरी येते. पहिल्यांदा शासकीय टँकर लावावेत अशी ऑडिटची किंवा सगळ्यांची मागणी असते. त्यामुळे टँकर आहेत त्याच परिस्थितीत चालू राहिले. १.४० लाख कि.मी. चालणे किंवा १० वर्षापेक्षा अधिक काळ झाल्यानंतर टँकर निर्लेखित केले पाहिजे होते, परंतु दोन्हीही झालेले नाही. प्रचंड खर्च होत असल्यामुळे निर्लेखित करण्याचा निर्णय घेत आहोत.

समितीने प्रतिपादन केले की, समितीच्या मुळात टँकर हे माल वाहतूक करणारे वाहन आहे. ३५-३५ वर्षे जुने असलेल्या टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा करावयास लागलो तर गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे यापुढे इतकी वर्षे जुनी असलेली वाहने वापरता कामा नये. ठराविक कालावधीपर्यंतच जुने वाहन वापरावे. तसेच दुसरी बाब अशी की, टँकर दुरुस्तीसाठी अग्रीम म्हणून देण्यात आलेल्या रु. ३९ लाख २४ हजार रकमेचे समायोजन वित्तीय वर्षामध्ये झालेले नाही. सदरहू अग्रीम रक्कम कोणत्या प्राधिकारान्वये अदा करण्यात आली आहे, समितीच्या या प्रश्नावर टँकर चालविण्यासाठी डिझेलची आवश्यकता असते. त्यामुळे या कामासाठीच कंधारच्या शाखा अभियंत्यांना अग्रीम देण्यात आला होता. अग्रीम म्हणून देण्यात आलेल्या ३९ लाख २४ हजार रुपयांचे समायोजन पुढील वर्षी करण्यात आलेले आहे. सदरहू अग्रीम रक्कम २००८-०९ मध्ये देण्यात आली होती व त्या रकमेचे समायोजन २००९-१० मध्ये करण्यात आले असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणाच्या अनुषंगाने समितीच्या निदर्शनास आले की, प्रथमतः पाणी पुरवठ्याकरिता शासकीय टँकर वापरावे व त्यानंतर खाजगी टँकर वापरावेत असा शासनाचा नियम असुन ३५ वर्षे जुन्या वाहनांचा वापर केल्यामुळे अपघात, देखभाल दुरुस्तीवरील अधिकचा खर्च व इंधनाचा अतोनात खर्च होऊन शासनाचे नुकसान होते, याबाबत शासन कोणती उपाय योजना करणार आहे ? समितीस पाठविलेल्या माहितीत ९ टँकर निर्लेखित केले असुन खाजगी टँकर उपलब्ध झाल्यानंतर उर्वरित ९ टँकर बंद करण्यात येतील असे नमूद आहे, याबाबत सद्यस्थिती काय आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जुन्या शासकीय टँकरचे आयुष्यमान ३५ वर्षापेक्षा जास्तीचे झाल्याने त्यावर जादा खर्च होत असल्याचे समितीने निर्देशित केल्यानुसार नांदेड जिल्ह्यातील सदर ९ शासकीय टँकर बंद करण्यात आले आहेत. हे शासकीय टँकर ज्या ठिकाणी वापरात होते त्या ठिकाणी खाजगी टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत दि. २२.०२.२०१६ रोजीच्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार १४२ गावे व ११३ वाड्यांमध्ये २७ शासकीय व २१६ खाजगी असे एकूण २४३ टँकर्सव्दारे नांदेड जिल्ह्यात पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

**उपरोक्त संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जुन्या शासकीय टँकरचे आयुष्यमान ३५ वर्षापेक्षा जास्तीचे झाल्याने त्यावर जादा खर्च होत असल्याचे समितीने निर्देशित केल्यानुसार नांदेड जिल्ह्यातील सदर ९ शासकीय टँकर बंद करण्यात आले आहेत. हे शासकीय टँकर ज्या ठिकाणी वापरात होते त्या ठिकाणी खाजगी टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत दि. २२.०२.२०१६ रोजीच्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार १४२ गावे व ११३ वाड्यांमध्ये २७ शासकीय व २१६ खाजगी असे एकूण २४३ टँकर्सव्दारे नांदेड जिल्ह्यात पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

## चौकशी अहवाल

पंचायत राज समितीने दि.१३.०९.२०१५ ते १५.०९.२०१५ पर्यंत जिल्हा परिषद नांदेडला भेट दिली आहे. या भेटी दरम्यान अहवाल वाचन, चर्चा व कार्यवाही या प्रक्रिये दरम्यान मुद्दा परिच्छेद क्र. ३.५६८ नुसार जिल्हा परिषदेकडील टँकर्स वर झालेला व होत असलेल्या खर्चाबाबत तपशीलवार चर्चा झाली. या चर्चे मध्ये सदरच्या टँकर्सवर होणरा इंधन,वगण,सुटेभाग दुरुस्ती यांचा खर्च आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसल्याचे समितीचे निदर्शनास आल्याने पंचायत राज समितीने सदर बाबत आवश्यक कार्यवाही करण्याचा सूचना दिल्या आहेत. त्यानुसार टँकर संदर्भात खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहेत.

जिल्हा परिषद, नांदेड कडे सद्यस्थितीत १८ टँकर्स व्दारे खालील तालुक्यांना पिण्याचे पाणी टंचाई निवारणार्थ पाणी पुरवठा करण्यात येतो.

| | | |
|---|---|---|
| (१) | पंचायत समिती मुखेड | ६ |
| (२) | पंचायत समिती नायगांव | ३ |
| (३) | पंचायत समिती कंधर | ४ |
| (४) | पंचायत समिती लोहा | ४ |
| (५) | पंचायत समिती नांदेड | १ |
| | एकूण | १८ |

सदर टँकर्स हे जिल्हा परिषद बांधकाम आणि लघुपाटबंधारे विभागाचे आहेत. हे टँकर्स १९७१ ते १९८५ या दरम्यान उत्पादित झालेले आहेत. पुर्वी रोजगार हमी योजनेवर याचा वापर झाल्यानंतर त्या त्या विभागाला हस्तांतर करण्यात आले आहेत. बांधकाम व लघुपाटबंधारे विभागांकडेही ज्या वेळेपासुन कामांमध्ये शासकीय मशिनरीचा वापर बंद झाला त्यानंतर ह्या टँकर्सचा वापर टंचाई पिण्याचे पाणी पुरवठा करणेसाठी करण्यात येतो.

किमान ३० वर्षे आणि कमाल ४४ वर्षे झाले जुने टँकर्स असल्याने त्यावरील इंधन, वंगण, सुटेभाग दुरुस्ती यांचा खर्च आणि जुन्या प्रकारचे मॉडेल असल्याने दुरुस्तीसाठी सुटेभाग उपलब्ध होत नसल्याने खर्च आर्थिकदृष्ट्या परवडत नाहीत.

या कार्यालयाचे पत्र क्र. पापुवि/मुकाअ/जिपनां/टंचाई/टँकर/३१३७/२०१५, दि. १०/९/२०१५ नुसार ह्या टँकर्सचे निर्लेखन करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे परवानगी मागितली आहे. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.२०१५/ मशाका/२/टे६/सी आर, दि. २२/९/२०१५ नुसार निर्लेखन करण्यास मंजुरी दिली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी यांनी दि. ०१.१०.२०१५ च्या पत्राने उप विभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना शासकीय टँकर्स बंद करुन आवश्यकतेनुसार आपल्या स्तरावरुन खाजगी टँकर्स उपलब्ध करुन घेण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

सद्यस्थितीमध्ये नांदेड चे १, लोहा ४, कंधार ४, हे टँकर बद करण्यात आले आहेत. मुखेड ६ आणि नायगांव ३, हे टँकर्स खाजगी टँकर उपलब्ध होताच बंद करण्यात येत आहेत. त्या बाबत सर्व १८ टँकर्स ची त्यांचे पत्रातील निर्लेखनाची कार्यवाही तात्काळ करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पाणी पुरवठा करण्याकरिता शासकीय टँकर वापरावे व त्यानंतर खाजगी टँकर वापरावेत असा शासनाचा नियम असून ३५ वर्ष जुन्या वाहनांचा वापर केल्यामुळे अपघात, देखभाल दुरुस्तीवरील अधिकचा खर्च व इंधनाचा अतोनात खर्च होऊन शासनाचे नुकसान होते, याबाबत कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे, यावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांनी समितीस विदित केले की, शासकीय टँकर बंद करुन खाजगी टँकर सुरु करण्यात आले आहेत. राज्यात ४६४० टँकर

सुरु आहेत. आजच्या स्थितीत नांदेड जिल्ह्यातील १९३ गावे व १४२ वाड्यांसाठी ३०६ टँकर सुरु करण्यात आले असून त्यावर शासनाकडून दररोज पर्यवेक्षण सुरु आहे. ३०६ टँकर पैकी २० टँकर शासकीय आहेत व २८६ टँकर खाजगी आहेत. तसेच, बीड जिल्ह्यात ८३८ इतके सर्वात अधिक टँकर पाणी पुरवठा करण्यासाठी सुरु करण्यात आले आहेत व औरंगाबाद येथे ७१२, परभणी येथे २००, जालना ४५५, लातूर येथे २६० टँकर सुरु आहेत. जिल्हा परिषदेने टँकरच्या संदर्भात दिलेली आकडेवारी जुनी आहे ही सद्यःस्थितीतील टँकरच्या संदर्भातील आकडेवारी सांगितली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

नांदेड जिल्हा परिषदेस समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी पंचायत समिती, कंधार यांनी उन्हाळी पाणीपुरवठा योजनेत इंधनावर रुपये ५४,७४,१०९/- तर दुरुस्तीस रुपये १,१५,२००/- खर्च केल्याप्रकरणी लेखापरिक्षकांनी टँकर खरेदी किंमतीच्या १ टक्यापर्यंतचा खर्च करणे बंधनकारक असताना दिनांक ६ जून १९८२ रोजीच्या शासन परिपत्रकातील तदतुदींचा भंग करुन मर्यादेपेक्षा रुपये १३,५३,७८४ चा जादा खर्च करणे, टँकर दुरुस्तीच्या अग्रिमाचे समायोजन त्याच वित्तीय वर्षात केलेले नसणे, वार्षिक खरेदी रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असेल तर वर्तमानपत्रात जाहीरात देवून निविदा मागवून करणे आवश्यक असताना ती प्रक्रिया न अवलंबणे, २७ वहानांचे लॉगबुक व इतिहास पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणे असे आक्षेप घेण्यात आले आहेत. वस्तुतः १.४० लाख कि.मी. परिवहन किंवा १० वर्षापेक्षा अधिक काळ झाल्यानंतर टँकरच्या निर्लेखनाची कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतू विभागाने तसे केले केलेले नाही. एखादा टँकर ४४ वर्षे वापरल्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय झाला आहे. सुमारे ३० ते ४४ वर्षे जुन्या वाहनांचे सुटे भाग मिळणे दुरापास्त होणे तसेच १ लिटर इंधनात वाहन सरासरी केवळ ३ कि.मी. परिवहन अशा बाबी समितीच्या निदर्शानास आल्या आहेत.

महसूल व वन विभागाच्या दिनांक ६ जून, १९८२ रोजीच्या परिपत्रकान्वये वाहनाच्या किमतीच्या १ टक्यापेक्षा जास्त दुरस्ती खर्च करता येत नाही आणि उद्योग विभागाच्या दिनांक २ जानेवारी, १९९२ (**परिशिष्ट १२.१**) रोजीच्या शासन निर्णयानुसार ५० हजार रुपयांपेक्षा अधिक खरेदीकरिता वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदेद्वारे वाजवी दराने खरेदी करता येते. यादोन्ही परिपत्रक व शासन निर्णयातील तरतुदींना आता अनुक्रमे २४ ते ३४ वर्षापेक्षा जास्त काळ झाला असून वर्तमानपत्रातील जाहिरातींचे वाढलेले दर तसेच वाहनांचा दर्जा इत्यादी बाबी लक्षात घेऊन उक्त परिपत्रक व शासन निर्णयात कालानुरुप बदल करणे आवश्यक आहे असे समितीचे मत झाले आहे.

**अतः जिल्हा परिषद, नांदेड यांनी सद्यस्थितीत जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यामार्फत सर्व जुन्या वाहनांच्या निर्लेखनाची कारवाई केली. परंतू ही वाहने वेळेवर निर्लेखित केली असती तर शासनाच्या निधीची निश्चितच बचत झाली असती, त्यामुळे जिल्हा परिषदने विहीत कालमर्यादेत वाहने निर्लेखित केली नसल्याबाबत समिती खेद व्यक्त करते. तसेच वाहन किंमतीच्या १ टक्के मर्यादेत दुरुस्ती तसेच रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या खरेदीकरीता वर्तमानपत्रातील जाहिरातीच्या मर्यादेत कालानुरुप व गरजेनुसार सुधारणा करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे जुने टँकर निर्लेखित करुन खाजगी टँकर्सना ग्रामीण भागात पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. असे करताना खाजगी टँकर्स जादा खेपा लावण्याची शक्यता नाकारता येत नाही तेव्हा टॅकर्सच्या पाणीपुरवठा करण्याच्या कामाची दैनंदिनी करीत असताना संबंधित टँकर पाण्याच्या उद्‌भवापासून रोज कोणत्या गावी व किती किलोमीटर धावतो, एक टँकर भरण्यासाठी व तो खाली करण्यास किती कालावधी लागतो, एका दिवसात किती गावांना किती खेपा करणे शक्य आहे, याचे प्रात्यक्षिक करुन तसे नियोजन करुन तेवढ्याच खेपा संबंधित खाजगी टँकर्सला देण्यात याव्यात व संबंधित टँकर्सचे Log Book रोजच्या रोज भरुन त्या त्या दिवशी अद्ययावत करण्यात यावे व Log Book ची सक्षम प्राधिका-याने तपासणी करुन, खात्री करुन, स्वाक्षरी करुन टँकर मालकास त्यानंतर भाड्यापोटी रक्कम अदा करावी व त्यादृष्टीने उपाययोजना करुन संबंधितांना आदेश द्यावेत अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण पंचवीस

## जिल्हा परिषद, नांदेड

### विशेष घटक योजना अंतर्गत लाभार्थ्यांना साहित्य पुरवठा वरील खर्चाबाबत

**परिच्छेद ३.७१७ ते ३.७२४ (सन २००८-०९)**

विशेष घटक योजने अंतर्गत १०० टक्के अनुदानावर कृषी औजारे खरेदी पोटी रक्कम रुपये ४४,५३,४४२/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८३ (३) नुसार साहित्य खरेदीपूर्वी विभाग प्रमुखाने गुणवत्ता व योग्यते बाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

२. योजनेच्या मार्गदर्शक सुचना दिनांक २७/१०/२००८ नुसार लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबनिहाय साहित्याची नोंदवही पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात आलेली नाही.

३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए/२०००/प्र.क्र.४१/३३, दिनांक १७ जानेवारी २००१ नुसार लाभार्थी निवड ते प्रत्यक्ष साहित्य वाटपाची कार्यवाही झालेली नाही.

४. भांडार खरेदी संहिता प्रकरण चार भाग - पाच मधील नियम २.४ प्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत दंडाची आकारणी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

५. ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. पीआरसी/१०८३/सीआर-१९७४/६७, दिनांक २ जुलै १९९३ नुसार फलश्रुती अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

६. पंचायत समिती, बिलोली सन २००७-२००८ च्या निवड यादीत नाव नसतांना आरसे गंगाधर नागोराव, वाघमारे संभाजी रंगोजी, वाघमारे मरिबा कोंडीबा या तीन लाभार्थींना पेट्रोकेरोसीन इंजीन वाटप केले आहे, अपात्र लाभार्थींना वाटप केलेल्या पेट्रोकेरोसीन इंजीनाची रक्कम रुपये ५०,५८९/- वसूल करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

७. पंचायत समिती, देगलूर अंतर्गत लाभार्थी निवड यादी सन २००७-०८ मध्ये नावे नसतांना ३ एचपी विद्युतपंप संच विठ्ठल चांदोबा माणिक मोते, शिवाजी सटवाजी सोनकांबळे, मोगलाजी गंगाराम पारसेवार, दशरथ तुकाराम बिजलीकर यांना वाटप केले. निवड यादीत नाव नसतांना वाटप केलेल्या विद्युतपंप संचाची किंमत रुपये ५४,४८०/- वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

८. पंचायत समिती, नांदेड अंतर्गत सन २००७-०८ निवड यादीत नाव नसतांना श्री. बळीराम बालाजी पोहरे यांना ताडपत्री किंमत रक्कम रुपये ३,४०२/-, विश्वनाथ तुकाराम पोहरे कृषी औजारे किंमत रक्कम रुपये ५,१४४/-, भिमराव संभाजी गायकवाड कृषी औजारे किंमत रुपये ५,१४४/- वाटप केले आहे. लाभार्थी निवड नसतांना केलेल्या वाटप साहित्याची किंमत रुपये १३,६८०/- वसूल करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

९. पुरवठा आदेशानुसार साहित्य दिनांक २५/३/२००९ पुर्वी पंचायत समिती स्तरावर प्राप्त होणे आवश्यक असतांना साहित्य एप्रिल-२००९ व जून २००९ मध्ये प्राप्त झाले. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र.पीआरसी-१०८१/सीआर-१९४०/३४, दिनांक १४ जून १९८२ नुसार साहित्य प्राप्त होण्याअगोदर साठा नोंदवहीत नोंद घेतली जाणार नाही असे स्पष्ट नमुद असतांना कृषी विकास अधिकारी यांनी बिलावर खोटे प्रमाणपत्र नोंदवून दिनांक ३१/३/२००९ रोजी प्रदानार्थ देयके सादर केलेली आहेत.

१०. पंचायत समिती, हदगाव, भोकर, नायगांव, कंधार, लोहा, मुखेड, मुदखेड यांनी साहित्य वाटपाबाबतचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

११. रक्कम रुपये ३,६७,५३८/- चे साहित्य वाटपाअभावी शिल्लक आहे. अनावश्यक खरेदी केलेली आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विशेष घटक योजना अंतर्गत लाभार्थ्यांना साहित्य पुरवठा वरील खर्चाबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.—

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार गुणवत्तेबाबत विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्रे लेखा परिक्षणाचेवेळी पंजिकेत उपलब्ध नव्हते ही वस्तुस्थिती आहे. तथापि सदर प्रमाणपत्र संचिकेमध्ये अवलोकनार्थ उपलब्ध करुन ठेवण्यात आलेले आहे.

२. योजनेच्या मार्गदर्शक सूचना दिनांक २७/१०/२००८ नुसार लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाब निहाय साहित्याची नोंदवही पंचायत समिती स्तरावर उपलब्ध आहे. नोंदवहीची छायांकित प्रत अवलोकनार्थ संचिकेमध्ये उपलब्ध करुन ठेवली आहे

३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक/झेडपीए/२०००/प्र.क्र./४१/३३, दिनांक १७ जानेवारी २००१ नुसार लाभार्थी निवड ते प्रत्यक्ष साहित्य वाटपाची कार्यवाही झालेली नाही हे सत्य आहे. लाभार्थी ची निवड ही जिल्हास्तरीय निवड समितीकडून करण्यात आलेली असून लाभार्थ्याच्या मागणीनुसार कृषि साहित्य पुरवठा करुन ते लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे. याची प्रत अवलोकनार्थ उपलब्ध करुन ठेवण्यात आलेली आहे.

४. भांडार खरेदी संहिता प्रकरण-चार, भाग-पाच मधील नियम २-४ प्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत दंडाची आकारणी करणे आवश्यक असतांना केलेली नाही हे सत्य आहे. तथापि त्यांना जा.क्र./जिपनां/कृषि/विघयो/२५३१/२०१५, दिनांक २०.०८.२०१५ व जा.क्र./जिपनां/कृषि/विघयो/२५३२/२०१५, दि.२०.०८.२०१५ दंडाची नोटीस देण्यात आली आहे.

५. संबंधित पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांचेकडून विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखा परिक्षणाचे वेळी दर्शविण्यात आले नाही हे सत्य आहे. तथापि सदरचे विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल कृषि अधिकारी यांच्याकडून घेण्यात आले असून संचिकेत उपलब्ध आहेत. विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखा परिक्षणाच्यावेळी का दाखविले नाही या बद्दल कृषि अधिकारी यांना जा.क्र./जिपनां/कृषि/आस्था/२५४२/२०१५, दि. २०.०८.२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

६. महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे पत्र दिनांक ०५/०३/२००९ व कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक/१२५, दिनांक ०६/०३/२००९ अन्वये सन २००१-०२ ते २००७-०८ या कालावधीत निवड झालेल्या लाभार्थ्यांना सन २००८-०९ च्या मंजूर तरतुदीमधुन उर्वरित राहिलेला लाभ देण्याची मान्यता प्राप्त झाली होती. आक्षेपामध्ये नमुद केलेल्या लाभार्थ्यांची निवड ही सन २००७-०८ मधील नसुन ती २००६-०७ च्या निवड यादी मध्ये आहे. त्यानुसार त्यांना लाभ दिलेला आहे.

७. महाराष्ट्र शासन कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दिनांक ०५/०३/२००९ व कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक/१२५, दिनांक ०६/०३/२००९ अन्वये सन २००१-०२ ते २००७-०८ या कालावधीत निवड झालेल्या लाभार्थ्यांना सन २००८-०९ च्या मंजूर तरतुदीमधुन उर्वरित राहिलेला लाभ देण्याची मान्यता प्राप्त झाली होती. आक्षेपामध्ये नमुद केलेल्या लाभार्थ्यांची निवड ही सन २००७-०८ मधील नसुन ती २००६-०७ च्या निवड यादी मध्ये आहे. तसेच विशेष घटक योजनेसाठी प्राप्त झालेल्या साठयामधुन एक विद्युत पंप संच नजर चुकीने ओ.टी.एस.पी.लाभार्थी श्रीमती शोभाबाई सुरेश तोटावार यांना वाटप करण्यात आले. व ओ.टी.एस.पी. साठी प्राप्त झालेल्या साठयामधुन नंतर विशेष घटक योजनेच्या लाभार्थ्याला विद्युत पंप संच वाटप करण्यात आला आहे.

८. महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे पत्र दिनांक ०५/०३/२००९ व कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक/१२५, दिनांक ०६/०३/२००९ अन्वये सन २००१-०२ ते २००७-०८ या कालावधीत निवड झालेल्या लाभार्थ्यांना सन २००८-०९ च्या मंजूर तरतुदीमधुन उर्वरित राहिलेला लाभ देण्याची मान्यता प्राप्त झाली होती. आक्षेपामध्ये नमुद केलेल्या लाभार्थ्यांची निवड ही सन २००७-०८ मधील नसुन ती २००६-०७ च्या निवड यादी मध्ये आहे.

९. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा साहित्य पंचायत समितीस्तरावर उशीराने प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली

आहे. तथापि याबाबत तत्कालीन कृषि विकास अधिकारी यांना जा.क्र./जिपनां/कृषि/पिपिएस/२४९३/२०१५, दि.२०.०८.२०१५ अनुसार कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

१०. पंचायत समिती, हदगांव, भोकर, नायगांव, कंधार, लोहा, मुखेड, मुदखेड यांनी साहित्य प्राप्त व वाटपाबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविली नाहीत हे सत्य आहे. संबंधित पंचायत समित्यांचे तत्कालीन कृषि गोदाम पर्यवेक्षक यांना दि.२०.०८.२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.सदर पंचायत समितीचे साहित्य प्राप्त व वाटपाबाबतचे अभिलेखे आता अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

११. लेखा परिक्षणाच्या वेळी वाटपा अभावी रक्कम रुपये ३,६७,५३८ चे साहित्य शिल्लक होते हे खरे आहे. सदरचे साहित्य नंतर पात्र लाभार्थीना वाटप करण्यात आलेले आहे. साठा नोंदवही दर्शविण्यासाठी उपलब्ध आहे.

**ओटीएसपी योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानावर साहित्य वाटपाबाबत — परिच्छेद ३.७१८**

ओटीएसपी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर साहित्य वाटपासाठी रक्कम रुपये ४०,८९,६६४/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ व १२६ नुसार योजना खर्च रक्कम रुपये २५ लाखापेक्षा जास्त असल्यामुळे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी असल्याचे घेणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए/२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दिनांक २० जून २००८ नुसार लाभार्थी निवड ते प्रत्यक्ष साहित्य वाटपाची कार्यवाही झालेली नाही.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३(३) प्रमाणे साहित्य खरेदी करण्यापूर्वी विभाग प्रमुखाने गुणवत्ता व योग्यतेचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

४. योजना मार्गदर्शक सूचना नुसार लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबनिहाय साहित्याची नोंदवही पंचायत समिती स्तरावर ठेवणे आवश्यक आहे.

५. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. पीआरसी/१०३/सीआर-१९७४/६७, दिनांक २ जुलै १९९३ नुसार फलश्रुती अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

६. पंचायत समिती, उमरीतील लाभार्थ्यांना रुपये १०,००० चे मर्यादेत ४०० नग पी.व्ही.सी.पाईप पुरवठा करण्यात आला आहे. लाभार्थ्यास प्रत्येकी ४० नग पाईप वाटपामुळे १० लाभार्थ्याकडून रुपये ८० प्रमाणे रुपये ८०० वसुली करून पुरवठादार संस्थेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

७. पंचायत समिती, किनवट मधील पाच लाभार्थ्यांना कृषी औजारे संच पुरवठा केला आहे. संचाची किंमत रुपये ५,१४४ असून अनुदान मर्यादा रुपये ५००० आहे त्यामुळे रूपये १४४ प्रमाणे पाच लाभार्थ्याकडून एकूण रूपये ७२० वसूल करून पुरवठादार संस्थेस अदा केले नाही.

८ पंचायत समिती, देगलूर यांनी कृषी औजारे संचाची लाभार्थ्याकडून वसुली केलेली लोक वाट्याची रक्कम रुपये ४३२ पुरवठादारास अदा करणे आवश्यक आहे.

९. पुरवठा आदेशानुसार दिनांक ३१/३/२००९ पुर्वी साहित्य पंचायत समितीस्तरावर प्राप्त होणे आवश्यक असतांना साहित्य जून २००९ व सप्टेंबर २००९ मध्ये प्राप्त झाले. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्र.पीआरसी १०८१/ सीआर-१९४०/३४, दिनांक १४ जून १९८२ नुसार साहित्य प्राप्त होण्याअगोदर साठा नोंदवहीत नोंद घेतली जाणार नाही असे स्पष्ट नमुद असतांना कृषी अधिकारी यांनी बिलावर खोटे प्रमाणपत्र नोंदवून दिनांक ३१/३/२००९ रोजी प्रदानार्थ देयके सादर केलेली आहेत.

१०. भांडार खरेदी संहिता प्रकरण-चार, भाग-पाच मधील नियम २.४ प्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत दंडाची आकारणी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

११. पंचायत समिती हदगाव, भोकर, नायगांव, कंधार, लोहा, मुखेड, मुदखेड यांनी साहित्य वाटपाबाबतचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

१२. योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधीत प्राधिका-याचे तपासणी अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला**

ओटीएसपी योजने अंतर्गत १०० टक्के अनुदानावर साहित्य वाटपाबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र शासन, कृषि व पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक/आऊयो/१६०७/प्र.क्र.१३९/४-अे, दिनांक १० ऑगस्ट २००७ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. शासनाची प्रशासकीय मान्यता असल्यामुळे जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक/झेडपीए/२००८/प्र.क्र./४४६/वित्त-९ दिनांक २० जून २००८ नुसार लाभार्थी निवड ते प्रत्यक्ष साहित्य वाटपाची कार्यवाही झालेली नाही हे सत्य आहे. लाभार्थीची निवड ही जिल्हास्तरीय निवड समितीकडून करण्यात आलेली असून लाभार्थ्यांच्या मागणीनुसार कृषि साहित्य पुरवठा करुन ते लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार गुणवत्तेबाबत विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र लेखा परिक्षणाचे वेळी संचिकेत उपलब्ध नव्हते ही वस्तुस्थिती आहे. तथापि सदर प्रमाणपत्र आता अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

४. योजना मार्गदर्शक सूचना नुसार लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबनिहाय साहित्याची नोंदवही पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात आलेली आहे व दर्शविण्यासाठी उपलब्ध आहे.

५. संबंधित पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांचेकडून विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखा परिक्षणाचे वेळी दर्शविण्यात आले नाही हे सत्य आहे. तथापि सदरचे विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल कृषि अधिकारी यांच्याकडून घेण्यात आले असून संचिकेत उपलब्ध आहेत. विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखा परिक्षणाच्यावेळी का दाखविले नाही या बद्दल कृषि अधिकारी यांना दि.२०.०८.२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

६. पंचायत समिती, उमरीतील लाभार्थ्यांना प्रत्येकी ४० नग पाईप वाटप करतेवेळी १० लाभार्थी कडून रु.८० प्रमाणे रुपये ८०० वसुली करुन पुरवठादार संस्था एम.एस.एस.आय.डि.सी.कडे डी.डी.क्र.४७४९३५, दि.१९.०८.२०१५ अन्वये भरणा करण्यात आलेली आहे व त्याचा तपशिल सोबत जोडला आहे.

७. पंचायत समिती, किनवट मधील पाच लाभार्थ्यांना कृषि औजारे संच वाटपाचे वेळी रुपये १४४ प्रमाणे पाच लाभार्थ्यांकडुन एकूण रुपये ७२० वसूल करुन पुरवठादार संस्थेकडे पावती क्र.२९६८, दि.१४.०८.२०१५ अन्वये भरणा करण्यात आलेले आहेत व त्याची पावती सोबत जोडली आहे.

८. पंचायत समिती, देगलुर यांनी कृषि औजारे संचाची लाभार्थ्यांकडुन वसूल केलेली लोकवाटयाची रक्कम रुपये ४३२ पुरवठादार संस्थेकडे पावती क्र.२९५९, दि.०४.०८.२०१५ अन्वये भरणा करण्यात आलेली आहे व त्याची पावती सोबत जोडली आहे.

९. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा साहित्य पंचायत समितीस्तरावर उशीराने प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली आहे. तथापि याबाबत तत्कालीन कृषि विकास अधिकारी यांना जा.क्र./जिपना/कृषि/पिपिएस/२४९३/२०१५, दि.२०.०८.२०१५ अनुसार कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे.

१०. भांडार खरेदी संहिता प्रकरण-चार भाग-पाच मधील नियम २-४ प्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत दंडाची आकारणी करणे आवश्यक असतांना केलेली नाही हे सत्य आहे. विलंबाबद्दल पुरवठादारास या कार्यालयाचे पत्र क्रं.२५३३ दि.२०.०८.२०१५ व पत्र क्र.२५३४ दि.२०.०८.२०१५ अन्वये नोटीस देण्यात आली आहे.

११. पंचायत समिती, हदगांव, भोकर, नायगांव, कंधार, लोहा, मुखेड मुदखेड यांनी साहित्य प्राप्त व वाटपाबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविली नाहीत हे सत्य आहे. संबंधित पंचायत समित्यांचे तत्कालीन कृषि गोदाम पर्यवेक्षक यांना दि.२०.०८.२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.सदर पंचायत समितीचे साहित्य प्राप्त व वाटपा बाबतचे अभिलेखे उपलब्ध आहेत.

१२. योजनेच्या मार्गदर्शक सूचना नुसार योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधीत प्राधिका-यांनी दौ-याचे वेळी तपासणी केलेली आहे. या बाबतचा तपासणी अहवाल संचिकेत उपलब्ध असून त्याची छायांकित प्रत उपलब्ध आहे.

**गळीत धान्य विकास कार्यक्रमाअंतर्गत ५० टक्के अनुदानावर कृषी साहित्य खरेदीबाबत — परिच्छेद ३.७१९**

गळीत धान्य विकास कार्यक्रमातंर्गत साहित्य खरेदीवर रक्कम रुपये ३९,८३,९५६ इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए/२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दिनांक २० जून २००८ नुसार लाभार्थी निवड ते प्रत्यक्ष साहित्य वाटपाची कार्यवाही झालेली नाही.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार विभागप्रमुखाने प्रत्यक्ष साहित्य खरेदीपूर्वी गुणवत्ता व योग्यतेबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

३. लाभार्थ्यांना साहित्य प्राप्त झाल्याबाबत पोचपावत्या द्वारे खात्री पटविणे आवश्यक आहे.

४. पंचायत समिती, उमरीस एचडीईपी पाईप ४७५ नग वाटपासाठी प्राप्त होते, तथापि साठा नोंदवहीनुसार वाटपाची प्रत्यक्ष बेरीज २७५ येते. त्यामुळे २०० पाईप वाटप केले नाही.

५. पुरवठा आदेशानुसार साहित्य दिनांक १६/३/२००९ व दिनांक २५/०३/२००९ पूर्वी पंचायत समितीस्तरावर प्राप्त होणे आवश्यक असतांना साहित्य जून २००९ व व जुलै २००९ मध्ये प्राप्त झाले. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र. पीआरसी-१०८१/सीआर-१९४०/३४, दिनांक १४ जून १९८२ नुसार साहित्य प्राप्त होण्याअगोदर साठा नोंदवहीत नोंद घेतली जाणार नाही असे स्पष्ट नमुद असतांना कृषी विकास अधिकारी यांनी बिलावर खोटे प्रमाणपत्र नोंदवून दिनांक ३१/३/२००९ रोजी प्रदानार्थ देयके सादर केलेली आहेत.

६. पंचायत समिती, कंधार, लोहा, मुखेड, भोकर, हदगाव, नायगांव, व मुदखेड यांनी साहित्य वाटपाबाबतचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

७. रक्कम रुपये ५,१४,५०६/- इतक्या रक्कमेचे साहित्य वाटप अभावी शिल्लक आहे. अनावश्यक खरेदीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

८. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. पीआरसी/१०८३/सीआर/१९७४/६७, दिनांक २ जुलै १९९३ नुसार फुलश्रुती अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

गळीतधान्य विकास कार्यक्रमा अंतर्गत ५० टक्के अनुदानावर कृषि साहित्य खरेदीबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.—

१. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र झेडपीए- २००८/ प्रक्र.४४६/ वित्त-९, दि.२०.६.०८ नुसार लाभार्थी निवड ते प्रत्यक्ष साहित्य वाटपाची कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे.पिक संरक्षण औषधी वरील उर्वरीत रक्कम रु.३,८१,५०० ची बाब बदल पिक संरक्षण औजारावर मिळणेसाठी पाठविलेल्या प्रस्तावास खात्याचे पत्र क्र.१७६४/०९ दि.२६.२.२००९, अन्वये मान्यता प्राप्त झाली होती, त्यानुसार २६.२.२००९ रोजी पिक संरक्षण औजारे पुरवठा करणेसाठी

एम.ए.आय.डी.सी.कडे मागणी नोंदविण्यात आली. तसेच उर्वरीत कृषि साहित्य पिक सरंक्षण औजारे, सुधारीत कृषि औजारे व एच.डी.पी.ई.पाईप चे दरपत्रक खात्याचे पत्र क्र.दि.२३.१२.२००८ अन्वये मान्यता प्राप्त झालेले दरपत्रक या कार्यालयास दि.३१.१२.२००८ रोजी प्राप्त झाले होते. दि.२३.२.२००९ रोजी पुरवठादार संस्थेकडे कृषि साहित्य पुरवठा करणेसाठी मागणी नोंदविण्यात आली होती. त्यामुळे खात्याकडून बाब बदल व दर पत्रक उशिराने प्राप्त झाल्यामुळे शासन निर्णय दि.२०.०६.२००८ प्रमाणे वेळापत्रक मर्यादा पाळणे शक्य झाले नाही ही वस्तुस्थिती आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार गुणवत्तेबाबत विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र लेखा परिक्षणाचे वेळी संचिकेत उपलब्ध नव्हते ही वस्तुस्थिती आहे, तथापि सदर प्रमाणपत्र आता अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

३. लाभार्थ्याना सहित्य प्राप्त झाल्याबाबत पंचायत समिती स्तरावरील वाटप रजिस्टरवर लाभार्थीच्या स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ दर्शविण्यासाठी संचिकेत उपलब्ध करुन ठेवल्या आहेत.

४. पंचायत समिती, उमरीला पुरवठा करण्यात आलेल्या ४७५ नग ३.२ के.जी.प्रेशरचे एच.डी.पी.इ.पाईपपैकी लेखा परिक्षणाचे वेळी २७५ पाईप वाटप झाले होते व २०० पाईप शिल्लक होते हे खरे आहे. नंतर सदर शिल्लक असलेले पाईप संपूर्ण वाटप झाले असून त्याची लोकवाटा रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेकडे (डी.एम.ओ.) भरणा करण्यात आली आहे. वाटपाच्या अभिलेख्याची छायांकित प्रत सोबत जोडली आहे व मुळ अभिलेखे दर्शविण्यासाठी उपलब्ध आहेत.

५. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा साहित्य पंचायत समितीस्तरावर उशीराने प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली आहे. तथापि याबाबत तत्कालीन कृषि विकास अधिकारी यांना जा.क्र./जिपनां/कृषि/पिपिएस/ १४९३/२०१५, दि.२०.०८.२०१५ अनुसार कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

६. पंचायत समिती, कंधार, लोहा, मुखेड, भोकर, हदगाव, नायगाव व मुदखेड यांनी साहित्य प्राप्त व वाटपाबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविली नाहीत हे सत्य आहे. संबंधित पंचायत समित्यांचे तत्कालीन कृषि गोदाम पर्यवेक्षक यांना दि.२०.०८.२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.सदर पंचायत समितीचे साहित्य प्राप्त व वाटपाबाबतचे अभिलेखे उपलब्ध आहेत.

७. लेखा परिक्षणाचे वेळी रु.५,१४,५०६ रक्कमेचे साहित्य वाटपा अभावी शिल्लक होते हे खरे आहे. नंतर शिल्लक असलेले साहित्य संपूर्ण वाटप झाले असून त्याची लोकवाटा रक्कम पुरवठादार संस्थेकडे भरणा करण्यात आली आहे.वाटपा अभावी कोणतेही साहित्य शिल्लक नाही.

८. संबंधित पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांचेकडून विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखा परिक्षणाचे वेळी दर्शविण्यात आले नाही हे सत्य आहे. तथापि सदरचे विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल कृषि अधिकारी यांच्याकडून घेण्यात आले असून संचिकेत उपलब्ध आहेत. विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखा परिक्षणाच्यावेळी का दाखविले नाही या बद्दल कृषि अधिकारी यांना दि. २०.०८.२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**केंद्रपुरस्कृत मका विकास कार्यक्रमातील ५० टक्के अनुदानावर कोल्टर पुरवठ्याबाबत — परिच्छेद ३.७२०**

जिल्हा परिषद कृषी विभागाने ५० टक्के अनुदानावर कोल्टर वाटपासाठी रूपये ३८,७५२ इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. पुरवठा आदेश देण्यापुर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांकडून ५० टक्के हिश्याची रक्कम वसूल करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

२. पंचायत समिती, मुदखेड, हदगांव, भोकर, उमरी, लोहा, कंधार, नायगांव, मुखेड, देगलूर यांनी साहित्य वाटपाबाबतचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

३. पंचायत समिती, नांदेड, बिलोली, धर्माबाद, किनवट, हिमायतनगर, माहूर, अर्धापूर यांना साहित्य सप्टेंबर २००९ व ऑक्टोबर २००९ मध्ये प्राप्त झाले. तत्पुर्वीच दिनांक ३१/३/२००९ रोजी साहित्याच्या रक्कमेचे प्रदान केलेले आहे. ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्र.पीआरसी-१०८१/सीआर/१०४०/३४, दिनांक १४ जून १९८२ अन्वये पुरवठादारास साहित्य पुरवठ्या अगोदर प्रदान करू नये अशा सूचना असतानाही प्रदान केले आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

केंद्र पुरस्कृत मका विकास कार्यक्रमातील ५० टक्के अनुदानावर कोल्टर पुरवठयाबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.—

१. पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पंचायत समिती स्तरावर करण्यात येते.साहित्याचा पुरवठा आदेश देण्यापुर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांकडून ५० टक्के स्वहिश्याची रक्कम अगोदर वसूल करण्यात आली नाही हे खरे आहे. शेतक-यांना मार्गदर्शन करुन देखील शेतकरी (लाभार्थी) स्वहिश्याची रक्कम भरत नाहीत. प्रत्यक्ष साहित्य आल्याची खात्री करुन रक्कम भरतात त्यानंतरच साहित्याचे वाटप केले जाते. तथापि पंचायत समितीस्तरावर लाभार्थ्यांकडून स्वहिश्याची रक्कम भरणा करुन घेवून त्यानंतर सदर लाभार्थ्यांना सिडकम फर्टीलायझर ड्रिल ३/४ कोल्टर ॲडजेस्टेबलचे वाटप करण्यात आले आहे.

२. पंचायत समिती, मुदखेड, हदगाव, भोकर, उमरी, लोहा, कंधार, नायगाव, मुखेड, देगलूर यांनी साहित्य प्राप्त व वाटपा बाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविली नाहीत हे सत्य आहे. संबंधित पंचायत समित्यांचे तत्कालीन कृषि गोदाम पर्यवेक्षक यांना दि.२०.०८.२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.सदर पंचायत समितीचे साहित्य प्राप्त व वाटपा बाबतचे अभिलेखे उपलब्ध आहेत.

३. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा साहित्य पंचायत समितीस्तरावर उशीराने प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली आहे. विलंबाबद्दल पुरवठा धारकास जा.क्र./जिपनां/ कृषि/पिसंयो/ २५१८/२०१५, दि.२०.०८.२०१५ अन्वये नोटीस देण्यात आली आहे.

**एकात्मिक कापुस विकास कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर साहित्य पुरवठाबाबत — परिच्छेद ३.७२१**

एकात्मिक कापुस विकास कार्यक्रम अंतर्गत साहित्य पुरवठ्याबाबत रक्कम रूपये १९,३८,२२५ खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ अन्वये योजना खर्च रुपये १५ लाखा पेक्षा जास्त असल्याने स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

२. पंचायत समिती स्तरावरील साहित्य वाटपाचे अनुषंगाने लाभार्थीची निवड यादी दर्शविणे आवश्यक आहे.

३. पुरवठादाराकडून साहित्य विलंबाने प्राप्त झाले परंतु पुरवठादारास रक्कम साहित्य प्राप्त होण्याआधी दिनांक ३१/ ३/२००९ रोजी प्रदान केले आहे.

४. पंचायत समिती, नांदेड, देगलूर, बिलोली, धर्माबाद, किनवट, हिमायतनगर, माहूर, अर्धापूर यांना कृषी औजारे मे २००९ ते ऑक्टोबर २००९ या कालावधीत प्राप्त झाली. तथापि प्रदान ३१/३/२००९ रोजी करण्यात आले. ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्र.पीआरसी १०८१/ सीआर/१०४०/३४, दिनांक १४ जून १९८२ अन्वये पुरवठादारास साहित्य प्राप्त होण्याअगोदर प्रदान करू नये अशा सूचना असतांनाही प्रदान केले आहे.

५. पुरवठा आदेश देण्यापुर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांकडून ५० टक्के स्वहिश्याची रक्कम वसूल करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

६. पंचायत समिती, कंधार, लोहा, मुखेड, उमरी, भोकर, हदगांव, नायगांव, मुदखेड यांनी साहित्य वाटपाबाबतचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

७. योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित प्राधिका-याचे तपासणी अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

८. लाभार्थ्यांस साहित्य प्राप्त झाल्याबाबत पोंच पावत्या दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

एकात्मिक कापुस विकास कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर साहित्य पुरवठाबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.—

१. एकात्मिक कापुस विकास कार्यक्रम ही योजना केंद्र पुरस्कृत योजना असल्यामुळे शासन निर्णय क्र.कापूस-१६०८/सीआर-१४१/४अे, दि.२७.५.२००८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.शासनाची प्रशासकीय मान्यता असल्यामुळे जिल्हा परिषद स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली नाही.

२. पंचायत समिती स्तरावर साहित्य वाटपाचे अनुषंगाने लाभार्थीची निवड यादी लेखा परिक्षणाचेवेळी दर्शविण्यात आली नाही हे सत्य आहे. पंचायत समितीस्तरावर निवडलेल्या लाभार्थ्यांची निवड यादी उपलब्ध असून त्याची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

३. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा साहित्य पंचायत समितीस्तरावर उशीराने प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली आहे. विलंबाबद्दल पुरवठा धारकास जा.क्र./जिपनां/ कृषि/पिसंयो/२५१६/२०१५, दि.२०.०८.२०१५ अन्वये नोटीस देण्यात आली असून त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे.

४. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा नांदेड, देगलूर, बिलोली, धर्माबाद, किनवट, हिमायतनगर, माहूर,अर्धापूर यांना साहित्य पंचायत समितीस्तरावर उशीराने प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली आहे. साहित्य विलंबाने पुरवठा झाल्या बद्दल पुरवठा धारकास जा.क्र./जिपनां/कृषि/पिसंयो/२५१६/२०१५ दि.२०.०८.२०१५, अन्वये नोटीस देण्यात आली आहे.

५. पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पंचायत समिती स्तरावर करण्यात येते.साहित्याचा पुरवठा आदेश देण्यापुर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांकडून ५० टक्के स्वहिश्याची रक्कम अगोदर वसूल करण्यात आली नाही हे खरे आहे. शेतक-यांना मार्गदर्शन करुन देखील शेतकरी (लाभार्थी) स्वहिश्याची रक्कम भरत नाहीत. प्रत्यक्ष साहित्य आल्याची खात्री करुन रक्कम भरतात त्यानंतरच साहित्याचे वाटप केले जाते, तथापि पंचायत समितीस्तरावर लाभार्थ्यांकडून स्वहिश्याची रक्कम भरणा करुन घेतल्यानंतर सदर लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

६. पंचायत समिती, कंधार लोहा, मुखेड, उमरी, भोकर, हदगाव, नायगाव, मुदखेड यांनी साहित्य प्राप्त व वाटपाबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविली नाहीत हे सत्य आहे. संबंधित पंचायत समित्यांचे तत्कालीन कृषि गोदाम पर्यवेक्षक यांना दि.२०.०८.२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सदर पंचायत समितीचे साहित्य प्राप्त व वाटपाबाबतचे अभिलेखे उपलब्ध आहेत.

७. योजनेच्या मार्गदर्शक सूचना नुसार योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधीत प्राधिका-यांनी दौ-याचेवेळी तपासणी केलेली आहे. याबाबतचा तपासणी अहवाल संचिकेत उपलब्ध असून त्याची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

८. लाभार्थ्यांना साहित्य प्राप्त झाल्याबाबत पंचायत समिती स्तरावरील वाटप रजिस्टरवर लाभार्थींच्या स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या आहेत. त्याची छायांकित प्रत उपलब्ध आहे व मुळ अभिलेखे दर्शविण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ऊस विकास कार्यक्रमाअंतर्गत वखर खरेदीबाबत — परिच्छेद ३.७२२**

ऊस विकास कार्यक्रमाअंतर्गत २५ टक्के अनुदानावर वखर खरेदीसाठी रूपये ३,७५,४१६ इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९९ अन्वये तांत्रिक मंजुरीचे आदेश दर्शविणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) विभाग प्रमुखांनी प्रत्यक्ष साहित्य खरेदी करण्यापूर्वी साहित्याची चाचणी करून गुणवत्ता व योग्यतेचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

३. पुरवठा आदेश देण्यापुर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांकडून ७५ टक्के हिश्याची रक्कम वसूल करून पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ९६ नुसार खात्री करूनच देयक सादर करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात पुरवठादाराकडून साहित्य सहा महिने विलंबाने प्राप्त झाले. परंतु साहित्य प्राप्त होण्यापूर्वीच दिनांक ३१/०३/२००९ रोजी पुरवठादारास प्रदान झाले आहे तसेच भांडार खरेदी नियमपुस्तीका प्रकरण-चार, भाग-पाच मधील नियम २.४ प्रमाणे विलंबाबाबत दंड आकारणी करून दंडाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

५. रक्कम रुपये १,२५,१३८ इतक्या रक्कमेचे साहित्य वाटपा अभावी शिल्लक आहे.

६. पंचायत समिती, कंधार, लोहा, मुखेड, भोकर, हदगांव, नायगांव, देगलूर, मुदखेड यांनी साहित्य वाटपाबाबतचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

७. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दिनांक २० जून २००८ नुसार योजना राबवितांना दिलेले वेळापत्रक पाळलेले नाही.

८. पंचायत समिती, उमरीच्या गोदामपालाने ७ यु टाईप वखराची लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये ७,४४४ महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांना भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ऊस विकास कार्यक्रमाअंतर्गत वखर खरेदीबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

१. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.नगदी पिके/ऊवियो/मासु/०८-०९/१६३/विप्र-४/०८, दि.१६.४.२००८ अन्वये योजनेच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या असून सदर मार्गदर्शक सूचना म्हणजेच योजना राबविण्यासाठीची तांत्रिक मान्यता होय. सदरील सूचना संचिकेत उपलब्ध आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार गुणवत्तेबाबत विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र लेखा परिक्षणाचे वेळी संचिकेत उपलब्ध नव्हते ही वस्तुस्थिती आहे. तथापि सदर प्रमाणपत्र आता अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

३. पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पंचायत समिती स्तरावर करण्यात येते.साहित्याचा पुरवठा आदेश देण्यापुर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांकडून ७५ टक्के स्वहिश्याची रक्कम अगोदर वसूल करण्यात आली नाही हे खरे आहे. शेतक-यांना मार्गदर्शन करुन देखील शेतकरी (लाभार्थी) स्वहिश्याची रक्कम भरत नाहीत प्रत्यक्ष साहित्य आल्याची खात्री करुनच रक्कम भरतात त्यानंतर साहित्याचे वाटप केले जाते. तथापि पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांकडून स्वहिश्याची रक्कम भरणा करुन घेतल्यानंतर सदर लाभार्थ्यांना वखराचे वाटप करण्यात आले आहे.

४. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा उशीराने साहित्य पंचायत समितीस्तरावर प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली

आहे. भांडार खरेदी संहिता प्रकरण-चार, भाग-पाच मधील नियम २-४ प्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत दंडाची आकारणी करणे आवश्यक असतांना केलेली नाही हे सत्य आहे.साहित्य विलंबाने पुरवठा झाल्याबद्दल पुरवठा धारकास जा.क्र./ जिपनां/कृषि/पिसंयो/२५१७/२०१५, दि.२०.०८.२०१५ अन्वये नोटीस देण्यात आली असून त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे.

५. लेखा परिक्षणाचे वेळी रु.१,२५,१३८ रक्कमेचे वाटप अभावी साहित्य शिल्लक होते हे खरे आहे. नंतर शिल्लक असलेले साहित्य संपूर्ण वाटप झाले असून त्याची लोकवाटा रक्कम पुरवठादार संस्थेकडे भरणा करण्यात आली आहे.वाटपा अभावी कोणतेही साहित्य शिल्लक नाही. उपरोक्त खुलासा मान्य व्हावा ही नम्र विनंती.

६. पंचायत समिती, कंधार, लोहा, मुखेड, भोकर, हदगाव, नायगाव, देगलूर, मुदखेड यांनी साहित्य प्राप्त व वाटपा बाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविली नाहीत हे सत्य आहे. संबंधित पंचायत समित्यांचे तत्कालीन कृषि गोदाम पर्यवेक्षक यांना दि.२०.०८.२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सदर पंचायत समितीचे साहित्य प्राप्त व वाटपा बाबतचे अभिलेखे उपलब्ध आहेत. उपरोक्त खुलासा मान्य व्हावा ही नम्र विनंती.

७. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक/झेडपीए/ २००८/प्र.क्रं./४४६/वित्त-९, दिनांक २० जून २००८ नुसार योजना राबवितांना दिलेले वेळापत्रक पाळले नाही हे सत्य आहे. लाभार्थीची निवड ही पंचायत समिती स्तरावर करण्यात आलेली असून लाभार्थ्यांच्या मागणीनुसारच कृषि साहित्य पुरवठा करुन ते लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे. उपरोक्त खुलासा मान्य व्हावा ही नम्र विनंती.

८. पंचायत समिती, उमरीच्या गोदामपालाकडे लेखापरिक्षणाचे वेळी ७ यु टाईप वखराच्या लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये ७,४४४ भरणा बाकी होती. सदर लाभार्थ्यांची हिश्याची रक्कम त्यांचेकडून वसूल करुन पुरवठादार संस्था एम.ए.आय.डी.सी.कडे डी.डी.क्रं.५२८१७४, दिनांक २०.०४.२०१० अन्वये भरणा करण्यात आली आहे. रक्कम भरल्याचे अभिलेखे सोबत जोडले आहेत.

**टीएसपी अंतर्गत १०० टक्के अनुदानावर कृषी पुरवठ्याबाबत — परिच्छेद ३.७२३**

१०० टक्के अनुदानावर टिएसपी अंतर्गत कृषी साहित्य पुरवठ्याबाबत खरेदी साहित्यावर रूपये ९,९८,३८५ चा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. योजना कार्यान्वीत करण्यापूर्वी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४ परिशिष्ट-२ नुसार तांत्रिक मंजुरी आदेश दाखविण्यात आले नाही.

२. पात्र लाभार्थ्यांची निवड यादी दर्शवून अनियमितता झाली नसल्याची खात्री पटविणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार विभाग प्रमुखाने प्रत्यक्ष साहित्य खरेदीपूर्वी साहित्याची तपासणी करून गुणवत्ता व योग्यतेचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

४. पुरवठादाराकडून पेट्रोकेरोसीन इंजिन विलंबाने प्राप्त झाले, परंतु साहित्य प्राप्त होण्यापूर्वीच दिनांक ३१/३/२००९ रोजी पुरवठादारास प्रदान केले आहे. तसेच सन २००६-०७ अंतर्गत लाभार्थ्यांना सन २००८-२००९ मध्ये नियमबाह्य वाटप केले आहे.

५. पंचायत समिती, किनवटचे साठा नोंदवहीत २५० नग एचडीपीई पाईप प्राप्त झाल्याची नोंद नाही. साहित्य प्राप्त न झाल्यामुळे रक्कम रुपये १,००,००० वसूल करून शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

६. लाभार्थ्यांना वाटपासाठी प्राप्त साहित्यापैकी साहित्य शिल्लक आहे. अनावश्यक खरेदी केली आहे.

७. योजनेतील मार्गदर्शक सूचनानुसार यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधीत प्राधिका-याचे तपासणी अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

८. कृषी औजारे संच दिनांक २५/३/२००९ पुर्वी पुरवठा करणे आवश्यक असतांना दिनांक ३१.३.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे विलंबाबत दंडाची रक्कम परिगणीत करून वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

टिएसपी योजने अंतर्गत १००% अनुदानावर कृषि साहित्य पुरवठयाबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.—

१. खात्याचे पत्र क्रमांक./विघयो/मासु/०७-८/विप्र-५/१५२/०७/कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे दिनांक २३ एप्रिल,२००७ मधील परि.क्र .४.६ नुसार योजनेच्या मार्गदर्शक सूचना म्हणजेच तांत्रीक मान्यता समजण्यात यावी असे नमुद केलेले आहे.त्यामुळे तीच तांत्रिक मान्यता होय. मार्गदर्शक सूचनाची प्रत उपलब्ध करुन ठेवण्यात आली आहे.

२. योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पात्र लाभार्थ्यांची निवड जिल्हा निवड समिती मार्फत करण्यात आली असून निवड यादी संचिकेत उपलब्ध आहे. उपरोक्त खुलासा मान्य व्हावा ही नम्र विनंती.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार गुणवत्तेबाबत विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र लेखा परिक्षणाचे वेळी संचिकेत उपलब्ध नव्हते ही वस्तुस्थिती आहे. तथापि सदर प्रमाणपत्र आता अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

४. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा साहित्य पंचायत समितीस्तरावर उशीराने प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली आहे. साहित्य विलंबाने पुरवठा झाल्याबद्दल पुरवठाधारकास नोटीस देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दिनांक ०५/०३/२००९ व कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक १२५/दि.०६/०३/२००९ अन्वये सन २००१-०२ ते २००७-०८ या कालावधीत निवड झालेल्या लाभार्थ्यांना सन २००८-०९ च्या मंजूर तरतुदीमधुन लाभ देण्याचे निर्देश असल्यामुळे सन २००६-०७ मध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांना सन २००८-०९ मध्ये लाभ दिलेला आहे.

५. पंचायत समिती, किनवटकडे डी.सी.नं.१५५७३८, दि.१९.०३.२००९ अन्वये २२५ नग व डी.सी.नं.१५५७३५, दि.१९.०३.२००९ अन्वये २५ नग असे एकूण २५० नग एचडीपीई पाईप प्राप्त झाल्याची नोंद घेतली असून ते लाभार्थ्यांना पुर्ण वाटप करण्यात आलेले आहेत व एचडीपीई पाईप वाटपाच्या नोंदी अभिलेख्यामध्ये उपलब्ध आहेत व त्याच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

६. लेखा परिक्षणाच्या वेळी शिल्लक असलेले साहित्य पात्र लाभार्थ्यांना संपुर्ण वाटप करण्यात आले असून वाटप रजिस्टरची छायांकित प्रत संचिकेत जोडली आहे.

७. योजनेच्या मार्गदर्शक सूचना नुसार योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सबंधीत प्राधिका-यांनी दौ-याचेवेळी तपासणी केलेली आहे. या बाबतचा तपासणी अहवाल संचिकेत उपलब्ध असून त्याची छायांकित प्रत संचिकेत उपलब्ध करुन ठेवली आहे.

८. कृषि औजारे संच विलंबाने पुरवठा झाल्याबाबत दंडाची आकारणी करणे आवश्यक असतांना केलेली नाही हे सत्य आहे. साहित्य विलंबाने पुरवठा झाल्याबद्दल पुरवठा धारकास या कार्यालयाचे पत्र क्र.२५३६, दि.२०.०८.२०१५ व पत्र क्र.२५३७, दि.२०.०८.२०१५ अन्वये नोटीस देण्यात आली असून याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत कृषी साहित्य पुरवठ्याबाबत — परिच्छेद ३.७२४**

कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत कृषी साहित्य ५० टक्के अनुदानावर व किटकनाशके ३३ टक्के अनुदानावर पुरवठ्यासाठी रुपये ९,८७,५८५ एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. पुरवठा आदेश देण्यापुर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांकडून लोकवर्गणीची रक्कम वसूल करून पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार विभाग प्रमुखाने प्रत्यक्ष साहित्य खरेदीपूर्वी साहित्याची तपासणी करून गुणवत्ता व योग्यतेचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/ प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २० जुन २००८ नुसार ठरवुन दिलेल्या वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

४. पुरवठादाराकडून साहित्य पुरवठा विलंबाने झाला परंतु पुरवठादारास साहित्य प्राप्त होण्यापूर्वीच दिनांक ३१/३/२००९ रोजी प्रदान झाले आहे.

५. पंचायत समिती कंधार, लोहा, मुखेड, उमरी, हदगांव, भोकर, नायगांव, मुदखेड यांनी साहित्य प्राप्ती व वाटपाबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास दर्शविले नाही.

६. लाभार्थ्यांकडून साहित्य प्राप्त झाल्याबाबत पोंचपावत्या घेणे आवश्यक आहे.

७. योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार फलश्रुती अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

८. योजनेतील मार्गदर्शक सुचनानुसार यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधीत प्राधिका-याचे तपासणी अहवाल दाखविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

कडधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत कृषि साहित्य पुरवठयाबाबत पुढील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

१. पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पंचायत समिती स्तरावर करण्यात येते.साहित्याचा पुरवठा आदेश देण्यापुर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांकडून लोकवर्गणीची रक्कम अगोदर वसुल करण्यात आली नाही, हे खरे आहे. शेतक-यांना मार्गदर्शन करुन देखील शेतकरी (लाभार्थी) स्वहिश्याची रक्कम भरत नाहीत प्रत्यक्ष साहित्य आल्याची खात्री करुनच रक्कम भरतात त्यानंतर साहित्याचे वाटप केले जाते. तथापि पंचायत समितीस्तरावर लाभार्थ्याकडून लोकवर्गणीची रक्कम भरणा करुन घेतल्यानंतर सदर लाभार्थ्यांना डवरासेट चे वाटप करण्यात आले आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार गुणवत्ते बाबत विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र लेखा परिक्षणाचे वेळी संचिकेत उपलब्ध नव्हते ही वस्तुस्थिती आहे तथापि सदर प्रमाणपत्र आता अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

३. योजने अंतर्गत प्रस्तावित असलेले कृषि साहित्य पुरवठा करतांना महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्रक्र.४४६/वित्त -९ दि.२०.६.२००८ नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकाचे पालन झाले नाही हे सत्य आहे. सदर साहित्य हंगामामध्ये पुरवठा झाले असून लाभार्थ्यांना मागणीनुसार वाटप करण्यात आले आहे.

४. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या तारखेपेक्षा साहित्य पंचायत समितीस्तरावर उशीराने प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक वर्ष संपत येत असल्यामुळे दि.३१.०३.२००९ रोजी अर्थ विभागाकडे देयक दाखल करुन पारीत करुन ठेवण्यात आले होते. साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधित पुरवठादार संस्थेस अदा करण्यात आली आहे. साहित्य विलंबाणे पुरवठा झाल्याबद्दल पुरवठा धारकास जा.क्र./जिपनां/कृषि/पिसंयो/२५१२/२०१५ दि.२०.०८.२०१५ नोटीस देण्यात आली असून त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे.

५. पंचायत समिती कंधार, लोहा, मुखेड, उमरी, हदगाव, भोकर, नायगांव व मुदखेड यांनी साहित्य प्राप्त व वाटपा बाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविली नाहीत हे सत्य आहे. संबंधित पंचायत समित्यांचे तत्कालीन कृषि गोदाम पर्यवेक्षक यांना दि.२०.०८.२०१५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सदर पंचायत समितीचे साहित्य प्राप्त व वाटपा बाबतचे अभिलेखे उपलब्ध आहेत.

६. लाभार्थ्याना सहित्य प्राप्त झाल्याबाबत पंचायत समिती स्तरावरील वाटप रजिस्टरवर लाभार्थीच्या स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या आहेत. त्याची छायांकित प्रत संचिकेत जोडली आहे व मुळ अभिलेखे दर्शविण्यासाठी उपलब्ध आहेत.

७. संबंधित पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांचेकडून विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखा परिक्षणाचे वेळी दर्शविण्यात आले नाही हे सत्य आहे. तथापि सदरचे विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल कृषि अधिकारी यांच्याकडून घेण्यात आले असून संचिकेत उपलब्ध आहेत. विनियोग प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखा परिक्षणाच्यावेळी का दाखविले नाही या बद्दल कृषि अधिकारी यांना दिनांक २०.०८.२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

८.योजनेच्या मार्गदर्शक सूचना नुसार योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सबंधीत प्राधिका-यांनी दौ-याचेवेळी तपासणी केलेली आहे. या बाबतचा तपासणी अहवाल संचिकेत उपलब्ध करुन ठेवण्यात आला असून तो अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, लेख्यामध्ये काही आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. १) कृषी अवजारांच्या गुणवत्तेबद्दल व योग्यतेबाबत खाते प्रमुखाचे प्रमाणपत्र केव्हा घेण्यात आले २) लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबनिहाय साहित्याची पंचायत समिती स्तरावरील नोंदवही लेखा परीक्षणास का त्याच वेळी उपलब्ध करून दिली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अवगत केले की, गुणवत्तेबद्दलचे प्रमाणपत्र त्यावेळी दाखविण्यात आले नव्हते ही वस्तुस्थिती आहे. त्याचबरोबर लाभार्थ्यांची नोंदवही देखील त्यावेळी दाखविण्यात आली नव्हती. जे जबाबदार आहेत त्यांना नोटीस दिली असून वेतनवाढ रोखण्याची कार्यवाही करण्यात येईल, यावर समितीने दुबार लाभार्थ्यांबाबत पुन्हा चौकशी करून समितीला एका महिन्यात अहवाल द्यावा. चुकीचे आढळले तर जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करावी आणि त्याचा अहवाल पाठविण्यात यावा, पंचायत समिती, बिलोली अनुक्रमांक १ ते १० या मुद्यांचाही चौकशीमध्ये समावेश करून संपूर्ण अहवाल समितीला सादर करावा. मास्टर नोंदवहीमधील लाभार्थ्यांची नावे आणि २०१५ पर्यंत त्याच लाभार्थ्यांना पुन्हा लाभ मिळाला असेल तर त्याचाही अहवाल सादर करावा. जोपर्यंत ही मास्टर नोंदवही समोर येत नाही तोपर्यंत सिध्द होणार नाही, असे निर्देश समितीने दिले.

समितीने पुढे विचारणा केली की, कृषी विभागाचे रुपये ५,१४,५०६/- इतक्या रकमेचे साहित्य वाटपाअभावी शिल्लक होते. त्यामुळे अशा प्रकारच्या अनावश्यक खरेदीस कोण जबाबदार आहे ? अहवाल वर्षात बरेच साहित्य शिल्लक होते याची कारणे काय आहेत. परंतू समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त होवू शकले नाही. समितीच्या मते लोकांना कृषी साहित्य मिळत नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी आहेत. यंत्रणेकडून प्रत्यक्षात कृषी साहित्याचे वाटप करण्यात आले की नाही, याबाबत समितीला शंका आहे. त्यामुळे कृषी विभागाशी संबंधित असलेल्या कृषी साहित्य पुरवठ्याबाबतच्या परिच्छेदांच्या अनुषंगाने जबाबदार असलेल्या ग्रामसेवक, कृषी विस्तार अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांच्यावर कारवाई करावी, असे निदेश समितीने दिले.

कृषी विभागाशी संबंधित असलेले परिच्छेद क्र.३.७१७ (३२८ व ३२९ ), ३.७१८ (३२९ व ३३०), ३.७१९ (३३०), ३.७२० (३३० व ३३१), ३.७२१ (३३१), ३.७२२ (३३१), ३,७२३ (३३२) आणि ३.७२४ (३३२) सारखेच असून या परिच्छेदांच्या संदर्भात चौकशी करून जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचा-यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्याचे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

कृषी विभागाशी संबंधित परि. क्र. ३.७१७, ३.७१८, ३.७१९, ३.७२०, ३.७२१, ३.७२२, ३.७२३, ३.७२४ संदर्भात चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत समितीने निदेशीत केले आहे, त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे, अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर परिच्छेद क्र. ३.७१७, ३.७१८, ३.७१९, ३.७२०, ३.७२१, ३.७२२, ३.७२३, ३.७२४ या मुद्दयांच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्यात आली असुन सदर प्रकरणी कृषि विकास अधिकारी यांचेकडुन झालेल्या अनियमिततेबाबत कारणे दाखवा नोटीस दिले असुन त्यांनी त्यांच्या खुलाशात झालेली अनियमिततेही प्राप्त तरतुद व्यपगत होणार नाही व निवड केलेल्या लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने साहित्य पुरवठाचे देयक साहित्य पुरवठा होण्यापूर्वी सादर करुन धनादेश साहित्याचा पुरवठा उशिराने झाल्याबद्दल पुरवठादार संस्थेस कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या असुन सदर संस्थने खुलाशात झालेली चूक क्षमापित करणेस्तव व यापुढे अशी दिरंगाई होणार नाही असे आश्वासीत केले असल्यामुळे व सदर पुरवठादार संस्था या शासनाच्या अंगीकृत आश्वासीत संबंधिताचा खुलासा मान्य करुन अनुषंगाने अभिलेखे न दाखविणा-या कर्मचा-यांवर रुपये १००/- दंडाची व एक वार्षिक वेतनवाढ (तात्पुरती) बंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

प्रस्तुत मुद्द्यांच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्यात आली असून तत्कालीन कृषि विकास अधिकारी यांच्याकडून झालेल्या अनियमिततेबाबत त्यांना जिल्हा परिषदेकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. प्राप्त तरतूद व्यपगत होणार नाही व निवड झालेल्या लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने साहित्य पुरवठा झाल्यानंतरच धनादेश अदा करण्यात आले आहेत, असा त्यांनी खुलासा केला आहे. साहित्य पुरवठा उशिराने झाल्याबद्दल पुरवठादार संस्थांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या. त्या संस्थांनी झालेली चूक क्षमापित करण्यास्तव व यापुढे अशी दिरंगाई होणार नाही असे आश्वासित संस्था असल्याने अभिलेखे न दाखविणा-या जिल्हा परिषद कर्मचा-यांवर रु. १००/- दंडाची कारवाई व त्यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आली आहे. नांदेड जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात यावी व लाभार्थ्यांच्या यादीसह चौकशीचा अहवाल व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्याचे समितीने निर्देशित केले आहे. त्यानुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले. यावर अतिरीक्त मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी समितीस विदीत केले की, मुद्दा क्रमांक ४२ व ४३ या दोन्ही मुद्यांचा विषय सारखाच आहे. यामध्ये असे आक्षेप होते की, कृषी अवजारांच्या गुणवत्तेबद्दल व योग्यतेबाबत खाते प्रमुखाचे प्रमाणपत्र ऑडिटरना दाखविण्यात आले नाही व लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबनिहाय साहित्याची माहिती उपलब्ध करून दिली नाही. या अनुषंगाने सीईओंनी तपासणी करून गोदामवाल्याला नोटीस देऊन शिक्षा देण्यात आलेली आहे. तसेच, गुणवत्ता प्रमाणपत्र न जोडल्याबाबत संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

याबाबत समितीने प्रतिपादन केले की, ५० हजार रुपयांत बैलगाडी येत नाही. केवळ नियम आहे म्हणून लोक स्वतःच्या घरचेच बैल घेऊन येतात आणि बैल घेतल्याचे सांगतात हे फॅक्ट आहे. त्यामुळे प्रत्यक्षात त्यांना काहीच फायदा होत नसल्याने याबाबत पुनर्विचार करावा. यावर अतिरीक्त मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी खुलासा केला की, या सर्व योजनांबाबत सन १९८२ पासूनच्या गाईडलाईन्स आहेत. त्यामध्ये थोडेफार बदल करण्यात आलेले आहेत. आर्थिक निकष थोडे वाढविण्यात आलेले आहेत आणि पात्रते संदर्भात थोडेफार फेरफार केलेले आहेत. आपण या अंतर्गत शेतक-यांना जी मदत करतो, त्यामध्ये फारसे बदल करण्यात आलेले नाहीत. या संदर्भात ५-६ अधिका-यांची एक समिती नेमली होती. तिचा अहवाल प्राप्त झाला आहे. याबाबतचा अंतिम निर्णय झालेला नाही. मात्र कृषी विभागाचे असे मत आहे की, या योजनेचे स्वरुप बदलले पाहिजे. त्यामध्ये प्रामुख्याने पाण्याचा उद्‌भव उपलब्ध करून देणे, कृषी पंप अन्यथा सोलर पंप उपलब्ध करुन देणे तसेच, ड्रिप इरिगेशन, स्प्रिंकलर इरिगेशन किंवा मायक्रो इरिगेशनची सोय उपलब्ध करुन देऊन त्यांची पाण्याची आवश्यकता पूर्ण केली पाहिजे. त्यानंतर ग्रीन हाऊस वगैरेबाबत विचार करता येईल. अशा उपाययोजनांमुळे शेतक-यांच्या उत्पन्नातही वाढ होईल. याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप व्हायचा आहे मात्र या निमित्ताने बरेचसे आयटम्स डिलीट करण्याची संधी मिळालेली आहे.

सन १९८२ पासूनच्या गाईडलाईन्समध्ये बदलच न केल्याने असे होत होते. याबाबतचा निर्णय जलदगतीने करावा. कारण सद्यःस्थितीत ५० हजार रुपयांत काही बैलगाडी येत नाही. त्यामुळे एका वर्षी बैल घेतले तर दुस-या वर्षी गाडी घ्यायची असे करण्यात २ वर्षे निघून जातात. त्यामुळे शासनाने लवकर निर्णय करावा जेणेकरुन चांगले रिझल्टस मिळतील. सर्वसाधारणपणे एका योजनेंतर्गत गाई म्हशी वाटल्याचे दाखविण्यात आले परंतु, प्रत्यक्षात तेथील दूग्ध उत्पादनात वाढ झाली नाही कारण ते केवळ कागदोपत्रीच घडले होते. लोकांनी आपल्या घरातीलच जनावरे नेऊन पावत्या बनविल्या होत्या. असे होऊ नये याकरिताच निर्णय जलदगतीने घेतले गेले पाहिजेत, असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत कृषी विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजना जसे विशेष घटक योजनेतील लाभार्थ्यांना कृषी औजारे, साहित्य पुरवठा, ओटीएसपी योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानावर साहित्य वाटप, गळीत धान्य विकास कार्यक्रमांतर्गत ५० टक्के अनुदानावर कृषी साहित्य खरेदी, केंद्र पुरस्कृत मका विकास कार्यक्रमांतर्गत ५० टक्के

अनुदानावर कोल्टर पुरवठा, एकात्मिक कापूस विकास कार्यक्रमांतर्गत ५० टक्के अनुदानावर साहित्य पुरवठा, उस विकास कार्यक्रमांतर्गत वखर खरेदी, टी.एस.पी. अंतर्गत १०० टक्के अनुदानावर कृषी साहित्य पुरवठा, कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत कृषी साहित्य ५० टक्के अनुदानावर व किटकनाशके ३३ टक्के अनुदानावर पुरवठा करणे, इत्यादी योजनांमध्ये अहवालवर्षात अनेक अनियमितता झाल्याचे भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले. कृषी विभागाशी संबंधित उक्त आठही प्रकरणांत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे समितीने निदेश दिले आहेत. प्राप्त तरतूद व्यपगत होणार नाही व निवड केलेल्या लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने पुरवठा होण्यापूर्वीच धनादेश सादर केलेला असला तरी पुरवठा झाल्यावरच धनादेश संबंधीत संस्थेला दिल्याचे समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. एवढेच नव्हे तर यामुळे तत्कालीन कृषी विकास अधिका-याचा खुलासा शासनाने ग्राहय धरला असल्याचेही समितीच्या निदर्शनास आले. साहित्याच्या उशीरा पुरवठयास जबाबदार असलेली संस्था केवळ शासनाचा अंगिकृत उपक्रम असल्यामुळे तिने दिलगिरी व्यक्त केल्यामुळे तिच्यावर दंडात्मक कारवाई केली नसल्याचे समितीस सांगण्यात आले. जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांच्याच चुका क्षमापित करण्याची कारवाई केली व नांदेड जिल्हा परिषदेने केलेल्या कारवाईस शासनाने सहमती दर्शविली असली तरी समिती अशा प्रकारच्या क्षमापनाशी सहमत होवू शकत नाही. लाभार्थ्यांना वेळेवर साहित्य मिळाले नसल्यामुळे त्यांचे व शासनाचा निधी व योजना फलद्रूप झाल्या नसल्यामुळे शासनाचे नुकसानच झाले आहे या निष्कर्षाप्रत समिती पोहोचली आहे.

वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेच्या संदर्भात समितीच्या असे निदर्शनास आले की, सुमारे ३४ वर्षापूर्वी शासनाने यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. दरम्यानच्या काळात पात्रता व आर्थिक निकष याबाबत थोडेफार फेरफार करण्यात आले आहेत. परंतु आजची कृषी क्षेत्राशी संबंधीत परिस्थिती व ३५ वर्षापूर्वीची परिस्थिती यात जमीन आस्मानाचे अंतर आहे. अतः सन १९८२ सालच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये अमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे मत आहे. **मध्यंतरी शासनाने ५ ते ६ अधिका-यांचा अभ्यास गट या कामाकरिता नेमलेला होता व त्यांनी आपला अहवाल शासनाकडे सादर केलेला आहे. सदर अभ्यासगटाच्या अहवालावर त्वरेने कारवाई करुन अंमलबजावणी करण्यात यावी व कृषी विभागामार्फत अंमलात येणा-या वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये कृषी पंप, सोलार पंप, ठिंबक सिंचन, स्प्रींकलर, मायक्रोइरीगेशन इत्यादीचा समावेश करण्यात यावा व अशा सर्व योजनांच्या अंमलबजावणी त्या त्या आर्थिक वर्षात करुन लाभार्थी शेतक-यांना खरीप व रब्बी हंगामाच्या वेळी त्याचा लाभ कसा होईल याची सत्वर कार्यवाही उक्त अभ्यास गटाच्या अहवालाच्या आधारे करावी तशी या सर्व आठ प्रकरणांमध्ये अनियमितता व सर्व संबंधितांना खुलासा सादर करण्यास नोटीशीद्वारे प्रकरणनिहाय कळविण्यात आले असे लेखी खुलाशात समितीला माहितीद्वारे नमुद केले. अशा सर्व प्रकरणी नैसर्गिक न्यायतत्वाचा वापर करुन संबंधितांस पुरेशी संधी देवून दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण सव्वीस

# जिल्हा परिषद, नांदेड

## महिला बचत गटांना आहार पुरवठापोटी केलेले नियमबाह्य प्रदानाबाबत

**परिच्छेद ३.९५२ (सन २००८-०९)**

पंचायत समिती किनवट अंतर्गत महिला बचत गटाला रुपये ३,९३,६४०/- व पंचायत समिती हदगाव अंतर्गत रुपये १,०५,०९१/- प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. शासन निर्णय क्र. ए.बा.वि.से.यो/२००४/प्र.क्र.२३३/का५ दिनांक २८/१०/२००५ च्या तरतुदीनुसार पुरक पोषण आहार या योजनेतंर्गत अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस हे या योजनेत लाभार्थी असल्याचे नमुद नाही. अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना लाभार्थी धरून केलेले प्रदान नियमबाह्य आहे. यापूर्वीचे कालावधीत अशाप्रकारचे प्रदान झाले बाबत जिल्हा परिषद स्तरावरून रक्कम परिगणित करून वसुली करणे आवश्यक आहे.

२. अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना लाभार्थी समजून प्रदान रक्कम रुपये ४,९८,७३१/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महिला बचत गटांना आहार पुरवठा पोटी केलेले नियमबाह्य प्रदाना बाबत ता.किनवट व हदगांवच्या मुद्यांबाबत पूढील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

१. शासन निर्णय क्रमांक एबाविसेयो /२००४/प्र.क्र.२३३/का-५ दिनांक २८.०५.२००५ च्या तरतुदीनुसार पुरक पोषण आहार या योजने अंतर्गत अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनिस हे या योजनेत लाभार्थी असल्याचे नमुद नाही.तथापि किनवट तालुक्यात रूपये ३९३६४०/- व हदगांव तालुक्यात रूपये १,०५,०९१/- अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना लाभार्थी धरुन केलेले एकूण रूपये ४९८७३१/- चे प्रदान नियमबाह्य आहे ही वस्तुस्थिती असुन याबाबत तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी, किनवट यांना या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस दिनांक २४.०८.२०१५ अन्वये बालविकास प्रकल्प अधिकारी यांनाही या कार्यालयाचे नोटीस दिनांक २४.०८.२०१५ अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे. तथापि मा.संचालक, समाज कल्याण, पुणे यांचे पत्रानुसार माहे-एप्रिल- १९९० पासुन म्हणजेच सन १९९०-९१ पासुन अंगणवाडी सेविका/मदतनिस यांना दूप्पट आहार देण्यांच्या सुचना आहेत. सदर बाबीस मा.संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दिनांक ०९.०४.१९९० मुळे पूष्टी मिळते याशिवाय भारत का राजपत्र दिनांक- ०८ जुन २०१५ मधिल बाब क्रमांक- ७ (७) मध्ये देखिल लाभार्थ्यांना आहार पुरवठा करण्यापूर्वी अंगणवाडी सेविका अथवा मदतनिस यांनी आहाराची चव पाहूनच लाभार्थ्यांना आहाराचे वाटप करण्यांबाबत सुचना आहेत सदरचे तिनही दस्तऐवज अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

तथापि आक्षेपात सुचविल्यानुसार यापूर्वीचे कालावधीत किनवट व हदगांव तालुक्यात किती रक्कमेचे अतिप्रदान करण्यात आले आहे याबाबतची परिगणना जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे. अंगणवाडी सेविका व मदतनिस ह्या मानधनी कर्मचारी असुन त्या अतिशय गरीब घरच्या आहेत याशिवाय महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्रमाक- एबावि- २००८/प्रक्र- ५९/का- ५ दिनांक- २४ ऑगस्ट २००९ मधील परिच्छेद क्रमांक- ३.१० नुसार अंगणवाडी सेविकांनी प्रत्येक दिवसाच्या आहाराचा नमुना (Sample) त्याचे वाटप झाल्यानंतर २४ तासांसाठी तपासणी करिता जतन (Preserve) करून ठेवावा अशी तरतुद आहे, सदर शासन निर्णय तसेच उपरोक्त तिन्हीही पत्रानुसार अंगणवाडी सेविका/मदतनिस यांना आहार देण्यांत आला आहे तथापी गट विकास अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना नियमबाह्य देयके सादर करणे बाबत या कार्यालयाने दिनांक- २४.०८.२०१५ रोजी नोटीस दिली आले आहे कारणे दाखवा नोटीसीची प्रत व परिगणनेची प्रत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

२. याबाबत किनवट व हदगांव तालुक्यात यापूर्वी अशा प्रकारे किती रक्कमेचे अतिप्रदान करण्यांत आले आहे याची परिगणना जिल्हा परिषद स्तरावर करण्यांत येत असुन, तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी, हदगाव व किनवट यांना या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस दिनांक- २४.०८.२०१५ अन्वये नोटीस देण्यांत आली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती किनवट व हदगाव अंतर्गत अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना लाभार्थी धरुन नियमबाह्य प्रदान कोणत्या प्राधिकारान्वये केले, अनियमित प्रदानामुळे झालेले रुपये ४,९८,७३१/- च्या अतिप्रदानास कोण जबाबदार आहे, संबंधितांवर याबाबत काय कार्यवाही केली, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) यांनी विदीत केले की, पंचायत समिती किनवट व हदगाव अंतर्गत अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना लाभार्थी समजून पुरक पोषण आहार दिला होता व हे लाभार्थी पकडूनच बिले काढण्यात आली होती. शासनाच्या दि.९.४.१९९० च्या पत्रात असे म्हटले आहे की, अंगणवाडी कार्यकर्ती आणि मदतनीस यांना लाभार्थी समजून पुरक पोषण आहार द्यावा. समितीने पुढे अशी विचारणा केली की, या प्रकरणामध्ये ४,९८,७३१/- रुपये जादा प्रदान झाले नाही असे आपले म्हणणे आहे काय, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) यांनी होकारार्थी उत्तर देवून विषबाधा वगैरे होऊ नये यासाठी अंगणवाडी कार्यकर्ती आणि मदतनीस यांनी प्रथम आहाराची चव घेतली पाहिजे. असे विदीत केले. शासनाच्या या संदर्भातील २.१.१९९० च्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, केंद्र शासनाच्या वरील संदर्भीय पत्रानुसार अंगणवाडी मदतनीस यांना अंगणवाडीतील लाभार्थ्यांप्रमाणे सकस आहार द्यावा असे कळविले आहे. विषबाधा होऊ नये याकरिता त्यांनी चव घ्यावी असाच राजपत्रात उल्लेख आहे.

समितीने चव घ्यावी की लाभ घ्यावा, हे परिपत्रक कोणाचे आहे, अशी विचारणा केली असता त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केंद्र सरकारने राज्य सरकारला डायरेक्शन्स दिल्या असल्याचे स्पष्ट केले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उत्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अधिक स्पष्टिकरण दिले की, हा आक्षेप असा आहे की, अंगणवाडीमध्ये आहार शिजविला जातो त्याकरिता २००८-०९ मध्ये लाभार्थ्यांची संख्या १५ असताना १७ दाखविली, २५ असेल तर २७ दाखविण्यात आली. दोन अतिरिक्त संख्येमध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी सकस आहाराचा लाभ घेतला. त्यांनी जे अन्न खाल्ले ते खाण्यासाठी ते पात्र होते की नव्हते असा मुद्दा आहे. २००८ च्या शासननिर्णयामध्ये उल्लेख नसल्यामुळे ऑडिटमध्ये आक्षेप घेण्यात आला. वास्तविक अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना अन्नाचा लाभ घेत होत्या. त्याला सपोर्टिंग म्हणून तपासणी केल्यानंतर केंद्र सरकारचे २००९ चे परिपत्रक सापडले. त्यावेळेला त्यांना लाभार्थी म्हणून गृहित धरले जात होते, आता ती पध्दत बंद झालेली आहे. जर चूक झाली असेल तर क्षमापित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्याबाबत शालेय शिक्षण विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, किनवट व हदगांव अंतर्गत अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना लाभार्थी गृहित घरुन नियमबाह्य प्रदानामुळे रुपये- ४,९८,७३१/- च्या अतिप्रदान झाले या लेखा परिक्षकाच्या आक्षेपावर जिल्हा परिषदेने केंद्र सरकारचे २००९ चे परिपत्रकानुसार त्यांना लाभार्थी म्हणून गृहित धरले जाते असा खुलासा केला असून याबाबत सर्वच जिल्हा परिषंदाबाबत निर्णय होण्याची आवश्यकता असल्यामुळे याबाबत शासनाची भुमिका काय आहे?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर प्रकरणी पंचायती राज समितीने सुचविल्यानुसार या कार्यलयाचे पत्र क्रमांक- ८७२ दिनांक-२६.११.२०१५ अन्वये महिला व बाल विकास विभागास अंगणवाडी सेविका / मदतनीस यांना पूरक पोषण आहाराचे लाभार्थी समजून दिलेल्या लाभाच्या रक्कमेस क्षमापन देण्याची विनंती तसेच यापूढे अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना लाभार्थी समजून आहार द्यावा किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागविले असता पत्र क्रमांक एबावि-२०१६/प्र.क्र.१५ दिनांक २९.०१.२०१६ अन्वये अंगणवाडी सेविका/ मदतनीस ह्या अंगणवाडी मध्ये उपस्थित असतांना महिला मंडळ/बचत गटांमार्फत आहार पूरवठा करण्यात येतो. सदर आहाराची गुणवत्ता तपासण्यासाठी आहार खावून पाहणे आवश्यक आहे. जेणेकरुन अन्न विषबाधा सारख्या घटना टाळता येऊ शकतील त्यामुळे सेविका/ मदतनीस यांनी खाल्लेल्या आहाराच्या रक्कमेस क्षमापन देण्यास हरकत नाही. तसेच भविष्यात सुध्दा अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना लाभार्थी समजून लाभार्थ्यांइतकाच आहार देणे आवश्यक वाटते असे अभिप्राय महिला व बालविकास विभागाकडून या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

**उपरोक्त संदर्भात महिला व बालविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद नांदेड यांचे अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येत आहे.

**चौकशी अहवाल**

शासन निर्णय क्रमांक एबाविसेयो/२००४/प्र.क्र.२३३/का-५ दिनांक २८.०५.२००५ च्या तरतुदीनुसार पुरक पोषण आहार या योजने अतंर्गत अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस हे या योजनेत लाभार्थी असल्याचे नमुद नाही. तथापि किनवट तालुक्यात रुपये ३,९३,६४०/- व हदगांव तालुक्यात रुपये १,०५,०९१/- अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना लाभार्थी धरुन केलेले एकुण रुपये ४,९८,७३१/- चे प्रदान नियमबाह्यरित्या झाले आहे. याबाबत तत्कालीन बाल विकास प्रकल्प अधिकारी किनवट व हदगांव यांना कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस दिनांक २४.८.२०१५ अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे. तथापि मा.संचालक समाजकल्याण पुणे यांच्या पत्रानुसार माहे एप्रिल, १९९० पासून म्हणजेच सन १९९०-९१ पासून अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना दुप्पट आहार देण्याच्या सूचना आहेत. सदर बाबीस मा.संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पूणे यांचे पत्र दिनांक ९.४.१९९० मुळे पूष्टी मिळते. याशिवाय भारत का राजपत्र दिनांक ८ जून, २०१५ मधील बाब क्रमांक ७(७) मध्ये देखील लाभार्थ्यांना आहार पुरवठा करण्यापूर्वी अंगणवाडी सेविका अथवा मदतनीस यांनी आहाराची चव पाहूनच लाभार्थ्यांना आहाराचे वाटप करण्याबाबत सूचना असल्याचे सदरच्या तीन्ही दस्तऐवजावरुन दिसून येते.

अंगणवाडी सेविका व मदतनीस ह्या मानधनी कर्मचारी असून त्या अतिशय गरीब घरच्या आहेत. याशिवाय महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि/२००८/प्र.क्र.५९/का-५ दिनांक २४.०८.२००९ मधील परिच्छेद क्रमांक ३.१० नुसार अंगणवाडी सेविकांनी प्रत्येक दिवसाच्या आहाराचा नमुना (Sample) त्याचे वाटप झाल्यानंतर २४ तासांसाठी तपासणी करीता जतन (Preserve) करुन ठेवावा अशी तरतुद आहे. सदर शासन निर्णय तसेच उपरोक्त तीन्ही पत्रानुसार अंगणवाडी सेविका / मदतनीस यांना आहार देण्यात आला असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

सदर प्रकरणी उपलब्ध अभिलेख्यांची तपासणी केली असता त्यात कोणतीही अनियमितता अथवा गैर व्यवहार झाल्याचे दिसून येत नाही. तसेच मा.पंचायती राज समितीने सूचित केल्यानूसार मा. संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दिनांक ९.४.१९९० ची स्वच्छ व स्पष्ट प्रत मागविण्यात आली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, किनवट व हदगांव अंतर्गत अंगणवाडी कार्यकर्ती व मतदनिस यांना लाभार्थी गृहित धरून नियमबाह्य प्रदानामुळे रु.४,९८,७३१/- च्या अतिप्रदान झाले या लेखापरीक्षकाच्या आक्षेपावर जिल्हा परिषदेने केंद्र सरकारचे २००९ चे परिपत्रकानुसार त्यांना लाभार्थी म्हणून गृहित धरले जाते असा खुलासा केला असून, याबाबत सर्वच जिल्हा परिषदांबाबत निर्णय होण्याची आवश्यकता असल्यामुळे याबाबत शासनाची भूमिका काय आहे यावर महिला व बालविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीस विदित केले की, प्रत्येक अंगणवाडीत मदतनिस या सेवक म्हणून काम करीत असतात. त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या जेवणाची तपासणी करणे अपेक्षित असते. त्यांना लाभार्थी म्हणून गृहित धरले जावे, अशी विभागाची भूमिका आहे आणि त्यानुसार विभागाने सर्क्युलर काढलेले आहे. या विषयाच्या संदर्भात एक पॉलिसी ठरविण्यासाठी मंत्री महोदयांकडे पुढील ७ दिवसांच्या आत प्रस्ताव पाठविला जाणार आहे. त्यानंतरच शासन निर्णय निर्गमित केला जाणार आहे. विभागाची अशी भूमिका आहे की, अंगणवाडी सेवक/ मदतनीस यांचा देखील यामध्ये समावेश असावा.

अंगणवाडीत मदतनिस या सेवक म्हणून काम करीत असतात. त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या जेवणाची तपासणी केली पाहिजे. परंतु, सद्यःस्थितीत ही पॉलिसी नाही. म्हणून एक्सेस रिकव्हरी दाखविण्यात आलेली आहे. ते लाभार्थी म्हणून धरले जात नाही. त्यांना देखील लाभार्थी गृहित धरले जावे, असे विभागाचे मत आहे. त्यांनी पहिल्याप्रथम जेवण घेऊन त्यानंतर ते विद्यार्थ्यांना दिले जावे, अशी विभागाची धारणा आहे.

## अभिप्राय व शिफारशी

एकात्मिक बाल विकास सेवा योजना राज्यात गेली ३५ वर्षाहून अधिक काळ राबविली जात आहे. अहवाल वर्षात पंचायत समिती किनवट अंतर्गत रुपये ३,९३,६४०/- व पंचायत समिती हदगांव अंतर्गत रुपये १,०५,०९१/- महिला बचत गटांना प्रदान करण्यात आले. परंतु दिनांक २८/१०/२०१५ च्या शासन निणर्यात अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनिस यांचा लाभार्थी म्हणून समावेश नसतानाही त्यांना लाभार्थी म्हणून ठरावीक रकमेचे प्रदान झालेले आहे ते नियमबाहय असून ते वसूल करण्यात यावे अशा आशयाचा तांत्रिक आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला होता. लेखा आक्षेपावरील खुलाश्यास (१) संचालक, समाजकल्याण, पुणे यांचे पत्रानुसार सन १९९० पासून अंगणवाडी सेविका/मदतनीस यांना दुप्पट आहार देण्याच्या सूचना आहेत. (२) राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियम, २०१३ च्या कलम ३९ चे पोट कलम (८) चा खंड (ख) व उपखंड (१) च्या प्रदान शक्तीस अनुसरुन केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने भारत सरकारच्या भाग दोन असाधारण राजपत्राव्दारे पूरक पोषण (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) नियमावली, २०१५ अधिसूचीत केली आहे. सदर नियमावलीच्या नियम ७ (७) अनुसार मुंलांना भोजन देण्यापूर्वी अंगणवाडी कार्यकर्ता किंवा सहायिकेने त्या खाऊन पाहणे बंधनकारक असल्याचेही समितीच्या निदर्शनास आले.

अंगणवाडीत मदतनिस या सेवक म्हणून काम करीत असतात. त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या जेवणाची तपासणी केली पाहिजे. परंतु, सद्यःस्थितीत हे धोरण नाही. म्हणून ज्यादा वसुली दाखविण्यात आलेली आहे. ते लाभार्थी म्हणून धरले जात नाही. त्यांना देखील लाभार्थी गृहित धरले जावे, असे विभागाचे मत आहे. त्यांनी पहिल्याप्रथम जेवण घेऊन त्यानंतर ते विद्यार्थ्यांना दिले जावे, अशी विभागाची धारणा आहे असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी सांगितले. सदरची धारणा योग्य आहे असे समितीचेही मत आहे. विभागीय सचिवांनी समितीस विदीत केल्याप्रमाणे अंगणवाडी मदतनीस/सेवक यांनी लाभार्थी बालकास दिल्या जाणा-या आहाराची प्रथमता चव चाखून त्यानंतर तसा आहार तयार करुन खाण्यास योग्य असा आहार बालकास दिला जातो. अशा आहाराची अंगणवाडी सेविका/मदतनीस चव चाखत असल्याने निश्चितच त्या आहाराचे सेवन केले जाते व अशा सेवन केलेल्या आहारात लाभार्थ्यांचा आहार गृहित धरणे योग्य आहे. लेखाआक्षेपात नेमकी कायद्याची भुमिका घेतली जात असून ती रास्त आहे. कारण अशाप्रकारे अंगणवाडी सेविका/मतदनीस यांनी चव चाखली म्हणून लाभार्थी गृहीत धरण्यात यावे असे राज्य शासनाच्या कोणत्याही परिपत्रकात नमुद केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे विभागीय सचिवांनी या संदर्भात प्रस्ताव पाठविला जाणार असून याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे. तथापि, असा धोरणात्मक निर्णय अद्याप घेतला गेला किंवा कसे याची माहिती समितीसमोर अद्याप आलेली नाही. तेव्हा **विभागीय सचिवांनी आश्वासित केल्याप्रमाणे अंगणवाडी सेवक/मदतनीस यांनी अंगणवाडीतील मुलांना दिला जाणारा आहार आधी चाखून नंतरच मुलांना दिला जावा तसेच उक्त अंगणवाडीसेविका/मदतनीस यांना त्यांनी सेवन केलेले उष्टे अन्न बालकांना दिले जात नसल्यामुळे केवळ तांत्रिक बाब येऊ नये यासाठी त्यांना लाभार्थी गृहीत धरण्यात यावे. या सुसंगत धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्यासंदर्भात विभागाने त्वरेने शासन निर्णय निर्गमित करावा अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण सत्तावीस

# जिल्हा परिषद, नांदेड

## गटविमा योजनेतील सदस्यांना बचत निधी / विमा निधीतील अतिप्रदानाबाबत

**परिच्छेद ३.१०१८ (४५०) (सन २००८-०९)**

गटविमा योजना बचत निधीच्या लाभ प्रदानाची परिगणना चुकीची झाल्यामुळे रुपये ४३,०७६/- अतिप्रदान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक गवियो-१००२/प्र.क्र. ३०/२००२/शा.हमी. दिनांक ५/१२/२००२ अन्वये गटविमा योजना बचत निधीचे लाभ प्रदानाचे सुधारीत परिगणीतीय तक्ते व मार्गदर्शक सुचना प्रकाशित करण्यात आल्या असताना परिगणना चुकीची केल्यामुळे रक्कम रुपये ४३,०७६/- संबंधितांना अतिप्रदान झाले आहे. अतिप्रदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

२. गटविमा योजना बचत निधीच्या लाभ प्रदानाचे कर्मचा-यांना प्रदानार्थ २० देयकाच्या स्थळप्रती/ अभिलेखे दर्शविण्यात आले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. सन २००८-०९ च्या लेखा परिक्षणामध्ये गटविमा योजनेच्या बचत निधी लाभाची परिगणना चुकीची झाल्याने संबंधित तत्कालीन कर्मचा-यास या कार्यालयाकडुन पत्र क्रं ५७९२ दिनांक २१.०८.२०१५ अन्वये कारणे दाखावा नोटीस बजावण्यात आली आहे. अतिप्रदान झालेल्या ३० कर्मचा-यांचे माहे ८/२०१५ च्या निवृती वेतनातुन अतिप्रदानाची रक्कम रुपये ४३,०७६/- वसुल करुन घेणेबाबत गट विकास अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र क्रं ५७७८ दि.१९.०८.२०१५ अन्वये आदेशित केले आहे.

२. गटविमा योजना बचत निधीचे अभिलेखे लेखा परिक्षणास न दर्शविलेबाबत संबंधितास या कार्यालयाचे पत्र क्रंमाक ५७९२ दि.२१.०८.१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देवुन खुलासा मागविण्यात आला आहे. गटविमा योजना बचत निधीच्या लाभ प्रदानाचे २० देयकाचे अभिलेखे सद्यस्थितीत अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, गट विमा योजनेत बचत निधीची चुकीची परिगणना केल्यामुळे झालेल्या रु. ४३,०७६/- च्या अतिप्रदानास कोण जबाबदार आहे. सदरहू योजनेचे देयके व त्या बाबतचे अन्य अभिलेखे लेखा परीक्षणाच्या वेळी उपलब्ध का करुन दिले नाहीत यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस स्पष्ट केले की, गट विमा योजनेच्या बचत निधी लाभाची परिगणना चुकीची झाल्याने संबंधित तत्कालीन कर्मचा-यास शो कॉज नोटीस इश्यू केली आहे. संबंधित कर्मचा-यांनी दोन वर्षानंतर सेवेचा राजीनामा दिलेला आहे. या प्रकरणी ३० कर्मचा-यांपैकी २५ कर्मचा-यांकडून वसुली करण्यात आलेली आहे. समितीने पुढे विचारणा केली की, ही वसुली कधी करण्यात आली आणि उर्वरित वसुली केव्हा करण्यात येईल यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वसुली करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित ५ कर्मचा-यांकडून एक महिन्याच्या आत वसुली करण्यात येईल. तसेच यापुढे अशा प्रकारची चूक होणार नाही याबाबत दक्षता घेतली जाईल असे समितीसमोर स्पष्ट केले. या प्रकरणी संपूर्ण वसुली करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी स्वीकारुन सर्व प्रकारच्या प्रलंबीत वसूली पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश समितीने दिले.

त्याचबरोबर नांदेड जिल्हा परिषदेमध्ये मोठ्या प्रमाणावर अखर्चित रकमा शिल्लक राहील्या आहेत. मोठ्या प्रमाणावर अखर्चित रकमा राहण्यामागची कारणे शोधून त्याबाबतचा तपशिल सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत मंत्रालयीन विभागाकडून माहिती मागविली.**

नांदेड जिल्हा परिषदेमधील रकमा अखर्चित राहण्याची कारणे शोधून त्याबाबत तपशिल विभागीय सचिवाच्या साक्षीपुर्वी सादर करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत त्या नुसार जिल्हा परिषदेमधील अखर्चित निधी शासन खाती जमा करण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण १००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय/मंत्रालय मुंबई दि. ६.६. २००८ व दि. २५/८/२०१५ उपरोक्त शासन निर्णय दि.६.६.२००८ नुसार योजनेचा अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्ष अखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती आहे. त्यानंतर शासनाची मान्यता आवश्यक आहे ही पध्दत अधिक सुटसुटीत व्हावी यासाठी उपरोक्त शासन निर्णय दि२५.०८.२०१५ च्या अनुषंगाने दि. ३१.०३.२०१४ पर्यंतच्या अखर्चित निधी खर्च करण्याच्या संबंधात खालील प्रमाणे निर्देश दिले आहेत.

१. अखर्चित निधी संदर्भात आढावा घेण्यात यावा.

२. बांधकामाव्यतिरिक्त (वेतन, अनुदान व सवलती इ.) अखर्चित निधी दि. ३०.०९.२०१५ पर्यंत शासनाखाली जमा करण्यात यावा.

३. बांधकाम निधी संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

भौतिकदृष्टया पूर्ण झालेली आहेत व खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकत नाही अशा प्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागाकडून परवानगी घ्यावी. तथापि, अशा कमावर इतर स्त्रोतातून खर्च न झाल्याची खात्री करावी. जी काम सुरु होऊन भौतिकदृष्टया अपूर्ण आहेत ती कामे दिनांक ३१.३.२०१६ पर्यंत पूर्ण होतील असे नियोजन करुन तसे हमी पत्र परवानगीचा योजनानिहाय प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाकडे पाठविण्यात यावा. जी कामे अद्याप सुरु नाहीत त्यांचा निधी दिनांक ३०.९.२०१५ पर्यत शासन खाती जमा करण्यात यावा. सविस्तर सूचना विभागास दिल्या आहेत त्यानुसार महिला बाल कल्याण विभागास शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. एबावि२०१५/प्र.क्र.२९१/का६ मंत्रालय मुंबई दिनांक २१.११.२०१५ अन्वये सन २००७-२००८ ते २०१३-१४ या कालावधीतील अंगणवाडी बांधकामाच्या रुपये १०.७५ कोटी अखर्चित रक्कम दिनांक ३१.३.२०१६ अखेर खर्च करण्यास परवानगी दिली आहे. शासन ज्ञापन नियोजन विभाग क्र. स्थाविका १११३ प्रक्र२१९/का१४८२ दिनांक १९.१.२०१६ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१०-११ ते सन २०१२-१३ यावर्षातील रुपये ५२.१८ लक्ष अखर्चित निधी सन २०१५-१६ वर्षात खर्च करण्यास अनुमती दिली आहे. प्राप्त सूचनेनुसार नांदेड जिल्हा परिषदेने रुपये ११५.०१ कोटी रक्कम शासन खाती जमा केली असून उर्वरित रुपये १८.६५ कोटी अजून भरणा करणे आहे. त्यापैकी रुपये १२.५७ कोटी म.बा.क. विभागाचे आहे तर उर्वरित रक्कम पंचायत / शिक्षण व ल.पा. विभागाकडून भरणा होणार आहे.

**उपरोक्त संदर्भात वित्त व ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) वित्त विभाग शासन निर्णय दि. ६ जून, २००८ अन्वये योजांनावरील अखर्चित निधी लगतच्या पुढील वर्ष अखेर खर्च करण्याची अनुमती आहे. (सोबत प्रत जोडली आहे.)

(२) वित्त विभागाच्या दि. २५ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयानुसार अखर्चित निधी खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. त्यानुसार या विभागाच्या दिनांक २९ ऑगस्ट, २०१५ च्या शासन पत्रान्वये जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) अखर्चित निधी शासन खाती भरण्याबाबत वित्त विभागाच्या दिनांक ६ जून, २००८ च्या अनुषंगाने वेळोवेळी सूचना जिल्हा परिषदांना देण्यात आलेल्या आहेत.

## चौकशी अहवाल

मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांचे आदेश क्र. जाक्र/जिपना/ अखा/अस्था-१/३०५/दिनांक १८/१/२०१६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार पंचायत राज समिती लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल सन २००८-२००९ मधील परिच्छेद क्र .३.१०१८ गट विमा योजनेतील सदस्यांना बचत निधी/विमा निधीतील अतिप्रदानाबाबत सद्यस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

गट विमा योजना बचत निधीची परिगणना चुकीची झाल्यामुळे एकूण ३० कर्मचा-यांची रु. ४३०७६/- अति प्रदान झाल्याची बाब लेखापरिक्षणात निदर्शनास आली. गट विमा योजने अंतर्गत एकूण ३० कर्मचा-यांना ४३०७६ इतक्या रक्कमेचे अतिप्रदान झाले होते. या पैकी पंचायती राज समितीच्या नांदेड जिल्हा परिषदेला भेट दौरा दिनांकापर्यंत एकुण २५ कर्मचा-यांची ३८४७६/- इतके अतिप्रदान त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून वसूल करुन शासन खाती जमा करण्यात आले होते.

पंचायती राज समितीने दिलेल्या सूचनेनुसार उर्वरीत ५ कर्मचा-यांची अतिप्रदान रु. ४६००/- हे वसूल करुन शासन खाती जमा करण्यात आले आहेत, चालनाच्या प्रती अवलोकनार्थ उपलब्ध आहेत. उपरोक्त नमूद केल्यानुसार गट विमा योजने अंतर्गत झालेले ३० कर्मचा-यांचे अतिप्रदान रक्कम रु. ४३०७६/- हे पुर्णतः वसुल करुन शासन खाती जमा करण्यात आली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, नांदेड जिल्हा परिषदेतील रकमा अखर्चित राहण्याची कारणे शोधून त्याबाबतचा तपशील विभागीय सचिवाच्या साक्षीपूर्वी सादर करण्याचे समितीने निदेश दिले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेमधील अखर्चित निधी शासन खाती जमा करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे यावर ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीस विदित केले की, १२३ कोटी रुपयांच्या अखर्चित रकमेपैकी ११५ कोटी रुपयांचा निधी शासनाकडे परत केला आहे. फक्त ७.५ कोटी रुपयांचा अखर्चित निधी शिल्लक राहिला आहे. सदर निधी परत करण्याबाबत विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

## अभिप्राय व शिफारशी

गटविमा योजना बचत निधीच्या लाभ प्रदानाची परिगणना चुकीची झाल्यामुळे रु. ४३,०७६/- अतिप्रदान झाले आहे. याबाबत गटविमा योजनेच्या बचत निधीच्या लाभाचे कर्मचा-यांना प्रदान करताना देयकाच्या स्थळप्रती/अभिलेख लेखापरीक्षणास दाखविण्यात आले नाहीत. याबाबत लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाली असता अतिप्रदान झाल्याची बाब मान्य केली असून अतिप्रदान झालेल्या ३० कर्मचा-यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांच्या निवृत्ती वेतनातून उपरोक्त रक्कम वसूल करण्याबाबत संबंधित गटविकास अधिका-यांनी आदेशित केले आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे. तथापि, गटविमा बचत अभिलेखे लेखापरिक्षणास दाखविलेले नसल्यामुळे याबाबत समिती नाराजी व्यक्त करीत असून सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी या संदर्भात **मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंडाची शास्ती करण्यात यावी. त्याचप्रमाणे याआधी देखील समितीने अभिलेख उपलब्ध न करणा-या अधिकारी/कर्मचा-यांविरुध्द दोषसिध्द झाल्यानंतर त्यांची एक वेतनवाढ रोखून सेवापुस्तकात नोंद घ्यावी अशा प्रकारची शास्ती निदेशित केली आहे. सदरची शास्ती या प्रकरणी देखील संबंधित कर्मचा-यांना करावी, अशी समितीची शिफारस आहे. त्याचप्रमाणे याप्रकरणातील अखर्चित रक्कमेची कारणे शोधताना त्यासंदर्भात शासन निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी अशीही समितीची शिफारस आहे.**

# जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रकरण अठ्ठावीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### मागणी व पुरवठा फरकाबाबत

**परिच्छेद ३.१४६/१०१ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद शिक्षण विभाग औरंगाबाद येथील सन २०११-१२ च्या लेखापरीक्षणात शालेय पोषण आहार संचिका व प्रमाणकांची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे पंचायत समितीने आहारांची केलेली मागणी व त्यांना मागणी पेक्षा जादा प्रमाणात केलेला पुरवठा याबाबतचा तपशिल विवरणपत्रात नमुद करुन मागणी पेक्षा जादा पुरवठा करुन झालेली जादा रक्कम अदायी बाबतचा तपशिल नमुद केलेला आहे.

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे व महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, लि. मुंबई यांचा शालेय पोषण आहार पुरवठा करण्या संबंधिचा करार दिनांक २३ ऑक्टोबर, २००९ अट क्रमांक ०५ अन्वये शाळांना मालाचा पुरवठा मागणीपत्राप्रमाणे करण्याचे नमुद केले असतांना प्रत्यक्ष पुरवठाधारकाने मागणी पेक्षा जास्तीचा पुरवठा कोणत्या नियमान्वये केला याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे व एकूण मागणी पेक्षा जादा आहार पुरवठा करुन अदायी झालेली एकूण रक्कम रुपये १६०७६५५/- वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर परिच्छेदात पुरवठाधारकास मागणी पेक्षा जास्त पुरवठा केल्यामुळे रक्कम रुपये १६०७६५३/- एवढा पुरवठा धारकांकडून वसूल करण्याचे निर्देशित आहे.

अहवाल वर्षात सदरचा परिच्छेद प्रमाणक क्रं. ७५,७६,७७,७८ व ७९ याबाबत घेण्यात आलेला आहे. प्रमाणकांचा तपशील पुढील प्रमाणे

| अ.क्र (१) | प्रमाणक क्रमांक (२) | पुरवठादाराने सादर केलेले देयक रुपये (३) | इतर कपाती (४) | जादा पुरवठयाची वसूली (५) | एकूण कपात (६) | प्रत्यक्ष अदा केलेली रक्कम (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७५ | ६६७९८३८ | ४५५५९५ | ५३५८९८ | ९९१४९३ | ५५५२८१२ |
| २ | ७६ | ५२६५२९६ | २९५३६७ | २४७१६२ | ५४२५२९ | ४६१९९८४ |
| ३ | ७७ | ७२३४४०० | ३७६२५६ | ८६२२४३ | १२३८४९९ | ५७५६५५८ |
| ४ | ७८ | ५३२८४५४ | २२७५०९ | ७२३९४० | ९५१४४९ | ४२६९३४८ |
| ५ | ७९ | २८६०२०१ | - | - | - | २८६०२०१ |
| | एकूण | २७३६८१८९ | १३५४७२७ | २३६९२४३ | ३७२३९७० | २३०५८९०३ |

वरील प्रमाणाकानुसार पुरवठादाराने मागणी केल्यापेक्षा जादा पुरवठा केलेल्या मालाची रक्कम रुपये २३,६९,२४३/- कपात करण्यात आली आहे. कपात केलेल्या रक्कमेत आक्षेपाधिन रक्कम रुपये १६,०७,६५५/- चा समावेश आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मागणीपेक्षा जादा पुरवठा झालेल्या शालेय पोषण आहाराची जादा अदायी

केव्हा वसूल करण्यात आली, सदर जादा अदायीस कोण जबाबदार आहेत व त्यांचे विरुद्ध कोणती कार्यवाही केली आहे वा केली जाणार आहे. मालाचा जादा पुरवठा कसा झाला, जादा माल का स्विकारण्यात आला व त्यास जबाबदार कोण आहेत, मुख्याध्यापक माल ताब्यात घेतात. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन मागणी नोंदविली जाते. त्यामुळे मुख्याध्यापकांनी जादा माल का ताब्यात घेतला, मालाचा पुरवठा कधी करण्यात आला, पुरवठादाराने देयक कधी सादर केले व रक्कम कधी कपात करण्यात आली आहे. या समितीच्या प्रश्नाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठादाराने मागणी केल्यापेक्षा जादा पुरवठा केलेल्या मालाची रक्कम रुपये २३,६९,२४३/- बिल अदा करीत असताना कपात केलेली आहे असा खुलासा केला. अपेक्षेपेक्षा अधिक मालाचा पुरवठा पुरवठादाराने केलेला आहे. परंतु, जादा मालाची रक्कम बिल अदा करताना कपात केलेली आहे असा खुलासा केला. त्यावर समितीने जादा माल पुरवठा केला असेल तर रक्कम कपात करण्याची काय आवश्यकता आहे, या प्रश्नास उत्तर देतांना मुख्याध्यापकांनी नोंदविलेल्या मागणीपेक्षा अधिक धान्याचा पुरवठा पुरवठादाराने केला आहे, ही सत्य बाब आहे. पुरवठादाराने मालाचा पुरवठा केल्यानंतर देयक गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर केले व ते त्यांनी जिल्हा परिषदेला पाठविले. जिल्हा स्तरावर ज्यावेळी देयकाची पडताळणी करण्यात आली त्यावेळी जादा मालाच्या पुरवठ्याची रक्कम देयकात अंतर्भूत करण्यात आल्याचे लक्षात आले. त्यामुळे देयक अदा करीत असताना तेवढी रक्कम वगळण्यात आली व उर्वरित रकमेचे देयक अदा करण्यात आले असा खुलासा विभागीय अधिका-यांनी केला.

समितीस प्राप्त झालेला जादा माल पुरवठादाराला परत केला का, जादा मालाचा पुरवठा करण्यात आला हे कोणाच्या लक्षात आले, पंचायत समितीकडून पूर्ण रकमेचे देयक जिल्हा परिषदेकडे कसे सादर करण्यात आले, जादा माल प्राप्त झाल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही का, यावर खुलासा करताना प्रमाणकामध्ये जास्त मागणी केली होती. जादा पुरवठ्याची रक्कम वसूल केली आहे. वसुली हा शब्द परिच्छेदाच्या अनुषंगाने आला आहे असे सांगितले. तद्नंतर समितीच्या परवानगीने शिक्षणाधिकारी यांनी प्रमाणक क्रमांक ७५, ७६, ७७, ७८ व ७९ च्या अनुषंगाने हा परिच्छेद आहे. या सर्व प्रमाणकांची लेखाधिका-यांनी छाननी केली. त्यामध्ये असे दिसून आले की, जादा मालाच्या पुरवठ्याची रक्कम त्यामध्ये अंतर्भूत आहे, त्यामुळे ती रक्कम वगळून देयक अदा करण्यात आले आहे. स्पष्टीकरणामध्ये 'जादा पुरवठ्याची वसुली' असे नमूद केले आहे. त्याऐवजी 'कपात' असे म्हणावयास हवे होते. प्रिंट मिस्टेक झाली आहे. जादा पुरवठा झालेला माल पुढील महिन्यात शाळांमध्ये समायोजित केलेला आहे. ज्या ठिकाणी कमी माल आला आहे, त्या ठिकाणी हा माल समायोजित केलेला आहे. मालाचा कमी पुरवठा केला असेल तर त्याप्रकरणी दंड केलेला आहे.

प्रमाणक क्रमांक ७५ अनुसार मसूर डाळीची मागणी ३५३६ असताना ५३८६ किलो एवढा पुरवठा झाला. म्हणजे १८५० किलो डाळीचा पुरवठा जास्त झाला. हरभ-याची मागणी ८०७ किलो असताना २३७५ किलोचा पुरवठा झाला आहे. म्हणजे १५६८ किलोचा पुरवठा जास्त झाला आहे. वाटाण्याची मागणी २५७६ किलो असताना ३२७६ किलो पुरवठा झाला आहे. मुगाची मागणी १८१५ किलो असताना ४२१५ किलो पुरवठा झाला आहे. सोयाबीन तेल २४०६ किलोची मागणी असताना ९९७ किलोचा पुरवठा झाला आहे. पुरवठादाराचे बिल दिलेले असून मागणीपेक्षा अधिक पुरवठा केलेला आहे. जिल्हा परिषदेने मागणीप्रमाणे पैसे दिलेले असून मागणीपेक्षा जास्त वस्तुंचे पैसे दिलेले नाहीत. जास्तीचा पुरवठा झालेला असल्यामुळे त्याचे समायोजन पुढील महिन्यात केलेले आहे, असा अधिक खुलासा केला.

मागणीपेक्षा जादा आलेल्या मालाचे पुढील महिन्यात समायोजन केलेले आहे. मसुर दाळ, हरभरा, वाटाणा, मुग, सोयाबीन इत्यादी प्रकारचा २३ लाखाचा जास्तीचा माल आपण कसा ताब्यात घेतला, या प्रश्नावर समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहु प्रकरणी मागणीपेक्षा जादा पुरवठा झालेल्या शालेय पोषण आहाराच्या अदायगीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची विभागीय चौकशी करुन अहवाल पाठविण्याचे निर्देश समितीने दिले असून सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले ?

**उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २००८-०९ ते सन २०११-१२ लेखापरिक्षणाचे पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालासंदर्भात पंचायत राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दि. १५/१०/२०१५ ते १७/१०/२०१५ या कालावधीत पंचायत राज समितीच्या भेटीच्या वेळी उपस्थित मुद्दा शालेय पोषण आहाराचा मागणी व पुरवठा फरकाबाबत (८७ अ) प्रकरणी मागणीपेक्षा जास्त पुरवठा

झालेल्या शालेय पोषण आहाराच्या अदायगीबाबत लेखापरिक्षण पथक, जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या अहवालानुसार खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.

सदर परिच्छेदामध्ये पुरवठाधारकास मागणीपेक्षा जास्त पुरवठा केल्यामुळे रक्कम रु. १६,०७,६५५/- पुरवठाधारकाकडून वसुल करण्याचे निर्देशित आहे. अहवाल वर्षात सदरचा परिच्छेद प्रमाणक क्र. ७५, ७६, ७७, ७८ व ७९ याबाबत घेण्यात आलेला आहे. प्रमाणकांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**१. प्रमाणक क्र.७५, दिनांक १०/६/२०११, रक्कम रु. ५५,५२,८१२/- :**

स्थानिक निधी लेखा यांनी सदरील प्रमाणकामध्ये मसुददाळ, हरबरा, वाटाणा,मुगदाळ, सोयाबीन तेल इत्यादी साहित्य मागणीपेक्षा जास्त पुरवठा केल्यामुळे रक्कम रु. ४,३३,०८३/- इतकी रक्कम जादा प्रदान झाल्याचे दर्शविले आहे. या रक्कमेत वाटाण्याची मागणी २५७६ किग्रॅ असुन प्रत्यक्ष पुरवठा ३२७६ किग्रॅ असा आक्षेपामध्ये दर्शविला आहे. परंतु वाटाण्याचा प्रत्यक्ष पुरवठा ३२७६ किग्रॅ न करता ३२६६ किग्रॅ केला आहे. त्यामुळे जादा प्रदान झालेली रक्कम रु. २६,२५५/- न येता रुपये २०,३५५/- येत असुन एकूण रक्कम रुपये ४,३३,०८३/- न येता रक्कम रुपये ४,२७,४८३/- येते.

**२. प्रमाणक क्र.७६, दि.१०/६/२०११, रक्कम रु.४६,१९,९८४/- :**

स्थानिक निधी लेखा यांनी सदरील प्रमाणकामध्ये रक्कम रु. १,९७,४४५/- इतकी वसुलपात्र दर्शवली आहे. सदर रक्कमेमध्ये सोयबीन तेल मागणी १,६१६ लिटर व पुरवठा २०३१ लिटर असा असुन २०३१-(वजा) १६१६=४१५ लिटर अशी येत असताना आक्षेपात ४२५ लिटर दर्शवुन रु. ६८/- दराप्रमाणे एकुण रुपये २८९००/- दर्शविलेली प्रत्यक्षात रक्कम रुपये २८२२०/- येत असल्याने एकुण रक्कम १,९७,४४५/-ऐवजी रक्कम रुपये १,९६,७६५/- इतकी येते.

**३. प्रमाणक क्र. ८६, दि.१०/६/२०११, रक्कम रु. ४२,६९,३४८/- :**

स्थानिक निधी लेखा परिक्षण यांनी सदरील प्रमाणकामध्ये मागणीपेक्षा जास्त पुरवठा केल्यामुळे रक्कम रु. २,६६,०८२/- इतकी रक्कम जादा प्रदान दर्शवलेली आहे. सदरील प्रमाणकामध्ये हरभ-याची मागणी २९१९ किग्रँ असुन प्रत्यक्ष पुरवठा ३३५० किग्रॅ केलेला आहे. ३३५० किग्रॅ -(वजा) २९१९ किग्रॅ=४३१ किग्रॅ इतका हरभरा जास्त पुरवठा झाला आहे. रक्कम रु. ३६.५०/- या दरामध्ये ४३१ किग्रॅ ची रक्कम (३६.५०X४३१ = १५७३१.५) इतकी रक्कम असतांना आक्षेपात रक्कम रु. १,५७,३१५/- दर्शवलेली आहे. ती चुक आहे. त्यामुळे एकुण रक्कम रु.२,६६,०८२/- इतकी न येता रक्कम रु. १,२४,४९८/- इतकी येते.

**४. प्रमाणक क्र.७९, दि.१/२०१२, रक्कम रु.२८,६०,२०१/- :-**

स्थानिक निधी लेखा परिक्षण यांनी सदरील प्रमाणकामध्ये मागणीपेक्षा जास्त पुरवठा केल्यामुळे रक्कम रु. २,९२,४६८/- वसुलपात्र दाखवलेली आहे. परंतु गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सिल्लोड यांनी खुलासा सादर केल्यानुसार मसुरदाळीची मागणी ३७०४ किग्रॅ नसुन ८०४३ किग्रॅ इतकी मागणी दिलेली आहे. प्रत्यक्षात पुरवठा ८००५ किग्रॅ म्हणजेच ८०४३ किग्रॅ-(वजा) ८००५ किग्रॅ = ३८ किग्रॅ इतका कमी पुरवठा झालेला आहे. त्यामुळे सदर प्रमाणकात रक्कम रुपये २,९२,४६८/- वसुलपात्र होत नाही.

वरील खुलाशाअन्वये सादर करण्यात येते की, खालील प्रमाणक निहाय जादा पुरवठा झालेल्या धान्यादी मालाची रक्कम वसुल पात्र ठरते.

| अ.क्र (१) | प्रमाणक क्रमांक दिनांक (२) | रक्कम (३) | वसुलपात्र रक्कम (४) |
|---|---|---|---|
| १ | ७५, १०/६/२०११ | ५५५२८१२/- | ४२७४८३/- |
| २ | ७६, १०/६/२०११ | ४६१९९८४/- | १९६७६५/- |
| ३ | ७७, १०/६/२०११ | ५७५६५५८/- | १४९३९/- |
| ४ | ७८, १०/६/२०११ | ४२६९३४८/- | १२४४९८/- |
| ५ | ७८, १०/६/२०११ | ४२६९३४८/- | ४०३६३८/- |
| ६ | ७९, /१/२०१२ | २८६०२०१/- | - |
| | एकूण रक्कम | | ११६७३२३/- |

वरील प्रमाणकावरुन असे निदर्शनास येते की, प्रमाणक क्र.७५,७६,७७,७८ व ७९ या प्रमाणकांची स्थानिक निधींनी लेखापरिक्षण करुन वसुलपात्र रक्कम रु. १६,०७,६५५/- इतकी काढली असुन प्रत्यक्षात पडताळणी केली असता इतकी न येता रक्कम रुपये ११,६७,३२३/- इतकी येते.

सदरील परिच्छेदामध्ये स्थानिक निधी लेखा यांनी जी वसुलपात्र रक्कम दर्शवलेली आहे हया दर्शवलेल्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम म्हणजे रक्कम रु. २३,६९,२४३/- (जादा पुरवठा केल्याची कपात) व (इतर कपाती) म्हणुन रक्कम रु. १३,५४,७२७/- अशी एकुण रक्कम रु. ३७,२३,९७०/-इतकी रक्कम पुरवठादारास त्याच्या साहित्याचे पुरवठयाची रक्कम प्रदान करताना कपात केलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र (१) | प्रमाणक (२) | पुरवठादाराने सादर देयक रुपये (३) | पोचपावतीनुसार प्रत्यक्ष पुरवठा केलेल्या मालाची रक्कम (४) | जादा पुरवठा मालाची कपात (५) | इतर कपाती (६) | एकूण कपात (७) | कपाती वजा जाता प्रत्यक्ष अदा केलेली रक्कम (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७५ | ६६७९८३८ | ६५४४३०५ | ५३५८९८ | ४५५५९५ | ९९१४९३ | ५५५२८१२ |
| २ | ७६ | ५२६५२९६ | ५१६२५१३ | २४७१६२ | २९५३६७ | ५४२५२९ | ४६१९९८४ |
| ३ | ७७ | ७२३४४०० | ७१६८२८४ | ८६२२४३ | ३७६२५६ | १२३८४९९ | ५७५६५५८ |
| ४ | ७८ | ५३२८४५४ | ५२२०६९७ | ७२३९४० | २२७५०९ | ९५१४४९ | ४२६९३४८ |
| ५ | ७९ | २८६०२०१ | २८६०२०१ | - | - | ० | २८६०२०१ |
| | एकूण | २७३६८१८९ | २६९५६००० | २३६९२४३ | १३५४७२७ | ३७२३९७० | २३०५८९०३ |

वरील प्रमाणकानुसार पुरवठादाराने मागणी केल्यापेक्षा जादा पुरवठा केलेल्या मालाची संपुर्ण रक्कम रुपये २३,६९,२४३/- कपात करुनच पुरवठादारास रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. त्यामुळे आक्षेपात दर्शवलेली वसुलपात्र रक्कम देयकातुन कपात झालेली असल्यामुळे आक्षेपात दर्शवलेली वसुली करण्याची आवश्यकता नाही. तरी अनुपालन मान्य करावे ही विनंती.

**उपरोक्त संदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** याबाबत जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरणी मागणीपेक्षा जादा पुरवठा झालेल्या शालेय पोषण आहाराच्या अदायगीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची विभागीय चौकशी करुन अहवाल पाठविण्याचे निर्देश समितीने दिले असून सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली यावर समितीच्या प्रश्नास शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांनी उत्तर देताना समितीस विदीत केले की, पुरवठादाराने शालेय पोषण आहाराचा अतिरिक्त पुरवठा केला त्यामुळे अतिरिक्त प्रदान झाल्याबाबतचा आक्षेप नोंदविण्यात आला होता. पुरवठादाराने अतिरिक्त मालाचा पुरवठा केलेला असला तरी त्याला अतिरिक्त प्रदान केलेले नाही. अतिरिक्त पुरवठा झालेल्या मालाची किंमत कपात करुन प्रदान केलेले आहे. साईट पॅरा काढताना देखील हीच स्थिती होती. यावर जादा पुरवठा झालेला होता, त्याची वसुली केलेली आहे असे जिल्हा परिषदेने उत्तरामध्ये स्पष्ट केले आहे. तक्ता दिला आहे त्यानुसार लेखा कार्यालयाने दाखविलेल्या वसुलीपेक्षा जास्त वसुली जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी केलेली आहे असे मत लेखा संचालकांनी साक्षीच्या वेळी मांडले.

## अभिप्राय व शिफारशी

राज्यात शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शाळेत उपस्थिती वाढण्याकरीता शालेय पोषण आहार ही योजना राज्यात राबविली जाते. तथापि, सदरहू योजना राबविताना जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, औरंगाबाद येथील सन २०११-१२ च्या लेखापरीक्षणाच्या वेळी शालेय पोषण आहाराच्या मालाचा पुरवठा मागणीपेक्षा जादा करण्यात आला व त्यामुळे जादा आहार पुरवठा करुन अदायी झालेली एकूण रक्कम रुपये १६,०७,६५५/- वसुल होणे आवश्यक असल्याचा आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला. या प्रकरणी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली होती. साक्षीच्या दरम्यान पुरवठादाराने मागणी केल्यापेक्षा जादा पुरवठा केलेल्या मालाची किंमत देयक अदा करीत असताना केली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षात घेवून मगच मागणी नोंदविण्याची कार्यपध्दती आहे. तरीही मुख्याध्यापकांनी जास्तीचा माल स्वीकारणे हे पूर्णपणे चुकीचे होते. पुरवठादाराने दिलेल्या देयकात जादा पुरवठा केलेल्या मालाचा समावेश असला तरी जिल्हा परिषदेने देयक अदा करीत असताना मुळ मागणी एवढ्या मालाचेच देयक अदा केले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. प्रस्तुत प्रकरणी शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नसले तरीही मागणीपेक्षा जादा पुरवठा झाल्यास तो कालबाह्य होऊन वापरण्यायोग्य राहणार नाही हे स्पष्ट आहे आणि अशा प्रकारे तो स्वीकारुन वापरल्यास त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून तो मुख्याध्यापकांनी स्वीकारता कामा नये असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी जिल्हापरिषद औरंगाबादमध्ये कंत्राटदाराची नेमणूक केलेली आहे. या कंत्राटदारास जिल्हापरिषदेकडून वेळोवेळी आवश्यक ते पुरवठा आदेश निर्गमित केले जातात. या प्रकरणी देखील कागदपत्रांची तपासणी केली असता आवश्यक ते पुरवठा आदेश निर्गमित केले होते. असे असूनही मागणी केलेल्या पुरवठयाच्या प्रमाणापेक्षा जास्त आहाराचा पुरवठा पुरवठादाराने केला. प्रस्तुत प्रकरणी जादा पुरवठा केलेल्या मालाची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम प्रदान केली असल्याचे दिसून येते. यावरील चौकशी अहवालात आक्षेपाई दर्शविलेली रक्कम देयकातून कपात झालेली असल्यामुळे अनुपालन मान्य करण्यात यावे अशी समितीला विनंती केलेली आहे. पुरवठादाराने मागणी केलेल्या मालापेक्षा जास्त पुरवठा करणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. यामध्ये ठेकेदारास शासनाची विहीत केलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम देवून त्यास फायदा कसा होईल असा संबंधितांचा दृष्टीकोन असल्याचे दिसून येते. हे आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने योग्य नाही. त्याचप्रमाणे अधिकचा साठा शाळांमध्ये ब-याच कालावधीसाठी पडून राहिल्याने तो खाण्यास अयोग्य होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना अशा अयोग्य व निकृष्ट दर्जाचा आहार खाण्यास भाग पाडले जाते. म्हणून जादा पुरवठा करणे देखील तेवढेच गैरशिस्तीचे आहे. या प्रकरणी रक्कम वसूल करणे म्हणजे पुरवठादारास शिक्षा केली असे नव्हते. पुरवठादाराने करारातील अटी व शर्तींचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये जेवढी मागणी केली तेवढाच पुरवठा करणे अपेक्षित आहे. ही बाब जर पुरवठा करारामध्ये अंतर्भूत केली नसेल तर त्यास प्रशासन देखील तेवढेच जबाबदार आहे. सदरची अनियमितता टाळण्यासाठी व कंत्राटदारास जास्त लाभ होऊ नये यासाठी आवश्यक ती काळजी घेणे आवश्यक होते. जादा पुरवठा झालेले धान्य जास्त कालावधीसाठी पडून राहणे अयोग्य आहे. त्यामुळे त्याचा दर्जा खालावतो त्यात आळया, जाळया, किडे यांचा प्रादुर्भाव होतो. **अशा निकृष्ट मालाचा आरोग्याच्या दृष्टीने विचार केल्यास तो खाण्यास योग्य राहिल किंवा कसे याबाबतही समितीला शंका असल्यामुळे कंत्राटदारावर वसूलीची केलेली कार्यवाही पुरेशी आहे असे समितीला वाटत नाही. त्यामुळे संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी. त्याचप्रमाणे भविष्यात असा जादा पुरवठा होऊ नये म्हणून सर्व संबंधिताना परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे व करार करताना देखील या बाबींचा अंतर्भाव करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण एकोणतीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### पंचायत समिती पैठण प्रशासकीय इमारत बांधकामातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद ३.२६७/१६३ (सन २०११-१२)**

पंचायत समिती पैठण प्रशासकीय इमारत बांधकामावर एकूण रक्कम रुपये ४५,०१,६५८/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र. जि. प. व. २०००/प्रक्र ८३७/३५, मंत्रालय मुबंई, दिनांक ०८ मे २००२ नुसार आणि शासकीय विमा कार्यालय पत्र क्र प्र. वि. नि. २३०५/कारडब्युसी/ VII/संकीर्ण /फ-२, दि १५.१२.२००५ नुसार १% इतकी रक्कम पहिल्या देयकातुन कपात करणे आवश्यक असतांना तशी नियमाप्रमाणे कार्यवाही न करता प्रथम देयकातुन रुपये २२,४०७/- व व्दितीय देयकातुन २२,०६३/- एकुण रुपये ४४,४७०/- कपात करण्यात आलेली आहे. निविदा रक्कम रुपये १,७३,१३,०२१/- असुन विम्याची रक्कम रुपये १,७३,१३०/- प्रथम देयकातुन कपात करणे आवश्यक होते. रुपये १,२८,६६०/- कमी कपात करण्यात आलेली आहे.

(२) सदरील कामाच्या मोजमाप पुस्तीकेतील नोंदीनुसार प्रथम देयकात ४८० mt स्टील व दुस-या धावत्या देयकात ३९.६५१/- mt स्टील व westege स्टील २.२२ mt दर्शविण्यात आलेले आहे. दुस-या देयकात फक्त स्टील आण्याबद्दलचे प्रदान केलेले आहे. २.२२ mt स्टील x ५४,०००/- दर = रक्कम रुपये १,१९,८८०/- चे स्टील निरुपयोगी झाले असल्याचे नाकारता येत नाही.

(३) कामाचे अंदाजपत्रक अर्धसमास पत्र क्र ११, दिनांक १७.११.२०१२ अन्वये मागणी करुनही लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याने अंदाजपत्रकातील दर शेडुल्य बी व मोजमाप पुस्तीकेत अचुक नोंदणी केल्याबाबत खात्री करता आली नाही.

(४) कामाचे आदेश दि ३१.०१.२०११ मधील सुचना क्र. १० नुसार कामाच्या ठिकाणी काम सुरु करण्यापुर्वी कामाचे नावांचे व माहितीचे फलक लावणे आवश्यक असतांना ते लावले बाबतचे अभिलेखे जोडले नाहीत.

(५) सुरक्षा अनामत रक्कम रुपये ३,४६,०००/- कपात करणे आवश्यक असतांना रुपये ४४,४७०/- कपात केलेली असल्याने रक्कम रुपये ३,०१,५३०/- कमी कपात केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

(६) बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता योग्य असल्याबाबतचा अहवाल प्रयोगशाळेतुन प्राप्त करणे आवश्यक असतांना चाचणी अहवाल प्राप्त न करताच साहित्य वापरल्याचे दिसुन येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) उपरोक्त काम १७२ लक्ष रकमेचे असल्याने अनुदान टप्प्याने टप्पानिहाय प्राप्त होत असल्याने झालेल्या कामाचे मूल्यांकनाप्रमाणे धावते देयकातून ०१टक्का विमा कपात करण्यात आला होता. कंत्राटदाराने विमा संचालनालयाकडे विमा काढलेला असल्याने पुढील देयकातून विमा कपात करण्यात आला नाही. पुराव्यादाखल विमा प्रत सोबत संलग्न करण्यात आली आहे. कंत्राटदाराच्या धावत्या देयकातून एकुण रुपये ४४,४७०/- एवढी कपात करण्यात आली आहे व कंत्राटदाराने १७३.०० लक्ष रकमेच्या विमा पॉलीसी दि.२१.१.२०१३ रोजी सादर केलेली आहे. या बाबत संबंधित शाखा अभियंता यांना ताकिद देण्यांत आली आहे.

(२) रुपये १,१९,८८०/- इतकी रक्कम कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत मधून वळती करुन घेण्यात आली आहे सोबत अभिलेखे अवलोकनास्तव सादर.

(३) सदर कामाचे अंदाजपत्रक व शेडयुल बी नस्तीमध्ये उपलब्ध आहेत. लेखा परीक्षण कालावधीमध्ये ते संचिकेत जोडल्या गेले नसल्यामुळे दर्शविता आले नव्हते. सध्या उपरोक्त अभिलेखे दर्शविण्याकरिता उपलब्ध आहेत. संबंधित शाखा अभियंता यांना ताकीद देण्यात आली आहे.

(४) कामाचे ठिकाणी माहितीचा फलक लावला आहे. सोबत फोटोग्राफ अवलोकनास्तव सादर.

(५) उपरोक्त कामाची किंमत जास्त असल्याने व एजन्सी जिल्हा परिषदेची नियमित एजन्सी असल्याने इतर कामांमध्ये रक्कम गुंतल्याने सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेने प्रथम धावत्या देयकातून सुरक्षा अनामत कपात करण्याबाबत परवानगी दिली होती. सध्या ४.३३ लक्ष कपात करून जमा केले असून याबाबतचा पुरावा या सोबत जोडण्यात आला आहे. कृपया पुरावादर्शक खालील तक्त्याचे अवलोकन करावे.

| हप्ता क्र. (१) | मो. पु. क्र. / पृक्र. (२) | देयक रक्कम (३) | सुरक्षा अनामत रक्कम (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३३२३/७० | २२,४०,६७३ | ६७,२२० | |
| ०२ | ३७२३/७५ | २२,०६,३२७ | ६६,१९० | |
| ०३ | ३७२३/९८ | २२,०७,७५६ | ६६,२३३ | |
| ०४ | ४४६४/५० | ५९,०९७ | २६,०७३ | |
| ०५ | ४४६४/७० | १३,६२,६५४ | ४१,१८० | |
| ०६ | ८२०९/७ | १८,९८,२३८ | ५६,९४७ | |
| ०७ | ८२०९/४१ | १६,५२,८७४ | ४९,५८६ | |
| ०८ | ८२०९/६१ | ११,३६,१०५ | ३४,१३२ | |
| ०९ | ८२०९/८६ | ८,७२,७८३ | २६,१८३ | |
| | **एकूण** | | **४,३३,७४४/-** | |

(६) प्रथम देयकावेळी चाचणीचे नमुने प्रयोगशाळेत सादर करण्यात आले होते व रु. १०,०००/- चाचणी अहवाला करिता रोखून ठेवण्यात आले होते. नंतर चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधितास रक्कम अदा करण्यात आली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, कामाच्या विम्याची मुदत ही कामाच्या कार्यादेशातील कालावधीपुरतीच मर्यादित असल्याने विमा संचालनालयाचे पत्र दिनांक १५/१२/२००५ नुसार कामाचा विमा काम सुरु करण्यापूर्वी किंवा कामाची पहिल्या धावत्या देयकातून कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार पहिल्या धावत्या देयकातून संपूर्ण विमा रक्कम कपात का करण्यात आली नाही, ठेकेदाराने कामाचा विमा कोणत्या दिनांकास उतरविला, कामाचे पहिले धावते देयक कोणत्या दिनांकास व किती रकमेचे पारित केले. ३९.६५१ मेट्रीक टन स्टील पुरवठ्याचे देयक अदा करण्यात आलेले आहे. सदर धावत्या देयकात २.२२ मेट्रीक टनचे वेस्टेज दाखवण्यात आलेले आहे. स्टीलचा वापर केलेला नसून केवळ पुरवठा केलेला आहे. अशा परिस्थितीत Wastage कोणत्या नियमाने दर्शविण्यात आले, या अनियमिततेमुळे झालेल्या १ लाख १९ हजार ८८० रुपयांच्या नियमबाह्य जादा प्रदानास कोण जबाबदार आहे, संबंधितांवर याप्रकरणी कोणती कारवाई केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त काम १७२ लक्ष रकमेचे असल्याने व अनुदान टप्पानिहाय प्राप्त होत असल्याने झालेल्या कामाचे मूल्यांकनाप्रमणे धावते देयकातून ०१ टक्के विमा कपात करण्यात आला होता. कंत्राटदाराने विमा संचालनालयाकडे विमा काढलेला असल्यामुळे पुढील देयकातून विमा कपात करण्यात आला नाही. कंत्राटदाराने १७३ लक्ष रकमेच्या विमा पॉलीसी दिनांक २१/१/२०१३ रोजी सादर केलेली आहे. कंत्राटदाराच्या धावत्या देयकातून ४४,४७०/- रुपयांचा विमा कपात करण्यात आला होता. संबंधित ठेकेदाराच्या सुरक्षित अनामत रकमेतून १ लाख १९ हजार ८८० रुपये वसुल करुन घेतलेले आहेत त्यांचे अभिलेखे आहेत असे समितीस सांगितले. तसेच या कामातील साहित्य तपासणीचे अहवाल कोणत्या दिनांकास प्राप्त झाले, इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतरही काम अपूर्ण राहण्याची कारणे काय तसेच काम अपूर्णावस्थेत असून सुधारित मान्यतेसाठी

शासनाकडे सादर केलेले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. त्यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी अधिक खुलासा करताना पैठण पंचायत समितीच्या इमारतीची वर्क ऑर्डर दिनांक ३१/१/२०११ रोजी देण्यात आली, तेव्हा कामाचा कालावधी २४ महिन्याचा देण्यात आला होता. माहे जानेवारी, २०१३ अखेर सदरचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. प्रशासकीय मान्यतेची रक्कम १ कोटी ४४ लाख रुपयांची होती. सदरच्या ठिकाणी काळी माती असल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी तसेच तांत्रिक मान्यतेसाठी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे सादर केलेले आहे. त्यावेळी रॉक फाऊंडेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिल्या टप्प्यामध्ये मुख्य इमारतीचे काम हाती घ्यावे असा निर्णय घेण्यात आला, त्याप्रमाणे अंदाजपत्रकाप्रमाणे निविदा काढण्यात आली. उर्वरित सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव माहे मे, २०१४ ला शासनाकडे सादर केलेला आहे. इमारतीचे फ्लोरिंगचे काम राहिलेले आहे. इलेक्ट्रिशीयनची कामे, अंतर्गत रस्ते, वॉटर सप्लॉय ही कामे राहिलेली आहेत. सुधारित प्रशासकीय मान्यता ३ कोटी २५ लाख ६४ हजार रुपये होती असे समितीस सांगितले.

समितीने पुढे पैठण पंचायत समितीच्या इमारतीचे दीड कोटीचे काम असताना त्यामध्ये आणखी दीड कोटी रुपये वाढ कशी झाली त्यावर कार्यकारी अभियंत्यांनी माहिती दिली की, वॉटर सप्लॉय ८.६६ लाख रुपये विद्युत कामांसाठी ११.९१ लाख रुपयांची कामे शिल्लक आहेत. आकस्मिक खर्चामध्ये संगणकीकरण, रेन वॉटर हार्वेस्टींग, तसेच दरसूचीमधील वाढ यांसाठी तरतूद अंदाजपत्रकात ठेवावी लागते. दरसूचीमधील वाढ ६ टक्के, अंदाजपत्रकातील १५ लाख रुपये अतिरिक्त बाबींसाठी असे मिळून एकूण ३ कोटी २५ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे. दरम्यानच्या कालावधीत शासनाकडून दोन त्रुटी आल्या. आपण स्वतः त्या त्रुटींची पूर्तता करण्याची तसेच सुधारित प्रशासकीय मान्यता प्रक्रिया सुरु केलेली आहे. १४४ लाख रुपये ठेकेदारास अदा केलेले आहेत अशी माहिती दिली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१. पंचायत समिती पैठण प्रशासकीय इमारत बांधकामावर एकुण रक्कम रुपये ४५ लक्ष एवढा खर्च झाला असुन सद्यस्थितीत इमारतीचा वापर होईल या दृष्टीने प्रयत्न करुन इमारत पुर्ण करण्यासाठी शासनाकडून अधिकचा निधी प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा करावा असे निर्देश समितीने दिले आहे त्यानुसार सदरहु इमारत वापरात आणली आहे काय ? व इमारत पुर्ण करणेसाठी शासनाने अधिकचा निधी दिला आहे का ?

२. लेखा परिक्षणाचे वेळी कामाचे अंदाज पत्रक व इतर अभिलेख उपलब्ध करुन न दिल्याप्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षण अधिनियम १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे काय ?

३. सदरहु प्रकरणी चौकशी करुन संबंधित अभियंत्यावर जबाबदारी निश्चित करण्याची समितीने निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय ? असल्यास त्यात काय आढळुन आले ?

**उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१. पंचायत समिती पैठण प्रशासकीय बांधकामास शासन निर्णय क्रमांक पंसई/२००८/क्र.२७८/पं.रा.७/ दिनांक १५.०७.२००९ अन्वये रुपये १४४४७४००/- रक्कमेस प्रशासकीय मान्यताप्राप्त असुन या कामावर रुपये १४४.४७ लक्ष एवढा खर्च झालेला आहे. इमारतीचे बांधकाम अपुर्ण असुन अद्यापही इमारत वापरात नाही. उपलब्ध अभिलेख्यावरुन या कामास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. १८/१२/२०१० ठराव क्र.४४६ मान्यतेने अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने जा.क्र.जिपऔ/बांध/निवीदा/४/४५३ दि. ३१.१.२०११ नुसार सन २०१०-११ च्या दरसुचीनुसार १,७३,१३,०२१ किमतीस कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे. या आदेशान्वये (१,७३,१३,०२१ - १४४,४७,००० = २८,६६,०२१) हया प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा रक्कमेचे आदेश शासनाचे पूर्व परवानगी न घेता देण्यात आलेले आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे खालील पत्राचे अनुषंगाने निधी मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे.

१. पत्र क्र. जिपऔ/बांध/पिबीआर-४/२०१२ दि. २७.०८.२०१२ व दि. १७/१२/२०१२ नुसार प्राप्त निधी रु. ४४.४७ लक्ष खर्च झाले असुन उर्वरित कामासाठी १.४५ कोटीची आवश्यकता असल्याचे शासनाचे निदर्शनास आणून देऊन वाढीव निधीची मागणी करण्यात आलेली आहे.

२. मूळ प्रशासकीय मान्यता रक्कमेत इमारतीचे काम पूर्ण होत नसल्यामुळे पत्र क्र.जा.क्र जिपऔ/बांध/बीबीआर-४/कावि/२०१३ दि. २१.११.२०१३ पत्रान्वये सदर बांधकामाची निविदा सन २०१०-११ दरसुचीनुसार स्विकृत केल्याने तसेच काही बाबींच्या परिणामात वाढ होत असल्यामुळे या कामाचा खर्च रु. २,८६,१३,०००/- इतका होत असुन सुधारित प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध होणेस्तव शासनाकडे विनंती करण्यात आली आहे.

सदर प्रस्तावास अनुसरुन शासन पत्र दि. ३०.०१.२०१४ नुसार मागविण्यात आलेल्या कागदपत्रांची पूर्तता करुन पत्र जा.क्र.जिपऔबाध/पिबीआर-४/३१४७ दि. ३०/७/२०१४ अन्वये पूर्तता करण्यात येऊन विहित प्रपत्रात आवश्यक ती माहिती भरुन रु. ३,२५,६४,०००/-सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत शासनाकडे विनंती करण्यात आली आहे. तसेच अधिक्षक अभियंता यांचे सहमतीचे रु. ३२५६४०००/- चे सुधारित अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे. पत्र जाक्र जिपऔ/बांध/ पिबीआर-४/२५०० दि.१०/६/२०१५ नुसार ही वाढीव निधी मिळणेबाबत विनंती करण्यात आली आहे.

पंचायती राज समिती भेटीच्या वेळी प्राप्त सुचनास अनुसरुन अर्धशासकीय पत्र जा.क्र.जिपऔ/बांध/पिबीआर-३/५१८४/२०१५ दि. २१.१२.२०१५ नुसार निविदेमधील आवश्यक बाबी पूर्ण करणेसाठी किमान रु. ६०.०० लक्ष उपलब्ध होणेसाठी शासनाकडे विनंती करण्यात आलेली आहे. अद्यापपर्यंत सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त झालेली नाही.

सदरहू इमारत निधी अभावी अपुर्ण असून निधी मागणी करण्यात आली आहे. शासनाने अधिकचा निधी रु.६०.०० लक्ष निधी शासनाने दिली तर इमारत पूर्ण होवू शकते. शासन निधी प्राप्त होवू स्तर जि.प.उपकरमध्ये रु. २०.०० लक्षची निधीची तरतूद करण्यात आली आहे. शासनाचे पत्र क्र.पंसई २०१३/प्र.क्र.३०५/पंरा-७ दि.०७.०१.२०१६ अन्वये अतिरिक्त मुद्यांचे माहिती मागविली आहे. सदर माहिती या कार्यालयाचे पत्र दि.१६/५/२०१६ अन्वये शासनास सादर केली आहे.

२. लेखा परिक्षणाचे वेळी कामाचे अंदाजपत्रक व अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे संबंधित कामाचे शाखा अभियंता श्री.डहाळे या कार्यालयाचे आदेश क्र. जिपऔ/बांध/आस्थपा.१/२१८३ दि. २९.०२.२०१६ अन्वये रुपये २५,०००/- दंडात्मक वसूल करण्याचे आदेश उप अभियंता (बांधकाम) उपविभाग औरंगाबाद यांना देण्यात आलेले आहे.

३. सदरचे काम अपूर्ण राहीलेबाबत चौकशी करण्यात आले असून खालील बाबी निदर्शनास आल्या. सदर इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळाल्यापासून निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात, करण्यास प्रत्यक्ष सुरु करण्यास विलंब झाला आहे.

काम मुदतीत न करुन घेणारे अधिकारी दोषी अधिकारी कर्मचा-यांचे नाव खालीलप्रमाणे.

१. श्री.सि.व्ही.सोनवणे, कार्यकारी अभियंता २३.६.२०१० ते ३१.१.२०१२

२. श्री. जी.एम.वानखेडे, प्रभारी कार्यकारी अभियंता १.२.२०१२ ते २१.६.२०१२

३. श्री. जे.ए.मुर्तुजा, उप अभियंता १२.१०.२०१० ते ३०.४.२०१३

४. श्री. आर.आर. हंपीहोळी, उप अभियंता ३१.५.२०१३ ते अद्यापपर्यंत

५. श्री.व्ही.जी.कुलकर्णी, शाखा अभियंता

कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच शाखा अभियंता श्री.व्ही.जी.कुलकर्णी यांची एक वर्षाकरीता एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीची इमारत बनविण्याकरिता प्रत्येक जिल्हा परिषदेस शासन निधी देत आहे. वाणिज्यिक ठिकाणी जर पंचायत राज समितीची इमारत असेल तर तिचा विकास करण्याकरिता बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्त्वावर

देण्याची मुभा आहे. परंतु या पंचायत राज समितीची इमारत पूर्ण करण्याकरिता शासनाने ४५ लाख रुपये दिलेले आहेत. या संदर्भातील धोरण ठरलेले आहे. त्यानुसार विशेषतः पंचायत समिती पैठण प्रशासकीय इमारत बांधकामावर एकुण रक्कम रुपये ४५ लक्ष एवढा खर्च झाला असून सद्यस्थितीत इमारतींचा वापर होईल या दृष्टीने प्रयत्न करुन इमारत पूर्ण करण्यासाठी शासनाकडून अधिकचा निधी प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा करावा असे निर्देश समितीने दिले आहेत, त्यानुसार सदरहू इमारत वापरात आणली आहे काय व इमारत पूर्ण करण्यासाठी शासनाने अधिकचा निधी दिला आहे का, यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी समितीस विदीत केले की, या संदर्भातील सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झालेले असून त्यावरील छाननी कार्यवाही चालू आहे. याकरिता मंजूरी मिळाल्यानंतर निश्चितपणे विहित वेळेत हे काम पूर्ण होईल.

तसेच सन २००९ मध्ये या पंचायत समितीच्या इमारतीच्या बांधकामाला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यावेळी ही इमारत दोन वर्षांमध्ये पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले होते. त्याप्रमाणे शासनाने जिल्हापरिषदेला ४५,००,००० लाख रुपये दिलेले आहेत. वेळेत सुधारित अंदाजपत्रक तयार न केल्यामुळे हे काम अपूर्ण आहे. हे काम दोन वर्षात पूर्ण झालेले नाही. या कामापैकी सिव्हील काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित कामाकरिता केवळ ६० लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. वेळेत सुधारित अंदाजपत्रक न केल्यामुळे याची किंमत वाढलेली आहे. दोन वर्षात या इमारतीचे काम पूर्ण केले नाही तर वाढीव खर्च स्वनिधीतून करावा लागेल, असे निर्देश दिले. काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाला जिल्हापरिषदेला अशा प्रकारचे निर्देश द्यावे लागतात. मूळात सुधारित अंदाजपत्रक उशिरा तयार झाल्यामुळे उर्वरित कामे रेंगाळलेली आहेत. तांत्रिक मजूर निविदा प्रक्रिया या कामांकरिता विलंब लागलेला आहे. आता या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक प्राप्त झालेले असून यावर छाननी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर विहित कालावधीत हे काम पूर्ण होईल.

समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हापरिषद प्रोजेक्ट कॉस्ट एस्कलेशन देत नाही का, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यासंबंधीची तरतूद अर्थसंकल्पामध्ये केलेली असेल तरच एस्कलेशन देता येते. हे सर्व वर्क ऑर्डरच्या स्टेजला झाले आणि नेमका त्यावेळी डीएसआर रेटही वाढलेला होता. आता या इमारतीचे १,७३,००,००० लाख रुपये सिव्हील वर्क पूर्ण झाले असून ६० लाख रुपयांचे काही छोटे किरकोळ कामे राहिलेली आहेत, ती कामे अंदाजपत्रकानुसार व अटींनुसार विहित वेळेत पूर्ण केले जातील.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, पैठण प्रशासकीय इमारत बांधकामाच्या बाबतीत कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून रुपये १,७३,१३०/- एवढी विम्याच्या रक्कमेची कपात करण्यात आलेली नव्हती. कामाच्या मोजमाप पुस्तिकेतील नोंदीनुसार केवळ स्टील आणण्याबद्दल रक्कम प्रदान केलेली होती. सुरक्षा अनामत रुपये ३,४६,०००/- ऐवजी ४४,४७०/- रुपये कपात केलेली होती. बांधकाम साहित्याच्या गुणवत्तेचा प्रयोगशाळेचा अहवाल अप्राप्त होता, इत्यादी आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेले आहेत.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, सन २००९ मध्ये रुपये १,४४,४७,४००/- इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता पंचायत समिती पैठणच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास मिळालेली होती त्यापैकी सदरहू कामावर रुपये ४४.४७ लक्ष एवढा खर्च होऊनही सद्यस्थितीत इमारतीचे बांधकाम अपूर्ण असून इमारत वापरात नाही. शासनाचा मोठ्या प्रमाणात निधी प्रस्तुत बांधकामात खर्च होऊन उर्वरित कामास रुपये १.४५ कोटीची आणखी आवश्यकता असून सुधारीत प्रशासकीय मान्यता व शासनाकडून वाढीव निधीची मागणी करण्यात आल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. प्रचलित शासन निर्णयांच्या अनुषंगाने सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचा व निधीच्या उपलब्धतेनुसार शासनाकडून सदरहू प्रस्तावावर निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यास विलंब होवू शकतो. **तथापि, सदर इमारतीस तातडीने किमान रुपये ६०.०० लक्ष निधी उपलब्ध झाल्यास इमारत आवश्यक ती बांधकामे पूर्ण करुन वापरासाठी उपलब्ध होऊ शकते याकरीता शासन निधी प्राप्त होईपर्यंत जिल्हा परिषद उपकरामध्ये २०.०० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे या पार्श्वभुमीवर तसेच शासनाचा सदर इमारतीच्या बांधकामावर झालेला खर्च वाया जाऊ नये तसेच पंचायत समिती, पैठण प्रशासकीय कार्यालय सद्यस्थितीत अत्यंत अपु-या व मोडकळीला आलेल्या इमारतीमध्ये कार्यरत असून ग्रामीण भागातील नागरीकांना आपल्या दैनंदिन कामासाठी अडचणी निर्माण होत असल्याच्या पार्श्वभुमीवर शासनाने उर्वरित कामाकरीता ६०.०० लक्ष रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करुन द्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

त्याचप्रमाणे जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी पंचायत समिती पैठण प्रशासकीय बांधकामास शासन निर्णय दिनांक १५.०७.२००९ अन्वये रुपये १,४४,४७,४००/- रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असताना मूळ प्रशासकीय मान्यता रक्कमेत इमारतीचे कामच पूर्ण होत नसल्यामुळे तसेच सदर बांधकामाची निविदा सन २०१०-११ च्या दरसुचीनुसार स्विकृत केल्याने व काही बाबींच्या परिमाणात वाढ होत असल्यामुळे या कामाचा खर्च रु. २,८६,१३,००० इतका वाढीव होत असल्यामुळे दि. २१.११.२०१३ रोजीच्या पत्रान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. **तसेच शासनाने काढलेल्या त्रुटी अनुसार माहे जुलै, २०१४ मध्ये त्रुटींची पूर्तता करुन रु. ३,२५,६४,०००/- सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. जिल्हा परिषद औरंगाबादकडून प्राप्त झालेल्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या व वाढीव निधीच्या प्रस्तावावर योग्य निधी मंजूरीस शासनाने तातडीने मान्यता द्यावी व या इमारतीचे संपूर्ण काम सहा महिन्यात पूर्ण करुन त्यात पंचायत समिती, पैठण कार्यालय स्थानांतरीत करावे अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती एक महिन्यात समितीस पाठवावी.**

प्रकरण तीस

# जिल्हा परिषद, औरंगाबाद

## आरोग्य विभागाकडील मुळबांधकाम व दुरुस्ती मधील अनियमिततेबाबत

**परिच्छेद ३.२६९/१६४ (सन २०११-१२)**

आरोग्य विभागाकडील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची बांधकाम/दुरुस्ती बाबत देयकांची तपासणी केली असता त्यावर रु. १,१२,६३,३७०/- चा खर्च करण्यांत आलेला आहे. त्याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता आदेशा मधील क्रमांक १८२४३-४७/२०११ दि.७.१०.२०११ अन्वये मान्यता दिलेल्या प्रशासकीय आदेश यामध्ये बदल करुन दि.२४.११.२०११ रोजी एकुण १६ कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच आदेश क्रं.५१०६-११ दि.०६.०३.२०१० रद्द करुन जावक्र क्रं.३९७४-४००२ ५१०६-११ दि.११.०३.२०१२ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता एकुण १७ प्राथमिक आरोग्य केंद्राना ४ अतिरिक्त खाटासाठी एक सुसज्ज खोली २० X ३० ची प्रती काम रु.८७५०००/- मान्यता देण्यांत आलेली आहे. परंतु प्रर्वीचे प्रशासकीय मान्यता प्रदान केलेले कोणती कामे होती या बाबत संचिकेत आदेश संलग्न नसल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

(२) सदरील दवाखान्याचे बांधकाम दुरुस्ती कोणत्या भागाची व केंव्हा करण्यात आली होती. या बाबतची मुळ बांधकामाची नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याने करण्यात आलेला खर्च अचुक होता किंवा कसे या बाबत खात्री करता आली नाही.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रं.व्हीव्ही एम.१०१९/ प्र.क्र.५४/०८ दि.२०.०५.१९९९ व शासन निर्णय क्रं.स्थाविका/२००३/का.१४४५ दि.२८.११.२००३ नुसार नामफलकाबाबत कार्यवाही केलेली नाही.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखांसहिता १९६८ चे नियम ८७ नुसार व शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्रक्रं.सिमेंट/साहित्य १०१९/प्र.क्र.५६ दि.३०.०६.२००० नुसार कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतुन गुणवत्ता चाचणी अहवाल अंतीम देयका सोबत सादर करणे आवश्यक आहे. परंतु अहवाल जोडलेला नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रं.झेडपीए.१०९३/प्र.क्र.१५१६/३३ दि.२७.०४.२०१० अन्वये कोणत्याही परिस्थितीत कामाचे विभाजन करण्यांत येवुन नये असे निर्देश असतांना अति मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी सदरील नियमांचे उल्लंघन करुन नियमबाह्य रित्या प्राथमिक आरोग्य केंद्र बिडकीन/देवगांव रंगारी/लोणी/वरखेडी व आळंद येथील कामास पुढीलप्रमाणे अनुक्रमे रक्कम रुपये २०.०० लक्ष व रुपये १७ लक्ष्य रुपये ५७.४०/- रुपये २०.०० लक्ष व रुपये ७३,८४,१८०/- प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या असुन कामाचे विभाजन करण्यांत आलेले आहे.

(६) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रं.झेडपीए २०००/प्रक्र.१८/३३ दि. २ मे, २००० नुसार ग्रामपंचायत संस्थेचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतींना त्यांच्याच कार्यक्षेत्रातील गावांच्या हद्यीत कामे करण्याची संमती देण्यात आलेली असतांना सदरील शासन निर्णयाचे उल्लंघन करुन फक्त एकाच ग्रामपंचायतीस काम दिल्याचे दिसुन येते.

(७) प्रमाणक क्रं.५३१ माहे ३/१२ रक्कम १,१०,८७३/- प्राथमिक आरोग्य उपकेंद्र पंढरपुर ता.गंगापुर सदरील कामावर दि.३१.१०.२००९ ते ३१.०३.२०१० मुदतवाढ मंजुर केलेली नाही. सदरील कामाच्या जागेबाबत वारंवार वाद होत असल्याचे संचिकेवरुन दिसुन येते काम सुरु करण्यापुर्वी जागा निर्वीवाद असल्याची खात्री केलेली नाही. तसेच सदरील काम दि.१५.०४.२०१० ला कामपुर्णत्व प्रमाणपत्रावरुन पुर्ण झाल्याचे नमुद असतांना महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती संहिता, १९६८ चे नियम ४४ (१) नुसार सदरील देयक कालबाहय झालेले असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेतलेली नाही. तसेच सदरील कामाचे बाब क्रं.१२, १५, २०, २५, २७, ५२ या बाबींचे काम केलेले नसताना सदरील काम दि.१५.०४.२०१० ला पुर्ण झाल्याचे कसे नमुद केले उक्त बाबीचे गरज नसताना अंदाजपत्रकात कशा समाविष्ट केल्या तसेच सर्वसाधारण पाहणी अहवाल अचुक केल्याचे दिसुन येत नाही.

(८) प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्रांना विद्युतीकरण करण्यात आलेल्या कामांची अंतिम तपासणी संबंधीत सक्षम अधिका-याने केल्याचे दिसुन येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागाकडील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकाम मंजुर होते व त्यावर रुपये १,१२,६३,३७०/- चा खर्च करण्यात आलेला आहे. लेखा आक्षेपानुसार खालील प्रमाणे अनुपालन सादर करण्यांत येत आहे.

(१) रद्द केलेले प्रशासकीय मान्यता आदेश व सुधारित प्रशासकीय मान्यता आदेश सोबत अवलोकनार्थ सादर केले आहेत.

(२) मुळ बांधकामाची नोंदवही ठेवणेत आली आहे. कामे मंजुर करतांना तालुका आरोग्य अधिकारी यांनी सुचविलेली व आरोग्य अधिकारी यांनी सुचविलेली व आरोग्य समितीने मंजुरी केल्यानुसार प्रशासकीय मंजुरी देण्यांत येते. त्यामुळे खर्च क्षेत्रीय गरजेप्रमाणेच केला असल्याने खर्च योग्य आहे.

(३) माहिती फलक बसविण्यात आले होते. व त्याची मोजमाप पुस्तिकेत नोंद आहे. त्याचे छायाचित्र देयका सोबत लावण्यात आले नव्हते.

(४) कामावर वापरण्यात येणारे साहित्याची चाचणी गुणनियंत्रण मंडळाकडुन केली आहे. अवलोकनास्तव प्रत जोडली आहे.

(५) प्रशासकीय मान्यतेता रक्कम मध्ये इमारत बांधकाम अंतर्गत रस्ते, विद्युतीकरण, पाणी पुरवठा व स्वच्छता हे विशिष्ट पध्दतीचे कामे असल्याने मंजुरीनुसार घटक निहाय कामे पुर्ण करण्यात आले आहेत.

(६) ग्रामपंचातय मागणी नुसार सक्षमता तपासुन ग्रामपंचायतीस कामे दिले जातात.

(७) ग्रामपंचायतने जागा उपलब्ध करतांना जागा निर्विवाद होती. तदनंत जागेबाबत वाद निर्माण झाला ज्यामुळे काम पुर्ण होण्यास विलंब झाला. दि.१५.०३.२०१० रोजी काम पुर्ण झाले. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विनादंड मुदतवाढीस मंजुरी दिली आहे. (दि.३१.१०.२००९ ते ३१.०३.२०१० कालावधी) आरोग्य विभागास निधी उपलब्ध नसल्याने देयक सादर करतांना मुदतबाह्य मान्यता सक्षम प्राधिका-यांकडुन घेण्यात आली होती व तसे कमी जास्त खर्चास सुध्दा सक्षम प्राधिका-याची कलम १५२(२) नुसार मान्यता घेण्यात आली होती. (प्रत संलग्न)

(८) विद्युतीकरण कामांची संबंधित शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता मार्फत अंतिम तपासणी करुनच देयक पारीत करण्यांत आलेले आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, आरोग्य विभागातील एकूण १६ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीच्या कामांना सुरुवातीस मान्यता दिली असताना ती रद्द करुन नवीन १७ कामांना प्रशासकीय मान्यता दिली. जुनी १६ कामे रद्द करण्याची कारणे काय आहेत, दवाखान्यांच्या मूळ बांधकामाची नोंदवही त्याचवेळी लेखा परिक्षणास का दाखविली नाही, दवाखाना बांधकामांच्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल केव्हा घेण्यात आला, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक २७/४/२००० नुसार कामाचे विभाजन करण्यास मनाई असताना, प्राथमिक आरोग्य केंद्र, बिडकीन, देवगाव, रंगारी, लोणी, वरखेडी व आळंद या कामांचे विभाजन कोणत्या प्राधिकारान्वये केले, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र पंढरपूर, याकामातील बाब क्रमांक १२, १५, २०, २५, २७, ५२ या ६ बाबी कार्यान्वित न करताच हे काम कसे पूर्ण केले, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विद्युतीकरणाच्या कामाची तपासणी सक्षम प्राधिका-याने केव्हा केली, याबाबतचे अभिलेख त्याचवेळी लेखा परिक्षणास का दर्शविण्यात आले नाहीत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी समितीस विदित केले की, मूळ १६ कामांचे प्रशासकीय आदेश उपलब्ध होते, परंतु ती कामे रद्द करुन १७ कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सुधारित आदेशाची प्रत उपलब्ध आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, १६ जुनी कामे रद्द करुन नवीन १७ कामे का घेतली, ही १६ जुनी कामे कोणती होती, या प्रश्नावर जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीस

माहिती दिली की, त्यांच्याकडे यासंबंधीचे रेकॉर्ड उपलब्ध नाही. यावर समितीने नाराजी व्यक्त करीत मत व्यक्त केले की, अधिका-यांकडे कागदपत्रे उपलब्ध नाहीत, ही अतिशय गंभीर बाब आहे. आरोग्य समितीची बैठक होत असते तेव्हा या ठरावावर चर्चा झालेली असेलच, त्यामुळे कोणत्या कारणांमुळे ही कामे रद्द करुन नवीन कामे घेतली, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभाग प्रमुखांची बैठक घेतली असेल तेव्हा या प्रश्नाची शहानिशा झालेली असेलच, तेव्हा सदरहू नस्ती उपलब्ध नाही असे आपल्याला समजले नाही काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी समितीस विदित केले की, नस्ती उपलब्ध नाही, परंतु सुधारित आदेशामध्ये १६ कामांचा रेफरन्स होता. सदरहू नस्तीचा दोन दिवसामध्ये शोध घेऊन पुढील कारवाई करता येईल. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, १६ कामांना पहिली मान्यता दिनांक ६ मार्च २०१० रोजी घेतली होती, त्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता घेतली आहे, याबाबतचा टिपणीमध्ये उल्लेख आहे, कामाचे नाव तसेच त्यासाठी किती रक्कम लागणार होती, ही सर्व माहिती मिळावयास पाहिजे. कर्मचारी ही बाब गांभीर्याने घेत नाहीत. पंचायत राज समिति जिल्ह्यात येणार आहे म्हणून नस्ती सापडत नाही हे योग्य नाही. उद्या ही माहिती समितीस उपलब्ध करुन देण्याचे निदेश समितीने दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, ही माहिती समितीला सादर करण्यात येईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जुनी १६ कामे कोणती होती आणि आता नव्याने कोणती कामे घेतली आहेत, याची माहिती समितीला देण्यात यावी, नवीन १७ कामे कोणती मंजूर झालेली आहे, त्याची माहिती समितीसमोर विशद करावी. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीस माहिती दिली की, या १७ कामांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र शिवूड, ता. वैजापूर, प्राथमिक आरोग्य केंद्र मनूर, ता.वैजापूर, प्राथमिक आरोग्य केंद्र लासूर, ता. गंगापूर, प्राथमिक आरोग्य केंद्र जीपठाण, ता.गंगापूर, प्राथमिक आरोग्य केंद्र विहार मांडवा, ता.पैठण, प्राथमिक आरोग्य केंद्र ढाके साकेफळ, ता. पैठण, प्राथमिक आरोग्य केंद्र औराळा, ता.कन्नड, प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचवली, ता.कन्नड, प्राथमिक आरोग्य केंद्र आमवढ, ता.सिल्लोड, प्राथमिक आरोग्य केंद्र अंधारी, तालुका सिल्लोड, प्राथमिक आरोग्य केंद्र पानवळ, ता.सिल्लोड, प्राथमिक आरोग्य केंद्र वडोदा बाजार ता.फुलंब्री, प्राथामिक आरोग्य केंद्र बाजार सावंगी, ता.खुलताबाद, प्राथमिक आरोग्य केंद्र लाड सावंगी, ता.औरंगाबाद, वरुळकाझी, ता.औरंगाबाद, येथे नवीन कामे मंजूर करण्यात आली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दवाखाना बांधकामांच्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल केव्हा घेण्यात आला, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक २७-४-२००० नुसार कामाचे विभाजन करण्यास मनाई असताना, प्राथमिक आरोग्य केंद्र बिडकीन, देवगाव, रंगारी, लोणी, वरखेडी व आळंद या कामांचे विभाजन कोणत्या प्राधिकारान्वये केले, यावर कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी समितीस माहिती दिली की, गुणवत्ता चाचणीचा अहवाल दिनांक ३-११-२००८, २१-११-२०११, १-३-२०१२ आणि दिनांक १५-२-२०११ रोजी घेण्यात आला होता.

समितीने पुढे आणखी विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र बिडकीन, देवगाव, रंगारी, लोणी, वरखेडी व आळंद या कामांची विभाजन कोणत्या प्राधिकारान्वये केले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, यामध्ये प्रशासकीय मान्यता एकाला मिळालेली आहे. ऑर्डर एक आहे. पण घटकनिहाय कामे वेगवेगळी करण्यात आलेली आहेत. हे शासन निर्णयानुसार अयोग्य आहे. भविष्यात असे होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल.

समितीने पुढे आणखी विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र बिडकीन/देवगाव/ रंगारी/लोणी/वरखेडी व आळंद येथील कामास पुढीलप्रमाणे अनुक्रमे रक्कम रुपये २० लक्ष, १७ लक्ष रुपये ५७.४०/- रुपये २० लक्ष व रुपये ७३,८४,१८०/- प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. परंतु, ती सर्व कामे वेगवेगळी आहेत, भाग पाडायला हरकत नाही. परंतु, प्रशासकीय मान्यता भागाप्रमाणे घेणे अनिवार्य आहे. याबाबत संबंधित अधिका-यांनी समितीला माहिती द्यावी. परंतू प्रशासकीय मान्यता भागाप्रमाणे घेणे अनिवार्य आहे. सदरहू प्रकरणी चौकशी पूर्ण करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. यामध्ये चूक केलेल्या अधिका-यावर कारवाई करुन त्याची माहिती समितीला अवगत करावी असे निदेश समितीने दिले.

समितीने पुढे विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र पंढरपूर, या कामातील बाब क्रमांक १२, १५, २०, २५, २७, ५२ या ६ बाबी कार्यान्वित न करताच काम कसे पूर्ण केले. प्राथमिक आरोग्य उपकेंद्र पंढरपूर, या कामातील बाब क्रमांक १२, १५, २०, २५, २७, ५२ या ६ बाबी कार्यान्वित न करताच ही कामे कशी पूर्ण केली आणि त्या कोणत्या बाबी आहेत. या ठिकाणी कामाची गुणवत्ता चांगली झालेली आहे, असे तांत्रिकदृष्ट्या म्हणता येईल किंवा कसे याबाबत संबंधित अधिका-यांनी समितीला माहिती द्यावी. यावर कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी समितीस असे विदीत केले की, तुलनात्मक तक्यांचे अवलोकन करता काही बाबींच्या परिणामात घट झालेली आहे आणि काही बाबींच्या परिणामात वाढ झालेली आहे. सद्यःस्थितीत ही कामे पूर्ण

झालेली आहेत. तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी त्या कामांना मंजुरी दिलेली होती. बाबनिहाय खर्चाची आकडेवारी उपलब्ध आहे. काही बाबींमध्ये एस्केलेशन झालेले आहे तर काही बाबींमध्ये कमी खर्च झाला आहे. बाब क्रमांक १२ मध्ये फिनिशिंग ११,८१८/-, बाब क्रमांक १५ मध्ये प्रोव्हिजन फॉर प्लिंथ १६३६/-, बाब क्रमांक १९ मध्ये प्रोव्हिजन फॉर आरसीसी फ्रेम ३८००/-, बाब क्रमांक २५ मध्ये शटर २११७/-, बाब क्रमांक २७ मध्ये मॉस्क्युटो जाळी ५१८५/- बाब क्रमांक ५२ मध्ये गली ट्रॅप २१५६/- असे आहे. सदरची संपूर्ण तपशिलवार माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल. परंतू कामे गुणवत्तापूर्वक झाली आहेत असे तांत्रिकदृष्ट्या कार्यकारी अभियंता बांधकाम यांना सांगता आले नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मा.उपसचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.२०२९५ दि.०३ मे, २०१६ अन्वये पंचायत राज समितीने चौकशी करण्याचे निर्देश दिले असून, चौकशीमध्ये आरोग्य विभागातील एकूण १६ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीच्या कामांना मान्यता दिली असताना ती रद्द करुन नविन १७ कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

आक्षेपात नमूद १६ कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे असा उल्लेख केला असून वास्तविकतः १६ कामे नसुन १७ कामांचीच प्रशासकीय मान्यता प्रत्येकी रु. ७.०० लक्ष प्रमाणे दि. ६.३.२०१० च्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे. तसेच याबाबतचा ठराव जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. १६/८/२०१० मध्ये घेण्यात आलेला आहे.

आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक दि. १८/०२/२००९ अन्वये उक्त कामातील रक्कमेत बदल झालेला असल्यामुळे प्रत्येक रु. ०८.७५ लक्ष प्रमाणे खर्च करण्यास मान्यता देण्यात आल्यामुळे व त्यावेळचे डीएसआर २५ टक्केने वाढल्याने सुधारित अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून घेऊन उक्त १७ कामांची सुधारित प्रशासकीय मान्यता दि.११/३/२०११ रोजी काढण्यात आलेली आहे. पंचायत राज समिती यांचे सूचनेप्रमाणे दि.१७/१०/२०१५ रोजीस सादर नस्ती समितीच्या अवलोकनार्थ मुदतीत सादर करण्यात आलेली आहे.

तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी प्रश्नावलीत नमूद केलेल्या दोन्ही मुद्दयांची चौकशी करण्याकरिता समिती गठित केली होती. या समितीने दोन्ही मुद्दयांची चौकशी करण्याकरिता समिती गठित केली होती. या समितीने दोन्ही मुद्दयांबाबत अहवाल सादर केला असून तो सोबत जोडला आहे. त्यानुसार कामे १६ नसून १७ च आहेत. गठित केलेल्या चौकशी समितीतील श्री. आर.आर. हंपीहोळी उपअभियंता बांधकाम, उपविभाग पैठण यांनी सदरील कामाचे अनुषंगाने बांधकामाची नोंदवही, बांधकामाच्या साहित्यांची गुणवत्ता तपासणी अहवाल, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विद्युतीकरणाच्या कामांची तपासणी करुन खात्री केली आहे.

सदरहू प्रकरणी आरोग्य विभागाने प्रथम तयार करुन चौकशी केली असता दि. २४/११/२०११ रोजी एकूण १७ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु आरोग्य संचालक यांनी उपरोक्त कामाच्या किमतीस वाढ केल्याने दि. ६/३/२०११ रोजी उपरोक्त कामे रद्द करण्यात आले. व नवीन किमती प्रमाणे १७ कामांना सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली. यात कुठलीही अनियमितता झाल्याचे दिसून येत नाही. फक्त किंमतीमध्ये वाढ झाल्याने सुधारित प्रशासकिय मान्यता काढण्यात आली आहे.

(२) मुळ बांधकामाची नोंदवही ठेवण्यात आली नव्हती. सध्या चालु आर्थिक वर्षापासुन मुळ बांधकामाची नोंदवही ठेवण्याची दक्षता घेण्यात आली आहे. नोंदवही न ठेवणारे संबंधितांवर कार्यवाही म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली आहे.

(३) दवाखाना बांधकामाच्या साहित्याचे गुणवत्ता चाचणी अहवाल घेण्यात आला आहे.

(४) कामाचे विभाजनास दोषी कर्मचा-यावर एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात ग्रामविकास व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दिलेल्या अभिप्रायाशी आरोग्य संचालनालय सहमत असल्याचे अभिप्राय आरोग्य संचालनालयाने दिलेले आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने आरोग्य विभागाकडील मूळ बांधकाम व दुरुस्ती मधील अनियमिततेबाबत हा विषय आहे. पंचायत राज समितीने चौकशी करण्याचे निदेश दिले असून चौकशीमध्ये आरोग्य विभागातील एकूण १६ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या दुरुस्तीच्या कामांना मान्यता दिली असताना ती रद्द करुन नवीन १७ कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कारणांबाबत रॅपिडली ॲक्शन झालेली आहे, ही अतिशय चांगली गोष्ट असल्याचे मत व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या बांधकाम/दुरुस्तीबाबत देयकांची तपासणी केली असता त्यावर रु.१,१२,६३,३७०/- खर्च करण्यात आला असल्याबाबत आक्षेप लेखापरिक्षणात घेण्यात आला आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची बांधकाम/दुरुस्तीबाबत मंजूर होते व त्यावर रु. १,१२,६३,३७०/- खर्च करण्यात आला. या प्रकरणी प्रशासकीय मान्यता आदेश व सुधारीत प्रशासकीय मान्यता आदेशामध्ये अवलोकनार्थ सादर करण्यात आला असून त्यानुसार प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. त्यामुळे क्षेत्रीय गरजेप्रमाणे खर्च केला असल्याचे कारण योग्य असल्याची माहिती समितीला देण्यात आली. या प्रकरणी समितीने आरोग्य विभागातील एकूण १६ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या दुरुस्तीच्या कामास मान्यता दिली असता ती रद्द करुन नवीन सुधारीत कामांना मान्यता देण्याची कारणे काय आहेत, याबाबत विचारणा केली असता यामध्ये १६ कामे नसून १७ कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रत्येकी रु.७.०० लक्ष प्रमाणे दिनांक ६.३.२०१० च्या पत्रान्वये देण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली. **तसेच सदरचा ठराव जिल्हापरिषद, औरंगाबादच्या सर्वसाधारण सभेत दिनांक १६.८.२०१० मध्ये घेण्यात आल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणी कोठलीही अनियमितता झाली नसून फक्त किंमतीत वाढ झाली असल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे मुळ बांधकामाची नोंदवही ठेवण्यात आली नाही. सध्या चालू आर्थिक वर्षामध्ये मुळ बांधकामाची नोंदवही ठेवण्याची दक्षता घेण्यात आली आहे. नोंदवही न ठेवणा-यांवर तात्पुरत्या स्वरुपात वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात असून त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घेण्यात आली. जिल्हापरिषदेने केलेल्या कार्यवाहीशी समिती सहमत आहे.**

प्रकरण एकतीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### मजूर सहकारी संख्या व ठेकेदार यांना एकाचवेळी ३ पेक्षा जास्त कामे देवून केलेल्या अनियमिततेबाबत

**परिच्छेद ३.३४६/२१२ (सन २०११-१२)**

सिंचन विभाग सन २०११-१२ मधील लेखा परिक्षणात असे दिसून आले की, मजूर संस्थांना काम देतांना अनियमितता झालेचे दिसून येते. याबाबत पूढील प्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसिंचन विभाग शासन निर्णय क्र.परांस/१००१/प्र.क्र. १६/३८ दिनांक ३१/०१/२००१ मधील अनुक्रमांक ०६ मधील ठेकेदारास देण्यात आलेल्या कामाची यादी वेळोवेळी प्रकाशित करण्यात यावी, अशी कार्यवाही केली नाही.

संस्थांना एकाचवेळी तीन पेक्षा जास्त कामे देवू नये तसेच ठेकेदाराने काम पूर्ण न केल्यास ठेकेदारास काळया यादीत टाकण्याचा प्रस्ताव सादर करावा. त्यास नविन कामे देऊ नये याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

तत्कालिन काम वाटप समिती मार्फत काही मजुर सहकारी संस्था यांना एकावेळी तीन पेक्षा अधिक कामाचे वाटप केले होते तथापी संबंधीत संस्थानी वेळेत गुणवत्ता पुर्वक कामे पुर्ण केलेले आहेत झालेल्या कामाबाबत कोणतीही तक्रार विभागास प्राप्त नाही विद्यमान काम वाटप समिती मार्फत कामे देतांना एका संस्थेस एका वेळी नियमानुसार जास्तीत जास्त तीन किंवा आर्थिक कामे न देण्याची कटाक्षाने दक्षता घेतली जात आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दिनांक ३१-१-२००१ मध्ये मजुर सहकारी संस्थांना एकाच वेळी तीनपेक्षा जास्ते कामे देऊ नयेत अशी तरतूद असतानाही ती डावलून तीनपेक्षा जास्त कामे कोणत्या प्राधिकरणान्वये दिली अशी पृच्छा केली. त्यावर कार्यकारी अभियंता यांनी तत्कालीन समितीमार्फत तीनपेक्षा जास्त कामे देण्यात आली होती ही वस्तुस्थिती मान्य करुन संबंधित संस्थांनी गुणवत्तापूर्वक कामे केलेली असून सद्यःस्थितीत झालेल्या कामाबाबत कोणतीही तक्रार नाही असा खुलासा केला. परंतु अनियमिततेबाबत समितीस उत्तर प्राप्त झाले नाही म्हणून समितीने पुढे चेअरमन मातोश्री, मजूर सहकारी संस्था, सिल्लोड यांना ११ कामे दिलेली असून, त्याची किंमत १,५६,४९,५७५/- इतकी आहे. चेअरमन, गिरीजा मजूर सहकारी संस्था, औरंगाबाद यांना ८ कामे देण्यात आलेली असून, त्याची किंमत ९६,२७,८३०/- इतकी आहे व श्री. ए.डी. खैरनार यांना चार कामे दिलेली असून, त्याची किंमत ५८,८९,१४२/- इतकी आहे. अशा प्रकारे उपरोक्त सर्व कामे अडीच ते तीन कोटी रुपयांची आहेत. ही कामे कशा प्रकारे गुणवत्तापूर्वक झालेली आहेत. कामाची गुणवत्ता टिकावी याकरिता मुदत घालून देण्यात आलेली आहे याबाबत समितीस माहिती देताना ही सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. परंतू पूर्णत्वाचे दाखले आता नाहीत ते मागवून घेण्यात येऊन समितीच्या माहितीस्तव सादर केल्या जाणार आहेत. यामध्ये अनियमितता झालेली आहे आणि भविष्यात अशी अनियमितता होणार नाही, या दृष्टीकोनातून योग्य ती काळजी घेण्यात येईल. तीनपेक्षा जास्त कामांचे वाटप केले ही वस्तुस्थिती आहे. ही कामे काम वाटप समितीमार्फत केली जातात असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीस विदीत केले.

समितीच्या मते काम वाटप समितीचा यामध्ये कोणताही संबंध येत नाही. यामध्ये काम देण्याबाबत कार्यकारी अभियंता यांना शिफारस करता येते काय, याबाबत खुलासा करताना या कामासाठी योग्य संस्था द्यावी म्हणून काम वाटप समितीकडे शिफारस केली असल्याचे कार्यकारी अभियंत्यानी समितीसमोर स्पष्ट केले. तसेच काम वाटप समितीला एका संस्थेला तीनपेक्षा जास्त कामे देता येत नाहीत तरीही त्यांनी एकाच संस्थेला तीनपेक्षा जास्त कामे दिलेली असून, त्यामध्ये अनियमितता झालेली

असल्याचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केले. काम वाटप समिती ज्यावेळी काम देते त्यावेळी कोणत्या संस्थेला किती कामे दिली आहेत, त्याचे रेकॉर्ड असते काय यावर समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त होवू शकले नाही. परंतू अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यकारी अभियंत्याकडून प्रशासकीय मान्यता मिळालेली कामे समितीकडे जातात. त्यानंतर काम वाटप समितीमध्ये ३३, ३३ आणि ३४ या प्रमाणे सुशिक्षित बेकार, सोसायटी आणि ठेकेदार असे आरक्षण निश्चित करावे लागते. यामध्ये कोण इच्छूक आहे हे जाणून घेण्यासाठी इच्छापत्रे दिली जातात. त्यानंतर काम वाटप केले जाते. शासन निर्णयानुसार तीनपेक्षा जास्त कामे देऊ नये. तथापि तीनपेक्षा जास्त कामे या ठिकाणी दिलेली आहेत असे समितीसमोर स्पष्ट केले.

या प्रकरणी गंभीर स्वरुपाची अनियमितता झालेली असून एकाच दिवशी ५ कामांचे आदेश देण्यात आलेले असून, ती १४ ते १५ लाख रुपयांपुढील आहेत. ही बाब संबंधित अधिका-यांच्या लक्षात आली नाही. नियमानुसार तीन कामे देता येत नसताना मात्र प्रत्यक्षात ५ कामे दिलेली आहेत. या प्रकरणाची चौकशी करुन त्यासंदर्भातील अहवाल समितीच्या अवलोकनार्थ सादर करावा असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मजुर सहकारी संस्था व ठेकेदार यांना एकाचवेळा ३ पेक्षा जास्त कामे देवून केलेल्या अनियमिततेबाबत :-

१. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दिनांक ३१/०१/२००१ नुसार मजुर सहकारी संस्थांना एकाच वेळी ३ पेक्षा जास्त कामे देऊ नयेत असे असतानाही या सूचना डावलून काही सोसायटयांना ११ ते ८ अशी कामे दिल्याप्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले.

२. एका मजूर सहकारी संस्थेला ३ पेक्षा अधिक कामे देण्यात येवू नयेत या शासन निर्णयाच्या परिणामाकारक अंमलबजावणीकरिता शासनस्तरावरुन कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

३. जिल्हयातील कोल्हापुर पध्दतीच्या बंधा-यांच्या कामांची पहाणी करुन त्यांच्या सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे तसेच ज्या बंधा-यामध्ये पाणी साठत नाही त्या बंधा-याचे काम करणा-या संस्थेला काळया यादीत टाकण्याचे निर्देश समितीने दिले असून त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१. सदर प्रकरणात चौकशी पथक स्थापन करण्यात आले होते पथकाने काम वाटप समिती यांचे मार्फत एकाच मजूर सहकारी संस्थेला ११ कामे व दुस-या मजूर सहकारी संस्थेला ८ कामे तसेच नियमित ठेकेदार यांना जे कामे देण्यात आल्याचे अभिलेख्यांची तपासणी केली असता निदर्शनास आले आहे. तत्कालीन काम वाटप समिती मार्फत वरील दोन मजुर सहकारी संस्थांना एकाच वेळी तीन पेक्षा जास्त म्हणजेच ११ व ८ कामे दिलेली आहेत. तथापि संबंधित संस्थांनी वेळेत गुणवत्तापुर्वक कामे पूर्ण केलेली आहेत. पूर्ण झालेल्या कामाबाबत तक्रार नाही. झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांना या प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

२. शासनस्तरावर

३. संबंधित संस्थेला वाटप केलेल्या १९ को.प.बंधा-यांची पहाणी जिल्हा परिषदेच्या चौकशी पथकाने केली असुन शेतक-यांचे पंचनामे सुध्दा केलेले आहे. चौकशी समितीच्या अहवालावरुन संबंधित बंधा-यात पाणी साठत असुन एक बंधा-याला दरवाजे पुरविण्यात आलेले नाही.

**उपरोक्त मुद्यांसदर्भात ग्रामविकास विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) पंचायत राज समितीच्या निर्देशानुसार चौकशी पथक स्थापन करुन सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील काम वाटप समितीने सदर कामाचे वाटप केले आहे. कामाच्या झालेल्या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना जलसंधारण विभागाकडून दिनांक १६/५/२०१६ च्या पत्रान्वये संबंधितांना सक्त सुचना देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २००१ व शासन निर्णय १९ ऑक्टोबर, २०११ नुसार प्रमाणशीर काम वाटपाच्या सूचना स्पष्ट आहेत. शासन निर्णय तरतूदीनुसार प्रमाणशीर काम वाटप न झाल्यास काम वाटप समितीस जबाबदार धरण्यात येईल अशा सुधारीत सूचना शासन स्तरावरुन निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) चौकशी समितीच्या अहवालावरुन संबंधित बंधा-यात पाणी साठत असून एका बंधा-याला दरवाजे पुरविण्यात आलेले नाही. तरी एका बंधा-याचे दरवाजे बसविण्याबाबत करण्यात येणा-या कार्यवाहीच्या सद्यःस्थितीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना दिनांक १६/५/२०१६ च्या पत्रानुसार कळविण्यात आले आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

राज्य शासनाच्या दिनांक ३१ जानेवारी, २००१ रोजीच्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांना एकाचवेळी ३ पेक्षा जास्त कामे देऊ नये असे बंधन असतानाही औरंगाबाद जिल्हा परिषदेने एका संस्थेस ११ व ८ अशी कामे दिली असल्याचा आक्षेप प्रस्तुत प्रकरणी घेण्यात आला आहे. जिल्हा परिषदांमार्फत इमारती, रस्ते, पाणीपुरवठा योजना, नाली/गटारे, समाजमंदीर, सभागृह अशा विविध विकासात्मक स्वरुपाच्या बांधकामांची कामे केली जातात. ग्रामविकास विभागाच्या दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार, ग्रामपंचायतीने कामे करण्यास असमर्थता दर्शविल्यास सदरची कामे ३३:३३:३४ या प्रमाणात मजूर सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये वाटप केली जातात. ग्रामविकास विभागाच्या दिनांक ८ मे, २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांना ३३% कामे देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ नुसार संबंधित मजूर सहकारी संस्थांच्या गटात निकोप स्पर्धा निर्माण होईल या दृष्टीने रुपये ५,००,००० लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक किमतीची कामे ई-टेंडरींग पध्दतीने देण्याचा निर्णय शासनाने घेतला. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित जिल्हा परिषदेचे अधिकारी यांची साक्ष घेतली असता कामे गुणवत्तापुर्वक पूर्ण झाली असून सद्यस्थितीत कामाबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. परंतू काम वाटप समितीने नियम डावलून एका संस्थेला तीन पेक्षा अधिक कामे का दिली याबाबत समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त होऊ शकले नाही. जलसंधारण विभाग, मंत्रालय यांच्याकडून सदर अनियमिततेबाबत सर्व संबंधितांना सक्त सुचना देण्याबाबत कळविण्यात आले असल्याची माहिती समितीस देण्यात आली. दिनांक ३१ जानेवारी, २००१ रोजीच्या व दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रमाणशीर काम वाटपाच्या सूचना असल्याची बाब ही समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

एका मजूर सहकारी संस्थेला तीन पेक्षा अधिक कामे वाटप करण्यात येवू नयेत या राज्य शासनाच्या दिनांक ३१ जानेवारी, २००१ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांच्याकडून लेखा आक्षेप घेण्यात आला. परंतू एका मजूर सहकारी संस्थेला एका वेळी तीन पेक्षा जास्त कामे देण्यात येवू नयेत ही अट दिनांक २६ ऑगस्ट, २००२ रोजीच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या क्रमांक झेडपीए -२००१/प्र.क्र.११५/वित्त-९ रोजीच्या शासन निर्णयानुसार **(परिशिष्ट १३.१)** काढून टाकण्यात आल्याची बाब स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळेस विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते.

शासकीय योजनेसंबंधी शासनाच्या विविध विभागाकडून शासन निर्णय निर्गमित केले जातात आणि कालपरत्वे व गरजेनुसार त्यांच्यात वेळोवेळी सुधारणा केल्या जातात व त्याची शुध्दीपत्रके, परिपत्रके, ज्ञापने, पत्रे निर्गमित केली जातात या सर्व शासन स्तरावरुन दिल्या जाणा-या सुचनांमुळे क्षेत्रिय स्तरावर एकप्रकारचे संभ्रमाचे वातावरण निर्माण होते असे समितीचे मत झाले आहे. लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपामध्ये वेळोवेळी उधृत करण्यात आलेले शासन निर्णय व परिपत्रके सर्वसाधारणपणे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर आढळून येत नाहीत. **त्याकरीता महाराष्ट्र शासनाचे हे** www.maharashtra.gov.in **संकेतस्थळ अद्ययावत करण्यात यावे. मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार रद्द केलेल्या अथवा त्यात सुधारणा केलेल्या शासन निर्णयांच्या बाबतीत सुस्पष्टता येण्यासाठी त्याचप्रमाणे प्रशासकीय नियमांचा वापर सुकरपणे व्हावा यासाठी अशा रद्द केलेल्या, सुधारणा केलेल्या तसेच नव्याने निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके, ज्ञापने, पत्रे, आदेश, विनियम, अधिनियम उक्त संकेतस्थळावर वेळच्या वेळी टाकण्यात यावेत व सदरच्या संकेत स्थळावर हे निर्णय राज्यातील शासकीय व निमशासकीय प्रशासकीय यंत्रणांना उपलब्ध झाले किंवा कसे याचीही संबंधितांनी शहानिशा करावी व त्यादृष्टीने सदरचे संकेतस्थळ परिपूर्ण माहितीसह अद्ययावत करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने सर्व संबंधित विभागांना परिपत्रकाद्वारे सुचित करावे अशी समितीची शिफारस आहे. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण बत्तीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योजने अंतर्गत क्विनॉलफॉस किटकनाशक वाटपाबाबत

**परिच्छेद ३.५१७/२९८ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद, औरंगाबाद, सन २०११-१२ (परिच्छेद क्र.३०) केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योजनेंतर्गत क्वीनॉलफॉस किटकनाशक वाटपाबाबत प्रमाणक क्र.२२४/ ३१.०३.२०१२ अन्वये रु.३,६५,९१८/- व प्रमाणक क्र.३२३/३१. ०३.२०१२ अन्वये रु.१,२१,९७२/- एकूण रु.४,८७,८९०/- खर्च करण्यात आलेला आहे.

१. महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए/ २००८ प्रक्र-४४६ वित्त-९ दि. २०.६.२००८ नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन करणे आवश्यक असते परंतू तसे करण्यात आलेले नाही.

२. महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. मागास-१०९३ प्र.क्र. १२३९/३४ दि. ०१.०९.१९९३ अन्वये औषधाची खरेदी व वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक आहे.

३. उपयोगीता प्रमाणपत्रे घेतलेली नाही.

४. महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.पंरास-१०८४/सीआर १६३३, दिनांक १९.०८.१९८५ अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्सा प्रथम वसुल करुन नंतर योजना राबविणे व साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

५. मार्गदर्शक सुचनेनुसार अनुसूचीत जातीसाठी १६% अनुसुचीत जमातीसाठी ८% व एकुण तरतुदीच्या ३०% अल्प व अत्यल्प व महिला शेतकरी यांना लाभ दिलेला नाही. लाभार्थी प्रमाण व पावत्या इतरांना लाभ दिल्याने योजनेचा हेतु सफल झालेला नाही.

६. पंचायत समिती गंगापूर येथील साठा नोंदवही पृ.क्र.१४९ वर दिनांक ०९.०२.२०१२ रोजी कृषि सहाय्यक, भिवधानोरा व कृषि सहाय्यक, गळनिंब यांना ११८ लिटर क्विनॉलफॉस दिले त्यांचेकडून शेतक-यांना वाटप झाल्याची पोच पावती नाही तसेच लाभार्थी हिस्सा जमा केल्याची नोंद नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. सदर योजना राबविणेसाठी कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र. उ.सं.पि.स./ विप्र -७/द.नि.१०३८/ ११ दिनांक ३० जुलै, २०११ या कार्यालयास दिनांक २४.०८.२०११ रोजी प्राप्त झाल्या होत्या. तोपर्यंत खरीप हंगाम संपत आला होता. सदर योजना खरीप व रबी या दोन्हीही हंगामासाठी लागु होती. त्यामुळे रबी हंगामातील करडई हे पीक निवडण्यात आले होते. त्यामुळे शासन निर्णय क्र. झेडपीए/ २००८ प्रक्र- ४४६ वित्त-९ दि. २०.६.२००८ नुसार योजना राबविताना वेळापत्रकाचे पालन करणे शक्य झाले नाही. (सोबत कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचनांची प्रत अवलोकनार्थ सादर.)

२. क्विनॉलफॉस किटकनाशकाची खरेदी व पुरवठा दि.०८.१२.२०११ ते २६.१२.२०११ या कालावधीत करण्यात आलेला आहे. प्राप्त कीटकनाशकाचे वाटप सन २०११-१२ मध्येच होणे अपेक्षित होते. परंतु रबी हंगामात पुरेसा पाऊस न झाल्यामुळे गळीत धान्य पिकाची पेरणी पुरेशा क्षेत्रावर झाली नसल्यामुळे शेतक-यांकडून किटकनाशकाची मागणी झाली नाही. त्याचप्रमाणे शेतक-यांच्या पिकावर किडीचा प्रादुर्भाव झाल्याशिवाय शेतकरी संबंधित औषधी खरेदी करत नाही, त्यामुळे किटकनाशकांचे सन २०११-१२ या वर्षात पुर्णतः वाटप होऊ शकले नाही. त्यामुळे उर्वरीत किटकनाशके सन २०१२-१३ या वर्षात वाटप करण्यात आले.

३. क्विनॉलफॉस किटकनाशक मागणीनुसार शेतक-यांना वाटप करण्यात आले असुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडून प्राप्त करुन घेऊन शासनास सादर करण्यात आले आहे.

४. क्विनॉलफॉस किटकनाशक हे मावा, तुडतुडे, पाने गुंडाळणारी अळी व पाने खाणारी अळी यांचे नियंत्रणासाठी वापरले जाते. या किडीचा प्रादुर्भाव पिकावर येण्याचे पुर्वानुमान करता येत नसल्याने अगोदर लाभार्थी निवड करणे शक्य होत नाही. तसेच कृषि आयुक्तालय पुणे यांचे दि. २७.०६.२०११ च्या शासन दर करार व त्यातील मार्गदर्शक सुचनेनुसार लाभधारकास किटकनाशकाचे वाटप करतांना अनुदान वजा जाता लोकवाट्याची रोख रक्कम वसुल करण्यात याव्यात अशा सुचना आहेत. त्यामुळे प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल करण्यात आलेला नाही.

५. कृषि संचालक, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार वर्गवारी निहाय अनुसुचीत जातीसाठी १६% अनुसुचीत जमातीसाठी ८% व एकूण तरतुदीच्या ३०% अल्प व अत्यल्प व महिला शेतकरी यांना लाभ देणे आवश्यक आहे. त्यानुसार या प्रवर्गासाठी औषधी वाटपासाठी उपलब्ध होती, परंतू सदर प्रवर्गातील लाभार्थी न मिळाल्याने व त्याबाबतचे संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचे अहवाल प्राप्त झाल्याने तसेच सदरील औषधी मुदतबाह्य होण्याची शक्यता असल्याने मागणीनुसार इतर प्रवर्गातील शेतक-यांना योजनेचा लाभ देण्यात आल्याने योजनेचा हेतू सफल झालेला आहे.

६. पंचायत समिती गंगापूरने दि. ०९.०२.२०१२ रोजी श्रीमती एस. के. लाटे कृ.स. भिवधानोरा यांना ११९ लिटर व श्रीमती एस.एस. बाहुधनकर कृ.स. गळनिंब यांना ११८ लिटर क्विनॉलफॉस किटकनाशक वाटपासाठी दिले होते. संबंधितांनी शेतक-यांना औषधी वाटप केलेले आहे व शेतक-याकडून ५० टक्के लाभार्थी हिस्सा वसुल केलेला आहे. श्रीमती एस.के. लाठे कृ.स भिवधानोरा यांनी ११९ लिटर क्विनॉलफॉसची रक्कम रु. १६६६०/- पंचायत समिती स्तरावर पावती क्र.२४४६०७ नुसार दि.१०.१२.२०१२ रोजी जमा केलेली आहे. श्रीमती एस.एस बाहुधनकर कृषि सहाय्यक यानी ११८ लिटरचे रक्कम रु.१६५२०/- पंचायत समिती स्तरावर पा. क्र. २४४६०८ नुसार दि.१०.१२.२०१२ रोजी जमा करण्यात आलेले आहे. सदरील २३७ लिटर किटकनाशक वाटप केला बाबतची यादी व ५० टक्के लाभार्थी हिस्सा जमा केल्याचा पावत्या अवलोकनार्थ सादर.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद औरंगाबाद येथे सन २०११-२०१२ मध्ये केंद्र पुरस्कृत गळीत धान्य ५० टक्के अनुदानावर वितरित केले. ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाच्या दिनांक २६/६/२००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार वेळापत्रक योजना राबविण्यास जिल्हा परिषदेला आलेल्या अडचणीबाबत कृषी विकास अधिकारी यांना योजना राबविण्यासाठी दिनांक २४/८/२०११ रोजी मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या होत्या, तोपर्यंत खरीप हंगाम संपत आला होता. सदर योजना खरीप व रब्बी या दोन्हीही हंगामासाठी लागू होती, त्यामुळे रब्बी हंगामातील करडई हे पीक निवडण्यात आले होते. दिनांक २०/६/२००८ नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन करणे शक्य झाले नाही. प्रत्येक वर्षाला कोठले किटकनाशक केव्हा घ्यावयाचे हे कळत नाही. ती औषधे त्याच वर्षात वाटप करणे क्रमप्राप्त आहे. सन २०११-२०१२ या वर्षात गळीत धान्य पिकांसाठी योजना होती. सरासरी सहा टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. उपलब्ध ९०० हेक्टर्सवर पेरणी झालेली नसल्यामुळे पूर्णतः वाटप करता आले नाही. सदर प्रवर्गातील लाभार्थी न मिळाल्याने सदरची औषधी मुदतबाह्य होण्याची शक्यता असल्याने इतर प्रवर्गातील शेतक-यांना योजनेचा लाभ देण्यात आला असा समितीसमोर खुलासा केला.

समितीच्या मते लाभार्थ्यांकडून फलश्रुती अहवाल महत्वाचा आहे. जिल्हा परिषद योजना राबविते परंतु लाभार्थी त्याचा वापर कसा करतो, यासंबंधीचा फलश्रुती अहवाल घेतलेला नाही याबाबत खुलासा करताना कृषि विकास अधिकारी यांनी ही वैयक्तिक लाभाची योजना असल्यामुळे तसेच मार्गदर्शक तत्वामध्ये तसा समावेश केलेला नसल्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. समितीने पुढे विचारणा केली की, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १९/८/१९८५ रोजीच्या शासन निर्णयानुसार लाभार्थी हिस्सा साहित्य पुरविण्यापूर्वी का वसुल करण्यात आला नाही यावर किडीचा प्रादुर्भाव पिकावर येण्याचे पुर्वानुमान करता येत नसल्याने अगोदर लाभार्थी निवड करणे शक्य होत नाही. शेतावरील पिकांवर कोणता रोग पडणार आहे, त्यावर शेतक-यांना कोणती औषधी वापरणे शक्य आहे, परंतु ती खरेदी करताना कोणाच्या शेतावर रोगाचा प्रादुर्भाव होणार आहे, या बाबी आपल्याला अगोदरच कळत नाही. समितीने यावर जिल्हा परिषदेने अगोदरच औषधी घेऊन ठेवली आणि लाभार्थीच मिळाले नाही त्यामुळे शासनाचा पैसा वाया जातो. यासाठी शासनाच्या निर्णयामध्ये बदल करणे आवश्यक आहे. लाभार्थी निवडण्यासाठी शिथिलता असावी. लाभार्थ्याची निवड करताना जिल्हा परिषद ऑर्डर देते आणि त्या लाभार्थ्यांकडून हिस्स्याची

रक्कम जमा करुन घेणे, क्षेत्रिय स्तरावर काम करताना हे अवघड असते, यामुळे या पध्दतीमध्ये आपल्याला बदल करणे आवश्यक असल्याची बाब समितीसमोर आली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योजनेअंतर्गत क्विनॉलफॉस किटकनाशक वाटपाबाबत :-**

(१) प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दिनांक २० जून, २००८ नुसार घालुन दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी केली नसल्याच्या लेखा आक्षेपावर शासनाकडुन अहवाल वर्षात माहे, ऑगस्ट २०११ अखेर मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या तेव्हा खरीपाचा हंगाम संपत आलेला होता. परिणामी खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामासाठी लागु असलेल्या योजनेत रब्बीत हंगामातील करडई हे पिक निवडण्यात आल्यामुळे शासनाने घालुन दिलेल्या वेळापत्रकाचे पालन करता आलेले नाही, असा खुलासा जिल्हा परिषद स्तरावरून समितीस प्राप्त झाला असून उक्त निर्णयाचे शासनाने पुनर्विलोकन केले आहे काय ?

(२) शासन निर्णय दिनांक १९/८/१९८५ नुसार साहित्य पुरविण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा वसुल करणे तसेच लाभार्थ्यांकडून फलश्रुती अहवाल घेतला नसल्याच्या आक्षेपावर जिल्हा परिषदेकडून कोणत्या पिकावर कोणत्या किडीचा प्रादुर्भाव होईल याचे पूर्वानुमान करता येत नसल्यामुळे अगोदर लाभार्थ्यांची निवड किंवा औषधाची खरेदी करणे शक्य होत नसल्याचा खुलासा करण्यात आला असुन सदर प्रकरणी संबंधित शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता यथोचित बदल करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच या प्रकरणी समितीने निदेश दिल्याप्रमाणे समितीला लाभार्थ्यां संदर्भातील चौकशी अहवाल न पाठविण्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योनजेअंतर्गत क्विनॉलफॉस किटकनाशक वाटपाबाबत परिच्छेदाच्या अनुषंगाने शासन निर्णय २० जून, २००८ नुसार विविध कृषि विषयक योजना राबविणेसाठीचे वेळापत्रक पुनर्विलोकनाबाबत प्रस्ताव मा.उपसचिव महाराष्ट्र विधान मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक २२/१२/२०१५ नुसार सादर केला असून संबंधित अहवालाची एक प्रत मा.आयुक्त कृषि यांचे मार्फत मा.अप्पर मुख्य सचिव (कृषि) व मा.सचिव, (ग्राम विकास विभाग) यांना सादर करण्यात आली आहे.

किडीचा प्रादुर्भाव पिकावर येण्याचे पुर्वानुमान करता येत नसल्याने अगोदर लाभार्थी निवड करणे व त्याअनुषंगाने लाभार्थी हिस्सा प्रथम जमा करुन योजना राबविणे शक्य होत नाही. तसेच कृषि आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक २७.०६.२०११ चे शासन दर करार व संदर्भीय योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभधारकास किटकनाशकाचे वाटप करताना अनुदान वजा जाता लोकवाट्याची रक्कम वसूल करुन पुरवठादार संस्थेकडे जमा करण्याचे सूचना आहेत. त्यामुळे प्रथम लाभार्थी हिस्सा वसूल करण्यात आलेला नाही. या अनुपालनानुसार समितीने निर्देशित केल्याप्रमाणे 'संबंधित योजनेतील औषधी किंवा अवजारे प्रत्यक्ष शेतक-यांना प्राप्त होईपर्यंत जो वेळ लागतो त्यामुळे लाभधारक त्याचा हिस्सा अगोदर भरण्यास तयार नसतो, त्यामुळे प्रत्यक्ष निविष्ठ/अवजार वाटप करतांना लाभधारक हिस्सा जमा करुन वाटप करण्यात यावे' अशा आशयाचे अपेक्षित बदल सुचविणारी टिप्पणी/प्रस्ताव विषयांकित प्रकरणी मा. आयुक्त कृषि यांचे मार्फत ग्राम विकास विभाग व कृषि विभागाकडे दिनांक ७/५/२०१६ च्या पत्रान्वये सादर करण्यात आली आहे. तसेच समितीने त्यांच्या दिनांक ३/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशान्वये या कार्यालयाचे पत्र दिनांक २२/१२/२०१५ नुसार लाभार्थी संदर्भातील टिप्पणी / प्रस्ताव सविस्तर अभिप्रायासह मा.उपसचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्यात आली आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणा-या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणीबाबत ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दिनांक २० जून, २००८ अधिक्रमित करण्यात येऊन सुधारीत शासन परिपत्रक काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग :**

पंचायत राज समितीच्या निर्देशानुसार संबंधित शासन परिपत्रक दिनांक १९/१/१९८५ नुसार सर्वसमावेशक व विविध विभागांशी संबंधित असल्याने ग्राम विकास विभागामार्फत तत्कालीन परिस्थितीत निर्गमित केले आहे. विषयांकित प्रकरणी योजनेच्या मुळ मार्गदर्शक सूचनेनुसार पिक संरक्षण औषधांचे वाटप झाल्यानंतर अनुदानाच्या रकमे व्यतिरिक्त शेतकरी हिस्सा गोळा करुन देय सर्व रक्कम पुरवठादार संस्थेस अदा करण्याच्या सूचना असल्याने उपरोक्त प्रकरणी संबंधित शासन परिपत्रकामध्ये बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीस केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योजनेंतर्गत क्विनॉलफॉस किटकनाशक वाटपाप्रकरणी शासन निर्णयाप्रमाणे घालून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी केली नसल्याच्या लेखा आक्षेपावर शासनाकडून अहवाल वर्षात माहे, ऑगस्ट, २०११ अखेर मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या तेव्हा खरीपाचा हंगाम संपत आलेला होता. परिणामी, खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामासाठी लागू असलेल्या योजनेत रब्बीत हंगामातील करडई हे पीक निवडण्यात आल्यामुळे शासनाने घालून दिलेल्या वेळापत्रकाचे पालन करता आलेले नाही, असा खुलासा जिल्हापरिषद स्तरावरुन समितीस प्राप्त झालेला असून लाभार्थ्यांकडून फलश्रुती अहवाल घेतला नसल्याच्या आक्षेपावर जिल्हा परिषदेकडून कोणत्या पिकावर कोणत्या किडीचा प्रादुर्भाव होईल याचे पूर्वानुमान करता येत नसल्यामुळे अगोदर लाभार्थ्यांची निवड किंवा औषधांची खेरेदी करणे शक्य होत नसल्याचा खुलासाही करण्यात आलेला आहे. हे परिपत्रक ग्रामविकास विभागाचे असून त्यात खरीप हंगामामधील देऊन परिपत्रक सुधारीत करण्यासंबंधीचे निर्देश दिलेले आहेत. यासंबंधी ग्रामविकास विभागाने उचित कारवाई केलेली आहे. यावर विभागीय सचिवांनी विदीत केले की, सदरहू परिपत्रक रद्द केलेले आहे. नवीन परिपत्रक काढण्याकरिता नव्याने सूचना प्रसारित केलेल्या आहेत. समितीने पुढे विचारणा केली की, वाटपाची पध्दत काय आहे, यातील लाभार्थी कोण निवडते. कृषी अधिकारी जर लाभार्थी निवडत असेल तर तो त्याच्या परिचयाची माणसेच लाभार्थी म्हणून निवडत असतो, अशा तक्रारी प्राप्त होतात, यामुळे मूळ पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून नेहमीच वंचित राहतात. एवढया मोठ्या योजनेची अंमलबजावणी करीत असताना कृषी अधिकारी किंवा कृषी सहायक यांच्या एकट्यावर लाभार्थी निवडण्याची महत्त्वाची जबाबदारी सोपविली जाते. यावर काहीतरी योग्य तोडगा काढून मूळ पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याकरिता कार्यवाही विभागाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे.

कृषी खात्यामार्फत जे बियाणे, खत, औषधांचे वाटप होते, त्यामध्ये कधी अनियमितता होते का, किंवा कधी हे वाटप केले जाणारे खत, औषध व बियाणे संपलेले आहे, असे होते का, झाल्यास विभागामार्फत काय केले जाते. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, औषधांचे वाटप पिकावर रोग पडल्यावर केले जाते. खते व बियाणे उपलब्धतेप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना दिले जाते. पात्र लाभार्थ्यांना वाटप करण्याकरिता बियाणे व खते कमी पडल्यास खरेदी केंद्रावरुन त्याची ताबडतोब खरेदी करुन शक्यतोवर जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनेप्रमाणे बियाणे व खते यांचे वाटप केले जाते.

## अभिप्राय व शिफारशी

औरंगाबाद जिल्हा परिषदेने सन २०११-२०१२ मध्ये 'केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योजने' अंतर्गत क्विनॉलफॉस किटकनाशकाच्या वापराबाबत (५०% अनुदान) देऊन उक्त योजनेवर एकूण रु.४,८७,८९०/- इतकी रक्कम खर्च केली. उक्त योजनेच्या संदर्भात जिल्हा परिषदेने योजना राबविताना ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयाचे (परिशिष्ट १४.१) पालन करणे आवश्यक असताना तसे पालन न करणे, त्याचप्रमाणे उक्त विभागाच्या दिनांक १ सप्टेंबर, १९९३ रोजीच्या शासन निर्णयान्वये खरेदी व वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असताना तसे न करणे, दिनांक १९ ऑगस्ट १९८५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वैयक्तीक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्सा प्रथम वसुल करुन नंतर योजना राबविणे व साहित्य खरेदी करणे आवश्यक असणे, शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अनुसूचित जातीसाठी १६%, अनुसूचित जमातीसाठी ८%, व एकूण तरतुदीच्या ३०% अल्प व अत्यल्प व महिला शेतकरी यांना लाभ दिलेला नाही. विहीत लाभार्थ्याऐवजी इतरांना लाभ दिल्याने योजनेचा हेतु सफल झालेला नाही. त्याचप्रमाणे शेतक-यांनी क्विनॉलफॉस किटकनाशकाचा

वापर केल्याबाबत त्यांच्याकडून पोच पावती तसेच लाभार्थ्यांचा हिस्सा, नोंद याबाबत लेखा आक्षेप उपस्थित केले. या आक्षेपास उत्तर देताना जिल्हा परिषदेने लेखी स्वरुपात माहिती देऊन सदरील योजना राबविणेसाठी कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ३० जुलै, २०११ रोजीच्या मार्गदर्शक सूचना जिल्हा परिषदेस दिनांक २४ ऑगस्ट, २०११ रोजी प्राप्त झाल्या होत्या. तोपर्यंत खरीप हंगाम संपत आला होता. सदर योजना खरीप व रब्बी या दोन्हीही हंगामासाठी लागू होती. त्यामुळे रब्बी हंगामातील करडई हे पिक निवडण्यात आले. त्यामुळे दिनांक २० जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार योजना राबविताना वेळापत्रकाचे पालन करणे शक्य झाले नाही. सदरची बाब अत्यंत गंभीर असल्याचे समितीला वाटते. कारण दिनांक २० जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयात परिशिष्ट-ई मध्ये जिल्हा परिषदेमधील वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्याच्यासंदर्भात जिल्हा परिषदेने करावयाची कार्यवाहीची बाब तक्यात नमूद केली आहे. यातील वेळापत्रक विचारात घेता येथे कोणतीही अडचण उपस्थित होणार नाही याची दक्षता या शासन निर्णयात घेण्यात आलेली आहे. कृषि आयुक्तालयाकडून उशीरा सूचना मिळाल्या ही बाब गंभीर असली तरी जिल्हा परिषदेने या उपरोक्त शासन निर्णयाच्या आधारे योजना राबविणे आवश्यक होते असे समितीचे स्पष्ट मत आहे. दिनांक २४.८.२०११ रोजी मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर क्विनॉलफॉस किटकनाशकाची खरेदी व पुरवठा दिनांक ८.१२.२०११ ते दिनांक १६.१२.२०११ या कालावधीत करण्यात आलेला आहे. कृषि आयुक्तालयाने केलेली चूक, त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेने त्या ठिकाणी खरेदी व पुरवठा यासाठी केलेला विलंब हा क्षमापित करण्यासारखा नाही. या योजना राबविणा-या सर्व अधिका-यांना हे माहित होते की, खरीप हंगाम जून, जुलै या महिन्यापासून सुरु होतो. सदरची बाब विचारात घेऊन या अधिका-यांनी मार्गदर्शक सूचना, त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेने करावयाचा पाठपुरावा या दोन्ही बाबत कमालीची उदासिनता दिसून येत आहे. त्यात केवळ क्विनॉलफॉस या औषधाची खरेदी करणे हे देखील समितीला अनाकलनीय वाटते. शासन शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारावी या हेतूने त्यांना अनुदानावर खते, किटकनाशके, बियाणे इत्यादि उपलब्ध करुन देत असते. किटकनाशक डिसेंबर आणि जानेवारीमध्ये वितरीत करणे हे अत्यंत हास्यास्पद व चिड आणणारे देखील आहे. संबंधित अधिका-यांनी याबाबत थोडेही भान न ठेवणे ही बाब समितीस उद्वीग्न करणारी आहे. सदर योजनेचा शेतक-यांना फायदा होऊच नये व तो केवळ त्यांच्या मर्जितील शेतक-यांनाच व्हावा असाही हेतू या अधिका-यांचा असल्याचे समितीला दिसून येते. त्यामुळे कृषि आयुक्तालयाने विलंबाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे, जिल्हा परिषदेने विलंबाने क्विनॉलफॉस किटकनाशकाची खरेदी आदेश व पुरवठा करण्याबाबत निर्णय घेणे तसेच ज्या लाभार्थ्यांसाठी ही योजना राबविली होती त्या लाभार्थ्यांना लाभ न देता अन्य लाभार्थ्यांना लाभ दिल्याने या योजनेची फलनिष्पत्ती व उद्दिष्टपुर्ती होत नाही. क्विनॉलफॉस या औषधाचा खरीप पिकासाठी वापर न होता तो केवळ रब्बी पिकासाठी देण्यात आला. मावा, तुडतुडे आणि पान खानारी अळी यांच्या नियंत्रणासाठी या किटकनाशकाचा वापर केला जातो. त्यामुळे प्रादुर्भाव नसल्यामुळे अगोदर लाभार्थ्यांची निवड करणे शक्य नव्हते हा विभागाचा खुलासा अत्यंत असत्य व दिशाभूल करणारा आहे. कारण क्विनॉलफॉस हया औषधाचा किटकनाशक म्हणून वापर हा खरीप पिकासाठी देखील केला जातो. खरीप पिकावर अनेक प्रकारच्या किटकांचा प्रादुर्भाव होत असतो. त्यामुळे हा खुलासा अत्यंत हास्यास्पद आहे. सदरचा खुलासा समितीला कदापीही मान्य होणार नाही.

या योजनेचा लाभ अनुसूचित जातीच्या १६% व अनुसूचित जमातीच्या ८% व एकूण तरतुदीच्या ३०% अल्प, अत्यल्प व महिला शेतकरी यांना लाभ देणे आवश्यक आहे. परंतु लेखी स्वरुपात पाठविलेल्या व विभागीय सचिवांची साक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीत देखील त्या प्रवर्गातील लाभार्थी उपलब्ध न झाल्यामुळे ते अन्य लाभार्थी प्रवर्गातील लाभार्थ्यांना देऊन संबंधित अधिका-यांनी नियमबाह्य वर्तन केलेले आहे. एका पंचायत समितीमध्ये हजारोच्या संख्येत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक व महिला शेतकरी यांचे प्रमाण आहे. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी योजना राबविण्यापूर्वी तशा प्रकारे प्रसिध्दी/गवगवा करुन सूचना दिल्या असत्या तर हजारोच्या संख्येने लाभार्थ्यांची गर्दी, पंचायत समिती व जिल्हा परिषदेसमोर झाली असती. तथापि असे करण्याची मानसिकता संबंधितांमध्ये नव्हती. अधिका-यांनी जाणीवपूर्वक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक व महिला शेतकरी यांना लाभापासून वंचित ठेवल्याचे समितीचे ठाम मत आहे. सदरहू योजनेचा लाभ संबंधित अधिकारी यांनी केवळ त्यांच्या मर्जितील शेतक-यांची निवड करुन दिला असल्यामुळे या प्रकरणी समिती गंभीर आक्षेप नोंदवित आहे. या योजनेचा नियमबाह्य लाथार्थ्यांना लाभ दिल्यामुळे सर्व संबंधित अधिका-यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

सन २०११-२०१२ वर्षाच्या गळीत धान्य योजनेचा लाभ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प व महिला शेतकरी यांना मिळालेला नाही. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. जिल्हा परिषदेतील अधिका-यांना क्विनॉलफॉस या किटकनाशकाचा वापर कोणत्या कालावधीत करावा लागतो हे माहित नसणे ही अत्यंत शोकांतिका आहे असे समितीला वाटते.

क्विनॉलफॉस हे किटकनाशक पिकाच्या कोणत्या अवस्थेत कालावधीत देतात याची जाणीव प्रत्येक कृषि अधिका-याला असते. ज्या वेळेला कृषि आयुक्तालयाकडून विलंबाने मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या. त्याच वेळी सदरची बाब कृषि आयुक्तालयाच्या निदर्शनास आणून दिली असती व सदरची योजना बदलून अन्य योजना राबविली असती तर निश्चितच त्याचा लाभ शेतक-यांना झाला असता. **योजनेचा लाभ देताना तो प्रत्यक्षपणे शेतक-यांना मिळाला पाहिजे व शासनाने घेतलेल्या धोरणानुसार लाभ झाला पाहिजे अशा स्वरुपाची समितीची धारणा आहे. त्यामुळे या प्रकरणी समिती तीव्र खेद व्यक्त करीत असून सर्व संबंधित अधिका-यांविरुध्द या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना वेळेवर मिळाला नसल्यामुळे, त्याचप्रमाणे या योजनेची फलनिष्पत्ती न झाल्यामुळे तसेच योजनेशी संबंधित शेतक-यांना लाभ न मिळाल्यामुळे उद्दिष्ट साध्य झाले नाही. याबाबतचा आक्षेप ठेऊन संबंधितांची सखोल चौकशी करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण तेहतीस

# जिल्हा परिषद, औरंगाबाद

## दिर्घकाळ विविध निधीची अखर्चीत रक्कम पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या नुकसानीबाबत

**परिच्छेद ३.७८७/४३९ (सन २०११-१२)**

पंचायत समिती वैजापुर सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणात पंचायत समितीकडे विविध योजनांच्या रोख किर्द व बँक खात्यामध्ये खालीलप्रमाणे अनावश्यकरित्या रक्कमा पडुन आहेत.

(१) जिल्हा निधी (२) अभिकरण (३) जि.प.उपकर (४) देखभाल दुरुस्ती (५) वित्त आयोग रोख किर्द व बँक खात्यामध्ये रक्कमा पडुन आहेत. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.जिपनि/२००९/प्र.क्र.५०१९/वित्त-३/ दि. १० जून, २००९ मधील परिच्छेद क्रं.२ नुसार विविध योजनांना वरील निधीच्या अल्प गुंतवणुकीव्दारे प्राप्त होणारी व्याजाची रक्कम हि जि.प.उत्पन्नाची बाब समजण्यात येवुन जि.प.उत्पन्नाच्या अर्थसंकल्पात ५-व्याज (२) शिल्लक रक्कमेच्या गुंतवणुकीवरील व्याज (अल्प मुदत) (अ) अल्पमुदतीत गुंतवलेल्या रक्कमेवरील व्याज या लेखाशिर्षा खाली जमा दाखवावे. व त्या रक्कमेचा विनियोग हा महाराष्ट्र जि.प. व पं.स. अधिनियम, १९६१ नुसार जिल्हा यादीमध्ये अंतर्भुत असलेल्या (पहिल्या अनुसूची) नमुद बाबीवर करण्यात यावा. वरिलप्रमाणे पंचायत समिती वैजापुरने रक्कम शिल्लक ठेवुन गुंतवणुक केलेली नाही. गुंतवणुक केली असती तर त्यामुळे अनुज्ञेय असलेले व्याज दर ८.५ टक्के प्रमाणे रु.१,१७,९९,०६२/- व्याज मिळाले असते अनावश्यकरित्या रक्कम शिल्लक ठेवुन व्याजाचे नुकसान झाले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती वैजापुरकडे सन २०११-१२ मध्ये एकूण जमा रक्कम रु.१,६६,५७,४९,९९९/- दर्शवुन वर्षभर सरासरी शिल्लक रक्कम रुपये रु.१३,८८,१२,४९९/- असल्याचे नमुद केलेले असुन वेळीच जिल्हा परिषदेकडे वर्ग केले असते तर व्याज दर ८.५ टक्के प्रमाणे रुपये १,१७,९९,०६२/- व्याज मिळाले असते असा आक्षेप आहे. जिल्हा परिषदेने पंचायत समिती वैजापुरला सन २०११-१२ मध्ये वित्त प्रेषणाव्दारे योजना निहाय वितरीत केलेल्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र (१) | योजनेचे नांव (२) | सुरुवातीची शिल्लक (३) | वर्षातील एकूण जमा (४) | एकूण (५) | वर्षातील एकूण खर्च (६) | शिल्लक (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा निधी | ६३३७३९९५ | ५५२६९०७७२ | ६१६०६४७६७ | ४८७७९२५०४ | १२८२७२२६३ |
| २ | अभिकरण | २४७६४०४४ | ५३१८३०३९ | ७७९४७०८३ | ५०३८७५९१ | २७५५९४९२ |
| ३ | देखभाल दुरुस्ती | ६४५६१६ | ३६१११९५ | ४२५६८११ | ४१७०४२३ | ८६३८८ |
| ४ | जि.प.उपकर | ९०७४९१ | २३५८८८० | ३२६६३७१ | २५७७९०८ | ६८८४६३ |
| ५ | १३ वित्त आयोग | २०३२१७९ | २५८५०४६ | ४६१७२२५ | ४३१६०८४ | ३०११४१ |
| | एकूण . . | ९१७२३३२५ | ६१४४२८९३२ | ७०६१५२२५७ | ५४९२४४५१० | १५६९०७७४७ |

उपरोक्त तालीकेतील तपशिलाप्रमाणे पंचायत समितीस सन २०११.१२ या वित्तीय वर्षात सुरुवातीची शिल्लक रु.९,१७,२३,३२५/- व प्रत्यक्ष प्राप्त निधी रक्कम रु.६१,४४,२८,९३२/- असुन त्यापैकी रक्कम रु.५४,९२,४४,५१०/- खर्च होऊन रक्कम रु.१५,६९,०७,७४७/- इतके शिल्लक होते. त्यापैकी दिनांक ३१.०३.२०१२ अखेर वार्षीक लेखे अंतिम करुन जिल्हा निधी रक्कम रु.१०,००,००,०००/- व अभिकरण योजना रक्कम रु.१,००,००,०००/- असे एकूण रक्कम रु.११,००,००,०००/- दिनांक २७.०६/२०१२ रोजी जिल्हा

परिषदेस परत करण्यात आले असुन उर्वरीत रक्कम योजनांची असल्यामुळे महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय दि. ०६ जुन, २००८ नुसार लगतच्या वर्षात खर्च करण्याची परवानगी असल्यामुळे सदरचा निधी पुढील वित्तीय वर्षात खर्च करण्यात आलेला आहे.

उपरोक्त तालीकेतील तपशिलात दर्शविल्यानुसार जिल्हा निधी (हस्तांतर योजना), अभिकरण योजना व देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानापैकी ९० टक्के निधी वेतन व भत्यावर खर्च करण्यासाठी पंचायत समितीस वित्त प्रेषणाव्दारे महिन्याच्या शेवटी प्राप्त होतो व पुढील महिन्याच्या १ ते ५ तारखेपर्यंत कर्मचारी/शिक्षकांच्या वेतन व भत्याच्या अदायगीवर खर्च होतो. परंतु महिना अखेर पंचायत समितीच्या किर्दीत शिल्लक दिसतो. प्रत्यक्षात सदर निधी पंचायत समितीच्या बँक खात्यात तीन आठवडेही जमा राहात नाही.

शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.जिपनि/२००९/प्र.क्र.२०९९/वित्त-३ दि.१० जून,२००९ अन्वये व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १०० व १२३ अन्वये जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केलेल्या योजनेसाठी प्राप्त होणारा निधी हा संबंधित प्रयोजनावर खर्च करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येतो. कोणत्याही परिस्थितीत योजनेसाठीचा निधी हा स्थानिक विकासाची बाब विचारात घेवुन वेळच्या वेळी उपयोगात आणण्यासाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे उपरोक्त शासन निर्णयान्वये शिल्लक निधी मुदत ठेवी मध्ये गुंतवणुक करण्याचे अधिकार तालुका पातळीवर गट विकास अधिकारी यांना नसल्याने रक्कमांची गुंतवणुक केलेली नाही. आर्थिक वर्ष संपल्यानंतर वार्षिक लेखे बंद करुन अखर्चित रक्कमा जिल्हा परिषदेकडे परत करण्यांत आलेल्या आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती स्तरावर विविध लेखाशिर्षांतर्गत अखर्चित रक्कमा त्या त्या वेळी शासन जमा करणेस काय अडचणी आहेत, सद्यःस्थितीत कोणकोणत्या वर्षाच्या किती अखर्चित रकमा शासनास जमा करावयाच्या प्रलंबित आहेत. अखर्चित रक्कमांमध्ये शासनाचा बराचसा निधी अनावश्यक अडकून राहिला. या अनियमिततेस जबाबदार कोण आहे, अशा प्रकारच्या अनियमितता अन्य पंचायत समित्यांमध्ये झाल्या आहेत किंवा कसे, याची सक्षम अधिका-यांनी तपासणी केलेली आहे काय, असल्यास समितीस अहवाल सादर करावा यावर मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी खुलासा केला की, पंचायत समिती वैजापूरकडे सन २०११-२०१२ मध्ये एकूण जमा रक्कम १६६ कोटी ५७ लाख ४९ हजार ९९९ रुपये दर्शवून वर्षभर सरासरी शिल्लक रक्कम रुपये १३ कोटी ८८ लाख १२ हजार ४९९ असल्याचे नमूद केले आहे. सदरची रक्कम वेळीच जिल्हा परिषदेकडे वर्ग केली असती तर व्याज दर ८.५ प्रमाणे रुपये १ कोटी १७ लाख ९९ हजार ६२ रुपये मिळाले असते, असा आक्षेप आहे. जिल्हा परिषदेची एकूण रुपये रक्कम ९ कोटी १७ लाख २३ हजार ३२५ असून वर्षातील एकूण रक्कम ६१ कोटी ४४ लाख २८ हजार ९३२ रुपये आहे. वर्षातील एकूण खर्च ५४ कोटी ९२ लाख ४४ हजार ५१० रुपये आहे. दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर वार्षिक लेखे अंतिम करुन जिल्हा निधी रक्कम रुपये १० कोटी व अभिकरण योजना रक्कम रुपये १ कोटी असे एकूण ११ कोटी रुपये दिनांक २७/६/२०१२ रोजी जिल्हा परिषदेस परत करण्यात आले आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ३१ मार्च संपल्यानंतरही पंचायत समितीने रक्कम जिल्हा परिषदेकडे परत केलेली नाही. सदरची रक्कम जिल्हा परिषदेला परत न केल्यामुळे सरासरी १२ ते १३ कोटी रुपये या पंचायत समित्यांनी शिल्लक ठेवले. त्या रकमेचे व्याज वर्षाचे १ कोटी १७ लाख रुपये होतात, ३१ मार्च नंतर अखर्चित रक्कम मोठ्या प्रमाणावर ठेवता येत नाहीत. ती जिल्हा परिषदेकडे परत पाठवायला पाहिजे. अशी रक्कम पडून राहिली तर व्याजाचे नुकसान होते. जवळपास १२-१३ कोटी रुपये अखर्चित ठेवले आहेत. या अखर्चित रक्कमा पडून आहेत, याला जबाबदार कोण आहे यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्पष्ट केले की, पंचायत समित्यांच्या योजना राबविण्यासाठी निधी पडून राहतो १० ते १५ कोटी रुपयांची अखर्चित रक्कम पंचायत स्तरावर पडून आहे याला कोण जबाबदार आहे.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित गट विकास अधिकारी यांच्याविरोधात जबाबदारी निश्चित करुन पुढील योग्य ती कारवाई करावी असे निदेश समितीने देवून भविष्यात पंचायत समितीमध्ये निधी अखर्चित राहणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

पंचायत समितीमध्ये निधी अखर्चित राहिल्यामुळे जिल्हा परिषदेचे १ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. हे फक्त एका पंचायत समितीमुळे झालेले आहे. सर्व पंचायत समितीमधील अखर्चित निधी तपासला तर त्यामुळे जिल्हा परिषदेला खूप मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे लक्षात येणार आहे. पंचायत समितीमधील अखर्चित निधी हा ३१ मार्चपूर्वी जिल्हा परिषदेकडे जमा केलाच पाहिजे अशा सूचना दिल्या.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**दिर्घकाळ विविध निधीची अखर्चित रक्कम पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या नुकसानीबाबत :**

(१) सदरहू प्रकरणी पंचायत समिती स्तरावरील विविध लेखाशिर्षा अंतर्गत अखर्चित रक्कमा वेळीच जिल्हा परिषदेकडे वर्ग न केल्यामुळे जिल्हा परिषदेला सुमारे २१ कोटी १७ लाख रुपये व्याजाला मुकावे लागले. सदर रक्कम जिल्हा परिषदेचे स्वउत्पन्न म्हणून गणले गेले असते. या प्रकरणी संबंधित गट विकास अधिका-यावर जबाबदारी निश्चित करुन पुढील कारवाई करण्याचे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे.

(२) जिल्हा परिषदा आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाव्यात त्याकरिता उक्त अखर्चित रक्कमा जिल्हा परिषदेकडे वेळीच वर्ग करण्याकरीता संबंधित अधिका-यास बंधनकारक करण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका काय आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती वैजापूर स्तरावर अखर्चित निधी दिर्घकाळ ठेवण्याबाबत पंचायतराज समितीच्या निर्देशाप्रमाणे श्रीमती. एस.एम. खिल्लारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती वैजापूर व सहाय्यक लेखाधिकारी श्री.आर.एस.चव्हाण यांना जिल्हा परिषदेने कारणे दाखवा नोटीस दिनांक २१/१२/२०१५ च्या पत्राने दिली असून जबाबदारी निश्चित का करु नये याबाबत खुलासा मागविण्यात आला आहे. तथापि, अद्यापही खुलासा प्राप्त न झाल्याने गट विकास अधिकारी यांची एक वेतनवाढ बंद करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांना सादर केला आहे. तसेच श्री.आर.एस. चव्हाण, सहाय्यक लेखाधिकारी यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली आहे.

पंचायत समिती स्तरावरील अखर्चित निधी तात्काळ जिल्हा परिषदेस परत करण्यात यावा व अखर्चित निधी पंचायत समिती स्तरावर दिर्घकाळ ठेवल्यास गट विकास अधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल असे परिपत्रक दिनांक २१/१२/२०१५ रोजी निर्गमित केले आहे.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात ग्राम विकास विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती वैजापूर स्तरावर अखर्चित निधी दिर्घकाळ ठेवण्याबाबत पंचायत राज समितीने दिलेल्या निदेशानुसार संबंधित गट विकास अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन एक वेतनवाढ बंद करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांना सादर केला असून संबंधित सहाय्यक लेखाधिकारी यांची वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली आहे.

तसेच अखर्चित निधी जिल्हा परिषदेला परत करण्याबाबत गट विकास अधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी यांना जबाबदार धरण्याबाबतचे जिल्हा परिषदेने परिपत्रक निर्गमित केले असल्याने पंचायत राज समितीच्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच पंचायत समिती स्तरावर अखर्चित निधी पडून राहू नये याबाबत ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र. अखनि-२०१६/प्र.क्र.२३/वित्त-२ दि. १३ मे, २०१६ नुसार सूचना दिल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, दीर्घकाळ विविध निधीची अखर्चित रक्कम पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या नुकसानीबाबतचा हा विषय आहे. सदरहू प्रकरणी पंचायत समिती स्तरावरील विविध लेखाशीर्षा अंतर्गत अखर्चित रकमा वेळीच जिल्हा परिषदेकडे वर्ग न केल्यामुळे जिल्हा परिषदेला सुमारे २१ कोटी १७ लाख रूपये व्याजाला मुकावे लागले. सदर रक्कम जिल्हा परिषदेचे

स्वउत्पन्न म्हणून गणले गेले असते. या प्रकरणी संबंधित गटविकास अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन पुढील कारवाई करण्याचे निर्देश समितीने दिले आहेत. जिल्हापरिषदा आर्थिकदृष्टया सक्षम व्हाव्यात त्याकरिता अखर्चित रकमा जिल्हा परिषदेकडे वेळीच वर्ग करण्याकरिता संबंधित अधिका-यास बंधनकारक करण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका काय आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, पंचायत समिती वैजापूर स्तरावर अखर्चित निधी दीर्घकाळ ठेवण्याबाबत पंचायत राज समितीच्या निर्देशाप्रमाणे श्रीमती एस.एम.खिल्लारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती वैजापूर व सहायक लेखाधिकारी श्री.आर.एस.चव्हाण यांना जिल्हा परिषदेने कारणे दाखवा नोटीस दिनांक २१.१२.२०१५ च्या पत्राने दिली असून जबाबदारी निश्चित का करु नये याबाबत खुलासा मागविण्यात आला आहे, तथापि, अद्यापहि खुलासा प्राप्त न झाल्याने गट विकास अधिकारी यांची एक वेतनवाढ बंद करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांना सादर केला आहे. तसेच, श्री.आर.एस.चव्हाण, सहायक लेखाधिकारी यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली आहे. जिल्हापरिषदेला साठलेल्या निधीच्या रकमांवरील बँकामधील खात्यातील व्याजही स्वउत्पन्न म्हणून वापरण्याची परवानगी नाही. जिल्हापरिषदेला व्याजवाढीकरिता कोणतीही रक्कम कुठेही गुंतविण्याची मुभा नाही. पंचायत समितीलाही रकमेवरील बचत खात्यातील व्याज स्वउत्पन्न म्हणून वापरण्याची मुभा नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हापरिषद स्तरावर पंचायत राज समित्यांच्या निधीच्या रकमा बँकेच्या बचत खात्यामध्ये ठेवल्या असता त्याच्यावरील व्याजाच्या रकमेचे यामुळे नुकसान होते, त्याबाबत जिल्हापरिषद कोणती कारवाई करणार आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पंचायत समिती स्तरावर करंट अकाऊंटमध्ये निधीच्या रकमा ठेवाव्या लागतात. बचत खात्यामध्ये कमी प्रमाणात ट्रान्सॅक्शन करण्याची परवानगी असते. परंतु चालू खात्यामध्ये दैनंदिन किती ट्रान्सॅक्शन केले तरीही चालण्यासारखे असते. याकरिता या रकमा चालू खात्यामध्ये ठेवलेल्या असतात. चालू खात्यामधील रकमांवर बचत खात्यासारखे व्याज मिळत नाही. व्याज मिळाले तरीही पंचायत समिती स्तर व जिल्हापरिषद स्तरावर व्याजाचा वापर स्व-उत्पन्न म्हणून करता येत नाही. जिल्हा निधीकरिता जिल्हा परिषदेचे खाते करंटमध्ये ओपन केलेले आहे. पंचायत समितीस्तरावरील जिल्हा निधीचे खाते करंट अकाऊंटमध्ये असते. त्यामध्ये व्याज मिळत नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, यामध्ये झालेल्या व्याजाच्या नुकसानीस कोण जबाबदार आहे. जिल्हा परिषदेने केवळ एका अधिका-याची वेतनवाढ थांबवलेली आहे व दुस-या अधिका-याची वेतनवाढ थांबविण्याबाबत आयुक्तांकडे प्रस्ताव गेलेला आहे, एकूण १ कोटी १७ लाख रुपयांची रक्कम गुंतलेली आहे ती पंचायत समितीला विकासासाठी रक्कम दिली जाते. रक्कम खर्च झाली नसेल तर वेळेवर म्हणजेच मार्च मध्ये परत करणे आवश्यक होते. परंतु रक्कम वेळेवर परत केली नाही. त्यांनी आता रक्कम परत केलेली आहे. त्यावेळी ऑडीटरने १ कोटी १७ लाख रुपये व्याज कॅलक्युलेट केले होते. १ कोटी १७ लाख रुपयांचे शासनाचे नुकसान झालेले आहे. संबंधित अधिका-यावर जबाबदारी निश्चित करुन ही रक्कम सर्व जबाबदार अधिका-यांच्या पगारातून वसूल करण्यात येईल काय, यासंदर्भात किती दंड आकारण्यात आला होता यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खूलासा केला की, प्रस्तुत प्रकरणी वसुलीची कारवाई केलेली नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, आर्थिक वर्ष संपले की, पंचायत समितीला दिलेल्या रकमा त्यांनी तातडीने जिल्हा परिषदेला परत करायला पाहिजे. त्या रकमा पडून रहाता कामा नये. त्या रकमा पडून राहिल्या तर त्या गुंतवता येत नाहीत. त्यामुळे व्याजाचे नुकसान होते, असा महालेखाकारांचा आक्षेप आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ही रक्कम मार्चमध्ये वेगवेगळ्या योजनांखाली प्राप्त झाली होती. परंतु ती सलग पडून राहिली नव्हती. दिनांक २७ जून २०१२ रोजी १० कोटी रुपये हस्तांतर योजनेचे आणि त्याच तारखेला अधिग्रहण योजनेचे १ कोटी रुपये असे ११ कोटी रुपये जिल्हा परिषदेला परत पाठविलेले आहेत. १५ कोटी रुपये ॲव्हरेज शिल्लक होते. एखाद्या योजनेची रक्कम दोन आर्थिक वर्षासाठी वापरता येते. त्यातील काही रक्कम योजनांवर खर्च झाली. ज्या योजनांचा कालावधी संपला होता, त्या योजनांचा ११ कोटी रुपयांचा निधी परत पाठविलेला आहे.

जिल्हा परिषदेने सन २०११-२०१२ मध्ये शासन खाती २९ कोटी ३९ लाख रुपये भरलेले आहेत. २०१२-२०१३ मध्ये २४ कोटी रुपये भरलेले आहेत. २०१३-२०१४ मध्ये २८ कोटी रुपये व २०१४-२०१५ मध्ये ७ कोटी ७९ लाख रुपये भरलेले आहेत या अखर्चित रकमा होत्या.

समितीने यावर पृच्छा केली की, २०११-२०१२ अखेर सर्व योजनांचे १५ कोटी ५९ लाख रुपये शिल्लक आहे. अखर्चित दाखविलेली रक्कम कोणकोणत्या टप्प्यावर अखर्चिक राहिली आहे, याचे कॅलक्युलेशन करण्यात यावे. त्यामध्ये तथ्य आढळते

का ते पहाणे आवश्यक आहे. रक्कम खर्च करण्यास दोन वर्ष परवानगी असते. दोन वर्षानंतर शिल्लक राहिलेल्या रक्कमेवर व्याज मिळायला पाहिजे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस पुन्हा विषद केले की, पंचायत समितीने २७ जून नंतर ११ कोटी रुपये जिल्हा परिषदेला परत केलेली आहे. अखर्चिक रक्कम त्या योजनांची असते. ती रक्कम पंचायत समितीला त्यांच्या स्तरावर गुंतवता येत नाही. त्यामुळे मार्च महिना संपल्यानंतर त्यांनी उर्वरित रक्कम परत केलेली आहे. सर्व अकाऊंट क्लोज झाल्यानंतर योजनानिहाय प्राप्त रक्कम किती, अखर्चित रक्कम किती व त्यातील शिल्लक रक्कम किती आहे, हे पाहून त्यांना खर्च करता येत नसलेला ११ कोटींचा निधी पंचायत समितीने जिल्हा परिषदेला परत केलेला आहे. जिल्हा परिषदेने २०१२-२०१३ मध्ये २४ कोटी ९५ लाख रुपये शासन खाती जमा केलेले आहेत.

समितीने असे प्रतिपादन केले की, यासंदर्भात असा नियम आहे की, पंचायत समितीने जेवढी रक्कम पाहिजे आहे, ती ठेवून इतर रक्कम तातडीने परत करायची असते. ती रक्कम ठेवता येत नाही. पंचायत समितीचे खर्चाचे नियोजन असते. त्यामुळे उर्वरित रक्कम परत पाठवणे आवश्यक होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ही रक्कम वेगवेगळ्या योजनांची आहे. त्यामध्ये पंचायत समितीचे डिपॉझीट ७१ लाख रुपयांचे होते. त्यामध्ये प्रसुतीगृह बांधकामाचा निधी २० लाख रुपयांचा आहे. दलित वस्ती सुधार योजनेचा निधी २० लाख रुपयांचा आहे. असा वेगवेगळ्या योजनांचा निधी आहे. पंचायती राज समितीच्या निदेशानुसार आम्ही पूर्ण पंचायत समितीचा ड्राईव्ह घेतला. त्यामध्ये ५२ कोटी रुपये परत घेतले. आता १ रुपयाचाही निधी अखर्चिक नाही.

यावर समितीने निदेश दिले की, ती रक्कम खर्च करण्याकरिता असलेली मुदत संपल्यानंतर परत घेतली होती काय, ती रक्कम परत घेतल्याबद्दल औरंगाबाद जिल्हा परिषद अभिनंदनास पात्र आहे. परंतु ती रक्कम दोन वर्षानंतर परत घेतली असेल तर ते अयोग्य आहे. रकमा परत केव्हा घेतल्या त्यासंदर्भात वर्षनिहाय माहिती सादर करावी.व्याजाच्या झालेल्या नुकसानीची पुनर्तपासणी करावी यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत पुनर्तपासणी करुन अहवाल सादर करण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत पंचायत समिती, वैजापुरच्या सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालात पंचायत समितीकडे विविध योजनांच्या रोखकिर्द व बँक खात्यामध्ये अनावश्यकरित्या रक्कमा पडुन असल्याचा तसेच त्यावरील अनुज्ञेय असलेल्या रु.१,१७,९९,०६२/- व्याजास मुकावे लागले असा आक्षेप घेण्यात आला.

स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालयाच्या आक्षेपाप्रमाणे शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रं.जिपनि/२००९/प्र.क्र.५०१९/वित्त-३ दिनांक १० जुन, २००९ (**परिशिष्ट १५.१**) मधील परिच्छेद क्र.२ नुसार “विविध योजनांवरील निधीच्या अल्प गुंतवणुकीव्दारे प्राप्त होणारी व्याजाची रक्कम ही जिल्हा परिषद उत्पन्नाची बाब समजण्यात येवून जिल्हा परिषदेच्या स्व-उत्पन्नाच्या अर्थसंकल्पात ५-व्याज (२) शिल्लक रक्कमेच्या गुंतवणुकीवरील व्याज (अल्प मुदत) (अ) अल्पमुदतीत गुंतवलेल्या रक्कमेवरील व्याज या लेखाशिर्षाखाली जमा दाखवावे व त्या रक्कमेचा विनियोग हा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार जिल्हा यादीमध्ये अंर्तभुत असलेल्या (पहिल्या अनुसुची) च्या नमुद बाबीवर करण्यात यावा.” सदरहू तरतुदीच्या अनुसार पंचायत समिती वैजापुरने रक्कम शिल्लक ठेवुन गुंतवणुक केलेली नाही. गुंतवणुक केली असती तर त्यावर वरीलप्रमाणे व्याजाचे नुकसान झाले नसते. वस्तुतः अखर्चित निधी अर्थसंकल्पात तरतूद आहे म्हणून ३१ मार्च पर्यंत निधी मुक्त करुन घेऊन तो शासनाच्या तिजोरीबाहेर ठेवण्याची प्रवृत्ती बळाऊ लागल्यामुळे अखर्चित रकमा शासन खाती जमा करण्याबाबत शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २६ सप्टेंबर, २००५ (**परिशिष्ट २.२**) व ६ जून, २००८ (**परिशिष्ट २.१**) अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे सर्व जिल्हा परिषदांनी तंतोतंत पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतू औरंगाबाद जिल्हा परिषदेने दिनांक १० जून, २००९ च्या शासन निर्णयाचे पालन केलेले नसल्यामुळे सुमारे १ कोटी १७ लक्ष रुपयांच्या व्याजास जिल्हा परिषदेला मुकावे लागले. सदरहू शासन निर्णयाप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत विकास कामांचा निधी वेळच्यावेळी उपयोगात आणणे आवश्यक होते. विकास कामे व विकास परियोजनांसाठी प्राप्त रकमा ह्या विकास विषयक कामांसाठी खर्च करण्यास अडचणी उद्भवणार नाहीत व वेळच्यावेळी त्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिल्यानंतरही रक्कम शिल्लक राहिल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा वित्तीय सल्ला घेऊन शिल्लक रकमांची अल्प मुदतीच्या ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्याबाबत आवश्यक ती दक्षता घेणे व त्यापासून मिळणारे व्याज शासन निर्णयातील सुचनांप्रमाणे खर्च करणे आवश्यक होते असे असतानाही समितीसमोर विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळीही जिल्हा परिषदांना बचत खात्यामध्ये रकमा गुंतवता येत नसल्याची माहिती समितीस देण्यात आली, याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते.

शासनाच्या विविध योजनांकरीता जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना प्राप्त झालेला निधी त्यांनी घालून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे खर्च करणे बंधनकारक आहे. परंतू काही कारणास्तव निधी अखर्चित राहिल्यास तो जिल्हा परिषदांना केवळ चालू खात्यामध्ये ठेवता येतो परंतू त्यावर बचत खात्याप्रमाणे व्याज मिळत नाही. व्याज मिळाले तरी अशा प्रकारच्या व्याजाचा वापर जिल्हा परिषदांना स्व-उत्पन्न म्हणून वापरण्याची कायद्याने परवानगी नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली. याचा अर्थ सन २०११-२०१२ या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल वर्षातील संबंधित अधिका-यांनाच नव्हे तर विद्यमान अधिका-यांना देखील दिनांक १० जून, २००९ रोजीच्या शासन निर्णयातील आदेशाबाबत पूर्णपणे माहिती नाही. तसेच शासन स्तरावरुन शासन निर्णय निर्गमित केले जातात परंतू या शासन निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याबाबत मंत्रालयीन स्तरावर उदासिनता आढळते. जिल्हा परिषदांना अशा रकमा गुंतविण्याचे अधिकार आहेत व त्यावरील व्याज हे त्या जिल्हा परिषदेचे स्व-उत्पन्न म्हणून गणले जाते. परंतू केवळ अज्ञानापोटी १ कोटी १७ लक्ष रुपयांच्या व्याजाच्या रकमेस जिल्हा परिषदांना मुकावे लागले. **स्थानिक स्वराज्य संस्था या आर्थिकदृष्टया बळकट होण्याकरीता जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांकडे विविध योजनांवरील अखर्चित निधी वाढीव व्याजाकरीता गुंतविण्याचे अधिकार जिल्हा परिषद स्तरावर दिनांक ६ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे देण्यात येवूनही सदरहू शासन निर्णयाचा उद्देश सफल होऊ शकला नाही. औरंगाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत काही पंचायत समित्यांमध्ये अशी परिस्थिती असेल तर संपूर्ण राज्यात अशा प्रकारच्या अखर्चित रकमा अल्प मुदतीत गुंतवणूक करण्याबाबतच्या आदेशाच्या अंमलबजावणीसंदर्भात मागील पाच वर्षांचा आढावा शासनाने घ्यावा व किती जिल्हा परिषदांमध्ये शासन निर्णयाचे पालन झाले व किती जिल्हा परिषदांमध्ये झालेले नाही याची वर्षनिहाय सकारण माहिती विवरणपत्रामध्ये भरुन तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे. तसेच दिनांक १० जून, २००९ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी यापुढील कालावधीमध्ये करण्याकरीता सर्व जिल्हा परिषदांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे अवगत करुन देण्यात यावे, अशीही समितीची शिफारस आहे.**

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली असता पंचायत समित्यांनी ३१ मार्च पुर्वी त्यांच्याकडे असलेला अखर्चित निधी जिल्हा परिषदेकडे जमा केलेला नसल्याबाबत सहाय्यक लेखा अधिकारी श्री.आर.एस.चव्हाण यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली असल्याबाबत समिती समाधान व्यक्त करते. संबंधित गटविकास अधिकारी श्रीमती.एस.एम. खिल्लारे यांचेवर जबाबदारी निश्चित करुन एक वेतनवाढ बंद करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांना सादर केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. संबंधित गट विकास अधिका-यांवरील जबाबदारी निश्चित करण्याची कारवाई शासनाने विहीत मुदतीत पूर्ण करावी. या प्रकरणात अखर्चित निधी व त्यावरील व्याजाचा विचार करता केवळ दोन अधिकारी कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करणे समितीला अनाकलनीय वाटते. यात आणखीही काही अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश असल्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल समितीसमोर सादर करण्याचे निदेश देऊनही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निदेशाचे पालन केले नाही. त्यामुळे नेमके किती अधिकारी या अखर्चित रक्कम ठेवण्यास व त्यावरील व्याज न मिळण्यास कारणीभूत आहेत याचा निश्चित उलगडा समितीसमोर होऊ शकला नाही. **केवळ दोन अधिका-यांवर कारवाई करुन उर्वरित दोषी अधिकारी/कर्मचारी यांना पाठीशी घालून त्यांचेवर कारवाई करण्याचे चौकशी अधिका-याने टाळले आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. प्रस्तुत प्रकरणात आणखी दोषी अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश आहे किंवा कसे याची पुन्हा चौकशी करुन त्यात दोषी आढळणा-या संबंधितांवर कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी. त्याचबरोबर सदरच्या रकमेचे संपूर्ण व्याज संबंधितांकडून वसूल करण्यात यावे व यापुढे याबाबीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून विभागाने सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रक निर्गमित करुन सूचित करावे व त्याबाबतचा अहवाल समितीकडे तीन महिन्यांच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चौतीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### जिल्हा परिषदेने लेखा परीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे

**परिच्छेद ३.८१२/४३ (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधिल कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परीक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परीक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो तरीसुध्दा लेखा परीक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाही.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात. संबंधित जिल्हापरिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आंत सादर करणे बाबत सुचित केले जाते तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करुन देऊन सुध्दा लेखा परीक्षणास असे अभिलेखे सादर करण्यासाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही.सदर बाब गंभिर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यां बाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | विभाग | ले.प.अहवालातील परि. क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ४३ | औरंगाबाद | सामान्य प्रशासन | २६ | —— |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदरहू परिच्छेदातील नमुद अभिप्रायानुसार सन २०११-१२ मध्ये ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखा परीक्षणांस उपलब्ध न केलेल्या ग्रामपंचायतींची संख्या सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे ४०२ आहे. सदरील ४०२ ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखा परीक्षणांस उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व संबंधीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना आदेशीत करण्यात आले. तत्कालीन अभिलेखे उपलब्ध करुन न देण्या-या व सद्यःस्थितीत कार्यरत ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांचेवर कार्यवाही न केल्याने संबंधित विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्या दि. ३०/०६/२०१५, १८/०९/२०१५ व २८/०९/२०१५ या दिनांकास आढावा बैठक घेण्यात आली.

तसेच गट विकास अधिकारी यांना दि.१/८/२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात येउन सदरील लेखा परीक्षण पुर्ण करणेबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.तदनंतर जबाबदार असलेल्या ग्रामपंचायतींचे तत्कालीन ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांना या कार्यालयाच्या कारणे दाखवा नोटीस जा.क्र. जिपऔ/१-पं/कावि-१५२९/४५२८/२०१५, दि.२९/ ०९/२०१५ अन्वये तामील करुन त्यांचे खुलासे मागविण्यात आले आहेत.

संबंधिताविरुध्द प्रशासकिय कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखा परीक्षणाने मागणी करुनही लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न करुन देण्याची कारणे काय आहेत तसेच अभिलेखे उपलब्ध न करुन देणा-या अधिकारी/ कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियमातील कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई का करण्यात आली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दिनांक ७-६-२०११, दिनांक ४-८-२०११ व दिनांक १८-११-२०११ या पत्रान्वये अभिलेखे लेखापरीक्षणासाठी मागणी करुनही ४०२ ग्रामपंचायतींनी अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. सदर ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणाचे घटक वर्ष १९८४-१९८५ ते २००६-२००७ या कालावधीतील आहेत. गट विकास अधिकारी यांच्याकडून अहवाल मागविला. त्यानुसार लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न करुन देणा-या ४०२ ग्रामपंचायतीपैकी १८५ ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण झाले असल्याचे गट विकास अधिकारी यांनी कळविले आहे. ७२ ग्रामपंचायतीचे अभिलेखे निरीक्षणासाठी उपलब्ध आहेत. सहाय्यक संचालक लेखा परीक्षण यांना या कार्यालयाचे दिनांक २३-९-२०१५ च्या पत्रान्वये अभिलेख्यासह निरीक्षणासाठी कळविण्यात आले आहे. उर्वरित १५० ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न करुन देणा-या १४२ ग्रामसेवकांपैकी १९ सेवानिवृत्त आहेत, २ बडतर्फ आहेत, ३१ मयत झाले आहेत. उर्वरित ग्रामसेवक यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे त्यांची तात्पुरत्या स्वरुपात एक वेतनवाढ रोखून शिस्तभंगाची कारवाई केलेली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, १८४ ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण पूर्ण झालेले आहे काय यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १८४ ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण पूर्ण झालेले असल्याचे समितीस विदित केले. तदनंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पुढे खुलासा केला की, सन २०११-२०१२ मधील परिच्छेद आहे. सन १९८४-१९८५ ते सन २००६-२००७ या कालावधीमधील रेकॉर्ड मागविण्यात आले होते. त्यावेळी अनेक ग्रामसेवकांच्या बदल्या झालेल्या असल्यामुळे नवीन ग्रामसेवकांना रेकॉर्ड मिळाले नाही. १८४ ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण झालेले आहे. ग्रामसेवक यांनी लेखापरीक्षणांसाठी अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे त्यांची तात्पुरत्या स्वरुपात एक वेतनवाढ रोखून शिस्तभंगाची कारवाई केलेली आहे. १५० ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न करुन देणा-या १४२ ग्रामसेवकांपैकी १९ सेवानिवृत्त आहेत, २ बडतर्फ आहेत, ३१ मयत झाले आहेत. सन २०१३-२०१४ मधील लेखापरीक्षण जवळपास पूर्ण झालेले आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**जिल्हा परिषदेने लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न करणे.**

(१) समितीने सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या लेख्यांवरिल लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता लेखा परिक्षणाचे वेळी मोठ्या प्रमाणावर लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न करुन दिल्याचे आक्षेप असुन या सर्व आक्षेपांवर संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या वर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० याच्या कलम ७ नुसार दंडात्मक कारवाई करुन त्या बाबतचा अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

(२) सदरहू संपूर्ण कामाची पाहणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी, संपूर्ण चौकशी करुन अहवाल सादर करावा असे निदेश समितीने दिले आहेत, त्यानुसार पाहणी व चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळुन आले आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन न दिलेल्या कर्मचा-यावरील केलेल्या कार्यवाहीचा तपशिल :**

| अ.क्र. (१) | परिच्छेद क्रमांक (२) | विभागाचे नाव (३) | दोषी अधिकारी कर्मचारी संख्या (४) | कार्यवाही केलेल्या कर्मचा-यांची संख्या (५) | पैकी वेतनवाढ स्थगित केलेली अधिकारी कर्मचारी संख्या (६) | पैकी रु. २५००० दंड केलेले अधिकारी कर्मचारी संख्या (७) | शेरा (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | समाजकल्याण विभाग | ३ | ३ | ० | ३ | सदर कर्मचा-यांवर रु. २५०००/- दंडाची कार्यवाही केली |
| २. | ३.८१२/४४ | सामान्य प्रशासन | ७ | ७ | ५ | २ | ५ कर्मचा-यांची १ वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली, २ कर्मचा-यांना रु. २५०००/- दंडाचे आदेश निर्गमित केले. वसुली होणे बाकी आहे. |
| ३. | ३.८१२/४६ | सिंचन/ ल.पा. विभाग | ५ | ४ | २ | २ | २ कर्मचा-यांची १ वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली व २ कर्मचा-यांना रु. २५०००/- दंडाचे आदेश देण्यात आले. वसुली होणे बाकी आहे. १ कर्मचा-याने कामाचे अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविले. |
| ४. | ३.८१२/४५ | शिक्षण (प्रा) | १ | १ | १ | ० | संबंधित मुख्याध्यापकांची १ वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | | आरोग्य विभाग | १ | १ | ० | १ | सदर कर्मचा-यास रु.२५०००/- दंडाचे आदेश देण्यात आले. रु.१२०००/- वसुल करण्यात आले आहे. उर्वरित वसुली सुरु आहे. |
| ६. | | महिला व बालकल्याण विभाग | २ | २ | ० | ० | २ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करणेबाबत प्रक्रिया सुरु आहे. |
| ७. | | बांधकाम विभाग | ३ | ३ | ० | ३ | सदर कर्मचा-यावर रु.२५०००/-दंडाची कार्यवाही केली. |
| ८. | ३.८१२/४३ | पंचायत विभाग | १४२ | ६० | ६० | ० | उर्वरित ८२ ग्रामसेवकांपैकी ४९ ग्रामसेवक सेवा निवृत्त व २ बडतर्फ तसेच ३१ ग्रामसेवक मयत झालेले आहेत. |
| ९. | | शिक्षण (मा.) विभाग | २ | १ | १ | ० | एक तत्कालिन शिक्षणअधिकारी श्रीमती काळुसे ह्या फेब्रुवारी, २०१० मध्ये सेवानिवृत्त झाल्याने दंडात्मक कार्यवाही करता आली नाही. संबंधित कनिष्ठ सहायक श्री. व्ही. बी. सोनवणे यांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली असून रु.२५०००/- दंड का आकारण्यात येवू नये याबाबत संबंधितांस कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. |

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**(अ)** सन २०११-१२ सिंचन विभागांतर्गत कार्यरत चार उप विभागात खालील प्रमाणे अभिलेखे दर्शविलेले नाहीत. त्यास्तव संबंधित कर्मचा-यांविरुध्द केलेली कार्यवाही खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. (१) | उपविभागाचे नाव (२) | अभिलेख्यांची संख्या (३) | केलेली कार्यवाही (४) |
|---|---|---|---|
| १. | सिंचन विभाग, औरंगाबाद | | श्री.संजय देविदासराव बोरुडे व सहायक (लेखा) यांची १ वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षासाठी बंद करण्यात आली आहे. (आदेश क्र.१०३०/११६३ दि.२/१०/२०१५) |
| २. | उपविभाग, औरंगाबाद | २३ | श्री.यु.एन.डांगे व सहायक याचे दरमहा रुपये १००० प्रमाणे २५ हप्त्यात रुपये २५०००/- निवृत्ती वेतनातून वसुल करण्यात येत आहे. (आदेश क्र.११६७/१०५८ दि.२९/९/२०१५) |
| ३. | उपविभाग, वैजापूर | २० | श्री.एम.डी.नाईकवाडी व सहायक यांचे दरमहा रुपये १००० प्रमाणे २५ हप्त्यात रुपये २५०००/- निवृत्ती वेतनातून वसुल करण्यात येत आहे. (आदेश क्र.११६६/१०५७ दि.२९/९/२०१५) |
| ४. | उपविभाग, सिल्लोड | २५ | श्री.बी.बी.फुलारे व सहायक यांची १ वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षासाठी बंद करण्यात आली आहे. (आदेश क्र. १०३०/१०५६ दि.२/१०/२०१५) |
| ५. | उपविभाग, कन्नड | ०२ | सदरील कामाचे अभिलेखे लेखा परिक्षणास दाखविण्यात आले आहेत. त्यामुळे कार्यवाही नाही. |

(३) अभिलेखे न दर्शविलेल्या एकूण ७० कामापैकी २६ कामाची पाहणी व चौकशी उपअभियंता व शाखा अभियंता यांच्या ३ समित्यांकडून करण्यात आली असून सदर कामे सुस्थितीत आहे.

**ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाचे अभिप्राय.**

(१) लेखापरिक्षणाचे वेळी कागदपत्रे उपलब्ध करुन न देणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबतचे सुधारित परिपत्रक क्र. पंरास २०१५/प्र.क्र.२८/वित्त-७, दि. ३० मार्च, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकातील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे.

(२) अभिलेखे न दर्शविलेल्या एकुण ७० कामापैकी २६ कामाची पाहणी व चौकशी उपअभियंता व शाखा अभियंता यांच्या ३ समित्याकडुन करण्यात आली असून सदर कामे सुस्थितीत आहेत. उर्वरित ४४ कामांबाबत पाहणी व चौकशी करुन तसा अहवाल शासनास सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना दिनांक १६/०५/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, यामध्ये लेखापरिक्षणाचे वेळी अभिलेखे सादर न केल्यामुळे ही कारवाई केल्याचे सांगितलेले आहे. त्यांची

वेतनवाढ थांबवून कार्यवाही करावी, असे समितीने निदेश दिले होते यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात कार्यवाही केलेली असल्याचे समितीस विदित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधिल कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परीक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते.त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परीक्षण सुरु  झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो तरीसुध्दा लेखा परीक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात. संबंधित जिल्हापरिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आंत सादर करणे बाबत सुचित केले जाते तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करुन देऊन सुध्दा लेखा परीक्षणास असे अभिलेखे सादर करण्यासाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाब गंभीर स्वरुपाची आहे.

एखाद्या जिल्ह्यातील ४४० पेक्षा जास्त ग्रामपंचायतींमधील अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध होत नाहीत ही बाब खरोखरच चिंता करावयास लावणारी आहे. लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात दरवर्षी याबाबत प्रकरणे खर्ची घातलेली असतात. शासनाकडून वेळोवेळी आदेश, परिपत्रके, शासन निर्णय इत्यादीद्वारे पाठपुरावा केला जावून ही माहिती व तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध होत नाहीत याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

**याप्रकरणी ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी लेखा परिक्षणाचेवेळी कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा सर्व अधिकारी/कर्मचा-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंडाची शास्ती करणे आवश्यक आहे व तशी शास्ती केल्याचे विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला सांगण्यात आले. तथापि, भेटीच्या वेळी समितीने अभिलेखे उपलब्ध करुन न देण्या-या अधिका-यांवर दंडात्मक कारवाई, त्याची एक तात्पुरती वेतनवाढ रोखणे व तशा प्रकारची त्यांच्या सेवा पुस्तीकेत नोंद घेण्यात यावी व त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात यावा असे निदेश दिले होते. परंतू मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत सर्वंकष कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविला नाही त्याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते. जर याप्रकरणी कार्यवाही केली नसेल तर ती त्वरेने करावी व सर्वसंबंधीतांवर समितीने निदेश दिल्याप्रमाणे दंडात्मक कारवाई, एक तात्पुरती वेतन वाढ रोखणे व सेवा पुस्तिकेत नोंद घेणे अशा प्रकारची कारवाई करुन त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पस्तीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### १०० टक्के अनुदानावर समाजकल्याण विभागतर्फे लॅपटॉप पुरवठा करणे अनियमितताबाबत

### (पंचायत समिती गंगापुर)

**परिच्छेद ४.३३१/६०७ (सन २०११-१२)**

सन २०११.१२ (परिच्छेद क्रं.५) या योजनेअंतर्गत लॅपटॉप खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक १/३-१२ रुपये २०००००/- खर्च केला याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) पंचायत समितीने ठराव क्रं १४ दि.१७/१२/२०११ अन्वये ठरावात संगणक घेणेबाबत शिफारस केलेली असतांना लॅपटॉप खरेदी केले आहेत.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रं.१०८४/आर/४६३७/५७ दिनांक १९/०१/१९८५ नुसार लाभर्थ्याचा लोकवाटा जमा झाल्याशिवाय साहित्य पुरवठा आदेश देण्यात येऊ नये असतांना लोकवाटा वसुल न करता आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र.मागास/१९०८/७३/३४/ दिनांक २०/१०/१९९९ अन्वये व सुधारित परिपत्रक व महाराष्ट्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेड पी.पु/२००८/प्र.क्र.४४६/वित्त/९ दिनांक २०/०६/२००८ च्या परिशिष्ट (इ) नुसार वेळापत्रकाचे पालन केले नाही.

(४) शासनाचा दर करार हा ए.सी.ई.आर.कंपनीसी आहे. लॅपटॉप खरेदी पुजा कॉम्प्युटर वाळुज यांच्या कडुन करण्यात आल्याने कंपनीचे अधिकृत पुरवठाधारकाकडुन खरेदी केली नाही.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३ (३) अन्वये साहित्याबाबत दर्जात्मक व गुणात्मक बाबीची चाचणी प्रमाणपत्र सादर केले नाही.

(६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र.मागास/१०९३/प्र.क.१२३९/३४ दिनांक ०१/०९/९३ नुसार पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

(७) शासन निर्णय क्र.झेडपी/९००७/४५४/प्र.क्र.५१/पंस-१दिनांक १९/१२/२००७ अन्वये महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत राबवावयाच्या योजनेत सादर योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही.

(८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता अधिनियम १९६१ चे कलम १०१ चे पालन केले नसुन महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास विभाग जीपीआर.१०८८/सीआर/८९६/३०/दि. २६/१०/८९ नुसार वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्या वर्षात त्याचा विनियोग केलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती गंगापुर यांना सन २०११-१२ मध्ये पंचायत समितीच्या स्वतच्या उत्पन्नामतुन पंचायत समिती उपकर निधीमधुन ९५ टक्के अनुदानावर लेखाशिर्ष १४ समाज कल्याण योजने अंतर्गत मागास वर्गीयांना लॅपटॉप वाटपा बातची योजना राबविण्यात आलेली आहे. सदर परिच्छेदाचे अनुषंगाने खालील प्रमाणे मुद्येनिहाय अनुपालन सादर करण्यात येत आहे.

(१) दि.१७/१२/२०११ रोजी पंचायत समिती गंगापुर सर्वसाधारण सभा ठराव क्रं.१४ अन्वये संगणक खरेदी बाबत मंजुरी घेण्यात आली असुन लॅपटॉप खरेदी करुन मागासवर्गीयांना वाटप करण्यात आलेली आहे.

(२) सदरील योजना ही ९५ टक्के अनुदानावर राबविण्यात आलेली असुन ५ टक्के लाभार्थी हिस्सा वसुली करुन नंतरच लाभर्थ्याना हिस्सा वसुली करुन नंतरच लाभार्थ्यांना लाभ देयात आला आहे. मंजुर ६ लाभर्थ्याकडुन लाभर्थी हिस्सा ५ टक्के प्रमाणे रुपये १६७३/- लाभार्थी हिस्सा एकुण रक्क्म रुपये १००३८/- वसुल करण्यात आले आहे.

(३) पंचायत समितीचे स्वतःचे उत्पन्नाचे स्त्रोत पंचायत समिती उपकर अनुदान, वाढीव उपकर अनुदान,स्थानिक उपकर सापक्ष अनुदान ई.उत्पन्नाचे स्त्रोत असुन सदरील अनुदान हे वर्ष अखेर प्राप्त होत असल्याने तसेच किती निधी प्राप्त होईल यांचा अचुक अंदाज येत नसल्याने शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविणे शक्य झाले नाही. भविष्यात याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे.

(४) शासनाचा दर करार हा ए.सी.ई.आर.कंपनीशी आहे. पुजा कॉम्प्युटर वाळुज हे कंपनीचे अधिकृत डिलर असल्यामुळे लॅपटॉप पुजा काम्प्युटर वाळुज यांच्याकडुन खरेदी करण्यात आलेली आहे.

(५) सदरील खरेदी ही शासनाचा दर करारानुसार करण्यात आल्याने साहित्याबाबत चाचणी शासन दर करार प्रक्रियेच्या दरम्यान होत असल्याने वेगळयाने प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

(६) समाजकल्याण योजने अंतर्गत लॅपटॉप वाटप योजना ही प्रथमच घेण्यात आलेली असुन निवड केलेल्या लाभार्थीना प्रथमच लाभ देण्यात आलेला असुन त्याची मास्टर नोंदवहीत नोंद घेण्यात आलेली आहे.

(७) ग्रामीण भागातील (एम.एस.सी.आय.टी.) प्रशिक्षणाव्दारे संगणकिय ज्ञान मिळविलेल्या विद्यार्थ्यांना रोजगाराची तसेच स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेत ठराव पारित केल्यानुसार सदर योजना राबविण्यात आलेली आहे. यापुढे सदर शासन निर्णयात नमुद केलेल्या योजनेतुनच योजनेची निवड करुन योजना राबविणे बाबत दक्षता घेण्यात आली आहे.

(८) सदरील योजने अंतर्गतची खरेदी प्रक्रिया ही त्याच वर्षात केलेली असुन खरेदी केलेले लॅपटॉप मंजुर लाभार्थीना वाटप करण्यात आलेले आहे. वाटपाबाबतची यादी या सोबत अवलोकनास्तव सादर करण्यात येत आहे. संबंधीत लाभार्थीना लॅपटॉप विहित कालावधीत उचल करण्याबाबत अवगत करण्यात आलेले होते परंतु पुरेसा वेळ न मिळाल्यामुळे सदर योजना त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप करणे शक्य झालेले नाही यापुढे त्याच आर्थीक वर्षात योजना अंतिम करण्याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे. साहित्य वापराबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आलेले असुन संचिकेस संलग्न आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, गंगापूर यांच्या ठरावानुसार संगणक खरेदीसाठी मंजुरी दिलेली असताना लॅपटॉप कोणत्या प्राधिकारान्वये खरेदी करण्यात आले, यावर गटविकास अधिकारी, गंगापूर यांनी समितीस विदीत केले की, दिनांक १७/१२/२०११ रोजी पंचायत समिती गंगापूर यांनी ठराव क्रमांक १४ अन्वये संगणक खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता, त्यानुसार लॅपटॉप वाटप करण्यात आले आहे.

समितीने पुढे आणखी विचारणा केली की, लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असताना सहाच लाभार्थ्यांची संख्या कशी निश्चित केली, त्यांची निवड प्रक्रिया कशी केली. यावर गटविकास अधिकारी यांनी खुलासा केला की, श्री.नितीन रोडगे, श्री.नंदू सुतार, श्री.मधुकर खरात, श्री.प्रदीप किशोर, श्री.केतनकुमार तुपे, श्री.वगरे, श्रीमती अनिता जाधव, श्रीमती निर्मला रोडगे, श्रीमती अर्चना रावडे, हे विद्यार्थी एमएससीआयटी पास झालेले होते. समितीने ठरविले त्याप्रमाणे या लाभार्थ्यांची निवड केलेली आहे. त्यांचे एमएससीआयटी प्रशिक्षण झाल्याने पंचायत समितीने असा निर्णय घेतलेला आहे. समाजकल्याण मधून ६ आणि महिला व बालकल्याण मधून ३ लाभार्थी निवडले आहेत. पंचायत समितीच्या निधीतून समाजकल्याण विभागासाठी हा निधी दिला होता.

समितीने पुढे विचारणा केली की, तत्कालीन गट विकास अधिकारी कोण होते, अशा प्रकारची योजना राबवायची असेल तर त्यासाठी निकष ठरविले पाहिजे. यापुढे गट विकास अधिका-यांनी योजना राबविण्यापूर्वी आपले अभिप्राय नोंदविले पाहिजेत. त्यावेळी गट विकास अधिका-यांनी काय सल्ला दिला होता ते दाखविणे आवश्यक आहे. ही योजना राबविलेली आहे ही योग्य आहे काय, महिलांच्या कल्याणासाठी १० टक्के निधी खर्च केला जातो काय, कोणकोणत्या बाबींसाठी खर्च करावा, त्यामध्ये लॅपटॉप आहे काय, याची आपण चौकशी करावी. लाभार्थ्यांचे निकष/पात्रता शासन निर्णयाप्रमाणे असली पाहिजे. ५ टक्के लाभार्थी हिस्सा वसुल करण्यात आला आहे काय, लॅपटॉपचा देण्याचा निर्णय समितीने घेतला असेल तर त्यावेळी गट विकास अधिका-यांनी आपले अभिप्राय नोंदविले आहेत का यावर तत्कालीन गट विकास अधिका-यांनी आपले अभिप्राय नोंदविलेले नाहीत असे दिसून येते असा खुलासा गटविकास अधिकारी यांनी केला. समितीच्या मते अशा प्रकारे लॅपटॉप देता येत नाहीत, अशा

प्रकारची नियमामध्ये तरतूद नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या प्रकरणाची चौकशी करावी आणि नियमबाह्य रक्कम खर्च केली असेल तर तत्कालीन गट विकास अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करावी आणि एक महिन्यात अहवाल समितीला पाठविण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सदरहू प्रकरण संगणक/लॅपटॉप वाटपाची योजना राबविण्यासाठी निकष ठरविणे आवश्यक असून योजना राबविण्यापूर्वी गट विकास अधिका-यांनी त्यावर आपले अभिप्राय नोंदविणे आवश्यक होते. तसेच लाभार्थ्यांची संख्या जास्त असतानाही केवळ ९ लाभार्थी कोणत्या निकषावर निवडण्यात आले. महिलांच्या कल्याण साठीचा व मागासवर्गीयांसाठीचा निधी खर्च करण्याच्या नियमांचे पालन प्रस्तुत प्रकरणी केले नसल्याचे समितीस आढळून आले असता समितीने प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन तत्कालीन गट विकास अधिका-यावर जबाबदारी निश्चित करुन अहवाल पाठविण्याचे आदेश दिले आहे. त्यानुसार चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले.

(२) महिलांच्या कल्याणाकरिता १० टक्के व मागासवर्गीयांच्या कल्याणासाठीचा २० टक्के निधी तसेच अपंगाकरिता ३ टक्के निधी नियमानुसार खर्च होण्याकरिता शासनाने कोणती उपाय योजना केली आहे.

**उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) प्रकरणात गट विकास अधिकारी पंचायत समिती, गंगापूर यांची चौकशी अधिकारी म्हणून कार्यालयाचे पत्र दि. १८/१२/२०१५ अन्वये नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार गट विकास अधिकारी पंचायत समिती, गंगापूर यांनी प्रकरणात चौकशी करुन चौकशी अहवाल त्यांचे पत्र क्र. ३६४७/२०१५ दि.२३/१२/२०१५ अन्वये सादर केला आहे. त्यानुसार खालील बाबी आढळुन आलेली आहेत.

१. शा.नि.ग्रा.वि.व. ज.स. विभाग क्र. १०९१/प्र.क्र. ७३/३४ दिनांक २०.१०.१९९९ मध्ये लॅपटॉप योजनेचा समावेश नसतानाही व नियमानुसार वरिष्ठ कार्यालयाची योजना राबविण्याबाबत परवानगी घेतलेली नाही.

२. योजना तयार करताना लाभार्थी पात्रतेबाबत निश्चित निकष ठरवलेले नाही.

३. प्राप्त साहित्याची गुणवत्ता चाचणी केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन गट विकास अधिकारी श्री.खोमणे यांनी नियमाचे पालन न केल्याने दोषी असल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधितांस दि. ९/५/२०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येवून खुलासा मागविण्यात आला आहे. संबंधिताचा खुलासा प्राप्त होताच सदरील प्रकरणात श्री. खोमणे यांची या स्तरावरुन विभागीय चौकशीसाठी दोषारोप पत्र १ ते ४ मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या मार्फत शासनास सादर करण्यात येईल.

(२) महिला व बाल कल्याण विभागाच्या प्राप्त १० टक्के निधी मधुन खर्च करण्यात आला आहे. वित्त विभागाने दिलेल्या माहिती नुसार मागील वर्षामध्ये कोणताही अनुशेष शिल्लक नाही.

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठीचा २० टक्के निधी तसेच अपंगाकरीता ३ टक्के निधी नियमानुसारच खर्च होण्याकरीता शासन निर्णय दिनांक २०.१०.१९९९ अन्वये समाज कल्याण विषय समितीच्या मान्यतेने योजनांचे नियोजन करुन शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विभागामार्फत योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.

**उपरोक्त संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य व महिला व बालविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) समाज कल्याण विभागातर्फे १००% अनुदानावर लॅपटॉप पुरवठा करणेबाबत झालेल्या अनियमितता या प्रकरणात गट विकास अधिकारी पंचायत समिती, गंगापूर यांनी चौकशी अधिकारी म्हणून चौकशी केली आहे. सदर चौकशीमध्ये गट विकास अधिकारी श्री. खोमणे हे दोषी असल्याचे आढळून आले. चौकशी अहवालाच्या अधिन राहून त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. श्री. खोमणे हे या प्रकरणात दोषी असल्याने सदरील प्रकरणात विभागीय चौकशी (दोषारोप पत्र १ ते ४) विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेमार्फत शासनास सादर करण्यात आल्यावर शासनस्तरावरुन आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) महिलांच्या कल्याणाकरीता जिल्हा परिषद अंतर्गत महिला व बाल कल्याण समितीमार्फत जिल्हा परिषद उत्पन्नाच्या १०% निधीमधुन शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१३/प्र.क्र.७६/पंरा-१, दि. २४ जानेवारी, २०१४ नुसार विविध योजना राबविण्यात येत असून प्रस्तुत निर्णयान्वये महिलांना व मुलींना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी विविध योजनांना मान्यता दिली आहे व त्याअनुषंगाने होणारा खर्च कसा करावा याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मागासवर्गीयांच्या कल्याणाकरीता असलेला २०% निधी तसेच अपंगांच्या कल्याणाचा ३% निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय दि. २०/१०/१९९९ व दि. १५/०७/२०१५ नुसार विहीत पध्दतीचा अवलंब करुन, विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्द्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरण संगणक/लॅपटॉप वाटपाची योजना राबविण्यासाठी निकष ठरविणे आवश्यक असून योजना राबविण्यापूर्वी गट विकास अधिका-यांनी त्यावर आपले अभिप्राय नोंदविणे आवश्यक होते. तसेच लाभार्थ्यांची संख्या जास्त असतानाही केवळ ९ लाभार्थी कोणत्या निकषावर निवडण्यात आले, महिलांच्या कल्याणासाठीचा व मागासवर्गीयांसाठीचा निधी खर्च करण्याच्या नियमाचे पालन प्रस्तुत प्रकरणी केले नसल्याचे समितीस आढळून आले असता समितीने प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन गटविकास अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन अहवाल पाठविण्याचे आदेश दिले आहेत, त्यानुसार चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले. यावर विभागीय सचिवांनी विदीत केले की, या प्रकरणाचे दोन भाग आहेत. लॅपटॉप संदर्भात मूळ जीआर ग्रामविकास विभागाचा आहे. समाजकल्याणासाठी जो निधी होता त्यामधून कार्यक्रम घेण्यात आला होता, त्यामध्ये अनियमितता झाली. त्याबद्दल ग्रामविकास विभागाचे प्रतिनिधी उत्तर देतील. दुसरा भाग १० टक्के निधी महिला व बालकल्याणासाठी राखीव ठेवण्याबाबतचा होता. या संदर्भातील मूळ जीआर ग्रामविकास विभागाचा आहे. ग्रामविकास विभागाने त्याची अंमलबजावणी निश्चित करावी.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायत समिती, गंगापूर येथे १०० टक्के अनुदानावर समाजकल्याण विभागतर्फे लॅपटॉप पुरवठा करण्याच्या कामात अनियमितता झाल्याबाबत लेखापरीक्षकांनी आक्षेप उपस्थित केले. या योजनेअंतर्गत लॅपटॉप खरेदीसाठी रुपये २,००,०००/- खर्च करण्यात आला. प्रामुख्याने पंचायत समितीने संगणक घेणेबाबत शिफारस केलेली असतांना लॅपटॉप खरेदी करणे दिनांक १९/०१/१९८५ च्या शासन निर्णयानुसार लाभर्थ्याचा लोकवाटा जमा झाल्याशिवाय साहित्य पुरवठा आदेश देणे, दिनांक २०/१०/१९९९ च्या शासन निर्णयानुसार व दिनांक २०/०६/२००८ च्या परिशिष्ट (इ) नुसार वेळापत्रकाचे पालन न करणे, अधिकृत पुरवठाधारकाकडून खरेदी न करणे, लॅपटॉपच्या दर्जात्मक व गुणात्मक बाबीची चाचणी प्रमाणपत्र सादर न करणे, पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही नसणे, विशेषतः महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत राबवावयाच्या योजनेत सादर योजनेचा समावेश करण्यात आलेला नसतानाही पंचायत समितीने खरेदी केलेली आहे.

या आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद नांदेडकडून पंचायत समिती, गंगापूर सर्वसाधारण सभा ठरावाअन्वये संगणक खरेदी बाबत मंजुरी घेण्यात आली असून लॅपटॉप खरेदी करुन मागासवर्गीयांना वाटप करण्यात आलेली असल्याचे सांगण्यात आले. तसेच लाभार्थी हिस्सा रुपये १०,०३८/- रुपये वसुल करण्यात आले असून पंचायत समितीचे स्वःउत्पन्नाचा अचूक नसल्यामुळे वेळापत्रकाचे पालन झाले नसल्याचे व यापुढील काळात याबाबत दक्षता घेत असल्याचे समितीस सांगण्यात आले. सदरहू प्रकरणी लाभार्थ्यांची निवड कोणत्या निकषावर केली व महिलांच्या कल्याणाकरीताचा १०% निधी व मागासवर्गीयांच्या कल्याणासाठीचा २०% निधी लॅपटॉप खरेदी करण्याकरीता नियमात तरतूद नसल्याबाबत विभागाकडून समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. एम.एस.सी.आय.टी. परीक्षा पास केल्यामुळे समाजकल्याण विभागामार्फत ६ व महिला व बालकल्याण मधून ३ लाभार्थ्यांना लॅपटॉप देण्यात आले. या ९ लाभार्थ्यांची निवड कशी केली हा प्रश्न शेवटी अनुत्तरीतच राहतो.

समितीने निदेशित केल्यानुसार उक्त प्रकरणाची गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांनी चौकशी केली असून ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दिनांक २०-१०-१९९९ मध्ये लॅपटॉप योजनेचा समावेश नसतानाही व नियमानुसार वरिष्ठ कार्यालयाची योजना राबविण्याबाबत परवानगी न घेणे, योजना तयार करताना लाभार्थी पात्रतेबाबत निश्चित निकष

ठरवणे, प्राप्त साहित्याची गुणवत्ता चाचणी केलेली नसल्यामुळे तत्कालीन गट विकास अधिकारी, श्री.खोमणे हे दोषी आढळले आहेत. **श्री. खोमणे यांना दिनांक ९ मे, २०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येवूनही त्यांनी अद्याप आपला खुलासा सादर केलेला नसल्याप्रकरणी समिती नापसंती व्यक्त करते. सदरहू अधिका-याचा खुलासा प्राप्त करुन घेऊन विभागीय चौकशीची कारवाई विहीत मुदतीत पूर्ण करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस सहा महिन्याच्या आत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

९५% अनुदानावर लॅपटॉप वाटपाबाबतची योजना समाजकल्याणच्या २०% व महिला बालकल्याणच्या १०% संदर्भातील शासन निर्णयांमध्ये समावेश नसताना सदरहू योजना राबविण्यात आली असून या योजनेचा लाभ ६ मागासवर्गीय व्यक्तींना व ३ महिलांना झाला असल्याबाबत समिती साशंक आहे. कदाचित मागासवर्गीय व्यक्तींच्या व महिलांच्या नावावर दुस-याच व्यक्तींनी लॅपटॉप बळकाविल्याची शक्यता नाकारता येत नाही आणि त्यामुळेच समितीने विभागीय सचिवांच्या साक्षीकरीता विचारणा करुनही यासंदर्भातील माहिती समितीस प्राप्त झालेली नाही. लॅपटॉपचे वितरण ज्या लाभार्थ्यांना केले आहे त्या लाभार्थ्यांकडे तरी हे लॅपटॉप वापरात आहेत किंवा नाही याचीही चौकशी होणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. **संगणकाची/लॅपटॉपची किंमत पाहता पंचायत समित्यांकडे उपलब्ध असलेला स्वःनिधी व त्या स्वःनिधीच्या अनुक्रमे २० व १० टक्केमधून हाती येणारी अर्थसंकल्पीय तरतूद पाहता बोटावर मोजता येईल एवढ्याच लाभार्थ्यांस लाभ देता येतो. तरी विभागाने अशा प्रकारच्या अव्यवहार्य वैयक्तिक लाभाच्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी राबविताना जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ कोणत्या योजनेद्वारे देता येईल त्यादृष्टीने विचार करुन तशा प्रकारच्या योजना राबविण्याबाबत जिल्हा परिषद/पंचायत समितीला अवगत करावे, अशा प्रकरणी शासन निर्णयाचे तंतोतंत पालन करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण छत्तीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणी खु. ता.वैजापुर इमारतीस संरक्षण भिंत बांधकामाबाबत

**परिच्छेद ३.२८१/१३० (सन २००८-०९)**

प्राथमिक आरोग्य केंद्र लोणी खु. १२ वा वित्त आयोगा अंर्तगत सदर कामास अदांजपत्रकीय रुपये १२४६८२०/- असुन कामावर १११८५९० खर्च झालेला आहे याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) सदरील कामासाठी प्रशासकीय मान्यता मुख्य इमारत बांधकाम संरक्षक भिंत स्वच्छतागृह सुविधा, विद्युतीकरणासह रक्कम रुपये ५७,४०,०००/- ला देण्यात आली. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक २७ एप्रिल २००० व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता अधिनियम, १९६८ परिशिष्ट ४ नियम ५ (४) नुसार शासनाचे पुर्व परवानगी शिवाय कामाचे तुकडे पाडण्यात येवु नये. असे असतांना केवळ संरक्षण भिंत बांधकामासाठी स्वंतत्र ठेकेदार नेमण्यात आलेला आहे.

(२) मोजमाप पुस्तीका पान क्र. १ वरील नोंदीनुसार दिनांक ०४-०६-२००८ रोजी काम केल्याच्या नोंदी आहेत कामाचे आदेश १९-०७-२००८ रोजी दिले असल्याने कामाचे आदेशापुर्वीच काम सुरु करण्यात आलेले आहेत.

(३) कामाचे अंदाजपत्रक जिल्हा दर सुची सन २००६-२००७ नुसार तयार केले प्रशासकीय मान्यता सन २००६-२००७ मध्ये व तांत्रिक मान्यता २००७-२००८ मध्ये घेण्यात आलेली असतांना दरपृथ्थकरण सन २००७-२००८ नुसार घेण्यात आलेले आहे. (सन २००७-०८ ची दरसुची दि. ०३ ऑगस्ट २००८ पासुन लागु करण्यात आलेली आहे) त्यामुळे जादा झालेल्या अदायीची गणना करुन वसुली होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :-**

सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात वैजापुर तालुक्यात मौजे लोणी येथील प्रा. आरोग्य केंद्राची इमारत संरक्षण भिंत बांधकाम घेण्यात आले होते.

(१) मा.अधिक्षक अभियंता यांची तांत्रिक मान्यता दिल्यानुसार पहिल्या टप्प्यात मुख्य इमारतीचे कामाची निविदा करण्यात आली व तदनंतर संरक्षण भिंत या कामाची निविदा करुन काम करण्यात आले.

(२) सदरील कामाचे आदेश १९-७-२००८ रोजी निर्गमित करण्यात आले होते. व अनावधाने मोजमाप पुस्तीकेत दिनांक ०४-०६-२००८ नोंदविण्यात आले होते त्यात सुधारणा करुन दिनांक २०-०७-२००८ करण्यात आली आहे.प्रथम धावते दिनांक ०५-०८-२००८ रोजी देण्यात आले होते सबब शाखा अभियंता यांना त्याबाबत दिनांक ०१-१०-२०१५ अन्वये ताकीद देण्यात आली आहे सोबत प्रत- अवलोकनास्तव सादर.

(३) सदर कामाची प्रशासकीय मंजूरी जिल्हा दर सुची २००६-२००७ प्रमाणे देण्यात आली होती तांत्रिक मान्यता जिल्हा दर सुची २००७-२००८ प्रमाणे देण्यात आले आहे. सदरील प्रशासकीय मान्यतेचे अधिन राहुन मुल्यांकन झालेले आहे. व तांत्रिक मान्यतेच्या मर्यादेतच अदायगी झालेली आहे. त्यामुळे जास्तीची वसुली करण्यात आली नाही. तसेच जिल्हा दर सुची दि ०३-०८-२००८ हे चुकीचे प्रिंट झाले असुन ते ०३-०८-२००७ असे आहे. त्याचे शुध्दीपत्रक सोबत अवलोकनास्तव सादर.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, नियमानुसार कामाचे तुकडे पाडण्यास अनुमती नसताना कामाचे तुकडे कोणत्या प्राधिकारान्वये करण्यात आले आहेत. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वैजापूर तालुक्यात मौजे लोणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत व संरक्षण भिंत बांधकाम घेण्यात आले होते. या कामास अधीक्षक अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली व पहिल्या टप्प्यात मुख्य

इमारतीच्या कामाची निविदा घेण्यात आली. त्यानंतर संरक्षण भिंत या कामाची निविदा काढण्यात आली. समितीने पुढे विचारणा केली की, वास्तविक पाहता हे एकच काम असताना ते वेगवेगळे का करण्यात आले आहे यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तांत्रिक मंजुरी कार्यकारी अभियंता यांनी दिलेली असल्याचा खुलासा केला काय, कार्यकारी अभियंता यांनी पुढे खुलासा केला की, मुख्य इमारत आणि भिंत असे वेगवेगळे टेंडर काढण्यात आले व कंत्राटदारही वेगवेगळे आहेत. विभाजन करता येत नाही, हे मान्य आहे. एकूण ४७ लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर झाले. पहिल्या टप्प्यात ३६ लक्ष ४१ हजार खर्चास तांत्रिक मान्यता देण्यात आली. सुरवातीला या कामाचे टेंडर काढण्यात आले व पुढच्या टप्प्यात कंपाऊंड वॉलचे टेंडर काढले आहे, नियमानुसार अशा प्रकारे विभाजन करता येत नाही. ही अनियमितता घडली असल्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी असे निदेश समितीने दिले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी अधिक खुलासा केला की, तांत्रिक मान्यता अधीक्षक अभियंता यांचेकडून मिळाली आहे. एस्टिमेट मंजुरीसाठी पाठविले होते. त्यास मंजुरी मिळाल्यानंतर निविदा काढण्यात आली. उर्वरित कंपाऊंड वॉलचे टेंडर नंतर काढण्यात आले. तांत्रिक मंजुरी अधीक्षक अभियंता यांनी दिलेली आहे. त्यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संपूर्ण कामाची चौकशी करावी आणि आपले अभिप्राय समितीला सादर करावेत असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**प्रा.आ.केंद्र लोणी खुर्द ता.वैजापूर इमारतीस संरक्षण भिंत बांधकामाबाबत :-**

१. औरंगाबाद जिल्हा परिषदेत विविध विकास कामाचे भाग पाडण्याचे प्रकार अधिक प्रमाणात समितीला आढळून आले. प्रस्तुत प्रकरणी मुख्य इमारत आणि भिंत अशा वेगवेगळ्या निविदा काढण्यात आल्या. प्रस्तुत प्रकरणी कामाची चौकशी करावी व त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले.

२. औरंगाबाद तसेच समितीने भेटी दिलेल्या इतर जिल्हा परिषदामध्येही विकास कामाचे भाग पाडण्याचे प्रकार समितीच्या निदर्शनास आले आहेत. कामाचे भाग पाडण्यात येवू नये असा शासन निर्णय असून त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता शासन कोणती उपाययोजना हाती घेत आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली:-**

प्रा.आ.केंद्र लोणी खुर्द ता.वैजापूर मुख्य इमारत बांधकाम करणे या कामास जिल्हा परिषद औरंगाबाद पत्र क्र.जिपऔ/आरोग्य/नियोजन/०५-०६/१५३४२ दि. २७.३.२००६ अन्वये रक्कम रु. ५७,४०,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. या कामाची चौकशी करण्यात आली असून चौकशीत खालील बाबी आढळुन आल्या.

मुख्य इमारत बांधकामाचे सविस्तर अंदाजपत्रक अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद कार्यालयात सादर करण्यात आले व रु. ३६,४१,४००/- एवढया रक्कमेस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार मुख्य इमारतीच्या बांधकामाची निविदा काढुन काम करण्यात आले. संरक्षण भिंतीचे बांधकाम रु.१२,४६,९००/- चे वेगळे अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे क्र.पिबीआर ३/६९ दि. १.१२.२००७ अन्वये तांत्रिक मान्यतेनुसार वेगळी निविदा निश्चित करुन काम करण्यात आले. सदरील कामाचे भाग पाडण्यात आले आहे ही सत्य परिस्थिती आहे. सद्यस्थितीत प्रा.आ.केंद्राची इमारत संरक्षण भिंतीसह आरोग्य विभागाच्या ताब्यात असून सुस्थितीत व वापरात आहे. संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांचेवर कार्यवाहीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला असून शाखा अभियंता यांची एक वेतनवाढ तात्पुरते स्वरुपात बंद करण्यात आली आहे.

शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक २४.४.२००० नुसार शासनाचे पुर्वपरवानगी शिवाय कामाचे तुकडे पाडू नये. या आदेशाची जिल्हा परिषद, औरंगाबादकडून तंतोतंत पालन करण्यात येत आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामविकास विभागाकडील दि. १०.१२.१९९३ व दि.२७.४.२००० च्या शासन परिपत्रकातील सूचना स्वयंस्पष्ट आहेत. जिल्हा परिषदमधील विविध स्तरावरील अधिका-यांना कामाचे तुकडे पाडले जाणार नाहीत हे तपासणेबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच आवश्यकता असल्यास शासनाची पूर्वपरवानगी घ्यावी, असे न केल्यास संबंधितांवर कार्यवाही केली जाईल याही सूचना त्यामध्ये समाविष्ट आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, औरंगाबाद जिल्हा परिषदेत विविध विकास कामाचे भाग पाडण्याचे प्रकार अधिक प्रमाणात समितीला आढळून आले. प्रस्तुत प्रकरणी मुख्य इमारत व भिंत अशा वेगवेगळया निविदा काढण्यात आल्या. प्रस्तुत प्रकरणी कामाची चौकशी करावी व त्या बाबतचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश समितीने दिले आहेत. त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जे बांधकाम करण्यात आले त्याचे दोन भाग पाडण्यात आले होते ही वस्तुस्थिती आहे. मुख्य इमारत आणि कंपाऊंड वॉल अशा वेगवेगळया दोन कामाच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. याबाबत जबाबदारी निश्चित केली असून एक शाखा अभियंता यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली असून उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्यावरील कारवाईचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. यापुढे कामाचे तुकडे पाडले जाणार नाहीत याची दक्षता आम्ही घेत आहोत.

## अभिप्राय व शिफारशी

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत राज समित्या लेखासंहिता १९६८ च्या परिशिष्ट ४ मधील नियम ५ (४) नुसार शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कामांचे तुकडे पाडता येत नाहीत. तसेच जिल्हा परिषदांमधील बांधकाम व लघुपाटबंधारे विभागातील कामांचे कंत्राट देताना कामांची विभागणी न करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिनांक ८.२.१९९०, दिनांक १०.१२.१९९३ (परिशिष्ट १६.१) व दिनांक २७.४.२००० रोजी परिपत्रके निर्गमित केली आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहितेतील नियम १३५ मधील तरतुदीनुसार रुपये ५०,००० पेक्षा जास्त किंमतीच्या कामासाठी विहीत पध्दतीप्रमाणे निविदा मागवावयाच्या असतात. परंतू अनेकदा नियम क्रमांक १२३ चा आधार घेऊन संयुक्तीक कारणाशिवाय अशा कामांची विभागणी करण्यात येते. परिणामी कामाचा दर्जा घसरतो, वेळेचे बंधन नसल्यामुळे कामात दिरंगाई होते व कंत्राटदारावर कोणत्याही प्रकारची जबाबदारी निश्चित करता येत नाही. यावर प्रतिबंध घालण्याकरीता शासनाने वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केलेली आहेत.

संबंधित सक्षम अधिका-यांनी बांधकामाला तांत्रिक मान्यता देतेवेळी तसेच निविदा मागविण्यापूर्वी कामाचे तुकडे पाडले जाणार नाहीत, तसेच आवश्यकता असल्यास शासनाची पूर्व अनुमती घेणे आवश्यक होते. तसे न केल्यास दिनांक २७.४.२००० रोजीच्या परिपत्रकांन्वये कारवाई करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. औरंगाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र लोणी खुर्द, ता.वैजापूर येथील मुख्य इमारत, संरक्षक भिंत, स्वच्छता गृह सुविधा व विद्युतीकरण याकरिता ५७,४०,०००/- रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. शासनाची मान्यता न घेता व वर नमुद परिपत्रकांचे उल्लंघन करुन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयाने सदरहू कामाचे तुकडे पाडून मुख्य इमारतीचे बांधकाम व संरक्षक भिंतीचे बांधकाम यांचे वेगळे अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे दिनांक १ डिसेंबर, २००७ रोजी तांत्रिक मान्यता देऊन वेगळी निविदा निश्चित करुन काम करण्यात आल्याचे समितीसमोर आलेल्या माहितीवरुन निदर्शनास आले आहे. **याप्रकरणी संबंधित कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली असून त्यांच्यावर पुढील कार्यवाहीबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असल्याबाबतची तसेच शाखा अभियंत्यांची एक वेतनवाढ रोखण्यात आल्याचे समितीस पाठविलेल्या लेखी माहितीवरुन दिसून येते. संबंधित कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्यावरील कारवाईबाबत शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर विहीत मुदतीत कार्यवाही पुर्ण करावी. त्याचप्रमाणे समितीने भेटीच्या वेळी निदेश देऊनही याप्रकरणी चौकशी अहवाल समितीस सादर न करणा-या अधिका-यांवर कठोर कारवाई करावी व या केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सदतीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### प्र.रा.मा.८ खंडाळा बोदवड, वसई प्रजिमा ४/३०० ते १०/०० रस्त्याच्या कामाबाबत

**परिच्छेद ३.२८४/१३१ (सन २००८-०९)**

१२ व्या वित्त आयोगा अंतर्गत अंदाजपत्रकीय तरतूद रुपये ६०,००,००० असुन सदर कामावर रक्कम रु.६१,३६,४७० असुन सदर कामावर रक्कम रु.६०,३६,४७० खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

(१) सदर कामासाठी निविदा केव्हा मागविण्यात आल्या. निविदा प्राप्त झाल्यानंतर दरपत्रके कोणासमोर उघडले या बाबत लिफाफ्यावर स्वाक्ष-या नाहीत. तुलनात्मक तक्त्यावर कोणत्याही सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी नाही. वाटाघाटी साठी कमी दर असणा-या ठेकेदारासोबत पत्रव्यवहार केल्याचे दस्तावेज नस्तीसोबत नाही.

(२) सदरचा रस्ता हा इतर जिल्हामार्ग असुन नियमानुसार डांबरी पृष्ठभागाची रुंदी ३.७५ मी. असणे आवश्यक आहे. परंतु कि.मी ९ ते १० दरम्यान ५० मी.मी. बिबीएम ३ मीटर केल्याची नोंद घेण्यात आली आहे. रस्त्याची रुंदी ०.७५ मी. ने कमी करण्यांत आलेली आहे.

(३) बाब क्र. १ नुसार ५० मी.मी. बिबीएम मोजमाप पुस्तिका पान क्र. २ वरील नोंदी वरुन कि.मी.९ ते १० दरम्यान ३५७० चौ.मी.काम करण्यात आले आहे. मात्र पान क्र. ३४ वर ४८२० चौ.मी.बिबीएम केल्याचे नोंद घेण्यात आलेली नाही. कोणत्याही प्राधिका-याची नोंद घेण्यात आलेली आहे. कोणत्याही प्राधिका-याची प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता नसणा-याची प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता नसणा-या बाबीची नोंदी काम पुर्ण झाल्यानंतर वापरात नसलेल्या मोजमाप पुस्तिका क्र. ११२५ वरील अंतिम पान क्र. ९६ वर खाडाखोड करुन (व्हाईटनर) लावुन १२५० चौ.मी. रस्त्याच्या कडा भरणे व खड्डा भरण्याच्या नोंदी आहेत. तांत्रिक मान्यता नसतांना रक्कम रुपये १,१९,६५० ची अदाई नियमबाहय झालेली आहे.

(४) बाब क्र. ४ नुसार ९ ते १० कि.मी. दरम्यान अंदाजपत्रकात कठीण मुरुमाचे परिमाण २०० घ.मी.दर्शविले. परंतु प्रत्यक्षात मोजमाप पान क्र. ५ वर ७४९.८१ घ.मी.कठीण मुरुम वापरला असल्याने रक्कम रु. ७४,४४४ ची जादा अदाई झालेली आहे.

(५) संचिके सोबत दि.२६/०४/२००७ रोजी रक्कम रु.५०,००० स्वामीत्व धनापोटी भरणे बाबतची पावती जोडली आहे. सदरील पावती कोणत्या गौण खनिजासाठी व कोणत्या कामासाठी आहे. याचा उल्लेख नाही सदरील ठेकेदाराच्या हातावर सन ०६-०७, ०७-०८ व ०८-०९ मध्ये अनेक कामे होती त्यामुळे कामावर वापरलेल्या ४९८७,८२ घ.मी.गौण खनिजाची रक्कम रु.८८,१३५ (प्र.घ.मी.१७.६७ प्रमाणे) वसुली होणे आवश्यक आहे.

(६) उप अभियंता यांनी दि.०३/०२/२००८ रोजी काम अंतिम झाले बाबत कामाच्या नोंदी तपासल्याच्या स्वाक्ष-या पान क्र. २९ वर केलेली आहे. परंतु त्यांनीच त्यांचे पत्र क्र. जिपसि/बांध/तांशा/१/ २००८/२७८/४०, दि.२४.०७.२००८ विलंबासाठी प्रतिदिन रुपये ५० चा दंड आकारणे बाबत कार्यकारी अभियंता (बां) विभाग यांना कळविण्यात आलेले आहे. यावरुन शासनाचे दिशाभूल केल्याचे दिसून येते.

(७) सदर कामाचे अंतिम देयक जानेवारी २००९ मध्ये अदा करण्यात आल्याने प्रतिदिन रु. ५० प्रमाणे ३२७ दिवसाचे रु.१६,३५० वसूल होणे आवश्यक आहे.

(८) कामासाठी साईटवर जमा केलेल्या साहित्याच्या नोंदी मोजमाप पुस्तीकेवर घेणे आवश्यक आहे. परंतु सदरच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. तथापि, कामासाठी पुरविण्यात आलेल्या डांबराचे डिलेव्हरी चलन नस्तीसोबत सादर केले आहे. डिलेव्हरी चलनावरुन कामासाठी ८९.२४० मे.टन डांबर पुरविल्याचे स्पष्ट होते. परंतु कामाची बाब क्र. १, २ व ३ साठी विहित केलेल्या प्रमाणानुसार डांबर ११३.६९२ मे.टन आवश्यक होते. सबब डांबर कमी वापरल्याने कामाचा दर्जा योग्य राखला गेला नाही. दरपृथकरणात आवश्यकते पेक्षा कमी डांबर २४.४५२ मे. टन (११३.६९२ मे.टन ०२४.४५२ मे.टन)यासाठी रक्कम रु.२३,२१५ प्रति मे. टन याप्रमाणे ज्यादा केलेली अदाई रक्कम रुपये ५,६७,६५३ वसुलात आणने आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात १२ वा वित्त आयोग योजने अंतर्गत प्र.रा.मा.८ ते खंडाळा बोदवड, वसई ते प्रजिमा ३/०० ते १०/०० काम किंमत रु.६० लक्षचे मंजूर होते.

(१) सदर कामाची निविदा दैनिक लोकमत, सकाळ व सांजशक्ती या वर्तमानपत्रात दिनांक १६.१२.२००६ रोजी व दैनिक औरंगाबाद टाईम्स मध्ये दि.१७.१२.२००६ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. व सदर कामाची निविदा दिनांक २२.०१.२००७ रोजी उघडण्यात आले होते. त्यात प्राप्त सर्व लिफाफे उघडण्यात आले होते. व त्यावर निविदा उघडणा-या अधिका-यांच्या स्वाक्षरी दिसून येत नाही. तसेच तुलनात्मक तक्त्यावर तत्कालीन अधिका-यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तथापि, वाटाघाटी बाबत दि.२४.०१.२००७ चे पत्र आहे व काम किमान दराच्या ठेकेदारास देण्यात आल्याची खात्री करण्यात आली आहे.

सोबत :-

(१) वाटाघाटीचे पत्र अवलोकनास्तव सादर.

(२) जि.प.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६२०, दि.६.२.०७.

(३) सदरचा रस्ता हा इजिमा असून कि. मी. ३/०० ते १०/०० मध्ये रुंदी रस्त्याची रुंदी ३.७५ मीटर आहे. व क्षेत्रीय परिस्थिती प्रमाणे साखळी क्रमांक ९/०० ते १०/०० मध्ये रुंदी ३.०० मीटर असल्याने तसे काम करण्यात आले आहे. प्रत्यक्ष केलेल्या कामानुसारच देयक देण्यात आलेले आहे. सदरील बाबीसाठी दि.१६.२.२००७ रोजीच्या पाहणी अहवालानुसार कार्यकारी अभियंता (बांध.) यांची मान्यता घेण्यात आली होती.

(४) बाब क्र. १ अंतर्गत ५० मि. मी. बी. बी.एम.मोजमाप पुस्तिके ची पान क्र. २ वर किमी १०/०० ते ९/०० अंतराकरिता ३७५० चौ.मी. असे नोंद केली होती व पुढे दुस-या मोजमाप पुस्तिकेत १२५० चौ.मी.ची नोंद घेतली होती असे अंतिम नोंद मोजमाप पुस्तिकेत नोंदविताना ४८२० चौ.मी.मोजमाप पुस्तक क्रमांक ३०७६ पृष्ठ क्रमांक ९ वर नोंदविण्यात आला आहे. मोजमाप पुस्तिका क्र. ११२५ मधील पान क्र. १ ते १०० पाने हे प्रमाणित केलेली असून ही मोजमाप पुस्तिका वापरात होती. तसेच मोजमाप पुस्तिका क्र. ११२५ पृष्ठ क्र. ९६ वर कोठेही खाडाखोड नाही. प्रत अवलोकनास्तव सादर.

(५) अंदाजपत्रक तयार करणे व प्रत्यक्ष कामास सुरुवात करणे यामध्ये बराच कालावधी गेल्यामुळे पावसाने साईड पट्टया जास्त प्रमाणात खचल्यामुळे जास्तीचा मुरुम टाकुन रस्ता सुस्थितीत वाहतुकी योग्य आणणे आवश्यक होते. त्यामुळे क्षेत्रीय गरजे प्रमाणे मुरुम जास्त प्रमाणात वापरलेला आहे. सदरील वाढीव बाबीसाठी कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचा पाहणी अहवाल दि.१६.०२.२००७ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. कामावर एकुण मंजुर रक्कमेपेक्षा जास्त खर्च झालेला नाही. जादा अदायगी झालेली नाही.

कार्यकारी अभियंता यांचा पाहणी अहवाल अवलोकनास्तव सादर.—

(६) सदर कामासाठी वापरात आणलेली गौण खनिजे विवरणपत्रावरुन एकूण ४९८७.८२ घ.मी. गौणखनिजे वापरलेले आहेत व ४९७७.८२ X १७.६७७ = ८८१३५ गौण खनिज वसूल करण्यात आले आहे व उपरोक्त कामासाठीच गौण खनिजची रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा केली. चलन क्रमांक १९८, दि.२८.०९.२०१५ प्रत अवलोकनास्तव सादर.

(७) सदर वस्तुस्थिती विचारात घेण्यात येवुन सूचविल्यानुसार दंडाची वसुली करण्यात आली आहे.सोबत चलन क्र. ७६ दि.२९.०९.२०१५ प्रत अवलोकनास्तव सादर.

(८) सदर वस्तुस्थिती विचारात घेण्यात येवुन सूचविल्यानुसार दंडाची रक्कम रु.१६,३५० वसुल करण्यात आली आहे. सोबत चलन क्र. ७६ दि.२९.०९.२०१५ प्रत अवलोकनास्तव सादर.

(९) प्रत्यक्षात काम योग्य दर्जाचे करुन घेण्यात आलेले आहे. काम करतांना Specification प्रमाणे डांबर वापरल्याची खात्री करण्यांत आली होती. या बाबत देयकासोबत सादर केलेले Asphalt Consumption Statement प्रमाणे डांबर वापरल्याचे आढळुन येते. तसेच कामाच्या मूळ संचिकेत एकूण खालीलप्रमाणे ०८ चलन जोडलेले असून एकूण डांबर ११८.४७ मे.टन हे त्याच कामासाठी वापरल्या बाबत खात्री केलेली आहे. वापरलेले डांबर हे योग्य प्रमाणात वापरुन सदरील काम निकषाप्रमाणे

झाल्याची खात्री केलीअसुन सदर काम २००८.२००९ मध्ये करण्यात आले होत व सध्यास्थितीत सप्टेंबर २०१५ मध्येही काम सुस्थितीत आहे. त्याचे फोटोग्राफस सोबत जोडले आहे. त्या वरुन कामाचा दर्जा योग्य असल्याचे दिसुन येते.

| चलन क्रं.<br>(१) | दिनांक<br>(२) | कामासाठी वापरलेले डांबर<br>(३) |
|---|---|---|
| ००७०१३ | २०.१.२००७ | १५००० किलो |
| ००८४९ | २७.१.२००७ | १४९०० किलो |
| ०९३००८ | १३.२.२००७ | १४८०० किलो |
| ०९६३२८ | २२.२.२००७ | १४८३० किलो |
| ००२३२८ | २.३.२००७ | १४९४० किलो |
| ००२२१८ | १६.३.२००७ | १४७७० किलो |
| १९०३५१ | २६.३.२००७ | १४५८० किलो |
| २०७९०८ | ३०.३.२००७ | १४६५० किलो |
| | एकुण म्हणजे... | ११८४७० किलो<br>११८.४७ मे.टन |

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, निविदा उघडण्यात आलेल्या अधिका-यांनी निविदा लिफाफ्यावर व तुलनात्मक तक्त्यावर स्वाक्षरी न करण्याची कारणे काय आहेत तसेच सदोष निविदा प्रक्रिया राबविण्यास कोण जबाबदार आहे. एकाच कामाचे मोजमाप असताना दोन वेगवेगळ्या मोजमाप पुस्तकांमध्ये नोंद का घेण्यात आली यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांनी निविदा लिफाफ्यावर व तुलनात्मक तक्त्यावर सह्या नाहीत व दोन मेजरमेंट बुकमध्ये रेकॉर्ड आहेत ही वस्तुस्थिती मान्य केली.

समितीने पुढे आणखी विचारणा केली की, बाब क्रमांक १ च्या नोंदी मूळ मोजमाप पुस्तिकेत घेतलेल्या आहेत. तथापि काम पूर्ण झाल्यानंतर वापरात नसलेली दुसरी मोजमाप पुस्तिका क्रमांक ११२५ वर दुसरी नोंद घेतलेली आहे. सदर नोंदीमध्ये व्हाईटनर लाऊन खाडाखोडी व उपरी लेखन केलेले आहे, याबद्दल कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अभिप्राय काय आहेत. यावर कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी खूलासा केला की, पान क्रमांक १ ते १०० यामधील पृष्ठ क्रमांक ९६ वर खाडाखोड करुन नोंद घेतली आहे. ही बाब मी स्वतः चेक केलेली आहे. दोन एम.बी. मध्ये रेकॉर्ड आहे, ही वस्तुस्थिती आहे. समितीने पुन्हा अशी खाडाखोड करण्यामध्ये त्यांचा काय उद्देश होता अशी पृच्छा केली असता संबंधित तत्कालीन शाखा अभियंत्यांचा खुलासा घेत असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु समितीने १२५० चौ.मी., त्याचे दर ९५.७२ = १,१९,६५० रुपये या नोंदी अतिरिक्त आहेत काय, याची तपासणी करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले असता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांनी पुनः मोजमाप क्रमांक ११२५ ची कॅरीफॉरवर्ड केलेली आहे, ही वस्तुस्थिती कबुल केली. समितीने या प्रकरणी अनियमितता झाली असेल तर तसा अहवाल तयार करुन तो समितीकडे पाठवावा असे निदेश देवून पुढे विचारणा केली की, कामासाठी ११३.६९२ टन डांबराची आवश्यक असताना ८९.२४० मे.टन डांबराचे डिलिव्हरी चलन आणले आहे. यावरुन डांबराचा कमी वापर केल्याने कामाचा दर्जा कसा राखला. परिच्छेदाच्या उत्तरामध्ये एकूण ११८.४७ मे.टन डांबर वापरल्याचे डिलिव्हरी चलनाच्या दिनांकानुसार दर्शविण्यात आले आहे. ही डिलिव्हरी चलने व डांबराच्या वापराचा तपशिल लेखा परिक्षणाच्या वेळी का दर्शविण्यात आला नाही,हा तपशिल लेखा परिक्षणाच्या वेळी दाखविला असता तर हा आक्षेप आला नसता

असे प्रतिपादन केले असता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी खुलासा केला की, संबंधित शाखा अभियंता यांनी तपशिल लेखापरिक्षणाचेवेळी दाखविला होता, परंतु त्याची दखल घेतली गेली नाही. समितीला सदरहू खुलासा मान्य होवू शकला नाही कारण लेखा परिक्षणाच्या वेळी रेकॉर्डवर घेतले नाही असे सांगितले गेले त्यानंतर संबंधितांनी खुलासा का केला नाही, संबंधित कागदपत्र का दाखविले नाही अशी विचारणा समितीने केली परंतु समितीस उत्तर प्राप्त झाले नाही यावर पंचायत राज समितीचा परिच्छेद येण्यापूर्वी चार महिने अगोदर अनुपालन अहवाल सादर केला जातो. लेखा संचालनालयाकडून कॅम्प आयोजित केले जातात, त्यावेळी सदरचे कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची संधी होती, परंतु त्यावेळीही तपशिल दाखविला नाही, हे योग्य नाही याबाबत संबंधितांकडून खुलासा घ्यावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्र.रा.मा.८ खंडाळा बोधवड, वसई प्रजिमा ४/३०० ते १०/०० जिल्हा परिषद, औरंगाबाद (१) सदरहू प्रकरणी दोन मोजमाप पुस्तिका तयार करणे नोंदणी मध्ये व्हाईटनर लावून खाडाखोड व उपरी लेखन करणे, डांबराचे डिलीवरी चलन नसणे, इत्यादी आक्षेपांवर जिल्हा परिषद स्तरावर समितीस समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यामुळे समितीने प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून खालील बाबी निदर्शनास आल्या :-

अंदाजपत्रकात किमी ३/०० ते १०/०० या ७.०० किमी लांबीत ३.७५ मी रुंदीस डांबरीकरण करणेची तरतूद आहे. या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ९.२.२००७ अन्वये मे.रेणूका कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांना देण्यात आले. या कामाचे मंजूर अंदाजपत्रकात व निविदेत रस्त्यावरील खड्डे भरणेची तरतूद करण्यात आली नव्हती.

दिनांक १५.२.२००७ रोजी मोजमाप पुस्तिका क्र.११२५ पान क्र.९५ व ९६ मध्ये किमी १०/०० ते ९/०० मध्ये खड्डे भरणे व तुटलेल्या कडा भरणे या कामाची मोजमापे घेवून १२५०.०० चौ.मी. एवढ्या परिमाणाच्या नोंदी घेण्यात आल्या व उप अभियंता यांनी १००% तपासली आहेत. अंदाजपत्रकात तरतूद नसताना १२५०.०० चौ.मी.ची मोजमापे नोंदविली गेली. दिनांक १६.२.२००७ रोजी कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांनी कामाची पाहणी करुन तत्कालिन कार्यकारी अभियंता यांना किमी ३/०० ते ४/०० व किमी ९/०० ते १०/०० मध्ये खड्डे भरणे व डांबरी कडा भरणेबाबत आदेश काढले. शाखा अभियंता श्री.यु.डी. लिंभारे यांनी दिनांक २०.२.२००७ रोजी मोजमाप पुस्तिका क्र.३०७६ पान क्र.२ वर पुनश्च किमी १०/०० ते ९/०० मध्ये खड्डे भरणे व पॅचवर्क दर्शवून १२५०.०० चौ.मी.ची नोंद घेतली. किमी ९/०० ते १०/०० या लांबीत खड्डे भरणे व कडा भरणे या कामाची १२५०.०० चौ.मी.ची दोनदा नोंदी झाल्यामुळे नंतर मोजमाप पुस्तिका क्र.३०७६ पान क्र.२ वरील नोंदीत खाडाखोड केल्याचे दिसते सदर १२५०.०० चौ.मी. परिमाणाची दुबार अदाई झालेली नाही. संबंधित उप अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून खुलासा प्राप्त होताच उचित कार्यवाही करण्यात येईल. मोजमाप पुस्तिकेत खाडाखोड केलेबद्दल संबंधित शाखा अभियंता यांना जबाबदार धरुन त्यांची एक वेतनवाढ एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आली आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग (पंरा-८) :- सहमत आहे.**

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत प्रमुख राज्य मार्ग ८ - खंडाळा बोदवड, वसई प्रजिमा ४/३०० ते १०/०० या कामाच्या निविदा केव्हा मागविण्यात आल्या, कोणासमोर उघडण्यात आल्या त्याबाबत लिफाफ्यावर साक्ष-या नसणे, तुलनात्मक तक्त्यावर सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्ष-या नसणे, वाटाघाटीसाठी कमी दर असणा-या ठेकेदरासोबतच्या पत्रव्यवहाराचा दस्तऐवज उपलब्ध नसणे, डांबरी पृष्ठभागाची रुंदी विहीत मोजमापाची नसणे, दोन मोजमाप पुस्तीकांमध्ये नोंदी ठेवणे, मोजमाप पुस्तीकेत खाडाखोड करुन व्हाईटनर लावून कामात समावेश नसलेल्या कडा भरणे व खड्डा भरण्याच्या नोंदी घेणे, तांत्रिक मान्यता

नसताना १,१९,६५० ची नियमबाह्य अदायी करणे, गौण खनिजाची वसुली न करणे, काम पूर्ण झाल्याची नोंद घेऊन उप अभियंत्यांनी शासनाची दिशाभूल करणे, विलंबाबातचा दंड वसूल केलेला नसणे, डांबर कमी वापरण्यात आलेले असणे इत्यादी आक्षेपाबाबत समितीला मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांच्या साक्षीच्या वेळेस समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही. याप्रकरणी चौकशी करुन समितीला अहवाल सादर करण्याचे निदेश देऊनही संबंधितांनी चौकशी अहवाल सादर केला नाही. याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते.

सदरहू प्रकरणी समितीसमोर आलेल्या माहितीवरुन सदरहू कामाचे मंजूर अंदाजपत्रकात व निविदेत रस्त्यावरील खड्डे भरण्याची तरतूद करण्यात आली नाही. याप्रकरणी तत्कालिन उप अभियंता व शाखा अभियंता यांचेवर रेकॉर्डमध्ये खाडाखोड केल्याप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात आली. उक्त अधिका-यांची प्रत्येकी एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे. **त्याचप्रमाणे याप्रकरणी समितीने निदेश देऊनही चौकशी अधिका-याने चौकशी अहवाल समितीस सादर केला नाही ही बाब अत्यंत गंभीर असून जिल्हा परिषदेने संबंधित अधिका-यांवर केलेली कारवाई ही जुजबी स्वरुपाची आहे. त्यामुळे समिती याबाबत असमाधान व्यक्त करते. तद्वतच ज्या अधिका-यांनी चौकशी अहवाल समितीस सादर केला नाही किंवा दडवून ठेवून त्यांनी समितीची दिशाभूल केली या कारणावरुन उक्त अधिका-यांविरुध्द कठोर कारवाई करावी तसेच लेखा आक्षेपात नमूद बाबी संदर्भात समितीने दिलेल्या निदेशानुसार याप्रकरणी चौकशी अहवाल समितीस पाठविण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण अडतीस

## जिल्हा परिषद, औरंगाबाद

### पाझर तलाव डिग्रस ११ ता. सिल्लोड कामातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद ३.४०१/१० (सन २००८-०९)**

सदर कामास सुधारीत तांत्रिक मान्यता रक्कम रु.२२,७६,७००/- ची घेण्यात आलेली असुन कामावर रक्कम रुपये १७,१९,०००/- खर्च करण्यात आलेला आहे. या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १०६ (क) नुसार निधीची हमी मिळाल्याशिवाय बांधकाम चालु करता येत नाही. परंतु कार्यकारी अभियंता (सिं) यांनी कामाचे आदेश देवुन दायीत्व निर्माण केलेले आहे.

(२) बांधकामासाठी १२,९७८.९६ घ.मी.गौणखनिज बाहेरुन खरेदी केले. दर रुपये ३५.३४ प्रमाणे गौण खनिज वसुल करणे आवश्यक असतांना रु.९८,०६४/- वसुल केले असल्याने रु.३,६०,६१२/- गौण खनिजापोटी वसुल होणे आवश्यक आहे.

(३) मोजमाप पुस्तिका क्र.१३७ पृष्ठ क्र.४० वर हार्टींग झोनचे काम ५५८६.९८ घ.मी.केसिंग झोनचे काम ७९६०.३६ घ.मी.केलेले आहे. महाराष्ट्र शासन जलसिंचन विभागाच्या १९८३ च्या नियम पुस्तिकेतील पान क्र.१०९ परि.क्र.८.७.३ चे उप परिच्छेद ड नुसार १० टक्के पोकळी वजावट करणे आवश्यक आहे. त्यानुसार वजावट न केल्याने, रक्कम रु.१,११,५९१/- ची जादा आदाई झालेली आहे.

(४) सदरील कामाची मुदत दिनांक ११.३.२००८ पर्यंत आहे परंतु सद्यस्थितीत काम अपुर्ण असल्याने शासन परिपत्रक क्र.वित्त विभाग बिजीटी १०९७/प्र.क्र.१६ अर्थसंकल्प-१२, दि. १७ एप्रिल १९९७ नुसार काम विहित मुदतीत पुर्ण झाले नसल्यास वाढीव आर्थिक खर्चाचा भार व विलंबा बाबत आवश्यक त्या उपाययोजना कार्यकारी अभियंता, सिंचन यांनी करणे गरजेचे आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

(५) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ व वनविभाग परिपत्रक क्र.एपीपी १०६६/२५०१७४, दिनांक १७ फेब्रुवारी १९७२ अन्वये सुरक्षा अनामतीच्या ३ टक्के प्रमाणे रु.११७०/- चे मुद्रांक वर करारनामा केल्याने शासनाचे रु.७७०/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

(६) पीसीसी १.३.६ कामासाठी रेड बुक स्पेसिफीकेशन प्रमाणे साहित्य न वापरल्यामुळे सिमेंटचा वापर कमी झाल्याचे दिसुन येते. सबब काम योग्य दर्जाचे झाले असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :-**

(१) MIN-६ लेखाशिर्षा अंतर्गत सन २००६-०७ मध्ये तरतुदी बाबत खालील तपशिल नमुद करण्यात येत आहे.

१. सुरुवातीचा अखर्चित निधी-निरंक

२. मंजुर निधी - ६०५.०० लक्ष

३. प्राप्त निधी - ६०५.०० लक्ष

४. निविदा पुर्वीचे दायित्व - ५३९.०० लक्ष.

५. प्रस्तुत निविदा मंजुरी नंतर होणारे एकूण दायित्व -५५२.०० लक्ष

सदर दायित्व प्राप्त निधीच्या आत असल्याने नियोजन करुन या लेखाशिर्षा अंतर्गत सदर कामाची निविदा मंजुर करण्यात आली.

(२) सदरील कामाचे अंदाजपत्रक व निविदा तयार करण्यासाठी सन २००५-०६ ची पाटबंधारे विभागाची दरसुची वापरण्यात आली. त्या दरसुची मध्ये स्वामित्वधनाची रक्कम रुपये १७.६७/- घ.मी.समाविष्ट असल्याने त्या दरानुसार संबंधिताकडुन फक्त ५५०० घ.मी. साठी रु.९८०६४/- गौणखनिज वसुली करण्यात आली आहे. तथापि उर्वरित वसुली रक्कम १२९७८.९६ घ.मी

X रु.१७.६७/घ.मी.प्रमाणे २२९३३९-९८०६४ = रक्कम रु.१३१२७५/- करणेसाठी संबंधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना नोटीस देण्यात आली आहे. त्यांनी भरणा केल्यामुळे संबंधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच त्यांचेवर आर.आर.सी.खाली वसुली बाबत तहसिलदार औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे. कामावरील तत्कालीन प्रभारी उपअभियंता हे निलंबित असुन त्यांची एक वेतन वाढ एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद केली आहे. संबंधीत अभियंता यांचेवर निश्चित करुन वसुलीची कार्यवाही प्रतीमाह करण्याबाबत आदेश निर्गमीत केले आहे.

(३) संबंधीत कामाची मोजमाप पुस्तीका गहाळ असल्याने याबाबत पोलीस स्टेशन मध्ये एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. सोबत एफआयआरची प्रत अवलोकनार्थ सादर.

(४) सदर काम विहित मुदतीत पुर्ण झालेले आहे. तथापि निधी उपलब्ध नसल्या कारणने मुदतबाह्य देयकास सक्षम स्तरावर मंजुरी घेवुनच देयक अदा करण्यात आले आहे. पुर्णत्वाचा दाखला अवलोकनार्थ सादर.

(५) रुपये ७७०/- च्या मुद्रांक घेवुन संचिकेत जोडण्यात आले आहे. मुद्रांकाची छायाकींत प्रत अवलोकनाथ सादर.

(६) पीसीसी १.३.६ काम करतांना खडी, रेती व सिमेंटचा वापर प्रचलित दरसुचीतील बाबीच्या ब्रेकअपनुसार करण्यात आलेले आहे व ते योग्य व मानकाप्रमाणे असल्यामुळे कामात सिमेंटचा वापर कमी झालेला नाही. सोबत ब्रेकअपची छायांकित प्रत अवलोकनास्तव सादर करण्यात येत आहे. तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडुन कॉक्रींट कामाचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला असुन सोबत छायांकित प्रत अवलोकनार्थ सादर.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, पाझर तलाव दिग्रस या कामाचे अंदाजपत्रक केव्हा मंजूर झाले, कामाची निविदी प्रक्रिया केव्हा करण्यात आली, स्वामित्वधनाचे वाढीव दर डिसेंबर, २००६ पासून लागू झालेले असताना २००८-२००९ मधील कामासाठी याचा विचार का करण्यात आला नाही, कमी गौण खनिज वसुलीमुळे झालेल्या रुपये ३,६०,६१२/- चे नुकसानीस कोण जबाबदार आहे, त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अवगत केले की, सन २००६-२००७ मधील दरसुची होती. त्यावेळी १७.६७ रुपये घनमिटर असा दर होता. सदर काम सन २००८-२००९ मधील आहे. त्यावेळी १७.६७ रुपये घनमिटर दरानुसार वसुली केलेली आहे. संबंधित कंत्राटदारास ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे. संबंधित कंत्राटदराचे नाव श्री. खान रईस खान असे आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर पाझर तलावाच्या हार्टींग झोनच्या मोजमापामधुन १० टक्के सिंकेज वजा न केल्याने झालेल्या रुपये १,११,५९१/- च्या जादा प्रदानास कोण जबाबदार आहे, या जादा प्रदानबाबत संबंधितांवर काय कारवाई केली यावर कार्यकारी अधिकारी (सिंचन) यांनी प्रत्येक बिलातून २ टक्के प्रमाणे सिंकेज वजा केल्यानंतर ते अंतिम देयकामध्ये रिलीज केले जाते असा खुलासा केला यावर समितीने २ टक्के सिंकेजचा नियम काय आहे अशी विचारणा केल्यावर इरिगेशन मॅन्युअल १९८२, ८७३ नुसार कार्यवाही केलेली असल्याचा निर्वाळा कार्यकारी अधिकारी (सिंचन) यांनी समितीस दिला. संचालक स्थानिक निधी लेखा यांनी अधिक स्पष्ट केले की, सुरुवातीला १० टक्के घेतले पाहिजे. प्रत्येक बिलातून २ टक्केप्रमाणे सिंकेज वजा केल्यानंतर ते अंतिम देयकामध्ये रिलीज केले जात असल्याचे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे या ठिकाणी नियमानुसार आक्षेप घेतलेला आहे यावर कार्यकारी अधिकारी (सिंचन) त्यांनी या ठिकाणी १० टक्के जास्तीचे काम करुन घेतलेले असल्याचे सांगितले असता समितीने पुढे आणखी विचारणा केली की, हे १० टक्के सिंकेज करायलाच हवे होते. १० टक्के जास्तीचे काम करुन घेतले याला पुरावा काय आहे, मेजरमेंटमध्ये तशा नोंदी आहेत काय, यावर सर्वत्र तसेच आहे आणि सर्व कामे अपूर्ण आहेत. सदर काम १२ महिन्यात पूर्ण करणे अपेक्षित असताना सद्यःस्थितीत देखील ते काम पूर्ण झालेले नाही असा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला.

मोजमाप पुस्तक नंतर गहाळ झाल्याचे समितीस सांगण्यात आले. मोजमाप पुस्तक असल्याशिवाय खरे कसे समजणार अशी समितीने पुढे विचारणा केली असता कार्यकारी अधिकारी (सिंचन) यांनी समितीस विदीत केले की, काम पूर्ण झालेले असून ते दिनांक २०-३-२००८ रोजी पूर्ण झालेले आहे. निधी नसल्यामुळे अंतिमिकरण झाले नव्हते. सदर काम त्यावेळी भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले होते.

समितीने पुढे विचारणा केली की, सदर कामावर किती रुपये खर्च केलेला आहे यावर कार्यकारी अधिकारी (सिंचन) यांनी

मोजमाप पुस्तक नसल्यामुळे प्रत्यक्ष खर्च किती झाला हे सांगणे कठीण असल्याचे समितीस अवगत केले यावर समितीने तिव्र नाराजी व्यक्त करुन पाणी प्रश्नाच्या संदर्भात समिती अतिशय गंभीर आहे. त्यामुळे अधिकारी वर्गाने समितीला बरोबर माहिती दयावी अशी मागणी समितीने केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मोजमाप पुस्तक हरविलेले असून जिल्हापरिषदेने एफआयआर नोंदविलेला असल्याचे समितीस विदित केले.

संबंधित अधिका-याने काम पूर्ण झालेले असून ते दिनांक २०-३-२००८ रोजी पूर्ण झाल्याचे उत्तर समितीला दिलेले आहे. त्यानंतर पुन्हा सुधारित मान्यता दिनांक २१-०८-२००८ रोजी घेतलेली आहे. त्यावेळी कार्यरत असणारे कार्यकारी अभियंता कोण आहे. समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली असता कार्यकारी अधिकारी (सिंचन) यांनी ठराव क्रमांक ३८ नुसार दिनांक २८.०१.२००८ रोजी सुधारित मान्यता घेतली होती व संबंधित तात्कालीन कार्यकारी अभियंता समितीच्या बैठकीसाठी आले नाहीत. श्री. वाघमारे, हे कार्यकारी अभियंता होत. ते सन २०१२ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी ३ वर्षे औरंगाबाद जिल्हापरिषदेत काम केले असल्याचे समितीस अवगत करुन देण्यात आले. यावर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या परिच्छेदाच्या अनुषंगाने संपूर्ण चौकशी करुन त्यासंदर्भातील अहवाल समितीच्या अवलोकनार्थ सादर करावा. याठिकाणी अनियमितता किंवा ज्या काही चुकीच्या गोष्टी घडलेल्या असतील तर त्या संदर्भातील जबाबदारी संबंधितांवर निश्चित करुन कारवाई करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एखाद्यावर ठपका न ठेवता संबंधित अधिका-यांच्या विरोधातील जबाबदारी निश्चित करुन त्या संदर्भातील अहवाल १ महिन्याच्या आत समितीच्या अवलोकनार्थ सादर करावा. यापूर्वी झालेले काम ते आज लोकपयोगी आहे किंवा कसे याची देखील तपासणी करण्याची गरज आहे. लघुपाटबंधारेच्या संदर्भात काही अनियमितता झालेली असेल तर त्याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः चौकशी करावी कारण शासन सिंचनावर कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करीत असते.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पाझर तलाव दिग्रस या कामाचे अंदाजपत्रक मंजूर झाल्याचा दिनांक, निविदा प्रक्रियेचा दिनांक, स्वामित्वधनाचे वाढीव दर डिसेंबर, २००६ पासून लागू झालेले असताना २००८-२००९ मधील कामासाठी याचा विचार करण्यात न येणे, गौण खनिजाची योग्य वसुली न करणे, हारटींग झोनच्या मोजमापात १०% सिंकेज वजा न करणे, मोजमाप पुस्तिका गहाळ करणे, इत्यादी गंभीर आक्षेपावर जिल्हा परिषद स्तरावर समितीस समाधानकारक उत्तरे प्राप्त झाली नसल्यामुळे समितीने प्रस्तुत प्रकरणी संपूर्ण चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास काय आढळून आले.

**उपरोक्त मुद्यांसदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

सदर कामाची चौकशी करण्यासाठी एक उप अभियंता व तीन शाखा अभियंता यांची नेमणूक करण्यात येवून त्यांनी चौकशी अहवाल पुढील प्रमाणे सादर केला आहे.

सदर कामास जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने ठराव क्र.११९, दिनांक ११/२/२००६ रोजी रुपये १८.०० लक्ष यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे व कार्यकारी अभियंता, सिंचन यांनी क्रमांक १/३/२००६ अन्वये रुपये १६.३८ लक्ष यास तांत्रिक मान्यता दिली असून दिनांक २२/३/२००७ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे. तसेच कामास दिनांक २१/८/२००८ रोजी रुपये २२.७८ लक्ष यास सुधारीत तांत्रिक मान्यता दिली असून दिनांक २८/१/२००८ अन्वये रुपये २५.०० लक्ष यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर काम कार्यारंभ आदेशानुसार सुरु करण्यात येवून दिनांक २०/३/२००८ रोजी पूर्ण करण्यात आले.

सदर कामात गौण खनिजाची वसुलीची रक्कम रुपये १,३१,२७५/- ही संबंधित शाखा अभियंता यांच्याकडून वसूल करण्यासाठी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत तसेच संबंधित तत्कालिन प्रभारी उप अभियंता हे निलंबित असून त्याची या प्रकरणात एक वेतनवाढ एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद केली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषदेच्या चौकशी पथकाने चौकशी केली असता धरणाचे माती काम माथा पातळीपर्यंत असल्याचे अहवालात नमूद आहे. प्रत्यक्षात हे काम दिनांक २०/३/२००८ ला पूर्ण झाले असून ७ वर्षानंतरही माती काम माथापातळीपेक्षा खाली दबलेली नाही म्हणजे वाढीव माती काम करण्यात आल्याचे स्पष्ट होते असे चौकशी अहवालात नमूद केलेले आहे. पाझर तलावांचे सांडवा बांधकाम, गाईड बंड हे काम

व धरणाचे मातीभराव काम पूर्ण झाले असून भरावाची लांबी १८० मीटर व माथ्याची रुदी २ मीटर आहे व ते भराव काम माथा पातळीच्या खाली दबलेले नाही. तसेच दगडी अस्ताराचे काम पूर्ण झालेले असून सद्यस्थितीत कोठेही विस्कळीत झालेले नाही हे ही चौकशी अहवालात नमूद केले आहे.

सदर कामाची मोजमाप पुस्तिका गहाळ असून त्या संबंधी तत्कालीन उप अभियंता यांनी पोलीस स्टेशन मध्ये दिनांक ०८/१०/२०१५ रोजी एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे.

**उपरोक्त संदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

स्वामित्व धनाची रक्कम नियमानुसार वसुल न केल्यामुळे तत्कालीन प्रभारी उप अभियंता श्री.डी.के.गवळे, यांची एक वेतनवाढ एका वर्षासाठी थांबविण्यात आली आहे. गौण खनिजाची रक्कम रु. १,३१,२७५/- संबंधित शाखा अभियंता श्री.खरात यांच्यावर निश्चित करण्यात आली असून त्यांच्या निवृत्ती वेतनातून रक्कम वसुली सुरु आहे. मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याबाबत पोलीस स्टेशन, सिल्लोड येथे दिनांक ८/१०/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने निदेश दिले की, सिंकेजचे दहा टक्के वजावट न करणे तसेच, मोजमापविषयी चौकशी करण्यात यावी. यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, रॉयल्टीवरील वाढीव दरानुसार रक्कम वजावट करण्यात आलेली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, सदरहू प्रकरणी दोन मोजमाप पुस्तिका तयार करणे नोंदणी मध्ये व्हाईटनर लावून खाडाखोड व उपरी लेखन करणे, डांबराचे डिलीवरी चलन नसणे, इत्यादि आक्षेपांवर जि.प.स्तरावर समितीस समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यामुळे समितीने प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले. यावर समितीस समाधानकारक उत्तर प्राप्त होवू शकले नाही परंतु सिंकेज चार्जेस व माथा आणि पातळीवरील मातीकाम हे जुने आहे. जुनी मोजमाप पुस्तके गहाळ झालेली आहेत. यामध्ये वाढीव माती काम केलले आहे. असे रेकॉर्डवर दिसत आहे. यामध्ये सिंकेज चार्जेस ॲड केलेले नाहीत. ताबडतोब जेवढे काही सिंकेज चार्जेस असतील ते त्यांच्या पातळीवर वजा करण्यात येतील तसेच या संदर्भात एफआयआर दाखल करण्यात आलेला असल्याचे समितीस सांगण्यात आले.

## अभिप्राय व शिफारशी

जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने ठराव क्रमांक ११९ अनुसार दिनांक ११/२/२००६ रोजी रुपये १८.०० लक्ष रुपयांच्या पाझर तलाव डिग्रस, ता.सिल्लोडच्या कामास मान्यता दिली व कार्यकारी अभियंता, सिंचन यांनी दिनांक १/२/२००६ अन्वये १६.३८ लक्ष यास तांत्रिक मान्यता दिली असून सदरहू मान्यता ही लेखासंहिता, १६८ चे नियम १०६ (३) नुसार निधीची हमी मिळाल्याशिवाय देवून कार्यकारी अभियंत्यांनी कामाचे आदेश देवून दायित्व निर्माण केल्याच्या प्रमुख लेखा आक्षेपासह गौण खनिजाची वसूली न करणे, १० टक्के सिंचनाची वजावट न करणे, दिनांक १७/४/१९९७ च्या शासन परिपत्रकान्वये काम विहीत मुदतीत पूर्ण झालेले नसल्यास कार्यकारी अभियंत्याने वाढीव आर्थिक खर्चाच्या भारासंबंधी व विलंबाबात योग्य ती उपाययोजना न करणे, कमी मुद्रांकावर करारनामा करणे, रेडबुक स्पेशिफीकेशनप्रमाणे काम झालेले नसल्यामुळे काम योग्य दर्जाचे झाल्याबाबत प्रमाणपत्र सादर न करणे ई. आक्षेप घेण्यात आले आहेत.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची साक्ष घेतली असता सदरहू काम हे उपलब्ध निधीच्या आत असल्याने अधिकचे दायित्व निर्माण केलेले नसल्याबाबतचा खुलासा समिती ग्राह्य धरते. **तसेच गौण खनिजाची फरकाची रक्कम १,३१,२७५/- भरणा केल्याबाबत व मुद्रांकाच्या फरकातील रुपये ७७०/- चे मुद्रांक घेवून अनुपालन केल्याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करते. परंतू आक्षेपाधिन कामाची मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याप्रकरणी समितीने औरंगाबाद जिल्हापरिषदेला भेट देईपर्यंत गुन्हा नोंदविण्यात झालेल्या विलंबाबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. प्रस्तुत प्रकरणात समितीस चौकशी अहवाल सादर झालेले असून चौकशी अहवालात ज्या संबंधित उप अभियंता व शाखा अभियंत्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे त्यांची विभागीय चौकशी विहीत मुदतीत पूर्ण करुन त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

परिशिष्ट १.१

सत्यमेव जयते

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा

# दिनांक ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल

## (स्थानिक संस्था)

महाराष्ट्र शासन

लेखा परीक्षणामध्ये असे उघडकीस आले की या योजने अंतर्गत पार पाडलेल्या कामांच्या बाबतीत चाचणी तपासणी केलेल्या 128 ग्राम पंचायतीं पैकी एकाही ग्राम पंचायतीने वरील तरतुदीचे पालन केले नव्हते. याचा परिणाम म्हणजे या ग्रामपंचायतींनी केलेल्या 201 कामांच्या किंमतीच्या पाच टक्के म्हणजे. रु 70.44 लाख एवढा जास्तीचा खर्च होण्यात झाला.

#### 3.9.5.4 निष्फळ खर्च

सातारा जि.प. मधील पंचायत समिती वाई मध्ये यांनी रु 34.25 लाख किंमतीच्या सहा पाटबंधारे योजना 2005-06 मध्ये पूर्ण झाल्या. निधीच्या अपुऱ्या तरतुदीमुळे ग्राम पंचायतीला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे विद्युत जोडणीसाठी ठेवावी लागणारी ठेव ठेवणे शक्य झाले नाही. विद्युत जोडणीची तरतुद न झाल्यामुळे पाटबंधारे योजनांचा काहीही उपयोग झाला नाही. परिणामी काम पूर्ण होऊन तीन वर्षांचा कालावधी उलटून देखील उपयोग न झाल्यामुळे रु 34.25 लाखाचा निष्फळ खर्च झाला.

#### 3.9.5.5 आवश्यक गटारांशिवाय रस्त्याची बांधणी

य.ग्रा.स.यो.च्या मार्गदर्शक तत्वांनुसार, रस्तेबांधणीच्या कामाबरोबर बाजूला गटार बांधणी करावी जेणेकरुन पावसाळयात रस्त्यांच्या नुकसानीपासून बचाव होईल.

2002-03 ते 2008-09 या कालावधीत बांधलेल्या 177[42] रस्त्यांमध्ये बाजूची गटारे न बांधल्यामुळे पाणी साचून त्यांची हानी होण्याच्या परिस्थितीला सामारे जावे लागले.

### 3.9.6 इतर वेधक मूद्दे

#### 3.9.6.1 वैधानिक वजावटी

ग्रामपंचायतींकडून विभागातूनच कार्यान्वित केलेल्या कामांच्या बाबतीत हप्ते देतांना ग्रामपंचायतींच्या कामाच्या बीलांमधून पं.स.नी. प्राप्तीकर, विक्रीकर (मूल्यवर्धित कर) विमा आकार, प्रतिभूती ठेव इ. वजावटींची वसुली करण्याची आवश्यकता नाही. तथापि, 275 प्रकरणांमध्ये सात पं.स.नी रु 53.41 लाख इतक्या रकमेची चुकीची वजावट केल्याचे दिसून आले.

या विरुध्द, कंत्राटदारांच्या कामाच्या बिलांमधून 25 ग्रा.पं.नी. 72 प्रकरणांत रु 12.56 लाख एवढी वैधानिक वजावट केली नव्हती.

#### 3.9.6.2 लोकवर्गणी काढून घेणे

तीन जि.प.च्या चाचणी तपासणीत असे दिसून आले की रु 162.78 लाख एवढया रकमेची लोकवर्गणी 148 ग्रा.पं.कडून काढून घेतली गेली. ह्यात खालील बाबींचा समावेश होता :

---

[42] 55 रस्त्यांच्या बांधणीचा खर्च रु 4.09 कोटी इतका होता

परिशिष्ट १.२

# INCOME-TAX ACT, 1961

[43 OF 1961]

*An Act to consolidate and amend the law relating to income-tax and super-tax*

**Section 1. to 194B** * * *

Section 194C. **Payments to contractors and sub-contractors :-** (1) Any person responsible for paying any sum to any resident (hereinafter in this section referred to as the contractor) for carrying out any work (including supply of labour for carrying out any work) in pursuance of a contract between the contractor and—

(a) the Central Government or any State Government; or

(b) any local authority; or

(c) any corporation established by or under a Central, State or Provincial Act; or

(d) any company; or

(e) any co-operative society; or

(f) any authority, constituted in India by or under any law, engaged either for the purpose of dealing with and satisfying the need for housing accommodation or for the purpose of planning, development or improvement of cities, towns and villages, or for both; or

(g) any society registered under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or under any law corresponding to that Act in force in any part of India; or

(h) any trust; or

(i) any university established or incorporated by or under a Central, State or Provincial Act and an institution declared to be a university under section 3 of the University Grants Commission Act, 1956 (3 of 1956) ; or

(j) any firm; or

(k) any individual or a Hindu undivided family 73a[or an association of persons or a body of individuals, whether incorporated or not, other than those falling under any of the preceding clauses], whose total sales, gross receipts or turnover from the business or profession carried on by him exceed the monetary limits specified under clause (a) or clause (b) of section 44AB during the financial year immediately preceding the financial year in which such sum is credited or paid to the account of the contractor,

shall, at the time of credit of such sum to the account of the contractor or at the time of payment thereof in cash or by issue of a cheque or draft or by any other mode, whichever is earlier, deduct an amount equal to—

(i) one per cent in case of advertising,

(ii) in any other case two per cent,

of such sum as income-tax on income comprised therein:

**Provisos.** * * *

**Section 194D. to 298.** * * *

**SHEDULES** * * *

**APENDIX** * * *

परिशिष्ट २.१

**अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- ६ जून, २००८**

**वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक: २६ सप्टेंबर २००५.**

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने विभागांतर्गत वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करतांना येणा-या अडचणी लक्षात घेऊन उपरोक्त शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहीलेला निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथिल करण्यात येत आहे. आता सदर अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात येत आहे. सदर अनुमती सन २००७-०८ व त्यापुढील अखर्चित रकमांसाठी राहील. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०६०६१४२१५७००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( सु.प्र.कानडे )**
**शासनाचे उप सचिव, वित्त विभाग**

**(कृ.मा.प.)**

प्रति:

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग,/ सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.

६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे

८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

९. निवड नस्ती, अर्थोपाय

परिशिष्ट २.२

अखर्चित निधी खर्च
करण्याबाबतची कार्यप्रणाली

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: २६ सप्टेंबर, २००५**

**वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक १० ऑक्टोबर २००२.**

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने ग्रामविकास व जलसंधारण विभागांतर्गत वर्ष अखेरच्या अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली होती. दिनांक ३१ मार्च पूर्वी निधी वितरीत करुन घेऊन राज्याच्या तिजोरीबाहेर ठेवण्याची प्रवृत्ती बळावू लागली म्हणून अखर्चित निधी खर्च करतांना संदर्भाधिन शासन निर्णयाप्रमाणे कार्यप्रणाली अवलंब करण्याचे ठरविण्यात आले होते. तथापि, अखर्चित निधी शासनाच्या तिजोरीत जमा करणे किंवा त्यासाठी पुरवणी मागणीन्वये तरतूद करुन संबंधितांना खर्च करण्यास उपलब्ध करुन देणे विभागाला कठीण झाले आहे. या कार्यप्रणालीमुळे लोकप्रतिनिधी वारंवार तक्रारी करीत आहेत. या सर्व मुद्यांचा विचार करता दिनांक १० ऑक्टोबर २००२ चा शासन निर्णय रद्द करण्याचे ठरविले आहे.

**शासन निर्णय:-**

या आदेशान्वये दिनांक १० ऑक्टोबर, २००२ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत असून अखर्चित निधी वापरण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यप्रणाली ठरविण्यात येत आहे.

(अ) अर्थसंकल्पात तरतूद आहे म्हणून ३१ मार्च पर्यंत निधी मुक्त करुन घेऊन ती शासनाच्या तिजोरीबाहेर ठेवण्यात येऊ नये.

(ब) मागील वर्षातील अखर्चित निधीची माहिती घेऊन तो निधी खर्च करण्यास या विभागाची ३० जून पूर्वी अनुमती घेण्यात यावी. जेणेकरुन अखर्चित निधी खर्च करण्यास पुरेसा कालावधी मिळू शकेल. यापैकी कांही निधी त्याच वर्षी खर्च झाला नाही तर तो निधी शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावा.

(कृ.मा.प.)

(ठ) एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी निधी अखर्चित राहिल्यास तो शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावा.

(ड) एक वर्ष किंवा त्यापूर्वीचा अखर्चित निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च करण्यास अनुमती देण्यात येणार नाही, असा निधी शासनाच्य तिजोरीत जमा करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.सा.गायकवाड )
शासनाचे सह सचिव, वित्त विभाग

प्रति:

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.

६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे

७. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

८. निवड नस्ती, अर्थोपाय

परिशिष्ट २.३

शासनाने वितरीत केलेल्या अनुदानापैकी अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- २५ ऑगस्ट,२०१५.

वाचा:- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.२६ सप्टेंबर,२००५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.३१ ऑगस्ट, २००७..
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.१५ नोव्हेंबर, २००७.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.६ जून,२००८.

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका तसेच शासनाकडून विविध महामंडळांना/प्राधिकरणांना वितरीत केलेल्या निधीपैकी वर्ष अखेर अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. महापालिका, नगरपरिषदा व जिल्हापरिषदा यांना वितरित केलेला निधी त्या आर्थिक वर्षानंतरच्या पुढील एका वर्षात खर्च करण्याची मुभा आहे. त्यानंतर शासनाची मान्यता आवश्यक आहे. अशा अखर्चित निधीबाबत विभागाकडून आढावा होऊन व अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी देत असताना प्रत्यक्ष निधीची उपलब्धता, प्रत्यक्ष काम झाले आहे किंवा कसे व त्याच कामावर एकाहून अधिक स्रोतातून निधी खर्च होत नाही या बाबींची तपासणी आवश्यक असते. या सर्व बाबी विचारात घेऊन व ही पध्दत अधिक सुटसुटीत व्हावी यासाठी पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

दि. ३१.०३.२०१४ पर्यंतच्या अखर्चित निधीसंदर्भात खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

अ) प्रशासकीय विभागांनी अशा अखर्चित निधी संदर्भात तात्काळ आढावा घ्यावा. सदर आढावा दि.३०.०९.२०१५ पर्यंत पूर्ण करण्यात यावा.

ब) बांधकामाव्यतिरिक्त (वेतन, अनुदान व सवलती, इत्यादी) अखर्चित निधी तात्काळ शासनास जमा करण्यात यावा.

क) बांधकामाच्या निधीसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

(i) जी कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत व खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकत नाही, अशा सर्व प्रकरणी खर्चाची परवानगी विभाग स्तरावर देण्यात यावी. परवानगी देत असताना त्याच कामावर इतर स्त्रोतातून खर्च न झाल्याची खात्री विभागाने करावी.

(ii) जी कामे सुरू होऊन भौतिकदृष्टया अपूर्ण आहेत, ती कामे पुढील दि.३१.०३.२०१६ पर्यंत पूर्ण होतील असे विभागाकडून नियोजन केले जाईल या अटींच्या अधीन राहून दि. ३१.०३.२०१६ पर्यंत खर्च करण्याची परवानगी विभागस्तरावर देण्यात यावी.

(iii) जी कामे अद्याप सुरू नाहीत त्याचा निधी तात्काळ शासन जमा करावा.

ड) प्रशासकीय विभागांनी यापुढे अनुदान मुक्त करत असताना विहीत मुदतीत (म्हणजेच पुढील वर्षाच्या दि.३१ मार्च पर्यंत) खर्च होईल तेवढेच अनुदान वितरित करण्याची दक्षता घ्यावी.

२. दि.३१.०३.२०१४ पर्यंत अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्यास मान्यता मिळण्यासाठीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी व दि.३१.०३.२०१४ नंतर मुक्त केलेल्या निधीच्या संदर्भात पुर्वीचे आदेश लागू राहतील व असा निधी विहीत मुदतीत खर्च करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८२५१७१६३२५८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant Krishna Patil

Digitally signed by Vasant Krishna Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasant Krishna Patil
Date: 2015.08.25 17:41:26 +05'30'

(व.कृ.पाटील)
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

१) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
२) सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग / सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
४) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा), मुंबई
५) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
६) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा), नागपूर
७) संचालक, लेखा व कोषागारे
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई /वांद्रे
९) निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
१०) निवड नस्ती (अर्थोपाय)

परिशिष्ट ३.१

**जिल्हा परिषदांमधील कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधित प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मान्यता तसेच निविदा किंवा कंत्राट स्विकारण्याच्या अधिकारात वाढ करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र ४४४/वित्त-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दि. १५ जुलै, २००८

वाचा :- १) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए २०००/प्र.क्र ४०२३/३३ दि. १२ जानेवारी, २००१
२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए १०९९/प्र.क्र २०८९ भाग-२/३३ दिनांक १२ जानेवारी, २००१
३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र. झेडपीए २००१/प्र.क्र ४०२३/वित्त-९ दि. १९ मार्च, २००४.
४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए २००८/प्र.क्र ४४४/वित्त-९ दि. २५ जून, २००८

शासन निर्णय :-

जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या विविध योजनांमुळे जिल्हा परिषदांकडील कामाची व्याप्ती बऱ्याच प्रमाणात वाढलेली आहे. यामुळे जिल्हा परिषदेकडील कामाच्या स्वरुपात वाढ झालेली आहे. त्या अनुषंगाने कालावधीत व किंमतीत वाढ झालेली आहे. तसेच या कालावधीत बांधकामासाठी वापरावयाच्या सिमेंट व स्टीलच्या दरात झालेल्या असाधारण (Abnormal) भाववाढ झाल्यामुळे शासकीय बांधकामांच्या प्रगतीवर विपरित परिणाम होत आहे. यामुळे शासकीय निधी अखर्चित राहणे, शासनाच्या विविध योजना वा कामे अपुर्णावस्थेत राहणे. इत्यादी कारणांमुळे विविध स्तरावरून या विभागाच्या दिनांक १२ जानेवारी, २००१ च्या दोन्ही शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत मागणी होत आहे. यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४ आणि परिशिष्ट दोन मध्ये शासन अधिसूचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र. झेडपीए २००१/प्र.क्र ४०२३/वित्त-९, दि. १९ मार्च, २००४ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणेत दि. २५ जून, २००८ च्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेले होते. परंतु सदर शासन निर्णय रद्द करण्यात येत असून खालील प्रमाणे फक्त अनावर्तीत खर्चाच्या अधिकाराच्या मर्यादेत सुधारणा करण्यात येत असून त्यानुसार सुधारीत शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ (नियम ४ खालील)परिशिष्ट - दोन

जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या अधिकारांची विभागणी करणे

| अ. क्र.१ | अधिकाराचे स्वरूप | ज्या प्राधिका-या कडे अधिकार सोपविण्यात आले आहे तो प्राधिकारी /प्राधिकरण | अंदाजित अनावर्ती खर्च | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ |
| | | जिल्हा परिषद | न्यूनतम मर्यादा | अधिकतम मर्यादा |
| भाग -१ | कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार | १.उप अभियंता | | १,००,०००* |
| | | २.कार्यकारी अभियंता | १,००,००० | ५,००,००० * |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | ५,००,००० | २०,००,००० * |
| | | ४.अध्यक्ष, स्थायी समितीचा | २०,००,००० | २५,००,००० * |
| | | ५.विषय समितीचा सभापती | २०,००,००० | २३,००,००० * |
| | | ६.विषय समिती | २३,००,००० | ३०,००,००० |
| | | ७.स्थायी समिती | २५,००,००० | ५०,००,००० |
| | | ८.जिल्हा परिषद | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १.गट विकास अधिकारी | | ५,००,००० * |
| | | २.पंचायत समितीचा सभापती | ५,००,००० | १०,००,००० * |
| | | ३.पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| भाग -२ | कामे किंवा विकास योजनांच्या निविदा किंवा रहत्राट स्विकारण्याचा अधिकार | १.उप अभियंता | | १,००,०००* |
| | | २.कार्यकारी अभियंता | १,००,००० | ५,००,०००* |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | ५,००,००० | २०,००,०००* |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ४. अध्यक्ष, स्थायी समितीचा | २०,००,००० | २५,००,०००* |
| | | ५. अध्यक्ष,विषय समितीचा | २०,००,००० | २३,००,०००* |
| | | ६.विषय समिती | २३,००,००० | ३०,००,०००* |
| | | ७.स्थायी समिती | २५,००,००० | ५०,००,०००* |
| | | ८.जिल्हा परिषद | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| | | पंचायत समिती | | |
| | | १.गट विकास अधिकारी | | ५,००,००० |
| | | २.पंचायत समितीचा सभापती | ५,००,००० | १०,००,००० |
| | | ३.पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| ग ३ | कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधातील तांत्रिक मान्यता देण्याचा अधिकार | १.उप अभियंता (मूळ बांधकाम) व दुरुस्त्या | | १,००,००० मूळ बांधकाम/ व दुरुस्त्या |
| | | २.कार्यकारी अभियंता-<br>१)मूळ बांधकामे<br>२) दुरुस्त्या | | २५,००,००० पर्यंत मूळ कामे अर्थसंकल्पिय तरतुदींच्या अधीन राहून पूर्ण अधिकार |
| | | ३)विद्युत कामे | | ५०,००० |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | | ५०,००,००० पर्यंत |
| | | ४. जि.प मधील विविध खातेप्रमुख | | ५,००,००० पर्यंत |
| | | ५. गटविकास अधिकारी | | ३,००,००० पर्यंत |

* टिप:- १) या स्तरावर दिलेल्या मान्यतेची माहिती पुढील विषय समितीस/स्थायी समितीस/पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य राहील.

२) प्रत्येक तिमाही बैठकीत जिल्हा परिषद विभागांनी तिमाहित केलेल्या कार्यवाहीचा आढावा दर्शविणारा अहवाल समितीच्या बैठकीत सादर करावा. अनुदानांची, बांधकामे व योजना यांच्याशी सुसंगती यांची माहिती अहवालात प्रामुख्याने द्यावी.

या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील परिशिष्ट २ मध्ये ...य वेळी बदल करण्यांत येईल.

हा शासन निर्णय संगणक संकेतांक क्र. २००८०७१५१२४५४००१ अन्वये www. ...arashtra.gov.in अन्वये शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ना.रा. भागवत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

...जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
...जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
...विभागीय आयुक्त ( विकास शाखा )
...लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण भवन, नवी मुंबई
...मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,नागपूर,अमरावती
...जिल्हा लेखा परिक्षक अधिकारी स्थानिक निधी लेखा
...लेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र-१, मुंबई.
...लेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र-२, नागपूर.
...विभागातील सर्व कार्यासने
...वड नस्ती, कार्यासन क्रमांक वित्त-९

परिशिष्ट ४.१

हदगाव पंचायत समिती (जि. नांदेड )
प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास
प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र.पंसई २००९/प्र.क्र.१७१ पंरा-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- ३१ डिसेंबर,२००९

संदर्भ :- कार्यकारी अभियंता, जि.प., नांदेड पत्र क्र.जिपनां/बांउवि/ईमारत/२७९८/०९,दि. ३.११.२००९

प्रस्तावना :-

कार्यकारी अभियंता, जि.प., नांदेड यांनी संदर्भीय दिनांक ३.११.२००९ च्या पत्रान्वये हदगाय पंचायत समितीची प्रशासकीय इमारत व अन्य बांधकाम मोडकळीस आलेले असून, ते अतिशय जीर्ण झालेले असल्याने, सदर बांधकाम पाडून हदगाव तहसिल इमारतीच्या पहिल्या मजल्यावर पंचायत समितीची नविन प्रशासकीय इमारत बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याची विनंती केली आहे.

हदगाव पंचायत समितीची अस्तित्वात असलेली इमारत सन १९६२-६३ साली बांधण्यात आलेली असून, सदर इमारत, सभागृह व कर्मचारी निवासस्थान हे जुन्याच्या बांधकामात असून, छतासाठी कौलारु शिट वापरात आहे. हे सर्व बांधकाम अतिशय जीर्ण झालेले असून, ते वापरण्यायोग्य नसल्याने जीर्ण इमारतीचे बांधकाम पाडून हदगाव तहसिल इमारतीच्या पहिल्या मजल्यावर पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये सादर करण्यात आला आहे. या प्रकरणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नांदेड यांनी मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां.वि.यांच्याकडील क्र.एबीडी (४)/टी-१२ हा नमुना नकाशा उपयोगात आणला असून, एकूण ८३८.४१ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम प्रस्तावित केले आहे. सदर प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी रु.१,११,९२,०००/- इतक्या किंमतीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक सन २००८-०९ च्या दरसूचीवर आधारीत असून ते उप अभियंता, जि.प.उपविभाग, हदगाव व कार्यकारी अभियंता (बांध.), जि.प.,नांदेड यांनी साक्षांकित केले आहे. कार्यकारी अभियंता, जि.प., नांदेड यांनी प्रस्तावासोबत बांधकामाचा नमुना नकाशा, जुन्या इमारतीचा ले-आऊट प्लॅन, अस्तित्वातील इमारती जीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व फोटो इ.कागदपत्रे सादर केलेली आहेत.

कार्यकारी अभियंता, जि.प., नांदेड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची मुख्य अभियंता (प्रमंग्रासयो) यांनी केलेल्या तांत्रिक छाननी अंती, हदगाव पंचायत समितीच्या रु.१,११,९२,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

-: शासन निर्णय :-

हदगाव (जिल्हा-नांदेड ) पंचायत समितीची अस्तित्वातील जीर्ण झालेल्या निवासी /अनिवासी इमारती पाडण्यास तसेच हदगाव तहसिल इमारतीच्या पहिल्या मजल्यावर पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या एकूण रक्कम रुपये-१,११,९२,०००/- (रुपये एक कोटी अकरा लक्ष ब्यान्नव हजार फक्त) इतक्या अंदापत्रकीय किंमतीच्या बांधकामास पुढील अटीच्या अधिन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

(१) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त दोन वर्षात पूर्ण होईल, असे संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जि.प. यांनी नियोजन करावे.

(२) या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रमा किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जि.प. यांनी दक्षता घ्यावी. प्रमा किंमतीपेक्षा अधिक खर्च वी पंचायत समिती/ जिल्हा परिषदेने सोसावा.

(३) प्रस्तुत प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.) जि.प. यांनी दक्षता घ्यावी.

परिशिष्ट ५.१

राज्यातील मागासवर्गीयांना शैक्षणिक सवलती

स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदान देण्याबाबतच्या नियमांची सुधारणा.

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीएच-१०९७/प्र.क्र.१०७/मावक-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ मार्च, १९९८.

वाचा :-
1. १] शासन निर्णय, कामगार व समाजकल्याण विभाग क्रमांक:इबीसी-१०५१/डी, दिनांक ३१ ऑगस्ट, १९५९.
2. २] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्रमांक:बीसीएच-१०७९/भ:२२३/सीआर-४९२/बीसीडब्ल्यु-४ दिनांक २२.११.१९८३
3. ३] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/मावक-४, दि. ४.११.१९९५
4. ४] शासन शुध्दीपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/मावक-४, दि. ६.३.१९९६
5. ५] शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/मावक-४, दि. २४ मे १९९६
6. ६] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक:इहीएस-१०९४/प्र.क्र. १७६/मावक-६, दि. २५.७.१९९६
7. ७] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २८/मावक-४, दिनांक २७.८.१९९६.
8. ८] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/मावक-४, दिनांक १२.९.१९९६
9. ९] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:बीसीएच-१०९५/प्र.क्र. २७२/(अ)/मावक-४, दि. ५.३.९७
10. १०] शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक:बीसीएच-१०९७/प्र.क्र. २७२/(अ)/मावक-४, दि. ५.३.९७.

शासन निर्णय :- स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहांना मान्यता व सहाय्यक अनुदान देण्याबाबतचे नियम वरील अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये शासनाने तयार केले होते. सदर नियमापैकी काही नियमांत वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी आलेल्या प्रशासकीय स्वरूपाच्या अडचणी विचारात घेऊन तसेच विविध वसतिगृह संचालक संघटनांनी वेळोवेळी केलेल्या मागण्या विचारात घेऊन आणि या नियमामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांचा समावेश करून शासन निर्णय तयार करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता या निर्णया

सोबत जोडलेल्या जोडपत्रात "जोडपत्र-अ" नुसार स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदाने देण्याबाबतच्या सुधारीत नियमांना मान्यता देत आहे. त्यामुळे यापूर्वीचे या योजनेसंबंधातील वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व आदेश रद्द करण्यात येत असून यापुढे या सोबतच्या जोडपत्र"अ" मधील सुधारीत नियमावली लागू करण्यात येत आहे. मात्र अनुदान निर्धारण तसेच वित्तीय बाबींशी संबंधीत बाब जून, १९९८ च्या शैक्षणिक वर्षापासून लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(जे.पी. डांगे)
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य नाशिक.
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई/अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर/निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
निवड नस्ती, कार्यासन मावक-४

जा.क्र. जिपनां-सकवि-वशा-९८ कार्यालय समाज कल्याण विभाग जि.प. नांदेड
दि. २०.५.९८

प्रति,
१) सर्व अनुदानीत मागासवर्गीय वसतीगृह संचालक
ता.- - - - - - - - जि. नांदेड.

समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड.

शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक:बीसीएच: १०९७/प्र.क्र. १०७/मावक-४, दिनांक १६ मार्च१९९८ सहपत्र

जोडपत्र "

महाराष्ट्र राज्यातील स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीय मुलामुलींच्या वसतिगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदान देण्याबाबतचे नियम

एक :- नांव

या नियमांना महाराष्ट्र राज्यातील स्वेच्छा संघटनांनी चालविलेल्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदान देण्या-बाबतचे नियम असे म्हणता येईल.

दोन :- उद्दिष्ट

मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने त्यांना वसतिगृहाच्या सोयी आणि शैक्षणिक सवलती यांचा फायदा देण्याबाबत प्रोत्साहन देणे.

तीन :- व्याख्या

[१] वसतिगृह

या योजनेच्या नियमानुसार विद्यार्थ्यांच्या निवासाच्या प्रयोजनासाठी योग्य म्हणून मान्यता दिलेली, शयन कक्ष, स्वयंपाक घर, भोजन कक्ष, कोठी घर, प्रसाधन गृह व स्नानगृह आणि वसतिगृह अधिक्षकांचे निवासस्थान यासारख्या आवश्यक सोयींनी युक्त अशी इमारत/घर.

[२] निवासी छात्र

मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये आयोजित पूर्णकालीक पाठ्यक्रमाचे शिक्षण घेणारे आणि मागासवर्गीयांच्या वसतिगृहात प्रवेश देण्यात आलेल्या मागास वर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनी.

[३] तपासणी अधिकारी

संचालक, समाज कल्याण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय समाज कल्याण अधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेचा समाजकल्याण अधिकारी, उप समाजकल्याण निरीक्षक किंवा संचालक, समाजकल्याण, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, विभागीय समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण अधिकारी वर्ग-१ व २ यांनी किंवा शासनाने प्राधिकृत

......

केलेला इतर कोणताही शासकीय अधिकारी.

[४] स्वेच्छा संघटना

संस्था नोंदणी अधिनियम, १८६० किंवा मुंबई सार्वजनिक अधिनियम, १९५० खालील नोंदणी केलेले कोणतेही अभिकरण/संघटना/संघ/संस्था.

[५] लेखा परिक्षा अहवाल

संबंधीत लेखासाठी अभिकरणाच्या बाबतीत नोंदणीकृत सनदी लेखापालाने संस्थेच्या लेख्यांची लेखा परिक्षा केल्याबद्दलचा [अभिकरणाची ज्या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आली असेल त्या अधिनियमातील तरतुदीनुसार विहित प्रपत्रातील] अहवाल.

[६] वसतिगृह वर्ष

१ जून पासून सुरु होणारे आणि ३१ मे रोजी संपणारे वर्ष.

[७] सकस व पुरेसे अन्न

शासनाचे अनुदान मिळणाऱ्या मागासवर्गीयांच्या वसतिगृहातील निवासी छात्रासाठी वेळोवेळी विहीत केलेल्या आहाराच्या प्रमाणानुसार द्यावयाचे अन्न.

[८] स्थानिक विद्यार्थी

वसतिगृह ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणच्या स्थानिक हद्दीच्या आत ज्याचे आई वडील सामान्यत: रहात असतील असा विद्यार्थी.

वर्ग :- नियम

१] मागासवर्गीयांच्या वसतिगृहास मान्यता मिळण्यासाठी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यामार्फत त्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे वसतिगृहास ज्या शैक्षणिक वर्षात मान्यता मिळविण्यासाठी प्रस्ताव असेल, त्या शैक्षणिक सत्राच्या किमान १ वर्ष आधी [म्हणजे जून पूर्वी] १ वर्ष संस्थेचे वसतिगृह चालविलेले असावे. तसेच विहीत नमुन्यामध्ये अर्ज [परिशिष्ट [ब] सादर केलेला असावा. सदर अर्जाचा नमुना समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कार्यालयात रु. १००/- वजन अथवा रोखीने भरणा करुन उपलब्ध होऊ शकेल.

२] ज्यांच्या व्यवस्थापनाची नोंदणी, संस्था नोंदणी अधिनियम १८६० किंवा मुंबई सार्वजनिक अधिनियम १९५० खाली करण्यात आलेली आहे,

पान...४३ वर...

असणारी मागासवर्गीयांची वसतिगृहे मान्यतेसाठी पात्र असतील.

[२] मान्यतेसाठी अर्ज विहित नमुन्यात व दोन प्रतीत [illegible] वसतिगृह चालू करावयाचे आहे. [illegible] विहित [illegible] प्रमाणे [illegible] जिल्हा समाजकल्याण अधिकारी [illegible] शिफारस देऊन पुढील [illegible] [illegible], अर्ज व [illegible] शासनाकडे पुढील मान्यतेकरिता [illegible] असतील.

[अ] मागासवर्गीय मुले/मुलींची विभागातील वसतिगृहे, मागासवर्गीय मुले / मुलींची संख्या आणि विभागातील वसतिगृहातील जागा / प्रवेश [illegible] विचारात घेता त्या भागात नवीन वसतिगृह सुरु करणे आवश्यक आहे काय ?

[ब] व्यवस्थापनाने सुरुवातीस [illegible] दर्शविल्या [illegible] सुविधा उपलब्ध केल्या आहेत काय ?

~~[१] वसतिगृह परिसर व इमारत [illegible] सर्व [illegible] [illegible]~~ [illegible] [illegible] अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र द्यावे.

[२] वसतिगृहाच्या इमारतीत प्रत्येक विद्यार्थ्यास किमान २४ चौरस फूट व कमाल ४० चौरस फूट या प्रमाणात शयन व भोजनासाठी पुरेशी जागा आहे काय ?

[३] वसतिगृहातील विद्यार्थी छात्रांना भोजन व शासनाने विहीत केलेल्या प्रमाणानुसार पुरेसे अन्न आणि निवास व्यवस्था [illegible] पुरविण्यात येते काय ?

[क] संस्था आर्थिक दृष्ट्या संपन्न असण्यासाठी वसतिगृहाचे व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेकडे [illegible] किमान रु. १०,०००/- राखीव निधी जमा असावे, तसेच मान्यतेकरिता [illegible] व्यवस्थापनावर आक्षेप [illegible] दायित्व अस्तित्वात नसावे.

[ड] शासनाकडून नवीन वसतिगृह सुरु करण्यास [illegible] मान्यता [illegible] संबंधित [illegible] समाजकल्याण [illegible] विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत अथवा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांमार्फत उपलब्ध आहे काय ?

[ड] वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांकरिता शक्यतो मैदानी व बैठे खेळांची सोय पुरेशा प्रमाणात तसेच दैनंदिन उपयोगातील सर्वसाधारण औषधी संच उपलब्ध आहे काय ?

४] वसतीगृह प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थिनीचे आई-वडील किंवा पालक यांचेकडून वसतिगृह चालक संस्थेस कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही.

५] निवासी छात्रांनी शिक्षण विभागाने मान्यता दिलेल्या शाळेतील किंवा इतर कोणत्याही संस्थेतील आयोजित शिक्षणक्रमाना नियमितपणे उपस्थित राहिले पाहिजे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारणे लेखी नमुद करुन शासनाने ज्यांना मान्यता दिलेली नाही अशा संस्थेच्या किंवा खाजगी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या तांत्रिक वर्गामध्ये जाणाऱ्या निवासी छात्रांच्या बाबतीत जर त्यांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पुर्व मंजूरीने वसतीगृहात प्रवेश देण्यात आला असेल तर अशा विद्यार्थ्यांवर अनुदान देण्यास परवानगी देता येईल.

६] या नियमान्वये मान्यता मिळालेल्या कोणत्याही नवीन वसतीगृहात किमान २० अनुसूचित जातीचे [बी.पी.एल.] दारिद्र्यरेषेखालील व महाराष्ट्रातील रहिवासी असलेले निवासी छात्र असणे बंधनकारक राहिल.

[अ] ज्या ठिकाणी नविन वसतीगृह प्रस्तावित असेल ते ठिकाण समाज कल्याण अधिकारी यांनी तयार केलेल्या योजनाबद्द आराखड्यात असावे

[ब] प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना अंथरुण-पांघरुणाची व्यवस्था संस्थेने पुरेशा प्रमाणात केलेली असावी.

[क] वसतीगृह इमारतीत छात्राकरिता शौचालय व स्नानगृह पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावे.

[ड] वसतीगृहात किमान १ महिना पुरेल एवढा धान्य साठा कोणत्याही तपासणीवेळी उपलब्ध असावा. तसेच छात्रांना सकाळी नाश्ता व दोन्ही वेळेचे भोजनात वरण, भात, पोळी, भाजी व किमान चटणीचा समावेश असावा.

७] वसतीगृहास मान्यता देण्यात आल्यावर त्यांच्या सहाय्यक अनुदानाचे प्रदान खालीलप्रमाणे विनियमित करण्यात येईल.

मान्यतेच्या पहिल्या वर्षात व्यवस्थापनास रु. २०००/- [रु. १,५००/- आवर्ती आणि भांडीकुंडी, फर्निचर इ. खरेदी करण्याकरिता रु. ५००/- अनावर्ती अनुदान] इतके सहायक अनुदान देण्यात येईल. त्यानंतर मागील वर्षी वसतीगृहाच्या पटावर असलेल्या मागासवर्गीय निवासी छात्रांच्या सरासरी संख्येच्या [वेळोवेळी वसतीगृहास दिलेल्या भेटीच्या आधारे निश्चित केलेली सरासरी] संदर्भात त्या वसतीगृहाच्या अनुदानासाठी पात्र म्हणून निश्चित केलेल्या छात्रांच्या कमाल संख्येच्या अधिनतेने

स्थापनात दावयाच्या नियमित अनुदानाची गणना करण्यात येईल.

खाली नमूद केलेल्या शर्तींना अधीन राहून वसतीगृहांना खालील दराने अनुदान मंजूर करण्यात येईल.

(एक) निवासी छात्र मुला-मुलींच्या बाबतीत दरमहा रु. ३३५/- प्रमाणे दहा महिन्यांसाठी

(दोन) जे निवासी छात्र एकाच इयत्तेत दोनदा नापास झालेले असतील किंवा परिक्षेला गैरहजर राहिल्याने किंवा परिक्षेला बसले नसतील किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे खंड पडला असेल तर अशा छात्रांसाठी कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

(तीन) जे निवासी छात्र महाराष्ट्र व्यतिरिक्त इतर राज्याचे असतील त्यांच्यासाठी कोणतेही अनुदान दिले जाणार नाही. या संबंधात जी व्यक्ती स्वत: किंवा तिचे आई-वडील वसतीगृहाच्या प्रवेशाच्या तारखेला किमान पंधरा वर्षासाठी महाराष्ट्राचे कायम रहिवाशी असतील अशी व्यक्ती ती महाराष्ट्रातील व्यक्ती असे समजण्यात येईल.

(चार) ज्याचे आई-वडील किंवा पालक, वसतीगृह ज्या शहरात किंवा गावात असेल त्याच शहरात किंवा गावात राहत असतील आणि ज्यांना त्यांच्या स्वत:च्या घरून त्यांची शाळा इत्यादिमध्ये उपस्थित राहणे शक्य असूनही वसतीगृहात प्रवेश देण्यात आला असेल अशा छात्रांवर अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. मात्र बाहेर गावातील अथवा शहरातील वर्ग ५ ते १० वी पर्यंत तसेच १० वी नंतरच्या मान्य महाविद्यालयीन अभ्यासक्रमातील शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना (स्थानिक विद्यार्थी वगळून) वसतीगृहात प्रवेश देण्यास अनुमती राहील व असे विद्यार्थी/विद्यार्थीनी अनुदानास अनुज्ञेय राहतील.

(पाच) स्थानिक विद्यार्थ्यांसाठी कोणतेही अनुदान देण्यात येणार नाही मात्र मांग, भंगी, कातकरी व गोंड या जमातीच्या स्थानिक विद्यार्थ्यांना आणि अनाथ, अपंग व निराश्रित छात्रांना अनुक्रमाने विहित टक्केवारीचे अधीन राहून प्रवेश देता येईल व त्यावर विद्यार्थी अनुदान देय राहिल.

(सहा) समाज कल्याण विभागाच्या विभिन्न अधिका-यांनी शासन परिपत्रक संकीर्ण-१०९४/७२/मावक-१, दि. ३१. ३. १९९५ नुसार अथवा त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार केलेल्या तपासणीतील प्रत्यक्ष उपस्थितीच्या सरासरीच्या आधारेच अनुदान निर्धारित केले जाईल. मात्र प्रत्यक्ष तपासणीच्यावेळी वसतीगृह प्रवेशित विद्यार्थी शाळेत शिकवणीला

प्रात्यक्षिक (प्रॅक्टीकल) /खेळ इत्यादी विरवनीय कारणाकरिता वसतीगृहाबाहेर गेले असतील व तपासणी अधिकाऱ्यांची तशी खात्री झाली असेल तर तशी नोंद शेरेबुकात घेऊन हजेरी अनुज्ञेय करावी. तसेच तपासणीच्या दिवशी शक्यतो शाळा /कॉलेज /पाठ्यक्रम सुरू होण्याच्या अगोदर किंवा नंतर जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थी वसतीगृहात हजर असतील अशा सकाळच्या किंवा सायंकाळच्या वेळात [मुलींच्या वसतीगृहाबाबत सकाळी ६ पूर्वी ते सायंकाळी ६ नंतरच्या वेळेत पुरुष तपासणी अधिकाऱ्यांनी भेट न देण्याच्या नियमाचे पालन करून] वसतीगृहांना भेटी देऊन हजेरीबाबत तपासणी करावी.

वसतीगृहाच्या मासिक तपासणीसाठी जाणाऱ्या अधिकारी अथवा कर्मचारी यांनी वसतीगृहात उपस्थित मुलांची हजेरीची संख्या व मुलांची नावे नमूद करावीत.

[सात] वसतीगृह प्रवेशित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संख्येवर टक्केवारीचे बंधन राहणार नाही व त्यांचेवर देय अनुदान हे इतर प्रवेशित विद्यार्थ्यांवर देय अनुदानाप्रमाणेच संस्थेस अदा केले जाईल. अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांना शालांत परिक्षेनंतरची केंद्र शासनाकडून शिष्यवृत्ती मिळते अशा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेतून निर्वाह अनुदानाएवढी रक्कम अथवा शिष्यवृत्तीची रक्कम कमी असल्यास पूर्ण शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी परस्पर कोषागारात भरणा करतील.

[आठ] सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या वसतीगृहाच्या व्यवस्थापनाने एखाद्या नोंदणीकृत सनदी लेखापालाकडून आपल्या लेख्यांची लेखा परिक्षा करून घ्यावी लागेल. नंतरच्या वर्षात कोणतेही अनुदान मिळण्यासाठी आधीच्या वर्षाचा लेखा परिक्षा अहवाल चालू वर्षाच्या ऑक्टोबर अखेरपर्यंत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा समाज कल्याण अधिकारी यांना सादर केला असला पाहिजे. स्वयंसेवी संस्थेकडून सनदी लेखापालाच्या लेखा परिक्षण अहवालाचा मागील वर्षाचा अनुदान विनियोग अहवाल प्रत्येक वर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत प्राप्त करून घ्यावा. संबंधीत संस्थेने या मुदतीत सदर अहवाल सादर न केल्यास एकूण देय अनुदानाच्या ५ टक्के पर्यंतच्या रकमेत कपात करण्याच्या दंडात्मक कार्यवाहीस संस्था पात्र राहिल.//

[आठ] अनुदानाचे निर्धारण

वसतीगृह चालविण्याबाबतच्या नियमित निर्धारित केलेल्या सबधात उर्ती पूर्ण करण्याच्या अधीनतेने वसतीगृह पुढीलप्रमाणे सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असेल.

[अ] दरडोई अनुदान :- नवीन मान्यता दिलेल्या वसतीगृहास मागील वर्षी संस्थेने केलेल्या मान्य बाबींवरील एकूण खर्चाच्या ६० टक्के किंवा मंजूर संख्येनुसार प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या छात्रांच्या सरासरी संख्येप्रमाणे १० महिन्यांकरिता विहित दराने आकारण्यात येणा-या रकमेच्या ६० टक्के इतकी रक्कम अग्रीम अनुदान म्हणून जुनमध्ये देण्यात येईल. पहिला हप्ता ६० टक्के माहे जूनमध्ये तर दुसरा हप्ता ४० टक्के माहे जानेवारीमध्ये अथवा उशिरात उशिरा माहे मार्च पूर्वी वितरीत करण्यात येईल. तथापि समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर वसतीगृहास भेट देऊन वसतीगृह समाधानकारक चालू असल्याची खात्री केलेली असावी. अग्रीम अनु अनुदान हे खालील शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येईल.

स्वयंसेवी संस्थेकडून सनदी लेखापालांच्या लेखा परिक्षण अहवालासह मागील वर्षाचा अनुदान विनियोग हक अहवाल प्रत्येक वर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत प्राप्त करुन घ्यावा. संबंधीत संस्थेने या मुदतीत सदर हू अहवाल सादर क न केल्यास एकूण देय अनुदानाच्या ५ टक्के पर्यंतच्या रकमेत कपात करण्याच्या दंडात्मक कार्यवाहीस संस्था पात्र राहिल.

प्रचलित नियमावलीतील इतर सर्व बाबींची पूर्तता करुन घेऊन संस्थेस वेळीच अनुदान देणेबाबत समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद जबाबदार राहतील.

अनुदानाचा पहिला हप्ता हा आधीच्या वर्षाच्या वार्षिक आवर्ती अनुदानाच्या ६० टक्के इतक्या मर्यादित असेल आणि तो वर्षाच्या अखेरीस समायोजित करण्याच्या अधीनतेने असेल आणि खबरदारीचा उपाय म्हणून जर वसतीगृह वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी बंद करण्यात आले असेल तर अग्रीम अनुदानाची रक्कम परत घेण्यात येईल. आणि जर संचालक, समाज कल्याण यांनी किंवा जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिका-याने मागणी केल्यावर उक्त रक्कम परत करण्यात आली नाही तर ती रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल असा करारनामा व्यवस्थापनाबरोबर करण्यात यावा.

प्रथम सहामाहीसाठी दिलेल्या ६० टक्के अग्रिम अनुदानाचा विनियोग वसतिगृह व्यवस्थापनावरच झाल्याची खात्री वसतिगृह तपासणी अधिकारी तथा प्राधिकृत केलेले अधिकारी आपल्या तपासणीत करतील आणि या अधिकाऱ्यांनी, वसतिगृह तपासणीकरिता दिलेल्या भेटीत निदर्शनास आलेल्या प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी संख्येच्या सरासरीप्रमाणे अंतिम ४० टक्के अनुदानाचे अंकेक्षण करुन समायोजित करण्यात येईल. मात्र वसतिगृहातील विद्यार्थ्यांची संपूर्ण वर्षाच्या उपस्थितीची सरासरी ७५% किंवा त्याहून अधिक असल्यास विद्यार्थी मान्य संख्ये एवढे पूर्ण अनुदान मिळण्यास संस्था पात्र राहील.

[ब] अधिक्षकाच्या वेतनावर अनुदान :- पूर्णकालीन अधिक्षकाची शैक्षणिक पात्रता एस.एस.सी. पास असावी. पूर्णकालीन अधिक्षक हा दरमहा रु. ६००/- किंवा व्यवस्थापनाने अधिक्षकाच्या वेतनावर खर्च केलेल्या रकमेच्या ५० टक्के रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमेइतके सहाय्यक अनुदान मिळण्यास संस्था पात्र असेल.,

[क] वसतिगृह भाडे अनुदान :- वसतिगृहाच्या इमारतीच्या भाड्याबद्दल व्यवस्थापनाने केलेल्या खर्चाच्या ७५ टक्के इतके सहाय्यक अनुदान मिळण्यास व्यवस्थापन पात्र असेल. मात्र त्यासाठी व्यवस्थापनाने दिलेले भाडे वाजवी असल्याबाबत आणि भाड्याची जागा आवश्यकतेच्या कमान व किमान गरजेपेक्षा कमी किंवा जास्त नसल्याबाबतचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने आणि समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रमाणित केले असले पाहिजे.

[ड] इमारत परिरक्षण अनुदान :- व्यवस्थापनाच्या मालकीच्या वसतिगृह इमारतीसाठी अनुदान खाली विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेच्या अधिनतेने, व्यवस्थापनाने केलेल्या खर्चावर अनुज्ञेय असेल. इमारतीचे भांडवली मूल्य नक्की जाणून घ्यावे. एकूण भांडवली मूल्यांच्या ७.५ टक्के इतकी रक्कम निर्धारित करण्यात यावी. परिरक्षण अनुदान अशारितीने निर्धारित केलेल्या भांडवली मूल्याच्या ७.५ टक्क्यांच्या ५० टक्के दराने निश्चित करण्यात यावे. ही रक्कम परिरक्षण अनुदान म्हणून देण्यात येईल. मात्र, त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याचे त्या रकमेच्या वाजवीपणाबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. लागेल. जेव्हा परिरक्षणासाठी केलेला प्रत्यक्ष खर्च हा अशारितीने काढलेल्या अनुदानापेक्षा कमी असेल तेव्हा फक्त प्रत्यक्ष खर्चाइतकी रक्कम परिरक्षण अनुदान म्हणून देण्यात यावी.

[ड] अनावर्ती अनुदान :- मान्यतेच्या पहिल्या वर्षात व्यवस्थापनास, भांडीकुंडी, फर्निचर इत्यादींच्या खरेदीसाठी रु.५००/- इतके अनावर्ती अनुदान मिळण्यास पात्र असेल. त्यानंतर व्यवस्थापन तीन वर्षाच्या कालांतराने निवासी छात्रांसाठी भांडीकुंडी, फर्निचर, खेळांच्या वस्तू इत्यादींसारख्या गोष्टी पुरविण्यासाठी निधीच्या उपलब्धतेच्या अधीनतेने मुला-मुलींच्या मान्य संख्येनुसार प्रत्येकी रु. २५/- प्रमाणे अनावर्ती अनुदान मिळण्यास पात्र असेल. हे अनुदान मंजूरीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत वापरण्यात आले नाही तर त्यापैकी न वापरलेली रक्कम वसूल करण्यात यावी. यासाठी व्यवस्थापन, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे [विहीत ["ड" संलग्न नमुन्यात] अर्ज करील.

[क] दंड म्हणून कपात :- खालीलपैकी कोणत्याही उल्लंघनाबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास/समाज कल्याण अधिकाऱ्यास अथवा संचालक, समाज कल्याण यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास व्यवस्थापनावर कोणत्याही वेळी प्रत्येक प्रकरणात रु. १०००/- [रुपये एक हजार फक्त] पर्यंत दंड आकारता येईल आणि सदर दंडाची रक्कम व्यवस्थापनास द्यावयाच्या अनुदानातून वजा करण्यात येईल.

[१] सुखसोयी पुरेशा आणि स्वीकृत प्रमाण दर्जाच्या नसणे [खेडगांवाखेरीज इतरत्र संडास, बाथरुम, दिव्यांची सोय, प्रमाणित दर्जाचा आहार, पाणी इत्यादी.

[२] निकृष्ट अपूरे अन्न

[३] अभिलेख अद्यावत ठेवलेले नसणे.

[४] स्वच्छता राखलेली नसणे.

[५] निवासी छात्रांची उपस्थिती वार्षिक सरासरी ७५ टक्क्येपेक्षा कमी असणे.

[६] किमान १ महिना पुरेल एवढा धान्यसाठा वसतीगृहात सदोदित उपलब्ध नसणे.

[७] इमारत निवासी व्यवस्था पुरेशी नसतांना मंजूर संख्येपेक्षा विनापरवानगीने जादा विद्यार्थी भरणा करणे.

[८] विद्यार्थ्यांकडून फी वसूल करणे.

[९] वसतीगृह प्रवेशितांसाठी शौचालय व स्नानगृहाची सोय उपलब्ध नसणे. याशिवाय असमाधानकारक व्यवस्थेमुळे वसतीगृहाच्या मंजूर संख्येत कपात करण्यात येईल.

१०.

[२] मंजूर संख्येत वाढ :- व्यवस्थापन निरनिराळ्या शर्तींच्या अधिनतेने निवासी छात्राच्या केवळ मंजूर संख्येवर सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असेल. वसतीगृहातील छात्राच्या विहीत संख्येत वाढ करू इच्छिणाऱ्या वसतीगृह व्यवस्थापनाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात [परिशिष्ट[क] अर्ज करावा. जर शर्ती पूर्ण केल्या असतील आणि तशा वाढीसाठी, असमाधानकारक व्यवस्थापनामुळे क्यात करून उपलब्ध झालेल्या, मान्य विद्यार्थी संख्येच्या कोट्यातून/जिल्ह्यातील वाटरात न आधलेल्या मान्य विद्यार्थी संख्या आणि जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक, समाज कल्याण, पुणे यांचेमार्फत शासनाची पूर्वानुमती घेऊन मंजूर संख्येत वाढ करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देतील. नंतरच्या वर्षापासून वसतीगृह वाढीव मंजूर संख्येवर सहाय्यक अनुदानही मिळण्यास पात्र असेल. छात्र विद्यार्थी संख्या या योजनेअंतर्गत शासनाने वेळोवेळी संबंधीत जिल्ह्यासाठी ठरवून दिलेल्या मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा अधिक होता कामा नये. तसेच मान्य संख्येच्या पूर्ण क्षमतेने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सवलतीचा लाभ मिळावा म्हणून कमी प्रवेशित/अत्यल्प उपस्थिती असणाऱ्या वसतीगृहांबाबत नियमावलीच्या अधिनतेने तात्काळ कार्यवाही करावी.

[२] प्रवेशासाठी कार्यपद्धती :-

[एक] व्यवस्थापनाने विस्तृत प्रसिद्धी देऊन अर्ज मागवावेत.

[दोन] मागासवर्गातील म्हणजे अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यातील सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश खुला असेल. मिळालेल्या सर्व अर्जांची नोंद प्रवर्गनिहाय नोंदवहीमध्ये करण्यात येईल. मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गासाठी खालील टक्केवारीप्रमाणे प्रवेश देण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| १] | अनुसूचित जाती | ८० % |
| २] | अनुसूचित जमाती | १० % |
| ३] | विमुक्त जाती व भटक्या जमाती | ५ % |
| ४] | विशेष मागास प्रवर्ग | २ % |
| ५] | अंध व अपंग व्यक्ती | ३ % |

प्रवेशासाठी मागासवर्गीयांच्या निरनिराळ्या प्रवर्गासाठी निश्चीत केलेल्या टक्केवारीमध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती इत्यादीतील सेनिकांच्या मुलांना व मुलींना आणि इतर अवलंबितांना तसेच बाल अ[illegible]

[तीन] अनुसूचित जातीसाठी राखून ठेवलेल्या जागांपैकी, महानगरपालिका क्षेत्रात व "अ" वर्गाच्या नगरपालिका क्षेत्रात १४ टक्के जागा "मांग व मेहतर" जमातीसाठी [मांग जमातीसाठी ७ टक्के जागा आणि मेहतर जमातीसाठी ७ टक्के] आणि जिल्हा व तालुका पातळीवर १० टक्के जागा [मांग व मेहतर जातीसाठी प्रत्येकी ५ टक्के] एकत्रितपणे राखून ठेवण्यात येतील.

[चार] जर सर्वप्रकारे प्रयत्न केल्यानंतरही अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय यापैकी कोणत्याही विशिष्ट प्रवर्गासाठी राखून ठेवलेल्या जागा रिकाम्या राहिल्या तर त्या खालील प्राधान्य क्रमानुसार भरण्यात याव्यात.

1] मांग व भंगी जातीचे विद्यार्थी.
2] विमुक्त जाती व भटक्या जातीचे विद्यार्थी
3] अनुसूचित जमातीचे विद्यार्थी
4] अनुसूचित जातीतील विद्यार्थी
5] इतर मागासलेले व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थी.

वसतीगृहाचे व्यवस्थापन, अशाप्रकारे जागांमध्ये बदल करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात [परिशिष्ट "ड"] शिफारशीपूर्वक अर्ज करतील. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्थानिक परिस्थितीची पाहणी केल्यानंतर तसे करण्याबाबतची कारणे नमूद करून शासनाच्या पूर्वमान्यतेने अशाप्रकारे बदल करण्यास परवानगी देता येईल. अशा रितीने जागांमध्ये बदल करण्यास देण्यात आलेली परवानगी ही त्या विशिष्ट शैक्षणिक वर्षापुरतीच असेल. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाही वसतीगृहात प्रवेश देता येईल. मात्र त्यासाठी मंजूर जागांपेक्षा आणखी जादा जागा उपलब्ध असल्या पाहिजेत. मंजूर जागांपेक्षा आणखी २० टक्क्यांपर्यंत अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. आर्थिक दृष्टया मागासवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या २० टक्के जागांपैकी १५ टक्के जागा इतर मागासवर्गातील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी आणि राहिलेल्या ५ टक्के जागा इतर जातीसाठी राखून ठेवण्यात येतील.

[सहा] बाहेरगावच्या इयत्ता ५ वी पासूनच्या सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. तथापि अनाथ, अपंग, निराश्रित विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

[सात] ज्या गावी व त्या इयत्तेपुढील शिक्षणाची स्थानिकरित्या सोय उपलब्ध नाही अशा गावातून आलेल्या मागासवर्गीय / आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थिनींना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

[आठ] ज्यांच्या आई-वडीलांचे किंवा पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २४,०००/- पेक्षा किंवा शैक्षणिक प्रयोजनासाठी शासन वेळोवेळी निश्चित करील अशा उत्पन्नाच्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल अशा मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थिनींना वसतीगृहात प्रवेश देता येईल.

[नऊ] व्यवस्थापन प्रत्येक वसतीगृहासाठी बँकेत एक स्वतंत्रपणे खाते उघडेल. वसतीगृहाचा अधीक्षक आणि व्यवस्थापनाचा स्थानिक कोषाध्यक्ष हे खाते संयुक्तरित्या चालवतील.

[दहा] व्यवस्थापन आणि वसतिगृहाचा अधीक्षक समाजकल्याण विभागाच्या तपासणी अधिकाऱ्यास वेळोवेळी हवी असेल ती माहिती तत्परतेने वक्तशीरपणे पुरवील. व्यवस्थापन समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्ताची एक प्रत जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे पाठवील.

[अकरा] अनुदान मिळणारी मागासवर्गीय मुलींची वसतीगृह महिला तपासणी अधिकाऱ्यास तपासणीसाठी सर्व वेळी खुली असतील. तथापि कोणत्याही पुरुष तपासणी अधिकाऱ्याने सायंकाळी ६ ते सकाळी ६ वाजेपर्यंत मुलींच्या वसतीगृहात भेट देता कामा नये. मुलांच्या वसतीगृहाचा संबंध असेल अशी वसतीगृहे तपासणी अधिकाऱ्यांना तपासणीसाठी कोणत्याही वेळी खुली असतील.

[बारा] वसतीगृहाची व्यवस्था समाधानकारकरीत्या पाहिली जात नाही. असे दर्शविणारा प्रथम दर्शनी पुरावा ज्या प्रकरणात असेल अशा प्रकरणी तपासणी अधिकाऱ्यांना सदर वसतिगृहाच्या कामकाजाची चौकशी करण्याचा आणि वसतिगृहाच्या व्यवस्थापनाच्या संबंधात विशेषत: हिशोब ठेवणे, नोंदवह्या व अभिलेख ठेवणे, पर्यवेक्षी कर्मचारी वर्ग बाबतची माहिती आणि निवासी छात्रांचे वर्तन चांगले राहील व त्यांच्यात शिस्त राहील याची खात्री करून घेण्यासाठी केलेल्या व्यवस्थेच्या संबंधात चौकशीच्या प्रयोजनासाठी माहिती देणे संस्थेवर बंधनकारक राहिल. तशी सर्व माहिती देण्याविषयी व्यवस्थापनाने [illegible] दिला तर सदर वसतीगृहाची मान्यता काढून घेतली जाण्यास पात्र

[तेरा] [illegible] शासनाने योग्य हिशोब ठेवण्यासाठी [illegible] वेळोवेळी निर्देश देण्यात येईल. त्याप्रमाणे अभिलेख व नोंदवह्या ठेवल्या पाहिजेत. वसतीगृहाचे सर्व अभिलेख व नोंदवह्या वसतीगृहातच ठेवण्यात याव्यात आणि आवश्यक असेल तेव्हा त्या तपासणी अधिकाऱ्यास सादर करण्यासाठी जतन करण्याबाबत आवश्यक ती काळजी घेण्यात यावी. त्याचबरोबर आजारी छात्रांची माहिती वैद्यकीय उपचारविषयक माहितीचे रजिस्टरदेखील असावे.

| | नोंदवह्यांची यादी | जतन करावयाचा कालावधी. |
|---|---|---|
| १) | निवासी छात्रांची सामान्य नोंदवही | कायम ✓ |
| २) | रोकड वही/खाते वही/प्रमाणकांची फाईल | कायम ✓ |
| ३) | निवासी छात्रांची उपस्थिती नोंदवही | ५ वर्षे ✓ |
| ४) | वस्तुसंग्रह व स्थावर मालमत्ता नोंदवही | कायम ✓ |
| ५) | अन्नधान्य व इतर उपयोगी जिनसांची दैनंदिन खर्च दर्शविणारी आणि कपडे अंथरूण-पांघरूण व औषधे वाहारख्या इतर आवश्यक वस्तूंची संग्रह नोंदवही | ५ वर्षे ✓ |
| ६) | निवासी छात्रांची शैक्षणिक प्रगती दर्शविणारी नोंदवही | ५ वर्षे |
| ७) | देणगी नोंदवही | कायम |
| ८) | आलेल्या प्रवेश अर्जांची प्रवर्गनिहाय संख्या आणि प्रवेश दिलेल्यांची प्रवर्गनिहाय संख्या दर्शविणारी प्रवेश नोंदवही | ५ वर्षे |
| ९) | भेट-पुस्तक | कायम |
| १०) | ग्रंथालय नोंदवही | कायम |
| ११) | वैद्यकीय उपचार नोंदवही | ५ वर्षे |
| १२) | आवक व जावक नोंदवही | ३ वर्षे |
| १३) | मुलींची मासिक पाळी नोंदवही | ५ वर्षे |

१०) <u>मान्यता काढून घेणे.</u>

गंभीर स्वरूपाच्या उणिवा आणि किंवा गैरव्यवस्थापन असेल अशा प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संचालक, समाज कल्याण यांच्या पूर्व

पर्यंत, त्यांनी वसतीगृहाची मान्यता काढून घेता येईल. आढळून आलेल्या सर्व उणिवांच्या बाबतीत व्यवस्थापनावर न घुकता "कारणे दाखवा नोटीस" बजावून त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात यावे. व्यवस्थापनास याबाबतीत आपले म्हणणे स्पष्ट करण्यासाठी पुरेसा अवधी देण्यात यावा. असे स्पष्टीकरण मिळाल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी स्पष्टीकरणाची छाननी करतील आणि त्यांचे समाधान झाले नाहीत र याबाबतची कारणे नमूद करून वसतीगृहाची मान्यता संचालक, समाज कल्याण, पुणे यांच्या पूर्व परवानगीने काढून घेतील. मान्यता काढून घेतल्याच्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट तारीख नमूद करतील.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध सचिव, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे अपील करता येईल. व्यवस्थापनाने, मान्यता काढून घेण्याबाबतचा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपील दाखल केले पाहिजे. सदर अपील रु. २०/- च्या मुद्रांक कागदावर सादर करणे आवश्यक आहे. अशा सादर केलेल्या अपीलाची प्रतिलिपी संचालक, समाज कल्याण, पुणे संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधीत समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनाही पाठवाव्यात [प्रतिलिपी प्रतीत मुद्रांक कागदाची आवश्यकता नाही]

एखाद्या वसतीगृहाची मान्यता काढून घेण्यात आली असेल आणि त्या बंद वसतीगृहाच्याऐवजी नवीन वसतीगृहास मान्यता द्यावयाची असेल तेव्हा नवीन वसतीगृहास मान्यता देण्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास संचालक, समाज कल्याण यांचेमार्फत शासनाची परवानगी घ्यावी लागेल, एखाद्या वसतीगृहाची मान्यता शैक्षणिक सत्राच्या मध्येच काढून घेण्यात आली असेल तर त्या वसतीगृह प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत आवश्यक उपाययोजना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी वसतीगृहाची मान्यता काढलेल्या गावात/शहरात किंवा अन्यत्र दुसरे या योजनेतील मान्यता प्राप्त वसतीगृह असल्यास अशा वसतीगृहात या विद्यार्थ्यांची पर्यायी सोय करावी.

११] वसतीगृह व्यवस्थापनास बंधनकारक असे जादाचे नियम :-

सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या वसतीगृहाच्या व्यवस्थापनाने या नियमावलीत वर नमूद केलेल्या शर्तीशिवाय आणखी पुढील शर्तींचेही पालन केले पाहिजे.

[एक] वसतीगृहाचे ठिकाण किंवा भाड्याने घेतलेली इमारत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

दोन] जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेशिवाय वसतीगृहाचे व्यवस्थापन इतर कोणत्याही अभिकरणाकडे परस्पर हस्तांतरीत करता येणार नाही.

तीन] अधिक्षकाच्या नेमणुकीसाठी पूर्वमान्यता मिळविण्यात यावी. एकदा नेमणूक केलेल्या अधिक्षकाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय काढून टाकता येणार नाही.

[चार] निवासी छात्र किंवा कर्मचारी कोणत्याही राजकीय किंवा सांप्रदायिक चळवळीत भाग घेणार नाहीत किंवा त्यासाठी वर्गणी देणार नाहीत. स्वतः चळवळ करणार नाहीत/सहाय्य करणार नाहीत याची व्यवस्थापनाने खात्री करुन घेतली पाहिजे.

[पाच] जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास/समाज कल्याण अधिकाऱ्यास हवी असलेली विवरणे आणि माहिती नियत तारखांना पुरविण्यात येते, याची व्यवस्थापनाने खात्री करुन घेतली पाहिजे.

[सहा] वसतिगृहे तपासणीसाठी कोणत्याही वेळी खुली राहतील. याची व्यवस्थापनाने खात्री करुन घेतली पाहिजे. तथापि, पुरुष तपासणी अधिकाऱ्यांनी संध्याकाळी ६.०० ते सकाळी ६.०० या वेळेत मुलींच्या वसतिगृहांना भेट देता कामा नये.

[सात] वसतिगृहास दिलेली मान्यताही त्याच जिल्ह्यापुरती मर्यादित राहिल. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात वसतिगृह स्थलांतरित करता येणार नाही.

१२] योजनेचे अंतिम अधिकार :-

या योजने संदर्भात शासनाचे आदेश अंतिम राहतील.

परिशिष्ट ६.१

-338-

r 1.doc

# लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद नांदेड

जि.प.प्रशासकिय इमारत रेल्वेस्टेशन रोड नांदेड ४३१६०१.
प्रशासकिय इमारत रेल्वेस्टेशन रोड नांदेड ४३१६०१
दुरध्वनी - ०२४६२-२३४०५९, फॅक्स २३९०३७,२३४६६८
ई मेल :- eemizpnan@gamil.com www.zpnanded.org

30

जा /क्र/जिपना/लपावी/ताशा-१ /2015/1110 दिनांक :- 3 SEP 2015

(... नोंदणी पत्राव्दारे)

जिल्हा परिषद, नांदेड
सामान्य प्रशासन विभाग
आवक क्र....... ६९१
04 SEP 2015
खाते/शाखा
क.स. उप.मु.का.अ. अति.मु.का.अ. मु.का.अ.

प्रती

महासंचालक

महाराष्ट्र अभियांत्रीकी संशोधन संस्था

नाशिक.

विषय - पधंरा ते वीस वर्षापूर्वीच्या जुन्या अर्धवट बांधकामासंदर्भात तांत्रिक मार्गदर्शन मिळणे बाबत.

लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत नउ कोल्हापुरी पध्दतीच्या बंधारेच्या बांधकामाच्या कामास सन 2000 पुर्वी सुरवात करण्यात आली होती. सदरील कामाची यादी यासोबत जोडण्यात येत आहे.क्षेत्रीय व तांत्रिक अडचणी यामुळे ही बांधकामे अर्धवट स्थितीत आहेत. ही अर्धवट बांधकामे पूर्ण करावी किंवा कसे याबाबत तांत्रिक मार्गदर्शन करावे, ही विनंती.

सदर तांत्रीक मार्गदर्शनासाठी लागणारा खर्च या कार्यालयास अवगत करण्यात यावा जेणे करुन देयक अदाईसाठी पुढील कार्यवाही करणे सूलभ होईल .

सहपत्र – कामांची यादी.

— स्वाक्षरीत —
कार्यकारी अभियंता ( ल.पा.)
जिल्हा परिषद नांदेड

प्रत,

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड याना माहितीस्तव सादर.
2. मा.अधिक्षक अभियंता,लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, कार्यालय औरंगाबाद याना माहितीस्तव सादर
3. मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नांदेड याना माहितीस्तव सादर.

कार्यकारी अभियंता ( ल.पा.)
जिल्हा परिषद नांदेड

परिशिष्ट ७.१

जिल्हा परिषदेमधील प्रलंबीत अग्रीमांची वसूली करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्र.:झेडपीए-२००९/प्र.क्र.५२२/वित्त -९
मंत्रालय ,मुंबई -४०००३२.
दिनांक:- १० डिसेंबर, २०१०

जिल्हा परिषद, नांदेड. सामान्य प्रशासन विभाग
वित्त
2 MAY 2011

**प्रस्तावना:-** महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहिता १. .१० नुसार वेतन अग्रीम ,प्रवास भत्ता अग्रीम ,वाहन अग्रीम इत्यादी अग्रीमाच्या रकमा अधिकारी मंजुर करतात व नियम २१२ नुसार हयांचे योग्य ते अभिलेखे व रजिस्टर्स ठेवली जातात. अग्रीमांची वसुली /समायोजन वेळचे वेळी होणे अत्यंत आवश्यक आहे. भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या वार्षिक अहवालात २० जिल्हा परिषदा व ६ पंचायत समित्या यांच्या अभिलेखांच्या छाननीत मार्च, २००६अखेर रुपये १४.२७ कोटी रक्कमेचे कर्मचा-यांना/ अधिका-यांना दिलेले वैयक्तिक अग्रीम प्रलंबीत होते.

**शासन परिपत्रक:-** सर्व जिल्हा परिषदांना असे आदेश देण्यात येते आहे की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम २१० नुसार आपल्या कार्यालयाकडुन देण्यांत आलेले वेतन अग्रीम , प्रवास भत्ता अग्रीम , वाहन अग्रीम इ. सर्व प्रकारचे प्रलंबीत अग्रीमांची वसूली करण्याबाबत व त्यांचे नियम २१२ नुसार योग्य ते अभिलेखे व रजिस्टर्स ठेवणे व विशेष योजनाबध्द मोहिमेचे आयोजन करुन सदर अग्रीमे वसूल करावीत . याबदल पुढील प्रमाणे ठळक सूचना देण्यांत येत आहेत.

१. प्रलंबीत अग्रीमाची वसुली नियमाप्रमाणे तात्काळ करावी.
२. जे कर्मचारी बदलीने अन्यत्र बदलून जातात त्यांच्या प्रलबीत अग्रीमाची नोद त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रा मध्ये घेण्यांत यावी.
३. जे कर्मचारी /अधिकारी सेवानिवृत्त त्यांची वसुली नियमाप्रमाणे करावी.
४. जे कर्मचारी /अधिकारी मयत झाले त्यांचेकडुन अग्रीम वसूली होणे शक्य नाही त्यांचेबाबत निर्लेखनाची कार्यवाही करावी.
५. कार्यालय प्रमुखांनी जे अग्रीम दिले आहेत त्यांचे कागदपत्रांचा शोध घेऊन समायोजनाची कार्यवाही करावी.
६. वरील पैकी कार्यवाही करुनही वसुली होत नसल्यास सबधितांचे मालमत्तेतुन वसुली नियमाप्रमाणे करण्याची कार्यवाही महसुल खात्यामार्फत करावी. म्हणजेच आर.आर.सी.द्वारे वसुलीची कार्यवाही करावी.
७. अग्रीमांचे अभिलेख अदयावत व योग्य प्रकारे ठेवावे.
८. एकदा अग्रीम दिले असल्यास त्याची वसुली झाल्याखेरीज दुसरे अग्रीम देवू नये.

उपरोक्त बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ उचित कार्यवाही करावी. सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यांत आले असून संगणक सांकेताक क्र. २०१०१२१०१४२८१६००१ आहे.

परिशिष्ट ७.२

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना मंजूर केलेल्या विविध अग्रीमांच्या संदर्भातील कसूरदारांविरुध्द करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक अग्रीम–1095/प्र.क्र. 70/95/विनियम,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 26 सप्टेंबर 1997.

प्रस्तावना :–

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही शासकीय अधिकारी/कर्मचारी त्यांना मिळालेल्या विविध अग्रीमांचा विनियोग ज्या कारणाकरिता अग्रीम घेतले आहे, त्याकरिता करीत नाहीत. अग्रीम मिळविण्यासाठी गैरमार्गाचा अवलंब करतात, तसेच अग्रीम व व्याज परतफेडीच्या संदर्भात ज्या काही अटी व शर्ती घालून देण्यात आलेल्या आहेत त्यांचे पालन करीत नाहीत. अशा प्रकरणांत दंडनीय व्याज आकारुन संपूर्ण अग्रीमाची रक्कम एका हप्त्यात व्याज व मुद्दलाची रक्कम वसूल करणे शक्य होत नाही. यातून मार्ग काढण्याकरिता शासनाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :–

शासनाकडून प्राप्त झालेल्या अग्रीम व व्याज परतफेडीमध्ये कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :–

(1) मुंबई वित्तीय नियम, 1959, परिशिष्ट 26 मधील नियम क्रमांक 14(जी) व वित्त विभागाच्या दिनांक 6 नोव्हेंबर 1990 च्या शासन निर्णयानुसार कसुरदारांकडून अग्रीमाची रक्कम दंडनीय व्याजासहित एकरकमी वसूल करण्यात यावी.

(2) अग्रीमासाठी जो प्रचलित व्याजदर आहे त्यापेक्षा रुपये 2.75 प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याज आकारण्यात यावे.

(3) वरीलप्रमाणे अग्रीम व त्यावरील दंडनीय व्याजाची वसुली होऊ शकली नाही तर कसुरदारांच्या मालमत्तेतून महसुली थकबाकी वसूल करण्यासाठी जी कार्यपध्दती अवलंबिली जाते त्यानुसार अग्रीम व त्यावरील दंडनीय व्याजाची वसुली करण्यात यावी किंवा या संदर्भातील विहित कायद्यानुसार वसुली करण्यात यावी.

(4) वरील (3) प्रमाणे कार्यवाही करतेवेळीच कसुरदार कर्मचाऱ्यांच्या एकूण वित्तलब्धीतून अग्रीमाची व दंडनीय व्याजाची रक्कम अशा प्रकारे वसूल करण्यात यावी की, वेतन देयकावरील नियमित वसुली व अग्रीम किंवा दंडनीय व्याजाची रक्कम मिळून होणारी वसुली एकूण वित्तलब्धीच्या 50 टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही.

(5) वरीलप्रमाणे अग्रीमाची अथवा दंडनीय व्याजाची वसुली होऊ शकली नाही तर अग्रीमासाठी जामीन राहिलेले जेवढे जामीनदार असतील त्यांच्या वेतनातून समप्रमाणात व अग्रीम मंजुरीच्या आदेशात ठरवून दिलेल्या हप्त्याच्या रकमेइतकी रक्कम दरमहा याप्रमाणे एकूण अग्रीम व दंडनीय व्याजाची वसुली करण्यात यावी.

(6) खोटे प्रतिज्ञापत्र, खोटी सही, खोटा करारनामा इत्यादी सादर करुन शासनाची फसवणूक करण्यात आली आहे, असे आढळून आल्यास, संबंधित कर्मचाऱ्याचे विरुध्द मुंबई वित्तीय नियम, 1959, परिशिष्ट 26 मधील नियम 11 नुसार विभागीय चौकशी करण्यात यावी. तसेच, आवश्यकता वाटल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

(कृ.मा.प.

ह् ि लैंग ग ग ... 19 ... ग व ... ग त ... व ... व ... ग ... त ...

राष्ट्राच ... व ... ग ... व ... ह ... गत.

य ... गं

... य ... व.

लेखापाल (... क्षा ... )- राष्ट्र ... ₹ 4000.

लेखापाल (... क्षा)- राष्ट्र ... ₹ 4000.

लेखापाल (... क्षा)- राष्ट्र ... पुर.

लेखापाल (... क्षा)- राष्ट्र ... पुर.

... अकारा.

... अकारा.

... आगार.

... क ... व ... क ... न ... ह.

... व

... व

... व

... अ ... क ... क.

४ ... (... आ).

४ ... (... आ).

६ ... राष्ट्र ... ह.

६ ... राष्ट्र ... मंडल ... ह.

४ ... क ... क ... क ... पालय ... र.

... आगार ... क ... क ... ह/पु/ ... /न/ ... /क/क ... ता.

... क (... ) ... क ... क ... त ... /न/ ... /आ/ ... /न/ ... /क/क ... ता.

... आगार ... अकारा.

... आगार ... अकारा.

... य ... च्या ... पालय ... पालय ... .

... य ... ल ...

... अ ...

... कार.

... व ... अकारा.

... अकारा.

... राष्ट्र ... दि ... 1 1 0 1.

... गत.

---

... .

परिशिष्ट ८.१

विंधण विहिरींवर बसविलेल्या हातपंप/
विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्ती.
देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्र. आपना.३३०७/ प्र.क्र.२६/ पापु.१५
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ७ एप्रिल, २००८.

वाचा:-

१) शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जीडब्ल्यूओ १४७७/ ५२२०/ सोळा दिनांक ३१ मार्च १९७८
२) शासन निर्णय ग्रामविकास विभाग, क्र. जीडब्ल्यूओ १४८०/ ४६१७/ (४५१७) सोळा दिनांक ३१ जुलै, १९८१
३) शासन निर्णय ग्रामविकास विभाग, क्र. जीडब्ल्यूओ १४८१/ सीआर ४५८४/ सोळा दिनांक ११ सप्टेंबर, १९८१
४) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.भूजल १०९५/ प्र.क्र.२१७/ ४३, दिनांक १७ जानेवारी, १९९६
५) शासन निर्णय ग्रामविकास विभाग, क्र.भूजल १०९६/ प्र.क्र.२४१/१४, दिनांक १६ फेब्रुवारी, १९९६
६) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. आपना ११९६/ प्र.क्र.८८/ पापु.१५, दिनांक ९ सप्टेंबर, १९९८
७) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. भूजल १०९८/ प्र.क्र.४६५/ पापु.१५, दिनांक १६ ऑक्टोबर, १९९८

प्रस्तावना:-

प्रस्तावनेत उल्लेखित क्र. १ येथील आदेशान्वये, हातपंप व विद्युतपंपाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता त्रिस्तरीय योजना अंमलात आणण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत गाव पातळीवर, तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवर दुरुस्ती संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूत्रे निश्चित करण्यात आली असून सदर योजनेनुसार, जिल्हयातील हातपंपाची व विद्युतपंपाची संख्या विचारात घेवून, जिल्हा परिषदांनी वर उल्लेखित क्र.१ येथील शासन निर्णयात नमूद सूत्रानुसार आवश्यक पदे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर निर्माण करुन, त्या त्या जिल्हा परिषदांनी भरणे आवश्यक आहे. देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक अवजारे, सुटे भाग, वाहनांचे इंधन व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांवरील खर्च देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये

जमा रक्कमेतून भागविणे आवश्यक आहे. सुरुवातीस, जिल्हा परिषदांनी स्वत:च्या निधीमधून देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक ती तरतूद करुन त्यामधून खर्च करावयाचा आहे व नंतर देखभाल व दुरुस्तीची वर्गणी वसूल करुन त्याची भरपाई करावयाची आहे. जिल्हा स्तरावर निर्माण केलेल्या देखभाल व दुरुस्तीमध्ये रुपये ५०० प्रती हातपंपास व रुपये २५०० प्रती विद्युतपंप याप्रमाणे वर्गणीची रक्कम संबंधित ग्रामपंचायतीकडून वसूल करुन जमा करावयाची आहे. या व्यतिरिक्त देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यात येणारे शासकीय अनुदान तात्काळ जमा करणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत देखभाल व दुरुस्तीची वर्गणी नियमितपणे वसूल करण्यात येत नसल्याने जिल्हा परिषदांना त्रिस्तरीय योजनेअंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा केले जात नाही असे हातपंप/ विद्युतपंप कर्मचारी संघटनेनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील ग्रामीण भागामध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या हातपंप/ विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी मूळात ग्रामपंचायतीची असून त्यांनी **किमान रुपये ७५ प्रती कुटुंब वसूल करुन त्यातून त्याबाबतचा खर्च भागविणे आवश्यक असून** व जिल्हा परिषदेला प्रती हातपंप/ विद्युतपंपामागे द्यावयाच्या रकमेची अदायगी केली पाहिजे. प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे अशी वसूली नियमितपणे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, सद्यस्थितीत हातपंप/ विद्युतपंपाची संख्या मोठया प्रमाणावर वाढली असल्यामुळे देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये खालीप्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) यशस्वी विंधन विहिरीवरील प्रत्येक हातपंपाची दरवर्षाची वर्गणी रुपये १०००/- (रुपये एक हजार )

२) यशस्वी विंधन विहिरीवरील प्रत्येक विद्युतपंपाची दरवर्षाची वर्गणी रुपये ५०००/- (रुपये पाच हजार )

२. याबाबत असेही आदेश देण्यात येत आहे की, जर ग्रामपंचायतीकडून वरील प्रमाणे रक्कम वसूल करुन जमा करण्यात आली नाही तर ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या अनुदानातून जिल्हा परिषदेने at

source कपात करुन ती रक्कम देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये जमा करावी. **त्रिस्तरीय योजनेअंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्याची प्राथमिक जबाबदारी जिल्हा परिषदेची असल्यामुळे जिल्हा परिषदेने वसूलीच्या कामाला प्राधान्य द्यावे व वरील प्रमाणे नियमितपणे रक्कम वसूल होईल याबाबत दक्षता घ्यावी.**

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.वि.कोळेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
५. सर्व विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
६. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
७. उप अभियंता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जिल्हा परिषद (सर्व)
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
९. मुख्य अभियता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
११. उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१४. वित्त विभाग ( व्यय-३, अर्थसंकल्प -२०)
१५. ग्राम विकास व जलसंधारण विभाग (जल-२ व जल-४ क्र २५ व २७)
१६. अप्पर मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्विय सहाय्यक
१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
१८. निवड नस्ती (पापु.१५)

परिशिष्ट ९.१

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व साक्षरता यासाठी महाराष्ट्र राज्याच्या कृति कार्यक्रमाची अंमलबजावणी ...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांसाठी किरकोळ खर्चाचे प्रमाण वेतन खर्चाच्या ४ % पर्यंत वाढविणे.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्रमांक:पीआरई १०९४/७०४/[दोन]/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ नोव्हेंबर, १९९४

पार्श्वभूमी :- १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये इ.स.2000 पर्यंत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याचे उद्दिष्ट नमूद करण्यात आले असून हे उद्दिष्ट गाठण्याचे दृष्टीने त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता उंचावण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सुचविण्याकरिता शासनाने ऑक्टोबर, १९९२ मध्ये एका कार्यबल गटाची नियुक्ती केली होती. या कार्यबल गटाने आपला अहवाल शासनास सादर केला. सदर अहवालातील शिफारशी शासनाने स्वीकारुन त्यांच्या अंमलबजावणीस तत्वत: मान्यता दिलेली आहे. कार्यबल गटाने सुचविलेल्या अनेक योजनांपैकी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांसाठी किरकोळ खर्चाचे प्रमाण वेतन खर्चाच्या ४ % पर्यंत वाढविणेबाबतची एक योजना आहे.

महाराष्ट्रातील एकूण ५९२९९ प्राथमिक शाळांपैकी बहुतांश शाळा स्थानिक स्वराज्य संस्थांनी म्हणजेच जिल्हा परिषद/नगरपरिषद/नगरपालिका यांनी चालविलेल्या असून त्यांना प्राथमिक शिक्षणासाठी शासनाकडून अनुदान मिळते. शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वत:च्या उत्पन्नातून किमान काही निधी उपलब्ध होऊन शैक्षणिक साहित्य उपलब्ध होऊ शकते. तथापि, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांची अवस्था मात्र तितकीशी चांगली नाही. शासन जिल्हा परिषदांना प्राथमिक शिक्षणावरील वेतन खर्चासाठी १०० % अनुदान देते. परंतु वेतनेतर खर्चासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरवर्षी रु.५/- आणि शिक्षकामागे दरमहा रु.४/- अशी अत्यल्प तरतूद उपलब्ध करते. त्यामुळे सर्वसाधारणत: प्रत्येक वर्गामागे दरवर्षी २५०-३०० रुपये उपलब्ध होतात. त्यापैकी मोठा भाग खडू व इतर दैनंदिन आवश्यक साहित्यापोटी खर्च होतो. बहुतांशी प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचा अभाव असल्याने शाळा अनाकर्षक झाल्या असून या प्राथमिक शाळांतून देण्यात येत असलेले शिक्षण निरस झाले आहे. त्यामुळे दाखल झालेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींपैकी

मध्येच शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त झाले असून सद्यस्थितीत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे लक्ष्य गाठणे शक्य होणार नाही व ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांची ही परिस्थिती लक्षात घेऊन कार्यबल गटाने या शाळांना दिल्या जाणाऱ्या किरकोळ खर्चाच्या प्रमाणात वाढ करण्याची शिफारस केली आहे.

शासन निर्णय :- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि साक्षरता कार्यक्रम या वरील महाराष्ट्र राज्याच्या कृतिकार्यक्रमामध्ये शिफारस केल्याप्रमाणे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी, म्हणजे जिल्हा परिषद/नगरपरिषदा/नगरपालिका यांनी चालविलेल्या प्राथमिक शाळांकरिता भौतिक शैक्षणिक सुविधा व दैनंदिन उपयोगाचे साहित्य उपलब्ध व्हावे याकरिता मागील वर्षाच्या वेतन खर्चाच्या ४ % पर्यंत सादिलवार खर्च खालीलप्रमाणे टप्प्याटप्प्याने मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १] | सन १९९४-९५ | २% |
| २] | सन १९९५-९६ | ३% |
| ३] | सन १९९६-९७ व त्यापुढील प्रत्येक वर्षी | ४% |

२. शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया मनोरंजक व अध्ययनाला अनुकूल व्हावी, वातावरण आकर्षक व्हावे, शिक्षण आनंददायी व्हावे, मुले शाळेत रमावीत यादृष्टीने आवश्यक भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्याचे दृष्टीने साहित्य खरेदी करण्याकरिता व कमी किंमतीचे शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी तसेच पुरविलेले शैक्षणिक साहित्य व यंत्रसामुग्री यांची दुरुस्ती व देखभाल याकरिता या रकमेचा वापर करावा.

३. सादिलवार खर्चाकरिता मंजूर केलेल्या रकमेतून शाळा पातळीवर खर्च करण्यासाठी अनुज्ञेय बाबींची मार्गदर्शक यादी प्रपत्र "अ" मध्ये दिली आहे. तर जिल्हा पातळीवर खर्च करण्यासाठी अनुज्ञेय साहित्याची यादी प्रपत्र"ब" मध्ये दिली आहे.

४. सादिलवार खर्चाकरिता मंजूर केलेल्या अनुदानाचे वाटप जिल्हा स्तरावर खरेदी करावयाच्या साहित्यासाठी २० % व शाळा स्तरावर खरेदी करावयाच्या साहित्यासाठी ८० % या प्रमाणात शिक्षण संचालकांनी करावे. सादिल खर्चाकरिता अनुज्ञेय होणारी रक्कम प्रत्येक शाळेच्या माहे जून व डिसेंबर या महिन्याच्या वेतन देयकामध्ये स्वतंत्र दर्शवून देण्यात यावी. सन १९९४-९५ या वर्षापासून पूर्वीच्या सूत्रानुसार सादिल खर्चाकरिता देण्यात येणारे अनुदान बंद करण्यात येत आहे.

४. जिल्हास्तरावर करावयाच्या २० टक्के खर्चापैकी निम्मी रक्कम शाळा दुरुस्तीकरिता राखून ठेवावी व उर्वरित रकमेतून प्रपत्र "ब" मध्ये नमूद केलेल्या साहित्यावर खर्च करावा. जिल्हा स्तरावरील खर्च करावयाची रक्कम शाळानिहाय खर्च न करता एकत्रित रकमेतून आवश्यकतेनुसार खर्च करावी.

५. या योजनेसाठी होणारा खर्च "२२०२-सर्वसाधारण शिक्षण-०१-प्राथमिक शिक्षण १०३-प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य -१०३[एक][१][एक]महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने [२२०२ ०१७३] मागणी क्रमांक ई-२" या अर्थशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

वित्त विभाग

६. सदर खर्च शासन ज्ञापन,क्रमांक:आकनि ११९४/१३९/अर्थसं.४, दिनांक ११ नोव्हेंबर,१९९४ अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या अग्रीम रु.२०,०००/- मधून भागविण्यात यावा.

७. आकस्मिकता निधीतून मंजूर अग्रीम रक्कम रु.२०००/- दिनांक ३१ डिसेंबर, १९९४ पूर्वत खर्च करावी व प्रत्यक्ष खर्ची पडलेल्या रक्कमेबाबत सविस्तर अहवाल शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे यानी शासनास सादर करावा.

८. संबंधित खर्च हा आकस्मिकता निधी अग्रीमामधून खर्ची पडणार असल्यामुळे महाराष्ट्र आकस्मिकता निधी नियमावलीतील नियम क्रमांक ६, ८ व १२ प्रमाणे देयके सादर करतांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

१] आकस्मिक निधीतून करण्यात येणाऱ्या खर्चासंबंधीच्या प्रत्येक प्रमाणकावर तांबड्या शाईने "रूपये आकस्मिक निधीतून" अशी नोंद घेण्यात यावी.

२] आकस्मिक निधीतून मंजूर झालेली रक्कम जर पूर्ण खर्च होणार नसेल तर, अग्रीम रक्कम कमी करण्यासाठी शासनाकडे वेळीच प्रस्ताव सादर करण्यात यावा.

३] आकस्मिक निधीतून खर्च करण्यात येणाऱ्या रकमेचा सतत मेळ घालण्यात यावा.

४] आकस्मिक निधीतून केलेल्या खर्चासाठी काढावयाची रक्कम वेगळी बिले पाठवून काढावी.

५] अशा प्रत्येक बिलावर व प्रत्येक पत्रावर वित्त विभागाने ज्या शासकीय ज्ञापनाव्दारे अग्रीम मंजूर केले आहे, त्याचा क्रमांक व दिनांक नमूद करावा.

६] बिलासोबत पाठविलेल्या स्लीपवर लेखाशीर्ष संकेतांक व खर्चाचा संकेतांक ८०००-१३९-८ असा नमूद करावा.

९. हा शासन निर्णय,नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या-

अनौपचारिक संदर्भ क्रमांक: ८०९/९४/व्यय-५-अ, दिनांक ११ नोव्हेंबर, १९९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

कुमुद बंसल

[ कुमुद बन्सल ]
सचिव[शिक्षण]

प्रति,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व शिक्षणाधिकारी[प्राथमिक], जिल्हा परिषद
महालेखापाल[लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल[लेखा परीक्षा], महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक
नियोजन विभाग
वित्त विभाग[व्यय-५, अर्थसं. ६]
ग्राम विकास विभाग
कार्यासन क्र. अर्थसं. १, अर्थसं. २, शालेय शिक्षण विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई [दोन प्रती]
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, "बालचित्रवाणी", पुणे
संचालक, [प्रौढ शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, "बालभारती", पुणे

प्रत निवड नस्ती, कार्यासन प्राशि-१

## प्रपत्र "अ"

### शाळा पातळीवर खरेदी करण्यायोग्य साहित्याची मार्गदर्शक यादी

१] खडू [रंगीत, पांढरे वगैरे]
२] कागद [कोरे, रेघी, बदामी, ड्राइंग]
३] पेन [साधा, स्केच वगैरे]
४] गोंद आणि फेव्हिकॉल
५] पेन्सिल [काळी, रंगीत वगैरे]
६] कलरबॉक्स [वॉटर कलर, ऑईल पेंट वगैरे ]
७] कार्बन
८] फाईल कव्हर
९] कोरे रजिस्टर [इतिवृत्त लिहिणे, सूचना वही वगैरेसाठी.]
१०] वह्या [टाचणासाठी, नोंदीसाठी वगैरेसाठी.]
११] विविध प्रकारच्या ऑडिओ आणि व्हिडीओ कॅसेटस्
१२] टाचण्या
१३] स्टेपलर
१४] स्टेपलर पीन
१५] टेबलक्लॉथ
१६] विविध फोटो [राष्ट्रनेते, साहित्यीक, सरस्वती, संशोधक वगैरे]
१७] ब्लॅक बोर्ड पेंट
१८] टॅग
१९] गुंडाळी फळे
२०] विविध प्रकारचे शिक्के [शाळा, मुख्याध्यापक वगैरे]
२१] शाईचे पॅड
२२] पॅड इंक
२३] शोकेस
२४] कचरापेटी
२५] कुलूप
२६] पाणी पिण्याचे ग्लास
२७] पाण्याचे पिंप
२८] शाळा, ऑफीस, वर्गाच्या पाट्या किंवा बोर्ड
२९] बागकाम अथवा शोभेसाठी कुंड्या
३०] कात्री

३१] शाळेतील विविध माहितीपत्रकासाठी लागणारे बोर्डस्
३२] बॉक्सटाईप व रोटो मशीन
३३] कपबशा
३४] स्टोव्ह
३५] वजनकाटा
३६] राष्ट्रध्वज
३७] दोन वर्तमानपत्रे
३८] सर्व प्रकारची शैक्षणिक मासिके, वाचनालय पुस्तके
३९] नकाशा स्टॅण्ड
४०] लाईट बल्ब/ट्यूब/विजेचे साहित्य
४१] पाण्याचे जग
४२] पातेले/मग/भांडी/गुलास वगैरे
४३] कार्यानुभव, उद्योग, कला, संगीत साहित्य
४४] प्रथमोपचार पेटी
४५] बादली
४६] टॉवेल
४७] भिंतीचे घड्याळ
४८] घंटा
४९] दंतमंजन
५०] नेलकटर
५१] आरसा
५२] कंगवा
५३] कॅमेरा
५४] फोटो रोल
५५] रांगोळी
५६] विविध प्रकारचे माती-रंग
५७] हार्ड बोर्ड
५८] कार्ड बोर्ड
५९] थर्माकोल
६०] सुतळी
६१] दोरे

६२] जिलेटीन पेपर

६३] खराटा व केरसुणी

६४] विज्ञान साहित्य - नाशवंत व अनाशवंत

६५] विविध प्रकारचे नकाशे/चार्टस्

६६] पृथ्वीचा गोल

६७] खेळाचे साहित्य -डंबेल्स,लेझीम,घुंगरकाठी,दोरी,लगोऱ्या इ.

६८] लाऊड स्पीकरचा सेट

६९] अक्षरखेळ संच

७०] चित्र जुळवणी संच

७१] लोकर

७२] फ्लॅनेल कापड

७३] फ्लॅनेल बोर्ड

७४] भाषेचे तक्ते

७५] गणित पेटी

७६] भूमिती पेटी

७७] बँड पथक साहित्य

७८] अभ्यासक्रम पुस्तिका

७९] हस्तपुस्तिका

८०] लोकनृत्य साहित्य

८१] टूल बॉक्स

८२] कार्यानुभव साहित्य-बागकाम वगैरे

८३] संगीत साहित्य

८४] योगासन तक्ते

८५] बीजगम बॉक्स

८६] विविध प्राणी/वनस्पती/मातीचे नमुने,मॉडेल्स

८७] अंक खेळ संच

८८] पॉलिथिन बॅग्ज

८९] रंगीत शाईच्या पुड्या.

९०] कापूस,बटन,टिकल्या,ब्लेड,सेलोटेप

९१] विविध भूमितीय आकाराचा संच

९२] घनाकृती विविध आकाराचे ठोकळे

९३] गुणाकाराचे चौरस संच

- ४ -

९४] वर्णमाला इंग्रजी संच
९५] प्रक्रिया चिन्हांचा संच
९६] अर्ध्या अक्षरांचा संच
९७] अक्षर चिन्हांचा संच
९८] वृध्दी चिन्हांचा संच
९९] प्रक्रिया चिन्हांचा संच + ÷ x –
१००] लाकडी मण्यांच्या माळा
१०१] सुटे मणी
१०२] संख्या स्टॅण्ड
१०३] घा जिना
१०४] संख्…ाल क्रियाचे स्टॅण्ड
१०५] चित्रदीप
१०६] जिगसॉ खेळणी
१०७] मनोरे रिंगाचे/ठोकळ्याचे
१०८] शिवण पेटी
१०९] घराचे मॉडेल्स
११०] लोहचुंबक
१११] ग्रहणपेटी
११२] ग्रहमाला
११३] मुखवटे
११४] बाहुली नाट्याच्या खेळाचे साहित्य
११५] घड्याळाचे मॉडेल
११६] धरणाचे मॉडेल
११७] विविध रंगाचे ठोकळे
११८] सर्व प्रकारचे नकाशे-भारत-जिल्हा-राज्य-राजकीय-भौगोलिक वगैरे
११९] डस्टर
१२०] शाळा बागकामासाठीचा आवश्यक खर्च
१२१] शाळा कुंपणासाठी लागणारा जुजबी खर्च
१२२] शाळा सजावट/वर्ग सजावटीसाठी लागणारा खर्च
१२३] शैक्षणिक साहित्य व यंत्रसामुग्री यांची दुरुस्ती व देखभाली करिता लागणारा खर्च.
१२४] जीवन शिक्षण मासिक तसेच शासनाने वेळोवेळी प्राथमिक शाळांच्या उपयोगाकरिता मान्य केलेली पुस्तके.

## प्रपत्र – "ब"

## जिल्हा पातळीवर खरेदी करण्यायोग्य साहित्याची यादी

१] टेबल [लोखंडी व सनमायका टॉप]

२] आलमारी [लोखंडी]

३] लोखंडी रॅक

४] खुर्ची

५] फळे [लाकडी]

६] ड्युएल डेक्स

७] साधी बाके : अ] इ. १ ली व २ री साठी कमी उंचीची
ब] नियमित आकाराची

८] आसन पट्टया : अ] सुताच्या
ब] १ ली व २ री साठी लाकडी पट्टया जिथे साधी बाके पुरविली आहेत.

९] विद्यार्थी हजेरी पट

१०] शिक्षक हजेरी पट

११] उपस्थिती गोषवारा रजिस्टर

१२] विविध प्रकारचे रजिस्टर्स –
अ] कॅशबुक
ब] स्टॉकबुक
क] पगार वाटप रजिस्टर
ड] इत्यादी

१३] पगार देयक तयार करणेसाठी लागणारे फॉर्मस् व इनक्लोजर्स.

जिल्हा परिषदेमधील बांधकाम
लघुपाटबंधारे विभागातील कामाचे कं
देताना निधी व कामाची विभागणी
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक. झेडपीए-१०९३/प्र. क्र. १५१६ (भाग-२)/३३.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ एप्रिल २०००.

वाचा : (१) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-१०८९/प्र. क्र.८५४/३३, दिनांक ८.२.१९९०.

(२) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-१०९३/प्र. क्र. १५१६/३३, दिनांक १०.१२.१९९३.

परिपत्रक

शासनाने जिल्हा परिषदांमधील बांधकाम विभाग व लघुपाटबंधारे विभागा कामाच्या विभागणीस केवळ अपवादात्मक परिस्थितीत अनुमती दिली हो ही अनुमती देताना कामाची विभागणी करण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याची मान घ्यावी असे स्पष्ट निर्देश शासनाने दिले होते. तथापि या निर्देशांचे पालन करता कोणतेही संयुक्तीक कारण नसताना कामाची विभागणी अग्राह्य नियमबाह्य पद्धतीने करण्यात येत असल्याचे शासनाचे निदर्शनास आले पंचायती राज समितीने या प्रकाराबाबत तीव्र आक्षेप घेतलेला आहे.

शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद तसेच पंचा समितीमधील निधीचे वाटप [illegible] करण्यात येते व अशा निधीम [illegible] कामे घेण्यात येतात, त्यातील कामाचे अनेक तुकडे करून कामे करण्य येतात. अशा पद्धतीमुळे पुढे जिल्हा परिषदांचे आर्थिक नुकसान होण्य शक्यता असते.

वरील बाब लक्षात घेऊन शासन असे आदेश देत आहे की, कोणत्याही परिस्थीतीत कामाचे विभाजन करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद वा पंचायत समितीने निधी व कामांचे सदस्यनिहाय वाटप करणे तात्काळ बंद करावे.

संबंधित सक्षम अधिका-यांनी बांधकामाला तांत्रिक मान्यता देतेवेळी व तसेच निविदा मागविण्यापूर्वी कामाची विभागणी केलेली नाही याची तपासणी करावी. कामाची विभागणी शासनाची पूर्वअनुमती न घेता केली असल्याचे आढळल्यास त्यांनी त्याबाबतचा अहवाल तात्काळ वरिष्ठ अधिकारी व या विभागाला पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जयश्री चौधरी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

परिशिष्ट ११.१



**जिल्हा परिषदांकडे बांधकामे, बंधारे, पाझर तलाव व रस्ते इत्यादी कामांबाबत योग्य नियोजन व संनियंत्रणाबाबत.**

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक पंरास-१००१/प्र. क्र. १६/३८,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दि. ३१ जानेवारी, २००१

**पार्श्वभूमी**

विधान मंडळाच्या पंचायती राज समितीच्या जिल्हा परिषद, नाशिक भेटी संदर्भात मंत्रालयीन सचिवांची साक्ष दिनांक १६, १७ जानेवारी, २००१ रोजी घेण्यात आली. अर्थसंकल्पीय तरतूद पुरेशी नसताना मोठ्या प्रमाणावर कामे सुरू केली जातात. त्यामुळे कामे अपूर्ण राहतात. अपूर्ण कामे पूर्ण न करता पुन्हा नवीन कामे सुरू करण्यात येतात. यामुळे अपूर्ण कामांवरील शासन निधी विनाकारण अडकून राहतो. पुन्हा अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सुधारित तरतूद करावी लागते. यासाठी शासनाला अपूर्ण कामावर जादा निधी खर्च करावा लागतो. बांधकामे, बंधारे, पाझर तलाव, रस्ते या कामांकरिता नियोजन आणि अंमलबजावणी यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. ही बाब पंचायत राज समितीला प्रकर्षाने आढळून आली. म्हणून कामाचे नियंत्रण योग्य होण्यासाठी आणि सुसूत्रता आणण्यासाठी शासन पुढील आदेश देत आहे.

**शासन निर्णय**

१. जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी दरवर्षी पूर्ण केलेल्या कामांची आणि अपूर्ण असलेल्या कामांची स्वतंत्र यादी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण वार्षिक सभेत मान्यतेसाठी सादर करावी. कामाची यादी परिशिष्ट "अ" नुसार सादर करावी.

जिल्हा परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने या यादीस मान्यता दिल्यानंतर ती प्रसारीत करण्यात यावी.



२. प्रत्येक कामासाठी किती पटीपर्यंत प्रशासकीय मान्यता देता येईल हे शासन आदेशानुसार ठ...५. ... अपेक्षा ... प्रशासकीय मान्यता द्यावयाची झाल्यास ती अपवादात्मक द्यावी व त्यासाठी स्पष्ट अभिप्राय असावेत. अर्थसंकल्पीय तरतुदीबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी स्पष्ट अभिप्राय द्यावेत. कोणत्याही परिस्थितीत एक हजार किंवा दोन हजार अशा नाममात्र तरतुदीची पद्धत बंद करण्यात येत आहे.

३. कामाच्या अंदाजपत्रक व नकाशामध्ये काही दोष नंतर आढळून आल्यास तांत्रिक मान्यता देणाऱ्या प्राधिकाऱ्यास त्यासाठी जबाबदार धरण्यात येईल.

४. प्रशासकीय मान्यता दिलेल्या क्रमाने काम पूर्ण करावे. क्रम सोडून काम हाती घेतल्यास ती परिस्थिती स्पष्टपणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर सादर करावी.

५. कोणत्याही दुरुस्ती व देखभालीच्या कामांना अधीक्षक अभियंत्यांनी दिलेली सहमती ही प्रशासकीय मान्यता समजण्यात येणार नाही. प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषदेच्या संबंधित समितीनेच द्यावयाची आहे. संबंधित समितीच्या मंजुरीशिवाय कामाची सुरुवात कोणत्याही परिस्थितीत करू नये.

६. अपूर्ण कामांना खाते प्रमुख जबाबदार धरला जाईल. अपूर्ण कामांचा आढावा खाते प्रमुखांनी घेऊन दरवर्षी अपूर्ण कामासाठी अर्थसंकल्पात तरतूद राहील याची काळजी घ्यावी. वार्षिक तरतुदीपेक्षा जास्त निधी आवश्यक असल्यास आर्थिक वर्षाच्या तरतुदीच्या ७० % आर्थिक निधी अपूर्ण कामांसाठी ठेवावा.

७. निविदा प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करावी. एखाद्या कामात ५० पेक्षा जास्त लाभार्थी सदर कामास अनुकूल नसतील तर ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी व त्यांनी योग्य खातरजमा करून काम बंद करण्याचा निर्णय घ्यावा.

८. कामाची निविदा अंतीम करून आदेश दिल्यानंतर कामाची प्रगती आणि काम पूर्ण करण्याची जबाबदारी कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता व उप अभियंता यांची राहील. यांचेवर कार्यकारी अभियंता व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे काटेकोर नियंत्रण राहील.

९. ठेकेदारांना देण्यात आलेल्या कामांची यादी वेळोवेळी वर्षात प्रसारीत करण्यात यावी. मजूर सहकारी संस्थांना एकावेळी तीनपेक्षा जास्त कामे देऊ नये. तसेच एकंदर रक्कम ५ लाखांपेक्षा जास्त असता कामा नये. ठेकेदारांनी काम अपूर्ण ठेवल्यास, समयनिहाय प्रगती न केल्यास, कामामध्ये दिरंगाई व निष्काळजीपणा दाखविल्यास ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव त्वरित सादर करावा. काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय झाल्यास अशा ठेकेदारास नवीन काम देण्यात येऊ नये.

१०. प्रगतीपथावरील कामाबाबत मोजमाप नोंदी समयनिहाय घेण्यात याव्यात व या कामाबाबतची देयके अदायी प्रस्ताव वेळेवर सादर करावा.

११. कामाची देयके पारीत करताना सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची बाब तपासण्याची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांची राहील.

१२. ब-एक व ब-दोन कामाच्या निविदा नमुन्यातील अट ३ (क) खाली काम काढून घेण्याचा निर्णय झाल्यास जुन्या ठेकेदाराकडून करावयाची वसुली या संदर्भातील कार्यवाहीचा अहवाल मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच बांधकाम समिती यांना सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जयश्री चौधरी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट " अ "

| अनु-क्र | विषय | कामाचे स्वरूप | तांत्रिक मान्यता रक्कम | कामाची निविदा रक्कम | प्रशासकीय मान्यता रक्कम | कामाची पद्धती | ठेकेदाराचे नाव ([illegible]) | कामाच्या आदेशाचा दिनांक | कामाची मुदत | काम पूर्णत्वाचा दाखला दिनांक | कामाची खर्च रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरुवातीची शिल्लक कामे | | | | | | | | | | | |
| २ | वर्षभरात मंजूर केलेली कामे | | | | | | | | | | | |
| ३ | वर्षभरात पूर्ण केलेली कामे | | | | | | | | | | | |
| ४ | वर्षा अखेरीस शिल्लक कामे | | | | | | | | | | | |

टीप : (१) वरील प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र फॉर्म्स वापरावे.
(२) अभिप्राय रकान्यात निविदा किती टक्कंनी मंजूर होती, कामात वाढ किंवा बदल झाला काय, असल्यास किती ? त्यांत बचत किंवा जादा खर्च झाला काय ? इ. आवश्यक ती माहिती नमूद असावी.

परिशिष्ट ११.२

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी ग्रामस्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे बँक खाते चालविण्याबाबत मार्गदर्शक सूचना..

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-११११/प्र.क्र.०७१/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ०२ डिसेंबर, २०११**

**वाचा:-** १)शासन निर्णय, पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.१०८/ पापु-०७, दि.२३ सप्टेंबर,२००८
२) शासन निर्णय पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.०८२/ पापु-०७, दि.१२ ऑगस्ट,२००९
३) शासन निर्णय पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.०८२/ पापु-०७, दि.१८ नोव्हेंबर,२००९
४)शासन निर्णय पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१९९/ पापु-०७, दि.१५ ऑक्टोबर,२०१०

**प्रस्तावना :**

संदर्भ क्र.१ अन्वये, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, जिल्हा परिषदांकडून योजनांसाठी निधी वितरीत करण्याच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्यात आलेले आहेत, त्या नुसार हा निधी, जिल्हा परिषदांकडून, ग्रामपंचायतीमार्फत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना उपलब्ध करून देण्यात येतो.

२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येते. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे पार पाडण्यासाठी निधी जिल्हा परिषदांकडून ग्रामपंचायतीमार्फत समितीच्या बँक खात्यावर उपलब्ध करुन दिला जातो. अनेक समित्यांकडून या निधीचा गैरवापर होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

३. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांच्या अध्यक्ष व सचिव यांचेकडून होणा-या गैरव्यवहारास आळा घालण्यासाठी शासनाने संदर्भ क्र.२ व ३ येथील अनुक्रमे दि. १२ ऑगस्ट,२००९ व दि.१८ नोव्हेंबर,२००९ च्या शासन निर्णयान्वये, समितीच्या पदसिद्ध अध्यक्ष व सचिवपदी अनुक्रमे सरपंच व ग्रामसेवक यांना आणण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या शासन निर्णयास उच्च न्यायालयाच्या नागपूर, औरंगाबाद खंडपीठातून दाखल झालेल्या याचिकांद्वारे मोठ्या प्रमाणावर आव्हान देण्यात आले. ही तरतूद मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदींशी विसंगत असल्याने, ती न्यायालयाने रद्दबादल ठरविली आहे. त्यामुळे संदर्भ क्र.४ येथील दि.१५ ऑक्टोबर,२०१० च्या शासन निर्णयानुसार सद्यस्थितीत, समितीची पुर्वीचीच रचना अस्तित्वात आहे.

६. ग्राम पाणी पुरवठ व स्वच्छता समिती मुंबई ग्राम पंचायत अधिनियम,१९५८ च्या कलम ४९ अनुसार स्थापन करण्यात येताता.या समित्या ग्राम पंचयातींचा अविभाज्य घटक आहेत. त्यामळे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या व्यवहारांवर ग्राम पंचायतींचे नियंत्रण आणण्यासाठी तसेच निधीचा अपहार रोखण्यासाठी, समितीच्या

निधीच्या व्यवहारांसदर्भात जबाबदारी वाढविण्यासाठी तसेच समितीच्या खात्यातून निधी काढण्यासंदर्भात सुधारीत सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी, जिल्हा परिषदांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यावर जमा झाल्यावर, या निधीतून नळ पाणी पुरवठा पुरवठा योजनांच्या कोणत्याही प्रकारच्या प्रदानासाठी निधीचे आहरण करताना, खालील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा-

१) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांमार्फत बँकेतून रक्कम काढताना,ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस बँकेतून रक्कम काढण्यास प्राधिकृत केल्याबाबतची सरपंच व ग्रामसेवकांनी साक्षांकित केलेला ग्राम पंचायतीचा ठराव धनादेशासोबत बँकेस सादर करणे आवश्यक राहील.ग्राम पंचायतीने असा ठराव मंजूर करतांना त्यामध्ये बँकेतून रक्कम काढण्याचाउद्देश स्पष्टपणे नमूद करावा.

२) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने सादर केलेल्या धनादेशासोबत ग्राम पंचायतीचा ठराव असल्याशिवाय बँकेने धनादेश स्विकारु नये अशा सुचना ग्राम पंचायतीने बँकेस स्वतंत्रपणे द्याव्यात.

३) मुंबई ग्राम पंचायत अधिनियम,१९५८ च्या कलम ४९(६) मधील तरतूदीनुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने यापुर्वी बँकेतून काढलेल्या रकमेचा तपशिल ग्राम पंचायतीस सादर केल्याशिवाय ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस पुढील आर्थिक व्यवहार करण्यास /बँकेतून रक्कम काढण्यास ग्राम पंचायतीने परवानगी देऊ नये.

४) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने बँकेतून काढलेली रक्कम,खर्च व शिल्लक रक्कम याबाबतची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्राम पंचायतीमार्फत ग्रामसभेस वेळोवेळी सादर करावी.

५) मुंबई ग्राम पंचायत अधिनियम,१९५८ च्या कलम ४९ मधील तरतूदीनुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ही ग्राम पंचायतीचा अविभाज्य घटक असल्यामुळे पाणी पुरवठा योजनांचा निधी हाताळणे ही ग्राम पंचायत आणि ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांची संयुक्त जबाबदारी राहील.

६) अखर्चित निधी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष / सचिव यांनी स्वत:कडे न ठेवता तो ग्राम पंचायच्या खात्यात वर्ग करावा व त्याची नोंद ग्राम पंचायतीच्या रोख वहीत घेण्यात यावी. रु.१०००/- पेक्षा जास्त रकमेचे सर्व व्यवहार केवळ धनादेशाद्वारेच करण्यात यावे.

२. बँकेतून रक्कम काढण्यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने सादर केलेल्या धनादेशासोबत ग्राम पंचायतीचा ठराव असल्याशिवाय ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा धनादेश बँकेन स्वीकारु नये, अशा सूचना कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी यांनी जिल्ह्यातील / तालुक्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँक / शेड्युल बँक / जिल्हा शिखर बँक यांना निर्गमित कराव्यात.

३. हे शासन परिपत्रक प्रगतीपथावरील योजना तसेच नव्याने घ्यावयाच्या योजनांसाठी लागू राहील.

४. सदर शासन परिपत्रक ग्राम विकास व पंचायतराज विभागाच्या सहमतीने, त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५८४६/secy/RD,दि.६/८/२०११ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१११२०२०८०६०२००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**(र.अं.खडसे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

*प्रत,*

*मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,*
*मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव*
*सर्व विधान परिषद/विधान सभा सदस्य*
*विभागीय आयुक्त (सर्व)*
*आयुक्त, महानगरपालिका (सर्व)*
*सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई*
*संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे*
*सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद*
*मुख्याधिकारी (सर्व नगर पालिका) (अ, ब व क वर्ग)*
*सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,*
*सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद*
*सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग*
*महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई*
*उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर*
*सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा*
*सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा*
*सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती*
*नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई*
*वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,*
*ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई*
*मंत्रालयातील इतर सर्व विभाग,*
*पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने*
*निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७*

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना..**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुद्धिपत्रक क्रमांक ग्रापाधो-१११९/प्र.क्र.१७४/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : २ डिसेंबर, २०११**

**वाचा:-** शासन निर्णय पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु-०७, दि.१७ मार्च, २०१०

**प्रस्तावना** :- संदर्भाधिन शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ३.१ मध्ये रु.५ कोटीपर्यंत किंमतीच्या योजनांची अंमलबजावणी ग्रामपंचायत / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती करील अशी तरतूद आहे.तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की राज्यातील ब-याच जिल्ह्यातील गावांमध्ये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या स्थापन करण्यावरुन वाद निर्माण होतात.त्यामुळे ग्रामिण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करणे प्रशासनास शक्य होत नाही.तसेच ब-याचदा ग्राम पाणी पुरवठा व समित्यांमार्फत पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी केली जात असताना मध्येच समित्यांमध्ये वाद निर्माण होऊन योजनेचे काम खोळंबून राहते.अशी परिस्थीती उद्‌भवल्यास ग्रामिण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी कशी करावी,याबाबत सदर शासन निर्णयात स्पष्ट तरतूद नाही. त्यामुळे गावांमध्ये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या स्थापन करण्यावरुन वाद निर्माण झाला असल्यास अथवा योजनेची अंमलबजावणी सुरु असताना समित्यांमध्ये वाद निर्माण होऊन योजनेच काम रखडले असल्यास पाणी पुरवठा योजना राबविण्यास अडचण येऊ नये यासाठी पाणी पुरवठा योजना कोणी व कशी राबवावी याबाबत शुद्धिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन शुद्धिपत्रक:-** प्रस्तावनेत नमूद केलेली माहिती विचारात घेता संदर्भाधिन शासन निर्णयातील परिच्छेद ३.१ मध्ये खालील दोन उप-परिच्छेद अंतर्भूत करण्यात येत आहे-

*तथापि गावांमध्ये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या स्थापन करण्यावरुन वाद निर्माण झाला असल्यास अथवा अस्तित्वातील पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांमध्ये वाद असल्यास अशा गावांतील ग्रामपंचायतीच्या पदाधिका-यांशी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी प्रथम विचारविनिमय करुन तोडगा काढावा.विचारविनिमय व चर्चेअंती तोडगा निघत नसल्यास व त्यामुळे पाणी पुरवठा योजनांच्या कामांस विलंब होत असल्यास अशा परिस्थितीत सदर गावांच्या पाणी पुरवठा योजनांची कामे जिल्हा परिषदेमार्फत पुर्ण करण्यात यावीत. योजनेच्या अंमलबजावणीसाठी समितीस वितरीत केलेला निधी जिल्हा परिषदेने तात्काळ परत घ्यावा व योजना पुर्ण*

*करावी .समितीने निधी परत करण्यास टाळाटाळ केल्यास समितीच्या पदाधिका-यांविरुध्द [illegible] गुन्हा नोंदवावा.तसेच समितीकडून त्या निधीच्या वसूलीसाठीसूद्धा समांतर कार्यवाही करण्यात यावी. योजना राबवित असताना जिल्हा परिषदेने गावांमध्ये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या स्थापन करण्याबाबत पुढाकार घ्यावा व योजना पुर्ण झाल्यानंतर ती ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस हस्तांतरीत करावी.*

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१११२०२०८०४५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**(र.अं.खडसे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

*प्रत,*

*मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,*

*मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव*
*सर्व विधान सभा व विधान परिषद सदस्य*
*विभागीय आयुक्त (सर्व)*
*सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई*
*संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे*
*सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद*
*सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,*
*सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद*
*सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग*
*महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई*
*उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर*
*सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा*
*सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा*
*सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती*
*नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई*
*वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,*
*ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई*
*मंत्रालयातील इतर सर्व विभाग,*
*पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने*
*निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७*

संग्रहक संकेतांक

परिशिष्ट १२.१

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या कामाचे विकेंद्रीकरण आणि शासकीय विभागामार्फत वस्तू खरेदी करताना घ्यावयाची खबरदारी तसेच लघुउद्योग, सार्वजनिक उपक्रम, इत्यादी, यांना द्यावयाची प्राधान्ये-सवलती बाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय, क्र. भांखस. १०८८/(३५१२)/उद्योग-६,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २ जानेवारी १९९२

**पार्श्वभूमी**

शासनाला आवश्यक असणाऱ्या वस्तू खरेदी करताना मध्यवर्ती खरेदीमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या कामाचे विकेंद्रीकरण करणे शासनास आवश्यक वाटल्याने शासनाने दिनांक १८ मार्च १९७६ च्या शासन निर्णयाप्रमाणे एक समिती नियुक्त केली होती व त्या समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या कामाचे विकेंद्रीकरण करून त्यात सुसूत्रता व सुलभीकरण आणण्यात आले होते. त्यानंतरच्या काळात दळणवळणातील सुविधा, उद्योगांचे विकेंद्रीकरण व मागास भागात उद्योग स्थापण्यासाठी शासनाने देऊ केलेल्या प्रोत्साहनामुळे झालेली औद्योगिक वाढ व शासनास आवश्यक असणाऱ्या मालाची राज्यात सर्वत्र उपलब्धता यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या कामाचे अधिक विकेंद्रीकरण करण्यासाठी तसेच लघुउद्योगासाठी राखीव वस्तूंच्या यादीचे पुनर्विलोकन, लघुउद्योग, सार्वजनिक उपक्रम, अंध व अपंग यांच्या संस्था व इतर संस्था यांना द्यावयाचे देऊ केलेले प्राधान्य व आरक्षण इत्यादी सवलतींचे पुनर्विलोकन करण्यासाठी शासनाने विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती जून १९८७ मध्ये स्थापन केली होती. सदर समितीवर विविध विभागांना प्रतिनिधित्व देण्यात आले होते. समितीने महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई यांचे विचार, तसेच गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक या जवळच्या राज्यांतील खरेदी संघटनेच्या कार्यवाहीची माहिती घेऊन तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या खरेदीबाबत लेंटिन आयोगाच्या शिफारशींवर विचार केला व तदनुषंगाने सदर समितीने आपला अहवाल दिनांक २७ डिसेंबर १९८८ रोजी शासनाला सादर केला. या अहवालावर भांडार खरेदी संघटनेमध्ये सखोल चर्चा करण्यात आली. तसेच समितीच्या अहवालावर संबंधित विभागांची मतेही जाणून घेण्यात आली. समितीने विकेंद्रीकरणासंबंधी, विभागवार वस्तू खरेदीबाबत तसेच किंमती प्राधान्य, खरेदीसाठी आरक्षण वगैरेबाबत शिफारशी केल्या आहेत.

समितीच्या सर्व शिफारशींवर मंत्रिमंडळ पातळीवर चर्चा होऊन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :—

**शासन निर्णय**

१. भांडार खरेदी संघटनेच्या कार्यपद्धती व विकेंद्रीकरणाबाबत क्र. एसपीओ-१०७७/६०९९३ (सीएसपीओ. ५७२)/उद्योग-६ दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ च्या समग्र शासन निर्णयानंतरही बरेच शासन निर्णय प्रसृत करण्यात आले होते. या सर्व शासन निर्णयांचे सुसूत्रीकरण, आवश्यक तेथे बदल व एकत्रीकरण करण्याची आवश्यकता बऱ्याच काळापासून शासनाच्या विचाराधीन होती. समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगानेही काही बाबतीत बदल आवश्यक असल्यामुळे सुधारित आदेश या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात येत आहेत.

**विभागवार खरेदी**

२. सध्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी करण्यात येत असलेल्या वस्तूंपैकी परिशिष्ट एकमध्ये दर्शविलेल्या एकूण ८ वस्तू या एकाच विभागाला खरेदीसाठी आवश्यक असल्यामुळे त्या त्या संबंधित विभागाने, आवश्यकतेनुसार खरेदी करावयाच्या आहेत. या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत दर करार/संख्या करार यापुढे करण्यात येणार नाही. परिशिष्ट एकबीत ज्या वस्तू एकापेक्षा अधिक विभागांना खरेदी करणे आवश्यक असेल त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी विचारविनिमय करून एक संयुक्त समितीमार्फत दर/संख्या करारावर खरेदीची व्यवस्था करावी.

**मुद्रण व लेखनसाहित्य**

३. शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांच्यामार्फत सध्या खरेदी होत असलेल्या वस्तूंच्या व्यतिरिक्त अधिकच्या २८ वस्तूंची खरेदी त्यांच्याकडे सोपविण्यात येत आहे. त्यामुळे शासन निर्णय, दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ च्या सहपत्रातील परिशिष्ट "क"मधून या वस्तू वगळण्यात येत आहेत. आता मुद्रण व लेखनसामग्री संचालनालयाने आवश्यकतेनुसार या वस्तूंबाबत दर करार/संख्या करार

एप १९९१ - ९

निश्चित करावयाचा आहे. सदर २८ वस्तूंची यादी परिशिष्ट दोनमध्ये दिलेली आहे. शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालयाच्या लागणाऱ्या व ज्या वस्तूंची खरेदी किंमत वार्षिक रु. १० लाखांपेक्षा अधिक आहे अशा वस्तूंच्या खरेदी संबंधात शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक पीपीएस. १०९०/(८९६५)/उद्योग-६, दिनांक १ सप्टेंबर १९९० अन्वये एक उच्चस्तरीय भांडार खरेदी समिती नेमण्यात आली आहे. या आदेशातील समितीच्या रचनेत अंशतः फेरफार करून आता खालील सदस्यांची भांडार खरेदी समिती या प्रयोजनार्थ नेमण्यात येत आहे :—

(१) उप सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग .. .. .. अध्यक्ष
(२) उद्योग सहसंचालक (भांडार खरेदी), उद्योग संचालनालय .. .. .. सभासद
(३) संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय .. .. .. सभासद
(४) उप संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय .. .. .. निमंत्रक

तथापि, एकूण वार्षिक खरेदी रु. १० लाखांपेक्षा कमी असणाऱ्या वस्तूंच्या खरेदीच्या बाबतीत शासन निर्णय, दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ नुसार नेमण्यात आलेल्या संचालनालयांतर्गत कार्यालयीन समितीमार्फत खरेदी करण्यात यावी.

सार्वत्रिक निवडणुकीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या खरेदीबाबत शासन निर्णय, दिनांक ५ नोव्हेंबर १९६६ तसेच ३ ऑक्टोबर १९७९ अन्वये आदेश देण्यात आले होते. आता या सर्व वस्तू सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांनी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे "तातडीचे खरेदी पद्धत" अन्वये प्रमाणपत्र मिळवून तसेच तातडीची खरेदी पद्धत अवलंबून खरेदी करावयाच्या आहेत. सदर खरेदीसाठी खालीलप्रमाणे एक भांडार खरेदी समिती नेमण्यात येत आहे :—

(१) उप सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग .. .. .. अध्यक्ष
(२) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/उपमुख्य निवडणूक अधिकारी .. .. सभासद
(३) उद्योग सहसंचालक (भांडार खरेदी), उद्योग संचालनालय .. .. .. सभासद
(४) संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय .. .. .. सभासद
(५) उप संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय .. .. .. निमंत्रक

**कारागृह विभागाकडून खरेदी**

४. कारागृह विभागाकडून खरेदी करण्यासाठी काही वस्तू यापूर्वीच शासन निर्णय, क्रमांक भांखस. १०८७/३१२५०२/(२४४०)/उद्योग-६, दिनांक २६ ऑगस्ट १९८७ अन्वये आरक्षित करण्यात आल्या आहेत. या वस्तूंच्या यादीत आणखी ४ वस्तूंचा अंतर्भाव करण्यात आला आहे त्या म्हणजे—(१) स्टील फोल्डींग कॉट्स (प्लेन), (२) स्टील फोल्डींग कॉट्स (क्रिसक्रॉस), (३) मॉस्क्युटो नेट्स व (४) बॅरेक ब्लॅंकेट. महानिरीक्षक, कारागृहे यांनी या वस्तूंचे मान्यताप्राप्त दर गृह विभागाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे प्रत्येक वर्षी ३१ मार्चपर्यंत ठरवून ते सर्व विभागांना माहितीसाठी पाठवावेत. कारागृह विभागाकडून वेळेवर व नियमित पुरवठा न झाल्यामुळे विभागांना वस्तू खरेदीबाबत अडचणी येऊ नयेत यासाठी ज्या वस्तूंच्या पुरवठ्याबाबत कारागृह विभाग असमर्थ असेल अशा वस्तूंची खरेदी संबंधित विभागांनी या वस्तू उत्पादन करीत असलेली राज्य शासनाची महामंडळे, शासकीय/निमशासकीय संस्था (परिशिष्ट पाचमध्ये दर्शविल्याप्रमाणे) यांचेकडून भांडार खरेदी संघटनेने ठरवून दिलेल्या दराने खरेदी करण्यास मुभा राहील.

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करावयाच्या वस्तू**

५. लघुउद्योग निर्मित वस्तू खरेदी करताना राज्याच्या सर्व भागांतील लघुउद्योजकांना वाव मिळावा व त्यामुळे निर्माण झालेल्या स्पर्धेतून शासनास अधिकाधिक दर्जेदार वस्तू माफक किंमतीत सर्वत्र मिळाव्यात या सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून लघुउद्योजकांना विक्रीसहाय्य करणाऱ्या महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी शासनाच्या विविध विभागांना लागणाऱ्या एकूण १५ वस्तूंची खरेदी यापुढे सदर महामंडळातर्फे करण्याचे शासनाने ठरविले आहे. या वस्तूंची यादी सदर निर्णयाच्या परिशिष्ट तीन येथे दर्शविली आहे. या खरेदीसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या भांडार खरेदी समितीकडून दर करार निश्चित करण्यात येतील. या समितीवर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचा प्रतिनिधी व बहुसंख्य खरेदीदार विभागांचा प्रतिनिधी यांना निमंत्रित म्हणून बोलाविण्यात यावे. या वस्तू खरेदीसाठी महामंडळाने त्यांच्याशी संलग्न तसेच इतर लघुउद्योजकांकडून निविदा मागवून उक्त समितीच्या निर्णयानुसार दर करार/संख्या करार निश्चित करावयाचा आहे. यासाठी सध्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून पाळण्यात येत असलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब महामंडळाने करावयाचा आहे. सर्व शासकीय विभाग, महामंडळे, शासकीय व निमशासकीय संस्था यांनी सदर वस्तूंची खरेदी महामंडळामार्फत करावी असे बंधन राहील.

**मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी**

६. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून यापुढे खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी परिशिष्ट चारमध्ये दर्शविण्यात आलेली आहे. तंत्रज्ञानाचा होणारा विकास व त्यामुळे बदलणारी शासकीय विभागांची गरज लक्षात घेता या यादीत बदल करण्याचे अधिकार सचिव (उद्योग) यांना राहतील.

**शासकीय व इतर संस्थांकडून उत्पादित वस्तूंचे दर ठरविण्यासंबंधीची कार्यपद्धती**

७. शासनाचा अंगीकृत व्यवसाय जसे, लिडकॉम, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ तसेच इतर सहकारी संस्था तसेच अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था, पुनर्वसन उत्पादन केंद्र, उल्हासनगर व पिंपरी आणि अनेक सार्वजनिक सेवाभावी संस्थांनी उत्पादित केलेल्या मालाची खरेदी शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून यापूर्वी प्रस्तुत करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये करण्यात येते. यापुढे परिशिष्ट पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे अशा उत्पादन संस्था व त्यांच्यासमोर दर्शविलेली उत्पादने त्या त्या संस्थाकडून खरेदीसाठी राखून ठेवण्यात येत आहेत. तथापि, या सर्व वस्तूंच्या किमतीची वेगवेगळ्या संस्थांकडून वेगवेगळ्या दराने आकारणी होत असल्यामुळे, तसेच एखाद्या संस्थेकडून वस्तूंचा वेळीच पुरवठा न झाल्यामुळे शासकीय विभागांना अडचण येऊ नये या दृष्टिकोनातून संबंधित संस्थांकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तूंची किमत ठरविण्याचे अधिकार यापुढे सध्या अस्तित्वात असलेल्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या सामान खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. वस्तूंचे दर ठरविताना संबंधित संस्थांच्या वतीने प्रतिनिधित्व करण्यासाठी म्हणून संबंधित प्रशासकीय विभागातील उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यास या समितीवर निमंत्रक म्हणून नेमणूक करावी. सध्या या वस्तूंच्या किमती ठरविण्याबाबत अस्तित्वात असलेल्या विभागवार समित्या बरखास्त करण्यात येत आहेत. दर ठरविताना बाजारभाव तसेच उत्पादन खर्च यांचा साकल्याने विचार करण्यात यावा. या सर्व संस्थांनी वस्तूंबाबतचे दर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत दरवर्षी १ मे पूर्वी निश्चित करून ते सर्व विभागांना कळवायचे आहेत. तसेच ज्या वस्तूंच्या बाबतीत वस्तू पुरवठा करण्यास सदर संस्था असमर्थ असतील अशा वस्तूंची यादी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस त्यांनी दिनांक १ मार्च पूर्वी द्यावयाची आहे. सदर वस्तूंची यादी मिळाल्यानंतर मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने नेहमीच्या पद्धतीचा अवलंब करून दर करार करावयाचा आहे. एखाद्या वस्तूचा पुरवठा परिच्छेद-५ तसेच परिच्छेद-७ मध्ये नमूद केलेल्या संस्था या दोहोंकडून होणार असेल तर त्या वस्तूंची किमत सारखीच असावी याची दक्षता संबंधित खरेदी समितीने घ्यावयाची आहे.

**विभागवार वस्तू खरेदीची कार्यपद्धती**

८.१. प्रत्येक विभागाने वस्तू खरेदीसंबंधी एक खरेदी समिती स्थापन करण्याविषयी दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ रोजी शासकीय आदेश प्रस्तुत करण्यात आले होते. काही मोजकेच विभाग वगळता अशा विभागवार समित्या स्थापन झाल्याचे दिसून येत नाही. प्रत्येक विभागाने यापुढे वस्तू खरेदी करताना त्यासाठी विभागीय खरेदी समिती स्थापन करावी व या समितीद्वारे दर करार किंवा संख्या करार करण्यात यावा. जरूर वाटल्यास या समितीवर भांडार खरेदी संघटनेच्या अधिकाऱ्यांची सभासद म्हणून नेमणूक करावी.

८.२. मध्यंतरी राज्य शासनाने नेमलेल्या लेंटिन आयोगाने मध्यवर्ती भांडार खरेदी समितीच्या कार्यवाहीत सुटसुटीतपणा आणण्यासाठी काही उपयुक्त शिफारशी केल्या होत्या. या शिफारशी परिशिष्ट सहा येथे दर्शविण्यात आल्या आहेत. या शिफारशींची अंमलबजावणी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून तसेच संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांच्या खरेदी समितीकडून यापूर्वीच करण्यात आली आहे. सर्व विभागीय समित्यांनासुद्धा सदर शिफारशी बंधनकारक आहेत. विभागवार समित्यांनी या सर्व शिफारशींची अंमलबजावणी यापूर्वीच केली नसल्यास हा शासकीय आदेश निर्गमित होईल त्या दिनांकापासून तात्काळ करावयाची आहे.

८.३. विभागवार खरेदी करताना निविदा काढण्यापासून माल स्वीकारण्यापर्यंत घ्यावयाच्या दक्षतेविषयी सविस्तर सूचना "मॅन्युअल ऑफ ऑफिस प्रोसीजर फॉर परचेस ऑफ स्टोअर्स बाय दी गव्हर्नमेंट डिपार्टमेंट्स" मध्ये देण्यात आल्या आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, या महत्त्वाच्या तरतुदींतील बाकी दिलेल्या काही महत्त्वाच्या तरतुदींचे पालन अभावानेच झाल्याचे आढळून येते :—

(अ) निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीत कमी तीन आठवड्यांचा कालावधी द्यावा, असे आदेश आहेत. तथापि बऱ्याच वेळा यापेक्षाही कमी कालावधीसाठीची निविदा प्रसिद्ध करण्यात येते.

(ब) एखाद्या निविदेतून कमी प्रतिसाद मिळाल्यास निविदा चौकशीला दोन वेळा मुदतवाढ द्यावी असे आदेश आहेत. तथापि, असे न करता उपलब्ध निविदेतूनच पुरवठादारांची निवड करण्यात येते.

(क) निविदा उघडताना त्याची पूर्वसूचना निविदाधारांना देणे व ठराविक वेळी व ठराविक ठिकाणी अशी निविदा हजर असलेल्या निविदाकारासमोर उघडाव्यात असे बंधन असले तरीही निविदाकारांना पूर्वसूचना न देणे अथवा निविदाकारांसमोर निविदा उघडण्याचे टाळणे, असे प्रकार आढळून येतात.

(ड) एकावेळी रु. ५०० पेक्षा कमी किंमतीची एकूण खरेदी असल्यास त्यासाठी कमीत कमी ३ दरपत्रके मागविण्याची गरज नसली तरीही अशी खरेदी मान्यताप्राप्त सहकारी भांडारातून करणे आवश्यक आहे. असे न करता इतर ठिकाणाहून करण्यात येते.

(इ) एकावेळची एकूण खरेदी रु. ५०० पेक्षा जास्त असेल किंवा एखाद्या विशिष्ट वस्तूची वार्षिक खरेदी ही रु. २०,००० पर्यंत जात असेल अशा वेळी कमीत कमी ३ दरपत्रके मागविणे बंधनकारक असूनसुद्धा अशी दरपत्रके न मागविता खरेदी केली जाते.

(फ) एका विशिष्ट वस्तूची एकूण वार्षिक खरेदी रु. २०,००० किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी जाहिरातीद्वारे निविदा चौकशी प्रसिद्ध करून निविदा मागविणे बंधनकारक आहे. तथापि, अशी जाहिरात न देता खरेदी झाल्याचे प्रकार आढळून येतात.

४

(ड) तसेच निविदा प्रपत्रकाचे शुल्क आकारणीसंबंधी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय, क्रमांक भांखस. १०८८/(२५००)/उद्योग-६, दिनांक २ जुलै १९९० अन्वये कोऱ्या निविदा प्रपत्रकाच्या सुधारित किमती ठरविण्यात आल्या आहेत त्या खालीलप्रमाणे आहेत :—

| अनुक्रमांक. | खरेदी करावयाच्या साहित्याची अंदाजे किमत (रुपये) | कोऱ्या निविदेची किमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | ५०,००० पर्यंत .. .. .. .. .. | १० |
| २ | ५०,००० ते १,००,००० .. .. .. .. .. | २५ |
| ३ | १ लाख ते २ लाख .. .. .. .. .. | ५० |
| ४ | २ लाख ते ५ लाख .. .. .. .. .. | १५० |
| ५ | ५ लाख ते १० लाख .. .. .. .. .. | २५० |
| ६ | १० लाखापेक्षा अधिक .. .. .. .. .. | ३०० |

तथापि, विविध विभागांच्या खरेदी अधिकाऱ्यांकडून अजूनही जुन्याच किमतीत कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री केली जाते असे आढळून आले आहे.

(इ) पुनर्प्रत्ययी आदेशाबाबत (रिपीट ऑर्डर) मार्गदर्शक तत्त्वे विहित केली असूनसुद्धा त्यांचे पालन यथायोग्य होत नसल्याचे आढळून येते. आता पूर्वीच्या पुनर्प्रत्ययी आदेशात अंशतः बदल करून सुधारित मार्गदर्शक तत्त्वे परिशिष्ट सातमध्ये दर्शविली आहेत. यापुढे पुनर्प्रत्ययी आदेश देताना सदर परिशिष्टात दिलेल्या आदेशांचे काटेकोर पालन खरेदी अधिकाऱ्यांनी/समितीने करावे.

(ई) वर्षभर आवश्यकतेनुसार वस्तू खरेदीसाठी संख्या करारापेक्षा दर करार करणे अधिक श्रेयस्कर ठरते, तथापि त्यासाठी दर करार न करता संख्या करार केल्याचे आढळून आले आहे.

वरील यादी सर्वकष नसून केवळ उदाहरण म्हणून देण्यात आली आहे.

८४. शासन परिपत्रक, दिनांक १४ ऑक्टोबर १९८६ अन्वये भारतीय मानक संस्थेने (Bureau of Indian Standards) चिन्हांकित केलेल्या वस्तू खरेदी करण्याविषयी आदेश देण्यात आले आहेत. असे असून सुद्धा काही वेळा विभागाकडून अचिन्हांकित वस्तूंची खरेदी होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. शासनास दर्जेदार मालाचा पुरवठा अधिकाधिक प्रमाणात व्हावा म्हणून भारतीय मानक संस्थेने चिन्हांकित केलेल्या वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या लघु उद्योजकांना आता ५ टक्के पर्यंतचे अधिकचे किमती प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे यापुढे भारतीय मानक संस्थेने (BIS) चिन्हांकित केलेल्या वस्तूंचीच खरेदी करण्यात यावी. क्वचित प्रसंगी भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेली मानके अस्तित्वात नसतील अथवा भारतीय मानक संस्थेकडून मानके ठरविली असूनही पुरेसे पुरवठादार उपलब्ध नसतील अशा वेळी चिन्हांकित नसलेल्या वस्तूंची खरेदी करण्यास हरकत नाही. तथापि अशी खरेदी करण्यापूर्वी संबंधित विभागाने उद्योग संचालनालयातील भांडार खरेदी संघटनेकडून मानके ठरविली नसल्याबद्दल, तसे आदेश प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. चिन्हांकित नसलेल्या वस्तूंची खरेदी करताना खरेदीदार विभाग स्वतःच एखाद्या वस्तूच्या दर्जाविषयी तपासणी करू शकत नसेल अशा वेळी मालाच्या दर्जाविषयी तटस्थ संस्थांकडून (जसे एस.आय.एस.आय., अंधेरी/यू.डी.सी.टी., माटुंगा/व्ही.जे.टी.आय. प्रयोगशाळा इत्यादी, अशा सर्व मान्यताप्राप्त संस्थांची यादी परिशिष्ट आठ येथे दर्शविण्यात आली आहे.) चाचणी प्रमाणपत्रे, पूर्वतपासणी, पुरवठापूर्व तपासणी करून घेणे बंधनकारक राहील. याकरिता निविदा काढताना वस्तूंची तपासणी ज्या संस्थेद्वारे करावयाची आहे त्या तटस्थ संस्थेचे नाव, तपासणी खर्च यांचा उल्लेख संबंधित खरेदी अधिकाऱ्याने करावा तसेच तपासणी खर्च पुरवठादाराकडून वसूल करावा. अतिमहत्त्वाच्या व मौल्यवान वस्तूंसाठी १०० टक्के तपासण्या तटस्थ संस्थांकडून करण्यात याव्यात. जेथे भारतीय मानक संस्था चिन्हांकित वस्तू खरेदी करण्याचा निर्णय झाला असेल तेथे तटस्थ संस्थांकडून तपासणी करण्याची आवश्यकता नाही. परंतु वस्तू स्वीकारताना समादेशकाने तपशीलवार तपासणी करणे आवश्यक राहील. तथापि, वरीलप्रमाणे भारतीय मानक संस्था चिन्हांकित वस्तू खरेदी करीत असतानाही तटस्थ संस्थांकडून तपासणी करण्याबाबत विभागाचा आग्रह असेल तर तपासणी खर्च संबंधित विभागाकडून करावा लागेल.

### दोन लिफाफे (टू बीड) पद्धती

८५. चिन्हांकित नसलेल्या तथापि, तांत्रिकदृष्ट्या प्रकृष्ट वस्तूंची खरेदी करताना सध्या सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पाटबंधारे विभाग यांचेकडे अंमलात असलेली निविदेची दोन लिफाफे पद्धत अवलंब करणे श्रेयस्कर व्हावे. सध्या सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पाटबंधारे विभाग यांच्या कामाच्या बाबतीत ही पद्धत सरसकट अवलंबिली जात आहे. कागद खरेदीच्या बाबतीतसुद्धा शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांनी या पद्धतीचा अवलंब सुरू केला आहे. या पद्धतीत निविदा दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांत देण्यात येते. पहिल्या लिफाफ्यात,—

(अ) कोषागार चलान तसेच अनामत रकमेचा ड्राफ्ट अथवा अनामत रक्कम भरण्यातून सूट दर्शविणारे प्रमाणपत्र तसेच संबंधित भांडार खरेदी संघटनेकडे अथवा त्या त्या विभागाकडे नोंदणी झाल्याचे नोंदणीपत्र

(ब) उद्योग घटकाकडे प्रस्तुत पुरवठा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असणारी यंत्रसामुग्री बद्दलची माहिती तसेच आवश्यक असल्यास नवीन घेण्यात येणारी यंत्रसामुग्री संबंधीची माहिती.

(क) पूर्वानुभवाबद्दलची तपशीलवार माहिती व विक्रीकरासंबंधीचा नोंदणी क्रमांक (असल्यास).

(ड) अशा प्रकारच्या निविदेत इतर ठिकाणी भाग घेतला असल्यास त्यासंबंधीची तपशीलवार माहिती.

(इ) निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य असलेले आयकर भरल्यासंबंधीचे प्रमाणपत्र.

वरील माहिती देण्यात येते. या लिफाफ्याला "तांत्रिक निविदेचा लिफाफा" असे संबोधण्यात येते. दुसऱ्या लिफाफ्यात फक्त मुख्य निविदा व त्यामध्ये घातलेल्या अटी व शर्ती यांचाच समावेश करण्यात येतो. हे दोन्ही लिफाफे त्यानंतर प्रत्येक लिफाफ्यावर लिफाफा क्रमांक १ व लिफाफा क्रमांक २ असे ठळक अक्षरात दर्शवून एकाच पाकिटात हे दोन्ही लिफाफे बंद करण्यात येतात. त्यावर निविदेविषयीची माहिती निविदाकाराचे नाव, इतर मजकूर स्पष्ट करण्यात येतो. पूर्वनियोजित तारखेला निविदेचा लिफाफा खोलताना प्रथम लिफाफा क्रमांक १ खोलून त्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली आहे किंवा कसे याची खातरजमा करण्यात येते व अशी पूर्तता केली नाही अशी खरेदी अधिकाऱ्याची खात्री झाली असल्यास लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येत नाही व निविदाकाराची निविदा रद्द समजण्यात येते पहिल्या लिफाफ्याची पूर्तता झाली असल्यास, मग दुसऱ्या लिफाफ्याबद्दल विचार करण्यात येऊन त्याविषयी दर ठरविण्याबाबत विचार करण्यात येतो. खरेदी अधिकाऱ्याने वरील पद्धतीचा अवलंब करताना अधिक तपशीलासाठी शासन परिपत्रक, पाटबंधारे विभाग, दिनांक ३० ऑक्टोबर १९८७ मधील कार्यप्रणालीचा अवलंब करावा.

**माल स्वीकारताना घ्यावयाची दक्षता**

८.६. (अ) पुरवठ्याच्या ठिकाणी माल पोहोचताच मालाचे त्वरित निरीक्षण केले जाणे आवश्यक आहे.

(ब) या निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणिवा/त्रुटी/दोष तातडीने पुरवठादाराच्या व खरेदी संघटनेच्या/खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी.

(क) माल पाठविण्याची रेल्वेची पावती (आरआर) किंवा निरीक्षणाची अट असल्यास निरीक्षण पत्र (Inspection Note) मिळाल्याखेरीज ९० टक्के रक्कम अदा करण्यात येऊ नये किंवा रक्कम प्रदान उपवाक्य (Payment clause) नुसार अटींची पूर्तता झाल्याखेरीज रक्कम प्रदान करू नये.

(ड) उरलेली रक्कम मालाची तपशीलवार तपासणी केल्याशिवाय व माल विनिर्देशाप्रमाणे आहे याची खात्री करून घेतल्याशिवाय प्रदान करू नये.

**कोषागारात सादर करावयाचा दाखला**

८.७. कोषागार नियमानुसार सामानाच्या खरेदीसाठी दिलेल्या रकमेचा पुरावा म्हणून खालीलप्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे :—

(अ) प्रमाणकांत वर्णिलेल्या वस्तू प्रत्यक्षात मिळाल्या आहेत.

(ब) मालाचे प्रमाण विनिर्देशानुसार असून माल चांगल्या प्रतीचा आहे.

(क) दिलेले दर हे स्वीकृत दरापेक्षा जास्त नाहीत.

(ड) सामान नोंदवहीत मालाची नोंदणी झाली आहे आणि त्यासाठी यापूर्वी कोणतीही रक्कम दिलेली नाही.

**समांतर दर-कराराचे तत्व**

९. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत निविदेद्वारे आलेल्या कमीत कमी दराने महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाशी ५० टक्केपर्यंत वस्तू पुरवठ्याचा समांतर दर-करार करण्याचे आदेश शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एसपीओ. १०८४/२९६२१/(२९९२)/उद्योग-६, दिनांक २१ ऑगस्ट १९८४ अनुसार निर्गमित केले आहेत. परिशिष्ट तीनमध्ये नमूद केलेल्या १५ वस्तू या महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडूनच खरेदी करण्याचे ठरविले असल्यामुळे या वस्तूंच्या बाबतीत समांतर दर-करार करता येणार नाही. यापुढे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून खरेदी करावयाच्या (परिशिष्ट चार) वस्तूंच्या बाबतीत समांतर दर कराराचे तत्व हे महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ या दोन्ही महामंडळांसाठी खालील अटींवर यापुढे अंगीकारावयाचे आहे :—

(अ) सदर महामंडळांनी नोंदणीकृत लघुउद्योजकांच्या वतीने प्रत्यक्ष निविदा भरून खरेदीत भाग घेतलेला असावा. तसेच निविदेतील वस्तूंच्या वर्णनातील दर्जाप्रमाणे आणि निविदेप्रमाणे आलेल्या कमीत कमी मान्य किमतीत वस्तू पुरवठ्याची तयारी दर्शविली असली पाहिजे.

(ब) सदर महामंडळांनी वस्तू पुरवठ्याची तयारी दर्शविली तर एकूण मागणीपैकी ५० टक्क्यांची मागणी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ किंवा महिला आर्थिक विकास महामंडळाकडे नोंदविण्यात यावी.

(क) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ या दोन्ही संस्थांनी जर एकाच वेळी पुरवठ्याची तयारी दर्शविली असेल तर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडे महिला उद्योजकांचीसुद्धा नोंदणी होत असल्याने ५० टक्के पैकी ७० टक्के मागणी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाला व उरलेली ३० टक्के मागणी महिला आर्थिक विकास महामंडळाला देण्यात यावी.

(ख) ज्या अटी व शर्तींवर दर-करार करण्यात आला असेल त्या सर्व अटी व शर्ती इतर पुरवठादारांप्रमाणेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेवर बंधनकारक राहतील.

(इ) महामंडळाची निविदा जर सर्वांत कमी दराची असेल व ती मान्य झाली असेल तर मात्र १०० टक्के पुरवठा महामंडळाकडून घेण्यात यावा.

(फ) महिला आर्थिक विकास महामंडळाने, महिला उत्पादक लघुउद्योजकांचे तर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने उत्पादक लघुउद्योजकांचे नोंदणीकरण करून अशा नोंदणी झालेल्या उत्पादक लघुउद्योजकांमार्फतच निविदा भरल्या पाहिजेत आणि ज्या उत्पादक लघुउद्योजकांमार्फत अशा निविदा भरल्या जातील त्यांची नावे व त्या लघुउद्योगांच्या नोंदणीपत्रकाची प्रत निविदेबरोबर जोडणे महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेवर बंधनकारक राहील.

(ग) ज्या वेळी राज्याबाहेरील पुरवठादारांनी व राज्यातील पुरवठादारांनी निविदेमध्ये एकत्र भाग घेतला असेल अशा वेळी परिशिष्ट नऊ येथे दर्शविल्याप्रमाणे सूत्र वापरून प्रथम किमतीतील साधर्म्य ठरविण्यात यावे. त्यानंतर जर एखाद्या निविदेत राज्याबाहेरील पुरवठादाराचा दर हा कमीत कमी मान्यताप्राप्त दर ठरला असेल तर अशा वेळी राज्यातील उद्योजकाला संधी मिळावी या दृष्टिकोनातून जर राज्यातील उद्योजक कमीत कमी मान्यताप्राप्त दराने समान दर्जाचा माल पुरवठा करण्यास तयार असतील तर अशा राज्यातील उद्योजकांपैकी ज्या उद्योजकांनी कमीत कमी दराची निविदा भरली असेल अशा उद्योजकास एकूण मागणीच्या ५० टक्केपर्यंत मागणी (जरूर पडल्यास विभागून) कमीत कमी मान्यताप्राप्त दराने देण्यात यावी. मात्र जर राज्यातील उद्योजक सदर मागणी स्वीकारण्यास तयार नसतील तर राज्याबाहेरील पुरवठादारास संपूर्ण मागणी देण्यात यावी. मागणी विभागून देण्याचे सर्वाधिकार संबंधित सामान खरेदी समितीस राहतील.

**लघुउद्योजकांना खरेदी व किमती प्राधान्य**

१०.१. राज्य शासनाच्या उद्योगांच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणामुळे मुंबई, पुणे व्यतिरिक्त इतर भागातही उद्योगांचे जाळे पसरण्यास मदत झाली आहे. नवनवीन उद्योजक मुख्यत्वेकरून पहिल्या पिढीतील उद्योजक (फर्स्ट जनरेशन) पुढे येत आहेत. त्यामुळे अत्यावश्यक असलेला श्रम रोजगार उपलब्ध होत आहे. तथापि, अशा उद्योजकांना आपण तयार करीत असलेल्या मालाच्या विक्रीबाबत मध्यम व मोठ्या उद्योजकांशी स्पर्धा करणे सुरुवातीला कठीण असते. यासाठी अशा उद्योजकांना विक्रीसहाय्य देण्यासाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. लघुउद्योगांना त्यांचा उद्योग सुरू झाल्यापासून पहिल्या काही वर्षांत विक्रीसहाय्य देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी उद्युक्त करण्याचे शासनाचे धोरण असल्यामुळे अशा उद्योगांना पहिल्या काही वर्षांत खरेदी प्राधान्याबरोबरच किमती प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने यापूर्वीच दिनांक १५ मार्च १९६९ च्या शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, हे आदेश सर्व शासकीय विभाग तसेच महामंडळे यांना लागू करण्यात आले असूनसुद्धा त्यांची अंमलबजावणी नीटपणे होत नाही. काही उपक्रम केवळ निविदांचे मूल्यमापन करण्यापुरतेच किमती प्राधान्याचे तत्त्व लक्षात घेतात व प्रत्यक्ष दर ठरविताना किमती प्राधान्याच्या तत्त्वांचा अंगिकार करीत नाहीत. या दृष्टिकोनातून लघुउद्योगांना मध्यम, मोठे उद्योग व व्यापारी यांच्या तुलनेत खरेदी व किमती प्राधान्य देण्याचे तत्त्व यापुढेही अंगीकारण्याचे शासनाचे धोरण राहील. तथापि लघुउद्योगांनी या सवलतीचा फायदा घेताना अधिकाधिक दर्जेदार मालाचे उत्पादन करावे तसेच शासनाला दर्जेदार व प्रमाणित मालाचा नियमित पुरवठा व्हावा या दृष्टिकोनातून भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तूंची खरेदी करण्यात यावी, असे शासनाचे धोरण यापुढे राहणार असल्याने त्या अनुषंगाने भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या लघुउद्योगांना सदर मानकपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेली तांत्रिक सेवा, प्रयोगशाळा, रसायन शाळा या व इतर बाबतीत येणारा खर्च विचारात घेता यापुढे ५ टक्केपर्यंतचे अधिकचे किमती प्राधान्य देण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यामुळे यापुढे लघुउद्योगांना या पूर्वी देय असलेल्या सरसकट १५ टक्केऐवजी १० टक्केपर्यंतच किमती प्राधान्य परिशिष्ट १० (दहा) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींना अधीन राहून देय राहील. त्याचप्रमाणे भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या लघुउद्योगांना यापुढे १५ टक्केपर्यंतचे किमती प्राधान्य परिशिष्ट १० (दहा) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींना अधीन राहून देण्यात यावयाचे आहे.

१०.२. नवनवीन लघुउद्योगांना विक्रीसहाय्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावे या वर नमूद केलेल्या शासनाच्या धोरणाप्रमाणे सदर किमती प्राधान्य लघुउद्योगांना कायम स्वरूपी न देता ते सध्या अस्तित्वात असलेल्या लघुउद्योगांसाठी दिनांक ३१ मार्च १९९५ पर्यंत देय राहील. तर नवीन उत्पादनात येणाऱ्या लघुउद्योजकांना त्यांना देण्यात आलेल्या कायमस्वरूपी प्रमाणपत्रावर उत्पादनात गेल्याचा जो दिनांक नोंदविला असेल त्या दिनांकापासून पुढे ७ (सात) वर्षांच्या कालावधीपुरते सदर किमती प्राधान्य सीमित राहील. असे किमती प्राधान्य

[illegible] लघुउद्योग प्रत्यक्ष उत्पादन करीत असेल व कायम स्वरूपी लघुउद्योग प्रमाणपत्रात ज्या उत्पादनाची नोंद असेल अशा उत्पादना-साठीच किमती प्राधान्य देय आहे. तसेच हा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी उघडण्यात येणाऱ्या सर्व निविदात किमती प्राधान्य मिळण्यास सदर लघुउद्योग पात्र समजला जाईल.

१०.३. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी लघुउद्योगांना बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने निविदा भरल्या असतील व वरील परिच्छेद १०.२ मधील अटीस पात्र असतील तर त्यांना किमती प्राधान्य देण्यात यावे. तथापि, ज्या लघुउद्योगांतर्फे अशा निविदा भरल्या असतील अशा लघुउद्योगांना त्यांनी वेगळी निविदा भरली असल्यास वेगळे किमती प्राधान्य देता येणार नाही. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ व महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी नवनवीन लघुउद्योगांना विक्रीसहाय्य पुरेसा प्रमाणात उपलब्ध होईल यादृष्टीने प्रयत्नशील रहाणे आवश्यक आहे. महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत सुद्धा खादी व ग्रामोद्योग वस्तूंच्या उत्पादन घटकांना विक्रीसहाय्य पुरविण्यात येते. असे घटक व महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनाही जर ते १०.२ मधील अटी पूर्ण करीत असतील तर किमती प्राधान्य देय राहील.

१०.४. खरेदी व किमती प्राधान्य देताना अंगिकारावयाची तत्वे परिशिष्ट बहामध्ये स्पष्ट केली आहेत. सर्व शासकीय विभाग, महामंडळे तसेच शासकीय व निमशासकीय संस्था यांनी वस्तू खरेदी करताना परिशिष्ट बहामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे लघुउद्योगांना खरेदी व किमती प्राधान्य द्यावयाचे आहे.

**राज्य सहकारी औद्योगिक संघटनांमार्फत खरेदी करताना अधिकचे १० टक्केपर्यंतचे किमती प्राधान्य**

१०.५. दिनांक ९ ऑगस्ट १९७७ च्या आदेशान्वये १५ टक्केपर्यंतचे किमती प्राधान्याशिवाय अधिकचे १० टक्केपर्यंतचे किमती प्राधान्य खालील संस्थांना देण्यात आले होते :—

(अ) उद्योग संचालनालयाकडे नोंदणीकृत असलेल्या सहकारी औद्योगिक संस्था.

(ब) शासकीय मदत मिळत असलेल्या अंध व अपंग व्यक्तींसाठी चालविण्यात येणाऱ्या संस्था आणि,

(क) स्त्री सेवा सहकारी संघ मर्यादित, मुंबई.

तथापि या आदेशामुळे लघुउद्योजकांना देण्यात येणाऱ्या किमती प्राधान्यामध्ये भेदभाव होत असल्यामुळे व दर-करार अंतीम करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्यामुळे वरील संस्थांना लघुउद्योजक म्हणून पात्र असतील व परिच्छेद १०.२ मधील अटी पूर्ण करीत असतील तरच परिशिष्ट दहामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे लघुउद्योजकांना जे किमती प्राधान्य देय राहील त्याप्रमाणे किमती प्राधान्य देण्यात यावे.

**लघुउद्योजकांसाठी वस्तू पुरवठ्याचे आरक्षण**

१०.६. शासनाने दिनांक ३० एप्रिल १९८६ च्या आदेशाप्रमाणे यापूर्वी एकूण १२१ वस्तू लघुउद्योगांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित ठेवल्या होत्या. मध्यंतरीच्या काळात झालेल्या तांत्रिक प्रगतीमुळे व केंद्र शासनाच्या धोरणामुळे अधिकाधिक वस्तूंचे उत्पादन आता लघुउद्योजकांकडून केले जात आहे हे लक्षात घेता, तसेच केंद्र शासनाचे व जवळच्या राज्यांचे यासंबंधीचे धोरण विचारात घेता सध्याच्या यादीत आणखी १२० वस्तूंचा समावेश करण्यात येत आहे. या सर्व वस्तू लघुउद्योजकांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित समजल्या जातील. या सर्व वस्तूंची यादी परिशिष्ट अकरामध्ये देण्यात आली आहे.

१०.७. विकास आयुक्त (उद्योग) व भांडार खरेदी अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मान्यवर पुरवठादारांच्या यादीत नोंदणी करताना लघुउद्योगांना काही विशेष सवलती प्रदान करण्यात आल्या आहेत. या सवलती तसेच पुरवठादारांची नोंदणी, बयाणा रक्कम व अमानत रक्कम व त्यांचा परतावा यासंबंधी घ्यावयाच्या विशेष दक्षताविषयीच्या सूचना परिशिष्ट बारामध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

१०.८. वस्तू खरेदीसाठी निविदा मागविताना प्रसिद्धी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे योग्य ठरते. अशा वेळी केवळ राज-पत्राद्वारेच निविदेला प्रसिद्धी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिद्धीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात व त्यातून दर्जेदार तसेच वाजवी दराने वस्तू खरेदीची संधी उपलब्ध होते. अशा वेळी जाहिरातीचा खर्च कोण्या निविदापत्राच्या किमतीतून काही प्रमाणात वसूल करता येणे सहज शक्य आहे. विभागवार खरेदी समितीने खरेदीसंबंधीची निविदा काढताना याविषयी योग्य ती काळजी घ्यावयाची आहे. आता दर-कराराचा कालावधी हा सर्व वस्तूंच्या खरेदीबाबत १ जुलै ते ३० जून असा ठरविण्यात आल्यामुळे एकाच वेळी वस्तू खरेदीची जाहिरात देणे सहज शक्य आहे. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महा-मंडळ तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग यांचेमार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंबाबत राजपत्राव्यतिरिक्त राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देणे बंधनकारक राहील.

**सर्वसमाविष्टित दर**

११.१. शासनास असे आढळून आले आहे की, दरकराराबाबत निविदा मागविताना दराचे बाबतीत वेगवेगळ्या प्रकारच्या निविदा मागविण्यात येतात. असे काही बाबतीत मूळ दर वेगळे दर्शवून इतर खर्च वेगळा दर्शविणारे दर मागण्यात येतात. तर काही ठिकाणी सर्वसमाविष्टित एकच दर मागविण्याचे प्रघात आहेत. वाहतूक खर्चाच्या बाबतीतही कधी वाहतूक खर्च अंतर्भूत असलेला दर (एफ.ओ.आर.

डेस्टिनेशन) दर कधी वाहतूक खर्च वेगळा दर्शविणारे दर अशी भिन्नता आढळून येते. शासनास असेही आढळून आले आहे की, वेगवेगळ्या वस्तू खरेदीसाठी सध्या दर कराराचा अवधी अस्तित्वात असताना राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पामुळे कर आकारणीत बदल झाल्यामुळे अथवा अन्य कारणामुळे किमतीवाढ (प्राईस एस्कलेशन) देण्याबाबतची प्रकरणे खरेदी समितीकडे अथवा शासनाकडे प्राप्त होतात. या सर्व अडचणींना विचार करुन यापुढे मूळ दर, केंद्र व राज्य शासनाचे विविध कर आणि इतर खर्च या सर्वांचा समावेश असलेला एकच सर्वसमाविष्टित दर निविदेद्वारे मागविण्यात यावा, असे शासनाने ठरविले आहे. तसेच वाहतूक खर्चाबाबत सध्या असलेली भिन्नता टाळण्यासाठी व सर्वसमाविष्टित दरात वाहतूक खर्चाचाही समावेश असावा या दृष्टिकोनातून यापुढे सर्व दर/करारांच्या बाबतीत वाहतूक खर्च अंतर्भूत असलेला दर (एफ.ओ.आर. डेस्टिनेशन) म्हणूनच निविदा मागवयाच्या आहेत. मा. बऱ्याच निविदांच्या बाबतीत राज्याबाहेरील पुरवठादारांनी भाग घेतल्यामुळे परिच्छेद ९ (ग) येथे नमूद केल्याप्रमाणे तुलनात्मक दर ठरविण्यास अडचण येऊ नये म्हणून राज्य शासनाच्या विक्रीकराच्या बाबतीत मात्र राज्य शासनाचा व केंद्र शासनाचा विक्रीकर (एम.एस.टी. आणि सी.एस.टी.) यांचा दर वेगळा दर्शविण्यात यावयाचा आहे. तसेच यापुढे सर्व (दरकराराचा) कालावधी हा १ जुलै ते ३० जून असा ठरविण्यात यावयाचा आहे, म्हणजे दरकरार व संख्याकरार करण्यापूर्वी केंद्र शासन व राज्य शासनाचे अर्थसंकल्प जाहीर झाले असल्यामुळे कराच्याबाबतीत पूर्वकल्पना सर्व पुरवठादारांना असेल. त्यामुळे यापुढे कराच्या व इतर खर्चाच्या (सांविधिक मूल्यवाढ धरुन) वाढीमुळे अशी वाढ किमती-वाढ मिळण्यास यापुढे पात्र ठरणार नाही व कुठल्याही दर/कराराच्या बाबतीत अशी किमतीवाढ यापुढे देय ठरणार नाही.

११.२. वर परिच्छेद ११.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वसमाविष्टित एकच दर निविदेद्वारे मागविण्यात येणार असल्यामुळे यापुढे लघुउद्योगांना मूळ किमतीवर किमती प्राधान्य देण्याविषयी अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे शासनाने असे ठरविले आहे की, निविदा-द्वारे मागविण्यात येणाऱ्या सर्वसमाविष्टित दरातील इतर खर्चाचा भाग वगळून राहिलेल्या खर्चावर किमत प्राधान्य देणे तर्कसंगत ठरत असल्यामुळे यापुढे सर्व निविदांच्या बाबतीत सर्वसमाविष्टित दरापैकी २० टक्के भाग हा इतर खर्चाचा आहे असे सरसकट गृहित धरुन राहिलेल्या ८० टक्क्यांवरच किमती प्राधान्य लघुउद्योगांना द्यावयाचे आहे. असे करताना परिच्छेद १०.२ मधील तसेच परिशिष्ट क्र. १० यातील तरतुदीनुसार किमती प्राधान्य द्यावयाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करावयाची आहे.

११.३. भांडार खरेदी संघटना; मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय तसेच इतर विभागीय खरेदी अधिकारी यांनी वरील ११.१ व ११.२ मध्ये दर्शविलेल्या निर्णयामुळे होणाऱ्या बदलाची नोंद घ्यावी व त्यानुसार राजपत्र, भाग दोन पुरवणी, स्वीकृती पत्र, निविदा स्वीकृती व दर-करार यांचे विहित नमुन्यात दुरुस्ती करावी.

**विकसनशील भागातील सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या उद्योजकांना खरेदी प्राधान्य**

१२. १९७७ च्या सामूहिक प्रोत्साहन योजनेसंबंधीच्या शासन निर्णयात शासकीय खरेदीत विकसनशील भागातील (मुंबई, ठाणे पुणे, पिंपरी-चिंचवड व तत्सम वगळता) उद्योजकांना वाव मिळावा या दृष्टिकोनातून एकूण खरेदीच्या ठराविक ३३ टक्के पर्यंतची खरेदी अशा उद्योजकांकडून करावी असे शासकीय धोरण सुस्पष्ट करण्यात आले होते. सदर धोरणाचा त्यानंतर जाहीर झालेल्या प्रत्येक सामूहिक प्रोत्साहन योजनेत अंतर्भाव करण्यात आला होता. सध्या अस्तित्वात असलेल्या १९८८ च्या सामूहिक प्रोत्साहन योजनेतसुद्धा वरील तत्त्वाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने विकसनशील भागातील ज्या उद्योजकांकडे सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत दिले गेलेले ग्राह्य पात्रता-प्रमाणपत्र असेल अशा उद्योजकांकडून जर त्यांनी निविदेत भाग घेतला असेल व निविदेत दिलेल्या कमीत कमी दराने व समान दर्जाच्या वस्तू पुरवठ्याची तयारी दर्शविली असेल तर सर्व शासकीय विभाग, महामंडळे तसेच शासकीय व निमशासकीय संस्था यांनी अशा उद्योजकांकडून एकूण खरेदीच्या ३३ टक्के खरेदी करावयाची आहे. आवश्यकता पडल्यास सदर ३३ टक्के मागणी ही अशा पात्र उद्योग घटकांना विभागून द्यावयाची आहे. १९८८ च्या सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत सदर सवलती या "ब" विभागांतर्गत ३ वर्षांसाठी "क" विभागांतर्गत ५ वर्षांसाठी "ड" विभागांतर्गत ७ वर्षे तर पायोनियर युनिटसाठी ९ वर्षांसाठी, उत्पादनाला सुरुवात झाल्याच्या तारखेपासून देय असतील. १९८८ प्रोत्साहन योजनेतील संबंधित उतारा सोबत परिशिष्ट तेरा येथे जोडला आहे.

१३. वस्तू खरेदीच्याबाबत खरेदी अधिकाऱ्यांना निविदा, निम्नदर, किमती प्राधान्य, समांतर दर करार या व इतर आनुषंगिक बाबींसंबंधी सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने काही अडचणी असल्यास त्यांनी विकास आयुक्त (उद्योग) यांचेकडे संपर्क करावयाचा आहे व याबाबत विकास आयुक्त (उद्योग) यांनी दिलेले निर्देश हे सर्व शासकीय विभागांनी तसेच महामंडळे, शासकीय व निमशासकीय संस्था यांनी पाळावयाचे आहेत.

१४. प्रस्तुत शासन निर्णयामुळे यापूर्वी निर्गमित केलेल्या आदेशांपैकी जे आदेश निष्प्रभ ठरतात अशा आदेशांची यादी परिशिष्ट चौदामध्ये दर्शविण्यात आली आहे. तसेच या आदेशामुळे पूर्वी निर्गमित झालेल्या आदेशामध्ये सुधारणा होत असल्यास, सदर शासन निर्णयातील तरतुदी अंतिम समजाव्यात. निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सदर आदेश अंमलात येतील.

१५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनुमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर. १३५/९१/व्यय-१६, दिनांक ३ डिसेंबर १९९१ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एस. राममूर्ती,
शासनाचे मुख्य सचिव.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस.१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२

सोबत जोडलेल्या परिशिष्टांची यादी

परिशिष्ट १ .. संबंधित विभागांनी खरेदी करावयाच्या वस्तू.

परिशिष्ट २ .. शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांचेकडून खरेदी करण्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी.

परिशिष्ट ३ .. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखून ठेवलेल्या वस्तूंची यादी.

परिशिष्ट ४ .. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी.

परिशिष्ट ५ .. शासनाचे अंगीकृत व्यवसाय, सहकारी संस्था, अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था व इतर संस्था यांचेकडून खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी.

परिशिष्ट ६ .. लेंटिन आयोगाच्या शिफारशी.

परिशिष्ट ७ .. पुनर्प्रत्ययी आदेशाबाबत मार्गदर्शक तत्वे.

परिशिष्ट ८ .. दर्जाविषयी तपासणी करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांची यादी.

परिशिष्ट ९ .. राज्याबाहेरील व राज्यातील पुरवठादारांच्या किमतीतील साधर्म्य ठरविण्याचे सूत्र.

परिशिष्ट १० .. लघुउद्योगांना खरेदी व किमती प्राधान्य देताना अंमीकारावयाची तत्वे.

परिशिष्ट ११ .. लघुउद्योगाकडून खरेदीसाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी.

परिशिष्ट १२ .. लघुउद्योगांसाठी विशेष सवलती.

परिशिष्ट १३ .. १९८८ च्या सामूहिक प्रोत्साहन योजनेतील उतारा.

परिशिष्ट १४ .. निरसित ठरलेल्या शासकीय आदेशांची यादी.

---

## परिशिष्ट एक

(परिच्छेद २ पहावा)

### संबंधित विभागांनी खरेदी करावयाच्या वस्तु

| | वस्तूचे नाव | | सर्वसाधारण खरेदी विभाग |
|---|---|---|---|
| (१) | ब्लड कार्उंटिंग मशीन | .. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग. |
| (२) | हॉस्पिटल फर्निचर (स्टील) | .. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग. |
| (३) | स्टरलायझर्स, सेंट्रीफ्यूजेस, ऑटोक्लेव्हज् | | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग. |
| (४) | अमोनिया लिक्विड | .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (५) | अमोनिया एक्स्पोझिंग मशीन | .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (६) | पेंटस् आणि वारनिशेस | .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (७) | अमोनिया पेपर | .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (८) | फेरो पेपर | .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (९) | रेन गॉज | .. | पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महसूल व वन विभाग. |
| (१०) | गॉज प्लेट | .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (११) | मेटॅलिक टेप्स | .. | पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग. |
| (१२) | वमबूट सर्जनस् | .. | कृषि व पदुम विभाग (दुग्धविकास). |
| (१३) | स्नो ब्लॅकल बूट | .. | कृषि व पदुम विभाग (दुग्धविकास). |
| (१४) | स्टिरप पम्पस्, हॅंड स्प्रेयर्स, | .. | कृषि व पदुम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग. |
| (१५) | ग्रेट वुलन क्लॉथ | .. | गृह विभाग |
| (१६) | ट्रॅफिक अंबेला | .. | गृह विभाग |
| (१७) | वाळंब शिटस् | .. | गृह विभाग |
| (१८) | कॅनव्हास, कॉटन क्लॉथ, हॅवरसॅक | .. | गृह विभाग |
| (१९) | रबर कोटेड ताडपत्र्या | .. | गृह विभाग/अन्न व नागरी पुरवठा विभाग संयुक्त दर करार. |

**परिशिष्ट तीन**

(परिच्छेद ३ पहावा)

**शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांचेकडून खरेदी करण्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी**

| अनुक्रमांक | वस्तूचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कॉटन वेस्ट | शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांनी सर्व खरेदी ही महाराष्ट्र वस्त्रोद्योग विकास महामंडळ महाराष्ट्र पॉवरलूम कॉर्पोरेशन व टेक्सकॉम यांचेकडून भांडार खरेदी संघटनेने ठरविलेल्या दराने करावी. |
| २ | फाईल कव्हर्स | शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांनी सर्व खरेदी जेल विभाग किंवा महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ किंवा त्यांच्या संलग्न उत्पादन घटकाकडून करावी. |
| ३ | गनी क्लॉथ | |
| ४ | (परिशिष्ट चार) | |
| ५ | कॉटन टॅग्स | |
| ६ | सिलींग वॅक्स | |
| ७ | पेन्सिल ब्लॅक लीड | |
| ८ | इंक्स | |
| ९ | ऑईल्स फॉर टाईपरायटर्स | |
| १० | वॉल क्लॉक्स/टाईम पिसेस | |
| ११ | पेन व पेन्सिल कार्बन पेपर्स | |
| १२ | डुप्लिकेटिंग इंक | |
| १३ | रबर स्टॅम्प पॅड | |
| १४ | गम क्रीस्टल्स | |
| १५ | ऑफिस पेस्ट | |
| १६ | ट्वाईन बॉल्स | |
| १७ | पेपर पिन्स | |
| १८ | पेपर वेट | |
| १९ | ट्रेसिंग पेपर | |
| २० | टॅसिंग क्लॉथ | |
| २१ | प्रिंटींग मशीन्स | |
| २२ | पेपर | |
| २३ | थ्रेड ॲड स्युईंग व मशीन स्युईंग | |
| २४ | डार्क ब्ल्यू वुलन क्लॉथ | |
| २५ | टाईपरायटर रिबन | |
| २६ | कार्बन पेपर्स (टाईपरायटरसाठी) | |
| २७ | स्टेन्सिल पेपर | |
| २८ | छत्र्या | शासकीय मुद्रण व लेखनसामग्री यांनी प्रत्येकी ५० टक्के खरेदी—<br>(१) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या कोल्हापूर केंद्रामार्फत व<br>(२) महाराष्ट्र छत्री उत्पादन सहकारी सोसायटी लि., कर्जत यांचेमार्फत मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने ठरविलेल्या दरानुसार करावी. |

## परिशिष्ट तीन

(परिच्छेद ५ पहावा)

### महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी

| अनुक्रमांक | वस्तूचे नाव |
|---|---|
| १ | पॉलिथीन बॅग्ज |
| २ | आर.सी.सी. पाईप्स |
| ३ | जीप्सी हट्स् |
| ४ | पी.व्ही.सी. पाईप्स |
| ५ | एअर कूलर्स |
| ६ | वॉटर स्टोरेज टॅंक्स (रिजिड) |
| ७ | स्टील फोल्डींग चेअर्स |
| ८ | स्टील टयुबलर टेबल्स |
| ९ | स्टील टयुबलर चेअर्स |
| १० | स्टील फायलिंग कॅबिनेटस् |
| ११ | स्टील लॉकर्स |
| १२ | स्टील बुक केसेस |
| १३ | स्टील कॅबिनेट मायनर |
| १४ | स्टील कॅबिनेट मेजर |
| *१५ | ए.सी. प्रेशर पाईप्स, ए.सी. कपलर्स, सी.आय.डी. जॉईन्टस् |
| १६ | स्टील रॅक्स व स्टील कॉट्स |
| १७ | संगणकासाठी फर्निचर |
| १८ | लोखंडी तिजोरी |

*या वस्तू राज्यातील उद्योजकांकडून खरेदी करावयाच्या असल्यामुळे लघुउद्योजकांची क्षमता संपल्यानंतर मध्यम व मोठया उद्योजकांकडून सदर वस्तू खरेदी करण्यास महामंडळाला मुभा राहील.

## परिशिष्ट चार

(परिच्छेद ६ पहावा)

### मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी

(१) बायनोक्यूलर रिसर्च मायक्रोस्कोप

(२) मोनोक्यूलर रिसर्च मायक्रोस्कोप

(३) सायकली

(४) बॉल पेन्स व रिफिल्स

(५) इलेक्ट्रिक बल्ब व टयूब्स

(६) ताडपत्र्या

(७) रेनकोट (एअरटेक्स-काळे)

(८) रेनकोट (खाकी)

(९) इलेक्ट्रॉनिक कॅल्क्युलेटर

(१०) इंटरकॉम सिस्टीम

(११) गमबूट-रबर

(१२) प्लेन पेपर कॉपीअर

(१३) ड्रील रॉड्स

(१४) हॅमर-सर्व प्रकारचे

(१५) ड्रीलिंग बीटस

(१६) ड्रीलिंग रींग्ज

(१७) इलेक्ट्रिकल रेझिस्टन्स वेल्डेड पाईप्स अन्ड टयूब्स

(१८) वुलन जर्सीज

(१९) कॉम्प्युटर स्टेशनरी

(२०) जनरेटिंग सेटस

(२१) डीझेल इंजिन्स

(२२) सेंट्रीफ्युगल आणि रेसीप्रोकेटिंग पंपींग सेटस्

(२३) हायड्रोलिक पंप्स

(२४) कॅनव्हास शुज-ब्राऊन

(२५) लॅमिनेटींग मशीन्स

(२६) बाईंडींग मशीन्स

(२७) इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रॉनिक टाईपरायटर

(२८) मॅन्युअल टंकलेखन यंत्र.—मॅन्युअल टंकलेखन यंत्रे यापुढे प्रत्येक विभागाने व कार्यालयाने त्यांच्या गरजेप्रमाणे अंदाजपत्रकात वित्तीय तरतूद करून खरेदी करावयाची आहेत. त्यामुळे यापुढे संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय यांचेकडे मागणी-पत्रक न पाठविता भांडार खरेदी संघटनेने केलेल्या दर कराराप्रमाणे परस्पर खरेदी करावयाची आहेत. तथापि, इंग्रजी टंकलेखन यंत्र खरेदीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(२९) पॉटेबल वॉटर प्युरिफिकेशन डिव्हाईस युईंग अल्ट्रा व्हायोलेट टेक्नॉलॉजी

(३०) कॉटन वेस्ट

(३१) ज्यूट ट्वाईन

## परिशिष्ट पाच

७

| (अ) शासनाचे अंगीकृत व्यवसाय | उत्पादित वस्तू. |
| --- | --- |
| (१) लिडकाम/मराठवाडा चर्मोद्योग महामंडळ, औरंगाबाद (सिकॉम) | सर्व प्रकारच्या चामडयाच्या वस्तू. |
| (२) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ/महाटेक्स/टिक्सकॉम महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ/महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर. | मिलचे कापड, लाँग क्लॉथ, चादरी, पडद्याचे कापड, टविल्स, हॉस्पिटल-साठीचे कापड, साडया, टेरिकॉटचे कापड, कॅलिको कापड, गादीपाट व सुती अथवा वुलन चादरी, हॉस्पिटल क्लॉथ क्र. १, २, ४, ६ ७ आणि ८, नॅपकीन्स हॉस्पिटल व गणवेशाचे कापड, परिशिष्ट चार हातमाग कापड (नॉन जनता). |
| (३) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ/हॅण्डमेड पेपर इंडस्ट्रीज, पुणे/उत्पादन केंद्र, चंद्रपूर/संरजाम कार्यालय, रत्नागिरी. | हॅण्डमेड पेपर, हॅण्डमेड ड्रॉईंग पेपर, हॅण्डमेड ब्लॉटिंग पेपर, फाईल कव्हर्स व बोर्डस्, फिनाईल, पोर्ट फोलिओ, आंघोळीचा तसेच सर्व प्रकारचे साबण, खाद्यतेल (घाणीचे) बॅरॅक ब्लॅन्केटस्, डिटर्जंट पावडर व डिटर्जंट केक, मेणबत्त्या, फर्निचर, दोरखंड व इत्यादी. |
| (४) महाराष्ट्र लोकर, मेंढी विकास महामंडळ .. | बॅरॅक ब्लॅन्केटस्. |

| (ब) सहकारी संस्था (कारागृह विभाग, महामंडळे, शासकीय किंवा निम शासकीय संस्थांकडून पुरवठा न झाल्यास) | |
| --- | --- |
| (१) सेंट्रल विव्हर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नागपूर .. | गॉज, बॅन्कोनेट क्लॉथ. |
| (२) मराठवाडा हॅण्डलूम विव्हर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी, औरंगाबाद. | गॉज, बॅन्कोनेट क्लॉथ. |
| (३) डिस्ट्रीक्ट इंडस्ट्रीयल को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. .. | गॉज, बॅन्कोनेट क्लॉथ. |
| (४) स्टेट इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., मुंबई .. | गॉज, बॅन्कोनेट क्लॉथ. |
| (५) महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित वेंगुर्ले, जिल्हा सिंधुदुर्ग. | काथ्यांच्या वस्तू. |

| (क) अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था | उत्पादित वस्तू |
| --- | --- |
| (१) फेलोशिप फॉर फिजीकली हॅण्डीकॅप्स, मुंबई .. | निरनिराळे ब्रशेस, लाकडी वस्तू, लेखनसामग्रीच्या किरकोळ वस्तू, वेगवेगळया पिशव्या, ॲप्रन्स, गणवेष, विद्युत उपकरणांतील सुटया भागांची जुळवणी. |
| (२) दि नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईंड, डॉ. बेझंट रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (३) दि व्हिक्टोरिया मेमोरियल ब्लाईंड स्कूल, ताडदेव, मुंबई. .. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम |
| (४) बेगर्स होम, चेंबूर, मुंबई .. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम |
| (५) ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह प्रोडयुसर्स सोसायटी लि. विक्रोळी, २२/६८६, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, टागोरनगर, विक्रोळी, मुंबई. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम |
| (६) इंडस्ट्रियल होम फॉर ब्लाईंड वुईमेन्स, दादर, मुंबई ४०० ०१४. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (७) मनचरजी नवरोजी वाणाजी इंडस्ट्रियल होम फॉर दि ब्लाईंड, जोगेश्वरी. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम, हॅण्डलूम डस्टर्स सर्व्हिस. |
| (८) कुटुंब कल्याण सहकारी उद्योग समिती लि., नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर. | |
| (९) महारोगी सेवा समिती, "आनंदवन", वरोरा, जि. चंद्रपूर .. | बॅण्डेज कापड, गॉज कापड, बेडशीटस्. |
| (१०) मराठवाडा लोकसेवा मंडळ, गुरुनानक कुष्ठ सेवा केंद्र, नांदेड .. | बॅण्डेज कापड, गॉज कापड, बेडशीटस्. |
| (१०अ) पुना डिस्ट्रिक्ट लेप्रसी कमिटी "मनिषा" दुसरा मजला, प्लॉट नं. ३५, २-ए, मोलेदिना रोड, पुणे ४११ ००१. | बॅण्डेज कापड, गॉज कापड, बेडशिट. |
| (११) विदर्भ महारोगी सेवा मंडळ, श्री जगदंबा कुष्ठ निवास, "तपोवन", जिल्हा अमरावती. | बॅण्डेज कापड, गॉज कापड, खुर्च्या, टेबल, स्टील व लाकडी खाटा, स्टूल्स, जेवणाचे लाकडी टेबल. |
| (१२) ब्लाईंड मेन्स असोसिएशन, ८१, जगमोहनदास मार्ग, मुंबई ४०० ०३६. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (१३) मे. दीपक इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी लि., ७५/२५५५, नेहरूनगर, कुर्ला (पूर्व), मुंबई. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम, लाकडी फर्निचर/फर्निचर दुरुस्ती. |

| | (क) अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था | उत्पादित वस्तू |
|---|---|---|
| (१४) | ऑम्बिसियस ब्लाईंड इंडस्ट्रियल को-ऑप. प्रोडयुसर्स सोसायटी लि., मुंबई ४०० ०८३. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (१५) | पुणे ब्लाईंड मेन्स असोसिएशन, ८२, रास्ता पेठ, पुणे ४११ ०११ | खडू. |
| (१६) | सिल्क ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी लि., १६२/५११२, कन्नमवार नगर, क्रमांक १, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०८२. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (१७) | पुणे स्कूल अँड होम फॉर द ब्लाईंड, १४-१७, कोरेगाव पार्क, डॉ. एस. आर. मालवे मार्ग, पुणे ४११ ०११. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम |
| (१८) | दि नॅशनल फेडरेशन ऑफ द ब्लाईंड (महाराष्ट्र), द्वारा रचनात्मक कार्य समिती, गांधी चौक, राष्ट्रीय शाळा मार्ग, विलेपार्ले (प.), मुंबई ४०० ०५६. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (१९) | डी. ए. एस. डी. ब्लाईंड इंडस्ट्रियल होम, वरळी, मुंबई .. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (२०) | दी नॅशनल सोसायटी फॉर द वेल्फेअर ऑफ द फिजिकली हॅन्डीकॅप्ड, बी-६, म्युनिसिपल टेनेमेंट्स, जगन्नाथ भातनकर मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (२१) | दुर्गेश वेल्फेअर सेंटर फॉर द ब्लाईंड अँड द फिजिकली हॅन्डीकॅप्ड, म्युनिसिपल कॉलनी, बी ब्लॉक, रूम नं. १२, वरळी सिनेमामागे, परेल, मुंबई ४०० ०१२. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम. |
| (२१अ) | नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड (महाराष्ट्र युनिट), यशवंत मंडई, ३ रा मजला, रविवार कारंजा, नाशिक-२. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम (नाशिक महानगरपालिका क्षेत्रापुरतेच). |
| (२१ब) | राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था (नॉफ), देशपांडे वाडी, कोल्हटकर कॉलनी, अमरावती ४४४ ६०५. | खुर्च्या दुरुस्ती/वितकाम (अमरावती महानगरपालिका क्षेत्रापुरतेच). |

**इतर संस्था**

| | | |
|---|---|---|
| (२२) | पुनर्वसन उत्पादन केंद्र, उल्हासनगर व पिंपरी .. | चामड्याच्या वस्तू, लाकडी फर्निचर. |
| (२३) | माजी सैनिकी प्रशिक्षण-नि-उत्पादन केंद्र, सातारा .. | मांजरपाट, बेडशीट्स, गादीपाट, टॉवेल्स, लोखंडी खुर्च्या, कॉट्स स्टील रॅक्स, ग्रील्स, लाकडी फर्निचर. |
| (२४) | महाराष्ट्र स्टेट हॅण्डलूम को-ऑपरेटिव्ह फेडरेशन .. | हॅण्डलूमचे कापड व वस्तू. |

---

## परिशिष्ट सहा

(परिच्छेद ८.२ पहावा)

### खरेदी समितीच्या सुसूत्रीकरणासाठी केळकर आयोगाच्या शिफारशी

(१) खरेदी समितीतील सर्व सभासदांनी बैठकीपूर्वी खाली नमूद केल्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र द्यावयाचे आहे. हे प्रतिज्ञापत्र सदर समितीच्या कार्यवृत्तांताचा भाग म्हणून समजण्यात यावे.

**प्रतिज्ञापत्र**

मी ............................................ असे घोषित करतो की, आज दिनांक .................. रोजी होणाऱ्या खरेदी समितीच्या बैठकीसमोर दर करार अथवा संख्या करार करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या प्रस्तावातील कोणत्याही कंपनीशी अथवा निविदाकाराशी माझा वैयक्तिक संबंध नाही.

सही/—

(नाव व पदनाम)

टीप.—(१) जर असा संबंध असेल तर संबंधित सभासदांनी दर/संख्या कराराच्या कार्यवाहीमध्ये सहभागी होऊ नये.

(२) ज्या ज्या वेळी खरेदी समितीची बैठक होईल त्या प्रत्येक बैठकीत हजर असणाऱ्या सभासदांची उपस्थिती दर्शविणारी वेगळी नोंदवही ठेवून त्यात बैठकीच्या वेळी उपस्थित सभासदांची स्वाक्षरी घ्यावयाची आहे.

(३) खरेदी समितीत घेतलेल्या निर्णयासंबंधी एक स्वतंत्र नोंदवही (मिनिट बुक) ठेवावयाची असून प्रत्येक बैठकीत झालेल्या निर्णयाची या नोंदवहीत नोंद झाल्यानंतर शेवटी सभासदांनी सहमतीदर्शक सही करावयाची आहे.

(४) खरेदी समितीसमोर निविदाकारांची थोडक्यात माहिती, प्रस्ताव सादर करताना द्यावयाची आहे ज्यायोगे, खरेदी समितीतील सभासदांना निविदाकारांविषयी अधिक चौकशी करणे शक्य होईल.

(५) किमतवाढीसंबंधीच्या प्रस्तावाचा विचार करताना निविदेतील अटी व शर्तीनुसार अशी किमतवाढ मान्य असेल तरच त्यासंबंधी सदर शर्ती व अटीनुसार किमतवाढीचा निर्णय घेण्यात यावा.

## परिशिष्ट सात

[ परिच्छेद ८.३ (इ) पहावा ]

### पुनर्प्रत्ययी आदेश (Repeat Order) बाबत मार्गदर्शक तत्वे

शासन निर्णय क्रमांक एसपीओ. १०६७/२६८८९-आयएनडी-तीन दिनांक १४ जून १९६८ नुसार संख्या करारासाठी पुनर्प्रत्ययी आदेश बाबतची मार्गदर्शक तत्वे दिलेली होती. हे आदेश आता निष्प्रभ करून शासन खालीलप्रमाणे नवीन मार्गदर्शक तत्वे निश्चित करीत आहे: पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या अवधीतच खालील मार्गदर्शक तत्वांनुसार देण्यात यावेत:

(१) पुनर्प्रत्ययी आदेश हे मूळ दरापेक्षा जास्त नाही अशा दराने देण्यात यावेत.

(२) जर मूळ आदेश हे तात्कालिक/आकस्मिक स्वरूपाचे असतील, तर त्या आदेशांवर पुनर्प्रत्ययी आदेश देण्यात येऊ नयेत.

(३) वस्तूंचा दर्जा मूळ आदेशान्वये नमूद केलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसावा.

(४) ज्या वस्तूंची खरेदी पुनर्प्रत्ययी आदेशान्वये प्रस्तावित केली आहे त्या वस्तूंच्या बाजारातील किमती मूळ आदेशापेक्षा कमी नसतील वा कमी होणार नसतील किंवा ह्या किमती स्थिर आहेत वा प्रमाणीकृत आहेत याची शहानिशा करण्यात यावी, तसेच याबाबत टिप्पणी संबंधित कागदपत्रांसहित सामान खरेदी समितीपुढे सादर करणे आवश्यक आहे.

(५) मूळ आदेशातील संख्या आणि/किंमती यापेक्षा पुनर्प्रत्ययी आदेश २०० टक्क्यांपर्यंत मर्यादित असावा. पुनर्प्रत्ययी आदेशान्वये लागणारी संख्या वा तिची गरज याविषयी संबंधित सामान खरेदी समितीने खात्री करून घ्यावी.

(६) नवीन निविदा चौकशी प्रसिद्ध करण्यास तसेच वस्तूंची प्रयोगशाळेकडून नमुना चाचणी करून घ्यावयास वेळ लागेल म्हणून पुनर्प्रत्ययी आदेश पद्धत अवलंबण्यात येत आहे. याविषयी सामान खरेदी समितीने खात्री करून घेणे आवश्यक आहे.

(७) सर्व पुनर्प्रत्ययी आदेशांचे प्रस्ताव सामान खरेदी समितीनेच मंजूर करावयाचे आहेत.

वरील क्रमांक (१) ते (२) या मार्गदर्शक तत्वांमध्ये सूट देऊन पुनर्प्रत्ययी आदेश द्यावयाचे असतील तर मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून पूर्वमंजुरी घेणे आवश्यक राहील.

---

## परिशिष्ट आठ

(परिच्छेद ८.४ पहावा)

### चिन्हांकित नसलेल्या वस्तूंची खरेदी करताना मालाच्या दर्जाविषयी तपासणी ज्या संस्थांकडून करून घ्यावयाची आहे अशा मान्यताप्राप्त संस्थांची यादी

| संस्था | तपासणीसाठी पाठवावयाची उत्पादने |
|---|---|
| (१) युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, माटुंगा रोड, मुंबई ४०० ०१९ | रासायनिक, रबर, कॅनव्हास, ज्यूट यांची उत्पादने तसेच मुद्रण लेखनसाहित्य |
| (२) नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पाषाण, पुणे ४११ ००८. | रासायनिक उत्पादने. |
| *(३) डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन, डी.जी.एस. ॲण्ड डी., आयकर भवन विस्तार, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०. | सर्व प्रकारची उत्पादने. |
| (४) संचालक, स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हीस इन्स्टिट्यूट, कुर्ला-अंधेरी रोड, साकीनाका, मुंबई ४०० ०७२ | लघुउद्योजकांसाठी राखीव सर्व उत्पादने. |
| (५) डायरेक्टर, सुपरिन्टेडन्स कंपनी ऑफ इंडिया प्रा. लि., लक्ष्मी भवन, १०१, डी. डिमेलो रोड, मुंबई ४०० ००१. | रासायनिक, रबर, ज्यूट, कॅनव्हास इत्यादींची उत्पादने, मुद्रण व लेखनसाहित्य व इतर. |
| (६) इलेक्ट्रॉनिक रिजनल टेस्ट लॅबोरेटरी, प्लॉट नं. ७, एमआयडीसी एरिया, सिप्झसमोर, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. | इलेक्ट्रॉनिकी उत्पादने. |
| (७) विश्वेश्वरय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, नागपूर ४४० ०११. | अभियांत्रिकी स्वरूपाची उत्पादने. |
| *(८) जनरल मॅनेजर, रेल इंडिया टेक्निकल ॲण्ड इकॉनॉमिक सर्व्हिसेस (राईट्स), चर्चगेट बिल्डींग विस्तार, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०. | लोखंडी व पोलादी वस्तूंची उत्पादने. |
| (९) संचालक, नॅशनल टेस्ट हाऊस, एफ-१०, एमआयडीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. | फाऊंड्री उत्पादने. |
| *(१०) इंजिनिअर्स इंडिया लि., एक्सप्रेस टॉवर्स, ५वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२०. | सर्व प्रकारचे पाईप्स व अभियांत्रिकी उत्पादने. |
| (११) व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट, माटुंगा रोड, मुंबई ४०० ०१९ | अभियांत्रिकी प्लॅस्टिक व अभियांत्रिकी उत्पादने |
| (१२) कॉटन टेक्स्टाईल रिसर्च लॅबोरेटरी, एडनवाला रोड, ५ गार्डनजवळ, माटुंगा रोड, मुंबई ४०० ०१९. | कॉटन, यार्न, क्लॉथ, मॅनमेड फायबर व कॉटन उत्पादने. |

* या संस्था त्रयस्थ संस्था म्हणून तपासणीचे कामही हाताळतात.

## परिशिष्ट नऊ

[ परिच्छेद ९ (ग) पहावा ]

### राज्याबाहेरील पुरवठादारांची व राज्यातील पुरवठादारांच्या किमतीतील साधर्म्य ठरविण्याचे सूत्र

ज्या ज्या वेळी राज्याबाहेरील व राज्यातील पुरवठादारांनी निविदेत एकत्र भाग घेतला असेल अशा वेळी खालील सूत्रांचा अंगीकार करून प्रथम राज्यातील उद्योजकांचा तुलनात्मक दर काढण्यात यावा व त्यावरून साधर्म्य ठरवावे :—

(१) सर्व समाविष्टित दरातील विक्रीकराचा भाग = सर्व समाविष्टित दर $\times \frac{द}{(१००+द)} \times \frac{३}{४}$

वरील सूत्रात "द" म्हणजे विक्रीकराचा दर. सर्व समाविष्टित दर म्हणजे केंद्र शासनाचे-अगर राज्य शासनाचे कर व वाहतूक खर्च व इतर खर्च अशा खर्चाचा समावेश असलेला निविदेतील दर.

(२) उदा.—जर राज्यातील पुरवठादाराने एखाद्या वस्तूचा सर्व समाविष्टित दर रुपये १०२ दर्शविला असेल आणि विक्रीकराचा दर जर ३ टक्के असेल तर विक्रीकराचा भाग $= \frac{३}{४} \times १०२ \times \frac{३}{१०० + ३} = \frac{९१८}{४१२} =$ २.२२३ एवढा येईल व राज्याबाहेरील पुरवठादारांची साधर्म्य ठरविताना सर्व समाविष्टित दर=विक्रीकर—तुलनात्मक दर म्हणून राज्यातील उद्योजकाचा दर=१०२—२.२२३=९९.७७७ एवढा धरण्यात यावा.

राज्यातील पुरवठादाराने नमूद केलेल्या सर्व समाविष्टित दरातून वर दिलेल्या सूत्राप्रमाणे विक्रीकरावजा निव्वळ दर काढण्यात यावा व या निव्वळ दराची तुलना राज्याबाहेरील पुरवठादारांच्या सर्व समाविष्ट दराशी करण्यात यावी. या तुलनेतून दोहोंतील निम्नदर ठरविणे सहज शक्य आहे. पुरवठादारांनी निविदा भरताना आपल्या विक्रीकर नोंदणी क्रमांकाचा उल्लेख निविदेत करावा.

---

## परिशिष्ट दहा

[ पहा : परिच्छेद ८, १० व ११ ]

### लघुउद्योगांना खरेदी व किमती प्राधान्य देताना अंगीकारावयाची तत्त्वे

शासकीय विभाग, महामंडळे, शासकीय व निमशासकीय संस्था यांनी वस्तू खरेदी करताना लघुउद्योगांना द्यावयाच्या खरेदी व किमतीतील प्राधान्याबाबत खालील तत्त्वांचा अंगीकार करावयाचा आहे :—

(१) निविदा मागविताना ती वस्तू लघुउद्योगांकडून राखीव खरेदीत (परिशिष्ट ११ मधील वस्तू) आहे किंवा कसे, हे स्पष्ट करण्यात यावे. ज्या ज्या ठिकाणी वस्तू खरेदी ही लघुउद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आली असेल त्या त्या वेळी फक्त लघुउद्योगांकडून वस्तूंची खरेदी करण्यात यावी.

(२) वस्तू खरेदी ही भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या मालासाठी आहे किंवा कसे, हेही निविदेत स्पष्ट करण्यात यावे, भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तूंसंबंधीची निविदा असेल तर इतर निविदांचा विचार करण्यात येऊ नये.

(३) क्वचित प्रसंगी भारतीय मानक संस्थेने एखाद्या वस्तूबाबत गुणांकन निश्चित केले नसेल किंवा अपेक्षित मागणीप्रमाणे जर पुरवठा क्षमता उपलब्ध नसेल तरच अप्रमाणित वस्तूंबद्दल निविदा मागवून अप्रमाणित वस्तू पुरवठा करणाऱ्या निविदाकारांच्या निविदांचा विचार करण्यात यावा, तथापि, अशा वेळी मान्यताप्राप्त तयस्थ संस्थेकडून (परिशिष्ट आठमधील) पुरवठापूर्व तपासणीची अट अनिवार्यपणे पाळण्यात यावी.

(४) प्रत्यक्ष निविदा प्राप्त झाल्यानंतर ज्या ज्या वेळी मध्यम किंवा मोठे उद्योग अथवा व्यापारी यांचेबरोबर लघुउद्योगानेही एखाद्या निविदेत भाग घेतला असेल तर—

(अ) जर भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तूंची खरेदी करण्यासंबंधीची निविदा असेल तर दर्जासंबंधी व इतर सर्व अटी पूर्ण करणाऱ्या लघुउद्योगास मध्यम, मोठे उद्योग तसेच व्यापारी यांच्या तुलनेत १५ टक्के पर्यंतचे अधिक किमती प्राधान्य देय राहील यापुढे निविदा मागविताना ती सर्वसमाविष्टित दराची निविदा राहणार असल्यामुळे प्रथम परिच्छेद ११.२ येथे स्पष्ट केल्याप्रमाणे सर्वसमाविष्टित दरातून २० टक्के इतर खर्च वजा करावयाचा आहे व त्यानंतरच किमती प्राधान्य ठरवावयाचे आहे. उदा.—अशा निविदेच्या प्रकरणी एखादा मध्यम, मोठा उद्योग अथवा व्यापारी

**परिशिष्ट सहा—चालू**

याने "क्ष" या सर्वसमाविष्ट व कमीत कमी मान्य दराची निविदा भरली असेल व त्याच्या तुलनेत लघुउद्योगाने "य" या सर्वसमाविष्टित व कमीत कमी मान्य दराची निविदा भरली असेल तर या दोन दरांची तुलना करताना—

$$(\text{य} - \frac{२०}{१००}\text{क्ष}) - (\text{क्ष} - \frac{२०}{१००}\text{क्ष})$$ या सूत्रान्वये आलेला फरक हा १५ टक्केपेक्षा अधिक असता कामा नये.

फरक १५ टक्के वा त्यापेक्षा कमी असल्यास लघुउद्योजक पुरवठ्याचे आदेश मिळण्यास पात्र ठरेल. फरक १५ टक्केपेक्षा अधिक असेल अशा वेळी मात्र लघुउद्योग पुरवठ्याचे आदेश मिळण्यास पात्र ठरणार नाही.

(ब) ज्यावेळी प्रमाणित वस्तूंची खरेदी अपेक्षित नसेल आणि प्रमाणित वस्तू निर्माण करणाऱ्या उद्योगांकडून निविदा प्राप्त झाल्या नसतील तर वरील उदाहरणामध्ये दर्शविल्याप्रमाणे लघुउद्योगांसाठी मध्यम व मोठे उद्योग आणि व्यापारी यांचे तुलनेत १० टक्केपर्यंतचे किमती प्राधान्य देय राहील.

(क) जर क्वचित प्रसंगी प्रमाणित वस्तूंच्या पुरवठ्याची निविदा असूनही निविदाकारांची प्रमाणित मालाचा पुरेसा पुरवठा करण्याची क्षमता नसेल तर अशा वेळी अप्रमाणित वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या निविदेचाही विचार करणे भाग पडेल. अशा प्रसंगी खरेदी करताना निविदाकाराचे प्रमाणित वस्तू पुरवठा करणारे मध्यम व मोठे उद्योग आणि व्यापारी व लघुउद्योग यांचा एक गट (गट "अ") तर अप्रमाणित वस्तूंचा पुरवठा करणारे मध्यम व मोठे उद्योग, व्यापारी व लघुउद्योग यांचा दुसरा गट (गट "ब") अशी दोन गटांत वर्गवारी करण्यात यावी. अशा वेळी दर्जासह इतर सर्व अटी पूर्ण करणाऱ्या गट "अ" मधील लघुउद्योगाला गट "अ" मधील मध्यम, मोठे उद्योग व व्यापारी यांच्या तुलनेत १५ टक्के अधिक पर्यंतचे व गट "ब" मधील लघुउद्योगापेक्षा ५ टक्के अधिक पर्यंतचे किमती प्राधान्य देय राहील. तर गट "ब" मधील लघुउद्योगाला त्याच गटातील मध्यम, मोठे उद्योग व व्यापारी यांच्या तुलनेत १० टक्के पर्यंतचे किमती प्राधान्य देय असेल.

(५) लघुउद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वस्तू खरेदीबाबत निविदा असेल तर—

(अ) जर भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या वस्तू खरेदी करण्यासंबंधीची निविदा असेल किंवा फक्त अप्रमाणित वस्तू खरेदीसंबंधीची निविदा असेल तर एकाच दर्जाचा माल खरेदी होत असल्याने किमती प्राधान्य देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(ब) तथापि, जर क्वचित प्रसंगी, प्रमाणित मालाचा पुरवठा अपेक्षित असूनसुद्धा निविदाकारांची प्रमाणित मालाचा पुरेसा प्रमाणात पुरवठा करण्याची क्षमता नसेल तर अशा वेळी अप्रमाणित वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या लघुउद्योगांच्या निविदांचाही विचार करणे भाग पडेल. अशा प्रसंगी वस्तू खरेदी करताना अप्रमाणित मालाचा पुरवठा करणाऱ्या लघुउद्योगांच्या तुलनेत ५ टक्के अधिक पर्यंतचे किमती प्राधान्य प्रमाणित वस्तू पुरवठा करणाऱ्या लघुउद्योगाला द्यावयाचे आहे.

(६) (अ) किमती प्राधान्याचे तत्त्व अंगीकारताना प्रथम शासकीय निर्णयाच्या परिच्छेद ११.२ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सूत्र वापरून वस्तूच्या मूळ किमतीवरच किमती प्राधान्य द्यावयाचे आहे.

(ब) शासनाच्या महामंडळांनी जसे म. ल. उ. वि. महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी त्यांच्याकडे नोंदणी झालेल्या लघुउद्योगांच्या वतीने निविदा भरल्या असतील तर वर दिल्याप्रमाणे लघुउद्योगांना जे किमती प्राधान्य देय असेल ते सदर महामंडळांना देण्यात यावे. तथापि, जर एखाद्या लघुउद्योगाने महामंडळामार्फत निविदा भरून पुन्हा स्वतंत्र निविदा भरली असेल तर अशा स्वतंत्र निविदेच्या बाबतीत किमती प्राधान्य देण्यात येऊ नये. अशाच प्रकारच्या सवलती महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ व त्यांच्या संलग्न उत्पादक घटक संस्था यांनी खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत (परिशिष्ट पाच मधील अनुक्रमांक ३ समोरील दर्शविलेल्या वस्तू वगळता इतर वस्तूंबाबत) निविदेत भाग घेतला असेल तर देय असतील. या शासन निर्णयानुसार आता राज्यातील लघुउद्योग घटकांची खालीलप्रमाणे वर्गवारी करण्यात आली असल्याने—

(१) १५ टक्केपर्यंत किमती प्राधान्यास पात्र लघुउद्योग,

(२) १० टक्केपर्यंत किमती प्राधान्यास पात्र लघुउद्योग,

(३) ५ टक्केपर्यंत किमती प्राधान्यास पात्र लघुउद्योग,

(४) किमती प्राधान्यास पात्र नसलेले लघुउद्योग.

यापुढे सदर महामंडळांनी आपल्याशी संलग्न असलेल्या लघुउद्योग घटकांची याप्रमाणे वर्गवारी करून वेगवेगळ्या निविदा भरणे बंधनकारक राहील.

(क) राज्य शासनाच्या उद्योग संचालनालयाने नोंदणी केलेल्या लघुउद्योगांनाच सदर सवलती लागू आहेत.

(ड) किमती प्राधान्याचे तत्त्व हे परिच्छेद १०.२ मधील अटी पूर्ण करणाऱ्या लघुउद्योगांनाच लागू असेल.

(इ) प्रमाणित वस्तू म्हणजे भारतीय मानक संस्थेने (ब्युरो ऑफ इंडियन स्टॅंडर्ड यांनी) आय.एस.आय. किंवा बी.आय.एस. म्हणून प्रमाणित केलेल्या वस्तू.

## परिशिष्ट अकरा

(परिच्छेद १०.६ पहावा)

### लघुउद्योगांकडून खरेदीसाठी राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची यादी

(१) अस्फाल्ट बॉयलर.
(२) एअर-कॉम्प्रेसर (५ अश्वशक्तीचे, स्प्रे पेंटींगकरिता लागणारे)
(३) पिण्याच्या पाण्यासाठी ॲल्युमिनियमच्या बाटल्या.
(४) ऑटोमोबाईल रेडीएटर्स.
(५) एआरसी/एसीएसआर कंडक्टर्स (१९ स्ट्रॅन्डसपर्यंत).
(६) ॲबसॉर्बन्ट कॉटन.
(७) प्राणिचलीत गाड्या/ॲनिमल ड्रिव्हन व्हेईकल्स.
(८) सुट केस, ब्रीफ केसेस, ॲटेच केसेस (प्लॅस्टीक ब्लो मोल्डेड सोडून).
(९) ॲमिटर्स/ओहम मिटर.
(१०) ऑटोमोबाईल हेड लाईट.
(११) हातात, विजेवर चालणाऱ्या व प्राणिचलीत कृषीविषयक अवजारे व वस्तू.
(१२) ॲल्युमिनियम बिल्डर्स व हार्डवेअर विजागऱ्या (हिंजेस)
(१३) एअर कूलर्स.
(१४) सायकलचे सुटे भाग.
(१५) लाकूड कटाईसाठी लागणारे बँड सॉ ब्लेड्स.
(१६) ६० लिटर क्षमतेपर्यंतचे बॅरल्स व ड्रम्स.
(१७) बॅटरी एलिमिनेटर्स.
(१८) बूट पॉलिश.
(१९) बिल्ले (बॅचेस).
(२०) बँडेजचे कापड.
(२१) चादरी (बेडशीट्स).
(२२) सर्व प्रकारचे ब्रश व ब्रुम्स.
(२३) बिटूमिनाईज्ड वॉटरप्रुफ पेपर.
(२४) ब्लू प्रिंट पेपर व अमोनिया पेपर.
(२५) ब्लॅकस्मिथ हुवे (लेकोटी).
(२६) बेनझील बेन्झोएट.
(२७) बोन मिल्स.
(२८) ब्रश व ब्रुम्स.
(२९) ब्लॉटींग पेपर.
(३०) ब्लो मोल्डेड कंटेनर्स.
(३१) बेकरी प्रॉडक्ट्स.
(३२) कॉक्स (नळ) व व्हॉल्व्ह (झडप).
(३३) सिमेंटच्या फरश्या (फ्लोरिंग टाईल्स).
(३४) कंडयूट पाईप्स (धातूचे किंवा अधातूचे).
(३५) कॅप्स (टोप्या व हॅट्स—सुती किंवा लोकरीच्या).
(३६) सुती पट्ट्या व नाड्या.
(३७) कॉयर फायबर/कॉयर यार्न.
(३८) कॉयर मॅटस् आणि मॅट्रेसेस.
(३९) कापूसाच्या काड्या.
(४०) कॉम्प्रेटेड पेपर व बोर्डस्.
(४१) कॉम्पोझीट कन्टेनर्स.
(४२) सिलींग रोझेस.
(४३) कॉपर सल्फेट आणि कॉपर नॅप्थेनेट.
(४४) कॉटन होझीअरी.
(४५) कॉटन कार्ड ट्वीन.
(४६) लोकरीच्या कांबळी.
(४७) सर्वांगिटर (क्लिनकिल).
(४८) कॅस्टॉर ऑईल (एरंडेल).
(४९) इतर कॉडजेल.
(५०) कॉटन रोल्स.
(५१) सी.आय.बी. जॉइन्टस.
(५२) १५ अश्वशक्तीपर्यंतचे डिझेल इंजिन आणि डिझेल इंजिनवर चालणारे १५ अश्वशक्तीपर्यंतचे व ३००० आरपीएमचे सेंट्रीफ्युगल पंप.
(५३) डेअरी इक्वीपमेंट्स मिल्क कॅन्स आणि स्ट्रेनर्स.
(५४) रेखा व गणिती उपकरणे आणि सर्वेक्षण उपकरणे (थिओलाईट व प्रिसिजन उपकरणे सोडून).
(५५) तारखेचे शिक्के (डेट स्टँप).
(५६) डिस्ट्रीब्युशन बोर्ड.
(५७) डस्टर कॉटन.
(५८) डस्ट बीन (कचऱ्याची टोपली).
(५९) डायमेथील थायलेट.
(६०) डायब्युटील थायलेट.
(६१) डाईज—(अ) ॲझो डाइज (डायरेक्ट ॲण्ड ॲसिड).
(ब) बेसिक डाईज.
(६२) एक्सपांडेड मेटल्स.
(६३) विजेवर चालणाऱ्या घरगुती वापराच्या वस्तू—रूम हिटर वॉटर हिटर, नॉन स्टोरेज इमर्शन टाईप—गीझर्स (इन्स्टेटेनीअस टाईप्स ऑफ हिटर्स, हॉट एअर प्लॉवर्स, इलेक्ट्रिक स्टोव्हज, ऑल टाईप्स ऑफ मिक्सर्स, डोअर बेल्स, चिम्स इलेक्ट्रिक केटल्स, टोस्टर्स, इलेक्ट्रिक आयन, रूम क्लीनर.
(६४) इलेक्ट्रिक सोल्डरींग आयर्न.
(६५) आयलेट्स.
(६६) इलेक्ट्रिक ट्रान्समिशन लाईन हार्डवेअर स्टील क्रॉस बार, क्रॉस आर्म क्लॅम्प, आर्चिंग आर्म, ब्रॅकेट्स, इ.
(६७) एक्झॉस्ट मफलर्स.
(६८) इमर्जन्सी लॅम्प्स.
(६९) इलेक्ट्रिक फ्लॅश गन्स.
(७०) फायर हायड्रंट्स.
(७१) फ्ल्युरोसंट ट्यूब्ज, चोक्स, स्टार्टर, स्ट्रीट लाईट फिक्चरसह.
(७२) फोल्डर्स (पेपर आणि प्लास्टीक).
(७३) फिश्श प्लेट्स आणि कॅन्स.
(७४) फ्रेंच पॉलिश.
(७५) फ्लशिंग सिस्टीम्स.
(७६) फायर बॉक्स.
(७७) गनमेटल वशेरा.

परिशिष्ट अकरा—चालू

(७८) गेज.

(७९) गम पेपर पट्टी.

(८०) गॉज क्लॉथ.

(८१) ग्लास ॲम्प्युल्स.

(८२) ग्रॅफिक क्रुसिबल्स—५०० नंबरपर्यंत.

(८३) गॅस मॅन्टल्स.

(८४) ग्रीस निपल्स, ग्रीस गन्स.

(८५) ग्लू.

(८६) हायड्रॉलिक व मेकॅनिकल जॅक्स, ३० टन क्षमतेपेक्षा कमी.

(८७) हॅण्डस्प्रेअर्स आणि डस्टर्स.

(८८) हायपोडर्मिक निडल्स.

(८९) हॅंगर्स फॉर फायलींग सिस्टीम.

(९०) हाताने करणारे लोहार काम/सुतार काम.

(९१) हॅण्ड स्टॅप्लींग मशीन.

(९२) हॅण्ड नम्बरींग मशीन.

(९३) हॅण्ड ग्लोव्हज (हातमोजे).

(९४) हॅण्ड प्रेस.

(९५) हाइड ॲण्ड कंट्री लेदर (सर्व प्रकारचे).

(९६) होल्बॉल.

(९७) हेल्मेट नॉन-मेटॅलिक.

(९८) होस पाईप्स.

(९९) हॅव्हर सॅक्स.

(१००) आयर्न ॲण्ड स्टील ट्रंक्स, बॉक्स सुट केसेस, किट बॉक्सेस, ट्रेज मग, डस्टबीन, बाथ टब्स.

(१०१) ऑफिस व हॉस्पिटलसाठी लागणारे आयर्न ॲण्ड स्टील अप्लायन्सेस.

उदा.—स्टील रॅक्स-स्केलटन व एन्क्लोज प्रकारची, स्टील चेअर्स सर्व प्रकारच्या (रिव्हॉल्व्हींग) व टिल्टींग चेअर्स वगळता, स्टील कॉट्स, स्टील बुक केसेस, स्टील कबर्ड्स, ॲक्स, कार्डइन्डेक्स, कॅबिनेट्स, हॉस्पिटल्स. इन्स्ट्रुमेंट, क्रीब कॅबिनेट्स, बेड स्टॅण्ड्स, ड्रॉपसाईड ॲडल्ट कॉट, फावलर बेड, मॅटरनिटी बेड वीथ साईड ग्रीब.

(१०२) आयर्न/मिटल क्लेड, एल ॲड टी डिस्ट्रीब्युटींग बॉक्सेस, आयसीडीपी ॲण्ड आयसीटीपी स्विचेस, किटकॅट फ्युजेस ॲण्ड कट आऊट्स बकट्स हाल्वस.

(१०३) इन्सेक्टीसाईड्स ॲण्ड फॉर्म्युलेशन्स.

(१०४) जॅकोनेट क्लॉथ.

(१०५) लो टेन्शन इन्स्युलेटर्स ॲण्ड फ्युजेस.

(१०६) लीड स्केल.

(१०७) लॅन्टर्न विक्स.

(१०८) लॅटिक्स फोम स्पंज.

(१०९) लॅम्प होल्डर्स.

(११०) लेदर कॉलर्स.

(१११) लेदर बेल्ट, स्ट्रीप्स, बॅग्ज पर्सेस, चामड्याच्या लहान शोभेच्या वस्तू, लेदर बूट, चप्पल, सॅंडल, लेदर हार्नेस.

(११२) लेदर सोल ॲण्ड अप्पर.

(११३) लिन्सीड ऑईल.

(११४) लुब्रिकेटर्स.

(११५) लायटनींग ॲरेस्टर्स, २० के. व्ही. पर्यंत.

(११६) मॅनहोल कव्हर्स ॲण्ड फ्रेम्स.

(११७) मेटल बटन्स.

(११८) एम. एस. पाईप फिटींग्स (१०० एमएम व्यासापर्यंत).

(११९) मेटॅलिक टेप्स.

(१२०) एम. एस. ॲण्ड सी. आय. फ्रेम्स.

(१२१) मेट्रिक वेट्स ॲण्ड मेझर्स, बॅलन्सेस स्केल्स (सायंटिफिक व इलेक्ट्रॉनिक बॅलन्सेस).

(१२२) मिनिएचर बल्बस्.

(१२३) मेटल पॉलिश.

(१२४) मेटल बॅजेस्.

(१२५) मच्छरदाणी.

(१२६) मॅग्नेशियम सल्फेट.

(१२७) मशीन स्क्रूज.

(१२८) मशीन शॉप वाइसेस.

(१२९) मेजरींग टेप्स ॲण्ड स्टीक्स.

(१३०) मोनोमिटर्स.

(१३१) नट्स ॲण्ड बोल्ट्स.

(१३२) नायलॉन स्टॉकिंग्ज.

(१३३) नेल कटर्स.

(१३४) निकेल सल्फेट.

(१३५) ऑर्डिनरी बेंच वाइसेस.

(१३६) इलेक्ट्रिक ओव्हन्स (घरगुती पद्धतीचे).

(१३७) पेट्रोमॅक्स लॅन्टर्न्स (हरीकेन लॅन्टर्न्स सह), सिग्नल लॅम्प, विक्स ॲण्ड प्रेशर स्टोव्ह.

(१३८) पी. व्ही. सी. ॲण्ड व्ही. आय. आर केबल्स.

(१३९) फिनाईल.

(१४०) पेन्ट्स ॲण्ड वार्निशेस ॲण्ड बॉइल ऑईल्स.

(१४१) पंचींग मशीन.

(१४२) पेपर पिन्स ॲण्ड क्लिप्स, सेफ्टी पिन्स, स्टॅप्लर पिन्स, पेपर कन्व्हर्शन प्रॉडक्ट्स, बॅग्ज, एन्व्हलप्स, आईस्क्रीम कप्स, स्ट्रॉलीप्स.

(१४३) पेपर बॅग्ज, पेपर कप्स आणि पेपर सॉसर्स (बशा).

(१४४) पेपर बोर्ड कार्टन्स, फोल्डर्स.

(१४५) पेपर (कागदी लिफाफे) एन्व्हलप्स.

(१४६) पेपर नॅपकिन्स.

(१४७) पॉलिथिन बॅग्ज.

(१४८) प्लॅस्टिक बॅग्ज ॲण्ड बटन्स.

(१४९) प्लॅस्टिक पेपर ॲण्ड क्लॉथ.

(१५०) पॉलिथिन फिल्म्स प्रॉडक्ट्स कलर्ड प्रिंटेड फिल्म्स ॲण्ड बॅग्ज इत्यादी.

(१५१) पेन्टेड साईन बोर्ड्स, वुडन हॅमर्स, वुडन क्रीज केन ॲण्ड बांबू लीन, लॅन्टर्न पोस्ट्स ॲण्ड लाठीज.

(१५२) पेन्ट रिमुव्हर.

(१५३) प्लॅस्टर ऑफ पॅरिस.

(१५४) पोस्टल लेड सिल्स.

(१५५) पी. व्ही. सी. फूटवेअर्स.

(१५६) प्लास्टीक केन.

(१५७) प्लेईंग कार्ड्स.

(१५८) पोटॅशियम नाइट्रेट.

परिशिष्ट अकरा—समाप्त

(१५९) पॉवर ट्रान्सफॉर्मर ११ के. व्ही. ते ३३ के. व्ही. मॅक्सीमम रेंज १०,००० के. व्ही. ए. पर्यंत.

(१६०) पिलो कॉटन.

(१६१) चटप्या व लोणची.

(१६२) पी. व्ही. सी. पाईप्स १,८०० मिलीमिटर व्यासापर्यंत.

(१६३) रिव्हेटस्.

(१६४) रोलींग शटर्स.

(१६५) आर. सी. सी. पाईप्स एनपी-१, एनपी-२-१२०० मिलीमिटर व्यासापर्यंत तसेच पी-१, पी-२, पी-३ इत्यादी वर्ग १८०० मिलीमिटर व्यासापर्यंत.

(१६६) डी. सी. रेग्युलेटर्स.

(१६७) रेडिमेड गार्मेंटस्.

(१६८) रिबन सिल्क अँण्ड आर्ट सिल्क.

(१६९) रस्ट अँण्ड स्केल प्रिव्हेंटींग/रिमुव्हींग कॉम्पोझीशन्स.

(१७०) रबुराईझ गार्मेंटस.

(१७१) रबर टयुबींग (ब्रेडेड टयुबींग सोडून).

(१७२) रबर होसेस आर्मर्ड (अनब्रेडेड) अँण्ड कॉर्डस.

(१७३) रस्ट कॉटन.

(१७४) रेझर्स.

(१७५) रबर बलुन्स.

(१७६) रेडिओ लो कॉस्ट (मिडियम वेव्ह बँड, कम्युनिटी रेडिओ रिसीव्हर्स).

(१७७) स्टील वॉटर टँकर्स.

(१७८) स्टरीलायझर.

(१७९) स्टीरप पंप्स.

(१८०) स्पेडस्, घमेली, बकेटस् केणीस.

(१८१) स्क्रू ड्रायव्हर्स.

(१८२) सबमर्सिबल पंप्स रेसिप्रोकेटिंग पंप्स—दहा हॉर्स पॉवरपर्यंत विजेवर चालणारे सेंट्रीफ्युगल पंप्स (जेक्ट पंप सेट सहित) दहा हॉर्स पॉवरपर्यंत.

(१८३) स्टील व्हॉल्टस् तिजोरी व कॅश बॉक्स (स्टील).

(१८४) मटण व खाद्यपदार्थ ठेवण्याकरिता लागणारी स्टीलची कपाटे.

(१८५) सोडियम सिलिकेट.

(१८६) स्पोर्टस नेट.

(१८७) सिलींग वॅक्स.

(१८८) कैची (सिझर्स) (सर्जिकल सिझर्स वगळून).

(१८९) स्टँप पॅडस्.

(१९०) सॉल्ट ग्लेझ्ड पाईप्स.

(१९१) सर्जिकल मोजे.

(१९२) सॉकेटस.

(१९३) स्ट्रीट लाईट फिटींग्ज.

(१९४) स्टुडंट मायक्रोस्कोप.

(१९५) स्ट्रँडेड वायर.

(१९६) स्टील मेझरींग टेप्स.

(१९७) शॉवेल्स.

(१९८) स्वीचेस टबलर

(१९९) स्केल्स पेईंग व [illegible]

(२००) सोडियम नायट्रेट.

(२०१) सायंटिफिक लॅबोरेटरी ग्लास वेअर्स.

(२०२) स्क्वीरर्ड केज इंडक्शन मोटर्स.

(२०३) सॅनिटरी टॉवेल्स.

(२०४) स्टील वूल.

(२०५) चष्म्यांच्या फ्रेम्स.

(२०६) सॅनिटरी प्लंबिंग फिटींग्ज.

(२०७) स्नॅप फास्टनर्स.

(२०८) सेफ्टी मॅचेस.

(२०९) बुटांच्या लेसेस्.

(२१०) लाख बँगल्स.

(२११) सर्व प्रकारची स्कीन सोप.

(२१२) सोप कार्बोलिक.

(२१३) स्लीपींग बॅग्ज.

(२१४) स्टोन मेटल.

(२१५) टीन कंटेनर्स, टीन ट्रेज, टीन मेस.

(२१६) टर्की रेड ऑईल.

(२१७) टार्पोलिन आणि कॅनव्हास बॅग्ज.

(२१८) टॅक्समेटॅलिक.

(२१९) टायर्स आणि टयुब्ज (सायकल).

(२२०) टूथ पावडर.

(२२१) टेबल नाईव्हज्.

(२२२) सर्व प्रकारची भांडी (युटेन्सिल्स)—
ब्रास, कॉपर, ॲल्युमिनियम, स्टेनलेस स्टील.

(२२३) छत्र्या.

(२२४) व्होल्टेज स्टॅबीलायझर्स.

(२२५) व्हील बॅरोज, हस्तचलित ट्रॉलीज, पिण्याच्या पाण्याकरिता ट्रॉलिज, ड्रायट फूड ट्रॉलीज, औषधांच्या ट्रॉलीज, सर्जिकल उपकरणांच्या ट्रॉलीज, स्ट्रेचर ट्रॉलीज.

(२२६) वॉटर मीटर्स.

(२२७) वायर नेल्स, स्टॅंडेड वायर पॅनेट पीन्स, कार्टेर [illegible] यासारखी तारेची उत्पादने.

(२२८) वॉशिंग सोप.

(२२९) वूलन ब्लँकेटस्, हॉस्पिटल वूलन ब्लँकेटस्.

(२३०) मेणबत्त्या.

(२३१) वुडन पॅकींग केसेस.

(२३२) वॅक्सड पेपर.

(२३३) लाकडी विद्युत उपकरणे—बॅटनस् राऊंड ब्लोकस् बोर्ड (प्लेन वार्निश्ड आणि रंगवलेले केसिंग व कॅपिंग).

(२३४) लाकडी फर्निचर.

(२३५) लिहिण्याकरिता शाई (फाऊंटन पेन व बॉलपेनची शाई वगळून) स्टँपपॅडची शाई (मुद्रणाकरिता लागणारी तसेच मार्कींगकरिता लागणारी पक्की शाई यासारखी विशिष्ट शाई वगळून).

(२३६) विड क्लिअर वायपर्स (फक्त आर्म आणि ब्लेडस).

(२३७) विविध प्रकारचे वॉशर्स.

(२३८) वुडन विनिअर्स.

(२३९) झिप फास्टनर्स-मेटॅलिक-नॉन मेटॅलिक.

(२४०) झिंक सल्फेट.

(२४१) ॲल्युमिनियम बॉक्सेस.

## परिशिष्ट बारा

(परिच्छेद १०.७ पहावा)

### लघुउद्योजकांसाठी विशेष सवलती

विकास आयुक्त (उद्योग) व भांडार खरेदी अधिकाऱ्याकडे मान्यवर पुरवठादार म्हणून ज्या पुरवठादारांस नोंदणी करावयाची असेल त्यांच्याकडून नोंदणी शुल्क म्हणून रु. १०,००० (रुपये दहा हजार मात्र) ची अनामत रक्कम खालीलपैकी कोणत्याही एका प्रकारात घेण्यात यावी. नोंदणीकृत सहकारी संस्थांच्या बाबतीत पुरवठादार म्हणून नोंदणी करताना ही रक्कम रु. ५,००० (रुपये पाच हजार मात्र) एवढी असेल.

(अ) विकास आयुक्त, उद्योग व भांडार खरेदी अधिकारी यांच्या नावाने दिलेली दर्शनी हुंडी.

(ब) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या संमतीसह अनुसूचित बँकांनी दिलेली ३ वर्ष मुदतीची बँक गॅरंटी.

(क) विकास आयुक्त (उद्योग) व भांडार खरेदी अधिकाऱ्यांना तारण ठेवलेली राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, राष्ट्रीय संरक्षण प्रमाणपत्रे आणि पोस्टाची बचत बँक खाती.

२. खालील नमूद केलेल्या पुरवठादारांना नोंदणी शुल्क, अनामत रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे :—

(१) महासंचालक, पुरवठा व विल्हेवाट, नवी दिल्ली यांच्याकडे नोंदणी झालेले व ज्यांचे संबंधित मालाचे उत्पादक उद्योग घटक महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात आहेत असे पुरवठादार.

(२) महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अर्धशासकीय व जिल्हा परिषदेच्या संस्था आणि मध्यवर्ती शासन व इतर सर्व राज्य शासनाच्या अंगीकृत व्यवसाय संस्था (यांच्यासाठी अशा संस्था प्रत्यक्षात उत्पादित करीत असलेल्या वस्तूंसाठी).

(३) उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे लघुउद्योग म्हणून नोंदणी झालेल्या घटकांसाठी त्यांच्या स्थायी लघुउद्योग नोंदणी पत्रात नमूद केलेल्या उत्पादित वस्तूंकरिता.

**बयाना रक्कम**

दरपत्रके सादर करताना दरपत्रकासोबत पुरवठा करावयाच्या साहित्याच्या किंमतीच्या शेकडा ३ टक्के रक्कम किंवा कमाल रु. ५,००० (रुपये पाच हजार फक्त) बयाना म्हणून रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडे चलनाद्वारे भरावे व चलनाची प्रत निविदेबरोबर सादर करावी, किंवा अनुसूचित बँकावर दिलेल्या रोखीत दर्शनी हुंडीच्या स्वरूपात विकास आयुक्त (उद्योग) व भांडार खरेदी अधिकाऱ्यांच्या नावाने पुरवठादाराने भरावी.

२. खाली नमूद केलेल्या पुरवठादारांना बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे :—

(१) ज्या पुरवठादारांना नोंदणी शुल्क अनामत रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे असे पुरवठादार.

(२) राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ व लघुउद्योग सेवा संस्था, मध्यवर्ती शासन यांच्याकडे नोंदणी झालेले लघुउद्योग उत्पादक (फक्त त्यांचे स्वतःचे उत्पादित साहित्य).

(३) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडे नोंदणी झालेले पुरवठादार/व्यापारी.

**जमानत ठेव**

सर्व यशस्वी पुरवठादारांकडून पुरवठा व्हावयाच्या साहित्याच्या किंमतीच्या ३ टक्के रक्कम जमानत ठेव म्हणून घेण्यात यावी ही ठेव नोंदणी शुल्क अनामत रक्कम ज्या स्वरूपात घेण्यात येते, त्यापैकी कुठल्याही स्वरूपात घेण्यास मुभा राहील. तथापि, तातडीच्या खरेदी पद्धतीनुसार जेव्हा खरेदी केली जाईल त्यावेळी पुरवठा व्हावयाच्या साहित्याच्या किंमतीच्या ५ टक्के रक्कम जमानत ठेव म्हणून घेण्यात यावी. अशा खरेदी पद्धती पुरवठा कालावधी कमी असल्याने व अधिक जोखीम असल्याने खबरदारी म्हणून अशी वाढ आवश्यक ठरते. कोणत्याही परिस्थितीत जमानत ठेव व करारपत्र या बाबी पूर्ण केल्याखेरीज अंतिम मागणी आदेश देण्यात येऊ नये.

अशी जमानत ठेव विकास आयुक्त (उद्योग) व भांडार खरेदी अधिकाऱ्यांच्या नावे कोणत्याही एका वरील स्वरूपात घेण्यात यावी. खाली नमूद केलेल्या पुरवठादारांना जमानत ठेव भरण्यापासून मुक्त केले आहे :—

(अ) महासंचालक, पुरवठा व विल्हेवाट, नवी दिल्ली यांचेकडे नोंदणी झालेले व महाराष्ट्रात कारखाने अस्तित्वात असलेले पुरवठादार.

(ब) विकास आयुक्त (उद्योग) व भांडार खरेदी अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या पुरवठादारांच्या मान्यवर यादीतील पुरवठादार फक्त रु. २५,००० (रुपये पंचवीस हजार मात्र) पर्यंतच्या साहित्यासाठी.

(क) उद्योग संचालनालय यांचेकडे लघुउद्योग म्हणून नोंदणी झालेल्या घटकांना व महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळाशी संलग्न अथवा नोंदणीकृत असलेल्या घटकांसाठी रु. ५०,००० पर्यंतच्या खरेदी किंमतीवर.

वरील (क) नुसार रु. ५०,००० पेक्षा जास्त खरेदी किंमत असेल तर खरेदी किंमतीच्या ३ टक्के प्रमाणे जमानत ठेव आकारण्यात येईल व या जमानत ठेवीची मर्यादा रु. १०,००० (रुपये दहा हजार फक्त) पर्यंत राहील.

परिशिष्ट बारा—चालू

२. पुरवठादाराने मालाचा पुरवठा उचित प्रकारे केल्याबाबत "ना हरकत प्रमाणपत्र" मागणीकार कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर अमानत ठेव पुरवठादारास परत दिली जावी असे शासनाचे आदेश होते. या आदेशात आता खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :—

"दर कराराचा वॉरंटी कालावधी एक वर्षाचा असल्याने हा कालावधी संपेपर्यंत अमानत रक्कम परत करण्यात येऊ नये. त्यासाठी समादेशकाने पुरवठा झाल्यावर सहा महिन्यांचे आत पुरवठादाराविरुद्ध काही तक्रार असल्यास मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस कळवावी. त्या सहा महिन्यांच्या कालावधीत समादेशकांकडून तक्रार आली नाही तर १ वर्षाच्या वॉरंटी कालावधीनंतर इंडेम्निटी बॉंड घेऊन पुरवठादाराची अमानत ठेव परत करण्यात यावी व अशी अट दर कराराच्या दरपत्रात घालण्यात यावी. संस्था कराराचे बाबतीत ना हरकत प्रमाणपत्र आल्याखेरीज आणि/किंवा वॉरंटी कालावधी संपेपर्यंत तक्रार न आल्यास अमानत ठेव परत करावी."

तसेच ही अट नोंदणी ठेव परत करण्यासाठी नोंदणी पत्रामध्ये घालावी व सहा महिन्यांच्या कालावधीत काही तक्रार न आल्यास इंडेम्निटी बॉंड घेऊन नोंदणी ठेव परत करण्यात यावी.

निविदाबाबत स्वीकृती आदेश रवाना झाल्यानंतर निविदा चौकशीसोबत आलेल्या सर्व बयाणा रक्कम त्वरित परत कराव्यात.

३. सदर शासन निर्णयानुसार खरेदीसाठी कोषागारातून संक्षिप्त बिलावर रकमा काढताना सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना "प्रस्तुत खरेदी करताना शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखसं. १०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२ मधील आदेशांचे पालन करण्यात आले आहे, असा दाखला देणे आवश्यक राहील. राज्यातील संबंधित कोषागार अधिकाऱ्यांना वित्त विभागामार्फत अशा सूचना देण्यात येत आहेत की, विकास आयुक्त (उद्योग) व भांडार खरेदी अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या माध्यमाशिवाय खरेदी करण्यात आलेल्या साहित्याच्या किंमती अदा करण्यासाठी जी बिले सादर केली जातील त्यावर वरीलप्रमाणे प्रमाणपत्र दिले असल्याची खातरजमा केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा करू नये.

---

## परिशिष्ट तेरा

(परिच्छेद १२ पहावा)

### राज्य शासन/शासनाचे उपक्रम/सांविधिक संस्थांच्या खरेदी कार्यक्रमामध्ये प्राधान्य

१९८८ योजनेखाली ज्या पात्र प्रकल्पांना कार्यान्वियीन अभिकरणाने आवश्यक पात्रता प्रमाणपत्रे दिली आहेत त्यांना अधिमान्य वागणूक देण्याच्या दृष्टीने शासन निर्णय क्रमांक एसपीओ. १०७७/१२०९५९/आयएनडी-६, दिनांक ९ ऑगस्ट १९७७ च्या परिशिष्ट १ मध्ये सूचित राज्य शासन आणि राज्य शासनाचे उपक्रम आणि सांविधिक संस्था अशा पात्र आणि भाव सांगणाऱ्या प्रकल्पांकडून मागणी प्रपत्रकाच्या प्रमाणाच्या ३३ प्रतिशत खरेदी जाहीर स्पर्धात्मक निविदामध्ये मान्य असलेल्या कमीत कमी किंमतीला करतील.

हे प्रोत्साहन व्यापारी तत्त्वावर उत्पादन सुरू झाल्यापासून खालील कालावधीसाठी उपलब्ध असेल :—

| गट "ब" क्षेत्र | गट "क" क्षेत्र | गट "ड" क्षेत्र | आद्यप्रवर्तक उद्योग आणि विनाउद्योग जिल्हा |
|---|---|---|---|
| ३ वर्षे | ५ वर्षे | ७ वर्षे | ९ वर्षे |

### तालुकावार गटवार वर्गीकरण

| जिल्हा | तालुका | १ ऑक्टोबर १९८८ ते ३० सप्टेंबर १९९० पर्यंत वर्गीकरण | १ ऑक्टोबर १९९० ते ३० सप्टेंबर १९९३ पर्यंत वर्गीकरण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| **१. मुंबई विभाग** | | | |
| (१) बृहन्मुंबई .. | .. बृहन्मुंबई .. | .. अ | अ |

परिशिष्ट तेरा—चालू

| जिल्हा (१) | तालुका (२) | १ ऑक्टोबर १९८८ ते ३० सप्टेंबर १९९० पर्यंत वर्गीकरण (३) | १ ऑक्टोबर १९९० ते ३० सप्टेंबर १९९३ पर्यंत वर्गीकरण (४) |
|---|---|---|---|
| | **२. कोकण विभाग** | | |
| (२) ठाणे .. | .. ठाणे .. .. | अ | अ |
| | भिवंडी .. .. | अ | अ |
| | कल्याण .. .. | अ | अ |
| | उल्हासनगर .. .. | अ | अ |
| | वसई (मुंबई महानगर प्राधिकरणाच्या हद्दीमधील). | अ | अ |
| | वसई (मुंबई महानगर प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील). | क | ब |
| | पालघर .. .. | क | ब |
| | डहाणू .. .. | क | ब |
| | तलासरी .. .. | ड | ड |
| | जव्हार .. .. | ड | ड |
| | मोखाडा .. .. | ड | ड |
| | वाडा .. .. | ड | ड |
| | शहापूर .. .. | ड | ड |
| | मुरबाड .. .. | ड | ड |
| (३) रायगड .. | .. पनवेल (मुं. म. प्रा. मधील) .. | अ | अ |
| | पनवेल (मुं. म. प्रा. बाहेरील) .. | क | ब |
| | खालापूर (मुं. म. प्रा. मधील) .. | अ | अ |
| | खालापूर (मुं. म. प्रा. बाहेरील) .. | क | ब |
| | रोहा .. .. | क | ब |
| | अलिबाग (मुं. म. प्रा. मधील) .. | अ | अ |
| | अलिबाग (मुं. म. प्रा. बाहेरील) .. | क | ब |
| | कर्जत (मुं.म.प्रा. मधील) .. | अ | अ |
| | कर्जत (मुं.म.प्रा. बाहेरील) .. | क | क |
| | पेण (मुं.म.प्रा. मधील) .. | अ | अ |
| | पेण (मुं.म.प्रा. बाहेरील) .. | क | ब |
| | उरण .. .. | ब | ब |
| | सुधागड .. .. | क | ब |
| | म्हसळा .. .. | ड | क |
| | श्रीवर्धन .. .. | ड | क |
| | माणगाव .. .. | ड | क |
| | महाड .. .. | ड | क |
| | मुरूड .. .. | ड | क |
| | पोलादपूर .. .. | ड | ड |
| (४) रत्नागिरी .. | .. रत्नागिरी .. .. | ड | क |
| | संपूर्ण जिल्हा (रत्नागिरी तालुक्याव्यतिरिक्त). | ड | ड |

परिशिष्ट तेरा—चालू

| जिल्हा (१) | तालुका (२) | १ ऑक्टोबर १९८८ ते ३० सप्टेंबर १९९० पर्यंत वर्गीकरण (३) | १ ऑक्टोबर १९९० ते ३० सप्टेंबर १९९३ पर्यंत वर्गीकरण (४) |
|---|---|---|---|
| (५) सिंधुदुर्ग .. | .. संपूर्ण जिल्हा .. .. | ड | ड |
| | **३. पुणे विभाग** | | |
| (६) पुणे .. | .. पुणे शहर .. .. | अ | अ |
| | हवेली (पुणे महानगर प्राधिकरणाच्या हद्दीमधील). | अ | अ |
| | हवेली (पु.म.प्रा. बाहेरील) .. | क | ब |
| | खेड (पु. म. प्रा. मधील) .. | अ | अ |
| | खेड (पु. म. प्रा. बाहेरील) .. | ड | ड |
| | मुळशी (पु. म. प्रा. मधील) .. | अ | अ |
| | मुळशी (पु. म. प्रा. बाहेरील) .. | क | ब |
| | मावळ (पु. म. प्रा. मधील) .. | अ | अ |
| | मावळ (पु. म. प्रा. बाहेरील) .. | क | ब |
| | इंदापूर .. .. | ड | क |
| | भोर .. .. | क | ब |
| | जुन्नर .. .. | ड | क |
| | सिरुर .. .. | ड | क |
| | दौंड .. .. | क | क |
| | बारामती .. .. | क | क |
| | पुरंदर .. .. | ड | क |
| | वेल्हे .. .. | ड | क |
| | आंबेगाव .. .. | ड | ड |
| (७) सोलापूर .. | .. सोलापूर (उत्तर) (चिंचोळी औद्योगिक क्षेत्राव्यतिरिक्त). | क | क |
| | माळशिरस .. .. | क | क |
| | अक्कलकोट .. .. | ड | ड |
| | बार्शी .. .. | ड | ड |
| | सोलापूर (दक्षिण) .. | ड | ड |
| | मोहोळ .. .. | ड | ड |
| | चिंचोळी औद्योगिक क्षेत्र (उत्तर सोलापूर आणि मोहोळ तालुक्यातील) | ड | ड |
| | मंगळवेढे .. .. | ड | ड |
| | पंढरपूर .. .. | ड | ड |
| | सांगोला .. .. | ड | ड |
| | करमाळा .. .. | ड | ड |
| | माढा .. | ड | ड |

परिशिष्ट तेरा—चालू

| जिल्हा<br>(१) | तालुका<br>(२) | १ ऑक्टोबर १९८८ ते ३० सप्टेंबर १९९० पर्यंत वर्गीकरण<br>(३) | १ ऑक्टोबर १९९० ते ३० सप्टेंबर १९९३ पर्यंत वर्गीकरण<br>(४) |
|---|---|---|---|
| (८) सातारा | कोरेगाव | ड | क |
| | सातारा | ड | क |
| | कराड | क | क |
| | फलटण | क | क |
| | वाई | ड | क |
| | खंडाळा | ड | ड |
| | माण | ड | ड |
| | पाटण | ड | ड |
| | खटाव | ड | ड |
| | जावळी | ड | ड |
| | महाबळेश्वर | ड | ड |
| (९) सांगली | खानापूर | ड | क |
| | मिरज | क | क |
| | संपूर्ण जिल्हा (खानापूर आणि मिरज तालुक्यांव्यतिरिक्त) | ड | ड |
| (१०) कोल्हापूर | शिरोळ | क | क |
| | हातकणंगले | क | क |
| | करवीर | क | क |
| | संपूर्ण जिल्हा (शिरोळ, हातकणंगले आणि करवीर तालुक्यांव्यतिरिक्त) | ड | ड |
| | ४. नाशिक विभाग | | |
| (११) नाशिक | नाशिक | ब | ब |
| | मालेगाव | क | ब |
| | सिन्नर | ड | क |
| | बागलाण | ड | क |
| | येवले | ड | क |
| | निफाड | क | क |
| | पेठ | ड | ड |
| | दिंडोरी | ड | ड |
| | सुरगाणा | ड | ड |
| | कळवण | ड | ड |
| | चांदवड | ड | ड |
| | नांदगाव | ड | ड |
| | इगतपुरी | ड | ड |
| (१२) अहमदनगर | अहमदनगर | क | ब |
| | संगमनेर | क | ब |
| | श्रीरामपूर | क | ब |
| | कोपरगाव | क | ब |

परिशिष्ट, तेरा—समाप्त

| जिल्हा | तालुका | | | १ ऑक्टोबर १९८८ ते ३० सप्टेंबर १९९० पर्यंत वर्गीकरण | १ ऑक्टोबर १९९० ते ३० सप्टेंबर १९९३ पर्यंत वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | | (३) | (४) |
| (१२) अहमदनगर—चालू | अकोला | .. | .. | ड | क |
| | राहुरी | .. | .. | क | क |
| | पाथर्डी | .. | .. | ड | ड |
| | जामखेड | .. | .. | ड | ड |
| | कर्जत | .. | .. | ड | ड |
| | श्रीगोंदे | .. | .. | ड | ड |
| | पारनेर | .. | .. | ड | ड |
| | नेवासे | .. | .. | ड | ड |
| | शेवगाव | .. | .. | ड | ड |
| (१३) धुळे .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (१४) जळगाव .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| | ५. अमरावती विभाग | | | | |
| (१५) अमरावती .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (१६) अकोला .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (१७) बुलढाणा .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (१८) यवतमाळ .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| | ६. नागपूर विभाग | | | | |
| (१९) नागपूर .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (२०) भंडारा .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (२१) वर्धा .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (२२) चंद्रपूर .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (२३) गडचिरोली .. | विनाउद्योग जिल्हा | | .. | | |
| | ७. औरंगाबाद विभाग | | | | |
| (२४) औरंगाबाद .. .. | औरंगाबाद (वाळूज औद्योगिक क्षेत्राव्यतिरिक्त) | | | क | क |
| | उर्वरित जिल्हा (वाळूज औद्योगिक क्षेत्रासह). | | | ड | ड |
| (२५) जालना .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (२६) परभणी .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (२७) नांदेड .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (२८) उस्मानाबाद .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (२९) लातूर .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |
| (३०) बीड .. .. | संपूर्ण जिल्हा | .. | .. | ड | ड |

टीप.—(१) औरंगाबाद किंवा गंगापूर तालुक्यांत येणारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे संपूर्ण वाळूज औद्योगिक क्षेत्र आणि सोलापूर (उत्तर) किंवा मोहोळ तालुक्यात येणारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे संपूर्ण चिंचोळी औद्योगिक क्षेत्र यांना १९८८ पासून [illegible] "ड" गटात वर्गीकरण करण्यात आले आहे.

(२) [illegible] १ ऑक्टोबर १९९० पासून होणारा बदल दर्शविते.

२८

## परिशिष्ट चौथा

(परिच्छेद १४ पहावा)

### निरसित झालेल्या शासकीय आदेशांची यादी

| अनुक्रमांक (१) | विषय (२) | शासन निर्णय, क्रमांक व दिनांक (३) |
|---|---|---|
| 1 | साहित्य खरेदी—लघुउद्योग, सहकारी उत्पादक संस्था, इत्यादींकडून साहित्य खरेदीबाबतची कार्यवाही. | शासन निर्णय, उ.व.का.वि. क्र. एसपीओ.१०६६/१७६२१ उद्योग-३, दिनांक १५ मार्च १९६९. |
| 2 | Stores Purchase, Purchase from Small Scale Industry, Government Aided Institution. | I. & L.D. Circular No. SPO. 1071/38933-IND.I(B), dated 27th July 1971. |
| 3 | Co-operative Industrial Societies at Sangli, Yeotmal and Nanded—Price preference to the products of. | Government Resolution, I. & L.D. No. SPO. 1071/28718/IND-I(B), dated the 2nd May 1972. |
| 4 | साहित्य खरेदी—लघुउद्योग सहकारी उत्पादक संस्था, इत्यादींकडून खरेदी करण्याबाबत. | शासन निर्णय, उ. व का.वि. क्र. एसपीओ.१०७२/३१८८६-उद्योग/१(ब), दिनांक २२ मे १९७२. |
| 5 | लघुउद्योग सहकारी उत्पादन संस्था इत्यादींकडून साहित्य खरेदी करण्याबाबत. | शासन निर्णय, उ. व का. वि. क्र. एसपीओ.१०७२/२४५०४-उद्योग-१(अ), दिनांक २६ सप्टेंबर १९७३. |
| 6 | Central Stores Purchase Organisation—Purchases of Stores from Small Scale Industries Units—Preferential treatment under Government Purchase Programme. | Government Resolution, I. & L.D. No. SPO. 1073/10258/IND.I(A), dated the 31st March, 1973. |
| 7 | साहित्य खरेदी—लघुउद्योग सहकारी उत्पादन संस्था, इत्यादींकडून साहित्य खरेदीबाबतची कार्यवाही. | दुरुस्तीपत्रक, उ. व का.वि.क्र.एसपीओ.१०६६/५०४५१—उद्योग-१(अ), दिनांक २१ जुलै १९७३. |
| 8 | Central Stores Purchase Organisation—Procedure for purchase of stores from the Small Scale Industries Units registered with the Central Stores Purchase Organisation. | Government Resolution, I. & L.D. No. SPO. 1073/39432/IND-I(A), dated 27th December 1973. |
| 9 | Central Stores Purchase Organisation—Procedure for purchase of Stores from the Small Scale Industries Units registered with the Central Stores Purchase Organisation etc. Security Deposit in respect of Stree Seva Sahakar Sangh Ltd. | Government Resolution, I. & L.D. No. SPO 1073/19570/IND-I(A), dated 24th April 1974. |
| 10 | साहित्य खरेदी—लघुउद्योग सहकारी उत्पादन संस्था इत्यादींकडून साहित्य खरेदी करण्याबाबत. | दुरुस्तीपत्रक, उ. व का. वि. क्र. एसपीओ.१०७२/२०५६९-उद्योग-१(अ), दिनांक २९ जून १९७४. |
| 11 | साहित्य खरेदी—लघुउद्योग सहकारी उत्पादन संस्था इत्यादींकडून साहित्य खरेदी करण्याबाबतची कार्यवाही. | शा. परिपत्रक, उ.ऊ. व का.वि.क्र. एसपीओ.१०७१/१०१०३१/(२३७)/उद्योग-६, दिनांक १ सप्टेंबर १९७७. |
| 12 | Directives regarding purchase and/or Price preference to and reservation of purchases from SSI Units, etc. To the State Government Undertakings including Statutory Bodies, etc. | Government Resolution, I.E. & L.D. No. SPO. 1070/130959/IND-6, dated the 9th August 1977. |
| 13 | Price preference to the State Sector Undertakings under the Control of the Government of Maharashtra. | Government Resolution, I.E. & L.D. No. SPO. 1077/133965/IND, dated the 1st September 1977. |
| 14 | Directives regarding purchase and/or Price Preference to and reservation of purchases from SSI Units, etc. To the State Government Undertakings including Statutory Bodies etc. | Government Resolution, I.E. & L.D., No. SPO. 1077/144571/IND-6, dated 1st December 1977. |
| 15 | Directives regarding purchase and/or Price Preference to and reservation of purchases from SSI Units, etc. To the State Government Undertakings including Statutory Bodies, etc. | Government Resolution, I.E. & L.D., No. SPO. 1077/61123(CSPO 573)/IND-6, dated 17th February 1978. |

| अनुक्रमांक (१) | विषय (२) | शासन निर्णय, क्रमांक व दिनांक (३) |
|---|---|---|
| | **II. Reservation of Items** | |
| 16 | शासनाच्या कापडविषयक गरजा भागविणे, बँडेज क्लॉथ, जॅकोनेट क्लॉथ, सर्जिकल गॉज, इत्यादींच्या खरेदीबाबत. | शा.नि. उ. व का.वि.क्र. एसपीओ. १०६८/२९६५४-उद्योग-३ दिनांक १९ जुलै १९६८. |
| 17 | Purchase of Bandage and Guage Cloth, for meeting Government's Cloth requirements. | Circular, I. & L.D. No. SPO. 1071/39447/IND,I(B) dated the 18th August 1971. |
| 18 | Purchase of Bandage and Guage Cloth, for meeting Government's Cloth requirements. | Circular, I. & L.D. No. SPO. 1067/48776/IND-III, dated 13th September 1967. |
| 19 | Purchase of Bandage and Guage Cloth, for meeting Government's Cloth requirements. | Government Resolution, I. & L.D. No. SPO. 1958/IND-III, dated the 29th July 1961. |
| 20 | Central Stores Purchase Organisation—Procedure for, purchase of Chalk Sticks from the— | Government Resolution, I. & L.D. No. SPO. 1072/14140/IND-I(B), dated the 16th March 1973. |
| 21 | Women's Co-operatives—Reservation of articles to be purchased exclusively from by the Central Stores Purchase Organisation. | Government Resolution, I. & L.D. No. SPO. 1072/14339/IND-I(B), dated the 23rd March 1973. |
| 22 | Women's Co-operative—Reservation of articles to be purchased exclusively from by the CSPO. | Government Resolution, I. & L.D. No. SPO. 1072/28422/IND-I(A), dated the 18th October 1973. |
| 23 | Direct purchase of articles manufactured by Production Centres of Maharashtra State Khadi and Village Industries Board at Chandrapur. | Circular, I. & L.D. No. SPO. 1067/18940/IND-III, dated the 15th March 1967. |
| 24 | Central Stores Purchase Organisation—Procedure for the purchase of stores through the— | Circular, I. & L.D. No. SPO. 2264/IND-III, dated the 5th January 1965. |
| 25 | Articles to be purchased from the Workshop for the Blind, Worli, Bombay. | Government Letter, I. & L.D. No. SPO. 1066/30239/IND-III, dated the |
| 26 | जुन्या खुर्च्या वगैरेंची विणाई मेहनताना याचा दर | शा.नि., उ. व का.वि. क्र. भाखसं. १०७६/२३४७०/उद्योग-३, दिनांक २२ मे १९६७. |
| 27 | Recanning of chairs/Furniture fixing the rate of— | Government Resolution, I. & L.D. No. SPO. 1073/308/IND-5, dated the 13th December 1975. |
| 28 | Direct purchase of articles manufactured by the Training-*cum*-Production Centre for Ex-Servicemen, Satara. | Circular, I. & L.D. No SPO. 1067/51091/IND-III, dated 28th September 1967. |
| 29 | Central Stores Purchase Organisation—Procedure for the purchase of stores through the— | Circular, I. & L.D. No. SPO. 1063/IND-III, dated the 12th December 1963. |
| 30 | महाराष्ट्र खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या उत्पादन केंद्रानी तयार केलेल्या साहित्याची परस्पर खरेदी. | शा. दुरुस्तीपत्रक, उ. व का.वि.क्र एसपीओ.१०६७/६७३८५-उद्योग-३, दिनांक २९ नोव्हेंबर १९६८. |
| 31 | Purchase of articles manufactured by the Munchorjee Nourojee Banajee Industrial Home for the Blind, Jogeshwari, Bombay. | Circular, I. & L.D. No. SPO. 1065/24642/IND-III dated 20th April 1966. |
| 32 | छत्र्यांची खरेदी, छत्री उत्पादन सहकारी संस्था, कर्जत व छत्री उत्पादन केंद्र, कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्यासाठी राखीव साठा. | शा.ज्ञापन, उ. व का.वि. क्र. एसपीओ. १०७१/३५६९३-उद्योग-१ (अ), दिनांक ५ नोव्हेंबर १९७३. |
| 33 | Purchase of Jail-made articles by Government Departments. | Government Letter, I. & L.D., dated 14th January 1974. |

परिशिष्ट चौदा—चालू

| अनुक्रमांक (१) | विषय (२) | शासन निर्णय, क्रमांक व दिनांक (३) |
|---|---|---|
| 34 | Purchase of Jail-made articles by Government Departments. Recommendation made by the Administrative Reorganisation Commission Heble (Commission). | Circular, Home Department, No. MIS. 5171/26701/(338/)XVI, dated 23rd August 1973. |
| 35 | Procedure for purchase of G.C.Y. Yarn by Government Departments. | Government Resolution, I.E. & L.D., No. SPO. 1076/52093/(3047)/IND-6, dated 23rd September 1976. |
| 36 | Khadi Purchase of —for meeting Government's cloth requirements. | Circluar, I & L. D., No. SPO. 1961/IND-III, dated the 21st April 1961. |
| 37 | Clarification regarding Khadi .. .. .. | Circluar, I. & L. D., No. SPO. 1061/IND-III, dated the 28th November 1961. |
| 38 | Purchase of Khadi-Certified by the All India Khadi Commission. | Circular No. SPO. 1070/42914/IND-III, dated the 6th August 1970. |
| 39 | Khadi—Purchase of—for meeting Government Cloth Requirements. | Government Resolution, I. & L. D. No. SPO. 1057-IND-II, dated the 22nd January 1958. |
| 40 | Recommendations of the Tidke Committee regarding use of handloom cloth where Khadi is not used—implementation of— | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1069/30057/IND-I(B), dated the 11th October 1972. |
| 41 | Uniforms to Class IV Servants .. .. | Government Resolution, I. & L. D., No. SPO. 1074/28604/IND-I(A), dated the 1st June 1974. |
| 42 | Uniforms to Class IV Servants .. .. | Corrigendum, I. E. & L. D., No. SPO. 1077/129851/IND-6, dated the 16th August 1977. |
| 43 | Dispersal of Industries, Package Scheme of Graded—Incentives—Revision of— | Government Resolution, I. E. & L. D., No. IDA. 7076/6212(5)/IND-8, dated the 18th January 1977. |
| 44 | Marketing Assistance to units from developing areas .. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1076/109460/(C.S.P.O.)/IND-6, dated 30th January 1978. |
| 45 | Incentives for the Industrial Units is Small Scale Sector—Purchase of Steel. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1075/47756/LAB-1, dated 6th July 1976. |
| 46 | Appointment of panel for the purchase of X-Ray machine. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1065/23808/IND-III, dated 19th April 1966. |
| 47 | Purchase of stationery required urgently by Director, Government Printing and Stationery for Election. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1066/59718/IND-III, dated the 5th November 1966. |
| 48 | Inspection of goods, on arrival of consignment at the Consignee's end. | Circular, I. E. & L. D., No. SPO. 1065/56002/IND-III, dated the 5th November 1965. |

परिशिष्ट चौदा—चालू

| अनुक्रमांक (१) | विषय (२) | शासन निर्णय, क्रमांक व दिनांक (३) |
|---|---|---|
| 49 | Inspection of goods on arrival of consignment at the Consignee's end. | Circular, I. & L. D, No. SPO. 1069/130687/BUD/IND-III, dated 28th June 1969. |
| 50 | Tender Forms issued by the Central Stores Purchase Organisation, Bombay—Levy of fees for— | Government Resolution, I. & L. D., No. SPO. 100/10227-G, dated 28th June 1957. |
| 51 | Metric Weights and Measures. Use of—from 1st October 1960. | Circular, I. & L. D., No. WMA. 2860/IND-III, dated the 22nd June 1960. |
| 52 | Sales Tax—Payment of —In respect of Purchases made by the Government Departments. | Circular, B. F. D. No. STA. 1060/A-1261/XIII, dated the 21st June 1961. |
| 53 | Goods bearing Indian Standards Institution Certification Marks—Grant of preference to in purchase of stores for Government purpose. | Circular, I. & L. D., No. SPO. 1072/32108/IND-I/(B), dated the 17th June 1972. |
| 54 | Purchase of stores against the rate contracts fixed by the Director General, Supplies and Disposal, New Delhi—permission to fix parallel rate contract for spare part of vehicles—by the Industries Commissioner and Central Purchasing Officer, Bombay. | Government Resolution, I. & L. D., No. SPO-1072/36620/IND-I(B), dated the 29th July 1972. |
| 55 | Distribution of Photogoods .. .. .. | Government Letter, I. & L. D., No. SPO. 1073/13854/IND-I(B), dated the 10th April 1973. |
| 56 | Prices fixed by the Statutory bodies appointed by the Government of India. | Government Letter, I. & L. D., No. SPO. 1074/20224/IND-A(A), dated 23rd April 1974. |
| 57 | Refund of Security deposits to the suppliers by the Industries Commissioner and Central Purchasing Officer, Bombay. | Circular, I. & L. D., No. SPO. 1072/21482/IND-I(A), dated the 23rd July 1974. |
| 58 | Central Stores Purchase Organisation—Principles Governing repeat orders to be placed by— | Government Resolution,, I. & L. D., No. SPO. 1067/26889/IND-III, dated 14th June 1968. |
| 59 | Central Stores Purchase Organisaion—Principles Governing repeat orders to be placed by— | Government Resolution, I. & L., D., No. SPO. 1973/11358/IND-I(A), dated the 6th February 1974. |
| 60 | Participation of M.S.S.I.D.C. on behalf of SSI units in the tender enquiry for purchase of stores. | Government Circular, I.E. & L. D., No. SPO. 1078/71094/IND-6, dated 3rd July 1978. |
| 61 | *Directives reg. purchase and/or price preference to and reservation of purchases from SSI units, etc.*—To the State Government Undertakings including statutory bodies, etc. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1078/84722/IND-6, dated 9th August 1978. |
| 62 | Placing of firm order only after taking a Security deposit and executing a formal agreement. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1075/9082/1978/(CSPO Case No. 236)/IND-6, dated 17th November 1978. |
| 63 | *Facilities available to SSI Units.*—Co-ordination for Marketing problesm of SSI units. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1078/61800/CSPO. 855/IND-6, dated 24th January 1979. |

परिशिष्ट चौदा—चालू

| अनुक्रमांक (१) | विषय (२) | शासन निर्णय, क्रमांक व दिनांक (३) |
|---|---|---|
| 64 | *Decentralisation and streamlising of the work of CSPO.*— Addition of institute in Appendi XXXXII of manual of office proceduring for purchase of stores by the Government Departments. | Government Resolution, I.E. & L. D., No. SPO. 1078/68520/(CSPO 892)/IND-6, dated 1st March 1979. |
| 65 | Exemption from paying security deposit against the purchases to be made form Stree Seva Sahakar Sangh Limited. | Government Circular, I.E. & L.D., No. SPO. 1079/72607/(CSPO Case No. 904)/IND-6, dated 17th March 1979. |
| 66 | *Directives reg. purchase and/or price preference to and reservation of purchase form SSI units, etc.*—To the State Government Undertakings including statutory bodies, etc. | Government Resolution, I.E. & L.D., No. SPO. 1079/82392/CSPO 10467/IND-6, dated 23rd July 1979. |
| 67 | Purchase of stationery required urgently by D.G.P. S., Bombay for general elections. | Government Resolution, I.E. & L. D., No. SPO. 1079/98466/(CSPO)/1129/IND-6, dated 3rd October 1979. |
| 68 | *Directives reg. purchase and/or price preference to and reservation of purchases form SSI Units, etc.*— To the State Government Undertakings including statutory bodies, etc. | Government Resolution, I.E. & L. D., No., SPO. 1079/110814/(CSPO-1191)/IND-6, dated 7th January 1980. |
| 69 | *Regarding purchase of Iron Safes* .. .. | Government Circular, I.E. & L.D., No. SPO. 1079/61647/(CSPO 1221) /IND-6, dated 18th February 1980. |
| 70 | Purchase of products of State Sector Undertakings under the Control of the Government of Maharashtra. | Government Circular, I.E. & L. D., No. SPO 1081/80867 (CSPO 1576)/ IND-6, dated the 28th January 1981. |
| 71 | Purchase of the Items—Bamboo Baskets and Trayed. by the Government Departments/Offices, Public Sector Government Controlled/Aided Institutions form the artisans, their Co-operative Socieities manufacturing this item under the Sanjay Gandhi Swavalamban Yojana. | Government Circular, I.E. & L.D., No. SPO. 1081/74869(/(1865)/ IND-6, dated the 4th January 1982. |
| 72 | *Incidence of Sales Tax*—Scrutiny of Quaotations .. | Government Circular, I.E. & L.D., No. SPO. 1079/103751/(1253)/IND-6, dated the 15th February 1982. |
| 73 | शासकीय कार्यालयांनी करावयाच्या हातमागाच्या कापडाच्या खरेदीबाबत. | शा. परिपत्रक, उ. ऊ. व का.वि., एसपीओ.१०८२/११४२१२/(२०५३) उद्योग-६, दिनांक नोव्हेंबर १९८२. |
| 74 | Marketing assistance to the units form Developing Areas | Government Circular, I.E. & L.D., No. SPO. 1083/5733/IND-6, dated 3rd May 1983. |
| 75 | Use of Coir Matting, Coir furnishing by Government Departments, Public Sector Undertakings and the State Government controlled/aided Institutions. | Government Circular, I.E. & L.D., No. SPO. 1082/66559/(2132)/ IND-6, dated 21st October 1983. |
| 76 | *Directives reg. purchase and/or price preference to and reservation of purchases form SSI Units, etc.*— To the State Government Undertakings including Satutory Bodies, etc. | Government Resolution, I.E. & L.D., No. SPO. 1080/67309/(1273)/IND-6, dated 28th November 1983. |

| अनुक्रमांक (१) | विषय (२) | शासन निर्णय, क्रमांक व दिनांक (३) |
| --- | --- | --- |
| 77 | लघुउद्योजकांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या खरेदीबाबत व त्यांना देण्यात येणाऱ्या किमती प्राधान्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे.—महाराष्ट्र शासनाचे अंगीकृत व्यवसाय व सांविधिक संस्था यांचे माहितीसाठी आणि उचित कार्यवाहीसाठी. | शासन निर्णय, उ. कु. व का. वि. क्र. एसपीओ. १०८०/६७३०९/(१२७३)/उद्योग-६, दिनांक २८ नोव्हेंबर १९८३. |
| 78 | Item exclusively reserved for purchase from Small Scale Industries. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1078/31069/(612)/IND-6, dated 15th June 1984. |
| 79 | *Directives reg. purchase and/or price preference to and reservation of purchases from Small Scale Industries Units, etc.*—To the State Government Undertakings including statutory bodies, etc. | Government Circular, I. E. & L. D., No. SPO. 1084/28527/(2193)/IND-6, dated the 5th July 1984. |
| 80 | *Government Purchase Programme.*—Proposal for 50 per cent purchases on parallel Rate Contract with Maharashtra Small Scale Industries Development Corporation. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1084/29621/(2192)/IND-6, dated the 21st August 1984. |
| 81 | जुन्या खुर्च्या/फर्निचर इत्यादींच्या दुरुस्तीचे/वितकामाचे काम मिळणेबाबत. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. एसपीओ. १०८४/२९९८१/(२१९५) उद्योग-६, दिनांक १७ जानेवारी १९८५. |
| 82 | *Directives reg. purchase and/or price preference to and reservation of purchases from Small Scale Industrial Units, etc.*—To the State Government Undertakings including statutory bodies, etc. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO, 1084/55839/(2255)/IND-6, dated 18th February 1985. |
| 83 | Directives reg. the purchase preference to the Small Scale Industrial Units from Maharashtra State. | Government Resolution, I. E. & L. D., No. SPO. 1083/12059/(2139)/IND-6, dated 30th March 1985. |
| 84 | केवळ लघुउद्योग घटकांकडून खरेदी करण्यासाठी राखून ठेवलेल्या बाबी. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. एसपीओ. १०८६/१०९३९५/(२३६९) उद्योग-६, दिनांक ३० एप्रिल १९८६. |
| 85 | रसायने, औषधिद्रव्ये इत्यादी पुनरावेष्टित (Repacking) करणाऱ्या नोंदणीकृत लघुउद्योगांना किमत प्राधान्य सवलतीचा फायदा न देणे. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. एसपीओ. १०८६/११०३४२/(२३६७)/उद्योग-६, दिनांक ५ मे १९८६. |
| 86 | विकास आयुक्त (उद्योग) व मध्यवर्ती भांडार खरेदी अधिकारी यांचेकडे नोंदणी करणाऱ्या ठेकेदारांकडून/पुरवठादारांकडून घ्यावयाची बयाणा रक्कम. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. १०८५/१५८२६/(२२६८)/उद्योग-६, दिनांक २९ जुलै १९८६. |
| 87 | भारतीय मानकसंस्था चिन्हीत (ISI Mark products) उत्पादित वस्तूंची खरेदी. | परिपत्रक, उ. ऊ. व का. वि. भांखसं. १३८६/११९४०४/(२३७१)/उद्योग-६, दिनांक १४ ऑक्टोबर १९८६. |
| 88 | लघुउद्योग घटकांकडून साहित्य भांडार खरेदी करताना त्यांच्याकडून घ्यावयाची प्रतिभूती ठेव (Security deposit). | शासन निर्णय, उ. ऊ. व. का. वि. क्र. भांखसं. १०८५/१५८२६/(२२६८) उद्योग-६, दिनांक १५ ऑक्टोबर १९८६. |
| 89 | लघुउद्योजकांसाठी आरक्षित ठेवलेल्या बाबींची खरेदी करताना खरेदी आणि/किंवा किमत प्राधान्य देण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे.—स्वायत्त संस्थेसह, शासनाचे अंगीकृत व्यवसाय इत्यादींनी पाळावयाच्या सूचना. | परिपत्रक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखसं. १०८५/४२५५९/(२३३०) उद्योग-६, दिनांक १० नोव्हेंबर १९८६. |

परिशिष्ट चौदा—चालू

| अनुक्रमांक (१) | विषय (२) | शासन निर्णय, क्रमांक व दिनांक (३) |
| --- | --- | --- |
| 90. | शासकीय कार्यालयांना लागणाऱ्या कागदाची खरेदी .. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. विभाग क्र. भांखसं. १०८६/१२४५७८/(२४०४)/उद्योग-६, दिनांक १४ नोव्हेंबर १९८६. |
| 91. | मे. दिपक इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी, कुर्ला यांना शासकीय कार्यालयासाठी नवीन लाकडी फर्निचरचा पुरवठा करणे व जुने फर्निचर दुरुस्त-करणेबाबतचे काम देण्याबाबत. | शासन परिपत्रक, उ. ऊ. व का. वि. क्र. एसपीओ.-१०८५/३४१५२/(२३४३)/उद्योग-६, दिनांक ७ एप्रिल १९८७. |
| 92. | कारागृहामध्ये उत्पादित झालेल्या वस्तूंची शासकीय विभागांतर्फे खरेदी. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. १०८७/(२४४०) ३१२५०२/उद्योग-६, दिनांक २६ ऑगस्ट १९८७. |
| 93. | शासकीय महामंडळे, जिल्हा परिषदा स्वायत्त संस्था व इतर वैधानिक मंडळे, उपक्रम यांना लागणाऱ्या कापडाची खरेदी. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. १०८६/३१८८५२/(२४०४)/उद्योग-६, दिनांक ३० डिसेंबर १९८७. |
| 94. | अपंग उत्पादित वस्तूंच्या खरेदीबाबत .. .. | शासन परिपत्रक, उ. ऊ. व का. विभाग क्रमांक भांखसं. १०८६/१४९८३०/उद्योग-६, दिनांक ३१ ऑगस्ट १९८८. |
| 95. | केवळ लघुउद्योग घटकांकडून खरेदी करण्यासाठी राखून ठेवलेल्या बाबींची खरेदी. | शासन ज्ञापन, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. १०८६/१२७५२०/(२३६९)/उद्योग-६, दिनांक १७ सप्टेंबर १९८८. |
| 96. | फेरो पेपर (Ferro paper) परिशिष्ट "क" मधून वगळून त्याचा समावेश परिशिष्ट "ब" मध्ये करण्याबाबत. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. १०८९/३०१५४८/(२५११)/उद्योग-६, दिनांक ३ जून १९८९. |
| 97. | माजी सैनिक प्रशिक्षण-नि-उत्पादन केंद्र, सातारा येथे तयार होणाऱ्या वस्तू खरेदीबाबत. | शासन परिपत्रक, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. १०८६/३२३३७७/उद्योग-६, दिनांक १९ सप्टेंबर १९८९. |
| 98. | बेडशिट्स, बँडेज व गॉज कापडाची खरेदी .. | शासन परिपत्रक, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. ११८९/३३८७४६/(२५४५)/उद्योग-६, दिनांक २४ जानेवारी १९९०. |
| 99. | इन्डेमिनिटी बॉडच्या आधारे ठेव परत करणेबाबत .. | शासन ज्ञापन, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. १०८८/२०९४४५०/(२५९८)/उद्योग-६, दिनांक १९ जुलै १९९०. |
| 100. | शासकीय कार्यालयांनी करावयाच्या हातमागाच्या—यंत्रमागाच्या कापडाच्या खरेदीबाबत. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. एसपीओ. १०८५/३२८५४/उद्योग-६, दिनांक १८ जुलै १९८५. |
| 101. | शासकीय महामंडळे, जिल्हा परिषदा, स्वायत्त संस्था व इतर वैधानिक मंडळे, उपक्रम यांना लागणाऱ्या कापडाची खरेदी. | शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्र. भांखसं. १०८६/३१८८५२/(२४०४)/उद्योग-६, दिनांक ३० डिसेंबर १९८७. |
| 102 | Central Stores Purchase Organisation : Procedure for the purchase of stores through the— | Government Circular, Industries and Co-operative Department, No. SPO-2259/IND-II, dated 6th February 1959. |
| 103 | Bed Sheets and Bandage cloth manufactured by Leprosy Institutions—Purchase of— | Government Resolution, I. & L. D., No. SPO.1059/21957-IND-III, dated the 11th April 1961. |
| 104 | Exemption from payment of earnest money and security deposit to Maharashtra Small Scale Industries Development Corporation. | Government Memorandum, Industries and Labour Department, No. 1065/50213/Ind-III, dated 6th November 1965. |
| 105 | Direct purchase of articles manufactured by Production Centres of Maharashtra State Khadi and Village Industries Board of Chandrapur. | Government Circular, Industries and Labour Department, No. SPO.1067/18940-IND-III, dated 15th March 1967. |

परिशिष्ट चौदा—समाप्त

| अनुक्रमांक (१) | विषय (२) | शासन निर्णय, क्रमांक व दिनांक (३) |
|---|---|---|
| 106 | महाराष्ट्र खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या उत्पादन केंद्रांनी तयार केलेल्या साहित्याची परस्पर खरेदी. | दुरुस्ती पत्रक, उद्योग व कामगार विभाग क्र. एसपीओ. १०६७/६७३८५/उ-३, दिनांक २९ नोव्हेंबर १९६८. |
| 107 | भांडार खरेदी संघटना—करार करताना अवलंब करण्याची कार्यवाही. | शासन निर्णय, उद्योग व कामगार विभाग क्र. एसपीओ. १०६८/५१२३८/उद्योग-३, दिनांक २६ ऑगस्ट १९६८. |
| 108 | शासनाच्या कापडविषयक गरजा भागविणे—बेडशिट व बॅण्डेज कापडाची खरेदी. | शासन निर्णय, उद्योग व कामगार विभाग क्र. एस.पीओ. १०६८/६५२६५/उद्योग-३, दिनांक १८ डिसेंबर १९६८. |
| 109 | Purchase of Bandage and Gauge cloth for meetings Government's cloth requirements. | Government Circular, Industries and Labour Department, No, SPO.1071/39447/IND-I(B), dated 18th August 1971. |
| 110 | Purchase of the Item—Bamboo Baskets and Trays by the Government Deptts./Offices, Public Sector Undertakings and the State Government Controlled/Aided Institutions from the Artisans of their Co-operative Socieities manufacturing this item under the Sanjay Gandhi Swavalamban Yojana. | Government Circular, Industries, Energy and Labour Department No. SPO.1081/74867/(1865)/IND-6, dated the 4th January 1982. |
| 111 | प्रमाणीकरण व गुणपद्धती (Standardization and quality system) यांचे संनियंत्रण करण्यासाठी राज्यपातळीवरील समितीची स्थापना करण्याबाबत. | शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखरं. १३८७/३०१४२१/(२३७९)/उद्योग-६, दिनांक २१ एप्रिल १९८७. |
| 112 | महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने लघुउद्योग घटकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबाबत. | शासन ज्ञापन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भाखस. १०८८/२०१९७९/उद्योग-६, दिनांक २१ डिसेंबर १९८८. |
| 113 | बेडशिटस बॅण्डेजचे व गॉज कापडाची खरेदी | शासन परिपत्रक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भाखस. १३८८/(२५२४)/उद्योग-६, दिनांक १५ डिसेंबर १९८९. |

प्रति :

राज्यपाल यांचे सचिव.
मुख्य मंत्री यांचे सचिव.
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक.
प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई.
प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
आयुक्त, महानगरपालिका, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर/सोलापूर/कोल्हापूर/ठाणे/पिंपरी-चिंचवड/कल्याण/अमरावती/नाशिक
सर्व नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी
विकास आयुक्त (उद्योग), मध्यवर्ती भांडार खरेदी अधिकारी, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई ४०० ०३२.
सदस्य सचिव, महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड, छत्रपती शिवाजी मार्केट बिल्डिंग, ४ था मजला, पल्टन रोड, मुंबई ४०० ००१.
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, हॉंगकॉंग बिल्डिंग, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ००१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम), निर्मल बिल्डिंग, १ला मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ००२१.
व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ, वॉर्डन हाऊस, ५ वा मजला, सर पी. एम. रोड, मुंबई ४०० ००१.
व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा विकास महामंडळ, विकास भवन, डॉ. राजेंद्रप्रसाद मार्ग, औरंगाबाद ४३१,००१.
व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, कुबेरा चेंबर्स, रेसकोर्स हाऊस, संचेती हॉस्पिटलजवळ, डॉ. राजेंद्रप्रसाद रोड, पुणे ४११ ००५.
व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ विकास महामंडळ, महाजन बिल्डिंग, मेन रोड, सिताबर्डी, नागपूर-१२.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, लोटस हाऊस, ३३-ए, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ, प्लॉट नं. २१४, बॅकबे रेक्लेमेशन, रहेजा सेंटर, १३ वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, " कृपानिधी " ९, वालचंद हिराचंद मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८.
अध्यक्ष, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन, द्वारा—" सिकॉम ", निर्मल बिल्डिंग, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, ६-ए, नवाब ले-आऊट, टिळक नगर, अमरावती रोड, नागपूर-१०.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, ३७०, भाकुर्डी, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, प्लॉट नं. बी, सर्व्हे नंबर ५८३, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ००९.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ, एम. के. एम. इंटरनॅशनल हाऊस, १७८, बॅकबे रेक्लेमेशन, बी. एम. चिनॉय मार्ग, मुंबई ४०० ०२०.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य तेलबिया, वाणिज्य आणि उद्योग महामंडळ, २०१, जॉली भवन क्रमांक २, २रा मजला, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ॲग्रीकल्चर फर्टिलायझर प्रमोशन महामंडळ (मॅफ्को), सिद्धी भवन, ६ वा मजला, दिनशा वाच्छा मार्ग मुंबई ४०० ०२०.

12'1

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, मेंढी फार्म, गोखले नगर, पुणे ४११ ०१६.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, प्लॉट नंबर ८, शास्त्रीनगर, पी.एन.नंबर १९, अमनखान प्लॉट, अकोला ४४४ ००१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, एम.एस.एच.सी. कॉम्प्लेक्स, सुत गिरणीमागे, उमर रोड, नागपूर ४४० ००९.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वीजमार्ग महामंडळ, बाशानी चेंबर्स, १ ला मजला, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ०२०.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस, ३रा मजला, सेंचुरी बाजारजवळ, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२८.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र भूविकास महामंडळ, न्यू ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग, ॲग्रीकल्चर कॉलेज कंपाऊंड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण प्रादेशिक विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ, न्यू ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग, ॲग्रीकल्चर कॉलेज कंपाऊंड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई ४०० ०१२.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाकाली मार्ग, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शहर आणि उद्योग विकास महामंडळ (सिडको), २ रा मजला, निर्मल बिल्डिंग, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (BMRDA), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ, एन.सी.सी. नेहरू मेमोरियल हॉल, ४-ए, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१.
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र पोलीस हाऊसिंग व कल्याण महामंडळ, एन.सी.सी. बॅरॅक क्रमांक १२, दिनशॉ वाच्छा रोड, मुंबई ४०० ०२०.
सदस्य-सचिव, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळ, ४ था मजला, एक्सप्रेस टॉवर, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
महाव्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जुहू सुप्रीम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड नं. १, जे.व्ही.पी.डी. स्कीम (उत्तर), विलेपार्ले (प.), मुंबई ४०० ०४९.
व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, सी.डी.ओ. बॅरॅक क्रमांक ९, योगक्षेमजवळ, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०२०.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बालरक्षक विद्यालय, १९/२१, मनोहरदास मार्ग, मुंबई ४०० ००१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी विकास संकुल, न्यू ॲडमिनिस्ट्रेशन बिल्डिंग, २ रा मजला, रमाबाई आंबेडकर गर्ल्स स्कूलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक-२.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य चर्मोद्योग विकास महामंडळ, बॉम्बे लाईफ बिल्डिंग, ४५, वीर नरीमन मार्ग, ५ वा मजला, मुंबई ४०० ०२३.
व्यवस्थापकीय अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, एक्सप्रेस टॉवर, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२०.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, फिल्मसिटी, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६५.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, अभ्यंकर नगर, नागपूर ४४० ०१०.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विदेश सेवा योजन व निर्यात प्रचालन महामंडळ (MOPEC), एक्स. के. बिल्डिंग, २रा मजला, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, ९वा मजला, न्यू एक्सेलसियर बिल्डिंग, अमृत केशव नायक मार्ग, मुंबई ४०० ००१.
व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ लिमिटेड, मौजे मोरेवाडी, तालुका करवीर, पो. बॉ. क्र. ३२०, कोल्हापूर ४१६ ००२.
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, बिल्डिंग क्र. ५, व्ही. आर. देसाई रोड, आझाद नगर क्र. २, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५८.
व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जुहू सुप्रीम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड नं. ९, जे.व्ही.पी.डी. स्कीम (उत्तर), विलेपार्ले (प.), मुंबई ४०० ०४९.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी संघ (MHATEX), १ ला मजला, बाशानी चेंबर्स, ४७, सर विठ्ठलदेव ठाकरसी मार्ग, मुंबई ४०० ०२०.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी विक्री संघ, कनमूर हाऊस, नरशी नाथा स्ट्रीट, मसजिद बंदर, मुंबई ४०० ००९.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक खरेदी-विक्री संघ, गौतम बिल्डिंग, अकेरिया बंदर रोड, शिवडी, मुंबई ४०० ०१५.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य तेलबिया उत्पादक सहकारी संघ, २४, रामदास कॉलनी, पो. बॉ. क्र. १०४, शिवाजी पेठ, जळगाव ४२५ ००१.
सदस्य-सचिव व संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था (MEDA), न्यू कामानी चेंबर्स, रामजीभाई कामानी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८.
संचालक, महाराष्ट्र ॲडमिनिस्ट्रेशन (MIDA), राजभवन कॉम्प्लेक्स, बॅनर रोड, पुणे ४११ ००७.
संचालक, हाफकिन इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग रिसर्च ॲण्ड टेस्टींग, आचार्य दोंदे मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२.
वेल्फेअर कमिशनर, महाराष्ट्र लेदर वेल्फेअर बोर्ड, मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३०.
उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

परिशिष्ट १३.१

मान्यता प्राप्त सहकारी मजूर संस्थांना जिल्हा परिषदा मार्फत देण्यात येणाऱ्या कामांची अट शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. झेडपीए-२००१/ प्र.क्र. ११५/ वित्त-९
मंत्रालय, मुंबई - ३२, दिनांक :- २६ ऑगस्ट २००२

संदर्भ :- १) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. झेडपीए-१०८५/ सीआर १६७७(३८)/ ५७, दिनांक २ जुलै,१९८५.
२) शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. झेडपीए-१०९५/ प्र.क्र. १९०७/३३, दिनांक ३१ जुलै, १९९९.
३) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. एलएबी १०९८/प्र.क्र. १६४/ इमारती-२, दिनांक ११ जानेवारी,२०००.
४) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.झेडपीए-२०००/प्र.क्र. ११/ ३३, दिनांक ८ मार्च, २०००.
५) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.पंरास-२००१/प्र.क्र.१६/३८, दिनांक ३१ जानेवारी २००१.

**शासन निर्णय :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाने संदर्भाधीन अ.क्र.३ वरील शासन निर्णयान्वये मजूर सहकारी संस्थांची सुधारीत वर्गवारी जाहीर केलेली आहे. यानुसार वर्ग "क" नोंदणीकृत संस्थांना "ब" वर्गामध्ये दर्जावाढ देण्यात आलेली आहे. वर्ग "ब" ची उच्चतम पात्रता रुपये २,५०,००० ठेवण्यात आलेली आहे. वर्ग-एक उच्चतम पात्रता रुपये ५,००,००० करण्यात आलेली आहे. सदर संस्थांच्या कामाच्या वाटपाची मर्यादासुध्दा "ब" वर्ग संस्थांसाठी रुपये २,५०,००० व "अ" वर्ग संस्थांसाठी रुपये ५,००,००० करण्यात आलेली आहे. तसेच मजूर सहकारी संस्थांना वर्षभरात एकूण रुपये ३०,००,००० पर्यंत कामे देण्याची मर्यादा घातलेली आहे. ग्राम विकास विभागाच्या संदर्भांकीत अ.क्र.४ वरील दिनांक ८ मार्च, २००२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांमार्फत मान्यताप्राप्त मजूर सहकारी संस्थांना द्यावयाच्या कामाच्या किंमतीत रु. ५ लाखपर्यंत वाढ करण्यात आलेली आहे. ही कामे एकावेळी ३ पेक्षा जास्त देण्यात येऊ नयेत अशीही अट ग्राम विकास विभागाच्या संदर्भांकीत अ.क्र. ५ वरील दिनांक ३१ जानेवारी, २००१ च्या शासन निर्णयान्वये घातलेली आहे. यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात येऊन आता मजूर सहकारी संस्थांना कामे देण्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भाधीन संदर्भ क्र.३ मध्ये नमूद आदेशातील [illegible] कामाच्या मर्यादा जिल्हा परिषदांसाठीही लागू करण्यात येत आहे. म्हणजेच रुपये ५,००,००० पर्यंतची कामे मजूर सहकारी संस्थांना विना निविदा देता येतील व अशाप्रकारे एका संस्थेस वर्षामध्ये रुपये ३०,००,००० इतक्या मर्यादेपर्यंत कामे देता येतील.

२) सहकारी संस्थांना एकाच वेळी तीनपेक्षा जास्त कामे देण्यात येऊ नयेत अशी अट यापुढे लागू राहणार नाही.

३) सहकारी संस्थांच्या अकार्यक्षमतेमुळे पूर्वी घेतलेले काम प्रलंबित असेल तर पुढील काम त्यांना देण्यात येऊ नयेत.

याबाबत आवश्यक ती दुरुस्ती महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मध्ये योग्य वेळी करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( भा. ज. कांबळे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
विभागीय आयुक्त (सर्व).
अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व).
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सह निबंधक, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती.
अधिक्षक अभियंता, मजूर सहकारी संस्था द्वारा आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे.
सर्व जिल्ह्यांचे उप निबंधक सहकारी संस्था.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व).
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, पुणे/कोकण/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
महालेखापाल-एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-दोन, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
उप सचिव, ग्रामविकास विभाग (सर्व).
अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्रा.वि.व ज.सं.वि.(सर्व).
निवड नस्ती, का.क्र.३३.

परिशिष्ट १४.१

जिल्हा परिषद स्तरांवर राबविण्यात येणा-या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक:झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: २० जून, २००८.

**वाचा:-** परिपत्रक क्रमांक: झेडपीए २०००/प्र.क्र.४१/३३, दिनांक : १७ जानेवारी,२००१

**परिपत्रक :-**

जिल्हा परिषदांनी योजना राबविताना योग्य वेळापत्रकानुसार योजना राबविण्यासाठी उपरोक्त शासन परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. तथापि जिल्हा परिषदांकडून केंद्र व राज्य शासन पुरस्कृत विविध योजनांची तसेच जिल्हा परिषदांनी स्वत:च्या उत्पन्नातून हाती घेतलेल्या योजनांची अंमलबजावणी करताना, उद्दीष्ट पुर्तीसाठी व्यवहार्य नियोजनाचा अभाव आणि विविध स्तरांवर घ्यावयाच्या निर्णयासाठी लागणारा विलंब, यामुळे अनेक योजनांची उद्दीष्टे पूर्ण करण्यांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ लागणे, वर्षाअखेरीस निविदा मंजुरी, लाभार्थी निवड करणे, आर्थिक वर्ष संपल्यानंतरही साहित्याचा पुरवठा न होणे इ. सारख्या गंभीर व आक्षेपार्ह चूका मोठया प्रमाणात होताना दिसून येतात, **परिणामी जिल्हा परिषदांच्या आणि पर्यायाने शासनाच्या कार्यक्षमतेवर अकारण टीका होत राहते.** यास्तव जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थित व जाणीव पूर्वक नियोजन करुन, त्या पध्दतीने अंमलबजावणी झाल्यास बहुतांशी योजनांची उद्दीष्टे त्याच **आर्थिक वर्षाच्या नोव्हेंबर- डिसेंबर** अखेर पूर्ण करता येणे शक्य आहे. ही बाब विचारांत घेवून विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासन स्तरावरुन सर्वंकष सूचना निर्गमित होणे आवश्यक आहे. **यास्तव उपरोक्त शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून,** या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे नव्याने सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

**(१) केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजना -**

१. केंद्र पुरस्कृत योजनांच्या नियोजन व अंमलबजावणी संदर्भात विविध टप्पे निहाय करावयाची कार्यवाही व अशा कार्यवाहीची अंतिम मुदत यांची माहिती व वेळापत्रक **परिशिष्ट "अ" आणि "ब"** मध्ये नमूद करण्यात आले आहे.

२. सदर परिशिष्टामध्ये नमूद बाबीवरील कार्यवाहीची जबाबदारी संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर व पंचायत समिती स्तरावर प्रथम निश्चित करावी. ज्या अधिकारी आणि कर्मचा-यांवर अशी कार्यवाहीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यांनी कार्यवाही पूर्ण न केल्यास संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्याच आर्थिक वर्षात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पूर्ण करावी.

**(२) जिल्हा परिषदांकडील हस्तांतरित योजना ( बांधकाम विषयक ) -**

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांपैकी ज्या योजनांमध्ये बांधकामाचा (work) समावेश आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक **"परिशिष्ट क"** मध्ये नमूद करण्यात आले आहे. निर्धारित वेळेनुसार प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रथमतःनिश्चित करावी व त्या प्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदती मध्ये पूर्ण करावेत.

बांधकाम विषयक योजनांच्या बाबतीत काही योजनांच्या आराखडयांना किंवा कामांना शासनाची मंजूरी आवश्यक असते अशा कामांच्या बाबतीत सर्व योजनांचे आराखडे शासनाकडे मान्यतेसाठी मुदतीमध्ये सादर करण्यात यावेत यामध्ये विलंब करणा-या **अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.**

ज्या योजनेच्या आराखडयास किंवा योजनेस समिती /सभा यांची मान्यता आवश्यक असेल तर समिती /सभा यांचे समोर आराखडा मान्यतेसाठी /संमतीसाठी / शिफारसीसाठी सादर करावा. विहीत केलेल्या मुदतीमध्ये समितीची /सभेची मान्यता न मिळाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तसे नमुद करुन विभागीय आयुक्तांकडे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम २६२ खाली प्राप्त अधिकाराचा वापर करण्यासाठी त्वरीत प्रस्ताव पाठवावा.

(३) **जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या योजना.**

जिल्हा परिषदा स्वतःच्या उत्पन्ना मधून बांधकाम विषयक व वैयक्तीक लाभांच्या येजना राबवतात. अशा योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक **परिशिष्ट "ढ" व "ड"** मध्ये नमुद करण्यात आले आहे.

विविध योजनांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत जिल्हा परिषद स्तरावर योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, निविदा मंजूर करणे, लाभार्थी निवड यादीस मान्यता देणे इ. बाबतचे अधिकार विषय समित्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तथापि विविध कारणास्तव विषय समिती समोर प्रस्ताव सादर करताना मोठ्या प्रमाणात विलंब होतो, असे दिसून आले आहे.

**परिशिष्ट "ढ" व "ड"** मध्ये विहीत केलेल्या वेळेनुसार विषय समित्यांनी प्रस्तावांना मान्यता देणे, संबंधीत विषय समितीवर बंधनकारक राहील. अशा मान्यतेचे प्रस्ताव मुदती पूर्वी किमान १५ दिवस अगोदर संबंधित समिती /सभे समोर सादर करणे ही विभाग प्रमुखांची जबाबदारी राहील. विहित वेळेत विषय समितीची मान्यता मिळणेसाठी नियमित मासिक सभे व्यतिरिक्त विशेष सभा बोलविण्यासाठी वा विहित केलेल्या कालावधीमध्ये जिल्हा परिषद /विषय समितीची बैठक घेण्यात आली नसल्यास, अथवा याबाबत वेळ काढूपणाचे धोरण स्वीकारले जात आहे हे निदर्शनास आल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम २६२ अनुसार विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठवून संबंधित समिती /सभेची बैठक बोलाविण्याची कार्यवाही करावी. व त्यामध्ये या विषयाचा निर्णय घेण्यात यावा.

वस्तु /साहित्य खरेदी संदर्भात अनेक वेळा शासन दर करारासाठी प्रतिक्षा करण्यात येते. त्यामुळे साहित्य खरेदीच्या प्रक्रियेस विलंब होवून वेळेवर साहित्याचा पुरवठा होत नाही. यासाठी साहित्याच्या खरेदीसाठी शासन स्तरावर होणा-या दर कराराची वाट पाहू नये. **खरेदी करावयाच्या साहित्य /वस्तूसंबंधी त्यावेळी दर करार अस्तित्वात असेल** तरच दर करारानुसार खरेदी करण्यात यावी. अन्यथा खुल्या बाजारातून निविदा मागवून साहित्य खरेदीची प्रक्रिया वेळेतच पूर्ण करावी.

**(४) निधी खर्चासाठी कालमर्यादा:-**

विविध योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात या परिपत्रकानुसार विहित केलेल्या काल मर्यादेत कार्यवाही पूर्ण करण्याची दक्षता सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. आर्थिक वर्षाच्या अखेर सर्व योजनांचा निधी खर्च होणे आवश्यक आहे. चालु वर्षासाठी माहे फेब्रुवारी २००९ नंतर कोणताही अखर्चित निधी शासनाच्या परवानगी शिवाय खर्च करता येणार नाही. तसेच सन २००८-०९ पासून पुढे अखर्चित निधी खर्चासाठीची **अंतीम मर्यादा जानेवारी अखेरची** राहील. याची नोंद सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २००८०५१४१७४८५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

(ना.रा.भागवत)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
१)महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता ) /(लेखा व परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
२)महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता ) /(लेखा व परिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.
३)वित्त विभाग, व्यय-१५ व अर्थसंकल्प-१९.
४)सर्व विभागीय आयुक्त (विकास शाखा)
५)मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण भवन,नवी मुंबई.
६)उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती.
७)सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
८) सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
९)सर्व जिल्हा लेखा परिक्षक अधिकारी स्थानिक निधी लेखा,
१०)ग्राम विकास व जलसंधारण विभाग, का.क्र.आस्था ४,६,८,
११)निवड नस्ती, कार्यासन क्रमांक वित्त-९.

# परिशिष्ट "अ"

## केंद्रपुरस्कृत योजना (बांधकामे)

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासून पूढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टांची निश्चिती मागील वर्षाचे उधिष्ट ग्राहय धरावे. | ३१ मे | १५ एप्रिल पर्यंत |
| २ | उधिष्टांचे तालुका निहाय वाटप एकुण उधिष्टांच्या १० % वाढ करुन वाटप करणे. | १५ जुन | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीस्तव सादर करणे. | ३० जुन | ३० एप्रिल पर्यंत |
| ४ | जिल्हा स्तरावर प्रस्तावांची छाननी करुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे. | १५ जुलै | १५ मे. |
| ५ | लाभार्थ्यां सोबत करारनामे पूर्ण करणे. | १५ जुलै १५ ऑगस्ट | १५ मे ते १५ जून |
| ६ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर | १५ जून ते १५ जूलै |
| ७ | बांधकामे पूर्ण करणे. | १५ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, ०९ | १५ जुलै ते ३१ डिसेंबर |
| ८ | बांधकाम पूर्णत्वाचे दाखले प्रदान करणे. | ३१ जानेवारी पर्यंत | ३१ जानेवारी पर्यंत |
| ९ | अंतिम देयके अदा करणे. | फेब्रुवारी अखेर | ३१ जानेवारी पर्यंत |
| १० | बांधकामाचे हस्तांतरण व नोंदी घेणे | मार्च | मार्च |

## परिशिष्ट "ब"
## केंद्रपुरस्कृत वैयक्तीक लाभांच्या योजना
## स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | पुढील वर्षाचे नियोजन करणे. | मे पूर्वी | मार्च पूर्वी |
| २ | तालुकानिहाय उद्दिष्ट वाटप करणे. | १५ जून पर्यंत | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | कर्ज प्रकरणे/प्रस्ताव सादर करणे. | ३१ जुलै पर्यंत | ३० जून पर्यंत |
| ४ | कर्ज प्रकरणे/प्रस्ताव बँकांकडे सादर करणे. | ३१ ऑगस्ट पर्यंत | ३१ जुलै पर्यंत |
| ५ | कर्ज प्रकरणास मंजूरी प्राप्त करुन घेणे. | ३१ ऑक्टोबर पर्यंत - | ३० सप्टेंबर पर्यंत |
| ६ | कर्ज प्रकरणे वाटप करणे | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |

# परिशिष्ट " क "

## जिल्हा परिषदांकडील बांधकाम विषयक शासकीय योजना

CR, SR, MNP, NON MNP वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास योजना, १२ वा वित्त आयोग (राज्य स्तर ), गौण खनिज इत्यादी अनुदान.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-२००९ साठी सुचना | सन २००९ -२०१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना |
|---|---|---|---|
| १ | वार्षिक नियोजन आराखडा तयार करणे. | ३१ मे पर्यंत | ३० एप्रिल पर्यंत |
| २ | आवश्यकतेनुसार आराखडयास समिती/सभा यांची मान्यता घेण्यासाठी आराखडा समिती/ सभेला सादर करणे. | १५ जून | १५ मे |
| ३ | आराखडा मंजूरीसाठी शासनास सादर करणे. | जून अखेर पर्यंत | मे अखेर पर्यंत |
| ४ | कामांना प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान करणे. | जुलै अखेर | जून अखेर |
| ५ | कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करणे. | सप्टेंबर अखेर | ऑगस्ट अखेर |
| ६ | कामाचे कार्यारंभ आदेश देणे. | १५ऑक्टोबर | १५ सप्टेंबर |
| ७ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | ऑक्टोबर अखेर | सप्टेंबर अखेर |
| ८ | कामाचे पूर्णत्वाचे दाखले देवून अंतिम देयकाची अदाई करणे. | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |
| ९ | विनियोग दाखले घेणे. | ३१ मार्च | ३१ मार्च |

## परिशिष्ट "ड"

## जिल्हा परिषदाकडील बांधकाम विषयक शासकीय योजना

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सुचना | सन २००९-१० पासून पूढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | योजनाची निवड व अर्थसंकल्पीय तरतूद करणे. | ३१ मे | ३१ मार्च पूर्वी मागील वर्षाची |
| २ | योजनेचे प्रारुप व कामांना प्रशासकीय आणि तांत्रिक मंजूरी प्रदान करणे. | ३१ जुलै | ३१ मे |
| ३ | कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करणे. | ३० सप्टेंबर | ३० जुलै |
| ४ | कामाचे कार्यारंभ आदेश देणे. | १५ ऑक्टोबर | १५ ऑगस्ट |
| ५ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | १६ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | १६ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर |
| ६ | काम पूर्णत्वाचे दाखले देवून अंतिम देयकाची अदाई करणे. | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |
| ७ | विनियोग दाखले घेणे. | ३१ मार्च | ३१ मार्च· |

## परिशिष्ट " इ "
## जिल्हा परिषदांकडील वैयक्तीक लाभांच्या योजना.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-२००९ साठी सुचना | सन २००९-२०१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सुचना |
|---|---|---|---|
| १ | योजनांची निवड व अर्थसंकल्पात तरतूद करणे. | मे पूर्वी | मार्च पूर्वी |
| २ | विविध योजनांचे प्रारुप निश्चित करुन त्यास विषय समितीची मान्यता / मंजूरी घेणे. | ३० जून | ३० एप्रिल |
| ३ | योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देणे. | ३१ ऑगस्ट | ३० जून पर्यंत |
| ४ | पंचायत समिती निहाय उद्दिष्ट वाटप व प्रस्ताव मागणे, प्रस्तावाची छाननी करणे. | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ५ | लाभार्थीची निवड करणे. | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ६ | निविदा प्रक्रीया पूर्ण करुन खरेदीस सक्षम अधिकारी/समितीची मान्यता घेणे. | ३१ ऑक्टोबर पर्यंत | ३१ ऑगस्ट पर्यंत |
| ७ | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश. | ३० नोव्हेंबर | ३० सप्टेंबर |
| ८ | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे. | ३१ जानेवारी | ३० नोव्हेंबर |
| ९ | पुरवठादाराचे देयके अदा करणे. | फेब्रुवारी पर्यंत | ३१ जानेवारी |
| १० | विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे. | मार्च | मार्च |

परिशिष्ट १५.१

जिल्हा परिषद स्तरावरील महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १०० खालील हंस्तातरित व कलम १२३ खालील अभिकरण योजनांच्या निधीतुन तात्पूरत्या गुंतवणूकीद्वारे प्राप्त होणा-या व्याजामधून विकास योजना राबविणेस मान्यता देणेबाबत.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग ,
शासन निर्णय क्र.जिपनि २००९/प्र.क्र. ५०१९ /वित्त-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० जून, २००९.

संदर्भ:-(१) शासन निर्णय झेडपीर २००२/ प्र.क्र.४१२७/वित्त -३(२४),
दिनांक १७ ऑगस्ट २००२.

प्रस्तावना :- जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील राबविण्यात येणाऱ्या विविध हस्तांतरीत व अभिकरण योजनांवरील शिल्लक रकमेच्या तात्पूरत्या गुंतवणूकीद्वारे प्राप्त होणाऱ्या व्याज्याच्या रक्कमांचा विनियोग शक्य तो त्या त्या संबंधित योजनासाठीच करण्याविषयीचे आदेश उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या व्याजाच्या रक्कमा निरनिराळ्या विकास विषयक कामांसाठी उपयोगात आणण्याबाबत काही जिल्हा परिषदांकडून या विभागाकडे पत्रव्यवहार प्राप्त झाला असून, त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :-

शासन निर्णय :-

उक्त प्रकरणी संदर्भिय शासन निर्णय रद्द करुन खालील सुधारीत निर्णय घेण्यात येत आहे. हस्तांतरीत व अभिकरण तत्वावरील योजनासाठी व विकास प्रयोजनासाठी ग्राम विकास विभागाकडून यापूर्वी अर्थोपाय अग्रीमाव्दारे अनुदान देण्यात येत होते. आता २००१ पासून वेतन व दिनांक १५/१०/२००८ पासून वेतनेत्तर अनुदान शासनाच्या संबंधीत प्रशासकीय विभागाकडून जिल्हा परिषदांना अर्थसंकल्पीय तरतूदी आधारे अर्थसंकल्पीय वितरण पध्दतीव्दारे देण्यांत येते. अशा माध्यमातून जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या अभिकरण व हस्तांतरण योजनांचा निधीच्या शिल्लक रकमांचा विनियोग तातडीने करावा लागणार नसेल तर काही तात्पुरत्या कालावधीपुरत्या अशा रक्कमा, जिल्हा मध्यवर्ती बँक या जिल्हा परिषदेचा आर्थिक व्यवहार ज्या बँकांमधून चालतात अशा बँकांमध्ये ठेवण्याबाबत शासनाचे आदेश आहेत. अशाप्रकारे हस्तातंरीत व अभिकरण योजनेसंदर्भात शिल्लक रक्कमांच्या गुंतवणूकीद्वारे प्राप्त होणाऱ्या व्याजाच्या रकमेचे विनियोगाबाबत काही जिल्हा परिषदांनी शासनास मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने अशा प्रकरणी कलम १०० व १२३ योजनांतर्गत निधीच्या गुंतवणूकीद्वारे प्राप्त होणारे व्याज हे जिल्हा निधीचा भाग म्हणून समजण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे .

जिल्हा [illegible] निधीच्या अल्प गुंतवणूकीद्वारे प्राप्त होणारी व्याजाची रक्कम ही उपरोक्त नमूद केल्यानुसार जिल्हा परिषद उत्पन्नाची बाब समजण्यात येऊन जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नाच्या अर्थसंकल्पात ५ व्याज (२) शिल्लक रकमेच्या गुंतवणूकीवरील व्याज (अल्प मुदत) (अ) अल्पमुदतीन

शाखा
आवक नं.:-
२४ JUN 2009
२९८३
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-
प्र. लि. वि. स. लि. लेखाधिकारी

गुंतविलेल्या रकमावरील व्याज या लेखाशिर्षाखाली जमा दाखवावी व त्या रक्कमाचा विनियोग हा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ नुसार जिल्हा यादीमध्ये अंतर्भूत असलेल्या (पहिल्या अनुसूचीच्या ) नमूद बाबीवर करण्यात यावा. याशिवाय अन्य कुठल्याही बाबीवर सदरिल रक्कम खर्च करण्यात येवू नये व तसे केल्यास ती अनियमीतता समजण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व) यांनी सद्य:स्थितीत उपरोक्तप्रमाणे निधीच्या गुंतवणूकीद्वारे प्राप्त झालेल्या व्याजाचा विनियोग वर नमूद केल्यानुसार चालू आर्थिक वर्षात तात्काळ करावा.याप्रकरणी आवश्यक तो शिल्लक रक्कमांचा ताळमेळ घेवून तातडीने कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधित जबाबदार अधिका-यांना सूचना देण्यात याव्यात.

३. उक्त प्रकरणी शासनाच्या विविध प्रशासकीय विभागाकडून कलम १०० व १२३ मधील योजनांसाठी जिल्हा परिषदेस प्राप्त होणारा निधी हा त्या त्या संबंधित योजनेकरिता तातडीने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत या योजनांसाठीचा निधी हा स्थानिक विकासाची बाब विचारात घेता वेळच्या वेळी उपयोगात आणणे आवश्यक आहे. विकास कामे व विकास परियोजनासाठी प्राप्त रक्कमा हया विकास विषयक कामांसाठी खर्च करण्यास अडचणी उद्‌भवणार नाहीत व वेळच्यावेळी त्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिल्यानंतरही रक्कम शिल्लक राहिल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा वित्तीयसल्ला घेवुन शिल्लक रक्कमांची अल्प मुदतीच्या ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी व त्यापासून मिळणारे व्याज वरील सूचनांप्रमाणे खर्च करावे. याप्रमाणे कार्यवाही करताना स्थनिक विकासाच्या कामांमध्ये आर्थिक अडचणी निर्माण होऊन, त्याकरिता विलंब होणार नाही याविषयी संबंधितांनी वेळीच दक्षता घ्यावी. तसेच अखर्चीत रक्कमा शासनखाती जमा करणेबद्दल शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २६ सप्टेंबर, २००५ व ६ जून, २००८ अन्वये निर्गमीत केलेल्या शासन निर्णयाचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद यांनी तंतोतंत पालन करावे. या संदर्भाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियमीत पणे जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेत ठेवण्यात यावा.

४. याप्रकरणी शासनाचे आदेश विचारात घेवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठवावा.

५. वित्त विभागाच्या मान्यतेने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.-१३०/०९/कोषा.प्र.-५ दिनांक ५ जून.२००९ नुसार निगमितकरण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

३०/०६/०९.

(एकनाथ मोरे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,

१ सर्व विभागीय आयुक्त
२ सहाय्यक आयुक्त (विकास) सर्व
३ महालेखापाल, महाराष्ट्र-१ ( लेखा व परिक्षा ), मुंबई (५ जादा प्रतींसह)
४ . महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व परिक्षा ), नागपूर (५ जादा प्रतींसह)

एच-६२२-१३

परिशिष्ट १६.१

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (अभियान)
दिनांक : 1 JAN 1994
उप मु. का. अ.
मु. का. अ.

Inward No. 6 JAN 1994
Date
E. E.
P.
Supdt.
D. A
Branch

जिल्हा परिषदेमधील बांधकाम व लघुपाटबंधारे विभागातील कामाचे कंत्राट देताना कामाची विभागणी न करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जल संधारण विभाग
शासन परिपत्रक क्र. झेडपीए १०९३/प्र.क्र. ९५१८/३३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक - १० डिसेंबर, १९९३.

वाचा :- शासन परिपत्रक ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र. झेडपीए १०८९/प्र.क्र. ८५४/३३, दिनांक ८/२/१९९०.

परिपत्रक :- उपरोक्त शासन परिपत्रकान्वये ग्राम विकास विभागाने खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहितेतील नियम १३५ मधील तरतुदींनुसार रु. ५०,००० पेक्षा जास्त किंमतीच्या कामासाठी विहित पध्दती प्रमाणे निविदा मागविण्याच्या असतात. परंतु अनेकदा नियम क्र. १२३ चा आधार घेऊन संयुक्तीक कारणाशिवाय अशा कामांची विभागणी करण्यात येते. अशा रितीने निविदा न मागविल्याने वाजवी दराचा फायदा जिल्हा परिषदांना मिळत नाही. शिवाय ब-१, ब-२ पध्दतीच्या निविदा मागविल्यामुळे कंत्राटदारावर कोणत्याही प्रकारची जबाबदारी निश्चितकरणे वा वसूली करणे शक्य होत नाही. काम पूर्ण करण्याचे वेळेचे बंधनही नसल्याने कामात दिरंगाई होते. तसेच सर्व कामांच्यात अशा प्रकारच्या कामाची गुणवत्ताही कमी दर्जाची असते आणि पर्यायी जिल्हा परिषदांचे नुकसान होते अनेक प्रकरणी विभागणी करून कंत्राटे दिली असताना त्यातील केवळ एक भाग कंत्राटदाराने पूर्ण न केल्याने संपूर्ण कामे अपूर्ण राहीलेली आहेत. असे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

तथापि, असे असूनसुध्दा काही जिल्हा परिषदांकडून कामाचे तुकडे/विभागणी करणेबाबत जिल्हा परिषदेला परवानगी देण्याची शासनास विनंती करण्यात आलेली आहे. परंतु वर नमूद केलेल्या कारणास्तव रु. ५०,०००/- पेक्षा जास्त किंमतीच्या कामांची विभागणी करण्यास प्रतिबंध घालण्यात आलेले आहेत म्हणून सदर विनंती मान्य करता येत नाही. तेव्हा वर नमूद केलेल्या शासन परिपत्रकातील आदेशांचा खालीलप्रमाणे पुनरुच्चार करण्यात येत आहे.

(अ) कामाची विभागणी करण्यावर खालील (क) मध्ये नमूद केलेली अपवादात्मक परिस्थिती वगळता सर्वंकष बंदी घालण्यात येत असून यापुढे कोणत्याही प्रकारे केलेल्या कामाच्या विभागणीची गंभीर दखल घेण्यात येईल.

(ब) रु. ५०,००० पेक्षा जास्त किंमतीची कामे ही बी-१/बी-२, पध्दतीच्या निविदा मागवून करण्यात यावी. या स्थितीत खालील (क) मधील परिस्थिती वगळता कोणत्याही परिस्थितीत ए-१/ए-२ निविदांचा वापर करण्यात येऊ नये.

(क) काही अपरिहार्य किंवा अपवादात्मक कारणास्तव रु. ५०,००० पेक्षा जास्त किंमतीच्या कामाची विभागणी करावयाची असेल तर तसा प्रस्ताव कार्यकारी अभियंत्याने जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी

व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेनंतर कामाची निविदा स्वीकारण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडे मंजूरीसाठी पाठवावा त्यांचेकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर कामाची विभागणी करण्यात यावी या पध्दतीचे काटेकोरपणे पालन करावे. यात अनियमितता आढळल्यास संबंधितांविरुध्द कठोर कार्यवाही करण्यात येईल.

[६] संबंधित क्षेत्रिय अधीक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंत्याच्या निरीक्षणाच्या वेळी, निविदा मागविण्यापूर्वी कामाची विभागणी केली नाही, याची तपासणी करावी आणि कामाची विभागणी केली असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडून पूर्व संमतीनेच करण्यात आली आहे याची खातरजमा करुन घ्यावी.

जिल्हा परिषदेच्या बांधकाम व लघु पाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंत्यांनी वरील आदेशाचे तंतोतंत पालन करावे तसेच वरील आदेशाचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कडक कारवाई केली जाईल.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ मधील नियम १२३ [१] च्या तरतुदीतील दुरुस्ती यथावकाश करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ दा. रा. आहेर ]
वरिष्ठ लेखा अधिकारी महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद [सर्व]
कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद [सर्व]
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन,
नाशिक/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती
सर्व जिल्हा स्थानिक निधी लेखा अधिकारी,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य मुंबई,
महालेखापाल [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य, नागपूर,
महालेखापाल [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य, नागपूर,
सार्वजनिक बांधकाम विभाग [इमा-२]
पाटबंधारे विभाग,
वित्त विभाग [अर्थ-१५]
इतर सर्व मंत्रालयीन विभाग [विधी व न्याय विभाग व गृह विभाग वगळून]
ग्राम विकास विभागातील सर्व अधिकारी व कार्यासने,
निवड नस्ती.

# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**रविवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०१५**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नांदेड**

उपस्थिती

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
५. श्री.उन्मेष पाटील, वि.स.स.
६. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
७. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
८. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
९. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
१०. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.
११. श्री.अमित झनक, वि.स.स.
१२. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
१३. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
१४. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
१५. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक आमदार**
श्री.प्रदीप नाईक, वि.स.स.
श्री.प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.
डॉ.तुषार राठोड, वि.स.स.
श्री.सुभाष साबणे, वि.स.स.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय**

श्री.राजेंद्र गेंगजे, अवर सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री.संतोष कोडे, सहायक आयुक्त

**जिल्हा परिषद, नांदेड**

श्री.अभिमन्यू काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.जी.डी.राठोड, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (प्रभारी), जि.ग्रा.वि.यंत्रणा

श्री.यू.ए.कोमवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रभारी) (साप्र)

श्री.जी.एल.रामोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु व स्वच्छता)

श्री.दीपक चाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)

श्रीमती कल्पना क्षिरसागर, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)

श्री.आर.एस.राऊत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्र.)

श्री.बी.एन.लांडेकर, कार्यकारी अभियंता (बांध.-दक्षिण)

श्री.बी.जी.पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम-उत्तर)

श्री.सुनील खमीतकर, समाज कल्याण अधिकारी

श्री.पी.एस.मोरे, कृषी विकास अधिकारी

डॉ.एम.यु.गोहोत्रे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

डॉ.बी.एम.शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री.एस.पी.पैलवाड, कार्यकारी अभियंता (ल.पा.)

श्री.डी.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु.)

श्री.संदीप सोनटक्के, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री.शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

सौ.सविता बिरगे, शिक्षणाधिकारी (निरंतर)

श्री.पी.पी.देशपांडे, उप अभियंता (यांत्रिकी), भूसवियं

श्री.व्ही.व्ही.घुगे, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्रा ग्रासयो

श्री.एन.आर.केंद्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील नांदेड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**सोमवार, दिनांक १४ सप्टेंबर, २०१५**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नांदेड**

**उपस्थिती**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

५. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

६. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

७. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

८. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

९. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१०. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

११. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१२. श्री.के.सी.पाडवी, वि.स.स.

१३. श्री.अमित झनक, वि.स.स.

१४. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१५. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

१६. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, नांदेड**
श्री.अभिमन्यू काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.जी.डी.राठोड, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (प्रभारी), जि.ग्रा.वि.यंत्रणा
श्री.यू.ए.कोमवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रभारी) (साप्र)
श्री.जी.एल.रामोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु व स्वच्छता)
श्री.दीपक चाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
श्रीमती कल्पना क्षिरसागर, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)
श्री. आर.एस.राऊत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्र.)

. . .

श्री.बी.एन. लांडेकर, कार्यकारी अभियंता (बांध.-दक्षिण)
श्री.बी.जी.पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम-उत्तर)
श्री.सुनील खमीतकर, समाज कल्याण अधिकारी
श्री.पी.एस.मोरे, कृषी विकास अधिकारी
डॉ.एम.यु.गोहोत्रे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
डॉ.बी.एम.शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री.एस.पी.पैलवाड, कार्यकारी अभियंता (ल.पा.)
श्री.डी.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु.)
श्री.संदीप सोनटक्के, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री.शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
सौ.सविता बिरगे, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री.पी.पी.देशपांडे, उप अभियंता (यांत्रिकी), भूसवियं
श्री.व्ही.व्ही. घुगे, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्रा ग्रासयो
श्री.एन.आर.केंद्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड
श्रीमती.पी.एस. यन्नावार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड
श्रीमती. अश्विनी ठाकूर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर
श्री. व्ही.एन.रंगवाळ, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा
श्री.के.एस. सायमोते, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार
श्री.व्ही.एन. घोडके, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड
श्री. जी.के. मेथेवाड, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर
श्री. एम.के. बिचकुले, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बिलोली
श्री. यू.डी. राहाटीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव
श्री. व्ही.आर. कोंडेकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद
श्री.जे.डी.गोरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर
श्री.एम.एन. केंद्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी
श्री.एस.एन. धनवे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव
श्री.राहूल काळभोर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर
श्री.यु.डी. इंगोले, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट
श्री.यु.डी. मांदाडे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर
श्री.यू.डी. तोटावाड, गट विकास अधिकारी, मग्रारोहयो

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नांदेड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर, २०१५**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नांदेड**

**उपस्थिती**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स
४. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
५. श्री.समीर कुणावार, वि.स.स.
६. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
७. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
८. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
९. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
१०. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.
११. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
१२. श्री. अमित झनक, वि.स.स.
१३. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक
श्री.वाघिरकर, सह संचालक, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, नांदेड**
श्री.अभिमन्यू काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.जी.डी.राठोड, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (प्रभारी), जि.ग्रा.वि.यंत्रणा
श्री.यू.ए.कोमवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रभारी) (साप्र)
श्री.जी.एल.रामोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु व स्वच्छता)
श्री.दीपक चाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
श्रीमती कल्पना क्षिरसागर, उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)
श्री. आर.एस.राऊत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्र.)
श्री.बी.एन. लांडेकर, कार्यकारी अभियंता (बांध.-दक्षिण)
श्री.बी.जी.पवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम-उत्तर)
श्री.सुनील खमीतकर, समाज कल्याण अधिकारी

..२

श्री.पी.एस.मोरे, कृषी विकास अधिकारी
डॉ.एम.यु.गोहोत्रे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
डॉ.बी.एम.शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री.एस.पी.पैलवाड, कार्यकारी अभियंता (ल.पा.)
श्री.डी.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु.)
श्री.संदीप सोनटक्के, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
श्री.शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
सौ.सविता बिरगे, शिक्षणाधिकारी (निरंतर)
श्री.पी.पी.देशपांडे, उप अभियंता (यांत्रिकी), भूसविय
श्री.व्ही.व्ही. घुगे, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्रा ग्रासयो
श्री.एन.आर.केंद्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड
श्रीमती.पी.एस. यन्नावार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड
श्रीमती. अश्विनी ठाकूर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर
श्री. व्ही.एन.रंगवाळ, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा
श्री.के.एस. सायमोते, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार
श्री.व्ही.एन. घोडके, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड
श्री. जी.के. मेथेवाड, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर
श्री. एम.के. बिचकुले, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बिलोली
श्री. यू.डी. राहाटीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव
श्री. व्ही.आर. कोंडेकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद
श्री.जे.डी.गोरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर
श्री.एम.एन. केंद्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरी
श्री.एस.एन. धनवे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव
श्री.राहूल काळभोर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर
श्री.यु.डी. इंगोले, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट
श्री.यु.डी. मांदाडे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर
श्री.यू.डी. तोटावाड, गट विकास अधिकारी, मग्रारोहयो

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नांदेड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २६ एप्रिल, २०१६**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

४. श्री.उन्मेष पाटील, वि.स.स.

५. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

६. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

७. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

८. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.

९. श्री.दिपक चव्हाण, वि.स.स.

१०. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

११. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री. दिनेश कुमार जैन, अपर मुख्य सचिव, कृषि विभाग,

श्री.विश्वनाथ गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग,

श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,

श्रीमती.सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री. एस.एस.संधू, प्रधान सचिव, सहकार विभाग,

श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

श्री. राजेशकुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

श्री. वि.रा. नाईक, सचिव, एमएमजीएसवाय

श्री. सुरेन्द्र बागडे, सचिव

श्री. रमेश देवकर, मु.का.अ.

श्री. सुनील खोतकर, पि.रा.क.स.

**नांदेड जिल्हा परिषद**

श्री. अभिमन्यु काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड

श्री. राऊत, मुख्य लेखा वित्त अधिकारी (प्रभारी), नांदेड,

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, कृषी विभाग, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, अपर मुख्य सचिव, नियोजन, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, महिला व बाल विकास, प्रधान सचिव, शालेय शिक्षण, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, प्रधान सचिव, उद्योग विभाग, सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, आयुक्त, सहकार आयुक्तालय, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांची साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, औरंगाबाद**

उपस्थिती

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

३. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

४. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

५. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

६. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

७. श्री.अनिल बाबर, वि.स.स.

८. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

९. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

१०. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.

११. श्री.अमित झनक, वि.स.स.

१२. श्री.राहुल मोटे, वि.स.स.

१३. श्री.दिपक चव्हाण, वि.स.स.

१४. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१५. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक लोकप्रतिनिधी**

१) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
२) श्री.श्रीराम नागोराव महाजन, अध्यक्ष, जि.प.
३) श्री.दिनकर पवार, उपाध्यक्ष, जि.प.
४) श्री.संतोष जाधव, सभापती, समाजकल्याण समिती
५) श्रीमती शीला चव्हाण, सभापती, समाजकल्याण समिती,
६) श्रीमती लताबाई वानखेडे, सभापती, सिल्लोड
७) श्रीमती माधुरी गाडेकर, सभापती, फलंब्री
८) सौ.नंदाबाई आगे, सभापती, सोयगाव
९) श्रीमती द्वारकाबाई पवार, सभापती, वैजापूर
१०) श्री.संजय जैस्वाल, सभापती, गंगापूर
११) श्रीमती पुष्पा केदारे, सभापती, पैठण

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय**

श्री.न.म. शिंदे, सह सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री.संतोष कोडे, सहायक आयुक्त

**जिल्हा परिषद, औरंगाबाद**

डॉ.अभिजीत चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.एस.बी.बेदमुथा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.एस.बी.लांगोरे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.
श्रीमती छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
श्री.उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री.व्ही.पी.सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
श्री.एस.जी.कदम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)
श्री.डी.ई.चाटे, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)
श्री.रविंद्र चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)
श्री.गजानन रबडे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)
श्री.बी.एस.बाविस्कर, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
श्री.पी.डी.सानप, कार्यकारी अभियंता (सिंचन)
श्री.एम.के.सापधरे, कार्यकारी अभियंता (सिंचन) (प्र.)
डॉ.बी.टी.जमादार, जिल्हा आरोग्य अधिकारी
डॉ.एम.एल.साळवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
श्री.एस.ए.कोलते, कृषि विकास अधिकारी
श्री.एस.ए.देशपांडे, जिल्हा कृषी अधिकारी
श्री.समाधान इंगळे, समाजकल्याण अधिकारी (प्र.)
श्री.एम.के.देशमुख, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (प्र.)
श्री.बी.एस.सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
श्री.एन.के.देशमुख, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) (प्र.)

**गट विकास अधिकारी**

श्री.व्ही.एफ.परदेशी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद
श्री.विशाल शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड
श्री.पी.एस.शिर्के, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर
श्री.व्हि.पी.केळकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर
श्री.यु.वाय.सोमवंशी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण
श्री.एस.बी.माने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री
श्रीमती के.एस.सानप, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड
श्री.आर.एस.लाहोटी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद
श्री.के.एस.जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगांव
श्री.एस.एम.डावकरे, उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)
श्री.एम.पी.सुरडकर, उप अभियंता (यांत्रिकी)
श्री.पी.ए.तुलंगेकर, सहायक भूवैज्ञानिक

श्री.एस.जी.जैन, कनिष्ठ भुवैज्ञानिक
श्री.आशिष दे.चौधरी, शाखा अभियंता (सिंचन)
श्री.अशोक साळवे, उप विभागीय अधिकारी (बांधकाम)
श्री.ए.कृ.कोथगिरे, वरिष्ठ लेखाधिकारी (वित्त)
श्री.राजेन्द्रकुमार खाजेकर, लेखाधिकारी (वित्त)
श्री.एस.एम.निकाळजे, सहायक लेखाधिकारी (वित्त)
श्री.अनिल क.राठोड, सहायक लेखाधिकारी (कृषी)
श्री.शरद सा.भिंगारे, लेखाधिकारी (वित्त)
श्री.बी.आर.पवार, सहायक लेखाधिकारी (पाणीपुरवठा)
श्री.आर.बी.शिंदे, सहायक लेखाधिकारी (आरोग्य)
श्री.आर.आर.हंपीहोळी, उपअभियंता (बांधकाम)
श्री.एम.जी.पाटील, पशुधन पर्यवेक्षक
श्री.डी.डी.जोशी, सहायक लेखाधिकारी (समाजकल्याण)
श्री.मनोज चौधरी, तत्कालीन गट विकास अधिकारी
श्री.पी.एस.कुलकर्णी, कनिष्ठ सहायक, ए.बा.वि.यं.
श्री.एस.वाय.काळे, विस्तार अधिकारी (पंचायत)
श्री.डी.टी.पाटील, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) (पाणी पुरवठा)
श्री.डी.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जि.प.यवतमाळ
श्री.एस.यु.अंभोरे, उप अभियंता (पाणी पुरवठा)
श्री.डी.टी. भिसे, सगविअ, पंचायत समिती, उमरगा
श्री.अे.टी.गायकवाड, उप अभियंता (सिंचन)
श्री.भास्कर कुलकर्णी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदलापूर
श्री.आर.व्ही.शिरसकर, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)
श्री.अे.बी.चौलवार, गटविकास अधिकारी, जालना
श्री.वि.एम.मिटके, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)
श्रीमती स्नेहा अरुण देव, बा.वि.प्र.अ.तथा अति.गट विकास अधिकारी
श्री.के.पी.कांबळे, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)
श्री.व्ही.आर.हरकळ, गटविकास अधिकारी, मानवत
श्री.पी.बी.काकडे, गटविकास अधिकारी (पैठण)
श्री.डी.झेड.पंचभाई, उपविभागीय अधिकारी, सिल्लोड
श्री.जी.डी.शेख, उप अभियंता
श्री.यु.डी.लिंभारे, सहायक अभियंता, वैजापूर
श्री.अब्दुल शेख, स्था.अ.स., वैजापूर
श्री.एस.एन.औताडे, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री.आर.डी.मडके, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री.जी.एम.वानखेडे, तत्कालीन उप अभियंता, बांधकामृ
श्री.यु.बी.ओल्हाळ, उपविभागीय अभियंता, कन्नड
श्री.जे.जी.कांबळे, वि.अ.पंचायत समिती, खुलताबाद
श्री.प्र.बा.चव्हाण, शि.अ.प्रा.(सेवानिवृत्त)
श्री.जे.बी.बागूल, शि.अ.प्रा.(सेवानिवृत्त)

श्री.डि.एच.पांडे, पंचायत समिती, कन्नड

श्री.एम.एस.सुरडकर, प्राथमिक आरोग्य केंद्र, वेरुळ

श्री.एस.एम.देवकर, पंचायत समिती, कन्नड

श्री.व्ही.आर.जाधव, मु.अ.जरंडी

श्री.एस.एन.थोरले, क.सहायक, शिक्षण

श्री.बी.डी.मेश्राम, क.समन्वयक

श्री.पी.वाय.दळवी, उप अभियंता, जि.प.सिंचन, वैजापूर

श्री.व्ही.व्ही.मामिलवाड, क.लेखाधिकारी, पं.स.सोयगांव

श्री.वाय.बी.शिंदे, क.स.लेखाधिकारी, पं.स.गंगापूर

श्री.एस.ई.खंडाळे, स.लेखाधिकारी, पं.स. गंगापूर

श्री.डी.एस.निकम, प्र.अ., पं.स.गंगापूर

श्री.एस.के.जोशी, व.सहायक, पं.स.गंगापूर

श्री.पी.जी.कुलकर्णी, तत्कालीन प्र.गट विकास अधिकारी, औरंगाबाद

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील औरंगाबाद जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, औरंगाबाद**

उपस्थिती

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
५. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
६. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
७. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
८. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
९. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१०. श्री.अमित झनक, वि.स.स.
११. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
१२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
१३. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय**
श्री.न.म. शिंदे, सह सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**
श्री.संतोष कोडे, सहायक आयुक्त

**जिल्हा परिषद, औरंगाबाद**
डॉ.अभिजीत चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.एस.बी.बेदमुथा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.एस.बी.लांगोरे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.
श्रीमती छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
श्री.उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री.व्ही.पी.सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
श्री.एस.जी.कदम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)

श्री.डी.ई.चाटे, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)

श्री.रविंद्र चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)

श्री.गजानन रबडे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

श्री.बी.एस.बाविस्कर, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री.पी.डी.सानप, कार्यकारी अभियंता (सिंचन)

श्री.एम.के.सापधरे, कार्यकारी अभियंता (सिंचन) (प्र.)

डॉ.बी.टी.जमादार, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ.एम.एल.साळवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री.एस.ए.कोलते, कृषि विकास अधिकारी

श्री.एस.ए.देशपांडे, जिल्हा कृषी अधिकारी

श्री.समाधान इंगळे, समाजकल्याण अधिकारी (प्र.)

श्री.एम.के.देशमुख, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (प्र.)

श्री.बी.एस.सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

श्री.एन.के.देशमुख, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) (प्र.)

**गट विकास अधिकारी**

श्री.व्ही.एफ.परदेशी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद

श्री.विशाल शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड

श्री.पी.एस.शिर्के, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर

श्री.व्हि.पी.केळकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर

श्री.यु.वाय.सोमवंशी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण

श्री.एस.बी.माने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री

श्रीमती के.एस.सानप, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड

श्री.आर.एस.लाहोटी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद

श्री.के.एस.जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगांव

श्री.एस.एम.डावकरे, उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

श्री.एम.पी.सुरडकर, उप अभियंता (यांत्रिकी)

श्री.पी.ए.तुलंगेकर, सहायक भूवैज्ञानिक

श्री.एस.जी.जैन, कनिष्ठ भुवैज्ञानिक

श्री.आशिष दे.चौधरी, शाखा अभियंता (सिंचन)

श्री.अशोक साळवे, उप विभागीय अधिकारी (बांधकाम)

श्री.ए.कृ.कोथगिरे, वरिष्ठ लेखाधिकारी (वित्त)

श्री.राजेन्द्रकुमार खाजेकर, लेखाधिकारी (वित्त)

श्री.एस.एम.निकाळजे, सहायक लेखाधिकारी (वित्त)

श्री.अनिल क.राठोड, सहायक लेखाधिकारी (कृषी)

श्री.शरद सा.भिंगारे, लेखाधिकारी (वित्त)

श्री.बी.आर.पवार, सहायक लेखाधिकारी (पाणीपुरवठा)

श्री.आर.बी.शिंदे, सहायक लेखाधिकारी (आरोग्य)

श्री.आर.आर.हंपीहोळी, उपअभियंता (बांधकाम)

श्री.एम.जी.पाटील, पशुधन पर्यवेक्षक

श्री.डी.डी.जोशी, सहायक लेखाधिकारी (समाजकल्याण)

श्री.मनोज चौधरी, तत्कालीन गट विकास अधिकारी

श्री.पी.एस.कुलकर्णी, कनिष्ठ सहायक, ए.बा.वि.यं.

श्री.एस.वाय.काळे, विस्तार अधिकारी (पंचायत)

श्री.डी.टी.पाटील, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) (पाणी पुरवठा)

श्री.डी.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जि.प.यवतमाळ

श्री.एस.यु.अंभोरे, उप अभियंता (पाणी पुरवठा)

श्री.डी.टी. भिसे, सगविअ, पंचायत समिती, उमरगा

श्री.अे.टी.गायकवाड, उप अभियंता (सिंचन)

श्री.भास्कर कुलकर्णी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदलापूर

श्री.आर.व्ही.शिरसकर, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)

श्री.अे.बी.चौलवार, गटविकास अधिकारी, जालना

श्री.वि.एम.मिटके, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)

श्रीमती स्नेहा अरुण देव, बा.वि.प्र.अ.तथा अति.गट विकास अधिकारी

श्री.के.पी.कांबळे, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)

श्री.व्ही.आर.हरकळ, गटविकास अधिकारी, मानवत

श्री.पी.बी.काकडे, गटविकास अधिकारी (पैठण)

श्री.डी.झेड.पंचभाई, उपविभागीय अधिकारी, सिल्लोड

श्री.जी.डी.शेख, उप अभियंता

श्री.यु.डी.लिंभारे, सहायक अभियंता, वैजापूर

श्री.अब्दुल शेख, स्था.अ.स., वैजापूर

श्री.एस.एन.औताडे, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.आर.डी.मडके, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.जी.एम.वानखेडे, तत्कालीन उप अभियंता, बांधकामृ

श्री.यु.बी.ओल्हाळ, उपविभागीय अभियंता, कन्नड

श्री.जे.जी.कांबळे, वि.अ.पंचायत समिती, खुलताबाद

श्री.प्र.बा.चव्हाण, शि.अ.प्रा.(सेवानिवृत्त)

श्री.जे.बी.बागूल, शि.अ.प्रा.(सेवानिवृत्त)

श्री.डि.एच.पांडे, पंचायत समिती, कन्नड

श्री.एम.एस.सुरडकर, प्राथमिक आरोग्य केंद्र, वेरुळ

श्री.एस.एम.देवकर, पंचायत समिती, कन्नड

श्री.व्ही.आर.जाधव, मु.अ.जरंडी

श्री.एस.एन.थोरले, क.सहायक, शिक्षण

श्री.बी.डी.मेश्राम, क.समन्वयक

श्री.पी.वाय.दळवी, उप अभ्यिंता, जि.प.सिंचन, वैजापूरृ

श्री.व्ही.व्ही.मामिलवाड, क.लेखाधिकारी, पं.स.सोयगांवृ

श्री.वाय.बी.शिंदे, क.स.लेखाधिकारी, पं.स.गंगापूरृ

श्री.एस.ई,खंडाळे, स.लेखाधिकारी, पं.स. गंगापूर

श्री.डी.एस.निकम, प्र.अ., पं.स.गंगापूर

श्री.एस.के.जोशी, व.सहायक, पं.स.गंगापूर

श्री.पी.जी.कुलकर्णी, तत्कालीन प्र.गट विकास अधिकारी, औरंगाबाद

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील औरंगाबाद जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, औरंगाबाद**

**उपस्थिती**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
५. श्री.उन्मेष पाटील, वि.स.स.
६. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
७. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
८. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
९. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१०. श्री.अमित झनक, वि.स.स.
११. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
१२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
१३. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय**

श्री.न.म. शिंदे, सह सचिव

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री.संतोष कोडे, सहायक आयुक्त

**जिल्हा परिषद, औरंगाबाद**
डॉ.अभिजीत चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.एस.बी.बेदमुथा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.एस.बी.लांगोरे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

श्रीमती छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)

श्री.उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.व्ही.पी.सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

श्री.एस.जी.कदम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)

श्री.डी.ई.चाटे, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)

श्री.रविंद्र चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)

श्री.गजानन रबडे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

श्री.बी.एस.बाविस्कर, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री.पी.डी.सानप, कार्यकारी अभियंता (सिंचन)

श्री.एम.के.सापधरे, कार्यकारी अभियंता (सिंचन) (प्र.)

डॉ.बी.टी.जमादार, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ.एम.एल.साळवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री.एस.ए.कोलते, कृषि विकास अधिकारी

श्री.एस.ए.देशपांडे, जिल्हा कृषी अधिकारी

श्री.समाधान इंगळे, समाजकल्याण अधिकारी (प्र.)

श्री.एम.के.देशमुख, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (प्र.)

श्री.बी.एस.सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

श्री.एन.के.देशमुख, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) (प्र.)

**गट विकास अधिकारी**

श्री.व्ही.एफ.परदेशी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद

श्री.विशाल शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड

श्री.पी.एस.शिर्के, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर

श्री.व्हि.पी.केळकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर

श्री.यु.वाय.सोमवंशी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण

श्री.एस.बी.माने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री

श्रीमती के.एस.सानप, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड

श्री.आर.एस.लाहोटी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद

श्री.के.एस.जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगांव

श्री.एस.एम.डावकरे, उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

श्री.एम.पी.सुरडकर, उप अभियंता (यांत्रिकी)

श्री.पी.ए.तुलंगेकर, सहायक भूवैज्ञानिक

श्री.एस.जी.जैन, कनिष्ठ भुवैज्ञानिक

श्री.आशिष दे.चौधरी, शाखा अभियंता (सिंचन)

श्री.अशोक साळवे, उप विभागीय अधिकारी (बांधकाम)

श्री.ए.कृ.कोथगिरे, वरिष्ठ लेखाधिकारी (वित्त)

श्री.राजेन्द्रकुमार खाजेकर, लेखाधिकारी (वित्त)

श्री.एस.एम.निकाळजे, सहायक लेखाधिकारी (वित्त)

श्री.अनिल क.राठोड, सहायक लेखाधिकारी (कृषी)

श्री.शरद सा.भिंगारे, लेखाधिकारी (वित्त)

श्री.बी.आर.पवार, सहायक लेखाधिकारी (पाणीपुरवठा)

श्री.आर.बी.शिंदे, सहायक लेखाधिकारी (आरोग्य)

श्री.आर.आर.हंपीहोळी, उपअभियंता (बांधकाम)

श्री.एम.जी.पाटील, पशुधन पर्यवेक्षक

श्री.डी.डी.जोशी, सहायक लेखाधिकारी (समाजकल्याण)

श्री.मनोज चौधरी, तत्कालीन गट विकास अधिकारी

श्री.पी.एस.कुलकर्णी, कनिष्ठ सहायक, ए.बा.वि.यं.

श्री.एस.वाय.काळे, विस्तार अधिकारी (पंचायत)

श्री.डी.टी.पाटील, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) (पाणी पुरवठा)

श्री.डी.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जि.प.यवतमाळ

श्री.एस.यु.अंभोरे, उप अभियंता (पाणी पुरवठा)

श्री.डी.टी. भिसे, सगविअ, पंचायत समिती, उमरगा

श्री.ओ.टी.गायकवाड, उप अभियंता (सिंचन)

श्री.भास्कर कुलकर्णी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदलापूर

श्री.आर.व्ही.शिरसकर, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)

श्री.ओ.बी.चौलवार, गटविकास अधिकारी, जालना

श्री.वि.एम.मिटके, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)

श्रीमती स्नेहा अरूण देव, बा.वि.प्र.अ.तथा अति.गट विकास अधिकारी

श्री.के.पी.कांबळे, गटविकास अधिकारी (सेवानिवृत्त)

श्री.व्ही.आर.हरकळ, गटविकास अधिकारी, मानवत

श्री.पी.बी.काकडे, गटविकास अधिकारी (पैठण)

श्री.डी.झेड.पंचभाई, उपविभागीय अधिकारी, सिल्लोड

श्री.जी.डी.शेख, उप अभियंता

श्री.यु.डी.लिंभारे, सहायक अभियंता, वैजापूर

श्री.अब्दुल शेख, स्था.अ.स., वैजापूर

श्री.एस.एन.औताडे, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.आर.डी.मडके, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.जी.एम.वानखेडे, तत्कालीन उप अभियंता, बांधकामृ

श्री.यु.बी.ओल्हाळ, उपविभागीय अभियंता, कन्नड

श्री.जे.जी.कांबळे, वि.अ.पंचायत समिती, खुलताबाद

श्री.प्र.बा.चव्हाण, शि.अ.प्रा.(सेवानिवृत्त)

श्री.जे.बी.बागूल, शि.अ.प्रा.(सेवानिवृत्त)

श्री.डि.एच.पांडे, पंचायत समिती, कन्नड

श्री.एम.एस.सुरडकर, प्राथमिक आरोग्य केंद्र, वेरुळ

श्री.एस.एम.देवकर, पंचायत समिती, कन्नड

श्री.व्ही.आर.जाधव, मु.अ.जरंडी

श्री.एस.एन.थोरले, क.सहायक, शिक्षण

श्री.बी.डी.मेश्राम, क.समन्वयक

श्री.पी.वाय.दळवी, उप अभ्यिंता, जि.प.सिंचन, वैजापूरृ

श्री.व्ही.व्ही.मामिलवाड, क.लेखाधिकारी, पं.स.सोयगांवृ

श्री.वाय.बी.शिंदे, क.स.लेखाधिकारी, पं.स.गंगापूरृ

श्री.एस.ई,खंडाळे, स.लेखाधिकारी, पं.स. गंगापूर

श्री.डी.एस.निकम, प्र.अ., पं.स.गंगापूर

श्री.एस.के.जोशी, व.सहायक, पं.स.गंगापूर

श्री.पी.जी.कुलकर्णी, तत्कालीन प्र.गट विकास अधिकारी, औरंगाबाद

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील औरंगाबाद जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २४ मे, २०१६**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

३. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

४. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

५. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.

६. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

७. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

८. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

९. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

१०. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.

११. श्री.अमित झनक, वि.स.स.

१२. श्री.राहूल मोटे, वि.स.स.

१३. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१४. श्री.दिपक चव्हाण, वि.स.स.

१५. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१६. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बामळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय प्रतिनिधी**

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.सतीश गवई, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग

श्री.संजयकुमार, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग

श्री.नंदकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

श्री.राजेशकुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्री.शाम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग

श्री.प्रभाकर देशमुख, सचिव, जलसंधारण विभाग

श्री.व्ही.आर.नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

श्री.सुधाकर बोबडे, उप सचिव, नगरविकास विभाग

श्री.व्ही.एस.वखारे, उप सचिव, जलसंधारण विभाग

श्री.सुग्रीव धपाटे, उप सचिव, कृषी विभाग

श्री.व्ही.व्ही.गुजर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.ज्ञा.ल.सूळ, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग

डॉ.बी.एन.पाटील, संचालक, पर्यावरण विभाग

**महानगरपालिका, औरंगाबाद**
श्री.ओमप्रकाश बकोरिया, आयुक्त

**जिल्हा परिषद, औरंगाबाद**
डॉ.अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.सुरेश बेदमुथा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.समाधान इंगळे, समाजकल्याण अधिकारी

श्री.आर.एस.मोगल, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री.आनंद गंजेवार, कृषी विकास अधिकारी

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
श्री.वि.मो.मोटघरे, सहसंचालक, म.प्र.नि.मंडळ

श्री.डी.बी.पाटील, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, जलसंधारण, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, संचालक, पर्यावरण विभाग व सहसंचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २५ मे, २०१६**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

उपस्थिती :

१. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

२. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

३. श्री.अनिल बाबर, वि.स.स.

४. श्री.अमित झनक, वि.स.स.

५. श्री.राहूल मोटे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**
श्री.विश्वनाथ गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. व्ही.व्ही. गुजर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, औरंगाबाद**
डॉ.अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.सुरेश बेदमुथा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद व इतर संबंधित अधिकारी यांची उर्वरित साक्ष गणपुर्ती अभावी स्थगित करण्यात आली.

**मंगळवार, दिनांक १ जून, २०१६**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

५. श्री.अनिल बाबर, वि.स.स

६. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

७. श्री.अमित झनक, वि.स.स.

८. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

९. श्री.दिपक चव्हाण, वि.स.स.

१०. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**
श्री.के.एम.विधाते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय प्रतिनिधी**
श्री.व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग
श्री.मुकेश खुल्लर, प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग
श्री. व्यंकटेश भट, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग
श्री.व्ही.व्ही.गुजर, उप सचिव, ग्रामविकास विभाग
श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग
श्री. एस.बी. लांगोरे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं., औरंगाबाद

**जिल्हा परिषद, औरंगाबाद**
डॉ.अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.सुरेश बेदमुथा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, व प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं., औरंगाबाद यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१६**

**स्थळ : विधान भवन, नागपूर**

**उपस्थिती :**

१. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

२. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

३. श्री.अनिल बाबर, वि.स.स.

४. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

५. श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.

६. श्री.अमित झनक, वि.स.स.

७. ** श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

८. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत सहाव्या व सातव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

❖ मा.कार्यकारी समिती प्रमुख प्रकृती अस्वास्थामुळे आजच्या बैठकीस अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे जागी तात्पुरते कार्यकारी समिती प्रमुख म्हणून ** श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी काम पाहिले.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.